भावी हिंदी स्वराज्य

लेखक

कृष्णाजी विनायक वझे, इंजिनियर

किंमत दीड रुपया

भावी हिंदी स्वराज्य

लेखक

कृष्णाजी विनायक वझे

धर्मशिक्षणाचा ओनामा, हिंदी शिल्प शास्त्राचें सार,
व्यापारी शिक्षण, विद्यार्थी धर्म, व हिंदी
शिल्पशास्त्र इत्यादि ग्रंथांचे कर्ते.

" स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे
व तें मी मिळविणारच. "

लो. टिळक

[किं. दीड रुपया

शके १८४६]

प्रकाशक—कृष्णाजी विनायक वझे, इंजिनियर, नाशिक.

मुद्रक—केशव रावजी गोंधळेकर, 'जगद्धितेच्छु प्रेस,'
९०७ शनवार, पुणें शहर.

किंचित् निवेदन

सन १९१६ सालीं 'जर्मन महायुद्धांत पाठवितील त्या रणांगणावर जाऊन सांगतील तें काम करण्यास सिद्ध आहे ' असें मीं सरकारास कळविलें. पण ती गोष्ट सरकारनें मान्य केली नाहीं. तेव्हां आतां लवकरच सरकारी नोकरी सोडून आजपर्यंत जें ज्ञान आपण मिळविलें त्याची सुव्यवस्था लावावी व ग्रंथलेखनास सुरुवात करावी असें मीं ठरविलें. राजकीय संस्थांकडे पाहूं लागून लिहिलेला पहिला निबंध म्हणजे मासिक मनोरंजनांत छापलेला 'एका जलबिंदूचा प्रवास ' हा होय. आपल्या शिक्षणांत धर्माची फार हेळसांड होते व शाळा-कालेजांतून आपल्या धर्मातील आचारविचारांचें रहस्य-स्पष्टीकरण मुळींच करण्यांत येत नाहीं व त्यामुळें विद्यार्थ्यांच्या मनांत आपल्या धर्माबद्दल अनादर उत्पन्न होतो हें पाहून 'धर्मशिक्षणाचा ओनामा ' या नांवाची पुस्तकमाला लिहिण्यास सुरुवात केली. या मालेपैकीं तिसरें पुस्तक-हिंदु धर्मातील सोळा संस्कारांवर-लिहीत असतांना हिंदुधर्म हा मानवांच्या सर्व व्यवहारांचें नियंत्रण करणारा असून सर्व शास्त्रांच्या कळसाच्या जागीं आहे व यामुळें त्याचे आचार त्या त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणें बदलतात ही गोष्ट वर्णाश्रमसंस्था, जातिसंस्था वगैरे बाबींचा विचार करतांना प्रमुखपणें नजरेस आली व त्यावेळीं आपल्या हिंदुस्थानचें पुढें काय व्हावें व होणार हा विचार मनांत येऊन या देशाचें कल्याण व्हावें असें वाटणाऱ्या लोकांनीं काय करावें हें सांगण्यासाठीं आणि धर्मशिक्षणांत ज्या गोष्टींचा समावेश सविस्तर करणें योग्य नाहीं असें दिसलें त्यांचा विस्तार करण्यासाठीं 'भावी हिंदी स्वराज्य ' हें पुस्तक लिहिलें. या देशाची सर्वांगीण उन्नति चालू परिस्थितींत आपणास कशी करतां येईल याचें दिग्दर्शन या पुस्तकांत केलें आहे.

सन १९२३ सालीं सोलापुरास असतां सर विश्वेश्वर अय्या यांचें 'रीकन्स्ट्रक्टिंग इंडिया' या नांवाचें पुस्तक पाहाण्यास मिळालें. यांत सर साहेबांनीं याच दृष्टीनें विचार केला असून त्यांचे व माझे विचार कित्येक ठिकाणीं अगदीं जुळते दिसून मोठें कौतुक वाटलें. त्यांच्या पुस्तकांत लढाई नंतरचे आंकडे व जपानमधील ग्रामसंस्थांची माहिती फार उपयुक्त दिसली व ती आपल्या पुस्तकांत घ्यावी असें वाटलें. त्या गोष्टीस त्यांनीं मोठ्या मेहेरबानीनें व आनंदानें परवानगी दिली याबद्दल त्यांचा मी फार ऋणी आहे.

यानंतर प्राचीन हिंदी राजकीय संस्था, ग्रामपंचायती वगैरे संस्थांची माहिती यांचा समावेश या पुस्तकांत करून तें चालू परिस्थितीपर्यंत आणून ठेवलें आहे. शिल्पाचा अभ्यास करणारा मी माणूस. या राजकीय विषयांचा खास अभ्यास असा केलेला नाहीं. यामुळें माझ्या विवेचनांत अनेक दोष झाले असतील. पण लोकांना एका प्रकारानें व दृष्टीनें विचार करण्यास प्रवृत्त करावें इतक्याच हेतूनें हें पुस्तक लिहिलें आहे; व त्या दृष्टीनें वाचकांनीं याकडे पहावें व चुका दुरुस्त करून घ्याव्या अशी विनंति करून हें निवेदन संपवितों.

नाशिक, मित्ती
आश्विन शु. १० शके १८४६. } कृष्णाजी विनायक वझे.

अनुक्रमणिका

पृष्ठें

१ प्रस्तावना खंड १–८१

उपोद्घात १–२
प्रकरण पहिलें–संघस्थापना ३–२५
प्रकरण दुसरें–हिंदुस्थानचें एकराष्ट्रीकरण २६–४५
प्रकरण तिसरें–प्रारंभीचा खटाटोप ४६–६०
प्रकरण चवथें–इष्ट सुधारणा ६१–८१

२ तयारी खंड ८२–१८४

उपोद्घात ८३–८४
प्रकरण पांचवें–धार्मिक तयारी ८५–१०२
प्रकरण सहावें–शिक्षणविषयक तयारी १०३–१११
प्रकरण सातवें–शेतीविषयक तयारी... ... ... ११२–१२५
प्रकरण आठवें–उद्योगधंद्याची तयारी १२६–१३८
प्रकरण नववें–व्यापार, उदीम यांत सुधारणा ... १३९–१५२
प्रकरण दहावें–साधनांत सुधारणा १५३–१६४
प्रकरण अकरावें–सामाजिक सुधारणा १६५–१८४

३ परंपरा खंड १८५–२५१

उपोद्घात १८५–१८८
प्रकरण बारावें–प्राचीन हिंदी प्रांतिनिधिक संस्था ... १८९–२१४
प्रकरण तेरावें–ग्रामपंचायती २१५–२२४

प्रकरण चौदावें–नगराधिपत्य Municipal Bodies २२५–२३८
प्रकरण पंधरावें–जानपद संस्था २३९–२५१

४ संपादन खंड २५२–३१२

उपोद्घात २५२–२५३
प्रकरण सोळावें–आत्मनिरीक्षण २५४–२६३
प्रकरण सतरावें–स्थानिक स्वराज्य २६४–२७६
प्रकरण अठरावें–प्रांतिक सरकार २७७–२८६
प्रकरण एकोणिसावें–मध्यवर्ति सरकार २८७–२९८
प्रकरण वीसावें–आर्थिक स्वातंत्र्य २९९–३०८
प्रकरण एकवीसावें–उपसंहार ३०९–३१९
विषय सूची ३२१–३२५

भावी हिंदी स्वराज्य

प्रस्तावना खंड

उपोद्घात

आपल्याला स्वराज्य पाहिजे असें आपण सर्व जण म्हणतों. पण तें स्वराज्य म्हणजे काय, त्या स्वराज्यांत कोणती स्थिति असेल व ती स्थिति नीट रहायावला आपणांस काय करावें लागेल याची स्पष्ट कल्पना फारच थोड्यांना असेल. ही स्पष्ट कल्पना लोकांच्या डोळ्यांपुढें ठेवावी म्हणून 'भावी हिंदी स्वराज्य' हें पुस्तक हिंदी जनतेपुढें मांडीत आहों. विषय-विवेचनाची सोय व्हावी म्हणून एकापुढें एक अशा कल्पित पायऱ्या पाडून विवेचन केलें आहे. पण व्यवहारांत या पायऱ्यांचा अनुक्रम राहील अगर राहिला पाहिजे असें नाहीं. व्यवहारांत सगळ्या पायऱ्यांवर एकदमच काम चालणार आहे व एका पायरीवरील कामाचा परिणाम इतर सर्व पायऱ्यांवर व इतर पायऱ्यांवरील कामाचा परिणाम प्रत्येक पायरीवर होणार आहे. हे ठाऊक असून केवळ विवेचनाच्या सोईसाठीं प्रत्येक पायरी स्वतंत्र आहे असें कल्पून विवेचन केलें आहे. अशा काल्पनिक स्वतंत्रपणानें कांहींहि न बिघडतां एकाच ठिकाणीं लक्ष एकाग्र करण्यास सोईचें पडतें. एखाद्या लढाईत ज्याप्रमाणें वर्णन करण्याच्या सोईसाठीं एका एका वीराची त्या दिवशीची हकीगत स्वतंत्रपणें द्यावी लागते व अशा सर्व वीरांच्या हकीगतींचा समुच्चय म्हणजे त्या दिवशींच्या लढाईची हकीगत होय; त्याचप्रमाणें ही विवेचनाची तऱ्हा आहे. एका गोष्टीचें वर्णन अगोदर आलें म्हणून ती जास्त महत्त्वाची अगर अगोदर घडली व एकीचें वर्णन मागून आलें म्हणून ती कमी महत्त्वाची, अगर

मागून घडली असें कोणी समजूं नये. पण त्याच वेळीं अमुक गोष्ट अगोदर यावी व अमुक मागाहून यावी ही गोष्ट केवळ यदृच्छेनेंहि घडलेली असेंहि नाहीं. विचाराला एक प्रकारचा सुसंगतपणा यावा, विचार एका पायरीवरून सहज सोयीनें वर चढत जावें, पुढें जात असतांना विचाराचा ओघ नीट चालावा व विवेचन सुगम व्हावें म्हणून विषयाची ही विशिष्ट मांडणी पत्करली आहे.

कोणत्याहि गोष्टीचें अंतिम ध्येय काय हें जर स्पष्ट डोळ्यापुढें असलें तर अनेक वळणें आलीं तरी ध्येयाकडेच जाण्याचा रोंख आपणांस ठेवतां येतो. रस्त्यानें जातांना आपण आपल्या ठिकाणाकडे कांहीं नीट सरळ रेषेंत जात नाहीं; इतकेंच नव्हें, तर कित्येक वेळां आपण उद्दिष्ट स्थळांच्या अगदीं विरुद्ध दिशेससुद्धां जातों. पण ती विविक्षित अडचण संपल्याबरोबर योग्य दिशेकडे जाण्याची जाणीव ठेवून आपण खबरदारी घेत असतों. राष्ट्राच्या उन्नतीचें काम असेंच आहे. यांत परिस्थितीप्रमाणें अनेक वळणें व केव्हां केव्हां कांहीं भागीं माघारहि घ्यावी लागते. अशा वेळीं सामान्य माणसाची दिशाभूल होऊं नये म्हणून त्याच्यापुढें अंतिम ध्येय स्पष्ट असल्यास बरें पडतें. अंतिम ध्येय अमुक आहे, पण कांहींतरी अडचण आल्यामुळें ही माघार घेतली असली पाहिजे असें जाणून माघार घेतल्यानें तो घाबरत नाहीं. पण कोणत्या अडचणी टाळण्यासाठीं माघार घेतली हें तो पहात असतो. हा विचार करण्याची बुद्धि सामान्य माणसांत उत्पन्न झाली म्हणजे एकंदर समाजाचें त्यापासून हित होतें. यासाठीं या अंतिम ध्येयाचें सामान्य स्वरूप जनतेपुढें मांडणें अवश्यक आहे.

प्रकरण पहिलें

संघस्थापना

हल्लीं हिंदुस्थानांत जर कोणत्या गोष्टीची उणीव असेल तर ती सामुदायिक घटनेची होय. समुदायाचें सामर्थ्य वाटेल त्या वेळीं वाटेल त्या ठिकाणीं एकाग्र करण्याचें काम ज्यामुळें सुलभ होतें अशा व्यवस्थित घटनेला सामुदायिक घटना हें नांव योजिलें आहे. कोणतेंहि मोठें काम करावयाचें म्हटलें म्हणजे त्याला अनेक व्यक्तींची मदत लागते. या घटनेच्या अभावामुळें अनेक व्यक्तींची मदत होण्यास हिंदुस्थानांत अडचण पडते; इतकेंच नव्हे; तर अशी मदत हल्लीं मुळींच होत नाहीं. हिंदुस्थानांत कोणत्याहि कामास लागणारें सर्व प्रकारचें सामर्थ्य मुबलक आहे. पण केवळ घटनेच्या अभावीं ज्या ठिकाणीं जें सामर्थ्य पाहिजे त्या ठिकाणीं नेमकें तेंच कमी पडतें असा अनुभव येतो व त्यामुळें काम पार पडत नाहीं. इतकेंच नव्हे तर अशा अव्यवस्थेमुळें देशाचें अनेक वेळां नुकसान होतें. हल्लींच्या काळीं हातीं घेण्यास योग्य अशीं मोठमोठीं कामें—म्हणजे व्यापार, उद्योग, सराफीसारखे धंदे, कारखाने, गिरण्या, आगगाड्या वगैरे—करण्याच्या कामीं हिंदुस्थान अगदींच नादान आहे. हें घटनासामर्थ्य समाजाच्या राजकीय घटनेप्रमाणेंच असतें. राजाच्या हातीं सर्व सत्ता असणाऱ्या देशांत सर्व कामें एकमुखी असतात. शरीरांत एक आत्मा, घरांत एक गृहपति, समाजांत एक पुढारी, राज्यांत एक राजा व ब्रम्हांडांत एक ईश्वर अशी स्थिति असून सर्वत्र द्वैततत्वज्ञानाचा पगडा असतो. पण अशा देशांत सुद्धां गणसंस्था किंवा एकाखालीं एक असे ठराविक अनुक्रम ठेवून कामाची शिस्तवार व्यवस्था करतां येते. ज्या देशांत राजसत्ता नियंत्रित असते तेथें या सर्व घटना नियंत्रित स्वरूपाच्या असतात. तेथील तत्वज्ञान सुद्धां विशिष्ट अद्वैत स्वरूपाचें असतें. प्रजासत्तात्मक राज्यघटना असली म्हणजे सर्व व्यवस्था प्रजासत्तात्मक होते. अशा देशांत तत्वज्ञानसुद्धां पूर्ण अद्वैती असतें. प्रत्येक इसमाला आपल्या कार्याच्या प्रयत्नाच्या जोरावर प्रत्यक्ष

परमेश्वरापर्यंत वाटेल त्या जागेवर आरूढ होतां येईल, अशी भावना या प्रजासत्तात्मक देशांत असते. आपल्याकडे या तिन्ही तत्वज्ञानाच्या पद्धति रूढ आहेत. यावरून आपला देश या तिन्ही अवस्था पाहिलेला असा आहे, हें उघड दिसते.

आपल्या हिंदुस्थानावर परदेशी लोकांच्या स्वाऱ्या येऊं लागल्यापासून व विशेषतः मुसलमानांच्या स्वाऱ्यांपासून देशांत अनेक शतकें अस्वस्थतेचीं गेलीं व त्यामुळें आमची घटना सर्व बिघडली असें आपले जुने ग्रंथ पाहिले म्हणजे दिसतें. अस्वस्थतेच्या काळांत कोणताहि समाज एकमुखीच होत असतो व त्याप्रमाणें आज हिंदुस्थान फक्त राजसत्तेलाच योग्य राहिला आहे. गेल्या जर्मन महायुद्धांत इंग्लंद, फ्रान्ससारखीं प्रजातंत्र राज्यें देखील बहुतेक एकमुखी झालीं होतीं व असली धुमश्चक्री पांचपन्नास वर्षें चालली तर तीं केवळ राजसत्तेस योग्य होतील हें इतिहास जाणणारांस सांगावयास नको. जगाची परिस्थिति हल्लीं बदलली आहे व या बदललेल्या परिस्थितीला हिंदुस्थानाला तोंड द्यावयाचें आहे. यासाठीं जशास तसें या न्यायानें त्याला आपली सामुदायिक घटना केली पाहिजे. ही घटना आंगीं कशी आणावी, ती अंगवळणीं पाडतांना तिच्यांतील दोष कसे टाळावे, फक्त गुणांचा मात्र संग्रह कसा करावा या गोष्टींचें विवेचन येथें करावयाचे आहे.

ज्यावेळीं राजशासनयंत्राला अमुक घटना देशांत रूढ व्हावी असें वाटतें तेव्हां त्या घटनेला अनुकूल असे कायदे व सवलती तें यंत्र अमलांत आणतें व याप्रमाणें घटनेला राजशासनाचा पाठिंबा मिळाला म्हणजे ती घटना सहज व लवकर अंमलांत येते. जपान देशाचें उदाहरण या नियमाचें प्रत्यंतरच आहे. हिंदुस्थानची स्थिति हल्लीं मोठी चमत्कारिक झाली आहे. इंग्रज सरकारचें राज्य हिंदुस्थानांत स्थापन झालें तेव्हां येथें सर्वत्र राजसत्ता चालू होती व लोकांस ही एकमुखी सत्ता अंगवळणीं पडली होती. यासाठीं त्याच धर्तीवर परिस्थिति व इंग्रज लोकांच्या मनोभावना विचारांत घेऊन हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची घटना करण्यांत आली. स्वतः इंग्रज लोक प्रजातंत्र राज्यपद्धतीचे चहाते व हिंदुस्थानचे लोक राजसत्तेला सरावलेले म्हणून येथें मिश्र पद्धति अंमलांत आणावी लागली.

अशा मिश्र पद्धतीमुळें देश दोन्ही प्रकारच्या संस्थांच्या फायद्याला मुकला. पण दोन्ही प्रकारांतील तोटे मात्र त्याला सहन करावे लागले. याशिवाय राज्यकर्ते हिंदुस्थानांत रहात नाहींत, त्यामुळें दोघांचें सुखदुःख एक नाहीं. दोघांचे हितसंबंध निरनिराळे पडतात व या हितसंबंधांचा विरोध तर या देशाला पावलोपावलीं नडतो. जपान केवळ पन्नास साठ वर्षांत जगांत सर्वमान्य झालें व दीडशें वर्षांत हिंदुस्थान मातीमोल झालें याचें कारण हें होय. राज्यकर्ते परकी असले तरी ते या देशांत रहाते तरी इतकें नुकसान झालें नसतें. पण ते लांब राहून या देशाचें जास्त अकल्याण करतात. जपानांत जपानी लोकांची राजसत्ता असल्यानें प्रत्येक गोष्टींत राजसत्तेचा त्यांना पाठिंबा मिळाला. प्रजातंत्र देशांशीं टक्कर देण्यास प्रजातंत्र राज-पद्धति पाहिजे म्हणतांच ती तेथें अमलांत आली. राज्यघटना अशी बदलतांच सगळ्या समाजाची दुसरी घडी झाली, व सर्व व्यवस्था सुयंत्र चालली. फिलीपाईन बेटांत पूर्वीची व्यवस्था नसल्यामुळें तेथें नवी व्यवस्था स्थापन करणें सोईचें झालें. पण हिंदुस्थानांत एक पद्धत अंमलांत असतांना ती मोडून दुसरी स्थापण्यास परकी सरकारला फार अडचणी येतात. येथील नोकरशाही राजतंत्री छापांत इतके दिवस पडल्यामुळें तिचा पूर्वीचा आकार मोडून नवीन आकार देण्यास जास्त अडथळे येतात. नोकरशाही राजाप्रमाणें सर्वस्वी स्वतंत्र व ती प्रजातंत्र पद्धतीप्रमाणें नेहमीं बदलणारी ! यामुळें एकाहि पद्धतीचा फायदा हिंदुस्थानास मिळाला नाहीं.

हिंदुस्थानासारख्या अफाट देशाची घटना करावयाची म्हणजे ती संयुक्त संस्थानांच्याच पद्धतीवर केली पाहिजे हें उघड आहे. हिंदुस्थानांत अनेक भाषा, अनेक पोषाख, अनेक धर्म, अनेकविध रिवाज व अनेक जाती असल्यामुळें निरनिराळे भाग स्थानिक व्यवहारापुरते स्वतंत्र ठेवून इतर बाबींत त्यांची एकत्र जोडणी केली पाहिजे. ही जोडणी मात्र सर्व भागांचें हितच व्हावें अशी केली पाहिजे. अमेरिकेसारखीं संयुक्त संस्थानें व हिंदुस्थान यांत एक मोठा भेद आहे तो हा कीं, येथें अनेक धर्मांची खिचडी आहे; ती अमेरिकेंत नाहीं व अशी खिचडी होऊं नये म्हणून प्रत्येक जण हल्लीं जपत आहे. हिंदुस्थानाचे अठरा निरनिराळे भाग इसवी सनापूर्वीं पासूनचे आहेत. पण त्यावेळीं परधर्मी लोकांची भेसळ नव्हती

म्हणून जूट लवकर होत असे. हल्लीं दर एक गांवांत व मोहल्यांत हिंदु-मुसलमान यांची खिचडी झाल्यामुळें जुटीचें काम कठीण झालें आहे. ज्या समाजाला आपण समर्थ असावें असें वाटतें त्यानें जगापेक्षां निराळी अशी आपली विशिष्ट घटना करावी लागते. अशा घटनेमुळें त्या समाजाच्या प्रत्येक घटकास आपला एकपणा, सहानुभूति व अभिमान वाटूं लागतो व या आपलेपणासाठीं आपलें सामर्थ्यसर्वस्व खर्च करण्यास तो उद्युक्त होतो. प्रत्येक घटकांत अशी आपलेपणाची जाणीव उत्पन्न झाली म्हणजे तो समाज जिवंत समजावा. या जिवंतपणापासून त्या समाजाला थोरवी व वैभव प्राप्त होतें. यासाठीं हिंदी स्वराज्याचा प्रारंभ निरनिराळे संघ स्थापण्यापासून झाला पाहिजे. देश, प्रांत, जिल्हा, गांव व मोहल्ले इतक्या भागांत हें संघांचें जाळें पसरलें पाहिजे. हे संघ कसे करावे म्हणजे जातवार, कां धर्मवार, कां स्थळवार, कां हितवार करावे याबद्दल मतभेद आहे. पण आम्हांला वाटतें हे संघ धंदेवार करावे. पूर्वीं जातवार आचार, विचार, पोषाक, धंदा अशी स्थिति होती व ती उत्तम होती. जूट होण्याला ही व्यवस्था फार सोईची होती. पण ती बाब आतां विस्कटली आहे; सबब आतां धंदेवार जूट करावी. या लोकांचे हितसंबंध, सुखदुःख साधारणपणें एक येत असल्यामुळें हे संघ सोईचे होतील. एक व्यवसाय करणारांचा एक संघ व या प्रमाणें सर्व देशभर संघ पहिल्यानें स्थापन झाले पाहिजेत.

कोणताहि संघ म्हटला कीं, त्यांत कांहीं माणसें विचार करणारीं, कांहीं माणसें काम करणारीं, कांहीं माणसें मदत करणारीं व इतर ठरल्याप्रमाणें वागणारीं असावी लागतात. संघाला दरमहा थोडें उत्पन्न, एक कचेरी, विविक्षित काम, ते करण्याची ठराविक पद्धति व झालेल्या व करावयाच्या कामाची प्रसिद्धि करण्याचीं साधनें इतकी सामुग्री पाहिजे. संघ स्थापन झाला कीं, त्या भागाची स्थिति व माहिती, इतर भागांशीं त्या भागाची तुलना, परदेशच्या त्या कामाची माहिती व नव्या जुन्या ग्रंथांतून त्या कामासंबंधीं मिळणारी माहितीहि गोळा केली पाहिजे. अशी माहिती गोळा होत चालली म्हणजे आपल्या उणीवा आपणास कळूं लागतात व या उणीवा इतर लोकांनीं कशा भरून काढल्या व त्यात त्यांस काय अनुभव आले हें समजतें. मग ह्या गोष्टी आपणांस कशा साध्य करतां येतील याचा विचार सुरू

होतो. हा विचार करतांना सर्व मंडळीची मदत संघानें घ्यावी. विचार करतांना असें आढळून येते कीं, कांहीं बाबींत सर्व किंवा पुष्कळ मंडळींची एकवाक्यता आहे व इतर कांहीं बाबींत थोडा फार मतभेद आहे. मग ज्या बाबतींत एकवाक्यता आहे त्या बाबींचे ठराव करून एकमतानें अमलबजावणीस सुरवात करावी व ज्यांत थोडा मतभेद आहे त्यांत घरसोड करून तडजोड करतां येईल तर पहावें व इतर बाबी तात्पुरत्या सोडून द्याव्या. अमलबजावणीस सुरवात झाली म्हणजे कित्येक तपशील जितके सोपे वाटले होते तितके नाहींत असें अनुभवास येतें, ज्या गोष्टी लक्षांत आल्या नव्हत्या त्या येतात व या अनुभवानें आपल्या कामांत फेरफार करावे लागतात. याप्रमाणें संघाच्या कामाच्या (१) माहिती गोळा करणें, (२) चर्चा करून निर्णय ठरविणें, (३) ठरलेल्या निर्णयाप्रमाणें वागणें व (४) अनुभवानें निर्णयांत फेरफार करून ते अंमलांत ठेवणें अशा चार पायऱ्या पडतात. या चारी पायऱ्यांवर काम एकसारखें चालू असलें पाहिजे म्हणजे तो संघ कायम झाला.

कोणत्याहि गोष्टीपैकीं अगदीं ठोकळ व सर्वांना सहज पटतील अशा थोड्याच बाबींत एकवाक्यता होणें शक्य असतें. इतर सर्व बाबींत बहु–मतानेंच निर्णय करावा लागतो. हा बहुमताचा निर्णय निमूटपणें मान्य करणें हें प्रत्येक व्यक्तीचें काम असतें. समुदायापासून मिळणारा फायदा पदरांत पडण्याठीं व्यक्तीनें आपलें इतकें स्वातंत्र्य सोडून द्यावें लागतें. विचार करण्याच्या बाबतींत व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य आहे. उच्चाराच्या बाबतींत दुसऱ्याच्या मनाला धक्का न लागेल इतकी खबरदारी घेणें अवश्य असतें व आचारांत प्रत्येकाच्या तसल्या स्वातंत्र्याला धक्का लागणार नाहीं हें पाहून वागावें लागतें. विचारांत फक्त मेंदूच्या सूक्ष्म हालचाली होत असल्यामुळें त्या कामीं विवक्षित प्रकारची शक्ति वापरावी लागते व या शक्तीपासून अपघातहि थोडाच होण्याचा संभव असतो, व म्हणून येथें स्वातंत्र्य जास्त आहे. उच्चारांत छाती, गळा, तोंड, चेहरा वगैरे अवयवांना चालना मिळते व त्या मानानें विचारापेक्षां जास्त शक्तीचा उपयोग करवा लागतो. या जास्त शक्तीचा चुकून दुरुपयोग झाला तर जास्त नुकसान आहे म्हणून येथें स्वातंत्र्य कमी. आचारांत तर

हातापायांसारखे मोठे अवयव व त्यांच्या मदतीस लहान मोठीं यंत्रें वापरावयाचीं असतात. या कामाला जास्त शक्ति लागते व या प्रचंड शक्तीचा जर चुकून दुरुपयोग झाला तर मोठे अनर्थ गुदरतील; म्हणून आचाराला सगळ्यांत स्वातंत्र्य कमी. जितकी जास्त शक्ति वापरावयाची असेल तितकें तिला नियंत्रण जास्त पाहिजे. सायकलचे ब्रेक लहानसे, मोटारीला ब्रेक असून शिवाय शंख व आगगाडीनें परवानगीशिवाय हलावयाचें नाहीं अशी मोठ्या शक्तीला जशी जास्त नियंत्रणें यांत्रिक कामांत असतात तशींच तीं विचार, उच्चार व आचार यांतहि पाहिजेत.

कोणत्याहि संघाच्या कार्यक्रमांत हजारों कामें येतील, पण त्यांपैकीं महत्त्वाचीं व जरूरीचीं कोणतीं हें ठरविण्याचें काम विचारी माणसाचें असतें व यासाठीं संघस्थापनेंत यांना अग्रस्थान मिळून पहिल्यानें कामास सुरुवात करणारीं माणसें हीं असावीं. या विचारी माणसांनीं फार सावधपणा व चातुर्य वापरावें लागतें. कारण विषय अनेक प्रकारचे व गुंतागुंतीचे असतात. त्यांचीं गुंतागुंत सोडवून, एक एक धागा घेऊन, तो आपल्या इष्ट मार्गाकडे जातो अशी खात्री करून घेऊन, मग त्यांतील गुण दोषांची पारख करून, त्यांत सुधारणा करून, त्याचा स्वीकार करावयाचा असतो. यासाठीं ज्यांना गुंतागुंतीच्या प्रश्नांचा विचार करण्याची संवय आहे अशी शास्त्रपारंगतच माणसें या कामाला पाहिजेत. यानीं शास्त्रें, ग्रंथ, स्वदेश, परदेश वगैरे सर्व पाहून त्या बाबीचा निर्णय केला पाहिजे. आपणाला आज येत असलेल्या अडचणी पूर्वीं कोणास कधीं आल्या काय किंवा हल्लीं दुसऱ्या कोठें येत आहेत काय व या अडचणींचें निरसन या लोकांनीं कसें केलें, याबाबद त्यांच्या व आपल्या परिस्थितीमुळें काय फरक पडतो, त्यांना सोई व अडचणी कोणत्या व आपणांस सोई व अडचणी कोणत्या, कोणती चूक झाल्यानें काय झालें व झाली तर काय होईल हें सर्व नीट पाहून यांनीं कामाचा निश्चय केला पाहिजे. लोकांनीं घेतलेला अनुभव जितक्या थोड्या किंमतींत आपणास उपयोगी पडेल तितक्या किंमतीस तो घेऊन वापरला पाहिजे. शहाणा माणूस व वेडा माणूस यांत अंतर पडतें तें येथेंच. वेडा इसम प्रत्येक बाबीचा स्वतः अनुभव घेत असतो, पण शहाणा लोकांच्या अनुभवानें आपण सावधगिरी ठेवीत असतो व

यामुळें शहाण्यास तितकेंच ज्ञान मिळविण्यास वेड्यापेक्षां कमी काळ व कमी खर्च लागतो.

हल्लीं हिंदुस्थानांतील लोकांचें आयुर्मान कमी झालें आहे. पूर्वींच्या शंभर वर्षांपैकीं तें सरासरी पंचवीस वर्षांचें हल्लीं आहे. ज्ञानसंपादनाची शक्तीहि हिंदी लोकांची कमी झाली आहे. पूर्वी ज्या गोष्टी शिकण्यास चार वर्षे पुरत त्याच गोष्टी शिकण्यास हल्लीं आठ वर्षे लागतात. यामुळें पंचवीसावें वर्षीं मरतांना हल्लीं साधारण माणूस पूर्वींच्या बारातेरा वर्षांच्या पोराइतका शहाणा असतो म्हणजे साधारणपणें बहुतेक माणसें नादान अवस्थेंतच हल्लीं मरतात. ही गोष्ट लक्षांत ठेवून विचार करणाऱ्या माणसांनीं कामांची रूपरेषा, पद्धत व आंखणी केली पाहिजे. नाहींतर आईचें आयुष्य पंचवीस वर्षें व तिला गर्भ धारणेस लागणारीं वर्षें वीस व बाळंत होण्यास लागणार वर्षें तीस अशी स्थिति होऊन गर्भारपणाचा व्यर्थ शीण मात्र व्हायचा ! आपली शक्ति व आयुष्य यांच्या आटोक्यांत कार्यक्रम असला पाहिजे इतकेंच बजावून सांगावयाचें आहे.

कोणत्याहि संघाच्या कार्यांत एकसूत्रीपणा व सारखेपणा पाहिजे. प्रत्येक गोष्ट कागदावर मांडलेली असली म्हणजे एका संस्थेच्या अनुभवाचा फायदा दुसऱ्या तसल्या अनेक संस्थांस घेतां येतो. कोठून कोणती माहिती मिळविली, तीपासून कोणत्या तऱ्हेनें कोणते निर्णय काढले, हे निर्णय अमलांत आणतांना काय अडचणी आल्या व त्या अडचणींतून कसे पार पडलों हें तपशीलवार संस्थेच्या कचेरींत मांडलेलें असावें व ही माहिती जरूर तर इतर तसल्या संस्थांस प्रसिद्ध करून पुरवावी. हिंदुस्थानांत हल्लीं अनेक संस्था निघतात व बुडतात; पण या संस्था पहिल्यानें काढल्या कशासाठीं, त्या कोणत्या कारणानें चालेनाशा झाल्या, त्यांत केलेले अंदाज कोठें व किती चुकले ही माहिती उपलब्ध असेल तर इतर लोकांना किती तरी फायदा होईल. आपली चूक प्रांजलपणें कबूल करण्यांतच खरा थोरपणा आहे. चुका झांकून ठेवल्यानें, त्यांवर पांघरूण घातल्यानें त्याच त्याच चुका वारंवार होतात व त्या चुका झाल्या होत्या हें इतरांना वेळेवर कळत नाहीं. अशी माहिती प्रसिद्ध किंवा उपलब्ध होत नसल्यानें संस्था बुडाली म्हणजे तिजविषयीं भलतेच गैरसमज व नाना कंड्या उठतात व इतर

तसल्या संस्था काढणारांची हिंमत खचते. अशा तऱ्हेच्या झालेल्या चुकांची माहिती प्रसिद्ध झाली तर इतर लोक सावध होऊन, नवीन कायदे वगैरे करून या चुका टाळण्याचे उपाय अंमलांत आणण्यास सोईचें होईल. ज्या देशांत अनेक प्रकारच्या अनेक संस्थांना एकदम अनेक वर्षेपर्यंत पुरेल इतकें काम आहे तेथें कांहीं थोड्या संस्था सोडून इतर संस्था निघतात व बुडतात हें पाहून साधारण लोक तर गांगरूनच जातात. हा काय खेळ आहे हें त्यांना आकलनच होत नाहीं. दर आठवड्यास, दरमहा, दरसाल झालेल्या कामाचें सिंहावलोकन व उरलेल्या कामाचा अंदाज प्रसिद्ध होत राहिला पाहिजे, म्हणजे लोकांस काम करण्यास हुरूप असतो. मनुष्य चुकीला पात्र आहे; चुका होतील व त्या झाल्या तर त्या लपवून ठेवूं नये. चूक लपविल्यानें दुसरा इसम तीच चूक करण्याचा संभव रहातो. यासाठीं अमुक चूक झाली म्हणून समजलें कीं, ती जगजाहीर करून टाकावी म्हणजे दुसरे लोक तरी ती चूक करणार नाहींत. व्यवहार हा भवसागर आहे. या समुद्रांतून जात असतांना जर कोणास खडक लागला, वाळूचें बेट लागलें अगर पाण्यांत भोंवरा लागला तर त्यानें ती माहिती सर्व गलबतांस कळवावी म्हणजे इतर त्या वाटेनें जाणारे लोक सावध होतील. इतिहासाचा उपयोग हाच, चरित्रांचा उपयोग हाच, पुराणांचा उपयोग हाच, व दंतकथांचा उपयोग हाच. अनेक चरित्रें वगैरे ग्रंथ जगांत प्रसिद्ध होतात त्यांचा उपयोग हाच. व्यक्तींच्या चरित्रांपेक्षां आतां संस्थांचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं पाहिजेत. बुडालेल्या, नाश पावलेल्या संस्थांचीं चरित्रें तर यशस्वी झालेल्या संस्थांच्या चरित्रांपेक्षां जास्त उपयोगी आहेत. कोणतेंहि काम बरोबर करण्याचा एकच मार्ग असतो व तो सहसा कोणाला सांपडत नसतो. यासाठीं अनेक चुकीचे मार्ग, अनेक मार्ग कीं, ज्या मार्गानें मनुष्य चुकण्याचा संभव आहे हे मार्ग लोकांना जाहीर केले पाहिजेत. असें केलें म्हणजे प्रत्येक इसम या अनेक मार्गांवरून आपण कोठें आहों हें ठरवील व त्यावरून पुढील मार्ग आंखण्यास त्यास सोईचें होईल याप्रमाणें एखाद्या संस्थेची जरी दहापांच वर्षांची माहिती मधून मधून प्रसिद्ध झाली तरी किती तरी उपयोग होईल व मेहनत वांचेल. इंग्रजींत म्हण आहे कीं, Money saved is money gained व ही गोष्ट वेळ,

सामर्थ्य वगैरे सर्व गोष्टींना लागू आहे. यासाठीं आपल्या अनुभवांचा फायदा प्रत्येक संस्थेनें इतरांना दिला पाहिजे व तो आपली खरी हकीकत, चुका कशा झाल्या यांची हकीगत प्रसिद्ध केल्यानें होणार आहे.

संघानें कोणतेंहि काम करावयाचें म्हणजे त्या कामाची प्रसिद्धि करावयाची असते. ही प्रसिद्धि त्या कार्याबद्दल, त्याच्या उपयोगाबद्दल नानाप्रकारची माहिती लोकांच्या कानांवर घालण्यानें होत असते. हा संघ झाल्यानें फायदे कोणते होतील, कोणते तोटे टळतील, कोणत्या उणीवा भरून निघतील, कोणतीं सुखें होतील यांचें वर्णन लोकांच्या कानावर गेलें पाहिजे. अमक्या मुदतींत हें काम झालें पाहिजे असें म्हटलें म्हणजे याला मोहीम म्हणतात. या कामासाठीं साधारणपणें सभा व व्याख्यानें यांचा उपयोग करण्याचा प्रघात आहे. याच्याबरोबरच वर्तमानपत्रांतून चर्चा हेंहि प्रसिद्धि करण्याचें मोठें साधन आहे. या प्रसिद्धि करण्याच्या बाबतींत माणूस उदासीन असूं नये. आपला मित्र व शत्रु हे दोघेहि या कामीं सारखेच उपकारक आहेत. गुण व दोष हे दोन्ही चर्चेचे विषयच असल्यामुळें दोष दाखविणें, गुण दाखविण्याइतकेंच महत्त्वाचें असतें. यासाठीं यापैकीं कोणतीहि बाजू घेऊन ती वाटेल तितकी गहिऱ्या रंगात रंगविली तरी तें दोषास्पद होत नाहीं. कारण कोणत्याहि रीतीनें जनतेचें लक्ष त्या विषयाकडे जावें इतकांच मुख्य मतलब असतो. लक्ष गेलें म्हणजे चांगल्या वाइटाची पारख जनता स्वानुभावावरून आपोआपच करते. यासाठीं संघाच्या कार्यांत वर्तमानपत्रकारांना तीन कामें करतां येतात (१) त्या कार्याची गांवोगांवची बातमी देणें, (२) त्या कार्याबद्दल जाहिराती वगैरे प्रसिद्ध करणें व (३) त्या कार्याच्या गुणदोषाचें विवेचन करणें. पहिल्या सदरांत या प्रकारच्या संघांनीं कोठें काय केलें व काय कधीं करणार ही स्वदेश व परदेशांतील माहिती द्यावयाची असते. संघाचें स्वतःचें वर्तमानपत्र असलें म्हणजे सगळीकडून पत्रें येऊन ही माहिती तेथें गोळा होते. परदेशचीहि असलीच वृत्तपत्रें घेतलीं म्हणजे तिकडील हकीगत कळते व याप्रमाणें इतक्यां संस्थाबद्दल आपलेपणा वाटूं लागतो. याप्रमाणें सगळीकडची माहिती गोळा करून प्रसिद्ध करण्याची पद्धति आंगवळणी पडली म्हणजे कोणतेंहि लहानमोठें काम याच पद्धतीनें सहज होतें. हीच पद्धत प्रजातंत्र राजपद्धति हिंदु-

स्थानांत उत्पन्न करण्यास व हिंदुस्थान देशाची सर्व बाजूनें भरभराट होण्यास उपयोगी पडणार आहे. या पद्धतीचीं मुख्य अंगें म्हणजे सार्वजनिक सभा व पटांगणावरील व्याख्यानें होत. या कामीं वर्तमानपत्रांवर तीन प्रकारची जबाबदारी असते. (१) या संस्थांच्या कामांचे अहवाल प्रसिद्ध करणें, (२) या संस्थांची रचना व घटक व याची माहिती देणें व (३) या संस्थांच्या गुणदोषाचें विवरण करून लोकांचें लक्ष या संस्थांकडे वेधणें. ज्या वेळीं वर्तमानपत्रें पक्षांध झालेलीं नसतात तेव्हां तीं आपलें हें कर्तव्य चांगल्या रीतीनें करून देशाचें कल्याण करतात; कारण या प्रकारानें लोकांचें लक्ष त्या संस्थांकडे लागतें, त्या संस्थांना त्यांचे दोष व उणीवा दिसतात व त्यांना मदत मिळून ते दोष घालविण्यास त्यांस मदत होते. याशिवाय संस्थेच्या प्रसिद्धीकरणाचे मार्ग म्हणजे जाहिराती, मासिक वृत्तें, लहान पुस्तकें, हस्तपत्रकें, भिंती वगैरेवर लावण्याचे जाहिरनामे, वगैरे होत. हिंदुस्थानांत या गोष्टी अद्याप प्रचारांत यावयाच्या आहेत. कारण सामुदायिक घटना असलेल्या सार्वजनिक संस्था हिंदुस्थानांत फार कमी आहेत. हिंदुस्थानांत म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डें आज तीस चाळीस वर्षें तरी आहेत. पण या स्थानिक संस्थांच्या कामांच्या अडचणी, त्यांच्या कामांची चर्चा, त्यांच्या गुणदोषांचें विवेचन वगैरेबद्दल उहापोह करणारें एकसुद्धां वृत्तपत्र नाहीं. प्रत्येक गांवांत व जिल्ह्यांत या संस्थांच्या कामाची रड खाजगी रीतीनें ऐकूं येते पण सार्वजनिक रीतीनें या कामाची चर्चा कोणी करीत नाहीं. या संस्थांच्या कामाची चर्चा करणारी जर एखादी संस्था निघाली तर किती तरी गोष्टींचें ज्ञान जनतेंत पसरेल, नवीन किती तरी अनुभवांची माहिती उपलब्ध होईल, पुढें होणारे किती तरी अनर्थ टळतील. स्थानिक स्वराज्य या नांवाचें एक दैनिक चालवावयाचें म्हटलें तरी चालेल इतकी या बाबीची माहिती जनतेपुढें मांडण्यासारखी आहे. याच बाबींत सिनेमाचाहि उपयोग करतां येण्यासारखा असून स्थानिक स्वराज्यावर एक दोन सुंदर नाटकेंहि करतां येतील. या ठिकाणीं स्थानिक स्वराज्य हें एक उदाहरणादाखल घेतलें आहे. व्यापार, उद्योग, धंदे, शिक्षण, धर्म, इतकेंच नव्हे तर समाईक भांडवलाच्या कंपन्या, भाजीपाल्याची शेती, गवळ्याचा धंदा असल्या फुटकळ विषयापर्यंत या संघांचें कार्यक्षेत्र व काम

करण्याची पद्धति यांचा विस्तार करतां येईल. सर्व वर्तमानपत्रांनीं एका राजकारणालाच स्वतःला वाहून घेण्याऐवजीं असल्या एक एक बाबीचा विचार करणारें एक एक पत्र व त्या पत्राला त्या बाबीची चर्चा करणारे व माहिती पुरविणारे संघ स्थापन झाले तर त्या बाबींची कितीतरी उपयुक्त चर्चा होण्यासारखी आहे. अशा रीतीनें समाजांतील सर्व माणसांना कोणत्या ना कोणत्या तरी उपयुक्त संघांत काम करतां येईल व याप्रमाणें एकदां संघानें कामें करण्याची संवय लागली, गोडी उत्पन्न झाली, कामें करण्याची पद्धत समजली, त्या पद्धतीनें कामें करण्यांत हौस वाटूं लागली म्हणजे हें ज्ञान वाटेल त्या संघशक्तीनें करावयाच्या कामाकडे लावतां येईल. एकदां बॉयलरमध्यें वाफ तयार झाली व त्या वाफेनें चालणारें यंत्र तयार असलें म्हणजे वाटेल तें काम त्या वाफेच्या यंत्रानें जसें करतां येते त्याचप्रमाणें एकदां संघाचे सभासद झाले, त्यांत काम करण्याची पद्धत अंगवळणीं पडली म्हणजे वाटेल तें काम संघशक्तीनें करतां येतें. हीच गोष्ट आपल्याला हिंदुस्थानांत लावावयाची आहे.

भजन, कीर्तन, गायन, फोनो यांचाहि प्रसिद्धि करण्याकडे उपयोग करतां येईल; तसेंच मेळे काढूनहि त्या बाबींत जनतेंत जागृति करतां येईल. याशिवाय या बाबींचें शिक्षण शाळा, विद्यालयें, विद्यापीठें यांत त्या विषयांवरील पुस्तकें व व्याख्यानें यांचे मार्फत शिक्षकांनीं अगर बाहेरच्या इतर लोकांनीं देण्याचा उपक्रम करावा. लहानपणापासून मुलांना त्या त्या विषयाचीं मूलतत्वें शिकविलीं व शास्त्रीय ज्ञान झालें तर त्याचा फारच चांगला उपयोग प्रौढपणीं होणार आहे. याप्रमाणें कोणत्याहि बाबींत संघानें काय केलें, कोठपर्यंत मजल गांठली यावरून त्या संघाचें काम करणाऱ्या लोकांचा उत्साह व कळकळ किती आहे, त्या संघांच्या पुढाऱ्यांची पुढारी होण्याची योग्यता किती आहे याचीहि कसोटीच आहे. अशा तऱ्हेनें सर्व बाजूनें एखाद्या गोष्टीबद्दल उचल करणें यालाच त्या गोष्टीचा व्यावहारिक उपक्रम म्हणावें. वर्षांतून केव्हांतरी एक दिवस त्या विषयाचा विचार करण्याचें प्रदर्शन किंवा हळदकुंकू करणें म्हणजे त्या विषयाचा संघ स्थापणें नव्हे. हें प्रदर्शन म्हणजे संघाची भातुकलीसारखी नक्कल होय. संघ म्हटला कीं त्या संघाच्या कामाला सर्वस्वी वाहून घेतलेलीं चार तरी माणसें हवींत

व त्यांनीं वर दर्शविल्याप्रमाणें कामाचा पद्धतशीर उपक्रम व विस्तार केला पाहिजे. असा विस्तार करण्यासाठीं पैसे हवेत हें खरें. पण आपण निरर्थक चैनीकडे कितीतरी पैसे खर्च करतों त्यांचा ओघ इकडे वळविला पाहिजे. भजीं खाण्यांत, चहा पिण्यांत, सिनेमा पाहण्यांत व नटण्यांत जें सुख वाटतें व मनोरंजन होतें तितकें तरी मनोरंजन होण्याइतकी गोडी संघाच्या कामांत उत्पन्न झाली पाहिजे, म्हणजे हेच पैसे तिकडे खर्च होतील. देशांतील हल्लीं शिक्षित, शहाणे व पुढारी म्हणविणाऱ्या माणसांजवळ पैसे नाहींत असें नाहीं. त्यांनीं मनावर घेतलें तर पुष्कळ गोष्टी करतां येण्यापुरते पैसे त्यांच्याजवळ आहेत व आपल्या देशाचें हित व्हावें म्हणून त्यांनीं आपले पैसे वर लिहिल्याप्रमाणें त्यांच्या आवडीच्या कोणत्या तरी बाबीची सांगोपांग चळवळ करणारा संघ स्थापण्यांत त्यांनीं खर्च केले पाहिजेत. पुढाऱ्यांत ही जागृति उत्पन्न करावी म्हणूनच ही लेखमाला सुरू केली आहे. पूर्वींचे ब्राह्मण गरीब व विरक्त असत, म्हणजे ते आपले पैसे जनतेला ज्ञान देण्यांत खर्च करीत असत. घरें, शेतें, दागदागिने करण्यापेक्षां देशहितासाठीं, कोणत्या तरी आपल्या आवडीच्या एका बाबीसाठीं आपली सर्व मिळकत, आपलें व कुटुंबाचें पोट भरून उरलेली फाजील मिळकत याप्रमाणें खर्च करण्याची बुद्धि पहिल्यानें पुढाऱ्यांत उत्पन्न केली पाहिजे.

आपल्याकडील बहुतेक संघांचें काम पद्धतशीर होत नाहीं. कळकळ असो नसो, पैसे देवो न देवो, कोणातरी निर्गुण माणसाला अध्यक्ष नेमावयाचें, त्याच्या मदतीला एक अल्पगुणी अमात्य द्यावयाचा व त्यांच्या भोंवतीं दहापांच जणांनीं नाचावयाचें, ही हिंदुस्थानांतील साधारण संघाची रचना आहे. मग अशा संघांनीं काम झालें नाहीं तर त्यांत आश्चर्य नसून असले थोतांडी संघसुद्धां कांहींतरी काम करून दाखवूं शकतात हेंच आश्चर्य होय ! " रे खद्योता अतां तू चमक बघ तुझें दैव बा फार मोठें " या अन्योक्तीप्रमाणें काळ्याकुट्ट अंधःकारांत असले संघ करतात तें काम दिसतें म्हणणेंच योग्य होईल. पण या काजव्यापासून उष्णता किंवा शाश्वत उपयोगी असा प्रकाश पडणार नाहीं. पहिली गोष्ट म्हणजे ज्यांना जी हौस असेल त्यांनींच त्या बाबीचा संघ स्थापावा. सभासदांना संघाच्या

कामाचा छंद किंवा नाद लागलेला पाहिजे. सभासद सरकारी नोकर असो, गरीब मजूर असो किंवा अंथरुणावर पडलेला रोगी असो, त्याला जर एखाद्या गोष्टीचा नाद असेल तर तो त्या बाबींत कांहींतरी करून दाखवील. अशी एका नादाचीं चार हौशी माणसें जमलीं म्हणजे त्यांनीं संघ करावा. त्यांत जो अत्यंत छांदिष्ट व हट्टी असेल तो अध्यक्ष व जो जास्त चळवळ किंवा हालचाल करणारा असेल तो अमात्य नेमावा. म्हणजे संघाच्या कामाला नीट सुरवात होईल व वळण लागेल.

हल्लींच्या संघांचा दुसरा दोष म्हटला म्हणजे त्यांच्या सभा नियमितपणें होत नाहींत, वर्गणी नियमितपणें वसूल होत नाहीं वगैरे अनियमितपणा. पहिल्या दोषापेक्षांही हा दोष जास्त भयंकर आहे. कारण हा जास्त पसरलेला आहे. चार छांदिष्ट मिळणें जितकें सोपें आहे तितकें इतर सभासदांचे आंगीं नियमितपणा आणणें नाहीं. नियमित वेळीं, नियमित माणसांनीं, नियमित ठिकाणीं जमणें व नियमित रक्कम न मागतां देणें हे गुण जर आपल्या हिंदी लोकांच्या अंगीं आलें तर निम्में स्वराज्य हस्तगत झालें असें समजावें. हिंदी लोक उत्तम नोकर आहेत. ताबेदार म्हणून ते नियमित आचरण निमूटपणें करतात पण स्वतंत्र म्हटले कीं, त्यांचा नियमितपणा जातो. स्वतःच्या पोट भरण्यापासून तों थेट अत्यंत महत्त्वाच्या कामापर्यंत त्यांचा अनियमितपणा अगदीं निश्चित व नियमित आहे. हा अनियमितपणा घालविण्यासाठीं तरुण मंडळींना लष्करी शिक्षण सक्तीचें पाहिजे. किंवा ताल धरून गाणें व नाचणें शिकलें पाहिजे. अनियमितपणा घातक कसा हें या विषयांतच चांगलें समजतें. या बाबतींत सुधारणा समंजस व थोर माणसांनीं पहिल्यानें केली पाहिजे. थोर माणसांना वेळेचें व नियमितपणाचें महत्त्व समजत असतें व देशहितासाठीं आपण हा मार्ग स्वीकारला पाहिजे ही गोष्ट त्यांना पटवितां येईल. ही गोष्ट पटली कीं, पहिला अमलांत आणावयाचा निर्णय म्हणजे हा. नेमल्या वेळीं, नेमल्या ठिकाणीं, नेमलेल्या मंडळींनीं बिनचूक यायचें हीच गोष्ट पहिल्यानें शिकावयाची व बोलल्याप्रमाणें वागावयाचें यांत संघाची इतिकर्तव्यता. त्याचप्रमाणें नियमित वर्गणी मागण्यास येण्याची अपेक्षा न ठेवतां नेमल्या दिवशीं, नेमल्या माणसाकडे पोंचती करावयाची.

तात्पर्य ज्याला जगांत सभ्यपणाची वर्तणूक म्हणून म्हणतात त्या गोष्टीचें शिक्षण देणारे संघ पहिल्यानें निघून त्याचे पुष्कळ सभासद झाले पाहिजेत. हा नियमितपणा आला म्हणजे अहवाल, हिशोब वगैरे कागद वेळचे वेळीं येतील, जमाखर्चांत सचोटी दृष्टीस पडेल, मंजुरीशिवाय खर्च होणार नाहीं व सर्व अनियमितपणाचे लहान प्रकार आपोआप बंद होतील. ज्यांच्या-मुळें अनेक संघ बुडून हल्लीं देशाचें नांव बद्दू करीत आहेत असे सर्व प्रकार या अनियमितणाच्या पोटीं उत्पन्न होतात. अनियमित माणसाचें सर्वच अनियमित. त्याचें सत्य अनियमित, न्याय अनियामित, प्रेमहि अनियमित. असल्या अनियमित माणसांचे लिहिणें अनियमित, वाचणें अनियामित, गणीत अनियमित, फार काय पण जगणें सुद्धां अनियमित.

हिंदी संघाचा तिसरा दोष म्हणजे ते एकमार्गी किंवा गतानुगतिक होतात. संघ निघून थोडे दिवस झाले नाहींत तोंच त्यांस काय करावें व व काय करूं नयें हें सुचत नाहीं. पायाला बोंचणारा खडा बोंचत नाहींसा झाला कीं, संपला संघाचा रोजगार ! संघाचें ध्येय अत्यंत आकुंचित, आकांक्षा फार थोडी, दृष्टी विलक्षण क्षुद्र अशी स्थिती असते. कामाला अद्याप नीटशी सुरवात झाली नाहीं तोंच स्वार्थ बोकाळून गैरवर्तणुकीला प्रारंभ होतो. नियमांत कोठें फट आहे काय हें पाहून त्या फटीवाटें हातीं लागेल तें घेऊन पळण्याची बुद्धि पुढाऱ्यांना होतें. स्वार्थत्यागाची गोष्टच राहिली पण व्यवस्थित व दूरवर दृष्टि देऊन स्वार्थ साधण्याकडे देखील लक्ष नाहीं ! पावसांत लांकडें भिजलीं म्हणून घराचे कोरडे वासे काढून जाळणारीच मंडळी फार. संघाच्या स्थापकांनीं नेहमीं योग्य मनुष्य सांपड-तांच त्याच्या ताब्यांत नित्यकर्म देऊन आपण पुढच्या पायऱ्या चढण्यास लागलें पाहिजे. ही गोष्ट पुष्कळ स्थापक विसरतात. स्थापकांनीं दूरवर विचार करून, कामाच्या पायऱ्या ठरवून एक पायरी होतांच दुसरी व दुसरी संपतांच तिसरी असल्या अनेक पायऱ्यांकडे लक्षच दिलेलें नसतें. एक पायरी चढतांच ते हुश्श करीत दमून बसतात व संघ झोंपी जातो. याचें कारण पुढाऱ्यांत जोमच कमी. पुढारी छांदिष्ट नेमले तर असें होणार नाहीं. पुढारी म्हटला म्हणजे तो जसजसा उंच चढत जाईल तसतशी त्याची नजर फांकली पाहिजे; त्याऐवजीं हल्लीचे पुढारी वर चढले म्हणजे

त्यांस घेरी येते व त्यामुळें दूरवर पाहण्याच्या ऐवजीं पायाखालीं देखील त्यांना दिसेनासें होतें. संघांत एकमेकांत दळणवळण ठेवून पाणी नेहमीं खेळतें ठेवावें, अधिकारी नेहमीं बदलून सर्वांना त्या कामाच्या तपशिलाची माहिती होईल असें करावें, नवीन नवीन विचार, नवे नवे मार्ग, नव्या नव्या रिती प्रचारांत आणून कामाला नवीनपणा आणीत जावा. प्रत्येक सभासदाला त्याच्या योग्यतेनुरूप संघांत कांहीं तरी काम नेमून द्यावें व त्याचें काम त्यानें बरोबर न केलें तर संघाचें काम अडून पडेल अशी जाणीव त्याला करून द्यावी म्हणजे प्रत्येक सभासदाला एक प्रकारचें महत्त्व येतें. अमका आला नाहीं तर न येवो अशी बुद्धि उत्पन्न होऊं देऊं नये. प्रत्येकाला संघाच्या कामाची गोडी उत्पन्न झाली पाहिजे अशी व्यवस्था संघांत करावी. अशा रीतीनें प्रत्येक सभासदाला संघाबद्दल अभिमान, संघाच्या कामांत भाग, त्या कामाची हौस व गोडी उत्पन्न झाली म्हणजे संघाला वजन येतें. शरीरांतील जसें कोणत्याहि क्षुद्र अवयवावांचून नडतें व चालत नाहीं त्याप्रमाणें संघाचें प्रत्येक सभासदावांचून नडावें व चालूं नये. असें झालें म्हणजेच प्रत्येक सभासद नियमित होतो. अमका सभासद सभेस आला नाहीं असें दिसलें कीं, सर्व सभासदांनीं त्याच्या घरी जावें, कां आला नाहीं म्हणून चौकशी करावी, बैठकींत काय काम केलें तें सांगावें. इतकें झाल्यावर दुसऱ्या खेपेस तो सभासद न कळवितां गैरहजर राहील असें होणार नाहीं व याप्रमाणें त्याला नियमितपणाचें शिक्षण मिळेल. संघांत आपल्यावांचून अडतें हें समजेल व संघाच्या कामांत तो जास्त लक्ष घालील.

संघाचे सर्व सभासद याप्रमाणें संघाच्या कामांत लक्ष घालूं लागले म्हणजे संघाच्या कामाकडे लोकांचें व सरकारचेंहि लक्ष लागेल. संघाच्या सभासदांची संख्या वाढेल व त्याप्रमाणें त्याच्या म्हणण्याचें वजन पडत जाईल. वजन पडूं लागलें म्हणजे त्याची उपयुक्तता दृष्टोत्पत्तीस येईल. संघाचा उपयोग दिसला कीं, लोक संघांत जास्त सामील होतील, कामांत लक्ष घालतील व याप्रमाणें संघाचे महत्व व कार्यक्षेत्र दिवसेंदिवस वाढतच जाईल.

तूर्त पहिली गोष्ट म्हणजे पुढारी लोकांनीं जनतेला विचार करण्यास प्रवृत्त करावें व नियमितपणें वागण्याची संवय लावावी. आपल्यांत अमुक उणीवा अगर दोष आहेत हीच जाणीव जनतेंत नाहीं. ही जाणीव झाली म्हणजे त्या उणीवा आपणच आपल्या संघसामर्थ्यानें भरून काढाव्या व स्वराज्य मिळवीपर्यंत सरकारची जशी सर्व खात्यांची रचना आहे त्या रचनेला अनुसरून प्रत्येक खात्याबद्दल विचार करणारे संघ वर लिहिल्याप्रमाणें स्थापन झाले पाहिजेत. स्वराज्यांत ज्याप्रमाणें राजसत्तेंत काम करणारीं कांहीं माणसें व राजसत्तेबाहेर तेंच काम करणारीं दुसरीं माणसें असे पक्ष पाहिजेत व या पक्षांत नेहमीं अदलाबदल होणार त्याच धर्तीवर एकाच बाबीचा विचार करणारे सरकारी अधिकारी व स्वतंत्र लोक असे दोन पक्ष पाहिजेत. हल्लीं सरकारी तज्ज्ञ एकजुटीनें काम करणारे असून जनता मात्र अज्ञानी व फूट पडलेली अशी आहे. ही स्थिति बदलून जनतेंतहि प्रत्येक बाबीचे खातेवार संघ, त्या संघाची घटना व नेहमीं टापटिपीनें काम करण्याची संवय पुढाऱ्यांनीं लावली पाहिजे. स्वराज्यांत सर्व कामें फुकट करणारीं माणसें लागणार व तीं आपण आतांपासून तयार करण्याच्या उद्योगाला लागलें पाहिजे. प्रत्येक गांवांतील चार पुढाऱ्यांना एकेका बाबतींत स्वतंत्रपणें दोन वर्षें काम करूं देऊन त्या वर्षांत त्यांनीं काय काम केलें याचा आढावा घ्यावा. मग दुसरे चार इसमांकडे दोन वर्षें तेंच काम द्यावें व एका विवक्षित दिशेनें काम चालू ठेवावें. सर्व हिंदुस्थानच्या घटनेंत (१) हिंदुस्थान, (२) प्रांत, (३) जिल्हे, (४) तालुके, (५) शहरें, (६) गांवें व (७) खेडीं इतक्या प्रकारचे प्रत्येक बाबींचे संघ पाहिजेत. त्याचप्रमाणें या संघांचे राजकीय, सांपत्तिक व सामाजिक असे तीन प्रकार पाहिजेत. राजकीय बाबींचा विचार करणारी राष्ट्रीयसभा व तिच्या शाखा वगैरे घटना तयार आहे. सांपत्तिक बाबींचा विचार करणारी व सामाजिक बाबींचा विचार करणारी अशा दोन संस्था औद्योगिक व सामाजिक परिषद नांवाच्या आस्तित्वांत आहेत. पण त्यांच्या शाखा पोटशाखा व घटना खेड्यापाड्यापर्यंत गेलेल्या नाहींत. त्या स्थापन करून त्यांचें काम व्यवस्थित होईल असें करावयास पाहिजे. या बाबींचीं वर्तमानपत्रेंहि निघालीं पाहिजेत व त्यांत याच बाबींचा वर्षभर खल

झाला पाहिजे. या तिन्ही संस्थांना वरचेवर चालन देऊन कामाची दिशा आंखून देण्यासाठीं प्रत्येक प्रांतांत एक एक सुधारणामंडळ पाहिजे. या सुधारणामंडळाचें काम म्हणजे या तिन्ही संस्थांचे कामाकडे लक्ष ठेवून मागें किती काम झालें अद्याप किती काम होणें आहे व तें कोणच्या दिशेनें झालें पाहिजे याचा नेहमीं विचार करून आढावा घेणें. या मंडळाचें एक त्रैमासिक प्रसिद्ध झालें पाहिजे. त्यांत नेहमीं ध्येय व त्याचे मार्ग यांचाच विचार व्हावा. या मंडळानें ज्या ठिकाणीं जी उणीव दिसेल ती भरून काढण्यासाठीं योग्य ती तजवीज केली पाहिजे. नुसत्या टीका करणें, दोष काढणें यासाठीं हें मंडळ नसून दोषांची दुरुस्ती करण्यासाठीं हें पाहिजे. लोकमान्यांप्रमाणें अत्यंत थोर अशा शेलक्या मंडळींचें हें मंडळ पाहिजे. राजकीय, सामाजिक व औद्योगिक बाबींचें काम करणारे पुढारी वगैरे निरनिराळे असावे. एकच पुढारी सर्व बाबींत किंवा एकापेक्षां अधीक बाबींत असूं नये. अनेक बाबींत पुढारी होण्यास योग्य अशीं माणसें सांपडतील तीं सुधारणामंडळांत दाखल करावीं. हें सुधारणामंडळ सर्व पक्षांपासून अलिप्त पाहिजे. त्यानें फक्त हिंदी राष्ट्र या दृष्टीनें सर्व कामें पहावयाचीं आहेत. पक्षभेदानें काम करण्यासाठीं संघ आहेतच. एकाद्या सुधारणामंडळाच्या सभासदाला पक्षभेद आवडला तर त्यानें त्या मंडळांतून राजीनामा देऊन आपल्या पक्षाचा संघ स्थापावा. तात्पर्य, सत्रांत ज्याप्रमाणे अध्वर्यु, होता, उद्गाता व ब्रम्हा असे चार प्रमुख ऋत्विज असतात त्याप्रमाणें या स्वराज्यघटनेंत तत्सदृश औद्योगिक, राजकीय, सामाजिक व सुधारणा हीं मंडळें असून त्याचप्रमाणें यांनीं कामें करावयाचीं आहेत.

वर सांगितलेल्या सर्व संस्थांची साधारण कार्यक्रमाची दिशा खालीं दिली आहे.

१ आपलें ध्येय स्पष्ट नजरेपुढें रहावें म्हणून पूर्ण ध्येयापर्यंतच्या सर्व अवस्थांचा व त्यांच्या कामांचा एक नकाशा किंवा तक्ता तयार करणें. या तक्त्यांत आजच्या स्थितीपासून शेवटच्या स्थितीला प्रत्येक बाब कशी जाऊन पोंचेल याचें स्पष्ट चित्र रेखाटलेलें असावें.

२ कोणत्याहि काळीं अत्यंत जरूर व महत्त्वाचे प्रश्न व त्यांचा निकाल करण्याची मांडणी तयार करावी.

३ ही मांडणी तयार करण्यासाठीं लागणारी माहिती गोळा करणें व तिचा अभ्यास करणें यासाठीं निवडक मंडळी शोधून काढून कामास लावावी.

४ या निवडक मंडळींनीं गोळा केलेल्या माहितीचें सार व अखेर ठरविलेला निर्णय दरसाल अगर सहामाहीस प्रसिद्ध करावे.

५ सुधारणामंडळानें वेळोवेळीं लोकांनीं कसें वागावें व काय करावें याबद्दल आपल्या आज्ञा प्रसिद्ध कराव्या.

६ दर एक भागांत ठरलेले निर्णय अमलांत आणण्यासाठीं व लागणारी माहिती गोळा करण्यासाठीं संघांची स्थापना करावी.

प्रत्येक भागांत दोन प्रकारच्या माणसांची जरूर आहे. असलीं माणसें हुडकून काढून त्यांची नोंद ठेवली पाहिजे व त्यांवर नेहमीं लक्ष ठेवलें पाहिजे.

(१) पुढारी होण्यालायक माणसें व त्यांच्या आवडीचा विषय. हीं कर्तव्यदक्ष असून अनेक संस्थांचें सहकार्य कसें करावें हें जाणणारीं हवी.

(२) काम करणारीं माणसें. हीं ठरवून दिलेल्या मार्गानें ठरीव काम नीट कळकळीनें करतील अशीं पाहिजेत.

ज्या ज्या भागांत ज्या ज्या विषयासंबंधीं कामें करण्यास माणसें मिळतील त्या त्या भागांत त्या त्या विषयाचे काम करणारे संघ स्थापून कामास सुरवात करावी. मग योग्य काळीं या संघांचें एकीकरण करतां येईल. पुण्यासारख्या शहरांत तिन्ही प्रकारच्या बाबींचा विचार व कामें करणाऱ्या अनेक संस्था निघतील, तर नाशकासारख्या ठिकाणीं एकच संस्था निघेल व कित्येक खेडेगांवांत तूर्त एकहि संस्था निघण्यापुरतीं माणसें मिळणार नाहींत. या संघांत पुष्कळ माणसें मिळालीं पाहिजेत असेंहि नाहीं. जीं माणसें मिळतील तीं मात्र कळकळीचीं, हौसेनें काम करणारीं पाहिजेत व त्यांनीं नियमितपणें सारखें काम करीत राहिलें पाहिजे. कोणत्याहि प्रदेशानें कोणाकरतां वाट पाहूं नये. दोन माणसें एकमताचीं अगर व्यवसायांची झालीं कीं, संघास सुरुवात झाली. त्यांनीं त्या बाबतींत त्या प्रदेशाची पहाणी करावी, त्या बाबीची माहिती गोळा करावी व विचार, निर्णय व आचार या पायऱ्यांनीं

वागणुकीस सुरुवात करावी. मग कालांतरानें असल्या संघांचें एकीकरण (निदान मेळ) घालतां येईल. पहिल्यानें विचार करण्यास व माहिती मिळविण्यास सुरुवात होऊन ते विचार कागदावर पडले पाहिजेत म्हणजे ते जमीनींत पडलेल्या बियांप्रमाणें योग्य परिस्थिति येतांच उगवतील. पृथ्वीवर उगवलेल्या गवताचें उदाहरण आपण गिरविण्यालायक आहे. गवत उगवतें, त्याला बीं येतें, मग तें मरतें. त्याचा उपयोग कोणी करो, न करो, इतकेंच नव्हे तर उपयोग काय असाहि तें विचार करीत नाहीं. मात्र त्याला बीं येऊन तें मेलें पाहिजे. हल्लीं आपल्या देशांत संघ-संस्थांची बी-बूड झाली आहे. ती स्थिति मोडली पाहिजे. वाटेल तें कां काम होईना, एकमेकांच्या नाशासाठीं, एकमेकांच्या विरुद्ध काम करणारे जरी संघ झाले तरी हरकत नाहीं. पण ते विचारपूर्वक व शिस्तीनें काम करूं लागले पाहिजेत. अगदीं एकमेकांविरुद्ध काम करणाऱ्या संघांचेंहि कालांतरानें तडजोडीनें, ज्ञान वाढल्यामुळें संयोगीकरण करतां येईल. नियमितपणें व संघानें कामें करण्याची पहिल्यानें संवय लागली पाहिजे. विचार करण्याची संवय लागली पाहिजे. मग या संवयीपासून वाटेल तें काम करून घेतां येईल.

स्वार्थत्यागपूर्वक फुकट कामें करणारीं फार माणसें केव्हांहि मिळणें शक्य नाहीं हें जाणूनच चार किंवा दोन माणसें कामाला पुरेत असें वर म्हटलें आहे. यापेक्षां जास्त माणसें मिळण्यासारखीं असतील तेथें दोन दोन माणसांनीं एक एक साल याप्रमाणें आळीपाळीनें काम करावें. विचार मात्र प्रत्येकानें व सगळ्यांनीं करावा, माहिती गोळा करणें ती ज्याची त्यानें प्रत्येकानें मिळवावी व ती कामें करणाऱ्या माणसांकडे द्यावी. अशी जी माहिती गोळा होईल तिचा काम करणाऱ्यांनीं योग्य विचार करून ती नीट व्यवस्थित लावावी. पुढारी असे निवडावे कीं, त्यांवर सर्व प्रकारच्या माणसांचा विश्वास असावा. त्यांनीं कोणत्याहि एका पक्षाकडे ओढा ठेवूं नये. आलेल्या माहितीचा योग्य विचार करून निर्णय ठरविणें व त्याप्रमाणे वागण्यास सुरवात करणें व करविणें हीं पुढाऱ्यांचीं मुख्य कामें आहेत. केवढाहि मोठा पुढारी असला तरी त्याला आपला वेळ सर्वस्वीं एक वर्षभर तरी त्या कामाकडे लावतां येत नसेल तोंवर त्यानें काम करणारा इसम होऊं नये. जरूर तर काम करणारे इसम

पगारी ठेवावे व त्यांस मोठ्या लोकांनीं पगार द्यावा. आपण आपला व्यवसाय करून जो पैसा मिळवितो त्याचा अंश याप्रमाणें काम करणाऱ्या माणसास दिला म्हणजे आपण अंशतः काम केल्यासारखेंच आहे. स्वतःची सर दुसऱ्याला येणार नाहीं हें खरें. पण कामाकडे खर्च करण्यास वेळ नसतांना काम केल्याची बतावणी करण्यापेक्षां हें ब्राह्मणद्वारा केलेलें काम बरें. सगळा दिवस तो एक माणूस त्या कामांत खपत राहिल्यानें त्याला दरमहा कांहीं तरी काम दाखवितां येतें. शहरांत बारा प्रमुख वकील व डाक्तर वगैरे असले तर त्यांपैकीं एक एकाने एक एक महिन्याचा पगार दिला तर संस्थेचें काम सारखें बारा महिने ब्राह्मणद्वारा होईल व एक काम करणारा नोकर कामांत वाकब व तयार झाला हा सुद्धां कांहीं लहान सहान फायदा नाहीं.

अशा रीतीनें देशाच्या कामांत सर्वस्वीं गुंतलेलीं कांहीं तरी स्वतंत्र व खाजगी माणसें निर्माण होतील. देशाच्या कल्याणाचा विचार सारखा त्या मार्गांत चालू राहील. सार्वजनिक सर्व बाबींवर नजर राहील व त्यांचा अभ्यास चालेल. जनतेपुढें वारंवार त्याच त्याच गोष्टी आल्यानें त्या गोष्टींबद्दल जनतेंत जिज्ञासा उत्पन्न होईल. पहिल्यानें सहज करमणुकीखातर, मग कौतुक म्हणून येतां येतां जनतेवर परिणाम होऊन तींत त्या बाबींत जागृति उत्पन्न होईल. जागृति झाली म्हणजे तिकडे तिचें लक्ष जाऊन त्या कार्यासाठीं लागणारी शक्ति तिच्या ठिकाणीं निर्माण होईल. याप्रमाणें पायरीपायरीनें कामांत यश येईल. नुसतें स्वस्थ पडून राहण्याचा हा काळ नाहीं. ज्याला त्याला कांहीं तरी करावें असें वाटूं लागलें पाहिजे. ज्याला जें करतां येणें शक्य तेंच त्यानें करावें. प्रत्येक घरांत, प्रत्येक दुकानांत, प्रत्येक कारखान्यांत, प्रत्येक कचेरींत आपल्याला जास्त चांगलें काम कसें करतां येईल व असें होण्यासाठीं काय करावें असा विचार करण्याची संवय पहिल्यानें उत्पन्न झाली पाहिजे. एकांतांत आत्मनिरीक्षण म्हणून सर्व शास्त्रकारांनीं व संतांनीं ज्याची स्तुति केली आहे तें म्हणजे हा विचार करणेंच होय.

किमिदं, कथमिदं जातं, को वा कर्तास्य विद्यते ॥
उपादानं किमस्तीति विचारः सोयमीदृशः ॥

ही विचाराची व्याख्या देशोन्नतीच्या विचारांनाहि लागू आहे. सर्व विचारांची हीच परंपरा आहे. हें काय आहे, असें कसें झालें, आतां कसें व्हावयाला पाहिजे व तें कसें होईल या सर्व विचारांच्या चार पायऱ्या आहेत. ही विचारांची चळवळ पहिल्यानें सुरू केली पाहिजे व ती नियमितपणें चालली पाहिजे.

वर केलेल्या विवेचनाला अनुसरून एका शहरांत खालीं दिल्याप्रमाणें कामें करतां येतील. संघाच्या पोटशाखा मंडळें व मंडळांच्या पोटशाखा (क्लब) पथकें व त्यांच्या पोटशाखा अड्डे अगर मेळे होत.

संघ—मतदारसंघ, व्यापारीसंघ, शिक्षणसंघ, व्यायामसंघ, विद्यार्थीसंघ, धार्मिकसंघ, करमणूकसंघ, सरकारी नोकरसंघ, कंपनीचे भागीदारसंघ, स्वयंसेवकसंघ वगैरे.

मतदारसंघ—आरोग्यमंडळ, पाणीपुरवठामंडळ, सफाईमंडळ, दळणवळणमंडळ, बाजारमंडळ, नगररचनामंडळ, शिक्षणमंडळ, सुधारणामंडळ.

व्यापारीसंघ—कापडमंडळ, सोनारमंडळ, सुतारमंडळ, सराफमंडळ, इत्यादि.

शिक्षणसंघ—शिक्षकमंडळ, वाचनमंडळ, पुस्तकसंग्रहमंडळ, प्रदर्शनमंडळ, वक्तृत्वमंडळ, गायनमंडळ, प्रचारमंडळ वगैरे.

व्यायामसंघ—देशी खेळमंडळ, विदेशी खेळमंडळ, नांवमंडळ, समाजसेवामंडळ, स्वारमंडळ, कवाईतमंडळ वगैरे.

विद्यार्थीसंघ—मधुकरीमंडळ, साधनमंडळ, स्वयंसेवकमंडळ, खेळमंडळ, पुस्तकमंडळ, आरोग्यमंडळ.

धार्मिक संघ—वेदपाठमंडळ, पुराणिकमंडळ, हरिदासमंडळ, भजनमंडळ, मौलवीमंडळ, पारशीमंडळ, अहिंसामंडळ, गोरक्षणमंडळ, दानधर्ममंडळ, औषधोपचारमंडळ, अनाथसंगोपनमंडळ.

करमणूकसंघ—पानसुपारीमंडळ, धूम्रपानमंडळ, दारूमंडळ, नाटकमंडळ, बैठे खेळमंडळ, देशी खेळमंडळ वगैरे.

सरकारी नोकरसंघ—मुलकीनोकर, न्यायनोकर, जंगलनोकर, शाळा-नोकर, प. व. डि. नोकर, टपाल व तार, शिक्षक वगैरे.

देशी खेळमंडळ—नमस्कारक्लब, तालीमक्लब, लेजीमक्लब, उड्याक्लब, आट्यापाट्याक्लब, खोखोक्लब, कुस्त्याक्लब, दौडक्लब वगैरे.

विदेशी खेळमंडळ—क्रिकेटक्लब टेनिसक्लब, फुटबॉलक्लब, बास्केटबाल-क्लब, फेलोक्लब, गोल्फक्लब, रेसक्लब वैगेर.

नांवमंडळ—बोटक्लब, पोहण्याचा क्लब, बुडी मारण्याचा क्लब वगैरे.

समाजसेवामंडळ—बालसंस्था, सूतिकाक्लब, औषधालय, वाचनक्लब, हातकामक्लब, धंदा लावणारा क्लब, यात्राक्लब वगैरे.

नमस्कार क्लब—राममंदिर आखाडा, गायनशाळा आखाडा, कृष्ण-गल्ली आखाडा वगैरे.

तालीम क्लब—भोंसल्यांचा आखाडा, व्यायामशाळा आखाडा, वगैरे.

याप्रमाणें कामाची दिशा दाखविली आहे, त्यावरून काय करावें याची जाणीव होईल. मात्र या सर्व संस्थांत कांहीं तरी त्या बाबींत सुधारणा व्हावी म्हणून माहिती गोळा करणें, विचार करणें, निर्णय ठरविणें व आचरण करणें या गोष्टी होऊन त्यांत किती काम केलें हें नियमितपणें प्रसिद्ध झालें पाहिजे. आपल्या कार्याचे शहरांत आखाडे कोठें आहेत, त्यांचे सभासद कोण व किती, ते काय काम व कसें करतात या बाबदची माहिती क्लबाला, क्लबांची माहिती संघाला, संघांची माहिती समाजाला व व समाजाची माहिती सभेला याप्रमाणें एकीकरण व व्यवस्थित मांडणी पाहिजे. राष्ट्रीय सभा, प्रांतिक समाज, स्थानीक संघ, संघांत मंडळ, मंडळांत पथकें याप्रमाणें सगळ्या देशाचे खेडेगांव किंवा आळीपर्यंत घटक बनविण्याची योजना पाहिजे. ही आजच सिद्ध होईल किंवा व्हावी असें नसून या घटनेचें अंतिम ध्येय हें असलें पाहिजे इतकीच गोष्ट येथें सांगावयाची आहे.

तात्पर्य, कोणतेंहि काम संघटित पद्धतीनें करण्याची लोकांना संवय लागावी व त्या दिशेनें प्रयत्नाला हळूहळू सुरुवात होऊन सर्व देश एक-

जात संघटनाच्या जाळ्यांत गुरफटलेला असावा. एकमेकांच्या अनुभवाचा फायदा एकमेकांस मिळेल, झालेल्याच चुका फिरून होणार नाहींत, दिवसें-दिवस देशाचें पाऊल पुढेंच पडत जाईल, जें कार्य होईल तें शिस्तवार व पद्धतशीर होईल अशी व्यवस्था करावयाला आपण लागलें पाहिजे. या प्रकारच्या संस्था हल्लीं अस्तित्वांत आहेत, नवीन निघतहि आहेत पण त्यांचें काम पद्धतशीर, सुव्यवस्थित व नियमितपणें होत नाहीं व होत असेल तर तें प्रसिद्ध होऊन जनतेपुढें येत नाहीं. कित्येक वेळां कोठें काय चाललें आहे याचीच लोकांना दाद नाहीं. तर तसें न होतां एका प्रकारच्या चळवळीचें एकीकरण होऊन तिला संघटित, नियमबद्ध व व्यवस्थित स्वरूप आलें पाहिजे. इतकीच गोष्ट येथें विशेष स्पष्ट करावयाची आहे.

प्रकरण दुसरें

हिंदुस्थानचें एकराष्ट्रीकरण

आज हिंदुस्थानांत आपल्यापुढें जे प्रश्न आहेत ते असे आहेत:—

(१) इतर देशांतील लोकांनीं जे अनुभव घेतले त्याचा फायदा घेऊन तुम्ही शहाणे व सशक्त होणार कां दिवसेंदिवस गरीब व अशक्त होणार?

(२) आपण विद्वान् होणार कां असेंच अज्ञान राहणार?

(३) आपण जगांत मिसळून त्यांची बरोबरी करणार कां कोंपऱ्यांत स्वस्थ बसून राहणार?

(४) आपणांस फाटाफूट प्रिय आहे कां जूट प्रिय आहे?

(५) आपण नेभळे व भित्रे राहणार कां साहसी व शूर होणार?

(६) आपण शेतीवरच बसणार कां उद्योगधंदेहि करणार?

(७) आपण दरिद्री, तुच्छ व तुडविलेले राहणार कां श्रीमंत, सन्मान्य व दरारा वाढलेले असे होणार?

यापैकीं आपण जे ठरवूं ते आपणांस प्रयत्नानें होतां येईल; मात्र नुसतीं मनोराज्यें न करितां आपण प्रयत्न व उद्योग केला पाहिजे.

उद्यमेन हि सिध्यंति कार्याणि न मनोरथैः ॥
नहि सुप्तस्य सिंहस्य प्रविशंति मुखे मृगाः ॥ सुभाषित.

राष्ट्रं स्वतःच्या उद्योगानें थोरपणास चढत असतात. कोणतेंहि राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रास वर काढूं शकणार नाहीं, पण बुडवूं शकेल. असें सांगतात कीं, राष्ट्रास थोरपणास चढविण्यासाठीं कायदेपंडित, समाजशास्त्रज्ञ व शिक्षक या तिघांनीं जुटीनें प्रयत्न केले पाहिजेत, म्हणजे यश हटकून येतें. हिंदुस्थानानें याप्रमाणें केलें तर त्यास यश खात्रीनें येईल असें वाटतें. लाइड जार्ज यांनीं नुकतेंच असें सांगितलें कीं, इंग्लंडदेश एक पंचमांश शेतीवर व चारपंचमांश व्यापारधंद्यावर अवलंबून आहे. हा देश

आपल्या स्वतःच्या पोटापुरतें देखील अन्न पैदा करित नाहीं; पण व्यापार-धंद्याच्या जोरावर सर्व जगांतील धान्य आपल्याकडे ओढून घेतो व ही पद्धति त्याला सोईची झाली आहे. असें करण्यांत एकप्रकारें धोका आहे ही गोष्ट खरी. महायुद्धासारख्या प्रसंगीं बाहेरचें धान्य येणें बंद होईल व उपाशी मरावें लागेल असा धोका या कामीं आहे, पण हे लोक हें संकट धीटपणें सोसण्यास कबूल आहेत; कारण हाच मार्ग त्यांच्या मतें या परिस्थितींत त्यांस श्रेयस्कर आहे.

जपाननेंहि या बाबतींत इंग्लंडचाच कित्ता गिरविला आहे. पण कानडा व संयुक्त संस्थानें यांचा विस्तार इतका मोठा आहे कीं, त्यांना अन्नासाठीं दुसऱ्या देशांच्या तोंडाकडे पाहण्याची जरूर नाहीं; उलट हे देश इतर देशांतील लोकांनीं आपल्या येथें येऊन, शेती करून, अन्न पैदा करावें असें सांगत आहेत. त्यांनीं शेती व धंदे हे दोन्ही उद्योग इतक्या उच्च दशेस पोंचविले आहेत कीं, आपल्या देशांतील मालाला परदेशीं गिऱ्हाईक मिळावें म्हणून महायुद्ध संपल्यापासून हे देश आगबोटी बांधण्याचे मार्गे आहेत. याप्रमाणें प्रत्येक देश आपआपल्या सोईप्रमाणें पुढें पुढें पाऊल टाकूं पहात असतां हिंदुस्थानानें स्वस्थ कमरेवर हात देऊन उभें राहणें योग्य होईल कां ? हिंदुस्थानांतील उत्पन्न व मालाची निपज वाढत नाहीं. हिंदुस्थानांतील कारभार, व्यापार व धंदे यांची मांडणी अशी आहे कीं, देशांतील लोकांचें सामर्थ्य व ज्ञान यांना काम करण्यास व वाढण्यास वावच ठेवलेला नाहीं.

कोणत्याहि देशातील सर्व लोकांचें सामर्थ्य व ज्ञान यांचा उपयोग करून ज्यास्त हित करून घेण्याचा मार्ग म्हणजे त्या देशाचें राष्ट्रीकरण हा होय. फुटकळ व्यक्ति किंवा संघ यांच्या योगानें देशाचें केव्हांहि कल्याण होत नसतें. कानडा वगैरे देशांसारखे आपण सामर्थ्यसंपन्न असावें असें हिंदुस्थानास वाटत असेल तर त्यानें आपली जूट व राष्ट्रीकरण केलें पाहिजे. माजी अध्यक्ष टॅफ्ट यांनीं संयुक्त संस्थानांस खालील उपदेश केला आहे:—

" विश्वबंधुत्वापेक्षां राष्ट्र व राष्ट्राभिमान यांना मी ज्यास्त मान देतों. ज्याप्रमाणें माणसाला आपल्या कुटुंबाचा अभिमान असणें अवश्य आहे त्याचप्रमाणें त्याला राष्ट्राचा अभिमान व राष्ट्राबद्दल प्रेम वाटणें जगाच्या

कल्याणाच्या दृष्टीनें अवश्य आहे. कुटुंबाच्या प्रेमानें जसें गृहसौख्य मिळतें त्याप्रमाणें देशाच्या प्रेमानेंहि एक प्रकारचें देशसौख्य म्हणून मिळत असतें व एकंदर सुखाच्या राशींत हीं दोन सुखेंच पुष्कळ भाग व्यापतात व प्रमुख आहेत."

तत्वज्ञानाच्या आंतरराष्ट्रीय सभेंत बाल्फूर यांनीं सांगितलें कीं "आधुनिक सुधारणा व सुखें यांचा भोग मिळण्यास राष्ट्रीयत्वाची भावना तीव्र पाहिजे. मानवजातीचें सामुदायिक कल्याण करण्याच्या सर्व मार्गांत व प्रजातंत्र राज्यपद्धति पूर्ण विकसित करण्याच्या सर्व पद्धतींत राष्ट्रीयत्वाच्या भावनेला मी अग्रस्थान देतों."

हिंदुस्थानानें देखील ही राष्ट्रीय भावना दृढ व तीव्र करण्यासाठीं शक्य ते प्रयत्न केले पाहिजेत. सबंध हिंदुस्थान म्हणजे एक देश किंवा राष्ट्र या दृष्टीनें त्यावर प्रेम करण्यास सर्वांस उत्तेजन दिलें पाहिजे. प्राचीन काळापासून आजतागाईत ज्या चांगल्या व थोरपणाच्या गोष्टी हिंदुस्थानांत झाल्या त्याबद्दल अभिमान वाटावा अशी शक्य ती खटपट केली पाहिजे. राष्ट्रीय पुढारी, राष्ट्रीय बांधव यांजबद्दल योग्य आदर व प्रेम प्रत्येकास वाटलें पाहिजे. शेजाऱ्यापाजाऱ्यांस मदत करणें म्हणजे देशाचें कल्याण करणें होय हें प्रत्येकाच्या मनावर ठसविलें पाहिजे. याप्रमाणें घटना केली म्हणजे व्यक्तींचें व सर्व देशाचें कल्याण होईल. कानडा हें राज्य किंवा संयुक्त संस्थानें याप्रमाणें एकमेकांच्या सहाय्यानें थोरपणास चढलीं आहेत हें उदाहरण हिंदुस्थानानें डोळ्यापुढें ठेवण्यासारखें आहे.

जगाच्या अनुभवानें जें राष्ट्र शहाणें होत नाहीं तें आपल्या हातानें आपला नाश करून घेतें व ही गोष्ट हिंदुस्थानांत पूर्णपणें प्रत्ययास येते. हिंदुस्थानांत अर्थशास्त्राचे नियम धाब्यावर बसविण्यांत येऊन इतर देशांच्या अनुभवांकडे दुर्लक्ष करण्यांत येतें. या देशाचें कल्याण कशानें होईल हें उघड समजण्यासारखें आहे. इतर दहाजणांनीं जें आजपर्यंत केलें तें जर हिंदुस्थानानें केलें तर त्याचें खात्रीनें नुकसान होणार नाहीं. जेथें जेथें सरकार देशहिताचें काम करील तेथें तेथें लोकांनीं सरकारला मनःपूर्वक मदत करावी; पण जेथें सरकार कुचराई करील अगर काम करणार नाहीं तेथें लोकांनीं स्वतंत्रपणें तें काम हातीं घ्यावें व यासाठीं त्यांची घटना नेहमीं

तयार असावी व तिनें जितका वाव असेल तेथपर्यंत पूर्ण प्रयत्न करावा व रोज नवीन वाव संपादन करावा.

देशांतील प्रमुख पुढारी व निरनिराळ्या धंद्यांतील सर्व प्रमुख लोक यांचा समुदाय म्हणजे राष्ट्र होय. साधारणपणें सरकारी व खाजगी संस्था एकमेकांस पूरक असतात. सर्व बाबतींत सरकारला शेंड्यापाशीं ठेवण्याचा उद्देश इतकाच असतो कीं, त्या कामाला त्याची मदत मिळावी; म्हणजे राष्ट्रीय धंदे व सामाजिक सुधारणा यांची ऊर्जित दशा होण्यास मदत होते. पण हिंदुस्थानांतील पुढारी व सरकार यांची एकवाक्यता नसल्यामुळें दोघांनीं सारख्याच आस्थेनें मदत केलेल्या संस्था हिंदुस्थानांत नाहींत. जर दोघांनाहि मान्य अशी एखादी योजना हिंदुस्थानचा उत्कर्ष करणारी असती तर तिला सर्व लोकांची मदत झाली असती. पण तशी स्थिति नसल्यामुळें पुष्कळ शक्ति कामास येत नाहीं व कामीं लागलेल्या शक्तींतला देखील बराच भाग एकमेकाशी घासाघीस करण्यांत वायां जातो.

यापुढें अशी हानि होऊं नये म्हणून राष्ट्रीय योजना तयार करून त्या शेवटास नेण्यासाठीं स्पष्ट मार्ग आंखावे. व या मार्गांत राजकीय, सामाजिक व औद्योगिक या तिन्ही प्रकारच्या कामांचा समावेश व्हावा. हें राष्ट्रीय कार्य कोणत्या धोरणावर ठरवावें हें पुढील प्रकरणांत खातेवार स्पष्ट करून सांगितलें आहे. जर या राष्ट्रकार्याला सरकारानें मदत केली तर लोकांत त्याची चहा होऊन जगांतहि त्याची कीर्ति होईल. पण हल्लीं जशा प्रकारचें सरकार हिंदुस्थानांत अधिकारारूढ आहे तसल्या सरकारापासून राष्ट्रकार्याची अपेक्षा धरण्यास आधार नाहीं. करितां लोकांनींच आपणांस जें करतां येईल तें करण्याचें ठरविलें पाहिजे. यासाठीं योग्य स्वार्थत्याग व संघटना करणें याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. इंग्रज सरकाराकडून स्वराज्य बक्षिस म्हणून केव्हांहि मिळणार नाहीं. कानडा, संयुक्त संस्थानें, ट्रान्सवाल वगैरे देशांचें उदाहरण आपण लक्षांत घ्यावें. आयर्लंड, ईजिप्त वगैरे सारखीं आपलीं समदुःखी राष्ट्रें व त्यांचे प्रयत्न हेहि आपणांस कित्ता म्हणून उपयोगी पडतील.

हल्लींचीं राष्ट्रें हे इतके मोठे व भानगडीचे संघ झाले आहेत कीं, राष्ट्रें कोणाला म्हणावें हें सांगणें कठीण झालें आहे. तथापि एक गोष्ट निश्चित

आहे कीं, राष्ट्र या संज्ञेस पात्र होण्यासाठीं त्या समाजाचे जगांतील इतर समाजापासून निराळे असे विशेष आचार, विचार वगैरे असून त्यांबद्दल त्या राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीला अभिमान वाटला पाहिजे. कोठेंहि गेली तरी ती व्यक्ति अभिमानानें मी अमुक राष्ट्राची असें समजत असली पाहिजे व आपले राष्ट्राचे म्हणून ठरलेले विशिष्ट आचार वगैरे पाळण्यास उद्युक्त असावी. या म्हणण्याला अनुसरून हिंदुस्थानची हिंदी म्हणून समजली जाणारी कांहीं तरी आचारविचार परंपरा इतकी लांबरुंद पाहिजे कीं, तिच्यांत हिंदुस्थानांत राहणाऱ्या सर्वांचा समावेश व्हावा व त्या बरोबर हिंदुस्थानाव्यतिरिक्त राष्ट्रांपासून त्यांत विशिष्टपणाहि पाहिजे. लहानपणापासून मुलांना आपलें गांव, आपला प्रांत, आपला देश यांचा अभिमान वाटेल अशा तऱ्हेनें त्याकडे पाहण्याची दृष्टि किंवा संवय लावली पाहिजे. विशिष्ट प्रकारचें शिक्षण, व्याख्यानें, कीर्तनें वगैरेंच्या योगानें आपल्या पूर्वजांनीं केलेली चांगली व थोरपणाचीं कृत्यें मुलांच्या कानांवर नेहमीं पडलीं पाहिजेत. अमक्या गोत्रांतील, अमक्या कुलांतील, अमक्या प्रांतांतील व अमक्या देशांतील मी आहे असा अभिमान त्याच्या मनांत उत्पन्न होईल अशी व्यवस्था केली पाहिजे. अशा तऱ्हेची वृत्ति लहान मुलांपासून मोठ्या माणसांपर्यंत सर्वांत उत्पन्न झाली म्हणजेच त्याला राष्ट्राभिमान म्हणतात. आपल्या देशांतील पुढारी यांच्याबद्दल देखील असाच अभिमान व पूज्यबुद्धि वाटली पाहिजे. पुढाऱ्यांनींहि आपलें वर्तन असें ठेवलें पाहिजे कीं, त्यांच्याबद्दल जनतेला अभिमान वाटावा. साधारण माणसें जनता वेडी असें समजतात. पण जनता वेडी नसून ती असावी तितकी शहाणी नसते इतकेंच. गप्पा छप्पा मारून जनतेला आपण भुलवूं असें कित्येकांना वाटतें पण तो त्यांचा भ्रम आहे. तुमच्या बोलण्यापेक्षा तुमची कृति जनतेवर जास्त परिणाम करते. जनता हा प्राणी फार सुधारलेला नाहीं. त्याला स्पर्शेंद्रियाशिवाय इतर इंद्रियें बहुतेक नाहींतच. यासाठीं प्रत्यक्ष कर्माचा जेव्हां त्याला आघात व्हावा तेव्हां त्याला त्या गोष्टीचें ज्ञान होतें. लांबच्या गोष्टीचें डोळ्यांनीं पाहून, कानांनीं ऐकून, नाकानें वास घेऊन त्याला ज्ञान होत नाहीं; कारण या प्राण्याला हीं इंद्रियें अद्याप आलेलीं नाहींत. यासाठीं प्रत्यक्ष कृति करून

जनतेला आपलें म्हणणें पटवावें लागतें व असें म्हणणें पटलें म्हणजे मग ती त्याप्रमाणें वागते. यासाठीं ज्याला ज्याला जनतेंत आपल्याविषयीं अभिमान उत्पन्न व्हावा असें वाटत असेल त्यानें जनतेला स्पर्श करील असें काम केलें पाहिजे. आपले देशबंधु म्हणून एकमेकांवर प्रेम करण्याचा धडा आपल्या देशांत नीट शिकतां येत नाहीं. त्यासाठीं परदेशच पाहिला पाहिजे. तथापि नित्याच्या व्यवहारांत मी माझ्या देशबांधवांना त्रास देणार नाहीं ही जाणीव देशांतल्यादेशांत उत्पन्न करतां येईल. शहाणीं, व्यवहार जाणणारीं, देशाचें कल्याण व्हावें असें इच्छिणारीं जीं माणसें असतील त्यांनीं याप्रमाणें आपलें वर्तन ठेवलें पाहिजे. म्युनिसिपल निवडणुकीसारख्या बाबतींत पैसे घेऊन मतें देतात म्हणून कित्येक लोक जनतेला हंसतात. पण त्यांचें हें करणें बरोबर नाहीं. पैसे देणाऱ्याच्या कृत्यानें मत देणारास जसा स्पर्श होतो तसा स्पर्श पैसे न देणारा जर दुसऱ्या कोणत्या तरी मार्गानें जनतेला करील तर त्याला देखील मतांची उणीव पडणार नाहीं. सगळे सारखेच बेदरकार, स्पर्श न करील असलें काम करणारे असले तर त्यांत पैसे देणाराच बरा. सगळे जर कामांत सारखेच स्वार्थी, आपमतलबी, गचाळ तर मग त्यांतल्या त्यांत दोन पैसे देणारा त्या पैशांपुरता तरी निस्वार्थी, स्वार्थत्यागी, उदार असें जनतेला समजतें व त्याला ती पसंत करते. यांत तिचा काय दोष आहे? जनता ही किती सुधारलेली आहे हें न समजल्यामुळें अशा प्रकारचे प्रवाद उत्पन्न होतात.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें संघ स्थापून संघाच्या द्वारें दुसऱ्याचें हित करावयला गेलें म्हणजे आपलें हित होतें ही जाणीव पहिल्यानें हिंदी समाजांत उत्पन्न केली पाहिजे. एकमेकांना मदत केल्यानें आपलें स्वतःचें कल्याण होतें ही जाणीव उत्पन्न झाल्यावांचून लोक एकमेकांना मदत करणार नाहींत. लोकांना स्वार्थ समजतो याचें कारण त्याचा त्यांना प्रत्यक्ष स्पर्श होतो. दुसऱ्याचें हित केल्यापासून होणाऱ्या सुखाचा जर असाच स्पर्श होऊं लागला तर तिकडेहि लोकांचें लक्ष लागेल. उत्सवामध्यें दहा माणसें आपल्या जिनसा आणून आरास करतात, आपण मेहनत करून मजा मारतात याचें कारण हेंच कीं, अशा संघानें काम करण्यानें जास्त सुख होतें हें त्यांना प्रत्यक्ष दिसतें; नव्हे अनुभवास येतें. इतर बाबींत देखील

असाच सुखकर अनुभव आणून देणें हें कांम पुढारी करतील तर त्या बाबींतहि खटपट न करतां संघ उत्पन्न होतील. पुढारी राहतात ती आळी, पुढारी राहतात ती पेठ, पुढारी राहतात तें गांव त्यांनीं संघशक्तीनें सुधारलें असें दिसलें तर इतर लोक या कामीं मागें राहणार नाहींत. पण वर्गणी द्यावी, सभासद व्हावें, काम करूं नये व काम केलें तर समजूं नये असें झालें म्हणजे लोकांना साहजीकच संघ वगैरे संस्थांचा कंटाळा येतो. कारण खिसा हलका झाला याशिवाय जास्त अनुभव त्यांना येत नाहीं व निरर्थक खिसा रिकामा व्हावा असें कोणास वाटत नसतें. सिनेमाला लोक पैसे देऊन जातात, चहासारखीं अपायकारक द्रव्यें ते पैसे खर्च करून पितात पण राष्ट्रकार्याला मात्र वर्गणी देत नाहींत, याचें कारण हेंच कीं, राष्ट्रकार्यापासून झालेलें सुख त्यांच्या अनुभवास येत नाहीं. हें सुख अनुभवास येईल असें केलें पाहिजे. अगदीं ढोबळ गोष्टी, कीं ज्यांचा अनुभव लवकरच येईल, अशा गोष्टी पुढाऱ्यांनीं पहिल्यानें हातीं घेतल्या पाहिजेत. एका वर्षांत स्वराज्य मिळवून देतों म्हटल्याबरोबर जनता एक कोट रुपये देऊन त्या स्वराज्यासाठीं किती उत्सुकतेनें काम करीत होती याचा अनुभव प्रत्येकास आहेच. स्वराज्य मिळवावयाचें असेल तर राष्ट्रीय शाळेंतील मुलांनीं गुरुजी नसतांना सुद्धां दंगा करूं नये, गप्प बसावें असें ऐकल्यावर चार महिनेपर्यंत मुलांनीं तें व्रत चालविल्याचा अनुभव लेखकास आहे. इतकी स्वराज्य मिळविण्याबद्दल जनतेंत उत्सुकता होती. पण शेवटीं तें अनुभवास न आल्यानें सर्वच घडी बिघडली. अशा तऱ्हेनें लोकांचा उत्साहभंग होईल असें करूं नये. दहा रुपये फायदा होईल असा अंदाज असला तर दोन रुपये मिळतील असें सांगावें. आणि ते दोन रुपये बिनचूक मिळाले पाहिजेत, म्हणजे जनतेला काम करण्यांत, अधिक झटून काम करण्यांत उत्साह वाटेल.

जगाची परिस्थिति, जगाचा अनुभव, कालाचा ओघ, परमेश्वरी इच्छा यांचा विचार न करतां जर आपण वागूं लागलों तर अशा वागण्यानें नाशच होणार. सृष्टीला क्षमा ठाऊक नाहीं. तुम्हीं कोणत्याही कारणानें वाईट कृत्य केल्यास त्याचा वाईट परिणाम तुम्हांस भोगावा लागेल, हा परमेश्वरी नियम आहे व त्यांत फेरबदल कोणालाहि करतां येत नाहीं.

आपलें कल्याण व्हावें असें आपणास वाटत असेल तर कल्याणकारकच गोष्टी आपण केल्या पाहिजेत. बर्फांत ठेवून जिन्नस ऊन झाला असें कधींही होत नाहीं. हिंदुस्थानची आजची कृति तशा प्रकारची आहे. हिंदुस्थानांतील लोकांची ऐपत थोडी, ते फार गरीब आहेत असें प्रत्येक जण म्हणतो, पण इंग्लंडसारख्या श्रीमंत देशांतील लोकांची रहाणी व चैन यांचें सेवन प्रत्येक जण करतो ! मग हा दारिद्य जाण्याचा उपाय फलद्रूप न झाला तर आश्चर्य काय ? मोठे लोकच स्वतःच्या आचरणानें असे चुकीचे धडे घालून देतात. राष्ट्रीय पुढारीच या चैनीच्या जिन्नसांचा उपयोग करतात. हिंदुस्थानांतील दारिद्य या विषयावर व्याख्यान देणारे पुढारी मोटारीनें प्रवास करतात. सोडा वाटर पितात व विलायती थाटाचा पोषाक करतात. दारिद्याचें हें काय लक्षण कीं दारिद्याचें ढोंग? दरिद्री देशांतील पुढाऱ्यानें त्या देशाच्या ऐपतीस साजेल असा आचार, पोषाक वगैरे करण्याचें उदाहरण घालून देण्याचें सोडून जर निरर्थक थाट केला तर लोक काय शिकतील ? ज्या ठिकाणीं सहज पायीं किंवा फुकट पालखींतून जातां येईल तेथें मोटार ! विनपैशानें मिळणाऱ्या बिनमोल पाण्याऐवजीं दीड आण्याचा सोडा ! थोड्या खर्चाचा, साधा, अभिमान बाळगण्यायोग्य देशी पोषाकाऐवजीं भारी खर्चाचा, देशी रिवाजाला विसंगत, विलायतला पैसे पाठविणारा साहेबी पोषाक पाहिल्यावर लोकांना काय उपदेश करावयाचा व कोणच्या तोंडानें नांवें ठेवावयाचीं ? पुढाऱ्यांनीं घालून दिलेला हा कित्ता जनतेनें सिनेमा, मोटार, दारू, चहा, वगैरे जिनसांना उदार हातानें उत्तेजन देऊन गिरविला तर तिला काय दोष देतां येईल ? गरीब आंधळ्याला पैसा नाहीं म्हणणारा पुढारी इस्त्रीसाठीं दोन आणे, दाढी करण्यासाठीं चार आणे, रुमाल व सेंटसाठीं आठ आणे खर्च करतांना पाहून लोक काय शिकतील ? पुढाऱ्यांना असा निरर्थक खर्च करणें शोभत नाहीं. पुढारी श्रीमान् आहेत, पण या पैशांचें काय करावें हें त्यांना समजत नाहीं कीं काय, म्हणून ते अशी उधळपट्टी करून भलतें उदाहरण घालून देतात ! जोंपर्यंत आपल्या देशांतील सर्व लोकांना पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळणार नाहीं तोंपर्यंत सर्व पुढाऱ्यांनीं अगदीं साधी व गरीबीची रहाणी ठेवली पाहिजे. असें न करतील ते लोकांचे पुढारी नसून शत्रु प्रच्छन्न शत्रु—

आहेत असें समजावें. त्यांचें उदाहरण शहाण्या माणसांनीं केव्हांहि गिरवूं नये. फार घाई असेल तेव्हां मोटारनें जावें, पण एरवीं सर्व पुढाऱ्यांनीं मोटार वर्ज समजली पाहिजे व याचप्रमाणें प्रत्येक चैनीला फांटा दिला पाहिजे व आपली फालतू संपत्ति देशहितार्थ खर्च केली पाहिजे, म्हणजे देशहित होण्याला फार उशीर लागणार नाहीं.

हिंदुस्थानाचें हित होण्यासाठीं काय झालें पाहिजे हें प्रत्येक जाणत्या माणसास समजण्यासारखें आहे. हिंदुस्थान गरीब असल्यामुळें त्याचा खर्च गरीबीला साजेसा पाहिजे. सर्व चैनीच्या वस्तू ही गरीबी जाईपर्यंत वर्ज केल्या पाहिजेत. देशहिताचीं कामें फुकट केलीं पाहिजेत. स्वराज्यांत सर्व सरकारी कामें अगदीं थोड्या वेतनावर करावीं लागतील यासाठीं या गोष्टीचा अभ्यास म्हणून मोठे पगार घेणाऱ्या लोकांनीं आपले फालतू पगार देशहिताच्या कामाकडे खर्च केले पाहिजेत. इंग्रज सरकारचें काम लोकांनीं केव्हांहि कमी पगारावर अगर फुकट करूं नये; कारण अशा रीतीने वांचलेले सर्व पैसे इंग्रज अधिकारी जास्त नेमण्यांत अगर त्यांचे पगार वाढविण्यांत खर्च होतात. आपण या गोऱ्या कामगाराइतकाच पगार घ्यावा पण मग तो आपण राष्ट्रकार्याकडे खर्च करावा. हायकोर्ट जज्ज किंवा काउन्सिलरपासून ते पांचशें रुपये पगारापर्यंतचे सर्व हिंदी अधिकारी शहाणे, देशहिताची कळकळ बाळगणारे असले पाहिजेत व त्यांनीं पांचशें रुपयांपेक्षां जास्त मिळणारे पैसे देशकार्यार्थ दिले तर वाटेल तितकें देशकार्य करतां येईल. डॉक्टर, वकील, व्यापारी वगैरेंनीं देखील हा कित्ता गिरविला पाहिजे. हल्लींचीं 'हिंदुस्थान देश दरिद्री आहे' वगैरे भाषणें वर्तनाच्या कसाटीनें मानभावीपणाचीं ठरतात. अशा रीतीनें जनतेनें देशहित करण्याचा निश्चय केला आहे असें दिसलें म्हणजे सरकार आपोआप त्या कामाला मदत करील. शिवाय उत्पन्नाला अशा तऱ्हेनें सत्कार्यीं खर्च करण्याचा आळा बसला म्हणजे लांचलुचपत, जुलूम, निर्दयपणा वगैरे उपायांनीं पैसे मिळविण्याची इच्छाच होणार नाहीं. याप्रमाणें उत्पन्न झालेल्या पैशांचा योग्य जमाखर्च, प्रत्येक रक्कम त्या त्या इसमाचे नांवें जमा, ती ज्या धंद्यांत खर्च होईल त्यांत होणाऱ्या नफ्याचा त्यास किंवा त्याच्या कुटुंबास अडचणीच्या वेळीं देणें अगर फिरून जमा करणें वगैरे गोष्टी झाल्या पाहिजेत. अशा

रकमांचा समाईक भांडवलाच्या कंपनीप्रमाणें सर्व व्यवहार होऊन तो प्रसिद्ध होईल तर जनता या पुढाऱ्यांबद्दल अभिमानानें व कौतुकानें स्मरण ठेवणार नाहीं ही गोष्ट शक्य नाहीं. जनतेचा आदर संपादण्यासाठीं आदरणीय वर्तन पाहिजे. असें वर्तन असल्यावर त्या पुढाऱ्याबद्दल जनतेला अभिमान वाटणारच.

सरकार ज्या ज्या ठिकाणीं देशहिताचें काम करील तेथें तेथें पुढाऱ्यांनीं व जनतेनें त्याला योग्य मदत करावी. मात्र ही मदत करतांना आपण काय करतों व यापासून खरें देशहित होईल अशी खात्री करून घेत जावी. नाहींतर जनतेच्या पुढाऱ्यांनीं फुकट कामें करावीं व हे वांचलेले पैसे भलतीकडेच उधळले जावे असें होईल. ज्या ठिकाणीं सरकार देश-हिताचें काम करणार नाहीं तेथें लोकांनीं स्वतः तें करावें. वर जी समाईक भांडवलाची कंपनी सांगितली-जिला हिंदी राष्ट्रीय हितसंवर्धक कंपनी म्हणतां येईल-त्या कंपनीनें हीं सर्व कामें आपण करावीं. यासाठीं लागणारा पैसा तिच्या हातीं आहेच व लागणारीं माणसें-हिंदी माणसें-तिनें तयार करवावीं. राष्ट्र म्हणजे मागल्या भागांत सांगितलेल्या सर्व संघांचा संघ होय. देशांतील सर्व लोक या संघाचे सभासद असून अन्न, वस्त्र वगैरे अवश्यक वस्तूंखेरीज देशांतील सर्व मालमत्ता ही या संघाची मालमत्ता होय. लोकांचे सर्व पुढारी हे त्या मालमत्तेचे संरक्षक (ट्रस्टी) होत व हें काम त्यांनीं परमेश्वरसाक्ष प्रामाणिकपणें केलें पाहिजे. अशा सर्व देशांतील मालमत्तेची वहिवाट करणाऱ्या पुढारी मंडळालाच खरोखर राज्यव्यवस्था असें नांव आहे. पण हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्था परकी असल्यामुळें स्वराज्यासाठीं आपणांस आज अशी व्यवस्था करावी लागत आहे.

कोणत्याहि देशांत आपण गेलों तरी आपणांस असेंच आढळून येईल कीं, सगळ्याच गोष्टी कांहीं सरकार करीत नसतें व सगळ्याच गोष्टी सरकारनें करण्याचें अंगावर घेऊं नये असेंहि शासनशास्त्रकारांचें म्हणणें आहे. सरकारनें फक्त लोकांमधील भांडणांचा बंदोबस्त करावा. देशांतील देशांत राहणारे लोकांमधील आपसांतील तंटे व या देशचे लोक व परदेशचे लोक यांच्यामधील तंटे तोडण्याचें काम सरकारनें करावयाचें असतें. सारांश, सरकार म्हणजे न्याय व सैन्य हीं दोन खातीं होत व या

दोन खात्यांच्या खर्चाच्या तजविजीसाठीं तिसरें मुलकी खातें; म्हणजे संपलें सरकार. न्यायखात्यांत पोलीस, तुरुंग, यांचा समावेश होतो व लष्करी खात्यांत सैन्य, आरमार, विमानें यांचा अंतर्भाव होतो. याखेरीज सरकार हल्लीं हिंदुस्थानांत जीं कामें करतें तीं सर्व लोकोपयोगी कामें जनतेनें संघशक्तीनें करावयाचीं असतात. सारांश, सरकार व जनता ह्या एकमेकांना पूरक अशा दोन संस्था असतात. यासाठीं त्या स्वराज्यांत एकमेकांस मदत करीत असतात व त्या अशा एकमेकांना मदत करूं लागल्या म्हणजे राष्ट्रीय सामर्थ्य, सार्वजनिक धंदे व सामाजिक स्वातंत्र्य उत्तम तऱ्हेनें संपादन होतात. पण हिंदुस्थानांत सरकारचा हेतु व लोकांच्या आकांक्षा एक नाहींत, यामुळें सर्व शक्ति सरकारच बळकावून बसलें आहे व दोहोंची एकवाक्यता करणारी शक्ति अस्तित्वांत नाहीं. जर राष्ट्रापुढें एखादी घटना, सर्व लोकांस संमत असें एखादें ध्येय व तें ध्येय पार पाडण्यासाठीं लागणारी संघशक्ति असती तर हें काम सुलभ झालें असतें. पण सर्वसंमत असें ध्येयच नसल्यानें जनतेच्या हातून कांहींच कार्य होत नाहीं असें झालें आहे. लोकांच्या अंगचें पाणी खेळतें नसून डबक्याप्रमाणें सांचून घाण होत आहे व त्यापासून हित होण्याऐवजीं अनहित मात्र होत आहे. एक साध्य व त्या साध्याची स्पष्ट कल्पना जनतेपुढें नसल्यानें जे कांहीं थोडे बहुत प्रयत्न होतात त्यांना चोहोंकडे अनेक फांटे फुटून गणपति करतांना त्याचा मारुति किंवा सूत करतांना भूत होऊन तो जनतेच्या बोकांडीं बसण्यास पहातो असा प्रकार होत आहे. यासाठीं असें ध्येय लोकांपुढें मांडणें जरूर आहे.

अशा प्रकारें अतःपर कामाची घाण, सामर्थ्याचा अपव्यय व पुढाऱ्यांची फजीति होऊं नये म्हणून हिंदुस्थानाच्या साध्याचा स्पष्ट नकाशा व त्या नकाशाची देश व काल यांना अनुसरून व्यवस्थित मांडणी करण्याकडे आपल्याला लक्ष पुरविलें पाहिजे व अशा प्रकारच्या मांडणीची रूपरेखा या पुस्तकांत दाखल केली आहे; ती पुढें क्रमशः येईल. या कामाला सरकारची मदत झाली तर त्यांत ग्रेटब्रिटनची मोठी कीर्तीच होणार आहे. पण गेल्या शंभर वर्षांचा कारभार लक्षांत घेतां या कामीं सरकारची मदत मिळेल अशी अपेक्षा धरवत नाहीं. यासाठीं लोकांनींच आपल्या साध्याची रूपरेखा

ठरवून ती अमलांत आणण्याची व्यवस्था केली पाहिजे. याप्रमाणें जरूर ती तयारी करून आपण व्यवस्थित प्रयत्न करूं लागलों म्हणजे सर्व गोष्टी आपोआप आपल्या हातीं येतील. आपण खटपट न करतां तें आपणांस देणगी म्हणून मिळेल असें जर लोक समजतील तर तें मिळण्यास फार काळ लागणार आहे. ज्याप्रमाणें परमात्म्यापासून उत्पन्न झालेली सृष्टि शेवटीं परमात्म्यांतच लय पावणार व याप्रमाणें मोक्ष हा सृष्टीच्या प्रलय कालीं सर्वांनाच मिळणार, पण इतका दम नाहीं म्हणून साधक अनेक साधनें करून लवकर मोक्ष मिळेल असा प्रयत्न करतात; त्याप्रमाणें स्वाभाविक परिपाकानें एक दिवस स्वराज्य मिळेल; पण तोंपर्यंत आपण म्हणजे हिंदी समाज जगतो कां मरतो हें निश्चित सांगतां येत नाहीं व तितका आपणांस दम नाहीं म्हणून आपण प्रयत्न करून तें लवकर या पिढीच्या हयातीतच मिळेल अशी खटपट करावयाची आहे. 'याचि जन्मीं याचि डोळां भोगीन तो सुखसोहळा' अशा निश्चयानें आपण कामास लागलें पाहिजे. कानडा, आस्ट्रेलिया वगैरे देशांना नोकरशाहीच्या विरोधाची अडचण आपल्याप्रमाणेंच होती. पण जुटीनें कामें करण्याच्या त्यांच्या संवयीनें त्यांना त्या नोकरशाहीच्या जांचांतून सुटता आलें. आयर्लंद जवळ पडलें म्हणून त्याला ही सोडवणूक होण्याला फार कष्ट पडले; पण त्यानेंहि अखेर संघशक्तीच्या जोरावरच आपलें उद्दिष्ट गांठलें.

या कामासाठीं जपाननें आपल्यांतील विद्वान् माणसें परदेशीं जाऊन त्यांच्या संस्था, शिक्षणपद्धति, कामाची व्यवस्था व सामाजिक मांडणी यांचा अभ्यास करण्यासाठीं व माहिती गोळा करण्यासाठीं पाठविलीं. या माणसांनीं निरनिराळ्या देशांतून पुष्कळ माहिती आणली व मग त्या माहितीचा खल करून आपल्या परिस्थितीशी व परंपरेशीं जी माहिती किंवा जे अनुभव जुळते व उपयुक्त दिसले त्यांचें आपल्या व्यवस्थेंत मिश्रण करून त्यांनीं आपली राज्यपद्धति, व्यापाराचें धोरण, कारखान्यांची व्यवस्था, सामाजिक संबंध यांची मांडणी केली. याप्रमाणें जपाननें आपली स्थिती सुधारली आहे व हा कित्ता हिंदुस्थानानें आपल्यापुढें ठेवून काळजीपूर्वक आपली परिस्थिति व परंपरा यांना अनुसरून गिरविला तर हिंदुस्थानाचेंहि कल्याण होईल. यासाठीं निवडक माणसें

पहिल्यानें स्वदेशीं तयार करून मग अभ्यास करण्यासाठीं पाठविली पाहिजेत. कोणा तरी धनिकाचा कसला तरी नातेवाईक कोठेंतरी पाठवून उपयोगी नाहीं. निवडक माणसांना, नेमलेल्या कामाची किंवा विषयाची निवडक माहिती मिळविण्यासाठीं विवक्षित देशांत पाठविलें पाहिजे व तीं माणसें जी माहिती आणतील ती एकत्र करून तिच्यांतील ग्राह्य अग्राह्य माहिती आपल्या परंपरेला व ध्येयाला अनुसरून ठरवून मग तीं आपल्या सुधारणांच्या कामीं काळजीपूर्वक वापरली पाहिजे. हिंदुस्थानाला पूर्वसंस्कृति असून ती फार प्राचीन असल्यामुळें घट्ट झालेली आहे. अशा संस्कृतीचें इष्ट रूपांतर सहज व सुलभतेनें होणें अशक्य आहे ही गोष्ट जाणून कोणत्या धोरणानें कशा सुधारणा करीत जावें हें ठरवून त्याप्रमाणें त्या एकसूत्रीपणानें हळूहळू अमलांत आणल्या पाहिजेत. या कामीं धोरण व सावधगिरी फार वापरली पाहिजे.

याप्रमाणें हिंदुस्थानानें आपल्या परिस्थितीला व परंपरेला अनुसरून राष्ट्रीय भावनांचा परिपोष केला पाहिजे. जर कानडा, आस्ट्रेलिया वगैरेंप्रमाणें ब्रिटिश साम्राज्यांत अंतर्गत पूर्ण स्वातंत्र्य व बाहेरच्या शत्रू वगैरेशीं वागण्यास ब्रिटन वगैरेंशीं साहचर्य असावें असें जर हिंदी लोकांना वाटत असेल तर त्यांनीं पहिल्यानें आपली स्वतःची जूट करण्यास व हिंदुस्थानाचें कल्याण करण्यांत एकमेकांनीं एकमेकांस मनोभावानें मदत करण्यास शिकलें पाहिजे. आपला शेजारी मरत असतां स्वस्थ बसणें अशी जी त्याची आजपर्यंतची खोड आहे ती त्यानें सोडली पाहिजे. हिंदुस्थानचे स्वातंत्र्य जाण्याला एकमेकांविषयीं निष्काळजीपणा—नव्हे एकमेकांविषयीं द्वेषच—सर्वथैव आजपर्यंत कारणीभूत झाला आहे. मराठी साम्राज्यांत शिंदे लढूं लागले म्हणजे होळकर मजा पाहात, होळकर लढूं लागले म्हणजे भोंसले तटस्थ असत, भोंसल्यांचें राज्य घालविण्यास गायकवाड मदत करीत व गायकवाडांशीं भांडणांत पेशवे पुढाकार घेत. टिपूला बुडविण्यासाठीं निजाम, पेशवे व इंग्रज एक झाले होते व अशा रीतीनें एकमेकांशीं वैर, तटस्थवृत्ति निष्काळजीपणा यांनींच इंग्रज सरकारला हिंदुस्थान काबीज करण्यास मदत केली आहे. दोघांचें भांडण व तिसऱ्याचा लाभ या म्हणीचें या प्रमाणें हिंदुस्थानांत प्रत्यंतर आलें आहे. ही स्थिति हिंदुस्थानांतच आहे असे

मात्र नाहीं. गेल्या महायुद्धांत युरोपियन राष्ट्रांनीं आपसांत लढून युरोपखंड अमेरिकेच्या घशांत घालण्याची मजल आणलीच होती. पण थोडक्यांत सावध होऊन जर्मनीनें लढाई बंद केली, म्हणून हें संकट टळलें. तथापि युरोपांतील राष्ट्रांची एकमेकांविषयींची द्वेषबुद्धि या थराला गोष्टी नेणार नाहीं असें मात्र नाहीं. या गोष्टीला आज नुसती सुरुवात आहे व हिंदुस्थानाप्रमाणें ही स्थिति हजारपांचशें वर्षें राहिली तर युरोप कदाचित नामशेष सुद्धां होईल. यापासून योग्य तो धडा घेऊन परस्पर द्वेष करणें आपण सोडलें पाहिजे.

ही परस्पर द्वेषाची बुद्धि सर्वांनीं सोडली पाहिजे. एका जातीनें किंवा समाजानें हें काम करून भागणार नाहीं. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांतहि हिंदुस्थानाप्रमाणें अठरा पगड जाती, अठरा भाषा, अठरा धर्म, अठरा निरनिराळे समाज अशी स्थिति आहे पण त्यांनीं ज्याप्रमाणें भेदभाव सोडून एकी टिकविली आहे, त्याप्रमाणें आपण केलें पाहिजे. गेल्या महायुद्धांत यूरोपांतील यादवीच्या वेळीं अमेरिकेंत देखील यादवी माजेल असा जर्मन लोकांना भरवंसा होता व तसा प्रयत्नहि त्यांनीं केला. पण अमेरिकेंतील जर्मन लोकांनीं आपल्या जातभाईस स्पष्ट सांगितलें कीं, आम्हीं अगोदर अमेरिकन व मग जर्मन आहों. अमेरिका जें धोरण ठरवील त्याला बाध न आणतां आम्हांस जें करतां येईल तें आम्ही करूं. आम्ही तुम्हांस मदत करूं ती येथपर्यंतच होईल. तुमच्या विरुद्ध प्रत्यक्ष लढण्यास आम्ही येणार नाहीं, पण यापलीकडे अमेरिकन धोरणाच्या बाहेर आम्ही पाऊल टाकणार नाहीं. अशी गोष्ट ऐकल्यावर जर्मन लोकांचा नाइलाज झाला व मग आपली ज्यास्त हानि होऊं नये म्हणून त्यांनीं लढाई बंद केली. अशी एकी महायुद्धांत अमेरिकेंत होती म्हणूनच मध्यें पडून अमेरिकेला यूरोपांतील लढाई बंद पाडतां आली. आयर्लंडच्या बाबतींत देखील अमेरिकेनें हेंच धोरण ठेवलें. अमेरिकेंतील आयरिश लोकांनीं व्यक्तिशः द्रव्याची वगैरे मदत आयर्लंडला केली पण इंग्लंड व आयर्लंडच्या दरम्यान अमेरिकेनें राष्ट्र म्हणून बिलकुल ढवळाढवळ केली नाहीं. हा कित्ता हिंदुस्थानानें अक्षरशः गिरविण्यालायक आहे. "विनाशकाले विपरीत बुद्धिः" वाईट व्हावयाचें असलें म्हणजे वाईट बुद्धि होते, त्याचप्रमाणें ती आपणास

एका कालीं झाली, तिचीं फळें आपण चाखीत आहोंत; तेव्हां आतां तरी असा आत्मघातकीपणा न करण्याची खबरदारी आपण घेतली पाहिजे. अशी खबरदारी न घेतली तर आपण हिंदी लोक नामशेष होऊन जाऊं.

अनेक विध भाषा, धर्म, आचारविचार असलेल्या मिश्र समाजाचें एकीकरण, शिक्षण व शिस्त कितपत, कसें व किती दिवसांत करतां येईल याचे प्रयोग व विचार अमिरिकेंतील संयुक्त संस्थानांत महायुद्धापासून चालू आहेत. महायुद्धाचा हा वणवा आपल्या देशांतहि पेटण्याचा संभव होता, ही जाणीव उत्पन्न झाल्याचें हें फळ असून या क्रियेला ‘ अमेरिकनायझेशन ’ असें नांव त्यांनीं ठेवलें आहे. यापुढें यूरोपांत दंगल माजली तर अमेरिकेनें तटस्थ वृत्तीच ठेवण्याचें जें जाहीर केलें आहे त्याचें देखील कारण हेंच कीं, यामुळें आपल्या स्वतःच्या देशांत तसलींच दंगल माजण्याचा संभव त्यांना दिसतो. या लढाईंत तरी इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांना कर्जाऊ दिलेले पैसे विजयी जर्मनी फेडण्याचें कबूल करणार नाहीं याच जाणिवेनें आपल्या पैशाच्या संरक्षणासाठीं अमेरिकेला दोस्तांची बाजू घ्यावी लागली. एरवीं आपण केवळ तटस्थ रहावें असेंच अमेरिकन बहुजन समाजाचें मत होतें. याच धोरणानें हिंदुस्थानांत देखील हिंदी म्हणविणाराचा पोषाक, आवडनिवड, आचारविचार वगैरेंत एकवाक्यता व वैशिष्टय ठेवण्याचा व उत्पन्न करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. पूर्वीं हिंदुस्थानांतील अठरापगड समाजांत व संस्थानांत वैदिक धर्म, संस्कृत भाषा, पागोटें व धोतर हा पोषाक; शेंडी व यज्ञोपवित ही खूण वगैरे बाबींत एकवाक्यता व वैशिष्टय होतें. मुसलमानी संयोगापासून ही घडी जी बिघडली ती अद्याप सुधारली नाहीं. पण ही घडी सुधारली पाहिजे अशी जाणीव मात्र हल्लीं हिंदुस्थानांत सर्वत्र पसरली असून अस्पृश्यतानिवारण पतितपरावर्तन, वगैरे गोष्टी या जाणिवेचींच दृश्यफलें आहेत. अशा प्रकारची एकवाक्यता व वैशिष्टय असलें म्हणजे त्याबद्दल प्रत्येकाला अभिमान वाटतो, इतर राष्ट्रांत त्याला योग्य मान असतो व सर्वजण या गोष्टींना सहानुभूतीपूर्वक पहातात अशी सर्व जगाला खात्री पटते, व असें झालें म्हणजे तो समाज एकराष्ट्र या नांवाला योग्य होतो.

हिंदुस्थानाचें हिंदीराजकारण होण्यास खालील गोष्टी व्हावयाला पाहिजेत. आणि हिंदी लोकांच्या आचार विचारांत या गोष्टी दृष्टीस पडल्या पाहिजेत.

१ आपल्या हिंदित्वाबद्दल व त्याच्या मानापमानाबद्दल योग्य अभिमान व चीड असून त्याबद्दल जरूर तो स्वार्थत्याग व कष्ट सोसण्याची तयारी.

२ सर्व देशांत सर्वांना समजेल अशा हिंदी भाषेचा व लिपीचा प्रसार. या हिंदी भाषेच्या संस्कृत व फारशी ह्या जननी म्हणून त्यांचा योग्य मान.

३ कमींत कमी चार वर्षांचें सक्तीचें शिक्षण. यांत हिंदी व मातृभाषा यांचा अभ्यास व जमाखर्च, हिंदी राजघटना व भूगोल यांची माहिती, हिंदी थोर पुरुषांच्या चरित्रांची ओळख व शरीराचे सर्व अवयवांचा यथायोग्य उपयोग करण्याची संवय, इतकें शिक्षण प्रत्येक मुलामुलीला मिळालेंच पाहिजे. या शिक्षणाला प्रारंभ सहा ते आठ वर्षांचें वय झालें कीं व्हावें. सहा वर्षांपासून खुषी व आठ वर्षांपासून सक्ति करावयाची.

४ काटकसर, कवाईत व नागरिकत्वाचें शिक्षण हें प्रत्येक शाळेंत देण्यांत यावें. या गोष्टी प्रौढ माणसांनाहि शिकवण्याची पद्धतशीर व्यवस्था झाली पाहिजे. अशा रीतीनें सर्व लहानथोर मंडळींना शिस्त व टापटीप यांचें वळण लाविलें पाहिजे.

५ ज्या घामटपणाच्या व हलगर्जीपणाच्या संवयी हल्लीं हिंदी लोकांत आहेत त्यांचा त्याग व ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्यांना प्रोत्साहन देऊन आरोग्य व स्वच्छता यांचा देशभर प्रसार केला पाहिजेत.

६ मुलांना कार्यकारण भावांचा विचार करणें व कल्पकता वाढविणें ज्यामुळें भाग पडेल अशा गोष्टी उच्च शिक्षणांत दाखल करणें व नित्याच्या व्यवहारांत या गोष्टी अंमलांत याव्या म्हणून सर्वत्र कल्पनांच्या पेट्या ठेवून त्या त्या बाबींच्या सुधारणा करणाऱ्या कल्पना वाढविल्या पाहिजेत. उदाहरणार्थ रेलवे, पोष्ट, कचेऱ्या, दुकानें वगैरेंत या कल्पनांच्या पेट्यांत त्या त्या कार्यांत कोणत्या

सुधारणा केल्या तर कारभार अधिक सुलभ व सुखकर होईल यांच्या कल्पना मागवाव्या.

७ पोषाकांत कांहीं तरी सर्वसामान्यत्व व वैशिष्ट्य असावें. डोक्यावर पागोटें, अंगांत लांब आंगरखा व खालीं धोतर अगर पोकळ विजार असा हा हिंदी पोषाक ठरविण्यासारखा आहे. व्यवहारांत सभ्यता व शिस्त असली पाहिजे.

८ लोकांत प्रवासाची आवड उत्पन्न व्हावी व त्यांचें दृष्टिक्षेत्र वाढावें म्हणून प्रवासाच्या सोईची गरीब व मध्यम वर्गाला सुखकर अशी वाढ व्हावी.

९ राष्ट्रीय हित साधण्यासाठीं व राष्ट्राचा मान वाढावा म्हणून प्रत्येक नागरिकानें काय करावें याबद्दलच्या माहितीचा प्रसार व या राष्ट्रिय ध्येयाला अनुसरून पुढाऱ्याचें वर्तन पाहिजे.

१० सर्वसाधारण नागरिकांना संघानें कामें करण्याची संवय लावण्यासाठीं उत्सवांची योजना.

११ प्रमुख माणसांना परदेशांची माहिती व्हावी म्हणून आंतरराष्ट्रीय प्रदर्शनें, खेळांचे सामने वगैरे इतर राष्ट्रांतील पुढाऱ्यांशीं मिसळण्याचीं साधनें.

सर्व नागरिकांना व्यक्तिशः व संघानें राष्ट्रकार्याची महती समजावी म्हणून प्रत्येकाला कांहीं तरी धंदा अगर व्यवसाय असून त्यांत काम केल्याशिवाय त्याला सन्माननीयता येऊं नये असा निर्बंध असणें इष्ट आहे. हातांनीं कामें करण्याची लाज जी समाजांत दृष्टोत्पत्तीस येते ती घालविणें अत्यंत जरूर आहे. अकबर, औरंगझेब, जयसिंग, शिवाजीमहाराज वगैरे प्राचीन थोर पुरुषांचीं उदाहरणें सोडलीं तरी औंधकर प्रतिनिधि, राजा रविवर्मा वगैरे आधुनिक संस्थानिकांचीं उदाहरणें सगळ्यांनीं अनुकरण करण्यायोग्य आहेत. पोट भरण्यासाठीं नव्हे, पण छंद म्हणून, नाद म्हणून कोणत्या तरी विद्येचें व्यसन प्रत्येक सुखवस्तु माणसास असलें पाहिजे.

हिंदुस्थानाची यांप्रमाणें हिंदीकरणाची प्रगती लोकांना या बाबतींत जितका वाव व जितके प्रसंग मिळतील व त्या प्रसंगांचा ते जितका फायदा घेतील त्यावर अवलंबून राहील. ही बाब सर्वथैव लोकोपयोगी असून हिला इंग्रज-सरकार मदतच करील अशी आशा करण्यास पुष्कळ जागा आहे. तथापि आपण सरकारच्या मदतीवर भार न घालतां अगर भिस्त न ठेवतां स्वतःच्या प्रयत्नावरच भिस्त ठेविली पाहिजे. जर नवीन संवयीं व व्यवस्था अमलांत आणावयाच्या असल्या तर त्यांना कांहीं तरी उत्तेजन पाहिजे ही गोष्ट कोणीहि नाकबूल करणार नाहीं. चिनांत अफू सोडील त्याला मताचा अधिकार देण्यांत आला; जपानांत लिहितां वाचतां येईल त्यालाच मत देतां येतें व अधुनिक रशियांत हातांनीं काम करील त्याला मात्र मत देण्याचा अधिकार ठेविला आहे. या भागांत ज्या गोष्टी प्रतिपादन केल्या आहेत त्यासाठीं सक्ति करावी असें म्हटलें म्हणजे कित्येकांना राग येईल; पण तो त्याचा रोष शिरसा मान्य करून या बाबी जरा सक्तीनेंच पाहिल्यानें अंमलांत आणाव्या असें वाटतें. कित्येकांना त्यांच्या नाविन्यामुळें या सूचना रुचणार नाहींत, कारण आपला हिंदी समाज फार गतानुगतिक आहे. अस्पृश्यता काढून टाकणें वगैरे बाबतींत मोठा भ्रष्टाकार वाटेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु कोणतीहि गोष्ट घेतली तरी तिला जगांत अनुकूल प्रतिकूल मतें पडणारच. सर्वथैव वाईट किंवा सर्वथैव चांगली अशी कोणतीच गोष्ट जगांत नसल्यानें कांहीं लोक जे दोष दाखवितील ते खोटे नाहींत, हें कबूल करणें भाग आहे. पण हिंदुस्थानाची जर सर्वांगीण उन्नति व्हावी असें वाटत असलें तर कांहीं दोष पत्करून, थोडा जुलूम मान्य करून, किंचित् त्रास सोसून, कांहीं कष्ट करून ही उन्नति घडवून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यांत यश आल्यावर पुढील पिढी आपणांस दुवाच देईल, हें जाणून वरील सूचना केल्या आहेत.

सर्व प्रकारच्या राजकीय विचार करणाऱ्या लोकांनीं हिंदुस्थान स्वराज्याला लायक होण्यासाठीं त्याची घटना सामाजिक, राजकीय, औद्योगिक वगैरे कशी बदलली पाहिजे याचा काळजीपूर्वक व कळकळीनें विचार करावा. सर्व धंदेवाईक, समाजशास्त्रज्ञ, कायदेपंडित, शिक्षणाभिमानी, धर्मज्ञ, वगैरे प्रमुख मंडळींनीं विचार करण्यायोग्य ही बाब आहे यांत संशय

नाहीं. पुढें होणाऱ्या दरएक संस्थानांतील म्हणजे भाषा, आचार, पोषाक वगैरेंत एकवाक्यता असणाऱ्या प्रत्येक प्रदेशांतील प्रमुख विचार करणाऱ्या माणसांची एक सभा बोलावून तिनें त्या प्रदेशा पुरता या बाबींचा सर्व बाजूंनीं विचार करावा व एक वर्षांत या प्रदेशांतील लोकांचें एकीकरण किंवा हिंदीकरण करण्यास काय करावें हें ठरवावें. या मंडळानें एक एक प्रश्न दहापांच तज्ज्ञांकडे विचारासाठीं सोंपवावा. हे तज्ज्ञ परप्रांतीय, परदेशीय असले तरी चालतील. मात्र त्यांचा निर्णय मंडळीला तज्ज्ञांचा म्हणून कबूल आहे असें असलें पाहिजे. या विचारपत्रिका व त्यांवरून मंडळानें ठरविलेले निर्णय हे मग त्या प्रदेशांत सर्वत्र प्रसिद्ध करावे. या गोष्टी सुंदर भाषेंत व कवितेंत ग्रथित केलेल्या असाव्या म्हणजे त्या तोंडपाठ करून सर्व लोकांच्या तोंडीं होण्यास बरें पडेल. याप्रमाणें प्रत्येक प्रांतानें सुचविलेली योजना जरी त्या प्रांतापुरती असली तरी इतर प्रांतांच्या भाषेंत या योजनेच्या कविता प्रसिद्ध करण्यांत याव्या. तात्पर्य, प्रत्येक प्रांताचें या बाबींत काय म्हणणें आहे, कोणत्या सूचना सर्व प्रांतांना ग्राह्य वाटतात, कोणत्या सूचना कोणत्या प्रांतास पटतात याबद्दल सर्व देशाला विचार करण्यास थोडा वेळ देऊन मग प्रत्येक प्रांताच्या सूचना त्या त्या प्रांतांत कायद्यानें विवक्षित दिवसापासून अंमलांत याव्या असा हुकूम फर्मावावा. सर्व हिंदुस्थानभर या सूचना एकदांच अंमलांत आल्या तर फार सोईचें होईल.

बली, राम, अशोक वगैरे प्राचीन राजांनीं याच रीतीने त्या त्या काळाला अनुरूप अशा गोष्टी अमलांत आणल्या होत्या व तोच मार्ग आतांहि अमलांत आणणें जरूर आहे. या सूचनांचा पहिल्यानें दरसाल फेरविचार करावा. बहुधा पहिल्या तीन वर्षांच्या अनुभवानंतर त्यांत फरफार करण्याचा प्रसंग येणार नाहीं. कालाची गति कुटिल असते यासाठी कालाशीं मेळ ठेवण्यासाठीं दर नऊ वर्षांनीं याबाबद फेरफार करतां येण्याची सोय सुचविली आहे. याप्रमाणें हिंदीत्व म्हणजे काय हें ठरल्यावर त्याप्रमाणेंच सर्व लोकांनीं वागावें. तसें वागण्यास संघ व लोकमत यांनीं त्यांना भाग पाडावें. तसें वागण्यांत हित किती व अनहित किती व कसें हें जनतेला नेहमीं समजावून देण्यासाठीं व्याख्यानें वगैरेची सोय ठेवावी. लोकांचें कल्याण व त्यांचें हित याकडे लक्ष देऊन फेरफार करतां

येण्याची सोय मात्र नेहमीं अशा घटनेंत पाहिजे. व्यक्तिस्वातंत्र्य या नांवाखालीं हल्लीं जो वाटेल तसा धुडगूस घालण्यांत येतो त्याला आळा बसला पाहिजे. अशा अनियंत्रित वर्तनानें कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, अशी स्थिति होते. सामान्य जनतेची प्रवृत्ति फाटाफुटीकडे जास्त असते. वैयक्तिक विशिष्टत्व प्रत्येकाला प्रिय असते, पण या स्वातंत्र्याला समाजबंधन म्हणून कांहीं तरी आळा पाहिजे व हा आळा म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें राष्ट्रानें मान्य केलेला निर्णय. या बंधनाच्या आंत प्रत्येक व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य आहे. निरर्गल स्वातंत्र्य कोणालाहि केव्हांहि देतां येत नाहीं. कायदे म्हणजे जसें व्यक्तीला एक बंधन आहे त्याचप्रमाणें वरील निर्णय हें देखील व्यक्तीला बंधन आहे व तें तिनें कायद्याप्रमाणेंच नेहमीं निमूटपणें मान्य केलें पाहिजे.

प्रकरण तिसरें

प्रारंभीचा खटाटोप

कोणतेंहि काम शेवटास न्यावयाचें म्हटलें म्हणजे त्याला पांच गोष्टी लागतात. हिंदी अर्थशास्त्रकारांनीं त्या पांच गोष्टी खालीलप्रमाणें सांगितल्या आहेतः—

१ कर्मणां प्रारंभोपायः—कामाच्या सुरुवातीस करावी लागणारी खटपट किंवा जुळवाजुळव.

२ पुरुषद्रव्यसंपद्— त्या कामासाठीं लागणारीं माणसें व पैसे.

३ देशकालविभाग—कामाची देशाच्या व वेळाच्या संबंधाची वांटणी. कोणत्या ठिकाणीं कोणत्या वेळीं किती काम करावयाचें याचा निश्चय.

४ विनिपातप्रतिकार—कामांत होणाऱ्या चुका व येणारे अडथळे यांचे निरसनाचा उपाय.

५ कार्यसिद्धि—कामाच्या शेवटीं करावी लागणारी निरवानिरव किंवा आवरआटोप.

यापैकीं आपण आतां या भागांत पहिल्या गोष्टीचें विवरण करावयाचें आहे.

हिंदुस्थानांत सुस्थिति येण्यासाठीं करावयाची पहिली गोष्ट म्हणजे येथील लोकांना पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळेल अशी तजवीज करणें होय. हिंदुस्थानांत हल्लीं शेंकडा ऐंशी लोक अन्नाची उपज करण्यांत शेतीच्याच कामांत गुतलेले असून त्यांना वर्षांतून सहा महिने काम नसतें. यासाठीं या लोकांपैकीं निदान निम्मे लोक शेतीवरून काढून उद्योगधंद्याच्या कामीं लावले पाहिजेत. म्हणजे शेतकरी लोकांना वर्षभर काम मिळून निम्मे लोक दुसऱ्या रीतीनें पोट भरूं लागतील. अशा रीतीनें माणसाचें उत्पन्न वाढेल व मग पोटभर अन्न सर्वांना मिळेल. हिंदी लोक फार अल्पसंतुष्ट व मितव्ययी आहेत. माणशीं अवघ्या पंचवीस रुपये दरसाल उत्पन्नांत ते आपला निर्वाह हल्लीं करतात व या उत्पन्नांत जर थोडीफार भर घालता

आली व उद्योगधंद्यांवर निम्मे लोक लावतां आले तर हें उत्पन्न निदान दिढी तरी होईल व ते लोक सुखी होऊन पुष्कळ सामर्थ्यवान् होतील.

अशा तऱ्हेनें हिंदुस्थानांतील निम्मे लोकांना उद्योगधंद्याला लावावयाचें म्हटलें म्हणजे पहिल्यानें सर्व लोकांना साक्षर केलें पाहिजे व त्यांना व्यवहारोपयोगी असें हस्तकौशल्य व यंत्रें वापरण्याचें शिकविलें पाहिजे. या गोष्टी कशा कराव्या हें या पुस्तकांत पुढें सविस्तर प्रतिपादन केलें आहेच. पण या बाबींचा मूलभूत विचार या ठिकाणीं या भागांत करावयाचें योजिलें आहे.

शिक्षणाचा प्रारंभ पुरेशा प्राथमिक शिक्षणाच्या शाळा काढून देशांतील आठ ते बारा वर्षांच्या सर्व मुलांना व मुलींना सक्तीनें शिकविण्यापासून केला पाहिजे. साधारणपणें गांवच्या लोकसंख्येपैकीं शेंकडा पंधरा जणांना तरी शिकविण्याची सोय प्रत्येक गांवांत या सक्तीच्या शिक्षणासाठीं केली पाहिजे. शहरांमध्यें यापेक्षांहि जास्त लोकसंख्येच्या शिक्षणाची सोय केली पाहिजे. अठरा वर्षांपेक्षां जास्त वयाच्या माणसांना पोटापाण्यासाठीं काम करावें लागत असल्यामुळें त्यांनीं दर आठवड्यांत केव्हां तरी सहा तास कांहीं तरी हस्तकौशल्य संपादन केलें पाहिजे असा नियम करून त्यासाठीं लागणारी व्यवस्था केली पाहिजे. अशा तरुण माणसांना उद्योगधंदा येत असला तर त्यांना लिहण्यावाचण्यास रात्रींकरितां शिकण्याची सोय करावयाला पाहिजे. या अक्षरओळख व हस्तकौशल्याशिवाय शेती व धंदे यांत हमेश उपयोगी पडणारें व्यावहारिक शास्त्रीय ज्ञान, थोडा जमाखर्च व जगातील पैशाच्या उलाढाली कशा होतात व हिंदुस्थानांत त्याबाबद काय व्यवस्था आहे इतकी अर्थशास्त्राची सामान्य माहिती, नागरिकाच्या कर्तव्यासंबंधानें स्थूल उपपत्ति, इतकें ज्ञान प्रत्येक प्राथमिक शाळेंत विद्यार्थ्यांना अवश्य मिळालें पाहिजे. या कामीं शिक्षक तयार करणें, जरूर तीं उपकरणें पुरविणें व शिक्षणासाठीं शालागृहें बांधणें यांना बराच खर्च लागेल खरा; पण हा खर्च म्हणजे अत्यंत अवश्य गोष्ट आहे म्हणून घरांतील दागिने मोडून सुद्धां करणें भाग आहे. या कामीं जितकी काटकसर होईल तितकी करावी. उदाहरणार्थ, शालागृहाऐवजीं नुसते मांडव किंवा छपरें घालावीं. शिक्षकांसाठीं भिक्षुक, कुळकर्णी, वगैरे माणसांना जरूर तें

शिक्षण देऊन उपयोगांत आणावे. विद्वान् लोकांनीं दिवसाकांठीं तास दोन तास या सार्वजनिक कामाकडे वापरावे. धनिकांनीं अवश्य तीं उपकरणें विकत घेऊन द्यावीं. इतकेंच नव्हे तर म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डसारख्या संस्थांना कर वाढवितां येत नसले तर त्यांनीं पैसे कर्जाऊ काढावे. रूसो–जपानी युद्धाच्या वेळीं जपानांतील बायकांनीं आपल्या अंगावरील दागिने काढून लढाईच्या खर्चासाठीं सरकारच्या स्वाधीन केले होते; मग सार्वत्रिक सक्तीच्या सुंदर शिक्षणासाठीं हिंदी कुलस्त्रिया या कामीं मागें राहतील हें संभवनीय नाहीं.

प्रत्येक हिंदी संस्थानानें आपल्या भाषेंत ज्ञान देणारें एक तरी स्वतंत्र विद्यापीठ व त्याला जोडून एक तरी धंदेशिक्षणाचें महाविद्यालय व व्यापारी महाविद्यालय काढावें. साधारणपणें दर एक कोटी लोकसंख्येला असलें एक विद्यापीठ पाहिजे. या विद्यापीठांत त्या संस्थानाच्या देशभाषेंत सर्व प्रकारचें अत्युच्च व संपूर्ण शिक्षण मिळण्याची सोय झाली पाहिजे. याप्रमाणें सर्व हिंदुस्थानांत मिळून पांच वर्षांत वीस तरी विद्यापीठें निघालीं पाहिजेत. विद्यापीठांत पदवी घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला अर्थशास्त्र व नागरिकांचीं कर्तव्यें हे विषय अवश्य शिकविले पाहिजेत. असें झालें म्हणजे खरे पुढारी, उत्तम संस्थास्थापक, निष्णात राजकार्य धुरंधर पुरुष हिंदुस्थानांत हल्लीं फार दुर्मिळ आहेत त्यांचा पुरेसा पुरवठा होईल. दर कोट लोकसंख्येमागे पन्नास विद्यार्थी जर्मनी, जपान वगैरे परदेशांत निरनिराळ्या शास्त्रांचा अभ्यास करण्यासाठीं पाठवावे. तसेंच तिकडील तज्ञ लोक येथें विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठीं विद्यापीठानें आपले विद्यार्थी तयार होऊन येईपर्यंत नोकर ठेवावे. परदेशीं पाठविलेल्या हिंदी विद्यार्थ्यांपैकीं पदवीधर होऊन यतील त्यांना त्या संस्थानानें पोसावें व इतरांना थोडी फार लागेल ती मदत द्यावी. याशिवाय संस्थानानें आपल्या विद्वान् पुढाऱ्यांना परदेशीं संस्थांची पहाणी करण्यासाठीं, त्यांचा स्नेह संपादन करण्यासाठीं व परस्परांना एकमेकांची माहिती पुरवण्यासाठीं वरचेवर पाठवीत जावें.

परदेशांतील राज्यपद्धति, व्यापारधंदे संस्था वगैरेंची सांगोपांग माहिती आपल्या तसल्या संस्था सुधारण्याच्या कामीं फार उपयोगी पडणार

आहे व या सुधारणा करतांना लोकांनीं ज्या चुका केल्या त्या चुका आपणास सावधगिरीनें टाळण्यासाठीं त्यांचे अनुभव आपणांस उपयोगी पडणार आहेत. शहाणा व मूर्ख यांतील फरक म्हणजे हाच कीं, शहाणा पुढच्याला लागलेल्या ठेंचेनें सावध होतो व मूर्ख तसें करीत नाहीं. देश संपन्न होण्यासाठीं हिंदुस्थानांतून परदेशीं जाणारा सर्व कच्चा माल हिंदुस्थानांतच पक्का झाला पाहिजे. यासाठीं हिंदुस्थानांत मोठमोठ्या गिरण्या काढाव्या लागल्या तरी हरकत नाहीं. अशा गिरण्यांच्या योगानें त्या गिरण्यांना सामान पुरविण्याचे देखील लहान मोठे कारखाने देशांत उत्पन्न होऊन चालतील. रेलवेला लागणारें सामान, यंत्रें, मोटारयंत्रें, कागद, तेल गाळणें, चिनीमातीचें काम, कांचकाम व कांतडीं रंगविणें इतके कारखाने दर संस्थानास एक एक तरी पाहिजेत. समुद्रकिनाऱ्याचे दरएक जिल्ह्यास गलबतें बांधण्याचा कारखाना, कापूस पिकणाऱ्या दरएक जिल्ह्यांत सर्व कापूस वापरण्याइतक्या कापडाच्या गिरण्या व लोखंड निघणाऱ्या प्रांतांत हिंदुस्थानाला पुरेल इतकें लोखंड गाळण्याचे कारखाने निघाले पाहिजेत.

हिंदी व परदेशी तज्ञांचे एक मंडळ सगळ्या हिंदुस्थानांतील कारखान्यांची नीट व्यवस्था लावण्यासाठीं नेमावें. या मंडळाच्या सल्ल्याप्रमाणें प्रत्येक संस्थानाचे उद्योगखात्याच्या मंत्र्यानें काम करावें. दरएक संस्थानानें दरसाल एक कोट रुपये या उद्योगधंद्यांच्या वाढीच्या कामीं दरसाल खर्च करावे. हा खर्च दहा वर्षांत एक कोटीवरून तीन कोटींपर्यंत वाढवावा. जसजसे एक एक कारखाने सुरू होऊन कामें करूं लागतील त्याप्रमाणें त्याला जास्त खर्च लागेल, यासाठीं हा वाढता खर्च ठेवला आहे. कांहीं कारखाने विवक्षित प्रौढत्वाला पोंचले म्हणजे ते आपल्या पायावर चालूं लागतील. या उद्योगखात्याचा खर्च संस्थानाच्या कायदेमंडळाच्या देखरेखी खालीं व्यापारी दृष्टीनें व्हावा, पण खाजगी कारखान्यांना यांतून कांहीं रक्कम मदतीदाखल फुकट देण्यास हरकत असूं नये. किंवा खाजगी कारखान्यांच्या व्याजाची हमी संस्थानानें घ्यावी. याशिवाय कारखान्यांना जोडून शोधनसंस्था, प्रयोगशाळा, कल्पकगृहें, शिक्षणालयें व सुधारणामंडळें वगैरे संस्था असाव्या व त्यांनीं प्रयोग करून तज्ञ व

कारखानदार, उत्पादक, चालक, व्यवस्थापक कामगार, देखरेख करणारे व नोकर तयार करावे. खाजगी माणसांत वर लिहिलेले गुण सांपडले तर त्यांना लागेल तें भांडवल वगैरे देऊन कारखाने काढण्यास व चालविण्यास उत्तेजन द्यावें, त्यांच्या कारखान्यावर संस्थानची देखरेख असावी. चूक होईल तेथें त्या इसमास योग्य सल्ला व इषारा मिळावा व तो कारखाना योग्य तऱ्हेनें भरभराटीस यावा अशी सर्व व्यवस्था संस्थानच्या तज्ञांनीं करावी. सार्वजनिक पुढाऱ्यांनीं देखील हीं कामें फुकट करावीं व पुढाऱ्यांना कारखाने पहाण्याची सवड कायद्यानें द्यावी. कारखान्यांना परदेशी मालाच्या स्पर्धेपासून त्रास होऊं नये म्हणून परदेशी मालावर जकात ठेवावी.

याप्रमाणें दहापांच वर्षें काळजीपूर्वक व पद्धतशीर जोपासना देशी कारखाने वगैरेची केली तर हिंदुस्थानाचा रंग सहज पालटून जाईल. लष्करी खर्चाकडे जे अनेक कोट रुपये खर्च होतात त्यांपैकीं कांहीं कोट रुपये सरकारनें या कामीं खर्च केले तर चांगलेंच होईल; पण सरकार असें न करील तर लोकांनीं खाजगी संपत्तीवर तुळशीपत्र ठेवून हें काम केलें पाहिजे. आपल्या पूर्वजांनीं आपआपसांत भांडून व अनेक दुष्कर्में करून जो पापसंचय केला त्याचें हा स्वार्थत्याग म्हणजे योग्य प्रायश्चित्त होईल.

शेतींत देखील योग्य खतें घातलीं व शास्त्रीय पद्धतीनें ती केली तर शेतीचें उत्पन्न पुष्कळ वाढेल. शेतीसाठीं पाणीपुरवठ्याकडे जितका पैसा खर्च करावा तितका तो सार्थकींच लागणार आहे. तलावांच्या पाण्यावर वीज वगैरे उत्पन्न करून मग तें शेतीकडे वापरलें तर त्याचा दुहेरी उपयोग होईल. हिंदुस्थानांतील शेतकऱ्याला यंत्रांची जोड, खतांची जोपासना व गुरें वगैरेचा उपयोग या बाबींत पुष्कळ शिकण्यासारखें आहे. प्रत्येक शहर व तालुका या ठिकाणीं शेतकऱ्यांच्या पतपेढ्या असाव्या. या पेढ्यांनीं दुहेरी काम करावें. शेतकऱ्याचा माल खपविण्यास अडते व शेतकऱ्यांच्या गरजा पुरविण्यास पेढ्या अशीं दोन कामें या संस्थांनीं उचलीं तर शेतकऱ्याला आपलें सर्व लक्ष व सगळा वेळ शेतकामाकडेच देण्यास बरें पडेल. त्याला लागणाऱ्या जिनसा स्वस्तांत स्वस्त मिळून त्याचा माल महागांत महाग विकण्याची सोय होईल व त्यास लाग-

णारा पैसा हलक्या दरानें व मुबलक उसनवार मिळेल व त्याचें सर्व प्रकारें कल्याण होण्यास मदत होईल. हल्लींच्या सोसायट्यांचें काम याप्रमाणें पद्धतशीर व सवलतीनें होत नाहीं. दरएक संस्थानानें याशिवाय दरएक जिल्ह्यांतील दहा दहा शेतकरी व एक दोन शेतकी पदवीधर परदेशची शेतीची व्यवस्था पाहण्यासाठीं आपल्या खर्चानें यूरोप, अमेरिका, जपान, वगैरे देशांत पाठवावे. जो कोणी जें कांहीं पहाण्यासाठीं किंवा शिकण्यासाठीं परदेशीं पाठवावयाचा तो हिंदुस्थानांतला त्या कामाचा काम करणारा माहितगार असला पाहिजे. धंदा करणारा कारागीर व उद्योग करणारा व्यापारी अगर शेती करणारा शेतकरी यास परदेशीं पाठवावें. या दहावीस इसमांबरोबर त्या शास्त्राचा एक देशी पदवीधर दुभाष्या म्हणून असावा.

परदेशांत गेलेल्या हिंदुस्थानांतील व्यापारी वगैरेंना मदत करण्यास, त्यांस भांडवल वगैरे पुरविण्यास देशी वकील व देशी पेढ्या सर्व परदेशीय राजधान्यांतून असावेत. हिंदुस्थानांतील प्रमुख शहरांतून परदेशी भाषांच्या शाळा उघडाव्या व हिंदी राहणीस अनुसरून सोय करणाऱ्या हिंदी आगबोटी हिंदी लोकांच्या सोईसाठीं व व्यापारासाठीं चालवाव्या. हिंदुस्थानांतील लोकांस माहिती व्हावी म्हणून परदेशीं गेल्यावर तेथें हिंदी लोकांनीं कसें वागावें, निरनिराळ्या देशचे रिवाज, आचार, विचार, धर्म, व्यापार, व्यवस्था वगैरेची माहिती देणारीं पुस्तकें हिंदुस्थानांत हिंदी भाषांत प्रसिद्ध करण्यांत येऊन वाचनालयांत ठेवावीं.

व्यापारासाठीं भांडवल पुरविण्याचें काम एका मोठ्या मध्यवर्ती पेढीकडे देऊन तिच्या शाखा प्रत्येक जिल्ह्याचे जागीं असाव्या. प्रत्येक जिल्ह्यास शिवाय धंद्यांना भांडवल पुरविणारी पेढी व शेतीला भांडवल पुरवणारी पेढी अशा दोन पेढ्या पाहिजेत. मोठ्या लोकांनीं आपले पैसे दागदागिन्यांत न घालतां या पेढ्यांतून ठेवावे व पेढींत ठेवलेल्या पैशावरून त्या इसमाची योग्यता ठरविण्यांत यावी. दरएक हिंदी गृहस्थानें हिंदुस्थान देशाची गरिबी आहे हें लक्षांत ठेवून त्याप्रमाणें आपली राहणी साधी ठेवली पाहिजे व चैनीकडे खर्च होणारा सर्व पैसा देशाच्या उन्नतीसाठीं या पेढ्या ठेवून देशकार्याला मदत केली पाहिजे. पेढी चालविणाऱ्या माणसांनीं, लोकांनीं त्यांकडे ठेवलेला पैसा किती स्वार्थत्यागपूर्वक

ठेवलेला आहे हें लक्षांत ठेऊन आपलें काम अत्यंत दक्षतेनें केलें पाहिजे. या उद्योगधंदे वगैरेंच्या उन्नतीसाठीं पहिल्यानें देशांत किती संपत्ति आहे तिची खानेसुमारी केली पाहिजे. प्रत्येक इसमाचें उत्पन्न किती, खर्च किती व त्यापाशीं त्यापैकीं किती रक्कम व्यापार वगैरेंत घालण्यासारखी आहे याची माहिती व्यापारी संघानें गोळा करावी. तसेंच प्रत्येक धंदा किंवा उद्योग करणाऱ्या लोकांच्या संघानें तो तो उद्योगधंदा ऊर्जित दशेस कसा आणावा, त्याला किती भांडवल लागेल, काय नफा राहील वगैरे माहिती तयार करावी व यावरून देशाची स्थिति आपल्या कार्याला किती अनुकूल आहे याचा आढावा प्रसिद्ध करावा. प्रत्येक संघाच्या सभासदांनीं आपली संपत्ति त्याचे संघाच्या कार्याकडे खर्च करावी म्हणजे आपला पैसा कोणालाहि गैरवाकब व गैरमाहीत माणसाचे स्वाधीन करावा लागणार नाहीं.

वर सांगितलेल्या सर्व गोष्टी होण्यासाठीं सरकार व जनता यांच्यांत पूर्ण विश्वास व एकी असली पाहिजे. असें होण्यास मध्यवर्ती सरकार व संस्थानें हीं सर्वथैव प्रातिनिधिक व पूर्ण सत्ताधारी झालीं पाहिजेत. जमाखर्चाच्या बाबद प्रत्येक संस्थानाला पूर्ण स्वायत्तता हवी. या सर्व गोष्टींचा पाया म्हणजे सरकार हें लोकांसाठीं, लोकांचें कल्याण करण्यासाठीं, आहे ही गोष्ट सरकार व लोक यांना मान्य झाली पाहिजे व या सरकारचें काम म्हणजे हिंदी जनतेचें कल्याण करण्याचें काम सर्वांनीं अगदीं मनोभावानें व दुसरा कोणताहि विचार मनांत न आणतां करण्यासाठीं झटलें पाहिजे. ही गोष्ट करण्यांत जर थोडी चूक झाली किंवा कसूर करण्यांत आली तर सर्व कामाचा बेरंग होईल. इग्लंड देशाला हिंदुस्थानांतून धान्य पाहिजे व तें धान्य इंग्लंडांत उत्पन्न होणाऱ्या लोखंड वगैरे जिनसांच्या मोबदला पाहिजे ही गोष्ट हल्लीं हिंदुस्थानाच्या प्रत्येक सुधारणेच्या आड येते. हिंदुस्थानांत कारखाने काढणें, त्यांना ऊर्जित दशेला आणणें या कामीं जर इंग्लिश लोक झटूं लागले तर या झटण्याचा मोबदला त्यांना अनेकरूपानें हिंदुस्थानातून मिळेल. हिंदुस्थानांतून खडणी म्हणूनसुद्धां कांहीं रक्कम इंग्लंडनें त्याजपासून घेतली तरी चालेल पण हल्लींची हिंदुस्थानची कुचंबणूक फार जाचक आहे. इंग्रजी भांडवल व भांडवलवाले हिंदुस्थानांत येऊन हिंदी लोकांशीं मिळून मिसळून काम करूं लागले तर हिंदी

लोकांना भांडवलाच्या कामांत बरीच मदत होईल व त्याचा मोबदला देखील इंग्रज भांडवलवाल्यांना मिळेल. याप्रमाणें हिंदुस्थानांतून जें द्रव्य इंग्लंडला मिळेल त्या द्रव्याचें इंग्रज लोकांनीं अमेरिका आस्ट्रेलिया वगैरे देशांतून धान्य खरेदी करावें, पण या धान्यखरेदीसाठीं हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यास वाढूं देऊं नये, त्यांच्या उत्पत्तीस अनेक अडथळे उत्पन्न करावे, त्यांच्या मालावर गैरवाजवी कर बसवून अयोग्य स्पर्धा करावी हें वाजवी नाहीं.

हिंदुस्थानांतील प्रांतांचीं निरनिराळीं संस्थानें करावीं. एक भाषा, समान आचारविचार व एक परिस्थिति असणाऱ्या सरासरी एक कोट लोकांचें एक संस्थान करावें. अशीं संस्थानें झालीं म्हणजे वर लिहिल्या-प्रमाणें शिक्षण, धंदे, व्यापार वगैरेंची वाढ व सुधारणा करण्यापुरतें त्यांचें उत्पन्न होईल. थोड्या उत्पन्नाच्या लहान संस्थानांना हीं कामें नीट व फायदेशीर रीतीनें करतां येणार नाहींत. हिंदुस्थानांत खेडेगांवांतून लोकसंख्या हल्लींच्या तेथील कामांच्या मानानें जास्त आहे. या जास्त लोकसंख्येस तेथेंच कारखाने काढून कामांत गुंतविलें पाहिजे. या लोकांना मोठमोठ्या शहरांत एकत्र आणण्यानें अनेक प्रकारचे तोटे होतात असा इतर देशांचा अनुभव आहे. या अनुभवानें आपण शहाणे झालें पाहिजे. यासाठीं दरएक तालुक्यांत एकादाच मोठा कारखाना चालू द्यावा. त्या कारखान्याच्या लोकांसाठीं तेथेंच स्वतःचें गांव वसवावें. ज्या ठिकाणीं ज्या कामाची सोय असेल त्या ठिकाणीं त्या कामाचे कारखाने काढावे, पण हे कारखाने पसरून पसरून अलग अलग असावे. खेडेगांवच्या दोनअडीच हजार लोकसंख्येला एक गांवपंचायत असावी. या गांवपंचायतीनें या लोक-संख्येचें सर्व प्रकारचें सार्वजनिक काम करावें. ही गांवपंचायत म्हणजे खेडेगांवचें सरकारच; या सरकारांत प्रतिनिधिमंडळ, काम करणारे नोकर, शिक्षण वगैरे संस्था, व सुधारणामंडळ यांचा समावेश व्हावा. हल्लीं तालुका लोकलबोर्डाकडे जीं कामें असतात त्याच प्रकारचीं कामें या गांवपंचायती-कडे राहतील. मात्र दिवाणी व फौजदारी हीं कामें देखील त्या भागापुरतीं या संस्थानाकडे देण्यांत येऊन योग्य माणसांची निवड त्या कामासाठीं यांनीं करावी व जोंपर्यंत तीं माणसें आपलें काम चोख रीतीनें करतात तोंपर्यंत त्यांस कोणी कामावरून बडतर्फ करूं नये असा नियम असावा.

मध्यवर्ती सरकार व प्रांतिक संस्थानें यांच्या दिमतीस सुधारणामंडळें व सुधारणामंत्री असावेत. या मंत्र्यांनीं सुधारणांसाठीं लागणारी माहिती गोळा करणें त्या माहितीचा विचार करणें व निर्णय ठरविणें, निर्णय अमलांत आणून त्यांत दुरुस्त्या सुचविणें वगैरे कामें करण्यासाठीं तज्ञ मंडळी नेमावी व या मंडळीच्या सल्ल्यानें हळूहळू सुधारणा अमलांत आणाव्या. या सुधारणांसाठीं लागणारे पैसे कसे मिळवावे, कोणत्या खात्या-कडे कोणती सुधारणा अंमलबजावणीस द्यावी, वगैरे मुद्यांवर लोकांकडून सुधारणासाठीं सूचना मागवाव्या, व ज्या योगें सुधारणा लवकर व पूर्ण-फलदायी होतील अशा सर्व गोष्टींसाठीं तज्ञ पुढाऱ्यांचीं मंडळें नेमावीं.

मध्यवर्ती सरकार व प्रांतिक संस्थानें यांत उत्पादक मंत्रिमंडळ निवडलें पाहिजे. कोणच्या प्रदेशांत काय उत्पन्न करतां येईल, तें उत्पन्न करण्यास लोक कसे तयार करावे व या उत्पन्न झालेल्या मालाचें काय करावें याचा विचार व त्याप्रमाणें काम या उत्पादनखात्यानें करावयाचें असावें. या मंडळानें सर्व देशाची पहाणी करून या देशांत कोणकोणत्या प्रकारची संपत्ति, किती व कोठें आहे याची माहिती गोळा करावी, व लोकांत कामें करण्याची शक्ति व ज्ञान किती आहे, यांचें टिपण करावें. मग या दोहोंचा नीट उपयोग करून देशांतील संपत्तीचा योग्य उपयोग व फायदा लोकांस घेतां येईल अशी व्यवस्था करावी. ज्यांना उद्योग नसेल अशांना उद्योग लावून देणें, जे कामें करीत नसतील त्यांना कामें करावयास लावणें व कामें करणारांना त्यांच्या कामास लागणारी मदत करणें हीं या उत्पादनमंडळाचीं मुख्य कामें होत.

वर लिहिलेल्या दोन्ही म्हणजे सुधारणामंडळ व उत्पादनमंडळ या दोन्ही संस्था फक्त माहिती गोळा करणें, विचार करणें व निर्णय ठरविणें याच कामासाठीं उत्पन्न करावयाच्या. अंमलबजावणीचें किंवा जरूर ते कायदे करण्याचें काम यांचें नाहीं; हीं कामें सरकारी नोकर व लोकप्रतिनिधि यांचीं होत. तात्पर्य, नव्या रचनेंत चातुर्वर्ण्य संस्था प्रस्थापित झाली पाहिजे ती अशी:—

१ माहिती गोळा करणें, विचार करणें व निर्णय ठरविणें हें काम एका वर्गाकडे.

२ या निर्णयाप्रमाणें जरूर ते कायदे करून त्यांची अंमलबजावणी करणें हें काम दुसऱ्या वर्गाकडे.

३ हे निर्णय अंमलांत आणण्यासाठीं लागणारें द्रव्य पुरविण्याचें काम तिसऱ्या वर्गाकडे.

४ वर लिहिलेल्या तिन्ही वर्गांचे दिमतीस राहून ते सांगतील तें काम करणारे नोकर पुरविण्याचें काम चवथ्या वर्गाकडे.

याप्रमाणें राष्ट्रांतील कोणत्याही एका वर्गाकडे पूर्ण सामर्थ्य राहूं नयें व जें होणें तें चारी वर्गांच्या सहकार्यानें व्हावें अशी योजना नव्या व्यवस्थेंत असली पाहिजे.

दरसाल हिंदुस्थानांत दहा कोटींपासून तीस कोटींपर्यंत कर्ज शिक्षण व उद्योग धंदे या कामासाठीं काढावे. प्रत्येक प्रांतिक संस्थानानें आपल्या प्रांतापुरतें कर्ज आपल्या प्रांतांत उभारावें व त्याच्या फेडीची व्यवस्था देखील आपली आपण करावी. हें कर्ज तीस ते पन्नास वर्षांत फेडावें व हें फेडण्यासाठीं व व्याजासाठीं दरसालचा हप्ता सालोसालच्या साऱ्यांतून देण्यांत यावा. याप्रमाणें ही कर्जफेडीसाठीं लागणारी रक्कम फार मोठी होणार नाहीं व ही प्रांतिक संस्थानाला सहन करण्यासारखीच राहील. याप्रमाणें तीस किंवा पन्नास वर्षांत देशांत इतकी सुधारणा व संपन्नता येईल कीं हें कर्ज त्यावेळीं सहज फेडतां येईल. उद्योगधंदे हे राष्ट्राचा जीव कीं प्राण असून शिक्षण हा त्याचा पाया आहे. या दोन्ही बाबींकडे गेल्या शंभर वर्षांत फार दुर्लक्ष झालें आहे व ही जी मोठी चूक झाली त्या चुकीचें प्रायश्चित म्हणून आपण या कामीं बिलकूल आळस अगर कसूर करतां कामां नये.

लोकांनीं स्वावलंबनानें या कामीं लक्ष घालून कसें काम करावें याचें दिग्दर्शन वर आलें आहेच व याचा सविस्तर तपशील पुढें निरनिराळ्या प्रकरणांत येणार आहे. संघस्थापनेपासून कामाला सुरवात होऊन तें काम वाढत वाढत सर्व देश व त्याचे सर्व अवयव व्यापून राहिलें पाहिजे. या जाळ्यांत कामांचे सर्व प्रकार व त्यांचा सर्व देशापर्यंतचा व्याप आला पाहिजे. सारांश एका बाजूनें सरकार व दुसऱ्या बाजूनें लोकांचें संघ यांनीं हें राष्ट्रकार्य उचलून धरलें पाहिजे म्हणजे हें काम उत्तम व लवकर होईल.

या गोष्टींसंबंधानें हिंदी लोकांचें लक्ष विशेषतः खालील गोष्टीकडे लागलें पाहिजे.

(१) राजकीय बाबींत हिंदुस्थानची स्थिति जी केवळ ताबेदारीची आहे ती बदलून त्या ठिकाणीं मालकी अधिकार चालवितां आला पाहिजे. इंग्लंडमधून चांगले वाईट जे हुकूम सुटतील ते मुकाट्यानें पाळण्याचे ऐवजीं योग्य तेथें ते धाब्यावर बसविण्याचीहि सत्ता हिंदी लोकांना पाहिजे.

(२) आर्थिक बाबींत व्यापाराचा सर्व प्रकारचा व्याप हिंदी लोकांच्या हातीं पाहिजे. तो तसा येण्यासाठीं त्यांनीं लागेल तें भांडवल गोळा केलें पाहिजे, लागेल तें शिक्षण संपादन केलें पाहिजे, लागतील तीं सर्व साधनें मिळविलीं पाहिजेत. तात्पर्य कोणत्याहि बाबींत या कामीं हिंदी जनतेला परक्यांच्या तोंडाकडे पहावें लागतां नये.

(३) सामाजिक बाबींत सर्व लोकांचा सारखा दर्जा असून त्यांत मोकळा व्यवहार व्हावयाला पाहिजे. इतर देशांत इतर स्वतंत्र राष्ट्रांच्या लोकांना जो मान व मोकळीक मिळते ती हिंदी लोकांनाहि मिळाली पाहिजे. असें समानत्व पत्करतांना हल्लींच्या सामाजिक व्यवस्थेंत जे गुण आहेत ते तसेच राहूं देण्याची खबरदारी घेतली पाहिजे. कारण निव्वळ सामानत्वामुळें पाश्चात्यांत अनेक दोष उत्पन्न झाले आहेत ते आपण टाळले पाहिजेत.

या प्रमाणें साम्राज्याचा भागीदार म्हणून हिंदी राष्ट्र व्यवहारांत दक्ष, समाजव्यवस्थेंत पूर्ण व राजकारणांत स्वतंत्र असें व्हावें व त्याला त्याच्या स्वतःच्या मताशिवाय बाहेरचा कोणीहि 'नाहीं होय,' म्हणूं शकूं नये किंवा याबाबत त्याला दुसऱ्या कोणाच्या तोंडाकडे पहावें लागूं नये अशी व्यवस्था झाली पाहिजे. या गोष्टी होण्यासाठीं पहिल्यानें लोकांना जुटीनें व सलोख्यानें कामें करण्याची पद्धतशीर संवय लागली पाहिजे व सरकारनें या कामीं मनःपूर्वक व लक्ष लावून हिंदी जनतेस मोकळ्या हातानें मदत केली पाहिजे. या गोष्टी साधण्याच्या कामीं आपण तत्काळ लागलें पाहिजे.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें सर्व देशभर संघांचें जाळें पसरून जुटीनें काम करण्याची संवय लागल्यावर जी कांहीं सरकारकडून मदत मिळेल ती सावधगिरीनें स्वीकारण्यांत लोकांनीं कसूर मुळींच करूं नये. ज्या ज्या बाबींत सरकारचा व जनतेचा मतभेद होईल अगर इंग्रज मुत्सद्यांचा त्याला विरोध दिसेल तेथें आपल्या स्वतःच्या हिंमतीवर कामें करण्याची त्यांची तयारी पाहिजे व या कामीं चिकाटीनें व स्वार्थत्यागपूर्वक त्यांच्या पुढाऱ्यांनीं कामें शेवटापर्यंत पोंचविलीं पाहिजेत. या सर्व कामांचा मुख्य भाग म्हणजे संघस्थापना व संघानें कामें करण्याचें अंगवळणीं पाडणें हें होय. संघांशिवाय कोणतेंहि मोठें काम हातीं घेतां येणार नाहीं व जरी कदाचित् एखादें काम एकट्यादुकट्या माणसास हातीं घेतां आलें तरी संघाचें शिक्षण त्यानें जनतेस मिळणार नाहीं. यासाठीं महत्त्वाचा असा प्रश्न हाच आपल्या पुढें दत्त म्हणून उभा रहातो कीं, वर सांगितल्याप्रमाणें संघ स्थापन करून एकजुटीनें व मोठ्या नेटानें काम करण्यापुरती शक्ति हिंदुस्थानांत आहे कां ? असें करण्याला लागणार धीर व नेट हिंदी जनतेंत उरला आहे कां ? ही अगदीं साधी पण अत्यंत अवश्य गोष्ट हिंदी जनतेच्या हातून पार पडेल कां ? जर हें काम हिंदी लोकांना साध्य करून दाखवितां आलें तर त्यांचा मोठा जयजयकार होणार आहे यांत संशय नाहीं. मग हिंदुस्थान हें जगांत एक अद्वितीय राष्ट्र आहे असें सिद्ध होईल. या मोठ्या कीर्तीसाठी हिंदी लोकांनीं सर्वव्यापी पण साधे संघ स्थापन करण्यास सुरुवात करून चिकाटीनें व धीरानें कामास लागलें पाहिजे. या कामांत अडचणी मोठ्या आहेत पण मिळणारें बक्षीसहि तितकेंच मोठें आहे. महत्कीर्ति महत्कृत्य केल्याशिवाय मिळत नसते. समर्थ म्हणतात तें अक्षरशः खरें आहे कीं,

सुख पहातां कीर्ति नाहीं। कीर्ति पहातां सुख नाहीं॥
केल्यावीण काही नाहीं। केव्हां ही॥ १॥
मरावें परी कीर्तिरूपें उरावें।

हें ध्येय प्रत्येक हिंदवासीयानें डोळ्यांपुढें ठेऊन काम केलें पाहिजे.

या कामासाठीं फार जोराची चळवळ केली पाहिजे, लोकांचा आळस व दुराग्रह पार मोडून काढले पाहिजेत, त्या जागीं योग्य आकांक्षा व उत्साह

उत्पन्न केले पाहिजेत, लोकांत संपन्नता व स्वसंरक्षण करण्याची धमक आणली पाहिजे. याबाबद पाश्चात्य देशांनीं स्वीकारलेले कांहीं उपाय आपण अंगीकारण्यालायक आहेत. उदाहरणार्थ, एका म्युनिसिपालिटीने खालील जाहिरनामा लावला होता.

"या ठिकाणीं परंपरेचें दास्य नसून प्रत्येक वस्तूची किंमत गुणांवरून करावयाची आहे. जें करावयाचें त्या प्रत्येकाला एकच कसोटी लावावयाची कीं "अशानें आयुष्याच्या सुखांत भर पडेल काय ?" व या कसास उतरलेल्या सर्वांचा अंगीकार करावयाचा."

दुसऱ्या एका शहरानें नागरिकांना हा उपदेश प्रसिद्ध केला होता; "आपण स्वस्थ बसलों तरी लोक आपल्यासाठीं कामें करतील अशी जर तुमची समजूत असेल तर ती साफ चुकीची आहे. हें काम प्रत्येकानें केल्याशिवाय केव्हांहि होणार नाहीं."

तिसऱ्या शहरानें चोंहोकडे हा जाहिरनामा वांटला.

"शहरें वाढत नसतात. तीं रचावी लागतात"

प्रत्येक घरांतील प्रत्येक माणसाला हें तत्व पढविलें पाहिजे कीं आपलें काम आपण विचार करून आपणच केलें पाहिजे. दुसऱ्यावर याबाबद टेकतां कामा नये ! व्यक्तीचें हित स्वतःच्या मेहनतीनें व समाजाचें हित सगळ्यांच्या एकवटलेल्या जोरानें होत असतें. आपल्या स्वाभाविक शक्तीचा उपयोग न केल्यानें त्या शक्ती नाहींशा होत असतात.

कोणत्याहि प्रदेशांत जेव्हां जेव्हां कोणतेंहि मोठें काम करण्याचा प्रश्न उत्पन्न होईल तेव्हां स्थानिक संघानें त्या कामाचा विचार करण्यासाठीं अत्युत्तम माणसें गुंतविलीं पाहिजेत. त्यांनीं पूर्ण विचार करून एकमतानें निर्णय केले पाहिजेत व त्या निर्णयांप्रमाणें सर्व लोकांनीं मुकाट्यानें आचरण केलें पाहिजे. असे प्रश्न म्हणजे एखाद्या जिनसेची पैदास वाढविणें, एकादा नवा प्रचार पाडणें, एकादा कलंक धुवून काढणें, एकादी संस्था स्थापन करणें किंवा एकाद्या सार्वजनिक कामासाठीं वर्गणी गोळा करणें असेल, पण असलें कोणतेंहि काम आपण किती आस्थेनें, किती झपाट्यानें व किती टापटिपीनें उरकतों यावरून आपल्यांत स्वराज्यप्राप्तीची किती योग्यता आली आहे हें स्पष्ट समजणार आहे. याप्रमाणें आपल्या तयारीची

वेळोवेळीं परीक्षा होऊन जनतेंत त्याबद्दल उत्साह उत्पन्न होणार अगर वाढणार आहे. संघानें काम करण्याची हातोटी ही मोठी शक्ति आहे. कोणालाहि ही शक्ति अंगीं बाणवितां येते व ही शक्ति किती आली हें अशा रीतीनें अजमावून पहातां येतें. अशा प्रकारें एक काम तडीस गेलें तर लोकांचीं तसलीं कामें करण्याची शक्ति दसपट वाढते.

या ठिकाणीं हें व त्या ठिकाणीं तें काम करण्यासाठीं चार मंडळी झटत असली म्हणजे झालें नाहीं. सर्व बाजूंनीं सर्व लोकांनीं आपआपल्या परीनें स्वराज्यासाठीं उठावणी केली पाहिजे. मूर्ति तितक्या प्रकृति या न्यायानें प्रत्येक मनुष्य आपल्या शक्तीप्रमाणें मार्ग काढील; व तो त्यास मोकळेपणें वापरूं द्यावा. जर प्रत्येक व्यक्तीनें या कामीं आपला अल्प पैसा, अल्प वेळ, अल्प सामर्थ्य आपल्या परीनें पण या एका कामाकडे लावलें, निश्चयपूर्वक व कळकळीनें लावलें, तर अशा सर्वांची बेरीज किती तरी मोठी होईल. आपल्या सामर्थ्याप्रमाणें लहान मोठा एक एक दगड श्रीरामचंद्राच्या अठरा पद्म वानरांनीं टाकतांच समुद्र भरून निघून सेतु झाला. सेतूंत प्रत्येक दगडाची जरूर होती. नुसत्या लहान दगडांनीं किंवा नुसत्या मोठ्या शिलांनीं हें काम झालें नसतें. अत्यंत मऊ वस्त्रगाळ चुन्याच्या कणापासून तों डोंगराएवढाल्या शिळांपर्यंत सर्व दगडांची मिळून ही प्रचंड रचना झालेली होती. सर्व राष्ट्रकार्यांची स्थिति याचप्रमाणें असते व असें झालें तर कितीहि मोठा पराक्रमी रावण मारला गेल्यावांचून रहाणार नाहीं.

ज्या ज्या हिंदी माणसानें वर लिहिलेल्या गोष्टींचा नीट विचार केला असेल व ज्याला ज्याला त्या गोष्टी नीट समजल्या असतील त्याला आपल्या हिंदुस्थानची हीन स्थिति पाहून लाज वाटेल व त्याची उन्नति करण्याची उमेद येईल. प्रत्येक हिंदी माणसाला ही लाज व ही उमेद वाटेल असें मात्र आपण केलें पाहिजे. या कामाला लागणारीं वर्ष दोन वर्षें आपण जाणते लोक झटलों तर स्वराज्य ही गोष्ट सुखानें साध्य होईल असें वाटतें. कामांत अडचणी आहेत, मोठ्या अजस्त्र अडचणी आहेत. पण त्या दुस्तर नाहींत. ह्या अडचणी आपण जुटीनें सहज पार पडूं. कित्येक पाश्चात्य लोक " हिंदुस्थान लवकरच नामशेष होण्याच्या पंथांत आहे " असें

प्रतिपादन करीत असतात. पण ती गोष्ट आपणांस खोटी करून दाखवितां येईल असें आमचें मत आहे. दयाघन परमेश्वर या देशाला या कार्यांत यश देण्यास कंबर बांधून उभा आहे व त्याच्या प्रेरणेनेंच हीं इच्छा आपणास होते असें आपण सर्वजण मनांत आणूं, आपापल्या परीनें झटूं, एकमेकांचे पाय मागें ओढणार नाहीं तर इतर देशांच्यापेक्षां सुद्धां पुष्कळ चांगलें राज्ययंत्र उत्पन्न करून सुख व संपन्नता संपादन करून दाखवूं. राम व रावण यांमधील संबंध आपणास या कामीं फार प्रोत्साहन देणारा आहे. रामाच्या वेळच्या वानरसेनेपेक्षां आपण कांहीं जास्त हीन स्थितीला पोंचलेले नाहीं, व म्हणून श्रीरामकृपेनें त्यावेळीं आपणांस जें करून दाखवितां आलें तेंच आज देखील करून दाखवितां येईल. आपल्या पुढाऱ्यांनीं मारुतिरायाचें उदाहरण ठेवून आपलें सर्व सामर्थ्य बिनमोबदला व बिनशर्त या कामीं वाहिलें पाहिजे. ईश्वर असें करण्यास त्यांस बुद्धि देवो अशी प्रार्थना करून हें प्रकरण संपवितों.

प्रकरण चवथें

इष्ट सुधारणा

एखाद्या इसमाची प्रकृति बिघडली असली म्हणजे वैद्य त्याला पहिल्यानें रेचक देतात. त्याचप्रमाणें एखाद्या संस्कृतींत अव्यवस्था झाली म्हणजे परमेश्वर त्या ठिकाणीं लढाई सुरू करीत असतो. गेल्या महायुद्धानें हें काम केल्याचें चांगलें निदर्शनास येतें. या युद्धामुळें प्रत्येक समाजाला आपल्या अंगीं असलेल्या दोषांची चांगली जाणीव झाली असून सर्व देशांनीं या दोषांचें निरसन करण्याचे प्रयत्न जोरानें चालविले आहेत. या प्रयत्नांत युद्धानें झालेली नासाडी भरून काढणें व युद्धासाठीं गोळा केलेलीं साधनें शांततेचा उत्कर्ष करण्याकडे वापरणें हीं कामें प्रमुख आहेत. याच्या खालोखाल अशा प्रसंगासाठीं आत्मसंरक्षणाचीं साधनें तयार ठेवणें हें काम महत्त्वाचें समजण्यांत येतें. देशांत उत्पन्न होणाऱ्या जिनसांची निपज वाढविणें, आपणांस लागणाऱ्या सर्व जिनसा आपल्या देशांत उत्पन्न करणें, ज्या जिनसा आपल्या देशांत होत नाहींत अगर होणें शक्य नाहीं त्यावांचून निर्वाह करणें अगर त्यांचे ऐवजीं दुसरी कोणती वस्तु वापरतां येईल याची चौकशी करणें, आपल्या देशांतील माल बाहेर देशीं आपल्या गलबतें वगैरेंतून पाठविणें व बाहेर देशांचा माल आपल्या देशांत, आपल्याच गलबतें वगैरेंत आणणें, देशांत व्यावहारिक व धनोत्पादक धंद्याचें शिक्षण वाढविणें व या धंद्यांचा प्रसार करणें, देशांतील जनतेंत एकोपा करणें व देशांतील मजूरवर्गाची स्थिति सुधारणें हीं कामें या प्रयत्नांत अनुक्रमानें हातीं घेण्यांत येत आहेत. या कामांत हल्लीं जगांतील सर्व राष्ट्रें अगदीं गढून गेलीं आहेत. हिंदुस्थानाला सुदैवेंकरून या युद्धामुळें झालेली नुकसानी भरून काढण्याचें काम करण्याचें प्रयोजन नाहीं. हिंदुस्थानाचें या युद्धांत आज भरून न निघण्यासारखें नुकसान झालेलें नाहीं. सैन्य वगैरे लढाऊ साधनांची शांततेच्या कामांत उपयोग करण्याची काम-

गिरी हिंदुस्थानांत थोडीच आहे. परंतु हिंदुस्थानाला या युद्धामुळें मोठें कर्ज झालें असून महागाई व धान्याचा दुष्काळ या गोष्टींचा विचार हिंदुस्थानांत फार कळकळीनें करण्याची अत्यंत अवश्यकता उत्पन्न झाली आहे व या बाबींत काय करावें याचा विचार इंग्रज सरकार करीत आहे.

हिंदुस्थानांतील सार्वजनिक पुढाऱ्यांना, जनतेच्या पुढाऱ्यांना, हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेची मांडणी सुखकारक होईल अशा बेतानें कशी सुधारावी याच एका बाबीची मोठी विवंचना लागली आहे. असें होण्याचें मुख्य कारण म्हणजे गेलीं शंभर दीडशें वर्षें या देशांत राजकीय, सामाजिक व आर्थिक या बाबींचा मोकळ्या मनानें व योग्य रीतीनें विचार सुद्धां करण्यांत आलेला नाहीं. अशी हेळसांड इतका काळपर्यंत झाल्यामुळें हा रोग इतका बलवान् झाला आहे कीं, तो असाध्य होऊन राष्ट्र क्षयरोगी होण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत. जपान देशानें या कामाला केवळ पन्नास वर्षांपूर्वी सुरुवात केली व हें काम अद्याप खुप जोरानें चालविलें आहे. व त्यामुळें आज जपान हें राष्ट्र जगांतील प्रमुख व बलाढ्य राष्ट्रांत गणलें जातें. हिंदुस्थान परतंत्र झाल्यामुळें गेल्या दीडशें वर्षांत हिंदुस्थानांत योग्य सुधारणा झाली नाहीं. यासाठीं जपाननें केलेल्या कामाला हिंदुस्थानाला आज सुरुवात करावी लागत आहे. पुष्कळ वर्षें दुरुस्ती न केल्यामुळें अस्ताव्यस्त झालेली इमारत हिंदुस्थानाला आज नवीन बांधण्याचें काम हातीं घ्यावयाचें आहे.

या दुरुस्तीच्या अगर नवीन रचनेच्या कामांत पहिल्यानें शिक्षणाची सुधारणा हातीं घेतली पाहिजे. शिक्षणानें नव्या उत्पन्न होणाऱ्या नागरिकांना योग्य वळण लागतें व पायांत याप्रमाणें दुरुस्ती झाली म्हणजे वरचा भाग आपोआप ठीक होतो. झाडाच्या मुळांतून नवीन व अधिक पौष्टिक रस पुरेसा मिळूं लागला म्हणजे वरचीं पानें, फुलें, फळें वगैरे आपोआप सुधारतात. आज हिंदुस्थानांत अशी स्थिति आहे कीं, दर चार गांवांपैकी तीन गांवांत मुळीं शाळाच नाहींत, आणि सर्व देशांत मिळून सुमारें तीन कोटी मुलें मुळींच शाळेंत जात नाहींत. शिक्षण सक्तीचें करण्याबद्दल सरकारी अधिकारी इतके बेफिकीर होते कीं जर एकादी म्युनिसिपालिटीसारखी संस्था तें फुकट देण्यास तयार झाली तर तिला तसें करण्यास परवानगी

नव्हती. अलीकडेच हा निर्बंध काढून टाकण्यांत आला आहे; पण त्यांतहि अनेक भानगडीचे प्रश्न आहेत. अशा स्थितींत हिंदुस्थानच्या एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा सात लोकांना सुद्धां नुसती अक्षरओळखहि नाहीं. मग नागरिक होण्याला योग्य अशा शिक्षणाची गोष्टच बोलूं नये. व या गोष्टीचें आश्चर्यहि वाटण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानाच्या लोकसंख्येच्या मानानें उच्च शिक्षण देणारीं विद्यापीठें तर फारच थोडीं आहेत व ही थोडीं सुद्धां पूर्ण शिक्षण देण्याइतक्या सुस्थितींत नाहींत. याबाबद सरकारनें सढळ हातांनीं स्वतः खर्च केला नाहीं व खाजगी संस्थांनीं हें काम हातीं घ्यावें इतकें त्यांस प्रोत्साहनहि दिलें नाहीं. हिंदुस्थानांतील असलेले जुने अनेक उद्योगधंदे इंग्रजी अमदानींत बुडाले व नवीन उद्योगधंदे सुरू करणें व त्यांची अभिवृद्धि करणें इकडे अजिबात लक्ष दिलें नाहीं. याशिवाय हिंदुस्थानांत सर्व प्रकारच्या परदेशी मालांस मुक्तद्वार ठेवल्यामुळें जे कांहीं धंदे अद्याप जीव धरून आहेत त्यांचीहि वाढ खुंटली आहे. याप्रमाणें दिवसें-दिवस हिंदुस्थान अधोगतीच्या मार्गांत सर्व प्रकारें खोल खोल जात आहे. हिंदुस्थानांतील तीन चतुर्थांश लोकसंख्या शेतीवर निर्वाह करीत असते व ही शेती सुद्धां शिक्षणाच्या अभावीं व गरीबीमुळें कश्यपांच्या वेळच्या हत्यारांनीं व पद्धतीनें अद्याप चालू आहे व जमीनीचा गेलेला कस भरून काढण्याचा मुळींच कोणीहि प्रयत्न सुद्धां करीत नाहीं. यामुळें दर एकरीं जमीनीचें उत्पन्न अत्यंत थोडें असून त्यांत शेतकऱ्याचें एक वेळीं कसें बसें पोट भरतें. इतकी उपासमार चालू आहे तरी लोकांना शेतीशिवाय दुसरा कांहीं तरी उद्योग लावून द्यावा अगर घरच्या घरींच शेतीला जोडून कांहीं पोट भरण्याचें दुसरें साधन दाखवून द्यावें अशी योजना करण्यांत आलेली नाहीं. हिंदुस्थानांत शेतींचें काम वर्षाकाठीं अवघें सहासात महिनेच असतें व बाकी उरलेल्या काळाचा सदुपयोग करण्यास शेतकऱ्यास शिकवूं नये ही मोठी खेदाची व लाजिरवाणी गोष्ट आहे. इतकी ही सर्व व्यवस्था सुधारलेल्या म्हणविणाऱ्या, कारागिरीवर आपल्या देशांतील सर्व लोकांचा निर्वाह सुखानें चालविणाऱ्या, जगांतील अत्यंत प्रबल व पहिल्या प्रतीच्या सरकारच्या नजरेखालीं व तिकडून मुद्दाम निवडून आणलेल्या मोठमोठ्या पगारांच्या नोकरांकडून घडवून आणली आहे.

हिंदुस्थान देशांतील उत्पन्नाच्या बाबींची योग्य वाढ झाली नाहीं याचें कारण हिंदी लोकांना ती वाढ करण्याचें शिक्षण व वावहि मिळाली नाहीं, व इंग्रज लोकांना त्या वाढीची अवश्यकता लागली नाहीं. आतां इंग्रज लोकांचें लक्ष या वाढीकडे लागत आहे व ही वाढ झाली पाहिजे ही गोष्ट त्यांना पटूं लागली आहे. जर इंग्रजी राज्य हिंदुस्थानांत होतांच हिंदी लोकांना जरूर तें यांत्रिक शिक्षण व नवीन उत्पन्नाच्या वाढीला लागणाऱ्या सवडी दिल्या गेल्या असत्या तर त्याच्या प्राचीन परंपरागत हस्त-कौशल्यामुळें जगांतील कोणत्याहि देशांतील मालाला मागें टाकतील अशा जिनसा त्यांनीं निर्माण केल्या असत्या, व हल्लींच्या काळीं हिंदुस्थान हें अद्भुत सामर्थ्यसंपन्न राष्ट्र झालें असतें. आतां अशी स्थिति आहे कीं, धंदे व व्यापार यांमध्यें मोठें भांडवल व अफाट कारखाने यावांचून इतर देशांच्या चढाओढींत हिंदुस्थानाचा निभाव लागणार नाहीं. विलायतेंत अशा कार-खान्यांना सरकार उत्तेजन व मदत देतें. पण हिंदुस्थानांत अशा कार-खान्यांना इंग्रजी व्यापाराचें भयंकर प्रतिस्पर्धी समजण्यांत येतें. इतकेंच नव्हे तर इंग्रजांच्या व्यापाराचा शत्रु तो इंग्रजांच्या सामर्थ्याचा व सत्तेचा शत्रु समजण्यांत येतें. सन १९०६ च्या स्वदेशी चळवळीच्या वेळीं रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूजच्या संपादकांनीं "हिंदुस्थानची स्वदेशी चळवळ म्हणजे इंग्लं-डनें जगावें कां हिंदुस्थाननें जगावें असा प्रश्न आहे व या प्रश्नाचें विलायत-सरकारनें काय उत्तर द्यावें हें मी सांगायला नकोच " असें प्रतिपादन केलें होतें. गेल्या महायुद्धाच्या वेळीं मात्र जर आज हिंदुस्थानदेश संपन्न व समर्थ असता तर त्यानें आपल्यास फार मोठी मदत केली असती व मग अमेरिकेसारख्या प्रतिस्पर्धी राष्ट्राची मदत हात जोडून मागण्याचा प्रसंग आला नसता असें इंग्रज मुत्सद्यांना वाटलें. अजूनहि याबाबद इंग्रजी मुत्सद्दी योग्य दृष्टीनें विचार करतील तर हिंदुस्थानची भरभराट व समर्थपणा म्हणजे ब्रिटिश साम्राज्याची भरभराट ही गोष्ट त्यांच्या लक्षांत नीट ठसेल. झालेल्या चुकीची मनोभावानें दुरुस्ती करण्यांत आली तर ब्रिटिश साम्राज्य जगांत अजिंक्य होईल हें कोणीहि सांगूं शकेल.

उद्योगी असणें हा एक हिंदुस्थानांत गुन्हा समजला जातो असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. कोणतेंहि काम शिस्तीनें व व्यवस्थितपणानें

करणारा इसम इंग्रज अधिकाऱ्यांच्या रोषाला पात्र झाल्यावांचून रहात नाहीं. आजपर्यंत इंग्रज अधिकाऱ्यांनीं ज्या चुका केल्या त्यांची परंपरा व कडू फळें प्रत्येक व्यवस्थित काम करणाऱ्या माणसाला पावलोपावलीं जाणवतात व तो त्याबद्दल त्यांना दोष देण्यास उद्युक्त होतो. आपल्यास दोष देणारा, आपणांस नांवें ठेवणारा इसम कोणाच्याहि रोषास पात्र होणें साहजिक आहे. व्यवस्थितपणें काम करणारा माणूस असे दोष दाखवूं लागला व रोषास पात्र झाला म्हणजे त्याच्या व्यवस्थितपणामुळें न्यायानें त्याला कांहीं शिक्षा वगैरे करतां येत नाहीं व मग त्याचें तोंड बंद करणें व आपली जनतेंत होणारी अपकीर्ति थांबविणें या कामासाठीं अधिकाऱ्यांना अन्यायाची कांस धरणें भाग पडतें. याप्रमाणें चुकीच्या रस्त्याला लागलेला मनुष्य काय करील व काय करणार नाहीं याचा नियमच राहत नाहीं. अशा तऱ्हेनें हिंदुस्थानांतील सन्माननीय माणसें व त्यांचे उद्योग गुन्हेगार ठरून त्यांना कशी शिक्षा भोगावी लागते याचें उत्तम उदाहरण म्हणजे हिंदी कापडावर बसविलेली जकात होय. हिंदुस्थानांतील गिरण्यांत व हातमाग वगैरेवर उत्पन्न होणारें कापड हें उद्योगी व व्यवहारदक्ष माणसाचें काम आहे व या कामासाठीं जकातरूपी दंड त्यांना निरर्थक भरावा लागतो. याशिवाय खादी वापरणारा, देशी पोषाकाची पद्धत कायम ठेवणारा इसम पाहतांच कित्येकांना राग येतो तो निराळाच. ब्रिटिश साम्राज्यांतील कानडा देश विलायती कापडावर पंधरा टक्के जकात घेतो व शेजारच्या संयुक्त संस्थानांतील कापडावर तर बावीस ते पंचवीस टक्के जकात घेतो व याप्रमाणें आपल्या देशाच्या कारागिरांचे व उद्योगी माणसांचें संरक्षण करतो. जगांत हल्लीं असा कोणताच देश हयात नाहीं कीं, जो आपल्याच देशाच्या कारागिरीवर जकात बसवून कारागीर व उद्योगी माणसांना दंड करतो. पण ही गोष्ट हिंदुस्थानांत आहे !

हिंदुस्थानांत परदेशी मालाला पूर्ण मुक्तद्वार असून देशांत उत्पन्न होणाऱ्या मालावर मात्र जकात वगैरेची धोंड पडते. परदेशांत हिंदुस्थानांतील व्यापारी व्यापारासाठीं गेले तर त्यांना सरकारकडून कोणतीहि आर्थिक, किंवा राजकीय सवलतीची मदत करण्यांत येत नाहीं. पेढ्यांनीं परदेशीं पेढ्या स्थापण्यास मदत, व्यापाऱ्यांना भांडवलाची सवलत, परदेशच्या

लोकांनीं हिंदी व्यापाऱ्यांना सभ्यपणें वागविलें पाहिजे असा आग्रह, हिंदुस्थानांतून बाहेर माल पाठवील त्याला बक्षीस अशा प्रकारची कोणतीहि सवलत, हिंदी सरकार आपल्या हिंदी प्रजाजनांना देत नाहीं. परदेशाची रड बाजूला ठेवली तरी प्रत्यक्ष ब्रिटीश साम्राज्यांत हिंदी व्यापाराला योग्य मदत तर नाहींच पण निःपक्षापात रीतीनें वागविण्यांत देखील येत नाहीं. कित्येक वेळां तर चिनी किंवा जपानी व्यापारी व कारागीर यांना ब्रिटिश साम्राज्यांत जसें वागवितात तितकें सौजन्य सुद्धां हिंदी लोकांना वागविण्यांत दाखविण्यांत येत नाहीं व याबद्दल हिंदुस्थान सरकारला रागहि येत नाहीं. तात्पर्य, हिंदुस्थानांत, हिंदुस्थानाबाहेर ब्रिटिश साम्राज्यांत अगर परदेशांत हिंदी लोकांच्या उद्योगीपणाला व बुद्धिवैभवाला उत्तेजन येईल, निदान त्यांची योग्य चहा होईल इतकी सुद्धां व्यवस्था हिंदुस्थान सरकार करीत नाहीं. विलायत सरकारच्या, विलायतच्या लोकांच्या स्वार्थासाठीं असें करण्यांत आलें तर तें कदाचित् क्षम्य समजण्यांत येईल. पण जेथें विलायत सरकारचा स्वार्थ नाहीं तेथें म्हणजे ब्रिटनखेरीज ब्रिटिश साम्राज्यांत व इतर परदेशांत तरी हिंदी व्यापार, हिंदी उद्योगधंदे, हिंदी उद्योगी व पराक्रमी माणसें यांची जोपासना होऊन त्यांस उत्तेजन येईल असें धोरण सुद्धां विलायत सरकार ठेवीत नाहीं; इतकी त्या सरकारची हिंदुस्थानांतील गोष्टींबद्दल आस्था आहे. ही स्थिति महायुद्धानंतर बदलेल असें वाटलें होतें. पण दोस्तांचा जय झाल्यानें असा बदल होण्याची जरूरी उरली नाहीं असें दाखविणारें वर्तन आज ब्रिटिश मुत्सद्दी करीत आहेत.

या सर्व अनास्थेचा परिणाम हिंदुस्थानावर फार वाईट झाला आहे. कानडा किंवा संयुक्त संस्थानें या देशांतील एक साधा कौशल्य नसलेला मजूर एका आठवड्यांत जें द्रव्य मिळवितो तितकें द्रव्य मिळविण्यास हिंदी मजुराला एक वर्षहि पुरत नाहीं. हिंदुस्थानांतील सगळ्या लोकसंख्येचें एकंदर वार्षिक उत्पन्न विलायतेंतील तितक्याच लोकांच्या उत्पन्नाचा विसावा हिस्सा आहे व अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांतील तितक्याच लोकसंख्येचें उत्पन्न हिंदी लोकांच्या उत्पन्नाच्या तीसपट आहे; असें असून सुद्धां इतक्या उत्पन्नांत या तेहतीस कोटी लोकांना आपला निर्वाह करून त्यांतच सगळ्या जगांत भारी पगाराची एक नोकरशाही पोसावी लागते.

हिंदुस्थानांतील लोकांच्या या कमी उत्पन्नाचें कारण हिंदुस्थानांतील लोक ज्यांत उत्पन्न किंवा नफा कमी अशा धंद्यांत गुंतलेले आहेत हें होय. धंद्यांतल्या धंद्यांत सुद्धां जास्त उत्पन्नाचे धंदे परकीय लोकांच्या ताब्यांत आहेत. भारी पगाराची नोकरी परकीय लोकांची, भारी नफ्याचे व्यापार परकीयांचे, भारी फायद्याचे कारखाने परकीयांचे, भारी उत्पन्नाच्या खाणी परकीयांच्या, भारी किंमतीचे जिन्नस परकी लोक पिकवितात. याप्रमाणें सर्व जास्त संपत्ति परकी लोकांच्या पदरांत पडते. स्वदेशांतच हिंदी लोकांची ही कुचंबणा; मग परदेशांत किफायतशीर धंदे हिंदी लोकांना करूं देत नाहींत किंवा करण्यास वाव मिळत नाहीं हें सांगावयालाच नको. परकी लोक तरी हिंदी लोकांना अशी सवड कशाला देतील? जेथें प्रत्यक्ष इंग्रज लोकच तसें करूं देत नाहींत हें त्यांना दिसतें, तेथें त्यांना तरी काय म्हणणार? इंग्रज लोकांना आपल्याच करणीमुळें "या हिंदी लोकांना असें करूं द्या किंवा कां करूं देत नाहीं" असें म्हणतां येत नाहीं. फार काय! पण एखाद्या हिंदी गृहस्थाला एखाद्या पाश्चात्य संस्थेचे सभासद व्हावयाचें असलें तर ती संस्था हिंदुस्थानांत त्या गृहस्थाला इंग्रज तश आपला बरोबरीचा समजतात कां असा प्रश्न करून मग त्यास सभासद होऊं देते. नुसत्या नांवासाठीं योग्य माणसाला सभासदत्व मिळालें नाहीं, पदवीच्या केवळ अक्षरांत बदल असल्यामुळें हिंदी पदवीधर कमी लेखला गेला अशीं उदाहरणें आहेत. तात्पर्य; इंग्रज लोकांचें पक्षपाती वर्तन हिंदी लोकांना जिकडे तिकडे नडतें व त्यांचा सर्वत्र पाणउतारा करतें.

हिंदुस्थानांतील राज्यपद्धतीचें धोरण, देशाचा उत्कर्ष करण्यापेक्षां, देशांत शांतता राखण्याकडे जास्त आहे. ज्याप्रमाणें एखादा आडमुठ्या पंतोजी शाळेंत मुलें काय शिकतात हें न पाहतां तो मुलें नुसतीं गप्प बसतात, गोंगाट वगैरे करीत नाहींत इतकेंच पहातो, त्याचप्रमाणें इंग्रज सरकार फक्त दंगेधोपे होत नाहींत असें पहाणें इतकेंच आपलें काम असें समजतें. ही शांतता सुद्धां निव्वळ दंडुक्यांनीं व पोलीसांच्या मदतीनें ठेवण्यांत येते. अशा रीतीनें लोकांची कर्तबगारी नाहींशी होते व त्यांची वाढ खुंटते या गोष्टीकडे डोळेझांक करण्यांत येते. अगदीं अलीकडच्या काळांत सुद्धां जुने दडपशाहीचे (इंग्रजी राज्य नवीन स्थापित झालें तेव्हां शांतता

स्थापित करण्यासाठीं केलेले अर्धवट लष्करी) कायदे नव्यानें अमलांत आणण्यांत आले आहेत. कायद्यांत असलेल्या कलमांचा ओढून ताणून शांतता स्थापित करतां येईल असा अर्थ लावण्यांत येतो. इतकी सामुग्री पुरत नाहीं म्हणून नवीन मुद्रण, भाषण व पर्यटनस्वातंत्र्यावर घाला घालणारे कायदे करण्यांत येत आहेत. अशा तऱ्हेचा कारभार कोणत्याहि सुधारलेलें म्हणून मानलेल्या राज्यांत पहावयाला सांपडणार नाहीं. तात्पर्य, प्रत्यक्ष इंग्रजी राज्य जरी सुधारलेलें असलें तरी त्याचा हिंदुस्थानांतील कारभार त्या सुधारलेल्या पद्धतीनें किंवा सुधारलेल्या नमुन्याप्रमाणें चालत नाहीं. हिंदी लोकहि स्वतः परप्रत्ययनेन (होयबा) व अप्रतिकारी (मुकाट्यानें सोसणारे) आहेत. त्यांची दृष्टी आपली जात, आपला पंथ, आपला व्यवसाय यापलीकडे जास्त विस्तृत असा राष्ट्रीय व्यवहार पहाण्यास असमर्थ आहे. राष्ट्रीय भावना, राष्ट्रीय आचार, राष्ट्रीय विचार त्यांच्यांत दृष्टोत्पत्तीस येत नाहींत. हल्लीं जगांत काय चाललें आहे हें न पाहतां ते दोन हजार वर्षांपूर्वीच्या गोष्टींत गुंग झालेले आहेत. "नवेन अनवं शोधयेत्" नव्या दृष्टीनें जुन्याकडे पहावें, किंवा जुन्यांत नवें मिसळून बदलेल्या काळाशीं समपद किंवा योग्य असावें हें कौटिल्याचें सूत्र त्यांना समजत नाहीं. ते अज्ञानी असल्यामुळें एक तर अगदीं जुन्याला चिकटतात अगर अगदीं नव्याशीं तद्रूप होतात. साधारण मध्यम अवस्थेंत त्यांना रहातांच येत नाहीं. परदेशीं प्रवास करणें त्यांना जिवावर येतें. नेहमीं दुसऱ्यावर भार टाकून बसण्याची संवय झाल्यामुळें पुष्कळ लोक निव्वळ बांडगुळें किंवा पोशे झाले आहेत. आपण स्वतः कांहीं करूं असें तर त्यांना वाटत नाहींच; पण आपणाला कांहीं तरी करतां येईल इतका आत्मविश्वास देखील त्यांना उरलेला नाहीं. फार झालें तर पूर्वजांची कीर्ति गावी व स्वस्थ उपाशी मरावें इतकेंच त्यांना समजतें. हिंदुस्थान देशांत एकमेकांना न शिवणारे असे कोट्यावधि लोक आहेत. आपणांस श्रेष्ठ समजणाऱ्या लोकांना आपण या लोकांना, आपल्या भावांना, खुशाल घाणींत लोळूं देतो हें बरोबर नाहीं; ही आपली लहान भावंडें, यांना उठवून धुऊन पुसून आपल्या बरोबरीस आपण आणलें पाहिजे अशी जाणीव नाहीं. कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या लोकांनाहि, आपण उठून आपलें आचरण वगैरे सुधारून, या आपल्या थोरल्या भावांच्या आदराला

पात्र व्हावें असें वाटत नाहीं. हेच लोक खिस्ती झाले म्हणजे जसे स्वच्छ व आचारशीलपणें वागतात तसे हिंदु असतांना वागत नाहींत. हिंदुत्वाला अमान्य असें अभक्ष्यभक्षण आपण करूं नयें, आपल्या देशाला शोभेल अशी स्वच्छता आपण पाळावी ही गोष्ट यांना समजत देखील नाहीं. तात्पर्य, दोघांनाहि एकमेकांबद्दल प्रेम व कळकळ वाटत नाहीं. दोघेहि असलेल्या स्थितीविषयीं अगदीं बेफिकीर व सुस्त आहेत. ही स्थिति अवश्य पालटली पाहिजे. ज्यानें त्यानें आपल्या जातिधर्माचा व्यवसाय करावा, समाजांत आपण आपल्या वांटणीचें काम पुरें पाडावें पण त्याशिवाय इतरत्र सर्वांनीं एकमेकांस सारखेपणानें वागवावें. चांभारानें आपला जोडे शिवण्याचा धंदा करून इतर राष्ट्रीय बाबींत इतरांबरोबरीनें लक्ष घालण्यास हरकत नाहीं. ब्राम्हणानें आपलें धार्मिक उपाध्येपणाचें काम करून सार्वजनिक बाबींत चांभाराची सल्ला घेण्यास व त्यास त्याचें कर्तव्य समजावून देण्यास तयार असलें पाहिजे. प्रत्येकानें आपल्या धंद्याचें आपलें विशिष्टत्व ठेवणारें गुप्त रहस्य आपल्यापाशीं ठेवून सर्वसामान्य व्यवहार शिकला व शिकविला पाहिजे हें यांना समजत नाहीं. पूर्वींची परिस्थिति हल्लीं बदललेली आहे, हें ओळखून सर्वांनीं एकमेकांस मदत केली पाहिजे. पूर्वींच्या शास्त्रांत वरिष्ठ जातींनीं सर्वत्र तूप वापरावें असें सांगितलें असून गरीबीमुळें ज्याप्रमाणें आपण तेल वापरतों, त्याचप्रमाणें पूर्वींच्या शास्त्रांत चांभार महार आपले शत्रु म्हणून त्यांस शिवूं नये असें सांगितलें असलें तरी ते पूर्वींचें शत्रुत्व बदललेल्या परिस्थितींत राहिलें नाहीं म्हणून त्यांना न शिवण्याचें तत्व सोडलें पाहिजे. जगांत नेहमीं जो आपला शत्रु, घातक, द्वेषी असेल तो अस्पृश्य असावा हें ठीकच आहे. त्याप्रमाणें हल्लींच्या काळीं काळे गोरे किंवा रंगित व बिनरंगी हे एकमेकांस अस्पृश्य आहेतच; मग आणखी त्या अस्पृश्य लोकांत आपल्याच कांहीं लोकांची निरर्थक भर घालणें अनवश्यक होय. शक्य तर हिंदु व मुसलमान यांचें सुद्धां द्वैत नाहींसें व्हावें. सुनी पंथाच्या या दोन्ही शाखा आहेत असें समजावें. हिंदी म्हणून नवीनच धर्माच्या या व हिंदुस्थानांतील सर्व धर्मशाखा आहेत असेंहि समजावें. हिंदु धर्म इतका व्यापक आहे कीं, त्यांत सर्व धर्मांचा समावेश होणें शक्य आहे. मूर्तिपूजक, मूर्तिपूजा न करणारे, शेंडी व जानवें

घालणारे व या गोष्टी नसणारे, मांसाहारी व मांस न खाणारे, दारू पिणारे व न पिणारे, अशा सर्व प्रकारच्या लोकांचा समावेश हिंदु धर्मात होऊं शकतो. प्रत्येकाचें स्वातंत्र्य राहण्यासाठीं आचारभेद, पंथभेद, त्यांत आहेत. अमुकच ग्रंथ, अमुकच मत, अमुकच व्यक्ति प्रमुख किंवा सर्वज्ञ मानावी असा त्याचा आग्रह नाहीं किंवा सर्वज्ञ मानूं नये असेंहि तो धर्म म्हणत नाहीं. तात्पर्य, स्वतंत्रता व परमतसहिष्णुता हे दोन या धर्माचे अढळ खांब आहेत व यासाठीं हा जगाचा धर्म होणें शक्य आहे व त्याप्रमाणें शक्य तर तो निदान सर्व हिंदुस्थानाचा धर्म व्हावा.

या श्रेष्ठ वरिष्ठ जातिभेदाप्रमाणेंच हिंदुस्थानांत स्त्री व पुरुष हे भेदहि बलवत्तर आहेत. हिंदु स्त्रियांना शिक्षण कमी व घरकामाशिवाय दुसऱ्या कामांत त्यांचा हातहि कमी आहे. त्यांच्याबद्दल "सबंध साळ्याची, अर्धी माळ्याची, मालकीण तेल्याची व ऋणकरीण ब्राम्हणाची" अशी म्हण प्रचारांत आहे. साळ्याची बायको नवऱ्याच्या बरोबरीनें काम करते, माळ्याची (शेतकऱ्याची) बायको त्याच्या निम्यानें काम करते, तेल्याची बायको मेहनतीचें काम न करतां दुकानच्या मालकिणीचें काम करते (हीच स्थिति इतर धंद्याची साधारण आहे) व ब्राम्हणाची बायको नवऱ्याच्या सापेक्षतेनें कांहींच (आर्थिक) काम करीत नाहीं. ब्राम्हणाची बायको द्रव्यसंपादनाचें काम करीत नसली तरी ती घरकामांत इतरांपेक्षां जास्त सुगरण असते व ब्राम्हणाच्या घरीं तितक्या उत्पन्नांत सुखसोई जास्त असतात हें विसरतां येणार नाहीं. बायकांना हिंदुधर्मकारांनीं स्वातंत्र्य फार कमी ठेवलें आहे व अंतर्व्यवस्था मात्र त्यांजकडे ठेवली आहे ही गोष्ट खरी. पण यामुळें स्त्री व पुरुष यांत जी स्पर्धा पाश्चात्य देशांत दिसते ती उत्पन्न झाली नाहीं व समाज हजारों वर्षें सुखानें नांदला हा फायदा कांहीं लहानसहान नाहीं. हिंदुस्थानांतील निम्मी लोकसंख्या याप्रमाणें धनोत्पादनाच्या कामांत मागें पडल्यामुळें त्या देशाच्या दरमाणशीं उत्पन्नाची सरासरी फार कमी पडते व सगळ्यांना पोटभर अन्न मिळण्यास हल्लीं अडचण पडते ही गोष्ट खरी. यासाठीं या आपत्काळीं आपण बायकापुरुषांनीं आपला फुरसतीचा वेळ कापसाचें सूत काढून कापड विणण्यांत घालविणें जरूर झालें आहे. माणसाला अन्न

व अच्छादन या गोष्टी मुख्य पाहिजेत; त्यांपैकीं अन्नासाठीं पुरुषांनीं आपला नेहमींचा धंदा करावा व आच्छादनासाठीं त्यांनीं रिकामपण व घरच्या इतर मंडळींनीं आपली फुरसत वापरली पाहिजे. असें केलें म्हणजे हिंदुस्थानाची बरीच ददात जाईल.

हिंदुस्थानची सामाजिक व्यवस्था अशी आहे कीं, त्यामुळें प्रजोत्पादनाला अद्याप अडथळा आला नाहीं, इतकेंच नव्हे तर केव्हां केव्हां जास्त प्रजोत्पादन होतें असें म्हणावें लागतें. लग्नें साधारणपणें लवकरच होतात व मुलाबाळांच्या पोटाची काय व्यवस्था वगैरे विचार न करतांच प्रजोत्पादन होतें. यामुळें प्रजा जरा जास्त होते खरी, पण इतर देशांपेक्षां व्यभिचाराचें प्रमाण फार कमी आहे. पाश्चात्य देशांत जरी पंचवीस वर्षांचे सुमारेंच लग्नें होतात तरी व्यभिचाराचें प्रमाण जास्त असून प्रजोत्पादन कमी आहे. त्या देशांत लग्नें करण्याची जी पद्धत आहे त्यामुळें स्त्रीपुरुषांचा फाजील संबंध येतो व या आतिरिक्त संबंधामुळें पुरुषांची प्रजोत्पादनशक्ति लवकरच नाहींशी होते. शिवाय प्रयत्नवादी समाजांत मुलाबाळांची काळजी करून मुलें न होतील अशी योजना करण्याकडेहि प्रवृत्ति आहे. अर्धपोटीं राहणाऱ्या, अर्धवट शिकलेल्या, अशक्त अशा कोट्यवधि माणसांपेक्षां पोटभर जेवणारीं ज्ञानसंपन्न व धडधाकट थोडीं माणसें बरीं ही गोष्ट हिंदुस्थानाला आतां फिरून नव्यानें शिकण्याचा प्रसंग आला आहे. हिंदुस्थानाची परिस्थिति इतक्या झपाट्यानें बदलली आहे कीं, हा विचार सुचून त्याप्रमाणें आचरण करण्यास त्याला सवडच मिळाली नाहीं. हजारों वर्षांच्या संवयी एक शें पन्नास वर्षांत सुटल्या नाहींत तर कांहीं आश्चर्य वाटावयाला नको. या बाजूकडे लोकांचें लक्ष हल्लीं लागलें आहे. पाश्चात्यांची लग्नपद्धति व स्त्रीपुरुषसंबंध एका अर्थानें वाईट आहेत ही जाणीव त्यांना झाली आहे. तरी ती पद्धति बदलणें जसें त्यांना अशक्य आहे त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या लोकांच्या कांहीं चालीरीती वाईट आहेत हें कळतें तरी त्या सोडणें त्यांना कठीण झालें आहे. हळूहळू या गोष्टी सुधारतील असें दिसतें. पण त्या पलीकडच्या काठाला जाऊं नयेत अशी खबरदारी घेतली पाहिजे.

हिंदुस्थानाची हल्लीं जी अव्यवस्था आहे तसली अव्यवस्था जर इतर

देशांची असती तर ती असाध्यच होती; पण हिंदुस्थानांत चिवटपणा किंवा स्थितिस्थापकता जास्त आहे व म्हणूनच हिंदुस्थानाला स्वराज्य प्राप्त होण्याची अद्याप आशा आहे. परिस्थितींत जरा पालट झाला कीं हिंदुस्थानाची स्थिति सुधारेल. स्वराज्य मिळतांच देशांत पाऊसपाणी ठीक होऊन आबादानी होईल. लोक व्यवस्थित व अल्पसंतुष्ट असल्यानें त्यांची सांपत्तिक स्थिति तेव्हांच सुधारेल. मोठे कारखाने निघाले नाहींत तरी देश आपल्या स्वतःच्या गरजा भागवून संपन्न होईल. लोकांच्या हाडींमासीं खिळलेली ज्ञानसंपन्नता व वैराग्य हीं हिंदुस्थानचीं मोठीं भाग्यचिन्हें आहेत. व्यक्तिशः व एकंदर लोकसंख्येच्या मानानें लिहिणें वाचणें जाणणाऱ्या लोकांची संख्या जरी कमी असली तरी त्यांचें तारतम्यज्ञान इतर कोणत्याहि देशापेक्षां जास्त आहे. एखादा अगदीं अडाणी भिल्ल जितकी नीति, धर्म, वेदांत वगैरे जाणतो तितकें उच्च ध्येयात्मक ज्ञान इतर देशांतील साधारण सुशिक्षित माणसाला देखील नसतें. तात्पर्य, हिंदुस्थानांत ज्ञान थोडें असलें तरी तें खोलपर्यंत रुजलेलें आहे व त्यामुळें जरा चालन देतांच त्यांत लागेल तितकें पीक येईल. अगदीं आधुनिक शिक्षणाचा विचार केला तरी आपणांस असें दिसेल कीं, यूरोपांतील कोणत्याहि देशांतील मुलांच्या संख्येपेक्षां हिंदुस्थानांतील शिकणाऱ्या मुलांची संख्या जास्त आहे. हिंदुस्थानांत आठच युनिव्हर्सिट्या असून त्यांच्या पदवीधरांची संख्या विलायतेंतील पंचवीस युनिव्हर्सिट्यांतील पदवीधरांच्या संख्येपेक्षां जास्त आहे. याप्रमाणें खोली थोडी असली तरी विस्तार जास्त असल्यामुळें एकंदर ज्ञानाची बेरीज हिंदुस्थानांत जास्त आहे व या समष्टि ज्ञानाचा फायदा घेण्यास आपण झटलें पाहिजे. हल्लीं हें ज्ञान विखुरलेलें आहे तें व्यवस्थित मांडून एकमुखी केल्यास पुष्कळ कार्य करतां येईल.

एकंदर हिंदी समाजाची नीट मांडणी केली, त्याच्या सामर्थ्याची एकमुखी व व्यवस्थित योजना केली व देशांतील शेती व उद्योगधंदे यांना चिकाटीनें शास्त्रीय ज्ञान व यंत्रसामुग्री यांची जोड दिली तर हल्लींच्या स्थितींत सुद्धां दहा वर्षांत देशाचें उत्पन्न दुप्पट व पंधरा वर्षांत तिप्पट करतां येईल. याच प्रमाणें योग्य जकाती ठेवल्या तर पंधरा वर्षांत परदेशीं जाणाऱ्या पक्क्या मालाचा व्यापारहि दुप्पट करतां येईल. शिक्षणाबद्दल

योग्य काळजी घेतली तर दहा पंधरा वर्षांत सर्व प्रजा साक्षर करतां येईल. लिहिणें, वाचणें व जमाखर्च इतकें शिक्षण सर्व माणसांना या दहा पंधरा वर्षांत देतां येईल. सन १९१९ सालचा कायदा जरी असमाधानकारक व अपुरा आहे तरी या असल्या मोडक्या कायद्याचा जर चांगल्या प्रकारें सरकारानें मनःपूर्वक उपयोग केला व लोकांच्या प्रतिनिधींनीं पक्षभेद विसरून देशहिताच्या दृष्टीनेंच त्याचा उपयोग करण्याचें ठरविलें तर हिंदुस्थानांत पुष्कळ गोष्टी घडून येतील. पण इंग्रज अधिकाऱ्यांची अधिकारलालसा व घमेंडखोरपणा व हिंदुस्थानांतील लोकांची एकमेकांचा घात करण्याची प्रवृत्ति यामुळें या देशाच्या प्रगतीला आजपर्यंत अनेक विघ्नें आलीं आहेत. सरकारी अधिकाऱ्यांनीं–हिंदी सरकारी अधिकाऱ्यांनीं–जर आपला अधिकार बरोबर कायद्याप्रमाणें चालविला तर देशाचें किती तरी कल्याण होईल. पण हल्लीं अधिकारी आपल्या जुलमानें इंग्रज अधिकाऱ्यांच्यावर ताण करतांना नेहमीं दिसतात. असा अतिक्रम करणें म्हणजे बढती मिळविण्याचें साधन व एकाची तात्कालिक बढती म्हणजे देशाचें चिरकालिक हित असें त्यांना वाटतें. बढती कोणाला तरी मिळणारच व ती कोणालाहि मिळाली तरी ती हिंदुस्थानाचेंच हित करते. पण आपण गैर वागून आपलें, सरकारचें व देशाचें अहित करतों हें हे शहाणे ओळखीत नाहींत.

अशा तऱ्हेनें हिंदुस्थानाच्या लोकांना आत्महित साधण्यास वाव ठेवण्यानेंच विलायतची दुर्बलता आपल्या नजरेस येते. प्रत्येक खात्यांत इतक्या जागा हिंदी लोकांना देणें त्यांना भाग पडतें यावरूनच हिंदी लोकांनीं मनांत आणल्यास त्यास स्वराज्य मिळविणें शक्य व सुलभ आहे ही गोष्ट सिद्ध होते. एका जिल्ह्यांत फक्त दहा वीस गोरे अधिकारी असतात व हे लोक आपल्या सर्व लोकांच्या विरुद्ध किती जातील ? व काय करूं शकतील ? पोलीस, लष्कर वगैरे सर्व खात्यांत हिंदी नोकर आहेत व त्यांच्या एकमुखी मागणीस वरिष्ठ अधिकाऱ्यांना मान देणें भाग आहे. पण हिंदी लोक ही आपली शक्ति ओळखतील तेव्हांना ! सर्वजण जर रास्त रितीनें वागूं लागले तर अन्यायानें बढती देणार कोणाला ? कोणालाहि बढती मिळाली तरी ती ताटांतच (हिंदुस्थानांतच) मिळणार. याप्रमाणें प्रत्येक बाबीचा

आपण नीट विचार करूं लागलों म्हणजे आपणांस असें दिसतें कीं, इंग्रज लोक हिंदी लोकांच्या आळसाशिवाय किंवा हिंदी लोक झोंपी न जातील तर हिंदुस्थान केवळ जुलमानें किंवा हत्यारांच्या जोरावर ताब्यांत ठेवण्यास असमर्थ आहेत. कायदा अपुरा आहे ही गोष्ट सर्वमान्यच आहे. पण आहे त्या कायद्यांत काम करावयाला, सुधारणा घडवून आणावयाला व एकीनें प्रयत्न करावयाला पुष्कळ वाव आहे. या पुस्तकांत विवेचन केलेल्या पद्धतीनें कामें करण्यांत जर आपण येतीं पांच वर्षें घालविलीं तर आपण अर्धे अधिक स्वराज्य मिळवूं व संपूर्ण स्वराज्याची पात्रता सर्वांच्या निदर्शनास आणूं. आपण या प्रमाणें चिकाटीनें व अंतःकरणपूर्वक खटपट मात्र केली पाहिजे. अशी सोन्याची संधी नेहमीं येत नसते. परमेश्वर संधी एकदांच देतो व तिचा उपयोग केला नाहीं तर फिरून तशी संधी लवकर येत नाहीं व पुष्कळ काळ वायां जातो. तसें शहाण्यानें केव्हांहि करूं नये.

गेल्या शंभर वर्षांत हिंदी लोक पुष्कळ गोष्टी शिकले व त्यांच्या आकांक्षाहि फार वाढल्या आहेत. सन १८१८ सालीं आपण मूर्ख, आपणांस राज्य चालवितां येत नाहीं, तेव्हां तें कोणाला तरी बक्षीस द्यावें, असें वाटत होतें; त्याच्याऐवजीं कोणी आम्हाला राज्य दिलें तर तें आम्ही असें चालवून दाखवूं कीं, लोकांनीं पहात रहावें अशी उमेद हल्लीं आली आहे. हिंदी लोकांची भांडणाची खोड जाण्यासाठीं त्यांना इतर लोकांशीं नौका, विमानें, सैन्य, व्यापार, उद्योगधंदे यांनीं लढावयाला शिकविलें पाहिजे. हिंदी लोकांची फाजील शक्ति आपसांत भांडण्यांत खर्च होते ती दुसऱ्यांशीं भांडण्यांत गुंतविली पाहिजे. त्यांना इकडे तिकडे बघावयाला देखील फुरसत मिळूं नये इतकें कामांत जखडून टाकलें पाहिजे. हिंदुस्थान सरकारचा व विलायत सरकारचा हिंदी कारभारांतील हात कमी करून हिंदी लोकांना कामें करण्यास जास्त वाव मिळाला पाहिजे. सरकार हा वात्र देईपर्यंत लोकप्रतिनिधींनीं खातीं वांटून घेऊन त्यांचें उत्पन्न, त्यांवरील अधिकारी, त्यांचीं कामें, त्यांचा खर्च, खर्च करण्याची पद्धति, त्या खात्यांत आपलें बोट शिरकाविणें, निदान आपला वचक तेथें स्थापन करणें या बाबींचा अभ्यास करण्यांत सगळा वेळ खर्च केला पाहिजे. खालपासून वरपर्यंतच्या सर्व पायऱ्यांवरील अधिकारी, त्यांचे

अधिकार व त्यांची अधिकार चालविण्याची पद्धत पाहून त्यांत लोकमताचा दाब कोठें, कसा व किती ठेवतां येईल हें पाहिलें पाहिजे. स्वराज्यांत जें काम आपणांस पुढें करावें लागणार त्याची सर्व माहिती आजच संपादन करून तिजवर आपली छाप पाडली पाहिजे. स्थानिक संस्था सर्वस्वी आपल्या आहेत, तर त्या लोकांना पूर्ण सुखदायी झाल्या–नव्हे केल्या–पाहिजेत. लोकांना काय पाहिजे, कोणतीं दुःखें आहेत, तीं कशीं जातील, यांचा विचार करून तीं तर सर्वथैव आपण नाहींशीं करूं अशी उमेद सर्व स्थानिक संस्थांतील सर्व प्रतिनिधींनीं बाळगिली पाहिजे. नगराचें कल्याण करणाऱ्या प्रत्येक बाबींत सर्वांचें एकमत असलें पाहिजे, म्हणजे या संस्था लोकांना फार सुखावह होतील व कामें करण्याची पद्धत लागेल.

हिंदुस्थान आजपर्यंत सार्वजनिक कामांत फार मागें आहे याचें कारण देशहिताकरितां काय व कसें केलें पाहिजे याचा कोणी चांगला विचारच केला नाहीं. तात्पुरती एखादी दुसरी बाब विचारांत घेऊन तेवढ्यापुरतें काम करण्याकडेच बहुतेकांनीं लक्ष दिलें. पण राष्ट्रीय, व्यापक दृष्टीनें विचार करून व्यवस्थित प्रकारची मांडणीच कोणीं केली नाहीं व त्यामुळें जरी आज पन्नास वर्षें कांहीं तरी सार्वजनिक काम आपण करीत आलों तरी आढावा पाहतां आपणांस कांहींच मोठें काम दाखवितां येत नाहीं. सार्वजनिक बाबींचा विचार केवळ जनहिताच्याच दृष्टीनें केला पाहिजे. त्यांत धरसोड अगर भीडभाड अगदीं उपयोगी नाहीं. तसेंच लोकांचा ओढा, त्यांची प्रवृत्ति व ऐपत यांचाहि योग्य विचार झाला पाहिजे. हे सर्व दोष बहिष्कारत्रयींत चांगलें निदर्शनास आले. नुसता तात्त्विक विचार करून राष्ट्रीय कार्य होत नाहीं. त्यांत व्यवहार, प्रत्यक्ष सुखःदुख आजपर्यंतच्या संवई या लक्षांत घेतल्या पाहिजेत. जनता ही पाण्याच्या प्रवाहाप्रमाणें आहे. पाण्याचा प्रवाह फिरवावयाचा असेल तर लांबपासून हळु हळु थोडें थोडें वळण देत जावें तेव्हां तो फिरतो. तसें न केलें तर प्रतिबंध करणाराला फोडून किंवा बगल देऊन तो आपला रस्ता धरतो. लोकमताची पण हीच स्थिति असते. तें हळू हळू व थोडें थोडें वळवीत गेलें तर वाटेल तिकडे वळेल. पण त्याला एकदम वळवूं म्हटलें तर तसें होणार नाहीं. लोकांपुढें मांडावयाचें ध्येय स्पष्ट व त्यांना सहज समजेल असें

पाहिजे. नुसतें तात्विक ध्येय जनतेला ग्राह्य होत नाहीं व म्हणूनच वेदांताचीं तत्वें उत्तम, निर्विवाद, सत्य व अनेक थोर पुरुषांनीं सांगितलेलीं अशीं आहेत तरी तीं लोकांच्या आचरणांत आलेलीं दिसत नाहींत. तीं व्यावहारिक नाहींत म्हणून असें होतें.

सार्वजनिक कामासाठीं जशी सरकाराची एक संघटित संस्था आहे तशीच लोकांचीहि, तिला तोड देण्याइतकी, संघटित संस्था पाहिजे. सरकार जसें केवळ सार्वजनिक कामालाच वाहून घेतलेलें आहे तसेंच याहि लोकसंस्थेची मंडळी केवळ सार्वजनिक कामाला वाहून घेतलेली पाहिजे. त्यांनीं पहाणी करून, लोकांनीं आपलीं आपण करण्यासारखीं कोणतीं कामें आहेत, याची जंत्री करावी. लोकांच्या गरजा काय आहेत, त्यांना कोणत्या गोष्टींची उणीव आहे हें पाहून त्या गोष्टी कशा साध्य कराव्या याचा विचार व चर्चा करण्यासाठीं सर्व लोकांपुढें मांडावे, व या गोष्टी साध्य केल्यानें सर्व देशाचें एकंदरींत कसें हित आहे हें लोकांस समजून देऊन त्यांच्या नजरेस आणावें. असें केल्यानें लोकांना एकत्र विचार करण्याची गोडी लागेल व मग एकजुटीनें कामें करण्याची बुद्धी होईल. याप्रमाणें सबंध देश म्हणजे एक चैतन्ययुक्त संस्था आहे असें प्रत्ययास येईल व असें झालें म्हणजेच त्या समाजाला राष्ट्रीयत्व आलें.

आपले आचार, विचार, सामर्थ्य यांचें, इतर देशांतील त्या त्या गोष्टींशीं तुलनात्मक असें, अध्ययन केलें पाहिजे. या अध्ययनांत कोणत्या कारणामुळें कोणती शक्ति उत्पन्न होते किंवा कोणतें दुर्बलत्व येतें, इतर देशांत गुण व दोष कोणते, आपल्या देशांत गुण व दोष कोणते, या गुणदोषांचें तारतम्य, बलाबल किती, इतरांनीं तसले दोष कसे घालविले व तसले गुण कसे वाढविले याचा विचार करून आपली स्थिति सुधारण्यास आपण काय केलें पाहिजे याची एक जंत्री केली पाहिजे. अशी जंत्री तयार झाल्यावर कोणती गोष्ट सुकर, कोणती गोष्ट अगोदर केली पाहिजे, कोणती गोष्ट आपली आपणास करतां येईल, कोणत्या गोष्टीला दुसऱ्याचें किती सहाय्य पाहिजे, हें सहाय्य आपणांस कसें मिळेल या गोष्टींचा विचार केला पाहिजे. असा विचार करण्याचा या पुस्तकांत अल्पसा प्रयत्न केला आहे.

याप्रमाणें स्वदेश व परदेश यांची माहिती मिळवून एक कार्यक्रम ठरला म्हणजे त्या कार्यक्रमाला अनुकूल असें लोकमत तयार केलें पाहिजे. त्याच त्याच बाबीचा अनेक वेळां जनतेपुढें उहापोह झाला, त्या बाबींच्या गुण-दोषांचें नेहमीं उद्घाटन झालें, त्यावर करावयाच्या उपायांची अनेकदां चर्चा झाली म्हणजे लोकमत त्या बाबींना अनुकूल होत असतें. सरते शेवटीं लोकांना आंखून दिलेल्या मार्गाप्रमाणें कामें करण्यास उद्युक्त करण्यासाठीं पुढाऱ्यांनीं भाषणें, व्याख्यानें, वर्तमानपत्रांतील लेख व आपलें स्वतःचें आचरण यांनीं लोकांत चैतन्य आणलें पाहिजे. चिंच खातांना पाहून जसें पाहणाराचे तोंडाला पाणी सुटतें त्याप्रमाणें पुढाऱ्याचें वर्तन पाहून, तसें आचरण करण्याचें, इतरांच्या अंगीं स्फुरण आलें पाहिजे. असें आचरण करण्यासाठीं जनतेंत एका प्रकारचा जोम लागतो हें खरें; पण असा जोम नसण्याइतकी, मुळींच नसण्याइतकी, नेभळी किंवा नपुंसक जनता बहुधा सांपडणेंच अशक्य. कांहीं लोक जास्त उच्छृंखल असतील, कांहीं जास्त शांत असतील, इतकेंच. इतर राष्ट्रांच्या तुलनेनें आपली स्थिति कशी आहे, हें ज्ञान एकदां जनतेला झालें म्हणजे त्याप्रमाणें आचरण करण्यास जनता माघार घेत नाहीं असा जगाचा अनुभव आहे. लोकांना प्रत्यक्ष आचरण करून दाखवून तो कित्ता त्यांना वळवावयाला लावलें पाहिजे. अनुकरणानें लोक जसे वळतात तसे नुसतें बोलणें ऐकून वळत नाहींत. याबाबद लोकांतील शैथिल्य जावें म्हणून लोकांचे भेदभाव बहुतेक नाहींसे करावे लागतात. पुष्कळ लोक अमक्यानें अमुक केलें म्हणून आपण तसेंच करावें, म्हणून तसें करतात. पण कित्येक लोक अमुक माणसानें असें केलें इतक्याच साठीं तसें करीत नाहींत व असे दोन पक्ष झाले म्हणजे कित्येक तटस्थ राहतात व काम बिघडतें. यासाठीं होतांहोईतों शहाण्यानें दोन मतें—प्रबळ अशीं दोन मतें—होतील असें करूं नये. परमेश्वरसुद्धां असुरांना किंवा अधर्माला चांगला प्रबळ होऊं न देऊन सर्वांची त्यांच्या नाशाबद्दल एकनिष्ठा झाली म्हणजेच अवतार घेऊन त्यांचा नाश करीत असतो. जगांत जर त्यांच्या नाशाबद्दल दोन प्रबल मतें झालीं तर हें काम आपणांस कठीण जाईल ही जाणीव प्रत्यक्ष परमेश्वरापासून सर्वांना असते. या दोन प्रकारच्या मतांत ३ स १ असे भाग झाले म्हणजे ३ भागांना एक १

भाग सहज बाजूला सारतां येतो. थोडेंच जर बहुमत असलें तर ती गोष्ट निःसंशय जनतेला पटली असें म्हणतां येणार नाहीं. कारण तटस्थ लोकांचा जो पक्ष तो कोणत्या बाजूकडे शेवटीं झुकेल हें ठाऊक नसल्यानें हें थोडें बहुमत वास्तवीक निर्णायक नव्हे. पाऊणशें व पचंवीस अशीं मतें झालीं म्हणजे तटस्थ लोकांचीं मतें दुसऱ्या बाजूकडे पडलीं तरी पासष्ट व पस्तीस असें फारतर मतांचें प्रमाण पडेल व कांहीं झालें तरी पाऊणशेंकडे निःसंशय बहुमत आहे असें म्हणतां येईल. यासाठीं प्रत्यक्ष आचरणाचे ठराव तीनचतुर्थांश मतानें मंजूर झाले पाहिजेत, असें साधारण तात्विक विवेचन सांगतें. पण आपण आपल्याकडे एकमतानें मंजूर झालेले ठराव देखील आचरणांत येत नाहींत असें प्रत्यक्ष पाहतों! यावरून इतकेंच समजावयाचें कीं, हिंदुस्थानांतील लोक फार भिडस्त असून ते भिडेनें, आपल्या हातून काय होईल काय होणार नाहीं, आपण काय करण्यास तयार आहों वगैरे विचार न करतां मतें देतात. तसेंच पुढारी निवडतांना खरा पुढारी कोण वगैरे न पाहतां जो हाताशीं सांपडेल त्याला पुढारी नेमतात. लोक मनोभावानें कामें करीत नाहींत म्हणून चांगलीं माणसें पुढारी व्हावयालाहि नाखूष असतात. प्रतिनिधींना घरोघर जाऊन मतांची भिक्षा मागावी लागते व स्वाभिमानी माणसांना हें करणें कठीण जातें. मतदार व प्रतिनिधी यांची ओळख असावी; पण प्रतिनिधीनें प्रत्येक मतदाराकडे गेलेंच पाहिजे, एरवीं त्यास मत देऊं नये असें म्हणणें म्हणजे तोंडपुजेपणाला उत्तेजन देणें होय. तात्पर्य, आपण आजपर्यंत जें राष्टकार्य करीत आलों त्यांत दाखविण्यासारखें काम झालें नाहीं याचें कारण जनता अद्याप तयार झाली नाहीं हें होय व हें जनता तयार करण्याचें काम आपण पहिल्यानें हातीं घेऊन केलें पाहिजे.

या पुस्तकांत सांगितल्याप्रमाणें संघस्थापनेपासून प्रारंभ करून हिंदुस्थानाचें मनुष्यबळ य साधनसंपत्ति यांचा राष्ट्रीय कामांकडे पूर्ण उपयोग करण्यास आपण शिकलें पाहिजे. लोकांना सर्वसाधारण व औद्योगिक ज्ञान जास्त दिलें पाहिजे. सहकारी संस्था काढून धंदे करण्यास उत्तेजन किंबहुना सक्ती सुद्धां केली पाहिजे. अगदीं नवीं साधनें व यंत्रें यांचा योग्य उपयोग उत्पन्न वाढविण्याकडे केला पाहिजे. परदेशी कला व व्यवस्था

हीं शिकून हिंदुस्थानांत रूढ केलीं पाहिजेत. याप्रमाणें शक्य तितके प्रकार प्रचारांत आणून हिंदुस्थानाचा उत्कर्ष व्हावा म्हणून प्रत्येक जाणता माणूस झटेल तर हिंदुस्थानाची सुस्थिति लांब नाहीं. अज्ञानी माणसें तर या हिशेबांतून गाळलींच आहेत. पण जे आपणांस समंजस म्हणवितात त्या शेंकडा पांच सातांनी तरी आपल्या समजुतीप्रमाणें, विचारपूर्वक मनोभावानें कामें केलीं पाहिजेत असें म्हटलें तर तें गैर होईल काय ? इतकीं शहाणीं माणसें मुद्धां जर असें मनोभावानें देशाच्या उद्धारासाठीं झटणार नसतील तर मग प्रातिनिधिक संस्थांची मागणी व इच्छा करण्यांत अर्थ तरी काय ? प्रातिनिधिक संस्था शेंकडा दहापांच माणसांनीं तरी त्यांत लक्ष घालून काम केल्याशिवाय नीट चालणार नाहींत व ही स्थिति म्युनिसिपालिट्यां-तून आपणांस पाहण्यास सांपडतेच. म्युनिसिपालिटीचे प्रतिनिधि काम बरोबर पहात नसल्यानें ती एक नोकरशाहीच झाली आहे. चीफ आफीसर वगैरे करतील ती पूर्वदिशा अशी मुनिसिपालिट्यांची हल्लीं स्थिति आहे. म्युनिसिपालिटींतील सभासदांनीं खुर्चीवर बसून (प्रत्यक्ष स्थितीशीं अगदीं विसंगत असे) वाटेल ते ठराव करावे व म्युनिसिपल नोकरांनीं आपल्या तब्येतीस लागेल तशी अंमलबजावणी करावी ! ठराव काय व त्याची बजावणी कशी हें जर कोणी पहावयाचेंच नाहीं तर मग असा गोंधळ झाला तर आश्चर्य कसलें ! असा गोंधळ झाला नाहीं तरच आश्चर्य. मत-दारांना काम नको, प्रतिनिधींना काम नको, नोकरांना काम नको, सर्वा-नांच काम नको मग उपाशीं राहून स्वस्थ मरावें हें ओघानेंच प्राप्त होतें.

हिंदुस्थानाच्या लोकांचीं पुढचीं दहा वर्षें म्हणजे अगदीं आणीबाणीची व कसोटीचीच वेळ आहे. ही कसोटी सर्व माणसें व सर्व संस्था यांची चांगली छाननी करणार आहे. हिंदुस्थानच्या लोकांत दूरदृष्टि, जोम व व्यवस्था किती आहे हें आतां चांगल्या रीतीनें निदर्शनास येणार आहे. निरनिराळ्या जातींत, धर्मांत, लोकांत सभेट ठेवणें, एकीनें व व्यवस्थेनें कामें करणें व सरकार जें काम करतें त्यांत असलेल्या उणीवी आपण स्वावलंबनानें भरून काढणें, हीं कामें करण्याची पात्रता हिंदुस्थानांत किती आहे हें दिसेल. ही परीक्षा जितक्या चांगल्या प्रकारें हिंदुस्थान पास होईल तितकी तें आपली स्वराज्याची लायकी सिद्ध करील. आजमित्तीला आम्हांला

स्वराज्य पाहिजे असें आम्हीं हिंदी लोक म्हणतों, स्वराज्याला आम्ही लायक आहोंत असें प्रतिपादन सुद्धां करतों; पण आमची वागणूक मात्र आम्ही प्रातिनिधिक संस्थांना लायक आहोंत असें दाखवीत नाहीं व यावरून आमचें भावी स्वराज्य प्रातिनिधिक स्वरूपाचें नसावें असें वाटूं लागतें. पण खरें पाहिलें तर आमचें स्वराज्य प्रातिनिधिकस्वरूपाचेंच आहे. पण आम्ही त्याला अद्याप योग्य झालों नाहीं. तें आम्हांला पाहिजे हेंहि खरें व यासाठीं आम्ही ताबडतोब तयारीला लागून ते मिळविण्यांत यश संपादन केलें पाहिजे. या कामीं आपणास जपानचें उदाहरण कित्ता गिरविण्यालायक आहे. जपानी लोकांना एकदां प्रातिनिधिक स्वराज्य पाहिजे असें वाटल्याबरोबर राजानें राज्य, जहागीरदारांनीं जहागिरी, सामुराई लोकांनीं आपलें श्रेष्ठत्व, जनतेनें आपलें व्यक्तिस्वातंत्र्य व सर्वांनीं आपलें लक्ष त्या कामीं वाहिलें. इतकी एकवाक्यता होतांच जगांत ज्याला उपमा नाहीं असें स्थित्यंतर पांच चार वर्षांत घडून आलें व वीस वर्षांत ते कसोटीस उतरून जगाच्या पसंतीचा छाप त्यांवर पडला. हीच गोष्ट हिंदुस्थानाची व्हावी असें मनापासून वाटतें.

या कामीं विलायतच्या लोकांनीं व सरकारांनीं जर व्यापार व उद्योग धंदे वाढविण्याच्या बाबतींत मनःपूर्वक मदत केली तर त्यांत दोन्ही देशांचें हित होईल. या दोन देशांची दोस्ती इतकी दृढ होईल व यांचें सामर्थ्य इतकें वाढेल कीं, या संयुक्त राष्ट्राला जगांतील सर्व राष्ट्रें हार जातील. संयुक्त अमेरिका, संयुक्त ब्रिटन व संयुक्त हिंदुस्थान म्हणजे जगाचा राष्ट्रसंघ होईल व फिरून पृथ्वीवर कृतयुग झालें असें दिसेल. अशा संयोगानें आपलें नुकसान होईल असें कित्येक ब्रिटिश मुत्सद्यांना वाटत असे, पण ही त्यांची चूक होती असें महायुद्धानें सिद्ध केलें आहे. हिंदुस्थानाचें उत्पन्न वाढलें तर सगळ्या जगाचेंच हित होणार आहे. शेतकरी, कारखानदार, आडते, व्यापारी व गिऱ्हाईक या सर्वांचेंच या उत्पन्नापासून हित आहे. हिंदुस्थानचें धनोत्पादन पोटापाण्याचें आहे, चैनीचें नाहीं व यासाठीं त्यापासून सगळ्या जगाचें हितच होईल असें खात्रीनें म्हणतां येईल. कांहीं काळ प्रारंभीं ब्रिटनचें नुकसान झाल्यासारखें दिसेल पण तें आजपर्यंत जी डोळेझांक करण्यांत आली तिचें प्रायश्चित्त होय. हें प्रायश्चित्त जितकें लांब

ढकलावें तितकी त्यावर चक्रवाढ व्याजानें रक्कम फुगत जाणार हें आपण विसरतां कामा नये. जगांत ब्रिटन व हिंदुस्थानच काय पण असलीं दहा राष्ट्रें राहण्यास—सुखानें राहण्यास—वाव आहे. समाज व व्यक्ति यांचा जो संबंध तोच जग व राष्ट्र यांचा आहे. समाजांतील व्यक्ति स्वतंत्र व संपन्न झाल्यानें जसें समाजाचें हित होतें तसेंच राष्ट्रें स्वतंत्र व संपन्न झाल्यानें जगाचें कल्याण होतें. समाजांत ज्याप्रमाणें एकादी व्यक्ति स्वतंत्र व संपन्न झाल्यानें दुसऱ्या एखाद्या व्यक्तीचें कांहीं काळ नुकसान झालेसें वाटतें, गुलामाला स्वातंत्र्य दिल्यानें त्या गुलामाच्या मालकाचें नुकसान झालें असें दिसतें पण तो गुलाम असतांना जितकें व जसें काम करीत असतो त्यापेक्षां तो स्वतंत्र झाल्यावर जास्त चांगलें व पुष्कळ काम करूं लागल्यानें एकंदर समाजाचें कल्याणच होतें व यासाठीं एका मालकाच्या हिताहिता-कडे न पाहतां गुलामगिरी बंद करावी असेंच समाज ठरवितो; त्याच-प्रमाणें एक देश स्वतंत्र व संपन्न झाल्यानें जरी दुसऱ्या एका देशाचें तात्कालिक नुकसान झाल्यासारखें दिसलें तरी हा स्वतंत्र व संपन्न देश जगाच्या उत्पन्नांत जी भर घालतो त्यानें एकंदरींत सगळ्या जगाचें कल्याणच होतें व यासाठीं शहाण्या माणसांनीं या स्वातंत्र्येच्छु देशाला शक्य ती मदत करावी. ब्रिटनची परंपरा या गोष्टीला अनुकूल अशी आहे. इतालीसारखे देश स्वतंत्र होण्याला ब्रिटननें मदत केली आहे व त्याचप्रमाणें आपण आपली तयारी करूं लागलों, केवळ शाब्दिक नव्हे तर सक्रिय तयारी करूं लागलों, तर ब्रिटन आपणास मदत करील असा अंदाज करण्यास हरकत नाहीं. मात्र आपण त्या मदतीसाठीं अडून बसूं नये. लावी पक्षीण व तिचीं पिलें ही गोष्ट लक्षांत ठेवून वागावें म्हणजे झालें.

तयारी खंड

उपोद्घात

आपण हिंदुस्थानांतील लोक आम्हांला स्वराज्य पाहिजे म्हणतों, इतकेंच नव्हे तर आम्ही स्वराज्याला लायक आहोंत असें म्हणतों; पण आपण आपला मागला सर्व इतिहास विसरून व हल्लींच्या स्थितीकडे दुर्लक्ष करून असें म्हणतों. इसवी सनापूर्वी हिंदुस्थानांत उत्कृष्ट स्वराज्य होतें व तें पाश्चात्त्यांच्या स्वराज्यापेक्षांहि उज्वल होतें. पण ग्रीक, इराणी, मुसलमान वगैरे परकीयांशीं झगडतां झगडतां आपण तें गमावलें व फिरून तें महत्प्रयासांनीं आपण मिळविलें; पण आपल्या अंगीं खिळलेल्या वाईट खोडींनीं तें आपणांस राखतां आलें नाहीं, असा आपला इतिहास आहे. हल्लींची आपली स्थिति अत्यंत बिघडलेली आहे. आपल्यांत तप (कष्ट सोसण्याची धमक), दम (आत्मसंयमन) व नियम (शिरतीनें वागण्याची संवय) बिलकुल नाहीं. प्रत्येक इसमाला स्वार्थापलीकडील देशहित पाहण्याची मुळीं जरूरच वाटत नाहीं. अशा स्थितींत आम्ही स्वराज्याला लायक आहों म्हणणें म्हणजे निव्वळ आपणांस फसविणें आहे. आपणांस स्वराज्य मिळावयाचें असलें तर आपण किती तयारी केली पाहिजे व मिळालेलें स्वराज्य कायम टिकविण्यासाठीं आपल्या अंगीं कोणते गुण पाहिजेत याचा कोणीं विचारच केलेला दिसत नाहीं. कोणत्याहि कार्याचा पहिल्यानें कांहीं तरी नकाशा तयार करणें, मग तें काम करण्यासाठीं लागणाऱ्या साधनांची तरतूद व जुळवाजुळव करणें, व शेवटीं त्याप्रमाणें तें काम वठवून दाखविणें या ज्या कामाच्या तीन पायऱ्या त्या स्वराज्यप्राप्तीला नकोत अशीच पुष्कळांची समजूत दिसते. ही समजूत बदलली पाहिजे. महत्प्रयास, मोठे कष्ट, बलवत्तर जूट, अत्यंत स्वार्थत्याग याशिवाय स्वराज्य मिळणार नाहीं व कदाचित् तें मिळालें तर टिकणार नाहीं हें ओळखून स्वराज्यसंपादन व रक्षण यासाठीं आपण कोणती तयारी केली पाहिजे हें सर्वांपुढें ठेवण्याचा प्रयत्न या पुस्तकांत केला आहे.

धार्मिक, सामाजिक, शिक्षणविषयक व शेती, उद्योगधंदे व व्यापार या बाबींत आपण पुष्कळ सुधारणा केल्या पाहिजेत व या सुधारणा करण्यासाठीं जिवापाड मेहनत घेतली पाहिजे. हल्लींच्या तरुण पिढीवर अत्यंत मोठी जबाबदारी आहे. त्या पिढीच्या कसोटीची ही वेळ आहे. अशी संधि नेहमीं येत नसते. अंगांत कांहीं त्राण आहे तोंच कांहीं तरी होईल. क्षयरोग एकदां बळावला म्हणजे तो असाध्य आहे. यासाठीं जें कांहीं करणें तें आजच व मनःपूर्वक केलें पाहिजे, ही गोष्ट वाचकांच्या मनांत बिंबवावी हा हें पुस्तक लिहिण्यांत उद्देश आहे. दिवसेंदिवस हिंदुस्थानाची स्थिति क्षयरोग्याप्रमाणें होत चालली. रोज थोडा थोडा शक्तिपात होत आहे. जगांतील इतर राष्ट्रांत व हिंदुस्थानांत पडणारें अंतर वाढत आहे. जगांत मोठी यादवी किंवा न भूतो न भविष्यति असा उलथापालथीचा प्रकार घडला तरी हिंदुस्थाना इतकें हीनबल जग होणें शक्य नाहीं व असें आहे तर हिंदुस्थानाचें पारतंत्र्य पण जाणें शक्य नाहीं. ग्रीक आले, कांहीं काळ राहिले, गेले. शक वगैरे मुसलमानांनीं धक्के मारून देश खिळखिळा केला. पुढें मोंगल आले; कांहीं काळ राज्य करून लयास गेले. नंतर जरा स्वराज्याची झुळुक लागली. पण जाग उत्पन्न होणार तोंच ती ज्योत विझली. आतां इंग्रज राज्य करीत आहेत. अशा रीतीनें अनेक उलथापालथी झाल्या तरी त्यांत हिंदुस्थानास काय होय ? त्याच्या कपाळाची कर्मकटकट संपत नाहीं. त्याची संस्कृति वर न येतां दिवसेंदिवस नाहींशीच होत आहे व मिसर, मेक्सिको, असीरिया, ग्रीस, रोम प्रमाणें हिंदी संस्कृति देखील नामशेष होऊन देशाच्या जमीनीला महद्भाग्य प्राप्त होईल! पण त्यांत आपणांस अभिमान बाळगण्यासारखें काय होईल? यासाठीं जगांतील उलाढालींनीं (आपणांस कष्ट, सायास, स्वार्थत्याग वगैरे केल्याशिवाय) आपोआप चांगले दिवस येतील असा कोणास भ्रम असेल तर ती मोठी चूक आहे.

या तयारीखंडांत सांगितल्याप्रमाणें तयारी कांहीं एका क्षणांत होणार नाहीं. चिकाटीनें व नेटानें प्रयत्न केले तर दहावीस वर्षांत ती होईल व अशी तयारी झाली म्हणजे जगांतील उलाढालीचा आपणांस फायदा घेतां येईल. जगांत कोणी तरी आपणांस विचारील इतकी तरी योग्यता

आपणांस संपादन केली पाहिजे. अशी योग्यता नसेल तर या दगडासारख्या जड हिंदुस्थानाला वर काढण्यास कोणता पोहणारा धजणार आहे? ही हिंदुस्थानची धोंड किती भारी आहे याचा इंग्रजी साम्राज्याला गेल्या महायुद्धांत चांगला अनुभव आला व म्हणूनच हें मढें निदान आपल्या पायावर उभें राहील असें करावें असें त्यास वाटतें व या वाटण्याचा फायदा घेऊनच आपण हात हालवावयाला लागलें पाहिजे.

प्रकरण पांचवें

धार्मिक तयारी

स्वराज्यसंपादनांत धार्मिक तयारीला अग्रस्थान दिलेलें पाहून कित्येकांना आश्चर्य वाटेल. पण धर्म हा राजकारणापेक्षां सर्वतोपरी श्रेष्ठ आहे हें या लोकांनीं लक्षांत ठेवावें. जगांत एकच मनुष्य असला तर त्याला राजकारणाची जरूर पडणार नाहीं पण त्यालाहि धर्म हा राहणारच. धर्म हा फक्त माणसामाणसांतील व्यवहारांचाच विचार नसून माणसाचा जनावरांशीं, झाडांशीं, निर्जीव वस्तूंशीं, अदृश्य व अगोचर वस्तूंशीं देखील माणसांनीं कसें वागावें हें सांगतो. फार काय, पण सृष्टीचा मूळ उत्पादक जो परमात्मा त्याशीं देखील कसें वागावें हें शिकवितो व यासाठीं राजकारणापेक्षां तो किती तरी व्यापक व गहन आहे. राजकारण हें हिंदी धर्मशास्त्रकारांच्या मतें धर्माचें एक अंग किंवा सहावा हिस्सा आहे. धर्म हा राजकारणाच्या अगोदर जन्मास येऊन राजकारणाचें काम नाहीसें झालें तरी धर्माचें काम संपत नाहीं. धर्म हा अनंत व अनादि आहे. तो इहलोकाचाच तेवढा विचार करतो असें नव्हें तर तो परलोकाचाहि विचार करतो. तो देश, काल, परिस्थिति यांनीं मर्यादित नाहीं. अमुक अवस्थेंत धर्म नको असें होत नाहीं. धर्माची शक्ति माणसाच्या शरीरावरच चालून थांबत नाहीं; ती माणसाचें मन वगैरेवरच काय पण प्रत्यक्ष जीवावर चालते. इतकी धर्माची थोरवी आहे. राजकारण त्याच्या पासंगाला सुद्धां लागणार नाहीं. धर्माचे व्यवहार नित्य व निश्चित आहेत. मात्र

नाधर्मश्चरितो लोके सद्यः फलति गौरिव ॥
पुनरावर्तमानस्तु कर्तुर्मूलानि कृंतति ॥ मनु ॥

धर्म सोडला तर तो तत्काळ शिक्षा करीत नसतो. त्याची शिक्षा खातीनें होते; पण ती सावकाश होते. व त्या शिक्षेंत त्या धर्म सोडण्याच्या प्रवृत्तीचें मूळ सुद्धां तो जाळून टाकतो. धर्म सोडल्याबद्दलची शिक्षा एकदां भोगली

तर फिरून तो सोडण्याची बुद्धि सुद्धां होऊं नये अशा प्रकारची शिक्षा असते. औषध घेतल्यानें रोग जाईल पण फिरून रोग होतो. निदान तो रोग होऊं नये अशी शक्ति औषधांत नाहीं. ती धर्मांत आहे. धर्म हा याप्रमाणें सर्व शास्त्रांपेक्षांहि थोर आहे. धर्मांत सर्व शास्त्रांचा, सर्व व्यवहारांचा, सर्व कर्मांचा अंतर्भाव होईल; पण धर्माचा अंतर्भाव दुसऱ्या कशांतहि होणार नाहीं इतका तो श्रेष्ठ, व्यापक व सर्वशक्तिमान् आहे. यासाठींच कोणत्याहि गोष्टीचा विचार करण्यापूर्वीं धर्माचा विचार केला पाहिजे.

याप्रमाणें तात्विक धर्म जरी सर्वव्यापक आहे तरी त्याचा इतका व्यापक विचार (राजकारण व स्वराज्यसंपादन याचा विचार करतांना) करण्याची येथें जरूर नाहीं. स्वराज्यसंपादन म्हटलें म्हणजे त्यांत पुष्कळ गोष्टी गृहीत धरल्या जातात व त्यामुळें त्या गृहीत गोष्टींना अनुसरून धर्माचा विचारहि मर्यादित व संकुचित होतो. निरपेक्ष धर्मविचारापेक्षां हा सापेक्ष धर्मविचार फारच लहान असतो. स्वराज्य म्हटल्याबरोबर सुयंत्रित समाज, त्याची विवक्षित मांडणी, त्याची एक प्रकारची राज्यपद्धति इतक्या गोष्टी सहजच येऊन गेल्या व या गोष्टींना अनुसरून, या गोष्टी विचारांत घेऊन धर्माचें विवेचन या वेळीं केलें पाहिजे. हिंदुस्थानांत अनेक धर्मांची—नव्हे धर्मपंथांची—सरमिसळ झालेली आहे. यासाठीं सार्वजनिक धर्माचा विचार करतांना या सर्व धर्मांची ज्यांत एकवाक्यता होईल इतक्या गोष्टींचा विचार करून यांतील भेदांचा किंवा विशिष्ट तत्त्वांचा विचार त्या त्या धर्मपंथीय लोकांकडे सोंपविला पाहिजे. या सर्व धर्मपंथांतील सामान्य अशीं तत्वें खालीं दिलेलीं होत.

(१) परमात्मा सर्वव्यापी व सर्वांचा नियंता आहे.

(२) सर्व प्रजा त्याचीं लेंकरें आहेत, म्हणून कोणत्याहि त्याच्या लेंकरास त्रास दिल्यास त्यास त्यापासून वाईट वाटतें व त्रास देणाराचा राग येतो.

(३) नियमितपणें त्याची आठवण ठेवून त्याचे हुकमांत वागणें त्याला आवडतें व हेंच माणसाचें कर्तव्य.

(४) आपण जें कर्म करूं त्याचें फळ आपणांस भोगावें लागतें. यांत केव्हांहि तफावत होत नाहीं.

(५) सर्व लोकांचे निरनिराळे देव, हे सर्व एकाच परमात्म्याचीं निरनिराळीं रूपें आहेत. त्या त्या विवक्षित देशाला, काळाला, परिस्थितिला अनुरूप अशीं रूपें असून ते धर्मग्रंथ देखील याचप्रमाणें परिस्थिति-सापेक्ष आहेत. यासाठीं सर्व देव व सर्व धर्मग्रंथ प्रत्येकानें सारखेच पूज्य मानावे व या पैकीं कोणाचाहि अपमान तो सर्वांचा अपमान होय.

या धर्मतत्वांवर हिंदुस्थानांतील सर्व लोकांचा व्यवहार आपआपल्या पंथा-प्रमाणें चालावा. कोणाहि पंथाला जास्त अगर कमी हक्क वगैरे नसावेत. सर्वच धर्ममंदिरांवरून इतर धर्मीयांनीं वाजवीत जाऊं नये. त्या मंदिराचा मान सरकारी कचेऱ्या वगैरेप्रमाणें यायोगानें ठेवावा. प्रत्येक धर्म-मंदिरांत त्या त्या धर्मपंथाच्या लोकांस पूर्ण स्वातंत्र्य असून इतर धर्मपंथीयांनीं ते लोक त्या मंदिरापुरते जे नियम करतील ते निमूटपणें पाळले पाहिजेत; जसा प्रत्येक इसम आपल्या घरांत स्वतंत्र व वाटेल तें करण्यास मुखत्यार आहे व त्या घरांत जाणाऱ्या प्रत्येकानें त्याच्या मर्जीप्रमाणें वागलें पाहिजे; त्याचप्रमाणें प्रत्येक धर्मपंथीय लोक आपल्या धर्ममंदिरांत स्वतंत्र असून इतर धर्मीयांनीं त्या मंदिरांत त्यांच्या मनाप्रमाणें वागलें पाहिजे. सर्वधर्मी-यांना सारखी मोकळीक अशी पाहिजे तर नवीन धर्ममंदिरें स्थापावीं व त्यांत सर्वसामान्य गोष्टींसाठीं सर्व धर्मीयांनीं एकत्र प्रार्थना करावी. पर्जन्य, रोग, लढाई वगैरे सर्वसामान्य आपत्तींसाठीं या मंदिरांतून प्रार्थना वगैरे व्हाव्या व या प्रार्थना वगैरेंत सर्व लोकांनीं भाग घ्यावा. स्वराज्यप्राप्तीसाठीं लागणाऱ्या प्रार्थना, वगैरे बाबी या धर्ममंदिरांत होतील. अनाथांस अन्नवस्त्र, रोग्यांस औषध व पथ्य, अशिक्षितांस फुकट व रात्रीचें शिक्षण अशा धर्म-मंदिरांमार्फत देण्यांत यावें. तात्पर्य, सर्व हिंदवासीयांना एकत्र करण्याचें, एकीनें काम करण्यास शिकविण्याचें हें साधन असावें.

या धर्ममंदिराचे चालक सर्व धर्मांचा एक एक प्रमुख गृहस्थ असावा. याची शाखा दर जिल्ह्यास एक असावी व धर्मा धर्मांत लढा पडला तर तो या सभेमार्फत मोडावा. कोणतेंहि दयाधर्माचें काम कीं ज्यांत सर्वधर्मीयांचा समावेश करावयाचा असेल त्याचें आचरण या धर्ममंदिरामार्फत व्हावें. प्रत्येक धर्माच्या लोकांचे दर गावांत, दर जिल्ह्यांत एक शिष्टमंडळ

असावें व या शिष्टमंडळानें या सर्वधर्मीय शिष्टमंडळांत आपला एक प्रतिनिधि पाठवावा. एकंदर गांवची दीनवत्सलता या सभेच्या मार्फत चालावी. प्रत्येक धर्माचें स्वतंत्र अन्नछत्र, सदावर्त, रुग्णालय असलें तर चालेल. पण सर्वधर्मीय सदावर्त, अन्नछत्र, रुग्णालय, रात्रीची शिक्षणसंस्था, सार्वजनिक उत्सव, व्याख्यानें, स्वयंसेवक वगैरे या संस्थेच्या ताब्यांत असावींत. याप्रमाणें सर्व हिंदुस्थानाच्या आकांक्षा एकत्र करणारी, सर्व हिंदी लोकांना सारखे लेखणारी अशी ही संस्था मोठी लोकोपयोगी होईल. जगांतील सर्व धर्मांचें तुलनात्मक अध्ययन करण्याची ही संस्था एक केंद्र होईल. सर्व धर्मगुरूंना एकत्र करून, विचारविनिमय करून, परधर्मसहिष्णुता उत्पन्न करण्याला व वाढविण्याला या संस्थेचा फार उपयोग होईल. त्याचप्रमाणें या संस्थांनीं सार्वजनिक विश्रामस्थानें (Parks), क्रीडास्थानें (Play grounds), नाटकगृहें, संग्रहालयें (Museums), शोधभांडारें (Invention galaries) व दुसऱ्या असल्या सार्वजनिक ज्ञान व मनोरंजन करणाऱ्या संस्था आपल्या देखरेखीखालीं घ्याव्यात. वाचनालयें (Reading rooms), पुस्तकसंग्रह(Libraries), यंत्रसंग्रह (Machine workshops), नमुन्याचीं कोठारें (Stores of models) अशा संस्था देखील या मंडळाच्या हातांत देण्यास हरकत नाहीं. याप्रमाणें निरनिराळे धर्म व पंथ यांची एकजूट, एकमुख व एकदृष्टि होण्याचें हें मोठें साधन होऊन सर्वांची एकवाक्यता करण्यास उपयोगी पडेल.

सार्वजनिक स्वच्छता हें या सर्व धर्मसंस्थांचें एक प्रमुख अंग केलें पाहिजे. म्युनिसिपालिटी घराच्या चार भिंतींबाहेरील स्वच्छतेवर नजर ठेवील पण धर्माला माणसाच्या शरीरांतील गुह्य भागापर्यंत जातां येईल व म्हणून हें काम त्यानेंच अंगावर घेतलें पाहिजे. रोज एकदां तरी स्नान करणें, घर झाडून सारवून स्वच्छ ठेवणें, रोज मोऱ्या धुणें, पाणी गाळून पिणें, धान्य नीट निवडून सडून चाळून खाणें, लघवी वगैरे नियमित जागींच —घाण वगैरे येणार नाहीं अशी खबरदारी घेऊन—करणें, केरकचरा दिवसभर एका कोपऱ्यांत व दिवसांतून एकदां अगर दोनदां कचऱ्याच्या कुंड्यांवर टाकणें, मुलांना बसण्यासाठीं उचलून ठेवतां येतील असे शौचकूप करणें, त्यावर ताडबतोब राख किंवा माती टाकणें, ओल आलेल्या

जागीं न रहाणें, घरांत केरकचरा, घाण वगैरे सांचूं न देणें, अंगावरील कपडे स्वच्छ ठेवणें, आंथरूण-पांघरुण रोज उन्हांत तापविणें वगैरे आरोग्याच्या अनेक बाबींचा विचार व शिक्षण याच संस्थांना देतां येईल. या बाबी राजकारणाच्या व म्युनिसिपल कायद्यांच्या कक्षेच्या बाहेर पडतात व त्या धर्मांतच येणें योग्य होय. जे लोक हीं बंधनें नीट पाळीत नसतील, सांगून सवरून सुद्धां मुद्दाम न मानतील, त्यांना धार्मिक संस्थांत कमी लेखून त्यांचीं घरें निराळ्या टापूंत ठेवावीं असा निर्बंध करावा अगर कसें वगैरे गोष्टींचा विचार या सर्वधर्मीय संस्थांनाच नीट करतां येईल.

वेश्यागृहें, मद्यपानगृहें, व्यसनगृहें कोठें असावीं, लोक व्यसनी होऊं नयेत म्हणून काय करावें, लग्नसंबंध न करण्यालायक रोगी, दुर्व्यसनी लोक कोणते, त्यांशीं शरीरसंबंध कसा टाळावा, अनीतिवर्तक लोक कसे कह्यांत ठेवावे, अनीतिवर्धक पुस्तकें, खेळ, नाटकें तमाशे, सिनेमा, वगैरे कोणते या सर्व बाबी या संस्थांकडे सोंपवाव्यात. गरीब व कामकरी वगैरे लोकांच्या ऐपतींत सुखकारक व सोईस्कर अशा नमुन्याच्या चाळी बांधवून त्यांत त्यांस राहण्याची सोय करून देणें इत्यादि हरएक प्रयत्नांनीं लोकांची रहाणी आरोग्यकारक, नीतिमान् व व्यवस्थित होईल यासाठीं व्याख्यानें वगैरेंनीं लोकांस उपदेश करणें, त्यांस योग्य वळण लावणें, त्यांचा घाणटपणा घालविणें, हीं कामें या संस्थांनीं करावीं. घरांतील चौक वगैरेंत पाणी मुरून जमीनीस ओल येऊं नये, पिण्याच्या पाण्यांत घाण पाण्याची मिसळ होऊन रोगराई होऊं नये, अव्यस्थित वागण्यामुळें झालेल्या रोगराईचा फैलाव होऊं नये, फैलाव झालाच तर लोकांस घरोघर व पडल्या अंथरुणावर औषधपाणी मिळावें असलीं धर्मकृत्यें, त्यांबाबद कथा, मेळे वगैरे या संस्थांनीं काढावेत. स्वयंपाक घरांत वापरावयाचीं भांडींकुंडीं मोलकरणी व घरच्या बायका कशीं घासतात व स्वच्छ करतात, त्याबाबद भांडीं फार न झिजतां, कडेवर न फुटतां, कशीं स्वच्छ करावीं; धुणीं न फाटतां जास्त स्वच्छ कशीं करावीं वगैरे माहिती या संस्थांनीं जनतेंत पसरावी. दरएक माणसानें आपलें काम थोडक्या वेळांत व मेहनतींत उरकून सार्वजनिक कामांत व उत्पन्नांत भर कशी घालावी हें या संस्थांनीं नमुनेदार कुटुंबें तयार करून दाखवावें. आळींतील लोकांना त्या घरांत नेऊन त्यांनीं कशी व्यवस्था

ठेवली आहे, त्यामुळें द्रव्य, आरोग्य वगैरेंत त्यांचा कसा फायदा झाला आहे हें सर्वांना समजून द्यावें व सर्वांना तसें करण्यास उत्तेजन द्यावें. निव्वळ बाजरी खाऊन, थोडे कपडे वापरून निरोगी व सशक्त कसें राहातां येतें हें नमुनेदार माणसांच्या प्रदर्शनानें दाखवावें. सशक्त माणसांस, निरोगी माणसांस बक्षिसें द्यावीं, त्यांचीं चरित्रें प्रसिद्ध करावीं. थोड्या खर्चांत, थोड्या वेळांत, थोड्या श्रमांत स्वयंपाक कसा करावा व आनंदांत कसें रहावें हें उदाहरणानें शिकवावें.

मुलींच्या शिक्षणांत विशेषतः हीं भाडीं घासणें, धुणीं धुणें, स्वयंपाक करणें, लोणचीं, पापड करणें वगैरे गोष्टी शिकविल्या पाहिजेत. मुलींना हीं घरकामें थोड्या खर्चांत, थोड्या वेळांत, थोड्या श्रमांत कशीं करावीं, उरलेला वेळ घरचें उत्पन्न वाढविण्यांत, सार्वजनिक कामें करण्यांत, देशाच्या हिताकडे लक्ष घालण्यांत कसा खर्च करावा व लहान मुलांना देशप्रीति, स्वदेशाभिमान वगैरे कसा शिकवावा हें शिकविलें पाहिजे. या गोष्टी त्यांना अत्यंत उपयोगी आहेत. या कामांत हल्लीं बायकांचें बहुतेक सर्व आयुष्य खर्च होतें. यापैकीं जर कांहीं काळ किंवा श्रम वांचले तर राष्ट्रीय कार्याकडे त्यांचा किती तरी उपयोग होईल. मुलांना राष्ट्रीय कामाचें बाळकडू घालणें हें आयांचें मुख्य कर्तव्य आहे व हें त्या जितक्या उत्तम तऱ्हेनें बजावतील तितकें देशाचें हित जास्त होणार आहे. लहानपणापासून प्रत्येक मुलाला हा माझा स्वदेश व या स्वदेशासाठीं माझ्या आईबापांनीं अमुक केलें व मी अमुक करीन अशी भावना उत्पन्न झाली तर तीच भावना मोठेपणीं दृढ होते व अनेक मोठमोठीं कामें करण्यास उत्तेजन देते. बायकांनीं चालविलेल्या लायब्ऱ्या, वाचनमंदिरें, कारखाने, दुकानें, शाळा वगैरे असून त्यांतील सर्व व्यवहार फक्त बायकांनींच चालवावे. बायकांनीं बायकांसाठींच चालविलेल्या गिरण्या असाव्या. हल्लीं अनेक लहानमोठीं यंत्रें झाल्यामुळें शारीरिक श्रमाचें व जोरदार स्नायूंचें काम फारसें उरलें नाहीं व यामुळें स्त्री-पुरुष भेद संपुष्टांत येत चाललेला आहे. सर्व मनुष्यमात्रांना एका पायरीवर आणण्यास यंत्रशास्त्रानें फार मदत केली आहे. सबब ज्यांना मुलें बाळें नाहींत व नकोत अशा विधवा वगैरे बायकांनीं, पुरुषांनीं करावयाचीं कामें स्त्रियांसाठीं करणें सोईचें होईल. शस्त्रक्रिया, वैद्यक, कीर्तन, पुराण, स्वयं-

सेवक, जलसंतरण, बालशुश्रूषा हीं कामें बायकांनीं बायकांसाठीं करावींत. स्त्रीपुरुषसंबंध अनीतिवर्धक होतो. ज्ञानी माणसें देखील त्यापासून आपला बचाव करूं शकत नाहींत. म्हणून बायकांसाठीं करावयाचीं सर्व कामें, हमाली गाड्या, घोडीं, मोटारी, तिकीटें घेणें देणें वगैरे बायकांनींच करावीं. बायकापुरुषांचा संबंध फक्त बहुजनसमाजांत, त्यांच्या घरच्या पुरुषासमक्ष मात्र यावा. स्त्रीपुरुषसंबंधांत आपली महाराष्ट्रीय समाजाची चाल उत्तम आहे. मुसलमानी गोषा एका टोंकाला व युरोपीय मोकळेपण दुसऱ्या टोंकाला, दोषोत्पादक आहेत. हीं दोन्ही टोंकें सोडून मध्यम पद्धत उत्तम समजली पाहिजे. यापुढें समाजांत जी संघटना अमलांत आणावयाची आहे तिच्यासाठीं एकत्र येणें, एकत्र विचार करणें व एकत्र वागणें व कामें करणें यांचीं संवय जितकी लागेल तितकी हवी आहे व यासाठीं असले प्रसंग आणतां येतील तितके घडवून आणून त्यांस देशहिताचा विचार जोडला पाहिजे.

व्यापारवृद्धि व्हावयाची म्हणजे प्रवासाच्या सोई जास्त वाढविल्या पाहिजेत. पूर्वींची आपली पडशी घेऊन जाण्याची पद्धति स्वातंत्र्याला पोषक आहे. या पद्धतींत प्रत्येक इसम स्वावलंबी असतो व समवायकरणाला हींत थोडा फेरफार केला पाहिजे. शाळेंतील विद्यार्थ्यांपासून तों संन्याशापर्यंत टोळ्यांनीं प्रवास करण्याची पद्धत आपण स्वीकारिली पाहिजे. या टोळीचीं कामें आळीपाळीनें वांटून घ्यावीं. उदाहरणार्थ, बाजारहाट करणें एकाकडे, स्वयंपाक करणें एकाकडे, धुणीं धुणें एकाकडे, भांडीं घासणें, जागा स्वच्छ ठेवणें एकाकडे, दिवे बत्ती अंथरुणें वगैरे एकाकडे याप्रमाणें कामें वाटावीं. तसेंच फिरतीच्या गांवची राजकीय चौकशी एकाकडे, औद्योगिक एकाकडे, शिक्षणविषयक एकाकडे, धार्मिक एकाकडे, याप्रमाणें कामें वांटून त्यांनीं माहिती गोळा करावी. रात्रीं किंवा रिकामपणीं त्याबाबद चर्चा करावी. जरूर तर तेथें व्याख्यानें द्यावीं अगर ऐकावीं. आपले विचार लोकांस द्यावे व आपण त्यांचे घ्यावे व याप्रमाणें ही टोळी कांहीं पायीं, कांहीं गाडीनें, कांहीं आगगाडीनें दरसाल महिना पंधरा दिवस प्रवास करून यावी. एका गांवची, एकमेकांच्या ओळखीची, साधारण समवयस्क व समसुखदुःखी अशी ही मंडळी असावी. बरोबरीचा

विलायती कपड्यांचा जोड व दुसरा खादीचा जोड ठेवणारी मंडळी फार झाली आहेत. म्हणजे खर्च कमी होण्याच्या ऐवजीं तो वाढला मात्र. अशी कोणत्याहि तत्त्वांत ढोंग मिसळण्याची संवय आपल्या लोकांत आहे ती गैर आहे. चांगले धर्मात्मे पुढारी फसतात ते असल्या लपंडावानेंच. महात्माजींच्या व्याख्यानास जिकडे तिकडे खादी पाहून लोकांना हें आपलें म्हणणें पटलें, याचा अमुक परिणाम होईल असें त्यांनीं समजावें तों परिणाम उलट ! सरकार धूर्त; पण तेंसुद्धां केव्हां केव्हां फसतें. गांधीटोपी घालणारा म्हणजे गांधींच्या मताचा असा समज सरकारचा पहिल्यानें झाला. पण पुढें या टोपींत कांहीं अर्थ नाहीं, लोक ही एक गम्मत म्हणून वापरतात असें पाहून सरकारनें तिजकडे दुर्लक्ष केलें. परकीं राष्ट्रें अशा या खोडसाळपणानें हिंदुस्थानावर विश्वास ठेवण्यास धजत नाहींत. हिंदुस्थानी माणसांची सर्वत्र जी कमी किंमत आहे त्याचें, हें ढोंग अंशतः कारण आहे. आपले स्वतःचे भाईबंद देखील अशा ढोंगानें फसतात.

अशा प्रकारें चैन वगैरेचा खर्च वांचवून तो संग्रहीं ठेवावा. प्रत्येक घरंदाज किंवा सभ्य म्हणविणाऱ्या माणसाजवळ त्याच्या नेहमींच्या खर्चाला दोन वर्षें पुरेल इतका संग्रह असलाच पाहिजे व त्याच्या नेहमींच्या खर्चाला तीस वर्षें पुरेल इतका संग्रह म्हणजे संग्रहाची पराकाष्ठा असावी. यापेक्षां जास्त संग्रह असेल तो नेहमीं पेढ्यांवर व्यापारांत गुंतलेला असावा. प्राचीन आर्यांचा संग्रह व व्यय करण्यासंबंधाचा हाच नियम आहे व तो अगदीं रास्त आहे. हल्लीं संग्रह किती असावा याचा कांहीं नियमच नाहीं. ही संग्रहाची हाव चांगली नाहीं. थोर म्हणविणारीं माणसें जर संग्रह करण्यांतच गुंतलीं तर इतर माणसें त्यांचा तोच कित्ता गिरविणार. अशा स्थितींत राष्ट्रीय कामें, कारखाने, उद्योगधंदे वगैरेंना पुरेसे पैसे मिळाले नाहींत तर आश्चर्य काय ? हिंदी इसमाचें सरासरी माणशीं उत्पन्न वर्षाचें रुपये पंचवीस सव्वीस आहे व इंग्रज गृहस्थाचें माणशीं सरासरी उत्पन्न वर्षाचें पांचशे रुपये आहे व या दोघांचें चैनीचें माप पहावें तें एक ! मग हा गरीब मनुष्य अन्नापाण्यावांचून उपाशी मेला, राजकीय वगैरे बाबींत त्याला पुरेसें द्रव्य नाहीं म्हणून गप्प बसावें लागलें, उद्योगधंद्यांत नेहमीं हात आंखडता घ्यावा लागला व लोकांच्या तोंडाकडे पहावें लागलें तर त्यांत आश्चर्य काय ? प्रत्येकानें

आपलें अंथरूण पाहून पाय पसरले पाहिजेत. अगदीं अवश्यक वस्तूंची गोष्ट निराळी. कितीहि कमी उत्पन्न असो, त्या सर्वांनाच पाहिजेत. पण चैनीच्या वस्तूंची काटकसर आपलें उत्पन्न पाहून अवश्य केली पाहिजे. इंग्रजी पोषाक, इंग्रजी थाटमाट, इंग्रजी आहारविहार, इंग्रजी खेळ, इंग्रजी व्यसनें या गोष्टी आपल्या देशाला दारिद्र्यांत बुडवून दाबून धरणाऱ्या आहेत. यामुळें इंग्रजांचा माल खपतो, त्यांना नफा होतो व आपले हाल होतात असें दोन्हीकडून नुकसान आहे. ही गोष्ट धार्मिक उपदेशकांनीं नेहमीं लोकांपुढें मांडली पाहिजे, लोकांनीं ती ध्यानांत ठेवली पाहिजे व त्याप्रमाणें प्रत्येकानें आचरण केलें पाहिजे. मनुष्यप्राणी उत्सवप्रिय आहे, पण जीव जाईपर्यंत उत्सव करणें गैर आहे. जगलों वांचलों तर अनेक उत्सव करतां येतील.

एखादा जुगारींत हरलेला मनुष्य जसा बेभान होऊन पण लावीत सुटतो तशीच अवस्था हिंदुस्थानाची झालेली दिसते. मागचा पुढचा विचार न करतां तो धूम कोणीकडे तरी चालला आहे. आपण काय करतों, त्याचा परिणाम काय, हें किती दिवस निभेल, याचा शेवट काय होईल याचा बिलकूल विचार न करतां लोक करतात तर आपणहि करावें म्हणून तो आपल्या गळ्याला तात लावून घेत आहे. इतर देशांत हातपाय चालतात तोंवर आजारीपण, म्हातारपण, अस्मानीसुलतानी यांसाठीं प्रत्येकजण तजवीज करीत असतो. यासाठीं विमा उतरणाऱ्या मोठमोठ्या कंपन्या तिकडे आहेत. पण अशी कांहींच योजना हिंदुस्थानांत नाहीं. ज्या कांहीं थोड्या विमा उतरणाऱ्या कंपन्या हिंदुस्थानांत आहेत त्या बहुतेक परदेशी लोकांनीं आपल्या जातभाईसाठीं काढलेल्या. बहुतेक कंपन्यांत हिंदी व युरोपियन यांचे दर, सवलती वगैरे निराळ्या व या कंपन्यांचा फायदा घेणारे थोडे. जणूं काय आपणांस अशा आपत्ती येणारच नाहींत अशा थाटानें सर्वांचा कारभार चालला आहे. शेतकऱ्याकडे पूर्वीं पेवांत दाणे ठेवीत. एक सालचे दाणे संग्रहीं असत व हाच संग्रह आपत्कालीं उपयोगी पडे; पण हल्लीं कोणाकडे पेव म्हणून नाहीं. जरा पैसे दिसले तर रिस्टवाच व मोटार यांत फडशा! आपत्कालीं या असल्या जिनसा घटोत्कचाच्या जिनसांप्रमाणें आपल्याच नाशाला कारणीभूत व्हावयाच्या. शहाणे म्हणविणारे लोक जे विचार करतात

तेच इतर लोक करतात. आंधळ्यांच्या माळेप्रमाणें चाललेला हा कारभार पाहून विचारी माणसें फार उद्विग्न होतात. योग्य कामें करावयाचीं सोडून देऊन बाळंत होण्याचे दवाखाने निघतात; पण त्या दवाखान्यांत जी स्त्री एकदां गेली ती फिरून तिकडे जाण्याचें नांव काढीत नाहीं. "नकोरे बाबा ते हाल. त्यापेक्षां मी घरीं मेल्यें तरी चालेल" असे चांगल्या सुशिक्षित व संपन्न स्त्रियांचे उद्गार ऐकावयास सांपडतात.

विलायतेंत महायुद्धांत पन्नास कुटुंबांच्या टोळ्या केल्या होत्या. त्यांत एका स्त्रीनें साऱ्यांचा स्वयंपाक करावा, एकीनें साऱ्यांचीं धुणीं धुवावीं, एकीनें साऱ्यांचें दळण दळावें, दोघींनीं साऱ्यांची मुलें संभाळावीं, चौघींनीं साऱ्यांचें अन्न कारखान्यांत पोंचवावें. दोघींनीं झाडलोट, दिवाबत्ती वगैरे करावी व बाकीच्यांनीं कारखान्यांत कामास जावें असें करीत. ही पद्धत फार सुखावह, थोड्या खर्चाची व जास्त उत्पन्नाची आहे असें आढळून आलें आणि हिंदुस्थानांत चार भावांच्या बायका एकत्र रहावयास नाकबूल! एखाद्या मोलकरीण बाईच्या हातापायां पडून बाळंतपण, आजारीपण वगैरेसारखे दिवस काढून घेतील. पण आपली जाऊ, नणंद अगर भावजय यांची मनधरणी करावयाच्या नाहींत. भाऊ दुसऱ्याचे घरीं नोकर राहील, त्याचें वाटेल तें काम करील पण घरीं आपल्या बापाचें अगर भावाचें ऐकावयाचा नाहीं. हिंदु किंवा मुसलमान साहेबाला बुटासकट देवळांत येऊं देतील पण आपल्या देशबांधवाला येऊं देणार नाहींत. साहेबाचे पंगतीस बसून गोसूकरमांसभक्षण करतील पण आपल्या भाऊबंदांनीं सांगितलें तर त्यांना बरें वाटेल असें कर्म करणार नाहींत. ही जी दुर्दशा करणारी खोड आपल्या देशांत पसरली आहे ती धार्मिक चळवळीनें घालविली पाहिजे. ही नैतिक आचरणाची बाब आहे. इंगजी पोषाक, इंग्रजी चेहऱ्याची ठेवण ही सर्वांना पटते. इंग्रजी जोडा देवघरांत किंवा भोजनगृहांत जातो. पण हिंदी पोषाक कर म्हटलें तर मुसलमानास मान्य नाहीं व मुसलमानी पेहराव हिंदूस मान्य नाहीं. सोय गैरसोय, व्यवस्था अव्यवस्था, कमीजास्त खर्च, वगैरेचा हा प्रश्न नसून केवळ अंध अनुकरणाचा, गतानुगतिकत्वाचा हा परिणाम आहे व म्हणून याचा निषेध करावयाचा. चांगलें असेल तर बेलाशक घ्या पण अहितकर घेऊं नका.

मालक आणि मजूर यांचा संबंध असाच धर्मानें हातीं घेण्यालायक आहे. एकमेकांचें हित, एकमेकांचे अहित हें या व्यवहारांत फार गुंतलेलें असतें. तथापि मालक मजुराला व मजूर मालकाला शत्रु समजत असतो. इतर देशांत हीं भांडणें फार विकोपास गेलीं असून त्यांचा निकाल लावणें दुर्घट झालें आहे. आपण या बाबतींत वेळींच सावधगिरी घेणें बरें. आपल्याकडे कारखान्यांचा प्रारंभ देशाच्या उत्कर्षासाठीं आपण करणार आहोंत. याच वेळीं काय केल्यानें हे तंटे पुढें होणार नाहींत तें आपण पाहिलें पाहिजे. इतर देशांनीं अनेकाविध समाजरचना करून पाहिली. पण प्रत्येक रचनेंत कोणता तरी एक वर्ग प्रबळ होऊन दुसऱ्यांना जाचक होतो असें दिसलें व शेवटीं आधुनिक समाजशास्त्रज्ञांनीं चातुर्वण्य संस्थाच चांगली असें ठरविलें आहे. (१) विचार करणाऱ्या लोकांचा वर्ग; यानें विचार करून कायदे करावे. (२) दुसरा अंमलबजावणी करणाऱ्या लोकांचा वर्ग; यांनीं नुसती ठरलेल्या नियमांची अंमलबजावणी करावी. (३) तिसरा द्रव्य पुरविणारा वर्ग; यानें सर्व कायद्यांची अंमलबजाणी होण्यासाठीं लागणारें द्रव्य पुरवावें. व (४) कामें करणाऱ्यांचा वर्ग; यानें चारी वर्णांना संमत अशीं कामें करावी. या पद्धतींत कोणाहि वर्गाला स्वतंत्र सत्ता नाहीं व यामुळें इतरांवर जुलूम करतां येत नाहीं. कायदे करणारांनीं भलता कायदा केला तर त्याची अंमलबजावणी होणार नाहीं. अंमलबजावणींत जुलूम होईल तर तसा कायदा नाहीं. दोघेहि स्वैर वागतील पण त्यांना द्रव्यबल नाहीं व तिघेहि एक झाले तरी त्यांचें काम कोण करणार ! अशा रीतीनें चौघांच्या संमतीशिवाय कांहीं होणार नाहीं व तिघे एक झाले म्हणजे ते चौथ्याला आवरतील. अशी ही चातुर्वर्ण्य संस्था होती व तीच पाश्चात्य देशांत मान्य होत चालली आहे.

अशीच चातुर्वर्ण्य संस्था प्रत्येक कारखान्यांत पाहिजे. सरकार हा कारखान्यांतील विचारी लोकांचा वर्ग. यानें कारखान्यासाठीं कायदे करावे. स्थानिक अधिकारी यांनीं या कायद्यांची अंमलबजावणी करावी. भागीदारांनीं पैशाचा भाग पुरवावा व मजुरांनीं मेहनत पुरवावी असे चार प्रकारचे सर्व जण एकत्र होऊन भागीनें, एकमेकांच्या सल्यानें, नफ्यांत भाग ठेवून व्यवहार चालावा म्हणजे मालक व मजूर यांत तंटे होण्याचे प्रसंग फार

येणार नाहींत. मजूरीपेक्षां भांडवल श्रेष्ठ ही गोष्ट केव्हांहि मान्य करावी लागेल. नुसती मजूरी कारखान्यांत कांहींच करूं शकणार नाहीं, पण नुसतें भांडवल कांहीं तरी करील. भांडवलाचा मालक स्वतःच काम करील तर भांडवलापासून कांहीं तरी उत्पन्न काढील. पण भांडवलाशिवाय मजूर कांहींच करूं शकणार नाहीं. यासाठीं भांडवलासाठीं थोडा नफा जास्त ठेवावा म्हणजे झालें. नवीन घटनेत पुढें येणाऱ्या संकटांची तरतूद अगाऊ करून ठेवावी. मागून येणाऱ्याला हे धोके टाळण्याचा प्रयत्न करतां येतो हाच फायदा. पहिल्यानें काम करणाऱ्यानें धोके सोसलेले असतात पण त्या वेळीं प्रतिस्पर्धी कमी असल्यानें त्याला नफा जास्त मिळतो. याप्रमाणें " कोठें कांहीं कोठें कांहीं । एक आहे एक नाहीं " ही गोष्ट खरी.

तात्पर्य, ज्या ज्या गोष्टी केवळ जोरानें, सामर्थ्यानें, सक्तीनें घडवून आणतां येत नाहींत त्या धर्माच्या सहाय्यानें प्रेमानें, दयेनें घडवून आणल्या पाहिजेत. धर्माचें क्षेत्र जास्त म्हणजे हेंच. सर्व धर्मगुरूंनीं एकत्र बसून याप्रमाणें विचार केला पाहिजे. असें न करतां जर आपण एकमेकांशीं भांडत बसलों तर आपणा सर्वांचाच नाश होणार आहे हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. दोघांचें भांडण व तिसऱ्याचा लाभ हा जगाचा नियम आहे व आपल्याला हा अनुभव चांगला ठसठशीतपणें आलेलाच आहे. हा अनुभव जमेस धरून आपण सर्वांनीं वागण्याची खबरदारी घेतली पाहिजे व त्यांत आपलें कल्याण आहे.

हिंदु लोकांचा धर्म म्हणजे नुसती कवाईत होऊन गेली आहे. ही पद्धत पार बदलली पाहिजे. मंत्रांचा गोषवारा समजेल इतकें संस्कृत प्रत्येक गृहस्थ व भिक्षुक यांस आलें पाहिजे. धर्मांत उच्च तत्वें आहेत तीं आचरणांत येऊन त्याप्रमाणें माणूस थोर झाला पाहिजे. धर्माच्या प्रत्येक पंथानें आपलीं तत्वें लहान लहान पुस्तकांत ग्रथित केलीं पाहिजेत. या तत्वांत नीतीचीं तत्वें, वर्तनाचे नियम व लोकांच्या उपयोगी पडण्याचें धोरण हीं स्पष्ट सांगितलेलीं असावीं. त्यांत आपलेपणाचा अभिमान उत्पन्न व्हावा, त्याप्रमाणें वागण्याची हौस वाटावी व त्याप्रमाणें आचारण करीन असा निश्चय करावा अशी मांडणी असावी. तत्वाप्रमाणें आचरण, शारीरिक वगैरे

स्वच्छता, दुसऱ्या पंथाविषयीं व धर्माविषयीं आदरबुद्धि, देशाभिमान, शिस्त, निश्चयीपणा व दुसऱ्यासाठीं कळवळणें हे गुण त्या धर्मांत उत्पन्न झाले पाहिजेत.

शाळांतून अगदीं तळापासून शेंड्यापर्यंत सर्व यत्तांतून धर्म व नीति यांचे पाठ असावे. सर्वव्यापी तत्वें नेहमीं आचरणांत यावीं अशी व्यवस्था शाळांतून पाहिजे. वडील व गुरुजी यांच्या पायां पडणें, त्यांच्या आज्ञेंत वागणें, खरें बोलणें, दुसऱ्याच्या उपयोगी पडणें, या गोष्टी सर्वत्र आचरणांत पाहिजेत व हें वळण बाळपणापासून लागलें पाहिजे.

हल्लीं हिंदुस्थानांत अत्यंत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे लोकांना सामाजिक शिस्त कशी लागावी हा आहे. जुन्या मताचे लोक 'इंग्रजी शिक्षणानें वडिलांचा मान व शिस्तीचें वर्तन नाहींसें झालें' असें म्हणतात व ही गोष्ट खोटी नाहीं. सुधारणा म्हटली म्हणजे असें व्हावयाचेंच. यःकश्चित घरांत आपण सुधारणा करूं लागलों तर जुन्या भिंती पाडाव्या लागतात व त्यामुळें घराला भकासपणा येतो. पण नव्या भिंती घातल्या म्हणजे घराला नवीन शोभा येते. त्याचप्रमाणें पूर्वीची शिस्त व वडिलांचा मान गेला ही गोष्ट जरी आज दिसली तरी लवकरच नवी शिस्त व पुढाऱ्यांचा मान या गोष्टी देशांत उत्पन्न होतील. एकदां विचारपूर्वक आचरण करण्याची संवय लागली म्हणजे विचारांची शिस्त व विचारी माणसांना मान साहजिक उत्पन्न होतो व या गोष्टी जास्त टिकाऊ व अभिमानार्ह असतात. पाश्चात्य देशांत असेंच झालें. विचाराला सुरुवात होतांच धर्मगुरूंचा मान गेला इतकेंच नव्हे तर बायबल देखील खोटें ठरलें. योग्य धिरे नाहींसे झाल्यानें समाजाचा डोलारा ढांसळेल असें त्या वेळीं पुष्कळांना वाटलें. पण तसें न होता संघांची शिस्त व पुढाऱ्यांचा दाब उत्पन्न होऊन समाज सुधारतच गेला. हल्लीं सुद्धां पाश्चात्य देशांत स्त्री व पुरुष या दोन घटकांच्या स्पर्धेमुळें व स्वतंत्र वागण्याच्या हौशीमुळें काय होईल अशी धास्ती वाटतच आहे. आपल्या हिंदु धर्माची इमारत या पाश्चात्य धर्मापेक्षा पुष्कळ रुंद व भजबूत पायावर उभारलेली आहे. यासाठीं तिच्यांत नव्या व्यवस्थेला योग्य अशी सुधारणा करण्यासाठीं कांहीं भिंती थोडा वेळ

पडल्या म्हणून घाबरण्याचें कारण नाहीं. योग्य ठिकाणीं नव्या भिंती घालून मर्यादा उत्पन्न केली म्हणजे नवे दिवाणखाने जास्त प्रशस्त व जास्त उपयोगीच होतील.

पाश्चात्य देशांत शाळा, कालेजें, कचेऱ्या व कारखाने यांत संघानें किंवा सहकारितेनें काम करण्याची शिस्त लावण्यांत येते. या शिस्तीला बळकटी यावी म्हणून सक्तीच्या लष्करी शिक्षणाची मदत घेण्यांत येते. सगळ्या शाळांतून, कालेजांतून इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष तुरुंगांतून सुद्धां आपली आपणच सर्व शिस्त लावावी व व्यवस्था करावी असें शिक्षण देण्यांत येत असतें. कारखान्यांत मालक व मजूर यांच्या संयुक्त मंडळामार्फत काम करून घेण्याकडे तेथें प्रवृत्ति आहे. असें करण्यानें राष्ट्र म्हणजे सर्व लोकांचें अशी भावना व्हावी, ज्याला त्याला आपलेपणा वाटावा, दुसऱ्यासाठीं आपलें मन आवरून धरण्याची संवय लागावी, एकमेकांच्या सल्ल्यानें तंटे मिटविण्याची बुद्धि व्हावी अशी योजना आहे. पूर्वीची मोडलेली शिस्त नव्या परीस्थितींत नवीन स्वरूपांत कशी उत्पन्न होते व त्यापासून देशाचें कसें हित होतें हें दाखविण्यासाठीं ही माहिती दिली असून याच धर्तीवर आपल्याला काम करतां येईल व तें करण्याचा उपक्रम केला पाहिजे हें सांगण्याचा येथें मुख्य उद्देश आहे. ढिलीं केलेलीं धार्मिक बंधनें याप्रमाणें शिस्तवार बळकट करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

धर्माची अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे पतितपरावर्तन होय. पतितांना परावर्तनाची सवड ठेवावी कां नाहीं याबाबद दोन्ही बाजूनें पुष्कळ सांगतां येईल. परावर्तनाची सवड नसली तर मनुष्य आपलें वर्तन फार जपून करील व तो नियमांना तुच्छ लेखणार नाहीं, हा मोठा गुण आहे. परावर्तनाला जागा असली तर चुकीच्या दुरुस्तीस वाव असतो खरा; पण त्यामुळें धर्माच्या बाबतींत फार ढिलाई होते व चंचलता येते. कांहीं असलें तरी सर्व धर्मांनीं ही सवलत ठेवली असून प्राचीन काळीं ही गोष्ट प्रचारांत होती. ज्या वेळीं वर्णव्यवस्था ढिली होती त्याच वेळीं पतितपरावर्तन शक्य होतें. पण धर्म म्हणजे एक चेष्टेचा विषय होऊं नये म्हणून ही सवलत काढून टाकण्यांत आली. परावर्तन करावयाचें असेल तर तो इसम पहिल्यानें पतित कसा झाला हें पाहिलें पाहिजे. तो काम, क्रोध किंवा लोभ यांना बळी

पडून पतित झाला असेल तर त्यांला परावर्तनास मोकळीक ठेवण्यांत अर्थ नाहीं. पण चुकून किंवा जुलमानें जर कोणी पतित झाला असेल तर त्यास शुद्ध करण्यास हरकत नाहीं. ज्या इसमाला आपण शुद्ध व्हावें असें वाटत असेल त्यानें पहिल्यानें मला शुद्ध करून घ्या अशी मागणी करावी व झाल्या चुकीबद्दल योग्य दंड द्यावा. शिवाय ज्या लोकांत त्याला यावयाचें त्यांच्यासारखें वर्तन त्यानें एक वर्ष उमेदवार म्हणून वागावें. असें केलें म्हणजे धर्माला क्षणिकत्व न येतां माणसाची कळकळ उघड होईल. त्याला उमेदवारी झाल्यावर योग्य संस्कार करून धर्मांत परत घेण्यास हरकत नसावी.

नवीनच कोणा इसमास हिंदु धर्मांत यावयाचें असल्यास त्यासहि हिंदु धर्मांत येण्याची परवानगी असावी. त्याला वरीलप्रमाणेंच अट पाहिजे. उमेदवारी, दंड, प्रायाश्चित व संस्कार इतकें झाल्यावर कोणालाहि हिंदी धर्मांत येतां यावें अशी सवलत ठेवण्यास हरकत नसावी. कोणत्या जातींत कोणाला घ्यावें हें त्या त्या जातींनें ठरवावें अगर पतितांची व परिवर्तितांची दुसरी एक स्वतंत्र जात करावी. जातिधर्म ढिले करावे याबाबद सामाजिक सुधारणेंत विचार केला आहे. तसाच अस्पृश्यत्वाचा विचार सामाजिक सुधारणा या प्रकरणांत केला आहे. रोटीबेटीव्यवहार सामाजिकच समजण्यांत यावा. वर्ण, आश्रम व धर्म हे अनेक पिढ्यांच्या आचरणशुद्धीनें वर चढावे अगर खालीं जावे. विविक्षित कसोटीला प्रत्येक वर्ण, आश्रम धर्म उतरला पाहिजे. पहिल्यानें धर्मांतर, मग आश्रमांतर व मग वर्णांतर अशी ही चढती योग्यता असावी. प्राचीन हिंदी शास्त्रकारांची या गोष्टीला संमति आहे. योग्य आचरणाचें बक्षिस म्हणून एकाद्या व्यक्तीला एक पिढीपुरतें उच्च वर्णांत दाखल करावें. असें केल्यानें श्रेष्ठ आचरणाला प्रोत्साहन मिळेल. देशकार्यासाठीं स्वार्थत्याग, धाडस किंवा अलौकिक कृति करणारांचा असा गौरव करणें सर्वथैव योग्य आहे. त्याचप्रमाणें नीच वर्तन, देशबुडवेपणा यांना बहिष्काराची शिक्षा पाहिजे. या सामाजिक निर्बंधांना कायदेशीर स्वरूप खास ठरावानें देतां यावें. तात्पर्य समाजाच्या ठिकाणीं कांहीं विशिष्ट निग्रहानुग्रहशक्ति पाहिजे व ती सर्वसंमत पाहिजे. अशा रीतीनें समाजाला जोम येईल, त्यांत उत्साह वाढेल, तेजस्विता प्रगट होईल असा वाव आपण अवश्य ठेवला पाहिजे. अलौकिकत्व हें केव्हांहि मानार्हच आहे व

यासाठीं त्याला योग्य मान प्रत्येक ठिकाणीं धर्म, समाज, राजकारण, धन, अधिकार वगैरे बाबतींत मिळाला पाहिजे. पदवी, मान, किताब, विशिष्ट सामर्थ्य, विशिष्ट पोषाक, चिन्हें हीं असला मान प्रदर्शित करण्याचीं साधनें आहेत व त्यांचा देशहिताचे दृष्टीनें योग्य उपयोग केला पाहिजे. त्याचप्रमाणें बिल्ला, पोषाक किंवा अंलकार, इनाम, जहागीर, वर्षासनें हीं योग्य वर्तनाला उत्तेजन देणारीं आहेत. यांचा उपयोग चांगल्या प्रकारें झाला पाहिजे. ज्याप्रमाणें सरकार या गोष्टी करतें त्याचप्रमाणें स्थानीक संस्था, जनता यांनीं या केल्या पाहिजेत. या गोष्टी करणें दोन्ही पक्षांना श्रेयस्कर आहे. मान देणाराची गुणग्राहकता व मान मिळविणाराची योग्यता या दोन्ही गोष्टी त्यांत जगाच्या निदर्शनास येतात.

प्रकरण सहावें

शिक्षणविषयक तयारी

हिंदुस्थानाला साधारणपणें निरक्षर लोकांचा देश असे म्हणण्याचा प्रघात आहे. असा किताब हिंदुस्थानास कां मिळतो याचा विचार करतांना हिंदुस्थानसरकार शिक्षणाकडे किती पैसा खर्च करतें हें मुख्यत्वें पहिलें म्हणजे झालें. सन १९१६-१७ सालीं जगांतील राष्ट्रांनीं लोकसंख्येच्या शंभर माणसांना शिक्षण देण्यासाठीं किती पैसे खर्च केले याचें कोष्टक खालीं दिलें आहे.

देशाचें नांव	शिक्षणखर्च	शिकणारीं मुलें	प्रमाण
हिंदुस्थान	४५	१००	२·९
जपान	२६०	४९३	१४·३
ग्रेटब्रिटन	६३०	५६८	१६·५
कानडा	१६७०	५४८	
संयुक्त संस्थानें	२७००	८०३	

स्त्रियांच्या लोकसंख्येशीं जर मुलींची—शाळेंत जाणाऱ्या मुलींची—संख्या तोलली तर हें प्रमाण भलतेंच कमी पडेल. स्त्रियांचें शिक्षण मागें असण्याचें कारण या शिक्षणाच्या योग्य सोईचा अभाव व लोकांच्या विशिष्ट चालीरीति या दोन गोष्टी होत. वर सांगितल्याप्रमाणें लोकसंख्येपैकीं निम्मी माणसें अडाणी राहिल्यावर पुष्कळ गोष्टींत आपणांस अडचणी येतात हें उघड आहे.

त्यांतल्या त्यांत जें थोडें बहुत शिक्षण हल्लीं देण्यांत येतें तें सर्व अव्यावहारिक असतें. मिळालेली माहिती व्यवहारांत—रोजच्या व्यवहारांत कशी वापरावी व कशी अवश्य आहे हें कोठेंच शिकविण्यांत येत नाहीं. सर्व शेतकरी व धंदेवाले लोक आपलीं मुलें शाळेंत घालण्यास नाखुष असतात, याचें कारण हें कीं, शाळेंत जाऊं लागलेला मुलगा आपला वडिलार्जित धंदा

करण्यास नाखुष व नालायक होतो हा त्यांचा अनुभव आहे हें होय. वडिलार्जित धंदा त्या मुलांना न आवडेल तर न आवडो, पण दुसरा कोणताहि किफायतशीर धंदा या मुलांना शाळेंत गेल्यावर येत नाहीं हें त्यांच्या नापसंतींत आणखी भर घालतें. ही झाली प्राथमिक शिक्षणाची रड.

दुय्यम व वरिष्ठ प्रकारचें शिक्षण घेतलेले जवान तरी शेतकी, शिल्प, कारागिरी, व्यापारधंदे यांत प्रवीण होतात म्हणावें तर तेंहि होत नाहीं. फक्त कारकुनी करण्यापुरतें लिहिणें, वाचणें व गणीत हे विषय या तरुणांना शिकविलेले असतात. इतिहास व समाजशास्त्राचें या शाळांतून जें शिक्षण मिळतें तें व्यवहारांत वापरण्याइतकें मुळींच नसतें. पुष्कळशी निरुपयोगी माहिती या विषयांत शिकविलेली असते व तीहि व्यवस्थित व पद्धतशीर मांडलेली नसते. राजकारणासारख्या खऱ्या लोकोपयोगी शिक्षणाला तर फांटाच दिलेला असतो. शिल्प व वैद्यक यांचें थोडें फार शिक्षण मिळतें. पण त्यांत सुद्धां हिंदी लोकांना परदेशीय कारखानदारांचे अडत्ये अगर गुमास्ते बनविण्यापलीकडे कांहीं राम नसतो. तात्पर्य, शाळांतून शिकून बाहेर पडलेला मुलगा कोणाचा तरी नोकर अगर ताबेदार रहावा याच धोरणानें सर्व शिक्षणाची मांडणी केली आहे व ही गोष्ट आज तीस चाळीस वर्षें पुढाऱ्यांच्या लक्षांत आली आहे. या शाळांना ते 'हमालखाने' म्हणतात. पण असे हमालखाने नव्हत अशी शाळा अद्याप निघाली नाहीं. स्वतंत्र खाजगी शाळा निघाल्या. राष्ट्रीय शाळा निघाल्या. पण त्यांत शिकविणारे बहुतेक आंधळेच असल्यामुळें त्यांच्या माळेचेच मणी ते तयार करतात. राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशोद्धारक शिक्षण म्हणजे काय, तें कसें असतें, कसें देतात व द्यावें या बाबींचा विचारपूर्वक अभ्यास करून कष्टपूर्वक शिक्षण देणारी माणसें विरळा. यामुळें नांवांत भेद पण शिक्षणक्रमांत, पद्धतींत व फळांत भेद नाहीं असेंच शिक्षण अद्याप मिळत आहे. नवीन योजना तयार करून त्याप्रमाणें आपण स्वतःची तयारी करून, ती पद्धत अमलांत आणून ती विद्यार्थ्यांत उतरून दाखविणारी शाळा अद्याप नांवलौकिकास आलेली नाहीं. मग ती पुढें केव्हां येईल ती येवो.

वरील प्रकारच्या शाळांत जाणारा काळ, लागणारा खर्च व द्यावी लागणारी फी वगैरे इतकी जबर आहे कीं, फारच थोड्या लोकांना यांचा फायदा घेववतो. शिष्यवृत्त्या देखील फार थोड्या असून त्या दुर्मिळ अशा मागासलेल्या लोकांकरितां आहेत. साधारणपणें बुद्धिमान् माणसें मध्यम व गरीब वर्गांतच जास्त असतात; कारण लोकसंख्येचा मोठा भाग याच लोकांचा झालेला असतो. दुय्यम व वरिष्ठ शिक्षणाची भाषा परकी, यामुळें तें शिक्षण नीट आत्मसात होत नाहीं. पुष्कळ गोष्टी इंग्रजींत समजल्यानें व देशी भाषेंत त्यांचें ज्ञान नसल्यानें तें ज्ञान व्यवहारांत उपयोगांत आणण्यास मुष्कील पडते. अशा अडचणीमुळें गरीब व मध्यम स्थितींतील हुशार, उद्योगी व होतकरू मुलांना या शिक्षणाचा लाभ मिळत नाहीं. यापुढें खर्च भागविण्यासाठीं फी वगैरे वाढूं लागली तर शिक्षण घेणारांची संख्या कमी होऊन उलट उत्पन्न जास्तच कमी होईल.

शिक्षणाच्या बाबतींत कंजूषपणा केल्यानें प्रत्यक्ष ब्रिटनचें सुद्धां पुष्कळ अहित झालें आहे. जर्मनी व जपान या देशांनीं शिक्षणाची जी व्यवस्थित मांडणी व शिस्त लावली आहे तिजपुढें ब्रिटनची व्यवस्था फारच फिकी पडते व यामुळें जर्मन लोकांपुढे ब्रिटनला महायुद्धांत कित्येक वेळा हार खावी लागली. लढाईंतील कोणतीहि नवीन पद्धति जपान व जर्मनी याच दोन राष्ट्रांनीं पहिल्यानें वापरली व मग ती पद्धति इतरांनीं उचलली. पण मूळ उत्पत्ति, प्रारंभीची कल्पकता जर्मन व जपान यांचीच होय. ही ज्या ठिकाणीं ब्रिटनची स्वतःची, मालक गणल्या किंवा म्हणविल्या जाणाऱ्या राष्ट्राची, स्थिति तेथें गरीब बिचाऱ्या गुलामप्राय ताबेदारींत रखडणाऱ्या हिंदुस्थान देशाचे हाल काय सांगावे ?

हिंदुस्थानांत आतां आपणांस स्वराज्याची मेढ उभारावयाची आहे व त्यासाठीं पाया म्हणून शिक्षणाची योग्य व्यवस्था केली पाहिजे. हें शिक्षण यापुढें असें पाहिजे कीं, त्यामुळें हें शिक्षण संपादन केलेले तरुण स्वराज्य चालविण्यास सर्वथैव योग्य व्हावे. इतकेंच नव्हे तर स्वराज्यासाठीं लागणारें आर्थिक व सामाजिक सामर्थ्य त्यांच्यांत उत्पन्न व्हावें. याबाबद हिंदुस्थानानें जपानचा कित्ता घ्यावा म्हणजे बरें. तो देश थोड्याच वर्षांपूर्वी

हिंदुस्थाना इतकाच मागसलेला होता, व त्यानें शिक्षणाच्या योगानें इतक्या थोड्या अवकाशांत इतकें उच्च स्थान पटकावलें आहे. या बाबद दुसरें देण्यासारखें उदाहरण म्हणजे फिलिपाइन बेटांचें. या बेटांनींहि केवळ वीस वर्षांच्या अवधींत हिंदुस्थानच्या माणून येऊन पुढची जागा पटकावली आहे. फिलिपाइनमधील शिक्षणपद्धति बहुतेक तोंडीं शिकविण्याची आहे. यामुळें तिला खर्च कमी येतो व थोड्या काळांत विद्यार्थी पुष्कळ प्रवीण होतो.

येत्या दहा वर्षांत हिंदुस्थानचा शिक्षणविषयक खर्च सदतीस कोटींवर गेला पाहिजे व त्याची वांटणी खालीं दिल्याप्रमाणें झाली पाहिजे.

शिक्षणाची जात	विद्यार्थ्यांची संख्या	लोक संख्येशीं हजारीं प्रमाण	खर्च लाख
प्राथमिक शिक्षण	३,६४,००,०००	१४०	२७००
दुय्यम शिक्षण	३६,४०,०००	१४	५२५०
उच्च शिक्षण	३,९०,०००	१.५	४५००
खास शास्त्रीय शिक्षण	१,३०,०००	०.५	७५०
एकूण	४,०५,६०,०००	१५६	३७५०

यापैकीं हल्लीं होणारा खर्च व तितकाच आणखी सरकार करील म्हटलें तरी वीसबावीस कोटी रुपये होतील व पंधरा कोटींची भर नवे कर व कर्ज यांनीं केली पाहिजे. हिंदुस्थानचें अनुत्पादक कर्ज थोडें आहे व त्यांत ही भर घालण्यास लोकांनीं मागें पुढें घेऊं नये. हें शिक्षणविषयक कर्ज म्हणजे स्वराज्याचा पाया आहे. इमारत मजबूत व्हावी असें वाटत असेल तर पायांत काटकसर उपयोगी नाहीं. ज्याप्रमाणें शेताच्या नांगरणींत व खुरपणींत खर्च झालेले पैसे पिकांत किती तरी पटीनें भरून निघतात त्याचप्रमाणें शिक्षणांत खर्च झालेले पैसे पुढें उत्पन्नांत किती तरी पटीनें भरून येतील. ज्याअर्थीं या पिकाचा फायदा सर्व राष्ट्राला व अनंत काळ होणार आहे त्याअर्थीं हा खर्च कर्ज काढूनच करावा हें योग्य आहे व म्हणूनच येथें कर्ज काढण्याची सूचना केली आहे. एका पिढीनें, एका काळच्या जनतेनें हा सर्व खर्च सोसणें शक्य नाहीं व वाजवीहि नाहीं.

प्रत्येक संस्थानाचें स्वतंत्र शिक्षणखातें असावें. त्या खात्याचा मुख्य एक दिवाण व त्याचे सल्लागार मंडळ असावेत. हे सल्लागार मंडळ प्रत्येक जिल्यातील शिक्षणमंडळानें निवडलेल्या सभासदांचें असावें. शिक्षणासाठीं लागणारीं पुस्तकें, वर्तमानपत्रें वगैरेंत जाहिरात देऊन चढाओढीनें रचावीं. हीं पुस्तकें त्या त्या विषयाच्या तज्ञांच्या मंडळाकडून तपासवून जीं उत्तम ठरतील तीं शाळांत चालवावीं. या पुस्तकांत सरकारी अधिकाऱ्यांचा हात बिलकूल असूं नये. सगळ्या शिक्षणखात्यांत सरकारची ढवळाढवळ नको. सर्व सत्ता लोकप्रतिनिधि व विद्वान् यांच्या हातीं पाहिजे. प्रत्येक मंडळींच्या कचेरींत एक लायब्ररी, एक वाचनालय, एक प्रयोगशाळा व एक पदार्थसंग्रहालय जरूर असावें. याप्रमाणें दर जिल्ह्यास एक मंडळ व त्याची कचेरी पाहिजे व संस्थानच्या राजधानींत युनिव्हर्सिटीशिवाय दिवाण व त्यांचे सल्लागार यांच्या कचेरींत संग्रह पाहिजे.

प्रत्येक जिल्ह्याच्या शिक्षणमंडळाचे सभासद, त्या जिल्ह्यांतील तालुके व जिल्ह्यांतील म्युनिसिपालिट्या यांच्या शिक्षणमंडळानें निवडावे. शहरच्या शिक्षणमंडळांत प्रांतिक सरकार अगर संस्थानातर्फे एक जिल्हाधिकाऱ्यातर्फे एक, युनिव्हर्सिटीतर्फे एक व जिल्ह्यांतील तिद्वनांतर्फे एक असे सभासद कमेटीच्या सभासदाशिवाय असावे. याशिवाय जिल्ह्यांतील नामांकित स्त्री अगर पुरुष यांस जरूर तर नेमून घेण्याचा अधिकार मंडळाला असावा.

प्रत्येक शिक्षणसंस्थेंत एक वाचनालय, एक ग्रंथसंग्रह, एक प्रयोगशाळा व एक पदार्थसंग्रहालय असावें. मुलांनीं आपण संपादन केलेल्या विचित्र जिनसा या संग्रहालयांत ठेवाव्या. शिक्षक व प्रोफेसर यांनीं विचारविनिमयासाठीं परप्रांतीं अगर देशीं जावें व शिक्षणांत सुधारणा करण्यांत मदत करावी असा नियम असावा. विषय उत्तम शिकविण्यासाठीं योग्य ती पद्धत वापरण्याची प्रत्येक शिक्षकास मोकळीक द्यावी. मुलांची परीक्षा म्हणजे वरच्या वर्गांतील उमेदवारी हीच असावी. शिक्षकाला कोणी मुलगा त्या यत्तेंत अयोग्य असा दिसला तर त्यास खालच्या यत्तेंत घालावें. यत्ता विषयवार निराळ्या असून एकच मुलगा निराळ्या विषयांत निरनिराळ्या यत्तेंत असण्यास हरकत नसावी. दरएक खेडेगांवास अगर खेडेगांवच्या

संघास एक शाळा असावी. संघांतील खेडींगांवें शाळेपासून एकदीड मैलाच्या आंत असावींत.

शिक्षणमंत्री व सल्लागार यांनीं पहिल्यानें आपल्या प्रांतासाठीं अगर संस्थानासाठीं एक पूर्ण व विस्तृत अशी योजना तयार करावी. या योजनेच्या धोरणानें जिल्ह्यांच्या व तालुक्यांच्या शिक्षणमंडळांनीं आपल्या योजना व क्रम ठरवावे. सक्तीचें शिक्षण किंवा प्राथमिक शिक्षण यांत पांच ते बारा वर्षांच्या मुलांचा समावेश व्हावा. आठ वर्षांच्या वर सक्ति व पांच वर्षांपासून खुषी ठेवावी. या प्राथमिक शिक्षणांत लिहिणें, वाचणें, जमाखर्च, गणीत हे विषय अवश्य असून चित्रकला, सृष्टिनिरीक्षण व व्यवहाराचीं तत्वें विशेषतः द्रव्य, काल व शक्ती यांचें महत्त्व हीं अवश्य असावीत. याशिवाय कोणता तरी धंदा शिकवावा. तो धंदा मुलांच्या आईबापांचा किंवा मुलांच्या आवडीचा असावा. तात्पर्य, प्राथमिक शिक्षण घेतल्यावर मुलगा कुशल (Alert), आत्मविश्वासी (Self-confident) व खटपटी (उद्योगी) बनला पाहिजे. त्याला आपण कांहीं तरी करावें अशी काम करण्याची हौस वाटली पाहिजे.

प्राथमिक शाळांना जोडून पण जरा स्वतंत्र अशा धंद्याच्या शाळा असाव्या. त्यांत शेती, व्यापार, सुतारी, कारागिरी, शिल्प, लोहारी, वगैरे विषय मुलांना व स्वयंपाक, शिवणकाम, धुणकाम, रोग्यांची शुश्रुषा, बालसंगोपन वगैरे विषय मुलींना शिकवावे. यांत शेतकीकडेच शिकणाऱ्या मुलांची संख्या मोठी असणार. ज्या ठिकाणीं शाळा काढण्याइतकीं मुलें शिकणारीं नाहींत तेथें सुट्टीच्या दिवशीं, रात्रीं त्यांना त्यांचे धंदे शिकविण्याची व्यवस्था करावी. शहरांतील तज्ञांनीं खेडेगांवीं मोठ्या कारागिरांना वर्षांकाठीं महिना पंधरा दिवस शिकवावें व मग या कारागिरांनीं रोज रात्रीं गांवांतील मुलांना शिकवावे अशी योजना करतां येईल.

जीं मुलें पुढें दुय्यम शिक्षण घेणार असतील त्यांना प्राथमिक शाळेंत धंद्याचें शिक्षण कमी पडलें तरी चालेल. थोडें तरी धंदेशिक्षण प्रत्येकाला पाहिजेच. दुय्यम प्रतीच्या शाळा प्रत्येक तालुक्याचे गांव व शहर येथें पाहिजेतच. या शाळेंत योग्य अशा गरीबांच्या मुलांस शिक्षक व शिक्षण-

मंडळ यांच्या शिफारसीनें फुकट घ्यावें. इतरांनीं फी दिली पाहिजे. याप्रमाणें दुय्यम शिक्षणांत चार सहा वर्षें घालविल्यावर मुलाला व्यवहार म्हणजे काय हें समजलें पाहिजे. नीट विचार करावा, शुद्ध आचरण ठेवावें, काय व कसें पहावें व त्यापासून सिद्धांत कसे काढावे, उद्योग, काटकसर व एकी किंवा जूट यांचे महत्त्व काय, स्वदेश व नागरिक यांचे संबंध काय, इतक्या गोष्टी त्याला समजल्या पाहिजेत. या शिक्षणांत शिल्प, यंत्र, धंदे, शेती, व्यापार, वैद्यक, नकशीकाम, मातीकाम, शिंपीकाम, वीणकाम, चामड्याचें काम, कारखान्यांतील काम, व घरें बांधण्याची माहिती यांपैकीं कांहीं तरी एक शिकलेंच पाहिजे अशी सक्ति असावी. धंदे व बौद्धिक शिक्षण हीं दोन्ही बरोबरच शिकविलीं पाहिजेत किंवा वर्षाकाठीं कांहीं दिवस बौद्धिक व कांहीं दिवस धंदेशिक्षण घ्यावें. या शिक्षणाच्या कामीं गांवांतील कारागीर वगैरेंची मदत घ्यावी.

दुय्यम शिक्षणानंतर ज्यांना उच्च शिक्षणाकरतां युनिव्हर्सिटींत जाण्याला ऐपत अगर वेळ नाहीं त्यांना देखील जास्त शिक्षण घेण्याची सोय दरएक जिल्हाचे ठिकाणीं थोडी फार व्हावी. अशीं व्यवस्था करण्याच्या कामीं युनिव्हर्सिटीला मदत करतां यावी म्हणून जिल्हा शिक्षणमंडळांत युनिव्हर्सिटीचा एक सभासद घेतला आहे. त्यानें याबाबद जरूर ती खटपट व शक्य ती योजना करावी. अशा कामाला धनिक लोकांचें सहाय्य मिळणें अशक्य वाटत नाहीं.

प्रत्येक युनिव्हर्सिटीनें नेहमींच्या उच्च शिक्षणाबरोबर अर्थशास्त्र, समाजशास्त्र व अंकानुमानशास्त्र (Statistics) यांचा अभ्यास अवश्य ठेवला पाहिजे. अशा शिक्षणानें प्रत्येक पदवीधर आपआपल्या धंद्यांत प्रमुख भाग घेऊं शकेल. निव्वळ बौद्धिक शिक्षणापासूनचे तोटे इतके उघड आहेत कीं, त्याबाबद चर्चा करण्याची जरूर नाहीं. श्रीमंत, सरदार वगैरे लोकांच्या मुलांसाठीं तर धंदेशिक्षण अत्यंत अवश्य आहे. व यासाठीं दरएक प्रांतास अगर संस्थानास एक खास शाळा असावी. अधिक खर्चाचीं उपकरणें, अधिक खर्चाचे प्रयोग, नवे शोध लावणें वगैरे गोष्टी या शाळेंत शिकवाव्या व प्रत्येक मुलानें हें शिक्षण घेतलेंच पाहिजे अशी धनिकांवर सक्ति करावी. हल्लीं धनिकांचीं मुलें कांहींच उपयुक्त शिकत

नाहींत असा अनुभव आहे. व हें एक मोठें देशाचें नुकसान आहे. तात्पर्य, युनिव्हर्सिटी म्हणजे पुढारी, व्यवस्थापक, म्यानेजर, गव्हर्नर, डायरेक्टर, काउन्सिलर वगैरे माणसें तयार करण्याचा कारखाना झाला पाहिजे.

युनिव्हर्सिटींत शिकवावयाचे विषय म्हणजे वैद्यक, शिल्प, यंत्र, विद्युत्, रसायन, खनिज, शेती, जंगल, नौका, विमान, व्यापार, कारखाने व पेढ्या हे होत. प्रत्येक पदवीधरास या विषयापैकीं एकतरी विषय यावयाला हवा. शिवाय भाषा वगैरे विषय व अर्थशास्त्र, समाजशास्त्र व अंकानुमान हीं अवश्य पाहिजेत म्हणून वर सांगितलेंच आहे. विशेषतः व्यापार, यंत्र व धंदे हे विषय हिंदुस्थानाला अत्यंत अवश्य आहेत.

अगदीं पहिली गोष्ट म्हणजे भाषांवार युनिव्हर्सिट्या स्थापल्या पाहिजेत व सर्व शिक्षण देशी भाषेंतून दिलें पाहिजे. सरकारचा हात शिक्षणांत बिलकुल नसावा व केवळ तज्ज्ञ लोकांना पूर्ण मुभा देऊन त्यांच्याकडून हा सर्व कारभार करावा. यासाठीं लागणारा पैसा दिवाणांनीं कर्ज काढून मिळवावा व पैसा नाहीं ही रड न सांगतां उत्तम काम करून दाखवावें. या गोष्टीकडे पहिल्यानें लक्ष दिलें पाहिजे. लोकल बोर्डाचें उत्पन्न दुप्पट करण्याची व्यवस्था झालीच आहे. व मेट्यांनीं देखील तसें करावें व हे पैसे शिक्षण मंडळानें खर्च करावे. हें शिक्षण मंडळ सर्व जनतेला जबाबदार व अगदीं निवडक माणसांचें पाहिजे.

याशिवाय प्रत्येक प्रांतानें आपल्या युनिव्हर्सिटींत ज्यानें ज्या कामांत नांव मिळविलें त्याला तोच धंदा शिकण्यासाठीं परदेशीं पाठवावे. या शिक्षणाचा निम्मा खर्च सरकारनें द्यावा व निम्मा त्या इसमानें धनिक वगैरेपासून मिळवावा व त्याबद्दल आपल्या आयुष्याच्या विम्याची हमी द्यावी. यासाठीं अशा मुलांना जरा खालींच युनिव्हर्सिटींत प्रवेश मिळाल्यावर कोणती तरी परकी भाषा शिकण्याची सल्ला द्यावी. अशी सल्ला दिलेल्या मंडळींतून जरूर त्यांची त्या धंद्यांतील प्राविण्यानुसार निवड करावी.

दुसरी महत्वाची बाब म्हणजे शिक्षक तयार करणें होय. धंदेवाइकांना शिक्षक होण्यासाठीं शिष्यवृत्त्या द्याव्या व त्या ठिकाणीं कसें शिकवावें हें त्यांस शिकवावें. हल्लीं शिक्षक तयार करण्याची पद्धत नीट नाहीं. शिक्षकाला

शिकविण्याच्या पद्धतींत पूर्ण मुभा द्यावी व विद्यार्थ्यांत तो विषय कसा उतरतो यावर बढती वगैरे ठेवावी. शिक्षक एका विषयांत निष्णात व शिकविण्याची हौस असलेला असावा व त्याचा पगार त्याच्या चरितार्थास व त्याच्या दर्जास शोभेसा असावा.

जनता व सरकार यांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे की, पद्धतशीर रीतीनें काम करून व जरूर तो पैसा सढळ हातानें खर्च करूनच शिक्षणांत सुधारणा होणार आहे. या महत्त्वाच्या कामीं चिक्कूपणा बिलकुल उपयोगी नाहीं. असा सढळ हातानें खर्च करून व अनेक कष्ट सोसून उत्तम शिक्षण दिल्यानेंच देशाची उन्नति व कल्याण होणार व याशिवाय या उन्नतीला किंवा कल्याणाला दुसरा मार्ग नाहीं.

प्रकरण सातवें

शेतीविषयक तयारी

देशी संस्थानांसुद्धां सर्व हिंदुस्थानाचा शेतीचा विस्तार घेतला तर तो चीन व अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें सोडून पृथ्वीवरील कोणत्याहि देशाच्या शेतीच्या विस्तारापेक्षां जास्त आहे. या शेतीचें उत्पन्न लढाई-पूर्वीच्या भावानें ६,००,००,००,००० रुपये होतें. हें उत्पन्न शेतकऱ्यांच्या लोकसंख्येवर वांटलें तर दरमाणशीं तीस रुपये व सर्व लोकसंख्येवर वांटलें तर दरमाणशीं वीस रुपये पडतें. या बाबींत हिंदुस्थान व जपान यांची तुलना केली तर असें दिसतें कीं जपान देश आपल्या स्वतःच्या उत्पन्नावर आपला निर्वाह करतो म्हणून एका जपानी माणसाला एक-तृतीयांश एकर जमिनीचें उत्पन्न पोटभर होतें; पण हिंदुस्थानांतील दर-माणशीं पांचषष्ठांश एकर जमिनीच्या उत्पन्नांत फक्त एकदांच अन्न मिळतें. जपानचें दरमाणशीं शेतीचें उत्पन्न रुपये दीडशें आहे. जपान व हिंदु-स्थान यांच्या उत्पन्नांत इतकें अंतर पडण्याचें कारण काय असा साहजी-कच प्रश्न उत्पन्न होतो व त्याचें उत्तर हेंच कीं, जपानांतील साधारण शेती बागाइताप्रमाणें काळजीपूर्वक करण्यांत येते. त्या देशांत खत मूत घालण्याची व्यवस्था फार विचारपूर्वक अमलांत आहे. जपानांत माणसांची लघवी अगदीं व्यर्थ घालवीत नाहींत. दरएक घरांत मोरीऐवजीं माती घातलेला कुंडा असतो व या कुंड्यांत सर्व माणसें लघवी करून ती माती शेतांत घालतात. बाजारांत देखील कागदी तंबू असून त्यांत हे लघवीचे कुंडे ठेवलेले असतात. या रीतीनें लघवींतील सर्व क्षार मातींत व शेतांत जातात. तसेंच भाताची लावणी. दोन रोपांमधील अंतर काठीनें मोजून अगदीं सारख्या अंतरावर लावतात. खेडेगांवांत गांवोगांव तरुणांचे संघ असतात. हे संघ पीक जास्त येण्यासाठीं दररोज नवीन कांहीं युक्त्या नेहमीं शोधून काढीत असतात व अशा मंडळांना सरकारी तज्ञ योग्य ती सल्ला फुकट देत असतात.

हिंदुस्थानांतील जमिनींत कमी पीक येण्याचीं अनेक कारणें आहेत. त्यांपैकीं कांहीं अनिवार्य असून कांहींचा बंदोबस्त करतां येण्यासारखा आहे. अगदीं मोठ्या महत्त्वाचें व अनिवार्य कारण म्हणजे पावसाची अनिश्चितता होय. पाऊस बंगाल, ब्रह्मदेश व कोंकण किंवा पूर्व पश्चिम घाट यांखेरीज सर्वत्र अव्यवस्थितपणें पडतो. यासाठीं पिकांस पाण्याचा पुरवठा हुकमी करतां येत नाहीं. कालव्याखालीं भिजणारें हिंदुस्थानचें क्षेत्र अत्यंत अल्प आहे. याशिवाय पाण्याची सोय म्हणजे गांवचीं तळीं व विहिरी होत. दुसरें कारण म्हणजे शेती करण्याची फार प्राचीन काळापासून चालत आलेली ठरलेली पद्धत होय. या पद्धतींत कोणत्या सुधारणा कशा करतां येतील याचा कोणीं विचार केलेला नाहीं व कांहीं विचार झाला असल्यास तो अमलांत नाहीं. अगदीं पृथ्वीच्या प्रारंभीं कश्यप संहितेंत जें नांगर वगैरेचें माप व वर्णन आहे तेंच आज सुमारें दहा हजार वर्षें प्रचारांत आहे. लोक अत्यंत साधेभोळे असून ते आपली पूर्वपरंपरा सोडावयास तयार नाहींत. तथापि उत्तम म्हणून जें कांहीं कोठेंहि सांपडेल तें उचलून आत्मसात् करण्यांत हिंदु लोकांचा हातखंडा आहे. याप्रमाणें लोक सुधारणा उचलतील. पण त्या आत्मसात् झाल्या पाहिजेत ही त्यांची अटहि बरोबर आहे. नांगर वगैरे हत्यारें करण्याचें लोखंड परकी, तीं हत्यारें बनविणारे व विकणारे परकी, त्यांचा उपयोग सांगणारे परकी, त्यांची दुरुस्ती करणारे देखील परकी. अशा स्थितींत हिंदी लोक या सुधारलेल्या आयुधें वगैरेंचा उपयोग करण्यास निरुत्सुक असावे हें साहजिक आहे.

हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची मनोरचना जगांतील इतर देशांतील शेतकऱ्यांच्या मनोरचनेपेक्षां भिन्न नाहीं. सुधारणा, नव्या सुधारणा, अपरिचित सुधारणा स्वीकारण्याबद्दल साशंक असणें हा मनुष्यस्वभावच आहे. परमेश्वरानें ही साशंक वृत्ती माणसाच्या हितासाठींच त्याच्या हृदयांत ठेवली आहे. आपला जीव वांचविण्यासाठीं ही साशंक वृत्ति जरूर असते. अपरिचित मनुष्य आपल्याला चोरील, अपरिचित प्राणी आपल्याला खाईल, अपरिचित वस्तु आपणांस अपाय करील, अपरिचित पद्धत आपणांस धोक्यांत घालील या शंका जन्मतःच प्राण्यांच्या हृदयांत आपल्या संरक्षणाचीं साधनें म्हणून ठेवलेल्या असतात. आपण शेतकऱ्यांच्या, हिंदी

शेतकऱ्यांच्या चरित्रांकडे काळजीपूर्वक पाहिलें तर आपणांस असें दिसेल कीं, तो परिस्थितीप्रमाणें फेरबदल करण्यास अगदीं नाराज किंवा अगदीं असमर्थ असा नाहीं. त्याला जीं साधनें सुगम असतात, जीं त्याच्या आटोक्यांत असतात, अशीं साधनें वापरण्यांत हिंदी शेतकरी बिलकुल कसर किंवा आळस करीत नाहीं. त्याला शिकविणाऱ्या माणसाबद्दल त्याला विश्वास वाटला, त्याच्या प्रामाणिकपणाविषयीं खात्री पटली, तो सांगतो ती गोष्ट हितकर आहे असें दिसलें म्हणजे हिंदी शेतकरी त्या उपदेशाप्रमाणें बरोबर वागतो असा अनुभव आहे. यासाठीं शेती सुधारण्यासाठी जे प्रयत्न करावयाचे, ज्या शाळा काढावयाच्या, ज्या पद्धती वापरावयाच्या, त्या शेतकऱ्यांची बरोबर खात्री पटवतील अशा पाहिजेत व ही खात्री पटण्यासाठीं या गोष्टी व शेतकरी यांचा नेहमीं वरचेवर संबंध आला पाहिजे. इंग्रज सरकारच्या शेती संस्था व नमुनेदार शेतें हीं शेतकऱ्यांशीं परिचय ठेवीत नाहींत. नमुनेदार शेतावर काम करणारे शेतकरी व मजूर यांची सुद्धा त्या व्यवस्थे-बद्दल शेतकी अधिकाऱ्यांना खात्री करून देतां येत नाहीं ! नमुनेदार शेत खरोखर फायदेशीर झालें असें साऱ्या मुंबई इलाख्यांत एकसुद्धां नाहीं. या शेतांवर गोठे, कोठारें, यंत्रें, अधिकारी यांचा खर्च मात्र अतिशय असतो व त्या मानानें उत्पन्न मुळींच नसतें. पावसाचीं अनुमानें काढणारीं साधनें व कचेऱ्या इंग्रज सरकारच्या इतक्या आहेत पण एका वर्षीं सुद्धां अनुमान बरोबर उतरत नाहीं. विलायती खतांच्या इतक्या जाहिराती आपण पहातों पण त्या खतांच्या किंमतीइतकीसुद्धां उत्पन्नांत वाढ अनुभवास येत नाहीं. अशा स्थितींत गरीब शेतकरी या गोष्टी उपयोगांत आणीत नाहींत यांत त्याचा काय दोष आहे ?

अधिकाऱ्यांमार्फत सरकारनें केलेले शेतकी सुधारण्याचे प्रयत्न इतके थोडे व असले कुचकामी आहेत कीं, ते शेतकऱ्यांच्या काळजाला जाऊन भिडतच नाहींत. प्रयोग करणारे अधिकारी सुद्धां जेथें प्रयोगाच्या फला-बद्दल साशंक, तेथें अडाणी माणसांना त्यांचा काय उपयोग ? आज कित्येक वर्षें मध्यवर्ती व नमुनेदार अशी थोडी शेती व कित्येक जिल्ह्यांच्या ठिकाणीं शेतेंहि सरकारी अधिकाऱ्याच्या मार्फत चालविलेलीं आहेत, पण त्यापैकीं एकांत

तरी खरोखर फायदा झाला असें सिद्ध झालें नाहीं व त्यामुळें त्या त्या जिल्ह्यांतील या शेत–सुधारणांचा परिणाम विस्तृत शेतीवर बिलकुल झालेला नाहीं. या शेतांवर काम करणारे सरकारी अधिकारी व शेजारचे शेतकरी यांमध्यें स्नेहसंबंधसुद्धां नाहीं. दोघेहि एकमेकांबद्दल सारखेच बेपर्वा आहेत. सरकारी शेत व शेतकऱ्याचें शेजारचें शेत यांमध्यें फलांत, उत्पन्नांत खर्चाच्या मानानें फरक दिसत नाहीं. सरकारी शेती करणारीं माणसें शेतीची तज्ञ म्हणून स्वतःची शेती करीत नसून सरकारी नोकर म्हणून सरकारचीं शेतें करीत असतात व त्यामुळें नफानुकसानी, उत्पन्न व खर्च, गरजा व सोई यांचा विचार न करतां पाश्चिमात्य देशांतील पद्धतीचें अनुकरण सरकारच्या हुकमानुसार त्या ठिकाणीं करण्यांत येतें. त्या सरकारी शेतावर कळकळ, नवीन युक्ति, लोकांनीं घेण्यासारखा कित्ता, प्रचंड उत्पन्न, नजर न ठरेसें पीक अगर आश्चर्यकारक व्यवस्था यांपैकीं कांहींच दृष्टीस पडत नाहीं. यावरून शेतीचें खरें ज्ञान तेथें नाहीं, सुधारलेल्या शेतीचें रहस्य तेथें नाहीं, पीक वाढविण्याची करामत तेथें नाहीं, हटकून अमुक गोष्ट घडवून आणीन अशी धमक तेथें नाहीं, कौतुक वाटेल अशी व्यवस्था तेथें नाहीं, आश्चर्य वाटेल असा प्रभाव तेथें नाहीं असें लक्षपूर्वक पाहणारास वाटतें. अशा स्थितींत आपली जुनी पुराणी व्यवस्थाच बरी वाटली तर शेतकऱ्यांचा काय दोष ? बेगडी सुशिक्षितांप्रमाणें नसते ढंग, वाईट प्रचार, फार खर्चाचे भपके, खोट्या गप्पा यांना ते बळी पडले नाहींत याबद्दल शेतकऱ्यांचें अभिनंदनच केलें पाहिजे.

सर्व शेतीसुधारणा, इंग्रजांचा व्यापार, अधिकाऱ्यांचा दरारा व दिखाऊ भपका यांनीं विटाळलेली असल्यामुळें त्यांत खाजगी भांडवल नाहीं, व यामुळें शेतीला पुरेसा भांडवलाचा पुरवठा नाहीं. व या सर्व बाबतींत आमूलाग्र बदल केल्यावांचून तिकडे लोक जाणार नाहींत हें निःसंशय आहे. प्रत्येक ठिकाणचीं चमत्कारिक परिस्थिति, शेतकऱ्यांचें अज्ञान, धनिकांचें औदासिन्य, यामुळें शेतकऱ्यांचे संघहि स्थापन झालेले नाहींत. अशा संघांनीं रशिया, जपान वगैरे देशांत शेती ही व्यापाराच्या पायरीवर आणली आहे. शेतकऱ्यांना योग्य अडत्याचे साहाय्य नसल्यामुळें त्यांच्या मालाची योग्य किंमत त्यांच्या पदरीं

पडत नाहीं. साधारणपणें शेतकऱ्यांचा अडत्या व सावकार एकच असतो व यामुळें चारी बाजूंनीं त्याचा मात्र फायदा होतो. अशा कारणा-मुळें ज्याला 'रयत' म्हणतात तो शेतांत खपणारा इसम उद्योग अगर सुधारणा याबद्दल उदासीन होऊन कोणीकडून तरी आयुष्य घालवावें व पोट भरावें याच्या मार्गे असतो. शहरांत चांगला प्रामाणिक अडत्या व खेड्यांत त्याचा संबंधीं शेतकरी अशी जोडी पाहिजे. शेतकऱ्याच्या शेतांत जें पिकेल तें त्यानें अडत्याकडे पाठवावें व शेतकऱ्याला जें कांहीं लागेल तें अडत्यानें पुरवावे अशी सहकारिता या दोघांत पाहिजे. या अडत्याने जगाशीं व्यवहार ठेऊन आपल्याकडे येणारें शेतकऱ्याचें उत्पन्न जास्तींत जास्त किंमतीला विकावें व शेतकऱ्याला लागणारें सर्व सामान कमीत कमी किंमतींत पुरवावें व होणारा नफा दोघांनीं सारखा घ्यावा असा व्यवहार झाला तर तो हितकर होईल. सहकारी संस्थांनीं हें काम करावयाला पाहिजे.

एकंदरींत तात्पर्य हें आहे कीं, तीसबत्तीस कोटी शेतकऱ्यांची सुधारणा, कामांत चूर असलेल्या, सर्वज्ञतेच्या घमंडीनें व श्रेष्ठकनिष्ठत्वाच्या दोऱ्यांनीं जखडलेल्या, जित व जेते यांची जाणीव पदोपदीं मनांत वागवि-णाऱ्या हजार पांचशें अधिकाऱ्यांच्या हातून होणें शक्य नाहीं. तशांत हे अधिकारी या कामांतील विशिष्ट योग्यता असलेले, त्यांना त्या कामाची मोठी हौस असलेली, त्या कामासाठीं त्यांचा जीव तिळतिळ तुटत असलेले अशी स्थिति असती तर सुधारणेच्या रस्त्याला लागण्याचा तरी ते प्रयत्न करते. पण बोलून चालून परकी, ज्यांचा स्वार्थ बलवत्तर, मी म्हणतो तेंच खरें व तसेंच झालें व असलें पाहिजे असा ज्यांना तोरा, सर्व शेतकरी हे ज्यांना घरच्या कचऱ्यापेक्षां सुद्धां हलके वाटतात अशांच्या हातून कांहीं झालें नाहीं यांत कोणाहि विचारी माणसाला आश्चर्य वाटणार नाहीं. यापेक्षां निराळा प्रकार दिसावा असें वाटत असलें तर शेती खात्याची चालू घडी मोडून नवीन घडी घातली पाहिजे, अधिकारपरंपरेची सांखळी तोडली पाहिजे व प्रत्येकानें स्वतंत्र पण सर्वांची एक सामान्य रचना याप्रमाणें संघशः सर्व देशांतील समं-जस माणसांनीं एक जोर केला पाहिजे. तेव्हां कांहीं तरी होणार आहे. लोकांचे सहज पुढारी असे जे मोठे जमीनदार यांच्या मदतीस शेतीचे तज्ज्ञ देऊन सबंद गांवेंची गांवें, यांची सुधारणा, त्या गांवांची परिस्थिति, त्या गांवांचें

सामर्थ्य व त्या गांवांची ऐपत पाहून एकीनें सुधारणा करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. गांवचा पाटील, गांवचा इनामदार यानें आपल्या शेतांत अमुक केलें त्यामुळें त्यास अमुक फायदा झाला असें दिसलें तर, सबंद गांवानें याच-प्रमाणें करावें म्हणून ज्याला जी पाहिजे ती मदत दिली तर, आणि एकमेकांनीं एकमेकांचें व सर्वांचें हित पहावयाचें असें ठरवून तसें आचरण केलें तर ही शेतीसुधारणा पांच दहा वर्षांत वाटेल तितकी होईल.

शेतीसुधारणेच्या मुख्य आकांक्षा दोन. (१) दरएकरीं येणारें पिकाचे परिमाण वाढावें व (२) त्या पिकाचा माल जास्त चांगला, वरच्या दर्जाचा असावा. यासाठीं आमच्या मतें खालील तीन गोष्टी केल्या पाहिजेत.

(१) शेतकऱ्याला निदान वर्षभर पुरेल इतकी अन्नवस्त्राची सोय व त्यास लागणारीं बीं व आयुधें.

(२) ताली, विहिरी, जमीनीस पाट करणें वगैरे कायमच्या सुधारणा व त्यासाठीं लागणारा पैसा.

(३) शेतींत खपणाऱ्या लोकांचा योग्य पुरवठा व इतर वेळीं त्यांस पुरेसें दुसरें काम.

पहिल्या सरदाराखालीं रोख पैसे, कर्ज, जनावरें, बीं, खतें व आउतें यांचा पुरवठा; शेत कामाचीं तत्वें अगर रहस्यें यांचें शिक्षण व शेतींत जुटीनें करावयाच्या कामाची माहिती हीं येतात. बियाचा पुरवठा व्हावा म्हणून निवडक दाण्याची कोठारें जागोजाग स्थापन केलीं पाहिजेत. जेथें कालव्याच्या पाण्याचीं सोय आहे तेथें रासायनिक खतांचे कारखाने काढावे. हीं खतें देशांतच केलीं पाहिजेत, परदेशांतून विकत आणून भागणार नाहीं. हीं नवीन खतें कचरा, मैला, मूत, शेण वगैरेंना मदत म्हणून वापरावयाचीं आहेत. यांच्या बदली हीं वापरणें चांगलें नाहीं. घरगुती खतांतील अर्क वायां न जाईल अशी तजवीज करण्यास शेतकऱ्यास शिकविलें पाहिजे. शेतीच्या जनावरांत देखील सुधारणा झाली पाहिजे. बैल मजबूत व धिप्पाड असावेत अशी तजवीज केली पाहिजे. " वोढा नड्वान् दोग्ध्रीर्धेनूः " खांदेदार बैल व दुधाळ गाई पाहिजेत. गुरांना खाणें, वैरण, पेंड, दाणा यांची काटकसर, यांचा योग्य पुरवठा, यांची जनावरांमार्गे

माफक वांटणी या गोष्टी पण शेतकऱ्यांना शिकविल्या पाहिजेत. आउतां-संबंधानें म्हटलें म्हणजे देशी आउलांत सुधारणा पाहिजे ही गोष्ट खरी. पण परदेशी आउतें घेण्यास लागणारा पैसा, त्यांच्या दुरुस्तींत येणाऱ्या अडचणी, त्यांच्या उपयोगांत होणारा त्रास या गोष्टींचा विचार झाला पाहिजे. हीं हत्यारें तयार करण्याचें, तीं दुरुस्त करण्याचें, मोडकीं हत्यारें घेण्याचें काम करणारीं माणसें जागोजाग दरएक तालुक्यास निदान एक संस्था निघाल्याशिवाय त्यांचा प्रसार योग्य रीतीनें होणार नाहीं. हीं कामें करणारे स्वदेशी कारखाने जागोजाग झाल्यावर हीं यंत्रें वापरण्यास अडचण किंवा हरकत नाहीं. तोंपर्यंत यांसाठीं परदेशीं पैसे पाठविणें इष्ट व श्रेयस्कर नाहीं. या गोष्टींवांचून अडलें आहे असें नाहीं व यासाठीं पर-देशचींहि हत्यारें खरेदी करूं नयेत. स्वदेशी कारखाने जागोजाग झाले म्हणजे तेथें नांगर, पंप, कापणी वगैरेंचीं यंत्रें, हातगाड्या व अशींच थोड्या श्रमांत व खर्चांत पुष्कळ काम करणारीं आयुधें वाटेल तितकीं घ्यावीं व हीं मोकळीं झालेलीं माणसें दुसरीं यंत्रें व कारखाने चालविण्यांत वापरावीं.

दुसऱ्या प्रकारचीं मोठमोठीं कामें करण्यासाठीं शेतकऱ्यांचे संघ असावे. हीं कामें एकट्यादुकट्यानें करावयाचीं नसतात. अनेक माणसें एकत्र होऊन त्यांनीं व्यवस्थित व पद्धतशीर ताली बांधाव्या, धरणें बांधावीं, पाट काढावे, पाण व पवनचक्क्या चालवाव्यात, म्हणजे शेतीला अनेक प्रकारें मदत होईल. अशीं कामें संघांनीं करण्याला उत्तेजन देणारे कायदे करावे, त्यांना जरूर त्या सवलती द्याव्या, सरकार अगर सरकारी अधिकारी यांची तब्बेत या कामीं मालक असूं नये. ठराविक गोष्ट, ठराविक पद्धतीनें गरीब रंकापासून श्रीमंत रावापर्यंत, अधिकाऱ्यांच्या जिवलग दोस्तांपासून कट्टया शत्रूपर्यंत सर्वांना हक्कानें मिळाव्यात व त्याचा फायदाहि ठराविक नियमा प्रमाणें सर्वांना सारखा व बिनहरकत मिळावा असा बंदोबस्त पाहिजे. कोंडवाड्याच्या कायद्यांत मालाची नुकसान भरून मिळाली पाहिजे. चोरीच्या कायद्यांत चोरीची किंमत भरून मिळण्याची सोय पाहिजे. नुसता गुराच्या मालकानें सरकारला दंड देऊन मालकाचें नुकसान भरून येत नाहीं. चोराला कैद किंवा दंड होऊन चोरी झालेली भरून येत नाहीं.

ही चोरी चोराच्या मालमत्तेंतून, त्याच्या श्रमांतून, त्याच्याकडून मालकासाठीं काम करवून भरून मिळाली पाहिजे अगर सरकारी पोलीस खात्यानें ती भरून दिली पाहिजे. सारा किंवा कर हा एक विम्याचा हप्ता आहे व हा हप्ता बरोबर मिळतो तोंपर्यंत झालेलें नुकसान विमा कंपनीनें भरून दिलें पाहिजे. हें नुकसान भरून देणें हें त्या कंपनीचें कर्तव्य आहे.

जपान देशांत बहुतेक खेड्यांतून सुद्धां असल्या शेतकी संस्था आहेत व याप्रमाणें सगळा देश एक शेतकी संस्थांचें जाळें आहे. सगळ्या देशाची एक मध्यवर्ती मंडळी, दरएक जिल्ह्याचें एक एक स्थानिक मंडळ व शेवटीं दरएक शहर अगर खेड्याचें मंडळ याप्रमाणें त्या देशांत एकंदर अकरा हजार शेतकी संस्था आहेत. या शेतकी संस्थांना जोडून कायद्यानेंच निर्माण केलेले कारागिरांचे संघ आहेत. या कारागिरांच्या संघांचें काम म्हणजे कारागिरीच्या जिनसांची निपज व उत्तमपणा यांची वाढ करावयाची हें आहे. याशिवाय व्यापारी लोकांनीं कसबी लोकांना उत्तेजन देण्यासाठीं खाजगी संस्था काढलेल्या आहेत त्या निराळ्याच. या सर्व मंडळ्या एकंदर देशाचें हित पाहतात व मधूनमधून विचार विनिमय करणें, नवीन सूचना व योजना अंमलांत आणणें व आजपर्यंत केलेल्या कामाचा आढावा घेणें यासाठीं या मंडळ्यांच्या प्रमुख लोकांच्या सभा भरत असतात.

हिंदुस्थानांत कांहीं थोडीं नमुनेदार शेतें व शेतकी शाळा आहेत म्हणून वर सांगितलेंच. पण त्यांचा शेतकऱ्यांशीं संबंध येण्यासाठीं त्या संस्था शेतकऱ्यांच्या संघांच्या ताब्यांत दिल्या पाहिजेत. हे शेतकऱ्यांचे संघ हुशार शेतकरी व धनिक पुढारी यांचे बनविले पाहिजेत. या संघांनीं सामान्य शेतकऱ्यांत या संस्थांच्या माहितीचा फैलाव केला पाहिजे. ज्या ज्या ठिकाणीं दरएक तालुक्यांत शेतकरी लोकांचा संघ मागेल तेथें एक शेतकी तज्ञ व त्याच्या देखरेखीखालीं शेतें दिलीं पाहिजेत. या शेतांवर व शेतीच्या कालेजांतून प्रयोगशाळा असून शेतास उपद्रव देणाऱ्या जीवजंतु, रोग वगैरेवर उपाय शोधण्याचें काम चालावें. ज्या वेळीं शेतकऱ्यांना रिकामपण असतें त्या काळांत या शेतांवर शेतकामांत काटकसर कशी करतां येईल हें शेतकऱ्यांना फुकट शिकवावें व त्यांजकडून तसें करून घ्यावें.

माफक वांटणी या गोष्टी पण शेतकऱ्यांना शिकविल्या पाहिजेत. आउतां-संबंधानें म्हटलें म्हणजे देशी आउतांत सुधारणा पाहिजे ही गोष्ट खरी. पण परदेशी आउतें घेण्यास लागणारा पैसा, त्यांच्या दुरुस्तींत येणाऱ्या अडचणी, त्यांच्या उपयोगांत होणारा त्रास या गोष्टींचा विचार झाला पाहिजे. हीं हत्यारें तयार करण्याचें, तीं दुरुस्त करण्याचें, मोडकीं हत्यारें घेण्याचें काम करणारीं माणसें जागोजाग दरएक तालुक्यास निदान एक संस्था निघाल्याशिवाय त्यांचा प्रसार योग्य रीतीनें होणार नाहीं. हीं कामें करणारे स्वदेशी कारखाने जागोजाग झाल्यावर हीं यंत्रें वापरण्यास अडचण किंवा हरकत नाहीं. तोंपर्यंत यांसाठीं परदेशीं पैसे पाठविणें इष्ट व श्रेयस्कर नाहीं. या गोष्टींवांचून अडलें आहे असें नाहीं व यासाठीं पर-देशचींहि हत्यारें खरेदी करूं नयेत. स्वदेशी कारखाने जागोजाग झाले म्हणजे तेथें नांगर, पंप, कापणी वगैरेंचीं यंत्रें, हातगाड्या व अशींच थोड्या श्रमांत व खर्चांत पुष्कळ काम करणारीं आयुधें वाटेल तितकीं घ्यावीं व हीं मोकळीं झालेलीं माणसें दुसरीं यंत्रें व कारखाने चालविण्यांत वापरावीं.

दुसऱ्या प्रकारचीं मोठमोठीं कामें करण्यासाठीं शेतकऱ्यांचे संघ असावे. हीं कामें एकट्यादुकट्यानें करावयाचीं नसतात. अनेक माणसें एकत्र होऊन त्यांनीं व्यवस्थित व पद्धतशीर ताली बांधाव्या, धरणें बांधावीं, पाट काढावे, पाण व पवनचक्क्या चालवाव्यात, म्हणजे शेतीला अनेक प्रकारें मदत होईल. अशीं कामें संघांनीं करण्याला उत्तेजन देणारे कायदे करावे, त्यांना जरूर त्या सवलती द्याव्या, सरकार अगर सरकारी अधिकारी यांची तब्येत या कामीं मालक असूं नये. ठराविक गोष्ट, ठराविक पद्धतीनें गरीब रंकापासून श्रीमंत रावापर्यंत, अधिकाऱ्यांच्या जिवलग दोस्तांपासून कट्टया शत्रूपर्यंत सर्वांना हक्कानें मिळाव्यात व त्याचा फायदाहि ठराविक नियमा प्रमाणें सर्वांना सारखा व बिनहरकत मिळावा असा बंदोबस्त पाहिजे. कोंडवाड्याच्या कायद्यांत मालाची नुकसान भरून मिळाली पाहिजे. चोरीच्या कायद्यांत चोरीची किंमत भरून मिळण्याची सोय पाहिजे. नुसता गुराच्या मालकानें सरकारला दंड देऊन मालकाचें नुकसान भरून येत नाहीं. चोराला कैद किंवा दंड होऊन चोरी झालेली भरून येत नाहीं.

ही चोरी चोराच्या मालमत्तेंतून, त्याच्या श्रमांतून, त्याच्याकडून मालकासाठीं काम करवून भरून मिळाली पाहिजे अगर सरकारी पोलीस खात्यानें ती भरून दिली पाहिजे. सारा किंवा कर हा एक विम्याचा हप्ता आहे व हा हप्ता बरोबर मिळतो तोंपर्यंत झालेलें नुकसान विमा कंपनीनें भरून दिलें पाहिजे. हें नुकसान भरून देणें हें त्या कंपनीचें कर्तव्य आहे.

जपान देशांत बहुतेक खेड्यांतून सुद्धां असल्या शेतकी संस्था आहेत व याप्रमाणें सगळा देश एक शेतकी संस्थांचें जाळें आहे. सगळ्या देशाची एक मध्यवर्ती मंडळी, दरएक जिल्ह्याचें एक एक स्थानिक मंडळ व शेवटीं दरएक शहर अगर खेड्याचें मंडळ याप्रमाणें त्या देशांत एकंदर अकरा हजार शेतकी संस्था आहेत. या शेतकी संस्थांना जोडून कायद्यानेंच निर्माण केलेले कारागिरांचे संघ आहेत. या कारागिरांच्या संघांचें काम म्हणजे कारागिरीच्या जिनसांची निपज व उत्तमपणा यांची वाढ करावयाची हें आहे. याशिवाय व्यापारी लोकांनीं कसबी लोकांना उत्तेजन देण्यासाठीं खाजगी संस्था काढलेल्या आहेत त्या निराळ्याच. या सर्व मंडळ्या एकंदर देशाचें हित पाहतात व मधूनमधून विचार विनिमय करणें, नवीन सूचना व योजना अंमलांत आणणें व आजपर्यंत केलेल्या कामाचा आढावा घेणें यासाठीं या मंडळयांच्या प्रमुख लोकांच्या सभा भरत असतात.

हिंदुस्थानांत कांहीं थोडीं नमुनेदार शेतें व शेतकी शाळा आहेत म्हणून वर सांगितलेंच. पण त्यांचा शेतकऱ्यांशीं संबंध येण्यासाठीं त्या संस्था शेतकऱ्यांच्या संघांच्या ताब्यांत दिल्या पाहिजेत. हे शेतकऱ्यांचे संघ हुशार शेतकरी व धनिक पुढारी यांचे बनविले पाहिजेत. या संघांनीं सामान्य शेतकऱ्यांत या संस्थांच्या माहितीचा फैलाव केला पाहिजे. ज्या ज्या ठिकाणीं दरएक तालुक्यांत शेतकरी लोकांचा संघ मागेल तेथें एक शेतकी तज्ञ व त्याच्या देखरेखीखालीं शेतें दिलीं पाहिजेत. या शेतांवर व शेतीच्या कालेजांतून प्रयोगशाळा असून शेतास उपद्रव देणाऱ्या जीवजंतु, रोग वगैरेवर उपाय शोधण्याचें काम चालावें. ज्या वेळीं शेतकऱ्यांना रिकामपण असतें त्या काळांत या शेतांवर शेतकामांत काटकसर कशी करतां येईल हें शेतकऱ्यांना फुकट शिकवावें व त्यांजकडून तसें करून घ्यावें.

तात्पर्य, शेतकी शाळेंत प्रत्यक्ष शेतांत काम करणारे लोक जितके जमवितां येतील तितके जमवून शास्त्रशुद्ध रीतीनें शेती कशी करावी हें त्यांजकडून करून घेतलें पाहिजे. शेतकऱ्यांना नवीन शेतीपद्धति कशी फायदेशीर होते हें प्रत्यक्ष मोजमाप घेऊन पटवून द्यावें. या शेतीशाळांतून जमीन व तिची मशागत, बीं, गुरेंढोरें, गोठे व घरें यांची व्यवस्था, बाजारचा व्यवहार, जमाखर्च व शेतकीला जोडून फुरसतीच्या वेळीं घरोघर करतां येण्यासारखे सूत काढणें वगैरे धंदे हे विषय सप्रयोग शिकविले पाहिजेत. या शिवाय गांवकामगार व तालुक्याचे अधिकारी यांनीं या नवीन शिकविलेल्या व्यवस्थेशीर पद्धतीनें लोक कामें करतात किंवा नाहीं यावर नजर ठेवून चुकत असेल तेथें समजावून दिलें पाहिजे. अडाणी लोकांना कोणतेंहि शास्त्रीय तत्व पटवून द्यावयाचा एकच मार्ग आहे व तो हा कीं व्यवहारज्ञान व प्रत्यक्ष अनुभव यांनीं ती गोष्ट फायदेशीर आहे असें दाखवून द्यावें. यासाठीं शेतकऱ्याला आपल्या शेतांत काय सुधारणा कराव्या याचा विचार करण्याची, त्या योजना अमलांत आणून किती व कसा फायदा होतो हें पहाण्याची, त्याला नवीन सुधारणा तज्ञांनीं सुचविण्याचीं साधनें उपलब्ध करून दिलीं पाहिजेत. विचार करून कांहीं तरी सुधारणा अमलांत आणण्याची संवय ही अत्यंत महत्त्वाची संवय आहे व ही संवय लहानपणापासून लागेल असा शिक्षणक्रम ठेवला पाहिजे. बायकांना देखील विचार करण्याची, कामें करण्याची, उत्पन्न वाढविण्याची, काटकसर करण्याची संवय लाविली पाहिजे.

ज्यांची शेती उत्तम चालत आहे त्यांच्या शेतावर आठचार दिवस राहून तेथें कामाची व्यवस्था व टापटीप कशी ठेवतात, त्यापासून हित कसें होतें हें पहाण्याचे प्रसंग अडाणी शेतकऱ्यांस आणले पाहिजेत. शाळांतून याप्रमाणें प्रत्यक्ष अनुभाविक शिक्षण मिळालें पाहिजे. युनिव्हर्सिटींत शेतकीचे नवे शोध, शेतांची शास्त्रीय जोपासना, शेताबद्दल व्यवस्थित मांडणी करून उत्तम व रगड पीक काढण्याची पद्धत, पिकांत सुधारणा करण्याचे मार्ग, अडचणींशीं झगडण्याची युक्ति यांच्या शोधांचें शिक्षण मिळावें. युनिव्हर्सिटींत लागलेले शोध अमलांत आणू शकतील असे शेतकरी तयार करण्याचे दुय्यम शिक्षणाचे वर्ग पाहिजेत. सांगितलेल्या पद्धतीनें बरोबर काम करून प्रयोगशाळेंत ठरलेला सिद्धांत प्रत्यक्ष व्यवहारांत व

अनुभवांत कितपत पटतो हें पाहणें व तें लोकांच्या निदर्शनास आणून देणें हीं कामें या दुय्यम शिक्षितांची होत. प्रयोगशाळेंतील सिद्धांत अनुभवास न उतरला तर युनिव्हर्सिटी त्याचा फेरविचार करीलच. हिंदुस्थानांतील शेतीखात्यांत शेतकीच्या मेस्त्रींची आवश्यकता आहे. प्रयोगशाळा व शेतकरी किंवा शेतकरीसंघ यांच्या दरम्यान माहिती पोंचवून प्रयोगशाळेंतील सिद्धांत शेतकऱ्यांकडून अमलांत आणण्याचें काम यांना दिलें पाहिजे. हे स्वतः शेतकरी असावे, यांनीं स्वतःच्या हातानें कामें करून माहिती द्यावी व तिचा त्यांनीं सर्वत्र प्रसार करावा. याशिवाय गुरांची जोपासना, त्यांची निपज, त्यांचे रोग वगैरेबाबद प्रयोग करून सिद्धांत काढणाऱ्या प्रयोगशाळा उघडल्या पाहिजेत. शेतकीसंघ व शेतें यांना जोडून व्याख्यानें, प्रयोग, संभाषणें, उपदेश वगैरेंनीं शेतींत सुधारणा कशा कराव्या हें दाखविणारे माहितगार दरएक जिल्ह्यास एक तरी असून त्यानें गांवोगांव व्याख्यानें वगैरे द्यावीं, काम करून दाखवावें, लोक त्याप्रमाणें करतात किंवा नाहीं हें पाहून ते कोठें चुकतात, चूक कशी सुधारावी वगैरे गोष्टी समजाऊन द्याव्या अशी योजना केली पाहिजे.

गेल्या पन्नास वर्षांत शेतकऱ्यांची फार दैना झाली असून त्यांची पत अजिबात गेली आहे. याचीं मुख्य कारणें खालील आहेत.

(१) लोकांस दुसरा धंदा नसल्यानें सगळ्यांचा मारा शेतीवर आहे.

(२) वांटण्या होतां होतां दरएक शेताचे लहान लहान तुकडे झाले आहेत.

(३) यंत्रांचा उपयोग सुरू नसल्यानें मोठमोठीं शेतें पडीत पडतात. त्यांना जरूर तीं गुरें व माणसें नाहींत.

(४) शेतकऱ्यांचा कायदा. या कायद्यानें शेतकऱ्यांना विशेष सवलती देण्याचा प्रयत्न केल्यानें त्यांचें अहित मात्र केलें.

(५) शेतसाऱ्याची वेळ. ही वेळ शेताचें उत्पन्न विकून पैसे हातीं येण्याच्या पूर्वींची असल्यानें वाटेल त्या भावानें पीक विकून पैसे उत्पन्न करावे लागतात.

(६) अडते व सावकार हे एकच गृहस्थ असून शिवाय ते परदेशीं धान्य पाठविणाऱ्या कंपन्यांचे नोकर असतात.

(७) समाईक शेतीचा अभाव व त्यामुळें सुधारणा नाहींत.

(८) घरधंदे बुडाले. रिकामा वेळ वायां जातो. आळस वाढला.

ही पत फिरून येण्याला शेतकऱ्यांच्या पतपेढ्यांचा थोडासा उपयोग आहे. हल्लीं चार प्रकारच्या पतपेढ्या अस्तित्वांत आहेत. (१) कर्ज देणाऱ्या, (२) माल खरेदी करणाऱ्या, (३) माल विकणाऱ्या व (४) सुधारणा करणाऱ्या. यांपैकीं पहिल्या प्रकारच्याच सोसायट्या फार आहेत.

पण मुख्य गोष्ट म्हणजे शेतकऱ्यांना घरगुती धंदे शिकवून त्यांचा रिकामपणचा वेळ पैसे मिळविण्यांत खर्च होईल असें केलें पाहिजे. शेतें लहान व शेती पावसावर अवलंबून, यामुळें शेतकऱ्याला वर्षांकाठीं सहा महिने रिकामपण असतें. या रिकामपणांत उपयुक्त काम करून पैसे मिळविण्याचें साधन त्याला करून दिलें पाहिजे. पाऊस नीट पडला नाहीं तर त्यांचे हाल होतात व दुष्काळ पडल्यास त्यांस उपाशीं मरावें लागतें. ही स्थिति पालटली पाहिजे. नवीन धंदे त्यांना लावून देणें हा अगदीं जगावें कां मरावें इतक्या महत्त्वाचा प्रश्न आहे. याचा सविस्तर विचार धंदे या सदरांत येईल.

शेतीबरोबर सहज रीतीनें करतां येणारे धंदे म्हटले म्हणजे फळें राखणें, दुभत्याचा धंदा, रेशमाचे किडे, मधमाशा, लांखेचे किडे वगैरे पाळणें, सूत काढणें, विणणें, गुरेंढोरें पाळणें, पांखरें पाळणें व औषधी वनस्पतींची जोपासना हे होत. शिवाय सुतार, लोहार, गवंडी, न्हावी, धोबी हे धंदे शेती संभाळून करतां येतात. कागद करणें, कांच करणें, खेळणीं करणें, गंजिफाक व पायमोजे विणणें वगैरे बरेच बारीकसारीक धंदे जपानी शेतकरी रिकामपणीं करतात. जंगलाजवळ जंगली जिनसांच्या वस्तु करणें व समुद्रकांठीं मासे धरणें व खारवणें हेहि धंदे शेतकऱ्यांनीं करण्यासारखे आहेत. ज्या ठिकाणीं जो धंदा करणें सोईचें असेल त्या धंद्याचें शिक्षण मुलांना शाळेंत द्यावें. त्यांना ते धंदे चालविण्यास भांडवल पुरवावें व तयार झालेल्या जिनसा तेथेंच विकत घेऊन नेऊन खपविण्याकडेच कित्येक संघांनीं लक्ष पुरवावें. उद्योगधंद्याच्या मंडळींनीं व अधिकाऱ्यांनीं शेतकऱ्यांना वेळोवेळीं लागेल ती मदत द्यावी व याप्रमाणें शेताची हेळसांड न होतां शेतकऱ्याला जास्त उत्पन्न होईल अशी तजवीज झाली पाहिजे.

पाटबंधारे व कालवे यांचा विचार पुढें देशाची भौतिक सुधारणा या सदरांत केला आहे म्हणून येथें करीत नाहीं.

आजपर्यंत अंकानुमानशास्त्र व त्यासाठीं गोळा करण्यांत येणारी माहिती यांची किंमत लोकांना समजत नव्हती. हा एक सरकारी अधिकाऱ्यांनीं रयतेला त्रास देण्याचा मार्ग काढला आहे असें लोक समजतात. पण ही समजूत फार चुकीची आहे. नानाप्रकारच्या माहितीचे आंकडे असल्याशिवाय सुधारणा व उद्योगधंदे कोठें व काय होण्यासारखे आहेत हें समजणार नाहीं. शेतकी संस्था व उद्योगधंद्यांच्या संस्था यांना ही माहिती फार उपयोगी आहे व यासाठीं किती क्षेत्रांत, कोणतें पीक किती आलें व शेतकऱ्यांनीं दुसरे कोणते धंदे करून काय पैदा केलें ही तपशीलवार माहिती गोळा केली पाहिजे व प्रसिद्ध केली पाहिजे. ही माहिती कोणाहि साधारण सुशिक्षिताला समजेल अशी खातेवार जंत्र्या करून प्रसिद्ध करावी. याचा अभ्यास करून त्यापासून योजना तयार करण्याचें काम कांहीं पंडितांकडे द्यावें व त्यांनी याबाबद निरनिराळे प्रांत व देश यांची तुलनात्मक कोष्टकें प्रसिद्ध करावीं. अशा तुलनेपासून आपले दोष व गुण समजून येतात. आणि त्यांत योग्य ती सुधारणा घडवून आणण्यासाठीं इतर ठिकाणची व्यवस्था पहाणें, तिची माहिती घेणें व तिचा उपयोग आपल्याकडे करणें या गोष्टींचा उपयोग होतो. याच माहितींत शेतकऱ्यांची साधारण स्थिति, प्रत्येकाचें सरकारी क्षेत्र, दुभतीं व इतर जनावरें यांची संख्या, त्यांचें भांडवल, (यांत हत्यारें वीं बियाणें, दाणागोटा यांचा समावेश व्हावा) त्याला असलेलें कर्ज, शेताचें उत्पन्न, कुटुंबांतील माणसें, हंगामांत लागणारे लोक, पाण्याचें जमीनीखालील खोलीचें व उंचीचें माप, वगैरे गोष्टी असाव्या. दर तीन-चार वर्षांनीं दरिद्री भागाची व दहा वर्षांनीं सर्व भागाची, याप्रमाणें खानेसुमारी घ्यावी.

हिंदुस्थानाला नेहमीं मारण्यांत येणारा टोमणा म्हणजे हा देश अधीर आहे. मिळालें कीं खालें; उत्पन्न यावयाचा अवकाश कीं फडशा, अशी याची स्थिति आहे हा होय. पण खरें पाहिलें तर नाइलाजास्तव त्याला हा मार्ग स्वीकारावा लागतो. पन्नास वर्षांपूर्वीं पेवांत धान्य व गंज्यांत गवत एक सालापुरतें तरी सांठविण्याचा प्रघात होता. पण हल्लीं चालू वेळ

कशी निभते हीच भ्रांत; तर सांठा कशाचा करणार ? कित्येक वेळीं पीक येण्यापूर्वींच तें गहाण टाकलेलें असतें. मागचा पुढचा विचार करण्यास फुरसतच नसते. ' शिर सलामत तो पगडी पचास ' किंवा ' जीवन्नरोभद्रशतानि पश्यति ' या म्हणीप्रमाणें जीव जगविण्याकडे त्याची प्रवृत्ति असते. हल्लीं हिंदुस्थानांतील शेतीला ' जडत्व ' आलें आहे. लोकांची जी निराशा व निरुत्साह झाला आहे तो घालवून त्या ठिकाणीं पहिल्यानें उमेद व उत्साह उत्पन्न केला पाहिजे. या गोष्टींशिवाय नवा दम व जोम उत्पन्न होणार नाहीं व त्यावांचून यश मिळणें अशक्य आहे.

पहिली गोष्ट म्हणजे जगांतील लोक काय करीत आहेत हें त्यांस दाखविणें ही होय. दर एक गांवांतील एक पुढारी शेतकरी याप्रमाणें हजार पांचशें शेतकरी दरसाल जपान, चीन या देशांतून फिरवून आणले पाहिजेत. या फिरस्यांत धनिक, शिक्षक, शेतकरी, मामलतदार व पदवीधर यांचा समावेश झाला पाहिजे. हे लोक जी माहिती व जे नमुने आणतील ते त्या जिल्ह्यांतील पदार्थसंग्रहालयांत ठेवावे. परत देशीं आल्यावर त्यांनीं आपण पाहिलेल्या गोष्टी त्या जिल्ह्यांतील लोकांस सांगाव्या. जिल्ह्याचा सर्व कारभार हिंदुस्थानचें कल्याण करण्याच्याच उद्देशानें अगदीं बदलल्याशिवाय कांहींच सफल होणार नाहीं. गांव, तालुका अगर जिल्हा यांतील कोणतेंहि काम लोकांनीं स्वतःच्या हातांनीं व हिमतीवर एकीनें करण्याची वहिवाट पाडली पाहिजे. रस्ते, पूल, तळीं, घाट, मोऱ्या, वगैरे सर्व कामें लोकांनीं आपलीं आपण करून घेतलीं पाहिजेत. हल्लींच्या पद्धतीनें हीं कामें सरकारी अधिकारी आपल्या हुकमानें करतात व त्यामुळें लोकांची, हीं कामें करण्याची हिंमत नाहींशी झाली आहे. याशिवाय लोकांचा प्रत्यक्ष कामाशीं संबंध तुटल्यामुळें त्यांत जीवंतपणा राहिला नाहीं. याप्रमाणें या हिंदुस्थानच्या मृत देहांत किडे पडून त्याचें शेण होण्यापूर्वीं त्यांत नवीन जीव घातला पाहिजे. हा जीव त्यांना स्वतंत्र सत्ता दिल्यावांचून येणार नाहीं. हिंदुस्थानांत मजूर, भांडवल, पुढारीपण व चातुर्य यांचा भरपूर संग्रह आहे पण तो कुलपांत पडलेला आहे अगर विसकटलेला आहे. त्याची नवी घडी नीट घालून, त्याला व्यवस्थित स्वरूप देऊन, एकमुखी करून कार्यक्षम केलें पाहिजे. इतर

देशांतून चारपंचमांश लोकसंख्येला वाटेल त्याप्रमाणें अधिकारी सर्व व्यवस्था करून देतात व यामुळें शेतकरी व नमुनेदार शेतें यांचा एकजीव होतो व कामें करण्याची उमेद व धमक उत्पन्न होते. मग हीं कामें पार पाडलीं म्हणजे उत्साह व एकी वाढते व याप्रमाणें सर्व शेतकरी जागे होतात.

हिंदुस्थानांत दुसरी गोष्ट म्हणजे विश्वास व एकी उत्पन्न करणें ही होय. एकदां विश्वास वाढला व एकी झाली कीं, वाटेल तें करतां येईल. अशा तऱ्हेनें दुष्काळाला सुद्धां देशांतून हांकून लावतां येईल. दरएक कुटुंबानें थोडें धान्य शिल्लक टाकलें, अशा शिलकेचीं सामुदायिक कोठारें केलीं, शेण जाळण्याची पद्धत बंद केली, जळणाकरतां जंगलें राखलीं, श्रमाऐवजीं यंत्रें वापरली व नवीन धंदे सुरू केले तर काय होणार नाहीं ? अशा रीतीनें एक साल गेलें तर आपलें किती हित झालें हें प्रत्येकाला स्पष्ट दिसेल. अशी एकदां जुटीनें कामें करण्याची गोडी लागली म्हणजे कोणतेंहि काम अशक्य राहणार नाहीं. याप्रमाणें आळस झाडला, काम करण्याची लाज जाऊन हौस वाटूं लागली, निरर्थक भपका जाऊन साध्या राहणीनें आरोग्य व संपत्ति वाढली म्हणजे सुख व समाधान वाढेल व फाटाफूट व भांडणें मोडतील.

सरकारनें देखील प्रत्येक तालुक्याच्या व जिल्ह्याच्या शेतीची सुधारणा व पिकाची वाढ कशी करावयाची हें ठरवून त्या धोरणानें कामें सुरू करावींत, त्याचा परिणाम काय झाला हें प्रसिद्ध करावें. व दर सालांत कोणतीं कामें केलीं व त्याचा काय परिणाम झाला हें प्रसिद्ध करावें. हिंदुस्थानांतील शेतीपासून मोठी संपत्ति प्राप्त होईल असें नाहीं, पण वर सांगितल्याप्रमाणें व्यवस्था केल्यास दहा पंधरा वर्षांत लोकांचें उत्पन्न दुप्पट होईल व सुखसमाधान वाढेल. शेतीची वाढ, पाण्याची सोय, पिकाच्या पाळ्या, मौल्यवान पिकांकडे लक्ष, खतांचा उपयोग, व गुरांची जोपासना हीं कामें पहिल्यानें हातीं घ्यावीं. लोकांना स्वतंत्रता देऊन त्यांच्या दिमतीस तज्ञ द्यावेत. "राजकीय स्वराज्या"च्या भागांत सांगितल्याप्रमाणें ग्रामपंचायती स्थापून त्यांना अधिकार दिले तर लोक आपली व्यवस्था करून घेतील व मग सर्व गोष्टी वर लिहिल्याप्रमाणें करतां येतील.

प्रकरण आठवें

उद्योगधंद्यांची तयारी

कोणत्याहि देशाची उत्पादकशक्ति व तेथील रहिवाशांची कर्तृत्वशक्ति यांची माहिती त्याच्या उद्योगधंद्यावरून होते व त्या देशाच्या सामर्थ्याची व संपन्नतेची साक्ष पटते. जर एखादें यंत्र हिंदुस्थानांतच सर्वस्वी तयार झालें तर तें आपणांस अगदीं जसें पाहिजे तसें होईल व जे पैसे परमुलखीं जावयाचे ते देशांतील देशांतच ठेवील. केवळ शेतीवर निर्वाह करणारा देश नेहमीं दरिद्रीच रहणार. " केदारपोषणरताः" शेतीवर निर्वाह करणारे लोक म्हणजे नुसते बायकोचे व आपलें पोट भरणारे लोक असें कौटिल्यानें म्हटलें आहे. हल्लीं तर हिंदुस्थानांत शेतीवर इतके लोक अवलंबून आहेत कीं, त्यांना त्या धंद्यांत एक वेळचें पोट भरण्याची देखील भ्रांत पडते. हिंदुस्थान असो कीं, दुसरा एखादा देश असो. त्याला उद्योगधंद्याशिवाय सधन होणें, थोडी तरी पत राखणें किंवा साधारण संपन्न म्हणविणें अशक्य आहे. हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांची इतर देशांतील उद्योगधंद्यांशीं तुलना केली तर काय दृष्टोत्पत्तीस येतें पहा. सन १९१४ सालीं जगांतील देशांत उद्योगधंद्यांत खालीलप्रमाणें भांडवल गुंतलेलें होतें.

देशाचें नांव	भांडवल पौंड	लोकसंख्या
ग्रेटब्रिटन	२,७३,७०,००,०००	१० कोटी सुमारें
कानडा	३९,००,००,०००	१ कोटी
संयुक्त संस्थानें	४,५५,८०,००,०००	२० कोटी सुमारें
जपान	२४,३०,००,०००	६ कोटी
हिंदुस्थान हिंदी लोक	६,००,००,०००	३० कोटी
हिंदुस्थान व इंग्रजसुद्धां	४७,१०,००,०००	३१ कोटी

हिंदुस्थानाची उद्योगधंद्याची काय स्थिति आहे हें वरील आंकडे चांगलें सांगतात. वर्णनानें यापेक्षां जास्त चांगली कल्पना येऊं शकणार नाहीं.

जगांतील सर्व देशांत याप्रमाणें उद्योगधंद्यावर भर देण्यांत येत असतांना हिंदी लोकांचें जीवनसर्वस्व म्हणजे शेती असून उद्योगधंद्यांकडे पूर्ण दुर्लक्ष आहे. शेतीची रड मागील प्रकरणांत सविस्तर सांगितलीच आहे. ही स्थिति बरोबर नाहीं, हें सर्व जगाचा अनुभव व हिंदुस्थानची प्रत्यक्ष स्थिति सांगतच आहे. एका काळीं हिंदी कारागिरीच्या जिनसा परदेशीं जात व त्यांस तेथें अतिशय मान होता. परंतु पूर्वीची काम करण्याची पद्धति जुनी पुराणी व रद्द ठरली व नवीन यंत्रें वगैरेंची वाढ देशांत बरोबर झाली नाहीं. हल्लीं हिंदुस्थानांतून कच्चा माल परदेशीं जातो व त्याच मालाचा झालेला पक्का माल हिंदी लोकांना सव्याज किंमत देऊन घ्यावा लागतो. उदाहरणार्थ विलायत व जपान येथें कापूस हिंदुस्थानांतून जातो व त्याचें कापड होऊन हिंदुस्थानांत येतें. जवस वगैरे धान्यें हिंदुस्थानांतून फ्रान्समध्यें जातात व त्यांचें तेल व वार्निश तिकडून हिंदुस्थानांत येतें. फार काय पण चाकू वगैरेंच्या मुठी करावयाचे दगड हिंदुस्थानांतून जर्मनीस जातात व त्यांच्या मुठी व जिनसा होऊन हिंदुस्थानांत परत येतात. याप्रमाणें देशाचें दुहेरी नुकसान होतें. मजुरी आपल्या देशास मिळत नाहीं व व्याज व नफा शिवाय दुसऱ्यांना द्यावा लागतो. पूर्वी हिंदुस्थानांतील लक्षावधि लोकांना जे धंदे पोटाला देत ते याप्रमाणें नाहींसे झाल्यानें हे लोक हल्लीं अन्नाला महाग झाले. शेतीवर जें कांहीं उत्पन्न होईल त्यांतून स्वतःचा निर्वाह करून शिवाय त्यातूनच ही पक्क्या मालाची मजुरी व नफा द्यावा लागतो. हा जो द्रव्यशोष होत आहे हा बंद करतां येण्यासारखा आहे. सरकार व जनता या दोघांनीं थोडें मनावर घेतलें तर हिंदुस्थानांत लागणारें सर्व कापड, लोखंडी सामान, चामड्याचें सामान व किरकोळ सर्व गोष्टी हिंदुस्थानांतच पुरेशा करतां येतील. त्यासाठीं परदेशाकडे आपल्याला एक पैभर सुद्धां पाहण्याची जरूर नाहीं. सर्व कच्चा माल, सर्व मजुरी, सर्व भांडवल देशांतच मिळण्यासारखें आहे व शिवाय लोकांना इतकें काम मिळेल.

स्थूलमानानें देशांतील धंद्यांचे तीन प्रकार होतात. (१) मोठ्या भांडवलाचे, (२) साधारण भांडवलाचे व (३) घरगुती. ज्या धंद्यांना मोठमोठीं अवजड यंत्रें, पुष्कळ भांडल व हजारों मजूर लागतात ते धदे मोठ्या

भांडवलाचे होत. यांत अनेक लोकांनीं, भागीदारांनीं भाग घ्यावा लागतो व यांना पुष्कळ विशिष्ट ज्ञान, यंत्रकौशल्य व व्यवस्थापकता लागते. हिंदुस्थान देशांत काढतां येण्यासारखे असे मोठ्या भांडवलाचे धंदे म्हणजे खालील होत:—

१ सूत व कपड्याच्या गिरण्या, कापूस, रेशीम व लोंकर.
२ धातू काढणें. नील लोह (मांगानीज), शिसें, तांबें वगैरे.
३ लोखंड ओतणें व पोलाद करणें.
४ यंत्रें तयार करणें.
५ जहाजें व आगबोटी बांधणें.
६ रासायनिक धंदे—विशेषतः रंग, तेजाब, पापडखार व कृत्रिम खतें (हाडें वगैरेंचीं).
७ कांच, चिनीमाती व सिमीट.
८ कागद, त्याच्या रांध्यासह.
९ चामड्याचें काम.
१० साखर.

कानडा, जपान, जर्मनी या देशांत हे धंदे पहिल्यानें सरकारनेंच सुरू केले व नंतर सरकारच्या मदतीनें व उत्तेजनानें चालले आहेत. हिंदुस्थानांतसुद्धां सरकारनें याप्रमाणेंच सुरुवात व संरक्षण केलें पाहिजे. पहिल्यानें सरकारला लागणाऱ्या या सर्व जिनसा त्यांनीं येथें तयार करण्यास सुरुवात करावी व बाहेरील मालावर जबर जकात ठेवावी म्हणजे पुरें आहे. असल्या कारखान्यांना पंधरा लक्षांवर प्रत्येकीं भांडवल पाहिजे व भागीदारीच्या पद्धतीनेंच तें उभारणें शक्य आहे.

घरगुती उद्योगधंदे म्हणजे लोकांना आपल्या घरोघर आपल्याच घरच्या माणसांच्या मदतीनें चालवितां येतात असे धंदे होत. यांना लागणारें साहित्य त्या गांवांत उत्पन्न होतें अगर बाजारांत येतें व त्यासाठीं लागणारें भांडवल व मजुरी हे लोक सावकार वगैरेपासून मिळवूं शकतात. असल्या धंद्यांत हजार पांचशांपासून पन्नास हजारांच्या आंत सगळी उलाढाल असते. कच्च्या मालाचा पुरवठा होतो असल्या सर्व जिनसा या काम करणाऱ्यांच्या हातून तयार होतात. या जिनसा तयार करणें

म्हणजे केवळ हस्तकौशल्यापासून थोडी फार यंत्रशक्ति, इतक्या शक्तीचें काम असतें.

पंधरा लाखांच्या वर ज्यांना भांडवल लागतें व पन्नास हजारांच्या आंत ज्यांचा सर्व कारभार, अशा या दोन टोकांच्या मध्यें असणारे सर्व धंदे साधारण धंदे होत. हे धंदे एकाच्या मालकीचे, भागीदारीचे किंवा समाईक भांडवलांचे असूं शकतील. मोठ्या कारखान्यांत होणारा माल केव्हां केव्हां या लहान कारखान्यांत तयार होतो. मात्र अशा वेळीं हा महाग असल्यानें मोठ्या कारखान्यापासून लांबच्या भागांतल्या लोकांच्या गरजांपुरता मात्र तो होतो.

हिंदुस्थान सरकारनें १९१६ सालीं असे धंदे सुरू करण्याची अनुकूलता पाहून त्यांची योजना तयार करण्यासाठीं एक कमिशन नेमलें होतें. या कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध होऊन कांहीं वर्षें झालीं. त्यांत फक्त घरगुती धंद्यांचाच विचार केला असून साधारण भांडवलांच्या धंद्यांचा थोडा विचार केला आहे. या कमिशनच्या सूचना उत्तम आहेत. पण त्यांनीं मोठ्या धंद्यांचा प्रश्नच मुळीं विचारांत घेतला नाहीं. या कमिशनची मोठी महत्त्वाची सूचना म्हणजे सरकारांनीं मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं आपआपल्या प्रांतापुरतीं धंद्यांचीं खातीं काढावीं. या खात्यांतून तज्ञ नोकर ठेवावे व यांनीं या धंद्यांना उत्तेजन द्यावें, योजना करावी, मांडणी करून द्यावी ही होय.

याप्रमाणें परदेशी लोकांचें एक उद्योगधंद्याचें अधिकारीमंडळ मात्र नेमण्यांत येणार. नोकरशाहीचें सगळेंच काम नोकरशाही! लोकांच्या अंगांत शक्ति नाहीं तर लोकांना पौष्टिक अन्न खाऊन दाखविणारें एक अधिकारीमंडळ असावें व त्यानें तूप, मध वगैरे खाऊन, जोर काढून दाखवावे असें हें सरकार ठरविणार! त्याचप्रमाणें ही सगळीच योजना चुकीच्या धोरणावर रचलेली आहे. लोकांना खरोखर मदत व संरक्षण पाहिजे आहे. त्यांना ताब्यांत ठेवणें व आंवरून धरणें याची जरूर नाहीं. वरील उदाहरणांत लोकांना तूप व मध मिळेल अशी तजवीज करण्याऐवजी आपण तें खाऊन दाखविण्याची जशी चुकीची रीत होती तशीच ही चुकीची रीत आहे. धंद्याच्या वाढींत अनेक प्रकारांनीं धंदेवाइकांना मदत करण्यासारखी

असतांना तें सोडून त्यांना आवरून धरण्यासाठीं अधिकारी नेमण्यांत अर्थ काय ? लोकांविषयीं सहृदयता, लोकांना मदत करण्याची उत्सुकता व लोकांच्या ताब्यांत मोकळेपणीं कामें देण्याची तयारी या गोष्टी झाल्या-शिवाय धंद्यांना ऊर्जित दशा येणार नाहीं.

रेलवेची व्यवस्थाहि देशी उद्योगधंद्यांच्या वाढीस पोषक नाहीं अशी तक्रार आहे. फॅक्टरी इनस्पेक्टर येऊन प्रारंभींच मोठी यंत्रसामुग्री व पुष्कळ खर्चाच्या इमारती पाहिजेत असा हट्ट धरतात, व यामुळें कार-खाने काढण्यास अडचणी येतात. परदेशांतून शिकून आलेल्या हिंदी लोकांना भांडवलाची मदत मिळत नाहीं व त्याच योग्यतेच्या इंग्रजापेक्षां कमी पगार मिळतो. या व असल्या दुसऱ्या पुष्कळ गोष्टींनीं उद्योगधंदे पुढें सरसावत नाहींत. याबाबद चौकशी होऊन या सर्व अडचणी दूर केल्या पाहिजेत. अगदीं एखाद्या ठिकाणीं थोडा जरी जुलूम झाला तरी त्याचा परिणाम दहा कारखान्यांवर झाल्यावांचून रहात नाहीं. याच्या योगानें लोकांचा विश्वास जातो व कारखानदार नाउमेद होतात.

खालीं लिहिलेल्या रीतीनें सरकारला कारखानदारांना मदत करतां येईल.

(१) कोणताहि नवा कारखाना निघाला म्हणजे चढाओढी पासून त्याचा बचाव व्हावा म्हणून सहा वर्षें किंवा कारखाना नीट चालेपर्यंत त्यांत तयार होणाऱ्या मालासारख्या परदेशी मालावर जकात ठेवणें.

(२) यंत्रें, रासायनिकें, गलबतें वगैरे धंदे परदेशी लोकांनीं हिंदुस्थानांत सुरू केल्यास त्यांसहि वरीलप्रमाणें संरक्षण देणें.

(३) अगदीं मोठे—आगगाड्या, आगबोटी वगैरेसारखे—कारखाने सरकारनें स्वतः सुरू करून, चांगले चालूं लागले म्हणजे लोकांच्या स्वाधीन करणें.

(४) लोकांनीं काढलेल्या कारखान्यास सालोसाल मदत, किंवा व्याजाची हमी, किंवा भांडवलाचा पुरवठा करणें.

(५) तज्ञांची मदत कारखानदारांना फुकट देणें, परकी देशांतून त्या-साठीं तज्ञ मागवून देणें.

(६) मालाला रेलवेभाड्याची सवलत देणें.

(७) उद्योगधंद्यांची खानेसुमारी दर तीन वर्षांस घेणें व त्यांत कोणत्या धंद्यांत किती भांडवल, काय नफा वगैरे माहिती प्रसिद्ध करणें. या पत्रकांत सरकारानें दिलेल्या सवलतींचा उल्लेख असावा. सर्व सुधारलेल्या देशांत योग्य प्रकारच्या आयात निर्गतीवर जकाती ठेवून कारखानदारांना उत्तम मदत करण्याची वहिवाट आहे.

प्रांतिक सरकारांनींहि वर सांगितलेल्या धोरणानें आपआपल्या प्रांतांत गलबतें बांधणें, यंत्रें करणें, इंजिनें व मोटारी करणें, रासायनिक धंदे, कागद, कांच, आगकाड्या वगैरेंना सुरुवात करून अगर मदत देऊन उत्तेजन द्यावें. एखाद्या धंद्याला लागणारा अवश्य तेवढा भाग मात्र आपण करून द्यावा, कारखान्यांतील कित्येक रहस्यें नुसतीं पैसा खर्चून आयतीं मिळत नसतात. तीं प्रत्यक्ष प्रयोग करूनच संपादन करावीं लागतात. धंदे ऊर्जित दशेला येण्यासाठीं धंद्यांच्या बाबतींत विश्वास व कामाची एकसूत्री परंपरा निर्माण केली पाहिजे. पहिल्यानें अमुक काम करावयाचें; तें इतकें वाढलें म्हणजे तमुक त्यास जोडावयाचें व याप्रमाणें पायरीपायरीनें कारखाना वाढवावयाचा असा लांबपर्यंत धोरण ठेवून बेत करणें कारखान्यांत अवश्य असतें. सोळा अश्वगतीचें एक यंत्र चालविण्यास आठ अश्वगतीच्या दोन यंत्रांपेक्षां पुष्कळ कमी खर्च लागतो म्हणून दूरवर नजर ठेवून जास्त काम वाढविण्याची तजवीज अगोदरपासून ठेवणें अधिक हितावह असतें. या कामांची ज्यांना कळकळ आहे अशा पुढाऱ्यांच्या ताब्यांत कारखान्याचीं सर्व सूत्रें असावींत व त्यांच्या सल्ल्याप्रमाणें कामें चालावींत. यासाठीं उद्यागधंदे–सहाय्यक ॲडव्हायजरी बोर्ड नेमावें व त्या बोर्डाच्या सल्ल्याप्रमाणें उद्योगधंद्याच्या संबंधांत आपण धोरण ठेवूं असें सरकारनें ठरवावें व प्रसिद्ध करावें म्हणजे त्या धोरणानें कारखानदार आपले कारखाने काढतील अगर वाढवितील. कारखाना चालविण्यास लागणाऱ्या मुख्य गोष्टी म्हणजे चालनाचें सामर्थ्य, मजूर, तज्ञता व कुशलता, भांडवल, यंत्रें, कच्चा माल व कामें चालविण्याचें धोरण हीं होत. कच्चा माल तर हिंदुस्थानांत रग्गड मिळतो. येथें तो खपत नसल्यानें, वापरण्यांत येत नसल्यानें, तो परदेशीं जातो. मजुरांचा पुरवठा पुरेसा आहे. या मजुरांना शिकविण्याची सोय नाहीं. पण ती हवी

तेव्हां करतां येईल व मग दहा पांच वर्षांत कसबी मजूर वाटेल तेवढे मिळतील. भांडवल असेल तर उत्तम यंत्रें विकत आणतां येतील. प्रारंभीं हीं यंत्रें विकतच घेतलीं पाहिजेत. पुढें यंत्रें हिंदुस्थानांत तयार होतील. जर भांडवलाचा योग्य उपयोग देशांत होऊन त्यापासून देशाचा व भांडवलवाल्यांचा नफा होईल तर लागेल तितकें भांडवल मिळेल. हिंदुस्थानाला परदेशांतून भांडवल आणण्याची जरूर पडेल असें वाटत नाहीं. परंतु जर पडलीच तर योग्य धंद्यांसाठीं परदेशीं भांडवल उसनें घेण्यास हरकत नाहीं. तज्ञ मात्र पृथ्वीच्या पाठीवर जेथें मिळतील तेथून त्यांस योग्य वेतन देऊन आणले पाहिजेत. त्यांचें वेतन महिना पगार व नफ्याचा हिस्सा असें ठरवावें. कांहीं धंदे इंग्रज किंवा दुसरे परकी व्यापारी यांच्याशीं भागीनें सुरू करण्यांत फायदा होईल. कारखाना चालविणारे व डायरेक्टर यांची हिंदुस्थानांत वाण नाहीं. मात्र त्यांना तज्ञांची मदत आणि भांडवलाचा पुरवठा झाला पाहिजे. जपानांत सुद्धां या कामीं पूर्वींच्या पद्धतीचे जुने वाकबगार यांच्या हातीं सूत्रें असून प्रत्यक्ष कामें करण्याचें काम तरुण होतकरू आधुनिक सुशिक्षितांच्या हातीं आहे व तीच पद्धत आपण घेतली पाहिजे. उद्योगधंद्यांची भरभराट करावयाची असें सरकारचें एकदां धोरण ठरलें म्हणजे हिंदुस्थानांत वनिक व उद्योगी माणसें पुढें येऊन त्या धोरणाचा फायदा घेण्यास तयार अशीं पुष्कळ मिळतील. जपानप्रमाणें सुशिक्षित माणसें परदेशीं पाठवून तयार करून आणण्याचें काम सरकारनें केलें पाहिजे. उद्योग-धंद्याच्या वृद्धीचें काम जर यशस्वी व्हावें असें वाटत असेल तर नेमलेले अधिकारी हंगामी असावेत व त्यांस वेतन नफ्याच्या प्रमाणांत असावें. यामुळें थोडा जास्त खर्च येईल पण हिंदी लोकांचें शिक्षण व कामांतील यश याबद्दल खात्री राहील. धंद्यांना लागणारें भांडवल कसें उभारावें याचा उहापोह आर्थिक बाबींत केला आहेच. पण येथें इतकेंच सांगावयाचें कीं, लोकांनीं आपली सर्व संपत्ति पेढ्यांत ठेवली पाहिजे व त्या पेढ्यांनीं लहान कारखानदारांस रोख कर्ज द्यावें व मोठे कारखाने समाईक भांडवलाच्या पद्धतीनें चालवावे.

याप्रमाणें सरकार व जनता यांच्या एकोप्यानें मनापासून जर उद्योगधंद्यांची अभिवृद्धि होण्यासाठीं प्रयत्न झाले तर लोकांचे जे पैसे हल्लीं दागदागिने वगैरेंत पेट्यांत आहेत ते पेढ्यांत येण्यास वेळ लागणार नाहीं. हे दागिने म्हणजे अडचणीसाठीं ठेवलेली ठेवच आहे व ती घरांत ठेवण्यापेक्षां पेढ्यांत ठेवणेंच सोईचें व सुरक्षित होय. तसेंच आपल्या अर्थशास्त्राप्रमाणें तीस वर्षांना पुरेल इतक्यापेक्षां ज्यास्त असलेला संग्रह राष्ट्रकार्यांत (धर्मकृत्यांत) वापरावा असा नियम आहे. याप्रमाणें गांवोगांव पेढ्या निघून धंद्यांसाठीं भांडवलाचा तोटा अगर अडचण पडणार नाहीं. याशिवाय पुढाऱ्यांनीं घरोघर जाऊन, लोकांना नफा तोटा समजावून देऊन, त्यांच्या शंका निवारण करून व आपल्या उदाहरणानें त्यांना तसें करण्यास उत्तेजन द्यावें. पेढ्यांच्या व्यवस्थापकांनीं लोकांच्या सर्व सोई होतील अशा सवलतीनें वागलें पाहिजे. पेढ्यांवर कांहीं दागिन्यांचे गट ठेवून लग्नकार्यांत जरूर ती हमी देणारास वापरण्यास देण्याची व्यवस्था केली तर हौशींत कमतरता पडणार नाहीं. शिवाय कालांतरानें दागिन्यापेक्षां बँकबुक पाहण्याकडे लोकांची प्रवृत्ति होईल तें निराळेंच. तात्पर्य, खरी कळकळ याबाबद उत्पन्न झाली पाहिजे व होईल.

उद्योगधंद्यासाठीं समाईक भांडवलाच्या कंपन्या निघण्यास उत्तेजन यावें म्हणून कंपन्यांच्या कायद्यांत जपान वगैरे देशांच्या नमुन्यावर योग्य त्या सुधारणा झाल्या पाहिजेत. या कायद्यांत प्रांतांच्या स्थानिक स्थितीला अनुसरून योग्य ते फेरफार करण्यास प्रांतिक सरकारांना मुभा असावी. कंपनी कशी स्थापावी, तिचें काम कसें चालतें याबाबद शाळांतून शिक्षण द्यावें व लोकांना व्याख्यानानें शिकवावें. हें शिकविण्याचें काम नुसत्या कंपन्या स्थापण्याची इच्छा करणाऱ्यांकडे सोंपवूं नये; कारण त्यांच्या बोलण्याकडे लोक वकील या दृष्टीनें पाहतात. यासाठीं हें काम उपदेशकांनीं पत्करलें पाहिजे. प्रांतानिहाय उद्योगधंद्याचें सल्लागार मंडळ नेमून त्यांच्याकडे हें काम द्यावें. या मंडळाच्या जिल्ह्यानिहाय व तालुक्यानिहाय शाखा स्थापाव्या व त्यांनीं हें उपदेशाचें काम करावें. जर्मनींत पेढीवाला आपल्या ठेवी ठेवणाराला अमुक कंपनींत हा पैसा घातला तर जास्त फायदा होईल असा सल्ला देतो. ही पद्धत जरूर तर वापरून पहावी. प्रांतिक

सल्लागार मंडळानें दरमहा आपल्या प्रांतांत कोणत्या कंपन्या निघाल्या व त्यांची स्थिति काय आहे याची माहिती प्रसिद्ध करावी, व ही माहिती जिल्हा व तालुका कमेटीच्या कचेऱ्यांत ठेवावी म्हणजे ज्याला वाटेल त्याला त्या कंपन्यावर देखरेख व कंपन्यांना सल्ला देता येईल. उद्योगधंद्यासाठी नवीन शोध लावणाऱ्या, लागलेल्या शोधांची छाननी करून त्यांस व्यवस्थित स्वरूप देणाऱ्या मंडळ्या प्रांतानिहाय असाव्या. या मंडळ्यांचा युनिव्हर्सिटी व रिसर्च इन्स्टिटयूट यांच्याशीं एकजीव असावा. एकमेकींनीं एकमेकींस शक्य ती मदत करावी. जुटीनें कामें करावीं व सर्वांचा अनुभव सर्वांना उपयोगी पडावा. तात्पर्य, हें काम माझें आहे व देशहिताचें आहे ही जाणीव ठेवून प्रत्येकानें दुसऱ्यास मदत करण्यास तत्पर असलें पाहिजे. 'पिंडे पिंडे मतिर्भिन्ना ' हें वाक्य या ठिकाणीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे. 'नहि सर्वविदस्तु सर्वे' परमेश्वर कोणाला कांहीं, कोणाला कांहीं जास्त देत असतो व या जास्ती दिलेल्याचा फायदा त्यानें सर्वांस दिला तर सर्वांना सर्व दिल्याप्रमाणें होतें.

त्याचप्रमाणें उद्योगधंद्यांचे प्रयोग करून पाहण्याचे कारखाने दरएक जिल्ह्यास एक तरी पाहिजेत. हे कारखाने सरकारनें काढावे व उद्योग-धंदामंडळाची त्यावर देखरेख असावी. त्यांचे मुख्य उद्देश म्हणजे लोकांत प्रयोग करून पाहण्याची गोडी उत्पन्न करावयाची, कोणी प्रयोग करीत असेल तर त्यास सल्ला व प्रोत्साहन द्यावयाचें, यशस्वी प्रयोग-वाल्याला धंदेवाला दाखवून द्यावयाचा अगर त्याची भांडवल मिळण्या-साठीं शिफारस करावयाची हे होत. अशा संस्थांची हिंदुस्थानांत अत्यंत उणीव आहे. पुष्कळ कल्पक अशा संस्था, शिफारस नसल्यानें, भांडवलाला महाग झाल्या आहेत व पुष्कळ भांडवलवाल्यांना कशांत भांडवल घालावें तें समजत नाहीं. अशा स्थितींत या सरकारी संस्था फार उपयोगी होतील. हिंदुस्थानांत सर्व कांहीं आहे पण त्यांचा एकमेकाशीं मेळ नाहीं व हा मेळ घालण्याचेंच पहिलें मुख्य काम आहे.

त्याचप्रमाणें उद्योगधंद्यांचीं पदार्थसंग्रहालयें दरएक जिल्ह्यास एक याप्रमाणें पाहिजेत. तसेंच उद्योगधंद्याबद्दल चौकशी करणारें व माहिती पुरविणारें एक मंडळ हवें. या मंडळाचा रिसर्च इन्स्टिटयूट, सल्लागार

मंडळ, प्रयोगशाळा वगैरे धंद्यांसंबंधाच्या सर्व संस्थांशीं संबंध असावा व या मंडळाचा सल्ला सर्व उद्योगधंद्यांच्या चालकांनीं घ्यावा व कोणालाहि लागेल ती माहिती या मंडळानें पुरवावी.

प्रत्येक प्रांतांत एक तरी धंदेशिक्षणाचें कालेज व जिल्ह्यांत धंदेशिक्षणाची एक तरी शाळा पाहिजे. या ठिकाणीं विज्ञानशास्त्र व रसायनशास्त्र यांचा उद्योगधंद्यांत उपयोगी पडणारा भाग शिकविला पाहिजे. या शाळांना जोडून प्रयोगशाळा व कर्मशाळा जोडाव्या व खेडेगांवांतील सर्व शाळांतून यंत्रें, त्यांची रचना व दुरुस्ती हा विषय शिकवावा. अशा प्रकारच्या शाळा जर पांचपन्नास वर्षांपूर्वींच काढण्यांत आल्या असत्या तर हिंदी लोकांची साधनसंपत्ति व कौशल्य यांचा विचार करतां हिंदुस्थान आज जपानच्या पुढें असता. प्रत्येक जिल्ह्यांत कोणते धंदे करण्याचीं किती साधनें आहेत यांची नक्की माहिती गोळा करून ती लोकांना प्रसिद्ध करून कळवावी. या पत्रकांत इतर देशांत याबाबद जी माहिती प्रसिद्ध करण्यांत येते ती सर्व प्रसिद्ध करावी व शिवाय प्रत्येक धंद्यांत कोणत्या जातीचे किती लोक गुंतले असून त्यांना किती उत्पन्न होतें ही माहिती द्यावी. खानेसुमारीच्या वेळीं ही माहिती गोळा केल्यास पुष्कळ खर्च वांचेल. सरकार व उद्योगधंद्यांच्या संस्था यांनीं परदेशांत त्या त्या धंद्यांत काय सुधारणा झाल्या आहेत याबाबद माहिती वेळोवेळीं प्रसिद्ध करावी. जमाबंदी खात्याच्या वार्षिक अहवालांत तालुका, शहर व जिल्ह्या यांतील उद्योगधंद्याची माहिती द्यावी.

उद्योगधंद्यांची प्रगति झाली तर हिंदुस्थानचें उत्पन्न पुष्कळ वाढेल यांत संशय नाहीं. भांडवल, निश्चय, लोकांचा सर्वस्वी स्वतंत्र ताबा, सर्व प्रकारची वर सांगितल्याप्रमाणें सरकारची मदत या गोष्टी असल्यावर हिंदुस्थानांत जो कच्चा माल मिळतो त्याचे पक्के जिन्नस करण्याचे सर्व कारखाने काढतां येतील. आज काढतां येतील. आज म्हणण्याचें कारण कीं आजची परिस्थिति या कामाला फार योग्य आहे. महायुद्धामुळें जगांतील सर्व राष्ट्रें हैराण आहेत. जर्मनी व फ्रान्स भांडणांत गुंतले आहेत व त्यामुळें उद्योगधंद्याची चढाओढ कमी व जिनसांचे भाव बरे आहेत. अशी संधी फिरून येणार नाहीं. सर्व

स्थीरस्थावर झाल्यावर परदेशची चढाओढ फार होईल. मोठें काम हातीं घ्यावयाचें म्हणजे दिरंगाई व सावकाशी उपयोगी नाहीं. यासाठीं सरकारला स्वतः मोठें कर्ज काढावें लागेल व उद्योगधंद्यांसाठीं कर्ज लोकांना द्यावें लागेल यांत संशय नाहीं. मात्र हें कर्ज प्रत्येक ठिकाणीं सल्लागार मंडळें नेमून त्यांत सर्व हिंदीच लोक ठेवून त्यांचे मार्फतीनें खर्च झालें पाहिजे. प्रांतिक सरकारानें आपल्या जबाबदारीवर प्रांतांत, बोर्डांनीं आपल्या जबाबदारीवर जिल्ह्यांत व कमेट्यांनीं आपल्या जबाबदारीवर शहरांत कर्ज उभारून खालपासून वरपर्यंत एका धोरणानें कामें चाललीं पाहिजेत. वर सांगितल्याप्रमाणें व्यवस्था केल्यास कर्ज मिळण्यास अडचण पडणार नाहीं. कामांची आंखणी दूरवर विचार करून एकदां कायदेमंडळानें मंजूर करावी. यासाठीं लागणारे अधिकारी नेहमींप्रमाणें नेमावे व त्यांचा खर्च वार्षिक जमेंतून करावा. याप्रमाणें काम सुरू केल्या दिवसापासून पांच वर्षांत त्याचें फळ दिसूं लागेल व दहा वर्षांत तें चाखावयास मिळेल. सुधारलेल्या देशांत प्रत्येक बाबीचा अगोदरच उपयोग करण्यांत येत असल्यामुळें त्यांना मिळणारा फायदा कमी असणारच; पण ती स्थिति हिंदुस्थानाची नाहीं. या ठिकाणीं मुबलक माल, स्वस्त मजुरी, उद्योगधंद्यांना वाव पुष्कळ आहे व म्हणून योग्य प्रयत्नानें हें झाड लवकर वाढून त्यास सुंदर फळें येतील. आज पाया घालण्यांत खर्च होणारी रक्कम कालांतरानें कितीतरी पटीनें फळ देईल; इतकेंच नव्हे तर हें फळ दिवसेंदिवस वाढतच जाईल.

या ठिकाणीं हें स्पष्ट सांगितलेलें बरें कीं, हिंदुस्थानचे उद्योगधंदे ऊर्जितावस्थेस आणण्याचें काम हिंदी लोकांचें आहे. हें काम दुसरे लोक करतील हें संभवनीय नाहीं. दुसरे लोक हें काम करूं लागले तरी त्यांच्या हातून हें बरोबर होणार नाहीं. प्रत्येक हिंदी माणूस, मग तो स्त्री असो कीं पुरुष असो, हिंदी असो कीं मुसलमान असो, जहाल असो कीं मवाळ असो, त्यानें हें माझें काम आहे, हें मीच केलें पाहिजे, माझ्याशिवाय दुसऱ्या कोणी हें करतां उपयोगी नाहीं, दुसऱ्याला मी हें काम करण्यासाठीं शिल्लकच ठेवणार नाहीं अशी मनःपूर्वक भावना ठेवून या कामाला लागलें पाहिजे. नोकरांवर सोंपविण्याचें हें काम नव्हे व हल्लींची नोकरशाही तर या कामाला अगदीं नालायक आहे ही गोष्ट चांगली लक्षांत

ठेवली पाहिजे. हिंदुस्थान सरकारनें या कामांत पडण्याचेंच कारण नाहीं. हिंदी लोकांच्या सल्लागार मंडळाच्या देखरेखीखालीं प्रांतिक सरकारनें हें काम हातीं घेतलें म्हणजे पुरे. प्रांतिक सरकारला मुबलक पैसा पुरविणें व त्याच्या कामांत ढवळाढवळ न करणें इतकें धोरण हिंदुस्थान सरकार व स्टेट सेक्रेटरी यांनीं ठेवलें म्हणजे पुरे. परदेशीय प्रतिस्पर्ध्यांपासून, खुद्द इंग्लंडच्या कारखान्यापासून या बाल कारखान्यांचें संरक्षण करण्याचें काम मात्र यांनीं केलें पाहिजे. या कामांत त्यांचा आळस अगर हेळसांड अगदीं अक्षम्य होईल. मग लोकांचा देशाभिमान व स्वार्थपरायणता हीं बाकी सर्व कामें करूं शकतील. आपला देश व त्याबरोबर मी संपन्न व्हावें ही इच्छा प्रत्येक माणसाच्या हृदयांत असतेच व त्या इच्छेच्या जोरावर तो जितकें काम करील तितकें या कार्याला पुरें आहे.

अधिकारी किंवा नोकरशाही व जनता यांत इतकें वांकडें असतें कीं, हीं दोन्ही संतुष्ट व संपन्न असणें शक्य नाहीं. एक जनता तरी संतुष्ट व संपन्न होईल किंवा नोकरशाही तरी संतुष्ट व संपन्न होईल. कदाचित् दोघेहि भिकारी होऊन मरतील पण दोघेहि संतुष्ट व संपन्न होणें शक्य नाहीं. यासाठीं नोकरशाहीवर बिलकुल न विसंबतां लोकांनीं या कामीं कंबरा बांधल्या पाहिजेत. आळस टाकून आपण स्वतः हें काम करून दाखविणार या ईर्षेनें प्रत्येकानें कामास लागलें पाहिजे. कौन्सिलच्या सभासदांनीं एकजुटीनें या कामीं प्रयत्न व नियम केले पाहिजेत. विद्वानांनीं आपली विद्वत्ता जरूर ती माहिती गोळा करण्यांत खर्चून तिचा सर्वत्र प्रसार केला पाहिजे. होतकरू तरुणांनीं प्रयोगशाळांत व कर्मशाळांत काम करण्यांत आयुष्य घालविलें पाहिजे. धनिकांनीं पैसे पुरविण्यास तयार होऊन कारखान्यांच्या कामावर देखरेख करण्यास पुढें सरसावलें पाहिजे. व्यापाऱ्यांनीं आम्ही हाच माल विकूं असें ठरविलें पाहिजे. मजुरांनीं तुम्ही शिकवाल तें शिकून या कारखान्यांत कामें करण्यास तयार आहों असें दाखविलें पाहिजे. पोरांनीं या कारखान्यांतील जिनसा घरोघर नेऊन विकण्यास पुढें आलें पाहिजे. गिऱ्हाईकांनीं आम्ही या देशी कारखान्यांचाच माल खरेदी करूं, नाहीं तर उपाशी राहूं किंवा या मालाशिवायच चालवूं असें ठरविलें पाहिजे. याप्रमाणें सर्व भेदभाव विसरून एक दिलानें करण्यायोग्य हें काम आहे व त्याच्या

योग्यतेप्रमाणें आपण त्याची संभावना केली पाहिजे. इतकी आपण तयारी केल्यावर दयाघन परमेश्वर लांब नाहीं. याप्रमाणें प्रत्येक जीवापासून परमात्म्यापर्यंत सर्वजणांनीं मनावर घेतल्यावर हें काम फत्ते झालेंच पाहिजे. नोकरशाहीचा या कामीं कांहीं विरोध होईल. पण आपल्या हिंदी लोकांच्या एकजुटीपुढें हा विरोध टिकणार नाहीं

याप्रमाणें उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं सल्लागारमंडळें, पेढ्या, कंपन्या, प्रयोगशाळा, संग्रहालयें, अडत्ये, माहिती देणारी मंडळी, धंदेशिक्षणाच्या शाळा, धंदे व त्यास लागणारें सामान यांची खानेसुमारी, कारखाने, दुकान-दार व गिऱ्हाईक इतक्या मंडळ्या स्थापून हीं कामें करण्यास आपण लौकर सुरुवात केली पाहिजे. ' शुभस्य शीघ्रं '.

हिंदुस्थानांतील व्यापाराचें कोष्टक

सन १९१८।१९

निर्गत व्यापार पौंड.		आयात व्यापार पौंड.	
कापूस	३,००,१५,९२५	कापड	४,०३,६९,८७१
सण	४,३५,८१,५१८	कपडे	१२,२३,१७३
ताग	९,७८,६४१		
रेशीम	४,३३,३९३	रेशमी कापड	२४,७२,६७४
लोंकर	३५,९४,९९२	लोकरी कापड	१४,४९,४९२
गळीत धान्यें	७४,७८,९०३	तेलें व्हार्निश	२४,०८,७९०
तेलें	१८,६८,१३२	पेंट (रंग तेली)	८,४५,४२९
चहा	१,१८,५०,४०४	साखर	१,०४,०९,०९४
लांख	१९,६५,६४०	रंग कोरडे	१०,५९,९५१
रंग सामान	१३,६६,५६८	रंगीत जिनसा	१,४२,५०६
रबर	१६,६९,५२७	रबरी जिनसा	१३,८५,७२२
औषधें, उद्भिज	७,५३,९१५	औषधें अर्क	९,७७,९६२
औषधें, खनिज	२,२४,७७३	औषधें खनिज	१६,६१,७१०
धान्यें खाद्य	४,२०,२०,४०७	लोखंड	२,२१,३५,७३०
चामडी	१,२६,९४,५१९	कांचकाम	२२,७६,०४२
एकूण	१२,०४,९९,२५७		८,८५,१२,८४६
वट एकूण	१५,९५,३८,५५४		११,२६,८०,४२८

प्रकरण नववें

व्यापार, उदीम यांत सुधारणा

हिंदुस्थानच्या व्यापारांत काय सुधारणा पाहिजेत हें नीट समजण्यासाठीं हिंदुस्थानच्या व्यापाराचे थोडेसे आंकडे पाहिले पाहिजेत. यासाठीं हिंदुस्थानच्या आयात व निर्गत व्यापाराचे ठळक आंकडे सन १९१९ या एका वर्षाचे सोबतच्या तक्त्यांत दिले आहेत. याच्या मागच्या सहा वर्षांचा आढावा पाहिला तर आयात व्यापार १०६,०००,००० व निर्गत व्यापार १५५,०००,००० चलनी पौंडांचा असून एकंदर परदेशचा व्यापार २६१,०००,००० पौंडांचा होता. यांत महायुद्धानंतर आयात मालाची किंमत शेंकडा १११ नीं वाढली आहे व निर्गत मालाची किंमत फक्त शेंकडा २५ च वाढली आहे. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे जरी आयात व्यापार वाढलेला दिसतो तरी प्रत्यक्ष माल हिंदुस्थानांत दिवसेंदिवस कमीच येत आहे असें दिसेल. व त्याचप्रमाणें एकूण व्यापार कमीच होत आहे हें उघड होईल. याबाबद हिंदुस्थान व जगांतील इतर देश यांची तुलना खालीं दिली आहे.

देशाचें नांव	माणशीं व्यापार १९१३–१४	माणशीं व्यापार १९१८–१९
विलायत	३०	४०
कानडा	२·९	७
संयुक्त संस्थानें	८·८	१८·४
जपान	७·६	२१·३
हिंदुस्थान	०·८	०·८

हें तुलनात्मक कोष्टक पाहतांना हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, जिनसांचे भाव जगांत सगळ्या देशांत वाढले आहेत. लोकसंख्येच्या मानानें व्यापाराचे आंकडे बसतात ते खालीं दिले आहेत.

देशाचें नांव	लोकसंख्या	उलाढाल	शेरा
बेल्जम	७५,००,०००	३२,६०,००,०००	१९१३ त.
कानडा	७२,००,०००	५०,९०,००,०००	१९१८ त.
हिंदुस्थान	३१,५०,००,०००	२८,२०,००,०००	१९१८ त.

महायुद्धांत कानडाचा परदेशचा व्यापार शेंकडा २३१ वाढला व जपानचा २३२ वाढला, पण हिंदुस्थानचा मुळींच वाढला नाहीं. सरकारी रिपोर्टांत फक्त या सालांत कानडा हिंदुस्थानला मागें टाकून गेला इतकाच उल्लेख केला आहे. दोन्ही देश ब्रिटिश साम्राज्यांत असून एकाची लोकसंख्या ऐंशी लाख व दुसऱ्याची साडेएकतीस कोटी असतांना लहानसा देश मोठ्या देशाला मागें टाकतो याबद्दल रिपोर्ट लिहिणाराला कांहींच वाटलेलें दिसत नाहीं. याचा अर्थ इतकाच कीं, महायुद्ध चालू असतां कानडानें आपले व्यापार व धंदे वाढविले; पण हिंदुस्थानानें तसें केलें नाहीं.

महायुद्ध संपतांच सर्व सुधारलेल्या राष्ट्रांनीं व्यापार वाढविण्यास कंबरा बांधल्या आहेत. शस्त्राच्या युद्धानंतर व्यापारी चढाओढ म्हणून सर्व राष्ट्रांत हुरूप आला आहे. अशा वेळीं जर हिंदुस्थान स्वस्थ राहिला तर हा मोठा आत्मघातकीपणा होणार आहे. यांत जगांतील चढाओढींत हिंदुस्थान मागें राहील; इतकेंच नव्हे तर यावेळीं जर हिंदुस्थानांतील उद्योगधंदे वाढले नाहींत तर परदेशी व्यापाऱ्यांच्या कचाटींत हिंदुस्थान कायमचें डांबलें जाईल. शेती व धंदे या दोहींतहि, विशेषतः धंद्यांत, या वेळीं वाढ झाली पाहिजे, म्हणजे स्वदेशांत व परदेशांत आपला व्यापार वाढेल. मुंबई शहराबाहेरील हिंदुस्थानचा सगळा परदेशी व्यापार इंग्रजांच्या हातीं आहे व हिंदी लोकांच्या हातीं त्यापैकीं फारच थोडा भाग आहे.

हिंदुस्थानांतून परदेशीं जाणारा माल म्हणजे धान्यें व कच्चा माल होय. इतर देशांतून बहुतेक पक्का मालच बाहेर जाऊं देतात. तसेंच हिंदुस्थानांत आयात होणारा माल म्हणजे पक्का माल होय व त्यापैकीं निम्मा अधिक माल विलायतेंतून येतो. हिंदुस्थानचा व्यापार मुख्यत्वें विलायतशीं आहे. आयात व्यापाराचा शेंकडा चौपन्न व एकंदर उलाढालीचा शेंकडा सव्वीस भाग विलायतशीं चालतो. ही पद्धत अशीच चालण्यास हरकत नाहीं असें गृहीत धरलें तरी अशा रीतीनें केवळ एकाच देशावर अवलंबून असणें मोठें

घातक आहे. कांहीं आकस्मिक कारणानें त्या देशाला इतका व्यापार करणें अशक्य झालें तर दुसरी कांहीं व्यवस्था होईपर्यंत हिंदुस्थानचे हाल कुत्रा खाणार नाहीं. गलबतें बांधण्याचें व चालविण्याचें हिंदी कसब पार लयास गेलें आहे. महायुद्धांत विलायती जहाजांना फुरसत नसल्यामुळें हिंदुस्थानच्या व्यापाराचे फार हाल झाले.

व्यापाराची उलाढाल करणाऱ्या सर्व बँका हिंदुस्थानांत परकीय आहेत. देशांतील अंतर्गत भागांत पोटबँका व त्याच्या गांवोगांव शाखा यांची मोठी उणीव असून तिच्या पूर्णतेसाठीं कांहींच तजवीज केलेली नाहीं. शेतकऱ्यांचा फायदा होईल अशा तऱ्हेनें अडते वगैरेंची सोय नसल्यानें परदेशीं जाणाऱ्या मालावर दलालच गबर होतात. शेतकऱ्याला त्याच्या मालाची भरपूर किंमत मिळावी म्हणून कानडा देशाप्रमाणें हिंदी सरकारनें मदत देण्यासाठीं कांहींच योजना केलेली नाहीं. सरकारी रिपोर्टांत व्यापाराचा उगीच भपकेदार सारांश दिलेला असतो. पण त्यांत परकी लोकांनीं चालविलेला व्यापार किती व हिंदी लोकांनीं चालविलेला किती अशी फोड नसते. अशी फोड केली तर तत्काळ हा भ्रमाचा भोपळा उघडा पडेल.

पुष्कळ दिवसांपासून लोकांची खात्री झाली आहे कीं, हिंदी लोकांच्या हातीं राज्यकारभार आल्यावांचून त्यांना पाहिजेत त्या व्यापारी सोई व्हावयाच्या नाहींत. जर खरें देशहित व्हावें असें वाटत असेल तर उद्योगधंद्याची बाब पूर्णपणें हिंदी लोकांच्या हातीं आली पाहिजे. हल्लींची नाण्याची पद्धति, जींत विलायती सावरिन व हिंदी रुपया हीं दोन्हीं नाणीं वाटेल त्या रकमेपर्यंत कायदेशीर नाणीं आहेत ही पद्धत, गैर आहे. कोणतें तरी एक नाणें कायम व प्रमुख पाहिजे. यामुळें भावाचा नेहमीं घोटाळा होतो. तो एक नाण्यानें मोडेल. हें एक नाणें सोन्याचेंच असावें. नाण्याच्या भावांत एकदम चलबिचल होऊन हिंदी व्यापाऱ्यांचें नुकसान होऊं नये अशी तजवीज झाली पाहिजे. हल्लींच्या पद्धतीनें महायुद्धांत व एरवीं पुष्कळ त्रास दिला आहे व शिवाय तींत खालील दोष आहेतः—

१ निरर्थक महागरें असें चांदीचें नाणें पाडावें व सांठवावें लागतें.

२ दहावीस वर्षांत कधींतरी जिचा एक दिवस उपयोग होईल अशी गंगाजळी ठेव विलायतेंत हमेश ठेवावी लागते.

सोन्याचें नाणें कायदेशीर व व्यवहार्य केल्यानें या दोन्ही अडचणी एकदम मोडतील. जर योग्य वजनाचें व योग्य किंमतीचें सोन्याचें नाणें सुरू केलें तर हुंडणावळीची काळजी नको. ती आपणच स्थिर होईल. इतर देशांत सोन्याचीं नाणीं आहेत व त्यामुळें बाजारभावाप्रमाणें जी हुंडणावळ असेल ती असेल, अशी स्थिति असते, तीच हिंदुस्थानाची असावी. कायदेशीर सोन्याचें नाणें म्हणजे सर्वत्र सोन्याचीं नाणीं वापरलीं पाहिजेत असें कांहीं नाहीं. कानडा, संयुक्त संस्थानें वगैरे देशांत सोन्याचें नाणें चालू आहे. पण सोन्याचा डालर कोणी देत घेत नसतो. सोन्याच्या नाण्याच्या भावानें नोटा व हुंड्या चालतात. हिंदुस्थानासारख्या देशांत जेथें परदेशांतूनच पुष्कळ पैसे येणें असतात, व लोकांजवळ असलेला पुष्कळ सुवर्णसंग्रह सरकारला उपयोगी पडेल तेथें सोन्याचें नाणें करण्यास अडचण आहे असें मुळींच नाहीं. सरकारची एक मध्यवर्ती पेढी व प्रांतोप्रांतीं सरकारी शिल्लक बाळगणाऱ्या पेढ्या असल्या म्हणजे कागदी नोटांसाठीं लागणारें सोनें या पेढ्यांत सहज सांठवितां येईल व त्याच्या जोरावर कागदी नाणें खुशाल सर्वत्र चालेल. असें केलें म्हणजे नाण्याची गंगाजळी ठेव जी ३१ मार्च १९१९ रोजीं नऊ कोट पाउंड होती ती लंडनमधून आपोआप हिंदुस्थानांत येईल. ही ठेव हिंदुस्थानांत आली कीं, हिंदुस्थानची पत आपोआप वाढेल व तिचा उपयोग व्यापाराच्या वाढींत पुष्कळ होईल. तसेंच हल्लीं सरकारला लागणारी चांदी लंडनमध्यें खरेदी करण्यांत येते ती हिंदुस्थानांत खरेदी करतां येईल. सोन्याचें नाणें झालें म्हणजे रुपयाची किंमत कृत्रिम न ठेवतां ती इतर खुर्द्याप्रमाणें वाटेल ती असूं शकेल.

हिंदुस्थानांतील प्रांतिक बँका मोडून सगळ्या हिंदुस्थानची एक इंपीरिअल बँक करण्यांत आली आहे. पण ही एक मोठी चूकच आहे. प्रत्येक प्रांतीय बँकेला त्या त्या प्रांतांत खुशाल काम करूं द्यावें, ज्यांना बँका नाहींत त्यांना नव्या प्रांतिक बँका स्थापूं द्याव्या व याप्रमाणें एकमेकांत चढाओढ राहूं द्यावी. एक बँक केल्यानें चढाओढ व चोख व्यवहार कमी होतो; पण पत कांहीं वाढत नाहीं. यामुळें व्यापाराला उत्तेजन न मिळतां सुस्ती मात्र येते. हिंदुस्थानासारख्या अवाढव्य देशांत फ्रान्स, जर्मनी,

किंवा जपानसारखी एक बँक करण्यापेक्षां कानडा, संयुक्त संस्थानें यासारखी अनेक बँकांची जूट किंवा संयोग करणें चांगलें. आपल्या नजरेंत राहतील अशा अनेक प्रांतवार बँका एका अवाढव्य व नजरेच्या आटोक्या बाहेर जाणाऱ्या बँकेपेक्षां हितकर होत.

अनेक बँका असल्यानें पैशाचा एकाच ठिकाणीं बोजा होईल इतका संचय होत नाहीं. मध्यवर्ती बँकेंत जो फायदा होणार तो होऊन भांडवल पसरलेलें राहण्याच्या कामीं पुष्कळ प्रांतिक बँका असणें हितकर असतें. एक बँक असली म्हणजे तिच्या शाखांना आपण नोकर आहों असें वाटतें व गांवोगांव व्यापार व व्यवहार वाढविण्याची उत्सुकता त्यांना वाटत नाहीं. उलट 'कोठें जातात, झक मारीत येतील' अशी बेपर्वाइ त्यांत उत्पन्न होते. पण निरनिराळ्या प्रांतीय किंवा परगण्याच्या बँका असल्या तर त्या आपल्या ओळखीपाळखीनें त्या परगण्यांत व्यापाराचा फैलाव करतात. त्या नोकर नसून मालक असल्यानें व्यवहार वाढविला तर आपला फायदा असें त्यांस वाटतें. त्यामुळें व्यापारवृद्धि होण्यास मदत होते. हिंदुस्थानांतील सरकारी म्हणविल्या जाणाऱ्या बँकांत सरकारी पैसे असतात व त्यामुळें त्या इतर बँकांशीं बेगुमानपणें वागतात. या बँका म्हणजे एक सरकारी खातींच होतात व त्यामुळें स्थानिक बँका बुडत असतांना यांना सोयेर अगर सुतक नाहींसें दिसतें. बँकांची जूट असली तर असा बेगुमानपणा, पोटशाखांचा नोकरपणा, व्यापार वाढविण्याची बेपर्वाइ वगैरे दोष जातात. त्याचप्रमाणें अतःपर प्रांतीय बँकांना परदेशांशीं व्यापारी उलाढाली करण्याची मनाई असूं नये. अशा मोकळेपणानें त्यांचा व्यवहार वाढेल.

याशिवाय केवळ परदेशांशीं व्यापार करण्यासाठीं एक हुंडणावळीची स्वतंत्र बँक जपानच्या याकोहामा स्पिसी बँकप्रमाणें स्थापावी. हल्लींच्या हुंडणावळीच्या बँका परकीय व परदेशी व्यापाऱ्यांनीं काढलेल्या असल्यामुळें त्या हिंदी व्यापाऱ्यांना योग्य त्या सवलती देत नाहींत. मग त्यांना उत्तेजन देऊन त्यांचा व्यापार वाढविणें तर लांबच राहिलें. हिंदी बँकांच्या शाखा इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, कानडा, संयुक्त संस्थानें, जपान वगैरे परदेशांत काढाव्या. कानडांतील पुष्कळ बँकांच्या इंग्लंडमध्यें शाखा आहेत.

हिंदी लोकांनीं चालविलेल्या पन्नास लाखांवर भांडवल असलेल्या बँका दरएक प्रांतांत एक एक, दोन दोन तरी पाहिजे आहेत. योग्य माणसांनीं मनावर घेतलें तर या बँकांना पैसे व व्यवहार सहज मिळेल. सरकारी बँका, हुंडणावळीच्या बँका, खाजगी बँका, धंद्यांच्या बँका, शेतीच्या बँका वगैरेंचा परस्पर मेळ असावा. तात्पर्य, बँकांचें एक जाळेंच देशभर विणलेलें असावें. प्रत्येक तालुक्यांत एक तरी बँक आफीस पाहिजे. फुकट तपासणी, व्याजाची हमी, सरकारी मदत व सल्ला व दुसरें कांहीं लागेल तें देण्याचें अश्वासन देऊन प्रत्येक जिल्ह्यांत एक एक बँक स्थापविली पाहिजे. बँका या व्यापाराच्या माता आहेत. त्या व्यापार उत्पन्न करतात व वाढवितात. शेतकऱ्यांशीं अडतीचा व्यापार करणाऱ्या बँकांची तर हिंदुस्थानांत अत्यंत जरूर आहे. धंदे व कारखाने यांना मदत करणाऱ्या बँका पाहिजे आहेत. पुष्कळ कल्पकांना पैसे नाहींत व पैसेवाल्यांना कोणाला मदत करावी हें समजत नाहीं. यामुळें दोघांचीहि हल्लीं कुचंबणा होत आहे. या धंद्यांच्या पेढ्यांना त्यांच्या भांडवलाच्या दसपटीपर्यंत हुंड्या देण्याचा अधिकार असावा. जपानांत असा अधिकार दिलेला आहे व त्याचा फार उपयोग होतो. जिल्ह्यांतील लोकलबोर्ड व म्युनिसिपालिट्या यांचे पैसे जिल्ह्याच्या बँकेंत ठेवावेत. या बोर्डांना कारखाने वगैरे काढण्यास पैसे या बँकांनीं द्यावे. त्या कारखान्यांत योग्य ती सल्ला, देखरेख वगैरे करून त्यांना ऊर्जित दशेस आणावे. बँकांच्या शाखा दरएक मोठ्या गांवीं असाव्या.

शेतकऱ्यांच्या पतपेढ्या वगैरे संस्थांना मदत करण्यासाठीं शेतीच्या बँका पाहिजेत म्हणून वर सांगितलेंच. जर या बँकांत परस्पर स्नेहसंबंध ठेवले, सरकारनें त्यांवर योग्य नजर ठेवली, त्यांना व्यापार धंदे वगैरे वाढविण्यास सवलती दिल्या तर वर सांगितल्याप्रमाणें बँकांचें जाळें अत्यंत हितकर होईल व हा एक कायमचा फायदा देशाला मिळेल.

हिंदी व्यापाराची कुचंबणा परदेशी आगगाड्या व आगबोटी यांनीं फार होते. या बाबीचा विचार दळणवळणांचीं साधनें या सदरांत केला आहे. हिंदुस्थानांतील व्यापाराचा प्रवाह परदेशी व्यापारावर फार अवलंबून आहे. हिंदुस्थानचा अंतर्गत व्यापार म्हणजे कच्चा माल बाहेर ढकलणें व पक्का माल आंत जिरविणें इतकाच आहे. पण देशी धंदे सुरू झाले

म्हणजे हा व्यवहार बदलेल. देशांतील देशांत कच्चा माल कारखान्यांस पुरविणें व पक्का माल गिऱ्हाइकांस पुरविणें हीं कामें पुढें अंतर्गत व्यापाराकडे येतील. मग परदेशचा पक्का माल बाहेर थोपवून धरणें व स्वदेशांतील कच्चा माल देशांत जिरविणें हें त्याचें स्वरूप होईल. याहिपुढें कालांतरानें परदेशचा कच्चा माल ओढून आणणें व स्वदेशचा पक्का माल बाहेर फेंकणें हें अंतर्गत व्यापाराचें ध्येय होईल. निदान परदेशी मालाशीं टक्कर देणें, त्याशीं दोन हात करण्याची धमक धरणें, शक्य तेथें परदेशी मालाची गुणांत, किंमतींत, उपयुक्ततेंत फजीति करणें हीं कामें अंतर्गत व्यापाराकडे येतील.

जपान देशांत मुलकी जमाबंदीच्या अधिकाऱ्यांनीं आपआपल्या तालुक्यांत व जिल्ह्यांत तशांच्या मदतीनें देशीं धंदे व व्यापार यांची वाढ होण्याची तजवीज करावी असा कायदा आहे व त्याच धर्तीवर हिंदुस्थानांत काम झालें पाहिजे. या अधिकाऱ्यांना सल्ला व मदत देण्यासाठीं खाजगी लोकांची कमेटी दरएक जिल्ह्यास एक तरी असावी. अशी कमिटी दरएक तालुक्यास एक असली तर उत्तम. प्रांताप्रांतांचा व्यापार वाढावा म्हणून दरएक प्रांतानें मोठमोठ्या शहरीं व बंदरीं आपला एक एक अडत्या ठेवावा. हे अडत्ये प्रांतिक व्यापारी सल्लागार मंडळाच्या ताब्यांत असावे. ह्या व्यापारी सल्लागार मंडळांच्या ताब्यांत देशांतील सर्व आगगाड्यांची व्यवस्था असावी. प्रत्येक प्रांताच्या व्यापारी मंडळानें आपले प्रतिनिधि रेलवेचा कारभार करणाऱ्या मंडळांत निवडून द्यावे.

कोणतेंहि सरकार आपल्या प्रजेविषयीं निष्काळजी असणें शक्य नाहीं व त्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारनें हिंदुस्थानाबद्दलची आपली बेपर्वाइ सोडली म्हणजे वर सांगितलेलीं मंडळें, अधिकारी, सल्लागार, बँका वगैरे उत्पन्न होण्यास उशीर लागणार नाहीं. सरकार जोंपर्यंत विरुद्ध आहे, निदान बेपर्वा आहे तोंपर्यंत हीं कामें लोकांनीं व त्यांच्या प्रतिनिधींनीं शिरावर घेतलीं पाहिजेत व सरकारला भंडावून सोडून त्यांत मन घालण्यास लावलें पाहिजे. यासाठींच दरएक प्रांत व मध्यवर्ति सरकार वगैरेंनीं या सुधारणांची योजना तयार करून अमलांत आणण्यासाठीं पांच वर्षेपर्यंत सारखें काम करणाऱ्या कमेट्या व कमीशनें नेमावीं म्हणून वर सांगितलेंच आहे. या

पांच वर्षांत प्रांतांना पूर्ण आर्थिक स्वातंत्र्य व सगळा देश ताबेदारीच्या स्थितींतून स्वतंत्र स्वराज्याच्या स्थितींत आणून सोडला पाहिजे. जपान, कानडा, आस्ट्रेलिया वगैरे नवीन ऊर्जित दशेस आलेल्या देशांची स्थिति, रीति व पद्धति यांचा विचार करून आपल्या परिस्थितीस योग्य ती पद्धत आपण स्वीकारिली पाहिजे. व्यापार व धंदे यांचा विचार करणारें एक मध्यवर्ति सल्लागार मंडळ नेमलें पाहिजे. त्याचप्रमाणें व्यापारधंदेविषयक एक कार्यकारी मंडळहि निवडलें पाहिजे. त्याचप्रमाणें मंडळें दरएक प्रांतास पाहिजेत. धंदे वगैरेंचे दिवाण किंवा प्रधान हे या मंडळांचे अध्यक्ष असावे व या सर्व संस्थांत हिंदी बहुमत पाहिजे.

दरएक प्रांतानिहाय जें व्यापारमंडळ नेमावयाचें त्यांत व्यापारी व अर्थशास्त्रांत निष्णात असे पांच सभासद असावे. यांची निवडणूक एक वर्षापुरती असावी व यांपैकीं दरसाल दोन सभासद जावे व दोन नवे यावे अशी योजना पाहिजे. या व्यापारी मंडळांच्या मदतीस सरकारी अधिकारी असावे. त्यांनीं सल्ला द्यावी पण मत मात्र देऊं नये असा निर्बंध पाहिजे. या मंडळाला जकाती, रेलवेभाडें वगैरेंबद्दल सल्ला देण्याचा अधिकार असावा व यांच्या सल्ल्याप्रमाणें त्यांत फेरफार करण्यांत यावे. हिंदुस्थानचा ज्या प्रमुख पांच सहा देशांशीं पुष्कळ व्यापार चालतो त्या पांच सहा देशांत हिंदी व्यापारी अडत्ये (हाय कमीशनर) नेमावे. या अधिकाऱ्यांनीं हिंदुस्थानांतील मालाला त्या देशांत जास्तींत जास्त किंमत कशी येईल व त्या परदेशांतील माल हिंदुस्थानांत स्वस्तांत स्वस्त कसा मिळेल हें पहावें व त्याप्रमाणें इकडे कळवावें व तजवीज करावी. हिंदी व्यापारी व कारखानदार त्या देशांत जातील तेव्हां त्यांस शक्य ती मदत करणें हें या अडत्यांचें काम होय.

व्यापारमंडळानें एक मासिक काढावें. त्यांत या अडत्यांकडून आलेली माहिती, दुसऱ्या लोकांनीं दिलेली माहिती व सरकारांतून व्यापारासंबंधीं प्रसिद्ध करण्यांत येणाऱ्या माहितीचा गोषवारा द्यावा. प्रांतिक व मध्यवर्ती व्यापारासंबंधीं सल्लागारमंडळ, खाजगी व्यापारी संघ व सरकारी अधिकारी यांनीं व्यापारधंद्यासंबंधीं उपयुक्त माहिती लोकांत प्रसिद्ध करावी. प्रांतोप्रांतीं असलेले प्रांतिक सरकारचे अडत्ये, देशांत फिरून माहिती

गोळा करणारीं मंडळें, खासगी संस्थांचे फिरते गुमास्ते व इतर व्यापारी लोक यांनीं व्यापारोपयोगी माहिती या मासिकांत पाठवावी अगर स्वतःचें दरएक प्रांताचें निराळें मासिक असून त्यांत ती प्रसिद्ध करण्यांत यावी. माहिती वाढली तर हें मासिक साप्ताहिक किंवा दैनिक सुद्धां करण्यास हरकत नाहीं. जिल्ह्यानिहाय व्यापारी माहिती प्रसिद्ध करणारें एक नियत-कालिक, व्यापारी संघामार्फत, प्रसिद्ध व्हावें.

सरकारी व्यापारी खात्यानें आपआपल्या प्रांतांतील भाषेंत परदेशांत व्यापारासंबंधीं काय नियम आहेत, कोणत्या पद्धति अंमलांत असतात, इतर देशांत जकाती, रेलवे, बोटी वगैरेंचे काय भाव व नियम आहेत वगैरे माहिती सोप्या शब्दांत साधारण व्यापाऱ्याला समजेल अशा पुस्तक-रूपानें प्रसिद्ध करावी. सर्व हिंदुस्थानभर एक वजन, एक माप करण्याची खटपट व्हावी.

प्रत्येक प्रांतांत त्या प्रातांतील व्यापाराची वाढ कशी होईल याचें चिंतन करण्यासाठीं एक चेंबर ऑफ कॉमर्स पाहिजे व सर्व हिंदुस्थानासाठीं अशा चेंबर ऑफ कॉमर्स संस्थांची जूट पाहिजे. याशिवाय प्रत्येक शहरीं एक व्यापारी संघ पाहिजे. या व्यापारी संघाचें एक माहितीपत्रक व शेती व कलाकौशल्याचें प्रदर्शन अगर संग्रहालय असावें. या संग्रहालयांत त्या जिल्ह्यांत होणाऱ्या वस्तु ठेवून त्यांच्या शेजारीं परदेशांत होणाऱ्या तसल्या वस्तु मांडलेल्या असाव्या. अशा संस्था खाजगी असलेल्या उत्तम, पण कायद्यानें त्यांना मंजुरी व सवलती दिलेल्या असाव्या.

प्रांतिक सरकारानें दर सहामाहीस पांच सहा चांगले व्यापारी परदेशीं फिरतीवर पाठवावे. यांनीं परदेशांतील व्यापाराचा अभ्यास करावा व आपला व्यापार तेथें वाढवावा.

प्रांतिक व्यापारी मंडळाचें मुख्य काम म्हणजे त्या प्रांतांत समाईक भांडवलाचे मोठमोठे कारखाने काढण्यास उत्तेजन देणें व लहान लहान कारखाने स्थापून कारखाने काढण्याचें लोकांस शिक्षण देणें हें होय. कर्तब-गारीची, कल्पक व उत्साही माणसें मिळतील त्यांस योग्य उत्तेजन व जरूर ती मदत देऊन त्यांस कारखाना काढण्यास प्रोत्साहन देणें हें प्रांतिक

मंडळाचें मुख्य ध्येय पाहिजे. एका सालांत असे किती प्रयत्न यशस्वी झाले ही या मंडळाच्या कामाची कसोटी असावी व मंडळानें आपल्या कामाचा अहवाल दर सहामाहीस प्रसिद्ध करावा.

ज्या ज्या कामांत परदेशी लोकांची स्पर्धा असते अशा प्रत्येक देश-हिताच्या बाबींत स्वदेशी लोकांची एकी व योग्य प्रकारें सुरुवात यांचीच मोठी अडचण पडते. या नियमाला व्यापारधंदा कांहीं अपवाद नाहीं. हें ओळखून आपणाला व्यापाराची नीट सुरुवात करून दिली पाहिजे. यासाठीं येतीं दहा वीस वर्षें हिंदी व्यापार वाढीस लागण्यास योग्य अशी परिस्थिति कायद्यानें करून दिली पाहिजे व एकदां आपला व्यापाराचा जम बसला म्हणजे मग मोकळा व्यापार व उघड स्पर्धा वगैरे बाबीच्या गोष्टी करता येतील. सरकारची मदत किंवा संरक्षक जकाती याशिवाय व्यापार वाढवा म्हणून उपदेश करणें किंवा परदेशी मालाची भयंकर चढाओढ असतां नवे कारखाने काढण्यास सांगणें म्हणजे लोकांना या गोष्टी करावयाला वावच न देणें होय. लहान मुलाला चालावयाला शिकावयाला जसा पांगुळगाडा किंवा मोठ्या माणसाच्या बोटाचा आधार लागतो त्याचप्रमाणें नवे कारखाने व व्यापार यांना संरक्षक जकाती व सरकाची मदत अवश्य असते. या गोष्टी न मिळाल्यास मूल जसें चालूं लागणार नाहीं त्याचप्रमाणें व्यापाराचें होईल. यासाठीं हिंदुस्थानचा व्यापार वाढण्यासाठीं लागतील त्या सवलती हिंदुस्थानाला देण्यांत येतील असें सरकारानें वेळोवेळीं जाहीर करावें, व इतर सुधारलेल्या देशांत या बाबतींत जे जे उपाय अमलांत आणण्यांत आले होते व अजूनहि येतात ते सर्व उपाय ताबडतोब अमलांत आणावे. व्यापार वाढण्यासाठीं सरकारी अधिकारी वगैरेंनीं काढलेल्या सर्व हुकुमांना कायद्याचें स्वरूप असावें म्हणजे अधिकारी बदलले तरी त्यांची पिछेहाट होणार नाहीं. सवलतीचें धोरण एकदां जाहीर झाल्यावर कोणाहि अधिकाऱ्यानें त्याला विरोध येईल असा कोणताहि हुकूम काढूं नये व काढला तर त्यास मान्यता नसावी; असा स्पष्ट कायदा व्हावयाला हवा. याप्रमाणें सर्व बाजूंनीं देशी व्यापाराला उत्तेजन येईल अशी तजवीज कायद्यानेंच केली पाहिजे व अशा तजविजीस सर्व सरकारी अधिकाऱ्यांनीं मदत केलीच पाहिजे असे निर्बंध हवेत.

प्रत्येक प्रांताच्या युनिव्हर्सिटीनें व्यापारोपयोगी शिक्षणाची सर्व सोय मुबलक व मोकळ्या हातानें केली पाहिजे. सर्व शिक्षण देशीच भाषेंतून द्यावयाचें असल्यानें विद्यार्थ्यांना त्याचा बोजा वाटणार नाहीं व शिक्षण सर्व त्यांस पूर्णपणें गळीं उतरेल. धंदे व उद्योग यांबाबद अशीच शिक्षणाची सर्व सोय पाहिजे. प्रत्येक शहरांत व्यापार व उद्योगधंदे यांचें एक कालेज असावें व त्या कॉलेजांत, विशेषतः त्या जिल्ह्यांत चालणाऱ्या व्यापारधंद्याचें शिक्षण देण्यांत येऊन त्याच बाबींत परदेशांत किती व कशी प्रगति झाली आहे याचें शिक्षण द्यावें. त्याचप्रमाणें प्रत्येक तालुक्यास व्यापार व उद्योगधंदे यांचें सामान्य शिक्षण देणाऱ्या शाळा असाव्यात व यांत पुढील पिढीचे होतकरू व्यापारी व कारखानदार यांना निर्माण करण्यांत यावें.

देशहिताच्या दृष्टीनें प्रत्येक चांगल्या व्यापाऱ्यानें व उद्योगधंदा चालविणारानें चांगलीं मुलें पाहून आपल्या जवळ उमेदवार म्हणून ठेवावीं. व्यवहाराचें साधारण काम या मुलांकडून करवून घेऊन त्यांना आपली विद्या शिकवावी. आपली गुप्त गोष्ट योग्य स्वदेशी माणसांना सांगण्यांत त्यांनीं केव्हांहि आळस करूं नये; इतकेंच नव्हे तर योग्य मुलें शोधून काढून त्यांना आपलें सर्व ज्ञान शिकवावें. आपली विद्या आपल्या देशांत कायम रहावी, शक्य तर ती वाढावी इकडे प्रत्येक चांगल्या माणसानें लक्ष दिलें पाहिजे. आपलें रहस्य कोणाला सांगावयाचें नाहीं या दुराग्रहानें आपल्याकडील पुष्कळ कलांचा नांवापलीकडे मागमूस नाहींसा झाला आहे. या मागील अनुभवानें शहाणे होऊन आपण पुढें तरी ही चूक करूं नये. शिकणाऱ्या मुलांत योग्य बुद्धि व उत्साह पाहिजे ही गोष्ट खरी; पण आपण तपासच करूं लागलों तर योग्य बुद्धीचीं व कर्तबगारीचीं मुलें आपणांस पाहिजेत त्याहून जास्त मिळतील. निदान कमी पडणार नाहींत असा भरंवसा वाटण्यास पुष्कळ जागा आहे.

व्यापार वगैरेंची जास्त वाढ व्हावी म्हणून गरीब व मध्यम वर्गाची प्रवासाची जास्त सोय केली पाहिजे. यासाठीं तिसऱ्या वर्गाचें भाडें कमी करून डबे अधिक सोईस्कर व जास्त केले पाहिजेत. डब्यांत पहिली सोय

पाहिजे ती म्हणजे हिंदी शौचकूप, बायकांच्या डब्यावर बायकांचें चित्र, आगगाडींत अन्नपाण्याची सोय व डब्यांत झोंपीं जाण्याची सोय. या बाबींत मधल्या बांकावर तीन मजले असलेले डबे साधारण बरे आहेत. तशीच व्यवस्था बाजूंच्या बाकांना केली तर बरें होईल. खाण्यासाठीं गाडीस एक निराळा डबा जोडून त्यांत निरनिराळ्या जातींना भात, भाजी व भाकरी बसून खातां येईल अशी सोय हवी. भाकरीऐवजीं पुऱ्यांची व्यवस्था केली तर सर्व साधारण जातींची पहिल्यानें सोय होईल व मग सर्व जातींची सोय होईल. मांसाहारी व शाकाहारी असे दोन भाग मात्र एकमेकांपासून अलिप्त असे पाहिजेत. याबाबद सरकारनें रेलवेंना सक्त ताकीद दिली पाहिजे. रस्त्यांवर म्युनिसिपालिट्यांनीं ही सोय वाटेवरील धर्मशाळांत करावी. कांहीं दिवस यांत नुकसान होईल, पण लवकरच ही व्यवस्था अंगवळणी पडून प्रवासाची सोय वाढेल.

प्रवासाची सोय वाढल्यावांचून माणसांना प्रवास करण्याचा हुरूप येत नाहीं. प्रवास केल्याशिवाय माणसाची नजर फांकत नाहीं. व्यापाऱ्यानें तर प्रवास अवश्य केला पाहिजे. प्रवासांत व्यापाऱ्याबरोबर मालाचे नमुने असल्यास त्यास रेलवेचें भाडें व जकाती याबाबद सवलत असावी. अशा सवलतीनें व्यापार वाढण्यास फार मदत होईल. प्रत्येक मोठ्या स्टेशनावर तेथील म्युनिसिपालिटीनें त्या गांवीं धंदे व व्यापार याबाबद काय सवलती किंवा सोई आहेत, तेथें कोणता व्यापार विशेष चालतो व तेथून दुसऱ्या कोणत्या कोणत्या गांवीं सोईनें जातां येईल ही माहिती फळ्यावर मोठ्या अक्षरांत द्यावी.

प्रत्येक धर्मशाळेच्या रखवालदाराकडे एक एक पुस्तक असावें व त्यांत अशा तऱ्हेची माहिती नमूद असावी. व्यापाऱ्याला जरूर ती माहिती रखवालदारानें द्यावी. धर्मशाळांच्या जमीनींत खोल पुरलेल्या कड्या असाव्या व या कड्यांना मुशाफरांनीं आपले सामानाची पेटी साखळदंडानें बांधून ठेवावी. चोरी वगैरेपासून व्यापाऱ्यांचा बचाव व्हावा म्हणून धर्मशाळांत ही सोय पाहिजे त्याचप्रमाणें ती आगगाडींतहि पाहिजे. तसेंच गार्डांच्या ताब्यांत माल देण्याच्या संबंधांत जास्त सवलत पाहिजे. स्टेशनवर

येतांच माल मोजून गार्डाच्या डब्यांत देण्यांत यावा व उतरल्या ठिकाणीं त्याचें वजन, पैसे वगैरे द्यावे. अशी तजवीज केल्यानें गाडींत चढतांना होणारी धांदल व त्रास पुष्कळ कमी होईल.

तात्पर्य, थोड्या खर्चांत व सुखानें प्रवास करण्याचीं साधनें वाढलीं म्हणजे लोक जास्त मुशाफरी करतील व त्यामुळें व्यापारास उत्तेजन येईल. धर्मशाळांत, बाजारांत, हंगामी प्रदर्शनवजा दुकानें कांहीं दिवस सवलतीच्या दरानें परप्रांतीय व्यापाऱ्यांना मांडूं द्यावीं.

प्रकरण दहावें

साधनांत सुधारणा

हिंदुस्थानासारख्या उष्ण कटिबंधांतील व शेतीवर अवलंबून असणाऱ्या देशांत पाटबंधारे व कालवे यांचें महत्त्व किती आहे हें सांगावयास नको. पाणी नसल्यास गवताची काडी सुद्धां उगवणार नाहीं असे प्रदेश हिंदुस्थानांत आहेत. हा सगळा देश हल्लीं देवमातृक किंवा निव्वळ पावसावर अवलंबून राहणारा आहे. त्याला प्रयत्नपूर्वक "नदीमातृक" म्हणजे पाटावर पोट भरणारा केला पाहिजे. एकंदर इंग्रजी हिंदुस्थानांत २२,००,००,००० एकर शेती आहे. त्यापैकीं फक्त ४,८०,००,००० एकरांना पाणी मिळतें व यांपैकीं २,६०,००,००० एकरांना पाणी सरकारी कालव्यांचें मिळतें व २,२०,००,००० एकरांना खाजगी तळीं व विहिरींचें पाणी मिळतें. देशी संस्थानांत सुमारें ६०,००,००० एकरांना पाणी मिळतें इंग्रजसरकारांनीं जे कालवे वगैरे बांधले आहेत त्यांवर भांडवलखातीं त्र्याहात्तर कोटी रुपये खर्च झाला आहे व या बागाईत जमिनींतील पिकांची किंमत दरसाल सत्त्याण्णव कोटी आहे. यावरून हें दिसेल कीं, पाटबंधाऱ्याकडे खर्च होणारी रक्कम उत्पन्नांत भरून निघत असते. इतकेंच नव्हे तर या कामांवर १९१८—१९सालीं ८·१ टक्के व्याज पडलें. त्याचा अर्थ असा होतो कीं, पाटपाण्याकडे शंभर रुपये खर्च केले तर दरसाल शंभर रुपयांचें पीक येतें व शिवाय आठ टक्के व्याज पडतें. असें असून आजपर्यंत इंग्रजसरकारनें आगगाड्यांकडे तीनशें साठ कोटी रुपये खर्च केले, पण पाटबंधारे यांजकडे अवघे सत्तर ऐंशी कोट रुपये खर्च केले.

हल्लींचें हिंदुस्थानसरकारचें पाट बंधाऱ्याचें धोरण सन १९०१ ते १९०३ यांच्या दरम्यान बसलेल्या इरिगेशन कमिशननें ठरविलेलें आहे. या कमीशनचें असें म्हणणें आहे कीं, हिंदुस्थानांत जो पाऊस पडतो त्याचा एकअष्टमांश किंवा आठवा हिस्सा देखील पाटबंधाऱ्यांकडे वापरण्यांत

येत नाहीं. एकंदर पावसाचें पाणी पन्नास कोट घनफूट भरतें व त्यापैकीं अवघें सहा कोट घनफूट पाणी हल्लींच्या पाटबंधाऱ्यांत वापरण्यांत येतें. बाकीचें सर्व पाणी समुद्रांत वांया जातें. यापैकीं कांहीं पाणी अद्याप शेतीसाठीं उपयोगी पडण्याजोगें आहे व तें अडवून पाटांतून शेतांत नेऊन सोडलें पाहिजे. यापुढें दरसाल या नव्या होणाऱ्या व झालेल्या पाटबंधाऱ्यांची माहिती प्रांतिक सरकारांनीं लोकांत प्रसिद्ध करावी.

माल उत्पन्न करणारे कारखाने व तयार माल वाहून नेण्याचीं साधनें यांची वाढ हल्लीं स्वस्त सर्पणावर अवलंबून आहे. कारण हीं कामें सध्या बहुधा वाफेनें होतात व वाफ म्हणजे सर्पण होय. जगांत एकंदर सर्व कारखाने मिळून बारा कोटी अश्वशक्ति कामांत गुंतलेली आहे. त्यापैकीं साडेसहा कोटी अश्वशक्ति कारखान्यांत गुंतलेली असून त्यापैकीं दीड कोटी अश्वशक्ति एकट्या विलायत देशांत गुंतली आहे. कानडा देशांत दोन कोटी अश्वशक्ति पाण्यापासून उत्पन्न होण्यासारखी असून त्यापैकीं तेवीस लक्ष अश्वशक्ति हल्लीं कामीं लागलेली आहे. हिंदुस्थानसरकारनें देखील हिंदुस्थानांत पाण्यापासून किती शक्ति निर्माण करण्यांत येण्यासारखी आहे याची पहाणी नुकतीच करविली व त्याबद्दलच्या माहितीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. त्यांच्या मतें हिंदुस्थानांत पाण्यापासून बारा लक्ष अश्वशक्ति निर्माण करतां येईल. हिंदुस्थानांतील सर्व पाऊस फक्त चार पांच महिन्यांत पडतो व शक्तीचा पुरवठा बाराहि महिने सारखा पाहिजे. यासाठीं मोठीं तळीं बांधून हा पाऊस पडतो तेव्हां पडलेलें पाणी सांठवून तें बाराहि महिने पुरवावें अशी योजना हिंदुस्थानांत करावी लागते. या पाण्याच्या शक्तीचा उपयोग म्हैसूर संस्थानांत म्हैसूर सरकारनें व खंडाळ्याच्या घाटांत टाटा कंपनीनें केला आहे. ही शक्ति हिंदुस्थानांत जागोजाग उत्पन्न करतां येण्यासारखी आहे व लोकांनीं व सरकारनें याबाबद झटून मेहनत करून योग्य उपयोग करून घेतला पाहिजे.

हिंदुस्थानसरकारचे ताब्यांत अडीच लाख चौरस मैल जंगल असून त्या जंगलापासून सन १९१८।१९ सालीं सरकारला दीड कोट रुपये उत्पन्न झालें. सरकारी जंगलखातें काय करतें याची दाद सुद्धां लोकांना नाहीं व यासाठीं हिंदुस्थानांतील जंगलांपासून काय उत्पन्न व्हावें, होतें तें

योग्य होतें कीं कसें व होत नसल्यास काय करावें याचें विवेचन करणें कठीण आहे. तथापि हिंदुस्थानांतील कारखान्यांना मालाचा पुरवठा करून जास्त उत्पन्न या जंगलांपासून करतां येईल असें आम्हांस वाटतें. हल्लीं हिंदुस्थानांतील जंगलांतून लोकांना इमारती लांकूड, जळाऊ सरपण, कागदाचा रांधा व तेल वगैरे किरकोळ वस्तु मिळतात. जंगल म्हणजे कांहीं खाण नव्हे. तें एक पीक आहे ही गोष्ट जंगलखात्याच्या अद्याप लक्षांत आलेली दिसत नाहीं. कारण जंगलांची वाढ होण्याऐवजीं जंगलें उजाड झालेलींच जास्त दृष्टोत्पत्तीस येतात. खाणींत माल वाटेल तितके दिवस पडला तरी चालतो पण शेतांतील पीक वेळच्यावेळींच काढलें पाहिजे. पिकाची वरचेवर लागवड व पीक पिकतांच काढणें या गोष्टी कराव्या लागतात; तसें खाणींचें नसतें. ही गोष्ट विसरून जंगलखातें लागवडीकडे व पीक वेळेवर काढण्याकडे लक्ष देतांना दिसत नाहीं.

खाजगी संस्थांना लागवड करून उत्पन्न करण्यासाठीं जंगलें दिलीं तर त्यांची हल्लींच्या पेक्षां जास्त चांगली व्यवस्था राहील. योग्य प्रदेशांत विविक्षित कारखान्यांसाठीं विविक्षित झाडांचीच लागवड व वाढ करण्यांत आली पाहिजे. कागदांचा राधा, आगपेट्या व काड्या, तरवडासारखीं रंगाच्या उपयोगी झाडें यांच्यासाठीं योग्य भाग राखून ठेवले पाहिजेत. अशा भागांजवळ हे कारखाने काढण्यास सवलती दिल्या पाहिजेत. अशा रीतीनें जंगलांची व्यवस्थित मांडणी व राखण करणें, त्यांच्या जोपासनेचें शिक्षण देणें व त्यांपासून दिवसेंदिवस जास्त व कायमचें उत्पन्न होईल अशी तजवीज करणें जरूर आहे. जंगलांची जोपासना वगैरे करण्याचे कामीं सरकारी अधिकाऱ्यांबरोबर प्रांतिक व स्थानीक कमेट्या नेमाव्या. या कमेट्यांनीं आपल्या कामाची माहिती गांवोगांव द्यावी व जंगल म्हणजे एक मोठी सार्वजनिक मिळकत आहे हें सर्वांस पटवून द्यावें. त्याचप्रमाणें या कमेट्यांनीं अमक्या भागांत अमुक लांकूड मुबलक होतें व त्यावर अमुक कारखाना चांगला चालतो हें देखील लोकांच्या निदर्शनास आणून तें जंगल राखणें, त्याची वाढ करणें व त्यावर कारखाना चालविणें हीं कामें खाजगी संस्थांकडे सोंपवावीं. दरसाल कोणत्या जंगलांत, कोणत्या वस्तूचें किती उत्पन्न झालें याचा आंकडेवार

तपशील प्रसिद्ध करावा म्हणजे याबाबद योग्य खबरदारी व काळजी घेण्यांत येते अगर कसें इकडे लोकांचें लक्ष राहील.

हिंदुस्थानांत पूर्वीं खाणी पुष्कळ ठिकाणीं होत्या व त्यांतून हिंदुस्थानास लागणारीं सर्व खनिज द्रव्यें पुरविलीं जात. इंग्रजी राज्य झाल्यापासून या खाणी सर्व बंद पडल्या. लोकांना अवश्य त्या सवलती न दिल्यामुळें या खाणी बंद पडल्या व त्यानंतर युरोपीय कंपनीला त्याच सवलती देऊन या खाणी वहिवाटीस देण्यांत आल्या. कोलारची सोन्याची खाण, अजमीरजवळील तांब्याची खाण, ब्रह्मदेशांतील राकेलची खाण याप्रमाणें बंद पाडण्यांत येऊन नंतर युरोपीय कंपन्यांच्या मार्फत हल्लीं चालत आहेत. हिंदी लोकांना याबाबद जगांत काय सुधारणा झाल्या याचा मागमूसच लागूं देण्यांत येत नाहीं. यामुळें हिंदुस्थानांत सुरू असलेले तुरटी, पुष्कळ क्षार, मोरचूत, हिराकस, तांबें, शिसें, लोखंड, पोलाद, सोरा, व सवागी यांचे कारखाने बंद पडले आहेत. कित्येक कारखान्यांना उपद्रव्यें करण्याची परवानगी नाहीं म्हणून ते बंद पडले आहेत. उदाहरणार्थ तांबें काढतांना तेजाब करणें, साखर करतांना मळीची दारू करणें वगैरे. हिंदुस्थानासारख्या विविध व अफाट देशाचें खाणींचें उत्पन्न १९१७ सालीं अवघें पंधरा वीस कोटी रुपयांचें होतें. याच सालीं कानडांत साठ कोटी, जपानांत सत्तर कोटी व अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत सातशें कोटी रुपयांचीं खनिज द्रव्यें काढण्यांत आलीं. हिंदुस्थानांतील खाणींतून १९१७ सालीं खालील द्रव्यें निघालीं. यांत इंग्रज कंपन्यांनींच पुष्कळ काढलेलीं आहेत.

दगडी कोळसा	सात कोटी
सोनें	साडेतीन कोटी
नीललोह (मांगानीज)	दोन कोटी
राकेल	दोन कोटी
मीठ	एक कोटी

यांत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, समुद्रवेष्टित हिंदुस्थानांत इंग्लंडांतून दोन कोटी रुपयांचें मीठ आणावें लागलें. तें सुद्धां येथें भरपूर काढलें नाहीं.

हिंदुस्थानसरकारनें व त्याचप्रमाणें हिंदी पुढाऱ्यांनीं हिंदुस्थानांत खाणींचा धंदा वाढविण्याचा कांहींच प्रयत्न केला नाहीं. हिंदुस्थानसरकारनें हिंदी भूगर्भ व भूस्तर शास्त्रांची माहिती गोळा केली आहे; पण ती

सामान्य लोकांना समजेल अशी कोठेंच उपलब्ध नाहीं. मग लोकांना त्यांत गोडी वाटेल, त्या ज्ञानाचा उपयोग करून दाखविण्यास वाव मिळेल, आपण अमुक करूं असा हुरूप येईल अशा रीतीनें ती शिकविणें तर लांबच राहिलें. हिंदी खाणी खाजगी व्यक्ति किंवा कंपन्यांनीं चालवाव्या पण त्यांची मालकी सार्वजनिक असावी अशी तजवीज झाली पाहिजे. प्रत्येक प्रांतिक सरकारला त्या त्या प्रांतांतील खनिज द्रव्य त्या त्या प्रांतांतील लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीनें मोकळेपणें काढण्याची व विकण्याची परवानगी पाहिजे. जपानी सरकारनें पुष्कळशा खाणी पहिल्यानें नमुना म्हणून स्वतः चालवून दाखविल्या. त्यांत त्यांनीं परदेशीय भूगर्भज्ञ व खनिज शास्त्रज्ञ कामास लावले व त्या नीट चालल्यावर लोकांकडे, जपानी खाजगी कंपन्यांकडे वहितीस दिल्या. खाणींच्या कामाचें सर्व प्रकारचें ज्ञान मिळण्यासाठीं त्याच्या शाळा व कॉलेजें पाहिजेत. त्यांत खाणसंबंधीं तात्त्विक, शास्त्रीय व व्यावहारिक ज्ञान देण्यांत यावें. तूर्त दोन तरी असलीं कॉलेजें मध्यप्रांत व बहारमध्यें पाहिजेत. त्याचप्रमाणें वऱ्हाड बहार, वगैरे भागांत खाणींचें ज्ञान देणाऱ्या शाळा जिल्होजिल्हीं पाहिजेत. याबाबद एक विस्तृत व व्यवस्थित योजना करून ती अमलांत आणली पाहिजे. प्रत्येक प्रांतांत एक खाणींचे खातें पाहिजे व त्या खात्याला एक एक हिंदी प्रतिनिधींचें सल्लागार मंडळ पाहिजे. याबाबद मध्यवर्ती सरकारनें परदेशची माहिती गोळा करणें व देशाची सूक्ष्म पहाणी करणें हीं कामें हातीं घ्यावीं. स्थानिक सविस्तर माहिती देणारी लहान लहान चोपडीं व त्या खाणी कशा चालवाव्या याची माहिती देणाऱ्या तज्ञांच्या कचेऱ्या प्रांतिक सरकारांनीं काढाव्या. हिंदुस्थानांतून परदेशीं अशुद्ध धातू पाठविण्यापेक्षां ती शुद्ध करण्याचे कारखाने काढावे. याप्रमाणें तांब्याचे कारखाने कानडांत आहेत व जस्ताचे कारखाने आस्ट्रेलियांत आहेत व नीललोह (मांगानीज) चे कारखाने हिंदुस्थानांत हवेत.

हिंदुस्थानांत एकंदर किती प्रकारचे कारखाने काढतां येतील याची पहाणीच अद्याप केलेली नाहीं. यासाठीं हिंदी लोकांचें एक मंडळ नेमून सर्व देशाची पहाणी केली पाहिजे. मुख्य चालण्यासारखे सहज

दिसणारे धंदे म्हणजे मीठ, मासे, मृगया, हे होत. हिंदुस्थानास पुरून उरेल इतकें मीठ हिंदुस्थानांत पैदा होण्यास कोणतीच अडचण नसावी. त्याचप्रमाणें मासे हिंदुस्थानच्या नद्यांत, तलावांत व समुद्रांत वाटेल तितके व वाटेल तसले निपजविण्यास काय हरकत आहे ? अशा रीतीनें अन्नाचा एक मोठा पुरवठा होणार आहे. तसेंच हिंदी जंगलांत इतक्या प्रकारचे पक्षी व प्राणी मिळतात कीं, त्यांची योग्य जोपासना व शिकार हा एक धंदा किंवा कारखाना होऊं शकेल. हल्लीं हरणांचा व माकडांचा तर भलताच सुळसुळाट होऊन त्यापासून लोकांस त्रास होत असतो.

हिंदुस्थानदेश हा एक बेट आहे म्हटले तर अतिशयोक्ति होणार नाहीं. जमीनीच्या अंगास जिकडे हा देश दुसऱ्या देशांना लागलेला आहे तिकडे उंच व दुर्लंघ्य डोंगर अगर वाळवंट व जंगल असल्यानें त्या बाजूंनीं हिंदुस्थानांत फारशी रहदारी नाहीं. यासाठीं परदेशाशीं हिंदुस्थानाचा सर्व व्यवहार समुद्रांतून गलबतें वगैरेंच्या मार्फत होतो. हा व्यवहार सन १९१३।१४ सालीं दोन कोट टनांचा होता तो सन १९१७।१८ सालीं एक कोट टनांवर आला; पण याच चार सालांत कानडाचा व्यवहार तीन कोटी टनांवर गेला व या फरकाचें कारण हिंदुस्थानचीं स्वतःचीं गलबतें अगर आगबोटी नाहींत हें होय. हिंदुस्थानच्या समुद्र किनाऱ्याची लांबी साडे-चार, पांच हजार मैल आहे व असें असून इतक्या विस्तारांत फक्त सहा सात चांगलीं बंदरें आहेत व आगबोटी तर सर्व परदेशी आहेत. परदेशांत बांधलेल्या पण हिंदुस्थानच्या मालकीच्या अशा आगबोटी शेंकडा एकदोन सुद्धां नाहींत. यासाठीं हिंदुस्थानांत आगबोटी बांधल्या पाहिजेत व हिंदी लोकांनीं परदेशी आगबोटी खरेदी केल्या पाहिजेत व त्यांतून व्यवहार केला पाहिजे. सन १८५० सालीं हिंदी लोकांचीं चौतीस हजार गलबतें होतीं व त्यांतून दरखेपेस साडेबारा लक्ष टन माल जात असे. सन १९०० सालीं ही संख्या तीन हजारांवर येऊन तींतून फक्त एक लाख टन माल जाऊं येऊं लागला व आज पंचवीस वर्षांत हा व्यवहार इतका कमी झाला आहे कीं, हिंदुस्थानांत हल्लीं स्वदेशी गलबतांचा व्यवहार नाहींच म्हटलें तरी चालेल. सरकारनें हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं गलबतें व आगबोटी बांधण्याचे स्वतःचे कारखाने काढले पाहिजेत. परदेशांतून

भाग आणून येथें नुसतें जोडण्याचें काम चाललें तरी कितीतरी लोकांना पोटाचा उद्योग मिळेल.

आस्ट्रेलियानें खाजगी गलबतें विकत घेतलीं, गलबतें बांधण्याचा स्वतःचा कारखाना काढला आणि सर्व गलबतें बांधण्याचे देशांतील कारखाने आपल्या नजरेखालीं घेतले. जपाननें तर गलबतें बांधणें व लोखंड व पोलादाचे कारखाने स्वतःचे काढले. हिंदुस्थानांत जसें या कारखान्यांना लागणारें सामान मिळतें तशी देखील स्थिति जपानची नाहीं. तरी आगबोटी बांधण्यांत जपाननें कितीतरी प्रावीण्य मिळविलें आहे. कानडा व संयुक्त संस्थानें यांत तर हें आगबोटी बांधण्याचें काम विलक्षण झपाट्यानें चाललें आहे. आस्ट्रिया, जर्मनी, फ्रान्स, अमेरिका व जपान या देशांचा हिंदुस्थानाशीं व्यापार त्यांच्या स्वतःच्या गलबतांतून चालत असे. स्थानिक सरकारें व प्रांतिक सरकारें यांनीं आपल्या सोईप्रमाणें याबाबद कारखाने काढणें व बंदरें तयार करणें यांकडे लक्ष घातलें पाहिजे.

हिंदुस्थानांत सन १९१७।१८ सालीं छत्तीस हजार मैल आगगाडीचा रस्ता असून त्यापैकीं अठरा हजार मैल साडेपांच फुटी रुंद रस्ता होता. या रेलवे बांधण्यांत सरासरी चारशें कोट रुपये खर्च झाले असून त्यावर सरासरी सात टक्के व्याज पडतें. हल्लींचा रेलवेचा व्यवहार अत्यंत असमाधानकारक आहे. जीवित व माल यांच्या सुरक्षिततेबद्दलच्या कलमांत पुष्कळ फेरफार केले पाहिजेत. रेलवे कंपन्यांना पुष्कळ बाबींबद्दल नुकसान भरपाई करून द्यावी लागली पाहिजे. हल्लीं प्रचारांत असलेल्या 'रिस्कनोट' प्रमाणें व्यवहार जगांत कोठेंहि चालू नाहीं. रेलवे भाड्याचे दर हल्लीं माल बाहेर जाण्याच्या सोईचे आहेत, ते बदलून टाकले पाहिजेत. व हे भाड्याचे दर हिंदी लोकांच्या संमतीनें ठरविले पाहिजेत. मालकी संबंधानें म्हटलें तर हिंदुस्थानांतील रेलवे बहुतेक सरकारी किंवा राष्ट्रीयच आहेत. रेलवेचा व्यवहार कंपन्यांकडे न सोंपवितां हिंदी सरकारी प्रतिनिधीकडे सोंपविला तर खर्च पुष्कळ कमी होऊन ती एक सरकारच्या उत्पन्नाची बाब होईल. हल्लीं नफ्याचा हिस्सा कंपनीला व्यर्थ द्यावा लागतो तो तितका वांचेल.

रेलवेच्या कारखान्यांचा उपयोग वर्ण वगैरेंकडे लक्ष न देतां मुकदम, यंत्रज्ञ यांच्या शिक्षणाकडे सर्रास झाला पाहिजे. रेलवे बोर्डांत निम्यापेक्षां

जास्त लोक हिंदी व्यापारी पाहिजेत. रेल्वेंतील गरीब प्रवाशांना अन्न वगैरे सोई अधिक सवलतीनें व ठरीव नियमांप्रमाणें मिळाल्या पाहिजेत. रेल्वेला लागणारें सर्व सामान हिंदुस्थानांत तयार करावें व हिंदुस्थानांत विकत घ्यावें.

गेल्या पंचवीस वर्षांत मोटारी ही नवीनच वाहनें उपलब्ध झालीं आहेत. या बाबींत संयुक्त संस्थानांत विलक्षण उत्क्रांति झाली आहे. त्या ठिकाणीं दररोज लाखों मोटारी तयार करण्यांत येतात व त्यांचीं यंत्रें तर भलतींच स्वस्त आहेत. अमेरिकेच्या पश्चिमकिनाऱ्याकडे तर जनावरें दिसत नाहींशीं झालीं आहेत. नांगरापासून विमानापर्यंत अनेक कामांत मोटारयंत्रें वापरतात. दर आठ माणशीं एक मोटार इतका तेथें मोटारींचा प्रसार झाला आहे. सन १९२० सालीं संयुक्त संस्थानांत शहात्तर लक्ष मोटारी होत्या व सगळ्या युरोपांत पांच लक्ष मोटारी होत्या. हिंदुस्थानांत तर त्यांची संख्या फारच थोडी होती. हिंदुस्थानांत देखील मोटारी करण्याचे कारखाने सुरू करून हिंदी प्रमुख व्यापाऱ्यांच्या सल्लयानें राकेल तेलावरील जकात बसविली तर हिंदुस्थानांत मोटारींचा प्रघात पुष्कळ वाढेल. सरकार योग्य सवलती देईल तर मोटारींचे हिंदी कारखाने आज सुरू होतील.

येत्या दहा वीस वर्षांत हल्लींच्या मोटारीप्रमाणें विमानें ही रोजच्या व्यवहाराची गोष्ट होऊन बसेल. यासाठीं हिंदी लोकांना विमानें तयार करण्याचें व चालविण्याचें शिक्षण आतांपासून दिलें पाहिजे. इतर राष्ट्रांच्या मागें हिंदुस्थानानें रहातां कामा नये. या बाबींत हिंदुस्थानाला पुष्कळ सोई आहेत व त्यांचा योग्य उपयोग मनःपूर्वक केला पाहिजे.

व्यापार उदीम वाढण्यासाठीं रस्ते चांगले असावे लागतात. हिंदुस्थानांत एकंदर दोन लाख मैल रस्ते आहेत. त्यापैकीं पंचावन हजार मैल खडी घातलेले असून एक लक्ष पंचेचाळीस हजार मैल रस्ते बिनखडीचे आहेत. सन १९१७।१८ सालीं रस्त्यांकडे खालील रकमा खर्च झाल्या.

लष्करचे सोईसाठीं लष्करी रस्ते	पन्नास लाख रुपये
अनेक प्रांतांना जोडणारे मोठे रस्ते	सहा लाख रुपये
अनेक जिल्ह्यांना जोडणारे लहान रस्ते	बावन्न लाख रुपये
जिल्ह्याच्या जिल्ह्यांतील रस्ते	दहा लाख रुपये

अनेक प्रांतांना जोडणाऱ्या मोठ्या रस्त्यांखेरीज बाकीचे सर्व रस्ते स्थानिक बोर्डांच्या ताब्यांत द्यावे. अनेक जिल्ह्यांना जोडणाऱ्या रस्त्यांबाबद या स्थानिक बोर्डांना प्रांतिक दळणवणाच्या बोर्डांनीं सल्ला द्यावा व इतर प्रांतांशीं यांनीं पत्रव्यवहार करून एक शिस्त ठेवावी. अनेक प्रांतांना जोडणारे रस्ते या प्रांतिक बोर्डांच्या ताब्यांत असावे. खेडेगांवास जोडणाऱ्या गाडीवाटा ग्रामसंघांच्या ताब्यांत द्याव्या. शेतांतून गांवांत माल आणण्यासाठीं लागणारे नवे रस्ते ग्रामसंघांनींच तयार करावे. लोकांना थोडें प्रोत्साहान व मदत केली तर लोक कामें चांगलीं करतील.

हळूहळू असे दिवस येत आहेत कीं, ज्या दिवसांत बैलगाडीचा प्रवास म्हणजे मोठा कंटाळवाणा वाटेल. यासाठीं चांगले रस्ते असणें एक अवश्य गोष्ट होईल. माल वाहून नेण्यास दोनचाकी बैलगाड्यांपेक्षां चारचाकी हलके गाडे जास्त सोईचे होतील व डोक्यावरून भारे आणण्यापेक्षां एक-चाकी ढकलगाडीनें माल नेणें अधिक फायदेशीर होईल व असल्या गाड्यांना हातभर रुंदीचे रस्ते पुरतील. या गाड्या बागाइतांच्या मधल्या बांधानें जातील. पुष्कळ नाल्यांवर पूल नाहींत. प्रत्येक जिल्ह्यांत कोठे पूल पाहिजेत याबद्दलची माहिती गोळा करून हे पूल बांधण्याची एक योजना तयार करावी. आणि स्थानिक बोर्डानें दरसाल या कामाकडे विविक्षित रक्कम खर्च करण्याचें ठरवावें.

हिंदुस्थानांत पाटांतून नावा जातील अशी सोय फारशी होण्यासारखी नाहीं. मात्र पूर्वबंगाल, ब्रम्हदेश व सिंध या प्रांतांत अशी कांहीं योजना करतां येईल. मद्रास इलाख्यांत कांहीं भागांत असें करतां येण्यासारखें आहे. यासाठीं कोणत्या सोई आहेत व त्यांत कोणत्या सुधारणा करतां येतील याची चौकशी करून निर्णय करण्यास व तो अमलांत आणण्यास एक नाविक मंडळ नेमावें व त्याजकडे हें काम सोंपवावें.

ज्या ठिकाणीं नावांतून माल नेण्याआणण्याची कांहीं सोय आहे अगर होती तेथें आगगाड्या होऊन आगगाडीच्या हलक्या दरामुळें ही व्यवस्था मोडली आहे. याप्रमाणें गुजराथच्या किनाऱ्याचा सर्व जहाजांचा व्यापार मोडलाच आहे व तीच स्थिति कराची ते मुलतान व कलकत्ता ते अलाहा-बाद ऊर्फ प्रयागची आहे. अशा व्यवस्थेमुळें लोकांचें दुहेरी नुकसान

होतें. (१) यामुळें एकाच रस्त्यावर मालाची गर्दी होते व (२) लोकांत नवीन मार्ग काढण्याची धमक नाहींशी होते. या धमकीमुळेंच जगांत कितीतरी सुधारणा घडून येतात. वेळोवेळीं जरूर त्याप्रमाणें रस्त्यांत सुधारणा न केल्या तर शहरांत एकवटलेला सर्व व्यवहार एकाच मार्गांत चोंदून जातो. यासाठीं कडक असे रस्ते, जमीनीच्या आंतून व वरून जाणाऱ्या आगगाड्या, ट्रामवे व मोटारगाड्या व जनावरांच्या गाड्या या साधनांचा मोठ्या शहरांतून भरपूर पुरवठा पाहिजे. मुंबई व कलकत्ता या दोन शहरांत जमीनीखालून चालणाऱ्या आगगाड्यांची अवश्यकता भासते. याबाबद कलकत्त्यासाठीं एक योजना केली असल्याचें ऐकिवात आहे. त्याचप्रमाणें पुणें, सोलापूर, अमदाबाद, नागपूर वगैरे शहरांतून आसपास जाणाऱ्या आगगाड्या पाहिजेत म्हणजे मजुरांना खेडेगांवांत मोकळ्या हवेंत राहून शहरांत आपल्या धंद्यापुरतें जातां येतां येईल. या योजना मोठ्या खर्चाच्या असून धंदे व कारखाने यांची पुष्कळ वाढ होईपर्यंत अमलांत येणाऱ्या नाहींत. देशांत लोखंडांचे कारखाने पुष्कळ होऊन लोखंडी सामान व यंत्रें येथें तयार होऊन वाटेल तशीं व स्वस्त मिळूं लागलीं म्हणजे या सुधारणा तेव्हांच होतील.

हिंदुस्थानांत टपाल, तार व बोलणारीं यंत्रें यांची वाढ पुष्कळ करतां येण्यासारखी आहे. यासाठीं हीं कामें सरकारनें खाजगी कंपन्यांना करूं दिलीं पाहिजेत. व्यापाराच्या नफानुकसानीच्या बाबी, विकतां येणाऱ्या सुख-सोईच्या बाबी, सरकारनें खाजगी मंडळ्यांकडूनच करवाव्या म्हणजे त्यांत चढाओढ राहून लोकांच्या सुखसोईकडे योग्य लक्ष पुरविण्यांत येतें. मात्र स्थानिक अधिकारी व सरकारी संस्था यांची या कामावर देखरेख पाहिजे.

सगळ्यांत अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे हिंदुस्थानांतील लोकांची अक्कल व शक्ति यांचा सार्वजनिक कामाकडे उपयोग करणें ही होय. इतर सर्व सुधारणांपेक्षां या गोष्टीची सुधारणा अत्यंत महत्त्वाची व अत्यंत निकडीची आहे. हिंदुस्थान देशाची सुधारणा घडवून आणण्याच्या कामीं सर्वथैव हिंदी अक्कल व शक्तीच वापरण्यांत येईल अशी शक्कल काढली पाहिजे. येत्या दहावीस वर्षांत कायद्यानें स्थानिक संस्थांवर या गोष्टीचा बोजा घालून हें काम करावें लागेल. स्थानिक प्रमुख व्यापारी

व पुढारी माणसें यांना एकत्र करून त्या त्या प्रदेशांतील गोष्टी जुटीनें करणें कायद्यानें भाग पाडलें पाहिजे. उदाहरणार्थ, एका जिल्ह्यांत खाणी संबंधीची संस्था स्थापावी, दुसऱ्यांत पाणी पुरवठ्यासाठीं, तिसऱ्यांत पाटबंधाऱ्यासाठीं, चवथ्यांत रेलवेसाठीं, पांचव्यांत विजेच्या पुरवठ्यासाठीं, सहाव्यांत मोटारयंत्रासाठीं, कोठें जंगलसुधारणेसाठीं, कोठें लोकोपयोगी कामासाठीं, कोठें पाणचक्क्यांसाठीं व कोठें विवक्षित धंद्यांसाठीं कमेट्या नेमाव्या, त्यांना अधिकार द्यावे, पैसे पुरवावे व कामें करणें व चालविणें भाग पाडावें. या कामासाठीं लागणारें भांडवल व मजूर तेथीलच लावावे. त्या भागांतील तरुण, उत्साही व धनिक पदवीधरांकडून हीं कामें कंत्राटानें करवावीं. याप्रमाणें जरूर तें शिक्षण देऊन एकदां कामें करण्याची संवय लागली, गोडी उत्पन्न झाली म्हणजे लोक हीं कामें करण्यास शिकतील व कामें करण्यास योग्य होतील. अशा तऱ्हेची शक्य तितकीं कामें प्रत्येक जिल्ह्यांत काढलीं पाहिजेत, चालविलीं पाहिजेत म्हणजे हें एक उत्तम व्यावहारिक शिक्षण होईल. अशा तऱ्हेची शिक्षणाची सोय केल्याशिवाय यापुढें एक दिवस देखील वाया जातां उपयोगी नाहीं.

वर सांगितलेलीं कामें करण्याचे तीन प्रकार आहेत. (१) निव्वळ खाजगी व्यक्ति किंवा संस्थांकडून, (२) खाजगी व्यक्ति व सरकारी अधिकारी यांच्या सहकार्यानें व (३) निव्वळ सरकारी नोकरांच्या मार्फतीनें. या कामांसाठीं लागणारे मजूर, भांडवल व सूत्रधार मिळविले पाहिजेत. हल्लींच्या मोठ्या कारखान्यांतून मजूर व पैसे यांच्या इतकेंच सूत्रधारत्वाचें महत्त्व आहे व या कामाचें शिक्षण पुष्कळ हिंदी लोकांना पाहिजे आहे. कांहीं पाट, जंगल, रेलवे, ट्रामवे, वीज वगैरे कारखान्यांना लागणारें भांडवल स्थानिक लोकांकडून उसनें म्हणून उभारतां येईल. हिंदी मजुरांना लोक कितीहि नांवें ठेवोत पण ही गोष्ट सिद्ध आहे कीं, हिंदी मजुरांना जर योग्य शिक्षण दिलें व त्यांच्यांत योग्य नियमितपणा आणला तर सगळ्या कामांना पुरेसे मजूर व कारागीर हिंदुस्थानांत मिळूं शकतील.

प्रत्येक प्रांतांत त्या प्रांतांतील परंपरेचा उपयोग करणारें एक मंडळ नेमावें. प्रत्येक प्रांतांत होणाऱ्या सुधारणेच्या कामावर वरिष्ठ अधिका-

त्यांच्या बरोबर तज्ञ व खाजगी लोक यांची सांगड ठेवावी, व या सांगड-कमेटीमार्फत सर्व कामें व्हावीं. या कमेट्यांची एकी करण्यासाठीं एक प्रांतिक मंडळ व त्यावर एक मध्यमवर्ती मंडळ निवडावें. या मंडळानें नेहमीं नव्या योजना, सुचवीत व अंमलांत आणीत असाव्यात. अगदीं फारच मोठें काम असलें तर तें सरकारी अधिकारी यांचे हस्तें अगर यांचे देखरेखीखालीं व्हावें. साधारण अशीं सर्व कामें स्थानिक माणसें यांच्या मदतीनें स्थानिक संस्थांनींच करून घ्यावीत. याप्रमाणें स्थानिक भांडवल, स्थानिक मजूर व स्थानिक संस्था यांच्या मार्फत पुष्कळ गोष्टी करतां येऊन नवीन उत्पन्नाच्या बाबी निर्माण करतां येतील. ही सुधारणा व शिक्षणपद्धति सर्वांत अत्यंत हितकर व कल्याणप्रद होईल. यायोगें लोकांत धमक, आत्मविश्वास व उत्साह वाढेल व याचा परिणाम पूर्ण स्वराज्य संपादनांत दृष्टोत्पत्तीस येईल.

प्रकरण अकरावें

सामाजिक सुधारणा

प्रत्येक इसमाला नवीन स्वराज्यांत नागरिक या नात्यानें आपलें काम नीट व मनापासून करतां यावें म्हणून हिंदी समाजाची हल्लींची रचना थोडीफार बदलली पाहिजे व तिचा विचार या भागांत करावयाचें योजिलें आहे. या सामाजिक सुधारणा करण्यापूर्वी निरनिराळ्या समाजांत कोण-कोणत्या योजना व चाली आहेत व त्यांचा त्या समाजावर बरावाईट काय परिणाम झाला हें पाहून मग त्यांपैकीं परिस्थिति व परंपरा यांना अनुरूप अशा चांगल्या सुधारणा मात्र उचलल्या पाहिजेत. याबाबद सुभाषित-कारांचा खालील श्लोक नीट विचारपूर्वक मनन करण्यासारखा आहे.

पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि सर्वं नवमित्यवद्यं ॥
संतः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ॥

जुनें म्हणून जें तें सर्वच चांगलें असें नव्हे; त्याचप्रमाणें केवळ नवीन म्हणूनच एखादें चांगलें असेंहि नव्हे. विचारी माणसें नीट पारख करून चांगलें तें स्वीकारीत असतात; परंतु वेडे लोक मात्र लोक करतात म्हणून त्यांचें अनुकरण करीत असतात. संयुक्त संस्थानांनीं दारूची पूर्ण हकालपट्टी केली आहे व दुसरे देश तसेंच करीत आहेत. आपलें शास्त्रहि दारू पिऊं नये असें म्हणतें तरी केवळ व्यक्तिस्वातंत्र्य म्हणून देशांत दारूला गोंधळ घालूं देतां कामा नये, किंवा स्त्रीपुरुष संबंधाचें उपयुक्त ज्ञान सर्व देशांत फैलावत आहे व त्यामुळें व्यक्तिस्वातंत्र्याच्या नांवाखालीं वाटेल तसा गोंधळ घालण्यांत येत आहे; किंवा भीक मागण्याची बंदी करण्यासाठीं पाश्चात्यांत अनेक कायदे करून अनाथ–पोषण हें एक सरकारी खातेंच झालें आहे व त्याचा खर्च सालोसाल वाढत असून अनाथत्व बंद होत नाहीं वगैरे गोष्टींचे परिणाम पाहून इष्ट तित-क्याच सुधारणा आपण स्वीकारल्या पाहिजेत. ‘उपायं चिंतयन्प्राज्ञः

अपायमपि चिंतयेत् ' उपायांचा विचार करतांना त्यापासून कोणते अपाय होतील याचा देखील विचार अवश्य केला पाहिजे. हट्टानें कोणत्याहि गोष्टीला चिकटणें, आग्रहानें कोणतीहि गोष्ट करणें बरोबर नाहीं हें जाणून योग्य तें केलें पाहिजे.

हिंदुस्थानांतील लोकांची हल्लींची स्थिति लक्षांत घेतां—

संसार दुःखा येवढें दुःख । लोकत्रयीं असेना ॥ दासबोध.

असेंच त्यांस वाटणें साहजीक आहे. आयुष्य क्षणभंगुर असून हें दुःख फार वेळ टिकणारें नाहीं व दुसऱ्या लोकीं या दुःखाचा वचपा निघेल अशी आशा करणेंच या लोकांना सुखकारक व सोईचें आहे. परंतु प्राचीन काळीं जेव्हां देशाची निराळी स्थिति होती तेव्हां या वेदांत तत्वाचा या देशांत इतका पसारा नव्हता.

अजरामरवत्प्राज्ञो विद्यां वित्तं च साधयेत् ।
क्षणशः कणशश्चैव विद्यां वित्तं च साधयेत् ॥
द्वाहुडाविवयुध्येते पुरुषार्थौ समासमौ ।
आत्मीयश्चान्यदीयश्च जयत्यतिबलस्तयोः ॥
प्राक्तनश्चैहिकश्चैव शाम्यत्यत्राल्प वीर्यवान् ।
बलादधस्पदीकार्या प्रत्यक्षादधिकानसा (चिंता)॥

हीं त्या वेळचीं ब्रीदवाक्यें होतीं. संसार करतांना माणसानें मी अमर आहे, मी अजर आहे असें समजावें. क्षणक्षणानें विद्या व कणाकणानें द्रव्याचा संचय करीत असावा. आपला प्रयत्न व दुसऱ्याचा प्रयत्न हे दोन एडके आहेत. त्यांत जो जास्त जोरदार असेल तो जिंकील. पूर्वजन्मींचें कर्म व आज आपण करतों तें कर्म यांत जें कमजोर असेल त्याचा नाश होईल. प्रत्यक्षापेक्षां भवितव्यता जोरदार आहे अशी काळजी करणें वाईट आहे. या बुद्धीला बलात्कारानें ढकलून खालीं पाडली पाहिजे इत्यादि. जन्मतः मनुष्य प्रयत्नवादी असून त्याची हिम्मत कमी झाली म्हणजे तो प्रारब्धवादी होतो. हल्लींची जी आपली हिंदी लोकांची समजूत आहे तिनें मनुष्य गारठून जातो, त्याचा उत्साह नाहींसा होतो, आनंद मावळतो व तो हताश होतो. उष्ण हवेमुळें

नाड्या ढिल्या होणें, पोटभर अन्न न मिळणें यामुळें शरीरांत ताकद नाहीं व अशक्ततेमुळें दैववादीपणा अशी ही हल्लींची कार्यकारण परंपरा आहे.

कित्येक लोक अविभक्त कुटुंबपद्धतीमुळें माणसें पोशीं होतात असें म्हणतात; कित्येक लोक फाजील संततीनें दारिद्र्य आलें असें म्हणतात; पुनर्विवाहाची चाल नसल्यामुळें घरचा कर्ता पुरुष मेला तर बायकामुलांचे हाल होतात असें कांहीं म्हणतात; लहानपणीं लग्नें केल्यानें संसाराची बेडी पडून उत्साह नाहींसा होतो असें कित्येक मानतात; अस्पृश्यतेमुळें, रोटीबेटी व्यवहार होत नाहीं म्हणून द्वेषबुद्धि वाढते असें कोणी सांगतात; भिक्षा मागणें कायद्यानें बंद करून प्रत्येकाला कांहीं तरी काम करणें भाग पाडावें असें कांहीं सुचवितात; श्रीमंतांचा आळस घालवून व चैन बंद करून त्यांना कामाला लावावें असें कांहीं सांगतात; आंधळे, पांगळे, रोगी, वेडे वगैरेंची ब्याद काढून टाकावी असें कित्येकांना वाटते; अनाथांसाठीं जिकडे तिकडे जेवणखाण, कपडे व सुखसोईची व्यवस्था केली पाहिजे असें कांहीं प्रतिपादन करतात; फुकट शिक्षण, फुकट औषधपाणी, वगैरे सोई अगोदर चोहोंकडे हव्या असें कांहीं म्हणतात. याप्रमाणें हिंदुस्थानचें दारिद्र्य व दुःख घालविण्यास अनेकांनीं अनेक उपाय सुचाविले आहेत. पण बारीक विचाराच्या कसोटीला यांपैकीं एकहि उतरत नाहीं. या सर्वांत अंशतः सत्य असेल पण पूर्ण सत्य यांपैकीं एकांतहि नाहीं हें निर्विवाद आहे व यासाठींच पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तरेकडील सर्व समाजांचें निरीक्षण करून चांगलें तेंच घ्यावें असें वर सुचविलें आहे.

हिंदुस्थानांतील लोकांना याप्रमाणें संसार हा बोजा वाटत असतांना पाश्चात्य लोकांत रगड उत्साह व अत्यंत चळवळ आहे. जगांत हजारों सुधारणा आम्हीं घडवून आणणार व यासाठीं व्यक्ति व संघानें प्रत्यक्ष काम करून दाखविणार अशी उमेद त्यांना आहे. हिंदुस्थानांत सुद्धां स्वराज्याचे मंद वारे वाहूं लागले, एकीची जरा ऊब लागली, यशाचे जरा अंकुर फुटले, परमेश्वरभक्तीचा ओलावा लागला व शिक्षण व विचारविनिमयाचें पाणी मोकळें सर्वत्र खेळूं लागलें म्हणजे ही स्थिति पार पालटेल. दाट सावली, मंद वारा, शितळ पाणी यांच्या मदतीनें हिंदी

लोकांना कामें करण्याची उमेद येईल, त्यांच्या हातून अनेक गोष्टी होतील, सगळ्या जगाचे डोळे हिंदुस्थानाकडे लागतील व त्याचें सर्वजण कोडकौतुक करतील असें आम्हांस वाटतें. मुख्य उणीव स्वराज्य व त्यांत मिळणारे कामें करण्याचे प्रसंग व वाव यांची आहे असें म्हणतां येतें.

हिंदी लोकांना संसार हा एक मोठा बोजा वाटतो इतकेंच नव्हे, तर हा बोजा सहन करण्याचें त्यांचें सामर्थ्य अनेक मतमतांतरामुळें छिन्नभिन्न झालेलें आहे. हिंदी खांबांतील या मतमतांतराच्या भेगा अनेक बाजूनें गेल्या असून या खांबाला बाहेरून आवळून धरणारी स्वराज्याची पट्टी काढून टाकलेली आहे. हिंदी लोकमताचा पारा स्वराज्याच्या बाटलींत घातला, हिंदी चाकाला स्वराज्याची धांव घातली म्हणजे हें वाटेल तो बोजा सहन करण्यास समर्थ आहे. कोणत्याहि देशांत पाहिलें तरी जन्म, संपत्ती, धंदा वगैरेवर उच्चनीच भाव आहेतच.

वयोजाति कर्म वित्त विद्यामान्य स्थानानि ।

वय, कूळ, धंदा, द्रव्य व ज्ञान यांवर जगांतील प्रत्येक देशांतील लोकांत भेगा पडलेल्या असतातच. कोणी खालीं, कोणी वर, कोणी श्रेष्ठ, कोणी कनिष्ठ, कोणी धनी, कोणी ताबेदार, कोणी लहान, कोणी मोठा, असे भेद सगळीकडेच असतात व या सर्वांना अनुसरून रोटीबेटी व्यवहार वगैरे सर्व देशांत आहेतच. मात्र एकाच जातींत वंशपरंपरा एकच धंदा व त्या धंद्याला अनुसरून आचार, विचार, पोषाक वगैरेंची मर्यादा इतर देशांत हल्लीं नाहीं व ही मर्यादा आमच्याच देशांत काय म्हणून? असें, ही मर्यादा चांगली कां वाईट याचा सारासार विचार न करतां, प्रत्येक जण विचारतो. या उच्चनीचपणामुळें आमचें स्वराज्य गेलें म्हणणें म्हणजे हिरवा अंगरखा घातल्यामुळें मला डाव येत नाहीं असें म्हणण्यासारखें वेडेपणाचें आहे. या मर्यादांचा अतिरेक करणें, जगांत काय चाललें आहे याचा विचार न करतां या मर्यादांचा आग्रह धरणें, या मर्यादांतच सर्व काय तें आहे असें समजणें हें वेडेपण होय. राष्ट्रीय सुस्थिति असावी, सर्व व्यवहार सुयंत्रित चालावे, कामें व ऐपती यांची वांटणी नीट व्हावी म्हणून हीं

साधनें आहेत व देश, काल, परिस्थिति यांना अनुसरून हीं साधनें बदललीं पाहिजेत. ही जाणीव ठेवून साध्याकडे लक्ष देऊन आपण वागलें पाहिजे.

हिंदुस्थानांतील जातिभेदांसंबंधानें अस्पृश्य मानलेल्या जातींनाच जास्त चिडविण्यांत येतें. त्यांना इतर लोक 'अस्पृश्य', तुम्हांला कोणी शिवतसुद्धां नाहींत असें चिडवितात. इतर देशांतील लोक म्हणजे सगळे सगळ्यांच्या नेहमीं गळां पडतात असें नाहीं. पण त्यांना शिवण्याची परवानगी आहे, निदान शिवूं नको असें कोणी म्हणत नाहीं इतकेंच. आपल्या शरीरांत-सुद्धां कांहीं भाग अस्पृश्य, गुह्य, अदर्शनीय असे असतात व तसें असणें साहजिक आहे. आपल्या समाजास अपायकारक असा भाग असा असतो. अस्पृश्य लोक हे आपल्यापैकींच असून समाजाला अपाय करणारे, सामाजिक बंधनें न पाळणारे म्हणून शिक्षा म्हणून यांना बहिष्कार घातला व शिक्षा म्हणून घाणेरीं किंवा हलकीं कामें त्यांस करण्यास लावलें. पुढें ते लोक तींच कामें करीत राहिल्यानें त्यांना समाजापासून अलग ठेवणें योग्यच होतें व यामुळें समाजांत एका प्रकारची स्वच्छतेची मर्यादा राहिली आहे. सगळ्या जगांत ज्यांना स्वच्छतेची मर्यादा नाहीं असे लोक म्हणजे खिस्ती लोक होत. इतर सर्व लोक परमेश्वरी पूजा वगैरे करण्यापूर्वी अमुक स्वच्छता पाहिजे, श्रेष्ठपणासाठीं अमुक स्वच्छता पाहिजे, अमुक स्वच्छता असेल तोच उच्च असें मानतात. पण सर्व जगांत गलिच्छ लोक, गलिच्छपणा वाटेल तेथें चालतो असे लोक, गलिच्छ लोकांना पण कनिष्ठ मानण्यांत येत नाहीं असे लोक म्हणजे खिस्ती होत व हे खिस्ती लोक आपल्या अस्पृश्य लोकांना फार चिडवितात. मुळीं नाकच नसणाऱ्या माणसानें शेंबूड येण्याबद्दल नाक असणाराला हंसावें अशांतला हा प्रकार आहे. ज्याप्रमाणें लहान मुलांना चिडवून घरांत भांडणें लावण्यांत येतात किंवा घरांतील गुप्त गोष्ट काढून घेण्यांत येते त्याप्रमाणें हा प्रयत्न आहे. आपण या अज्ञान लोकांना समजत नाहीं यासाठीं आपले नियम जरा बदलले पाहिजेत. अत्यंत गलिच्छ, धर्मानेंच गलिच्छ, नियमितपणें किंवा हटकून गलिच्छ, शौच पाळलेंच पाहिजे असा ज्यांच्यांत निर्बंध नाहीं, ज्यांना ×× तोंड धुतल्याशिवाय जन्मभर रहातां येतें व सर्व कर्में करतां येतात अशा पाश्चात्य लोकांइतकी मोकळीक आपल्या अस्पृश्य वर्गाला दिली

पाहिजे. या दोघांत चामड्यांच्या रंगाशिवाय कांहीं अंतर नाहीं हें सर्वांना ठाऊक आहे, तर त्याप्रमाणें त्यांनीं वागावयाला पाहिजे. ज्या निर्बंधांतील विशिष्टत्व गेलें तो निर्बंध ठेवण्यांत अर्थ नाहीं, हें ओळखून आपण खिस्ती लोकाइतकी मोकळीक महार मांग वगैरेंना दिली पाहिजे. इतकेंच नव्हे तर खिस्ती लोकांपेक्षां त्यांना जास्त मोकळीक द्यावयाला पाहिजे.

सर्व लोकांप्रमाणें या लोकांना रीतभात, स्वच्छता, धंदा, व्यवहार हा आपण लावला पाहिजे. त्यांना लिहिणें वाचणें शिकवून उच्च जातींबरोबर वागणूक वगैरे सुधारण्यास मदत केली पाहिजे. आतां हे लोक पूर्वीप्रमाणें समाजाचे निर्बंध पाळण्यास नाखूष नाहींत, ते समाजाचा घात करणारे नाहींत, ते समाजांत मिसळूं इच्छितात तर त्यांना तसें करूं द्यावें. आपली संस्कृति, आपलें रक्त, आपला समाज नीट ठेवण्यासाठीं या लोकांना बाहेर वाळींत टाकलें होतें व तो हेतु कायम ठेवूनहि आज आपणास त्यांस पुष्कळ सवलती देतां येतील. बहिष्कृत, अंत्यज, पंचम हे शब्दच त्यांची रचना व स्थिति दाखविणारे आहेत. चार वर्णांबाहेरील सरहद्दीवरील चारी वर्णांचा चोथा किंवा गाळ असे हे लोक होत. यांना शिक्षा म्हणून वाईट धंदे सांगण्यांत आले व आनुवंशिक संस्कारांचे जोरावर हे धंदे याच लोकांकडे निर्धास्तपणें राहिले व हे धंदे किंवा यांची घाण सर्वत्र पसरणें धास्तीदायक वाटल्यानें यांस अस्पृश्यत्व आलें. दारू पिणें वाईट असें ठरल्यावर दारूचा धंदा करणारे कलाल देखील असेच अस्पृश्य ठरले. धोबी, न्हावी सर्व प्रकारची घाण धुतात म्हणून त्यांनाहि थोडें अस्पृश्यत्व आलें आहे. याप्रमाणें अस्पृश्यत्व शास्त्रशुद्ध व वाजवी आहे; पण आपण गोऱ्या किंवा खिस्ती लोकांशीं तें पाळीत नाहीं तेव्हां याहि लोकांशीं तें सोडण्यास हरकत नाहीं, असा वादाचा मुद्दा आहे. कांहींहि कारण असलें तरी खिस्ती लोकांशीं तुलना करतां हे जातिनिर्बंध थट्टास्पद झाले आहेत. स्वैरवर्तनप्रिय पाश्चात्यांच्या संसर्गानें पूर्वीचीं बंधनें दुःसह वाटतात व नवीन संघांचीं बंधनें अद्याप रूढ झालीं नाहींत अशा स्थितींत आपण आहोंत व अगदींच बंधनें तोडण्यास प्रवृत्त होण्यापेक्षां तीं थोडीं ढिलीं करून समाज विस्कळींत होऊं न देतां जूट कायम ठेवण्याकडे आपण लक्ष दिलें पाहिजे. हीं बंधनें

हल्लीं इतकीं घट्ट झालीं आहेत कीं, तीं पाळण्यांत आयुष्याचा पुष्कळ भाग खर्च होतो. त्या बंधनांतील मुख्य तत्व किंवा रहस्य सुटल्यानें तीं बंधनें म्हणजे एक ढोंग झालें आहे. या ढोंगामुळें आपली कुचंबणा होऊन वाढ खुंटत आहे. यासाठीं यांत किती मोकळेपणा देतां येईल याचा विचार नव्या स्वराज्यांत अवश्य झाला पाहिजे.

हल्लीं वागण्याचे नियम इतके शिथिल झाले आहेत कीं, प्रत्येक इसम म्हणजे एक एक पोटजात झाली आहे. अशा स्थितींत पोटजाती मोडून जातींत सर्वत्र रोटीबेटी व्यवहार सर्वदा सुरू केला पाहिजे. कित्येक वेळां तर मुलाच्या जन्मापासून आपल्या जातींत मुलगी जन्माला यावी म्हणून नवस करतां करतां त्याच्या लग्नाच्या वेळींच मुलगी नुकती जन्म पावावी असा प्रसंग येतांना पाहण्यांत आहे व अशा रीतीनें म्हतारा पुरुष व तरुण पोरगी यांचीं लग्नें लावण्याचा प्रसंग आला आहे. तसेंच उलट बहिण-भावंडांतच लग्नें करण्याचे प्रसंग आलेले आहेत. ही आपत्ति टळावी म्हणून पोटजाती मोडणें कायदेशीर झालें पाहिजे. तसेंच हुंडा घेणें व गांवजेवण घालणें कायद्यानें बंद केलें पाहिजे. या चालीमुळें पुष्कळ घरें धुळीस मिळतात व ही चाल वाईट असें सर्व लोक म्हणतात. पण ती स्वार्थामुळें त्यांना मोडवत नाहीं. कित्येक जातींत गर्भाधानाचा निर्बंध नाहीं, तो घातला पाहिजे. नुसतें लग्न झालें म्हणजे कोणताहि मुलगा अगर मुलगी स्त्रीपुरुष संबंधाला योग्य झाली असें नाहीं. त्यांचें रीतसर गर्भाधान योग्य वयांतच झालें पाहिजे व यासाठीं हा निर्बंध कायद्यानें घातला पाहिजे. पूर्वी पंचांना—जाती पंचांना—असले निर्बंध घालतां येत असत. पण हल्लीं पंचांना मान नसल्यानें या गोष्टी कायद्यानें करणें जरूर झालें आहे.

कित्येक जातींत पुनर्विवाह करूं नये असा निर्बंध आहे. याबाबद लोकमत बदलत आहे व त्याला अनुसरून योग्य परिस्थितींत पुनर्विवाह करण्याची मोकळीक देणें योग्य आहे. त्याचप्रमाणें कित्येक जातींत व परिस्थितींत पुनर्विवाहाची मनाई केली पाहिजे. पुनर्विवाह हा बायकांचाच नव्हे तर पुरुषांचा सुद्धां कायद्यानें मुक्त किंवा निषिद्ध असा दोन्ही प्रकारचा पाहिजे. या बाबींत मर्यादा असणें जरूर आहे. पुष्कळ विधवा वगैरे अविवाहित रहातात, लहान पोरांची मृत्युसंख्या मोठी

आहे, लोकांना पोटभर अन्नवस्त्र मिळत नाहीं हें खरें. तरी हिंदुस्थानची लोकसंख्या फार झपाट्यानें वाढत आहे व तिला आळा घालण्यासाठीं अमुक वर्षांच्या वयावर पुनर्विवाह करूं नये, असा निर्बंध करणे अवश्य आहे.

विवाहासंबंधीं या सुधारणाबरोबर परदेशीं जाण्याबद्दल असलेले निर्बंध रद्द केले पाहिजेत. प्राचीन काळीं सर्व जगभर ज्यांनीं साम्राज्यें स्थापून धुडगूस घातला त्याच आर्य लोकांच्या वंशजांनीं आतां परदेशगमन निषिद्ध मानावें हें मोठें चमत्कारिक दिसतें. आपण सुधारलेले व पूर्ण, आणि जग सगळें अडाणी व त्यापासून आपणांस शिकण्यासारखें कांहीं नाहीं अशा स्थितींत कोणी हे निर्बंध घातले असतील; पण आज ती स्थिति अगदीं पालटली आहे, तेव्हां त्याप्रमाणें हे नियमहि पालटले पाहिजेत. यासाठीं प्रवासांत आपणांस योग्य त्या सवलती मिळतील अशी तजवीज हिंदुस्थानानें केली पाहिजे. उदाहरणार्थ, आगबोटी व परमुलुखाचीं बंदरें व मोठीं शहरें येथें फक्त हिंदी व्यवस्थेचे शाकाहारी असें भोजनवसतिगृह काढलें पाहिजे. या भोजनवसतिगृहांची सर्वत्र फार अवश्यकता असून अशा शाकाहारी भोजनगृहांत परदेशी लोकांचें मोठें गिऱ्हाईक येईल. परदेशच्या प्रवासाची मोकळीक व ही सोय अशा दोन गोष्टी झाल्या म्हणजे हिंदी लोकांना जगभर सुखानें प्रवास करतां येईल.

हल्लीं हिंदुस्थानांतून परदेशीं जाणाऱ्या लोकांत पुष्कळ मजूरच असतात. अशा मजुरांचे संघ करून त्यांच्या सुखसोईची व्यवस्था काणारीं मंडळें स्थापन झालीं पाहिजेत. हे लोक कोठें जातात, यांजजवळ कोणतीं साधनें आहेत व कोणत्या साधनांची यांना उणीव आहे हें पाहून तीं साधनें त्यांना उपलब्ध करून देणें, परदेशीं यांची योग्य सोय लावणें, यांना लागेल ती मदत करणें हें परदेशीं हायकमीशनरांचें एक अवश्य कर्तव्य समजलें पाहिजे. परदेशच्या चालीरिती, त्यांचे व्यवहार व व्यवहाराचें तत्व हीं हिंदुस्थानांतील जनतेस समजतील असे प्रयत्न आपण केले पाहिजेत. परदेशीं जाणाऱ्या लोकांची सोय व व्यवस्था करून देणारें मंडळ मुंबई, मद्रास, कराची, कलकत्ता यासारख्या दरएक बंदरीं पाहिजे व त्या मंडळाचे अडत्ये जगभर पाहिजेत. त्या अडत्यांनीं हिंदी लोकांना

देशोदेशींचे रिवाज शिकवावे, परदेशी लोकांच्या ओळखीपाळखी करून द्याव्या, त्यांचा नीट जम बसवून द्यावा, हीं कामें करावीं. हिंदुस्थानांत कारखान्यांची व व्यापाराची योग्य वाढ होण्याला या गोष्टी अवश्य आहेत व या वाढीबरोबर अडते व खाणावळी यांची वाढ साहजीक होणार आहे.

शिक्षणांत अगोदर हिंदुस्थान मागें व त्यांत स्त्रीवर्ग फार मागें आहे. त्यांना योग्य लिहिणें वाचणें व त्याबरोबर योग्य पुस्तकें व धंदे यांची वाढ केली पाहिजे. लिहिणें वाचणें शिकावयाचें तें नाटकें, कादंबऱ्या वाचण्यासाठीं नव्हे तर उपयुक्त ज्ञान संपादनासाठीं आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवून लिहिण्यावाचण्याच्या प्रसाराबरोबर योग्य पुस्तकांचा प्रसार झाला पाहिजे. जें पुस्तक अनेकदां वाचलें तरी फिरून वाचावें असें वाटेल तें, जें आपली रहाणी व मिळकत सुधारील तें, जें आपलें आचरण व परमेश्वरी भक्तीकडील ओढा सुधारील तें चांगलें पुस्तक. व अशी पुस्तकें योग्य बक्षिसें लावून तयार करविलीं पाहिजेत व योग्य माणसांकडून परीक्षा करवून त्यांचा प्रसार होईल असें केलें पाहिजे. बायकांच्या सुधारणेंत दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे पडदा. पडदा असणें, फार पडदा असणें, दहा जणांत येऊन बसण्या बोलण्याची मनाई किंवा लाज असणें हें वाईट आहे. त्याचप्रमाणें मुळींच आडपडदा नसणें, पुरुषांशीं स्पर्धा करणें, विनय व मर्यादा सोडून देणें, खिचडीप्रमाणें किंवा पत्त्याप्रमाणें स्त्रीपुरुषांची हवी तशी मिसळ असणें देखील वाईट होय. योग्य मर्यादेनें स्त्रीपुरुषांना एकमेकांशीं मोकळेपणें वागतां यावें अशी व्यवस्था पाहिजे. योग्य शिक्षणानें ही गोष्ट सुलभ आहे. या बाबतींत स्त्रियांना शिक्षण पाहिजे, तसेंच पुरुषांनाहि पाहिजे. दोघांनींहि आपलें आचरण शुद्ध व सरळ ठेवलें पाहिजे असा निर्बंध पाहिजे. अमर्याद वर्तन करणारा पुरुष दंड्य समजला पाहिजे व त्याचप्रमाणें स्त्री देखील दंड्य समजली पाहिजे. स्त्रियांनीं पुरुषांचें मन चंचळ होऊन लालचावेल असें वर्तन करूं नये; त्याचप्रमाणें पुरुषांनीं स्त्रियांकडे फार नजर लाऊन आपलें मन उल्लू करूं नये ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. उत्सव वगैरे प्रसंगीं योग्य मर्यादेनें स्त्रीपुरुषांनीं एकत्र यावें, भाषणें करावीं, विचारविनिमय करावा अशी योजना करून त्यांना योग्य वळण लावलें पाहिजे.

वर सांगितलेल्या सामाजिक सुधारणा करण्याचा प्रयत्न आज पुष्कळ वर्षे हिंदुस्थानांत चालू आहे. परंतु त्यास यावीं तशीं फळें आलीं नाहींत याचीं कारणें—

(१) लोक अत्यंत अज्ञान व अव्यवस्थित आहेत. चांगलें व वाईट कोणतें याची निवड त्यांना स्वतःला करतां येत नाहीं व सांगणारे लोक वकीलाप्रमाणें एकपक्षीं गोष्टी सांगतात.

(२) सरकार हिंदी लोकांचें नाहीं यामुळें सामाजिक बाबींत तें बेदरकार आहे. शिवाय परकी लोकांना त्यांच्या स्वतःच्या चाली चांगल्या वाटल्यामुळें जनतेनें तिकडे जावें असें त्यांना वाटतें व त्या धोरणानें त्यांचे प्रयत्न न कळत सुद्धां होतात.

(३) शिक्षणखात्यानें योग्य शिक्षण देण्याची व्यवस्था केली नाहीं व त्यामुळें मुलामुलींना योग्य वळण, योग्य विचार करण्याची संवय व योग्य आचरणाची शिस्त लागली नाहीं. खऱ्या रस्त्यानें जावयाच्या ऐवजीं दरएक मोठा मनुष्य आपल्याच मताकडे व वर्तनानुरूप जनतेला वळण लावण्यास पहात आला आहे.

(४) सरकारची शांतता ठेवण्याकडे कठोर नजर असल्यानें जनतेला अप्रिय व खरोखर देशाला घातुक अशा गोष्टी देखील लोकांना मुकाट्यानें उघड्या डोळ्यांनीं व मन शांत ठेवून पहाव्या लागतात. याप्रमाणें मन लोंचट व पोंचट झाल्यानें चांगल्या गोष्टी तशाच शांतपणें ऐकण्यात व पाहण्यांत येतात. दोहोंचा योग्य परिणाम मनावर न झाल्यानें जनता ही सुकाणूं नसलेल्या बोटीप्रमाणें अव्यवस्थितपणें हेलकावे खात आहे.

(५) कोणतीहि सामाजिक सुधारणा लोकांच्या मनांत तेज व तिरस्कार उत्पन्न केल्याशिवाय होत नाहीं. निग्रहानें वागण्याची संवय लोकांत असल्याशिवाय भाषणें वगैरेंचा परिणाम आचरणांत होत नाहीं. ही निग्रहशक्ति तर इंग्रज सरकारनीं पहिल्यानें नष्ट करून टाकली, मग लोकांच्या आचरणावर परिणाम होत नाहीं याबद्दल रडण्यांत काय अर्थ ?

(६) योग्य शिक्षणानें योग्य वळण लावतां येईल. पण लोकांत तेज व आत्मविश्वास उत्पन्न न होऊं देण्यासाठींच निर्माण केलेल्या शिक्षणानें जें काम व्हावें तेंच झालें आहे. कांहींच करण्याची धमक नाहींशी केल्यानें सामाजिक सुधारणा देखील करतां आल्या नाहींत.

(७) हिंदु समाजांतील पुष्कळ दोष जातिबंधनामुळेंच आले आहेत व यासाठीं अगोदर जातिबंधनें योग्य प्रकारें ढिलीं केलीं पाहिजेत. कायद्याशिवाय दुसरें बंधनच न मानण्याची लोकांना संवय झाली आहे व त्यासाठीं कांहीं दिवस या सुधारणा कायद्यानेंच करावयाला पाहिजेत.

(८) कायद्यानेंच या गोष्टी तूर्त केल्या पाहिजेत हें खरें, पण यासाठीं निव्वळ कायद्यावरच अवलंबून रहाणें चांगलें नव्हे. लोकांत योग्य प्रकारची जागृति करून चांगलें वाईट काय याची जाणीव त्यांच्या मनांत दृढ केली पाहिजे म्हणजे कायदा व लोकमत यांची योग्य सांगड होईल व मग हें काम उत्तम होईल.

सामाजिक सुधारणा करण्याचा थोडा फार प्रयत्न होऊन त्यापासून योग्य उपयोग झालेला दिसत नाहीं याचीं कारणें वरप्रमाणें आहेत. हीं कारणें अंशतः तरी पहिल्यानें काढलीं पाहिजेत व यासाठीं पहिल्यानें चांगल्या गोष्टी सक्तीनें व कायद्यानें तसेंच लोकमत जागृत करून पुढाऱ्यांनीं केल्या पाहिजेत. यासाठीं संघ, व्याख्यानें वगैरे सर्व साधनांचा उपयोग केला पाहिजे.

सुशिक्षित माणसें जर स्त्रीपुरुष संबंधांत योग्य निर्बंध पाळणार नाहींत तर कायदे तरी काय करूं शकतील ? यासाठीं सोळा वर्षांची मुलगी व बावीस वर्षांचा मुलगा यापेक्षां लहानांचा गर्भाधान संस्कार किंवा स्त्री-पुरुष संयोग होऊं नये याबद्दल वडील माणसांनीं खबरदारी घेतली पाहिजे. यांत चोरून मारून किंवा चूक झाली तर ती इतकी थोडी होईल कीं, त्यापासून अपाय होणार नाहीं. मुलींचीं किंवा मुलांचीं लग्नें लवकरच व्हावीं व तशीं तीं होण्यांत कोणताहि दोष नाहीं. पाश्चात्य

देशांत सुद्धां याबाबद पुष्कळ मतांतर झालें आहे. मुलींच्या पाश्चात्य देशांतील लग्नाचें वय अठरावरून बारापर्यंत आलें आहे व लहानपणीं झालेल्या लग्नांत घटस्फोटाचे प्रसंग कमी येतात असा त्यांचा अनुभव आहे. ही गोष्ट खालील कोष्टकावरून कळेल.

मुलाचें वय	लग्नांची संख्या	घटस्फोट	मुलींचें वय	लग्नांची संख्या	घटस्फोट
१५	१६००	८२	१२		
१६	३२२२	१४४	१३		
१७	७६९१	२६६	१४		
१८	२४९४४	७७०	१५	१२३८४	४९९
१९	५८९०९	१३१७	१६	४१६२६	१२६८
२०			१७	९०९३०	२७९२
२१			१८		

हे आंकडे संयुक्त संस्थानांच्या १९२१ सालच्या खानेसुमारींतून घेतले आहेत व यावरून लवकर लग्नें हितकर असें पाश्चात्य देशांत ठरत आहे. लहानपणीं लग्नें करण्याची चाल बंद झाली तर बालविधवांची संख्या कमी होईल हें उघड आहे. पण अविभक्त कुटुंबांत सुखानें राहण्यासाठीं जो लहानपणापासूनचा लळा पाहिजे तो नाहींसा होईल. पाश्चात्यांची विभक्त कुटुंबपद्धति हिंदुस्थानाला घेण्यासारखी नाहीं. या विभक्त कुटुंबपद्धतीनें देशांत नसते ढंग व खर्च वाढतात व बंधुप्रेम कमी होतें. न्याय व दूरदर्शीपणा यांच्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे कोणालाहि तूं पुनर्विवाह अगर विवाह कर किंवा करूं नको म्हणणें गैर आहे; पण समाजाचें स्थैर्य व सुस्थिति यांच्या दृष्टीनें याबाबद काहींतरी निर्बंध असणें जरूर आहे. हे निर्बंध पुष्कळसे लोकमताचे व थोडें कायद्याचे असावे. नवराबायकोंत पांच वर्षांपेक्षां कमी व वीस वर्षांपेक्षां जास्त अंतर असूं नये असा कायद्यानें निर्बंध घालावा व ज्यांना दहा वर्षें स्त्रीपुरुषसुख किंवा चार मुलें झालें त्यांनीं पुनर्विवाह करूं नये असा लोकांमताचा निर्बंध पाहिजे. धर्मानें तर कोणाहि स्त्रीनें अगर पुरुषानें पुनर्विवाह करूं नये असा रोंख ठेवावा.

बायकांच्या स्थितीसंबंधानें देखील हिंदुस्थानांत पुनर्घटना होणें जरूर आहे. लोकसंख्येपैकीं निम्या लोकांनीं केवळ गृहकृत्याशिवाय कांहीं करूं नयें हें उचित नाहीं. धंदे वाढले म्हणजे ही स्थिति साहजिकच सुधारेल. घरच्या धंद्यांत बायकापोरांची मदत होईलच. बायकांनीं आपलें गृहकृत्य करून मिळविलेले पैसे त्यांच्याच मालकीचे व्हावे असा लोकमताचा ओघ झाला तर पुष्कळ कार्य होईल. शिंपी, पटवेकरी, वगैरे जातींत हल्लींच असा प्रकार आहे व घरगुती धंद्यांची जितकी वाढ होईल तितकी ही स्थिति सार्वत्रिक होणार आहे. घरोघर किंवा पांच चार घरांत चालवितां येतील असे धंदे बायकापोरांना शिकविले पाहिजेत व त्यांची होईल तितकी वाढ केली पाहिजे. तात्पर्य, एकट्या पुरुषांच्याच श्रमांवर सगळ्या कुटुंबाचा भार पडणें जरा घातक आहे. वाटेल तितकें शिक्षण घेऊन स्वतंत्रपणें पोट भरण्याची किंवा धंदे चालविण्याची स्त्रियांना मुभा असावी व त्यांस वावहि द्यावा. केवळ बायकांनींच चालविलेले कारखाने अगर धंदे असावे. मात्र स्त्रीपुरुषांची अनियंत्रित मिसळ जी पाश्चात्य देशांत अनीतिवर्धक व स्त्रीपुरुषांत स्पर्धा उत्पन्न करणारी झाली आहे तसें न होण्याची आपण खबरदारी घ्यावी.

याचप्रमाणें अस्पृश्य लोकांत देखील शिक्षण, धंदे व संपत्ति यांचा प्रसार करून त्यांचें वर्तन सुधारेल व ते स्पर्शार्हच नव्हेत तर समाजांत मिसळण्यास योग्य होतील असा प्रयत्न झाला पाहिजे, त्यांनीं आपल्या योग्य धंदा, पिढीजाद धंदा, करून स्नान वगैरे करून समाजांत यावें म्हणजे झालें. गिरणींत कोळसा घालणारे वगैरे कामकरी लोकांसारखी महार, भंगी वगैरेंनीं वागणूक ठेवावी म्हणजे त्यास समाजांत मिसळतां येईल. तेली, लोहार, भडबुंजे देखील आपलें काम झाल्यावर स्वच्छ स्नान करून स्वच्छ पोषाख करून समाजांत मिसळतात. पिढीजाद धंदे करण्याची चाल मात्र आपण सोडूं नये. कारण समाजाला ही मोठी हितकारक आहे. हलक्या समजल्या जाणाऱ्या जातींनीं व्यसनांना आळा घालून संपत्तीचा संचय करण्यास शिकावें. असा संचय त्यांच्या जवळ झाला, त्यांचे धंदे करण्याचें काम कंत्राटानें, संघानें, कंपन्या काढून होऊं लागलें तर त्यांची प्रतिष्ठा वाढेल. त्यांना

एक प्रकारें महत्त्व व संघटित स्वरूप येईल व इतर जातींना त्यांचा वाटणारा तिरस्कार आपोआप कमी होत जाईल. विद्या, धंदे व संपत्ति वाढली म्हणजे त्यांचे नागरिकत्वाचे अधिकार देखील वाढतील व मग सभा, परिषदा, सोसायट्या, कमेट्या यांत ते कामें करूं लागले म्हणजे त्यांच्या वागणुकींत वगैरे योग्य फेरफार होऊन त्यांची उन्नति होईल.

वरील विचार वाचून पुराणमताभिमानी लोकांना एक प्रकारें 'अब्रम्हण्य' वाटेल. त्याचप्रमाणें समाजसुधारकांची आजपर्यंत काय चूक होत होती हें त्यांना दिसेल हें जाणूनच योग्य ते विचार निर्भीडपणे प्रगट केले आहेत. कोणतेहि विचार केवळ नवीन म्हणून त्याज्य मानूं नयेत इतकाच इषारा येथें द्यावा असें वाटतें. समाजाचे प्रत्येक घटकांत निर्भयता उत्पन्न होणें जरूर आहे. फक्त पाप व परमेश्वर यांचें भय पाहिजे. आपण आजपर्यंत आपणाला संपूर्ण समजून जगाची पर्वा करीत नव्हतों. पण ही स्थिति दिवसेंदिवस राहणार नाहीं. यासाठीं जगाला दूर ठेवण्याऐवजीं आपण त्याच्याबरोबर चाललें पाहिजे. चांगलें दिसेल तें घेऊन त्याचा आपल्या जुन्याशीं एकजीव करण्याची आपली पूर्वपरंपराच आहे. संध्येसारख्या अगदीं लहान व नित्याच्या गोष्टीपासून तों थेट वेदांताच्या उच्चतम शिखरापर्यंत नव्याजुन्याचा मेळ ठेवून सुधारणा करण्याची आपली हिंदु लोकांची प्रवृत्ति स्पष्ट दिसेल. आज दीडहजार वर्षें ही प्रवृत्ति सुटली आहे ती आपणांस फिरून रूढ केली पाहिजे. पाश्चात्यांच्या नव्या समाजांत नवे शोध, नवे अनुभव व नव्या सोई दिसतात. त्यांपैकीं चांगला भाग घेऊन आपण आपली सुधारणा करण्याचें धोरण ठेवलें पाहिजे म्हणजेच आपली खरी व टिकाऊ सुधारणा होईल. सुधारकची लटपटीत रीत, दिखाऊ भपका व भीत भीत केलेली योजना उपयोगी नाहीं. योग्य ती गोष्ट आपण निर्भयपणें व मोकळ्या मनानें करण्यांत कसूर करूं नये.

हल्लीं जातिधर्मीचें बंड बरेंच कमी झालें आहे पण तें शास्त्र शुद्ध किंवा जाणून बुजून केलेलें नाहीं. औषधें नाइलाज म्हणून, बर्फ, चहा, सोडा व्यसनें म्हणून, पाव, बिस्किटें चैन म्हणून लोक खातात; पण याच लोकांना साधें पिण्याचें पाणी किंवा भाकरी पोळी चालत नाहीं अशी स्थिति आहे. ही स्थिति मोडून पद्धतशीर व विचारपूर्वक ज्या गोष्टी

केल्या त्याच खऱ्या सुधारणा. दारूबाज व व्यसनी मनुष्य भंग्याबरोबर दारू पितो व शेतखान्याच्या पाण्यांत लोळतो किंवा रंडीबाज व्यसनी महारणीशीं उकिरड्यांत रत होतो म्हणजे कांहीं सुधारणा नव्हे. स्वच्छ पाणी व स्वच्छ भाकरी कोणाहि स्वच्छ माणसानें केलेली कोणच्याही स्वच्छ ठिकाणीं, कोणाच्याही समक्ष खाण्यास हरकत नाहीं असा जेव्हां रिवाज पडेल तेव्हां ती खरी सुधारणा म्हणतां येईल. तोंपर्यंत हे सर्व ढंग आहेत व अशी सुधारणा होण्यासाठीं प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करण्याची संवय लागली पाहिजे. जी गोष्ट विचाराला पटली ती आचरणांत आली अशी संवय लागली म्हणजे मनुष्य 'बोले तैसा चाले' असा होतो व हीच खरी सुधारणा.

हिंदुस्थानची जर खरी उन्नति झपाट्यानें व्हावयाला पाहिजे असेल तर रोटी बेटी व्यवहाराला त्यांनीं नसतें महत्त्व देतां कामा नये. एका ताटांत जेवणारे भाऊ भाऊ जर एकमेकांस पाण्यांत पहात असले, मुली दिल्या घेतल्या असे व्याही जर एकमेकांचा द्वेष करीत असले, तर त्या रोटी-बेटीव्यवहारांत काय अर्थ आहे ? हें जाणून एकमेकांवर प्रेम करावें, हा माझा म्हणून जीव तिळतिळ तुटावा यांत सर्व येतें. खरी स्वच्छता, शुद्धि कशांत आहे, तिचें तत्व काय, हें पाहून त्याप्रमाणें बुद्धिपुरःसर व निर्भयपणें आचारण करण्यास लोकांस शिकविलें पाहिजे. परदेशीं जाण्यापूर्वीं त्या देशांतील रीतीरिवाज यांची माहिती व अभ्यास अवश्य केला पाहिजे. त्या परदेशांत आपल्या व्यवस्थेच्या खाणावळी व वसतिगृहें काढलीं पाहिजेत. परदेशांतून माणसें आलीं म्हणजे त्यांना भेटून तेथील चालीरीती, कामधंदे करण्याच्या पद्धति, सुखसोई, व्यापाराच्या योजना कुटुंब, संघव्यवस्था याबद्दलची माहिती प्रत्येकानें विचारून संपादन केली पाहिजे.

परदेशांशीं व्यापारउदीम, शिक्षणसंघट्टन व अनेक प्रकारचे व्यवहार हिंदी लोक समक्ष करूं लागल्यावांचून हिंदुस्थानची सुधारणा होणें नाहीं. याबाबद आपण हल्लीं केवळ परक्या कंपन्या व अडत्ये यांवर अवलंबून आहोंत ही मोठी चूक आहे. असा आपला परदेशांशीं प्रत्यक्ष व्यवहार वाढला म्हणजे वक्तशीर व व्यवस्थित कामें करण्याची संवय, वेळेची

किंमत ओळखणें, संकेत बरोबर पाळणें, आचरणाचा विवक्षितपणा, लोकांशीं मिळूनामिसळून व लोकांच्या उपयोगी पडण्याची वागणूक व समारंभांत, व्यवहारांत, चारचौघांत बोलण्याचालण्याची ढब या गोष्टी आपणांत येतील. परकी लोकांना आपल्याविषयीं पूज्य बुद्धि वाटेल व आपण परकीयांना भीत नाहींसे होऊं. समाजांत वागण्यासंबंधाचे आपण नियम ठरविले पाहिजे. आपल्या चांगल्या चाली ठेवून त्यांत नव्या चांगल्या चालींची भर घातली पाहिजे. सरळपणा, प्रामाणिकपणा व लोकांच्या उपयोगी पडण्याची संवय हे गुण आपण वाढविले पाहिजेत. नाहीं म्हणण्याला न कचरणें ही गोष्ट पहिल्यानें शिकावयाला हवी.

सांगितलेलें मुकाट्यानें ऐकावें अशी मुस्कुटदाबी, विचार करण्याची संवय लागल्यावर, चालणें शक्य नाहीं व ही चालवील असें कोणीहि समंजस माणूस म्हणणार नाहीं. युद्धांत एकतंत्री राज्यपद्धति हितप्रद व जास्त फलदायक होते व असा पुष्कळ काळ लोटल्यामुळें ही मुस्कुटदाबी प्रचारांत येते हें महायुद्धानें सगळ्या जगाच्या निदर्शनास आणलें आहे. हिंदुस्थानांत देखील ही मुस्कुटदाबी अशीच जन्मास येऊन वाढली आहे. पण काळ बदलल्यामुळें तिचेंहि रूपांतर करणें जरूर आहे. आईबापांनीं मुलांना, गुरुजींनीं शिष्यांना कारणें सांगितलीं पाहिजेत. कारणांची दिशा दाखवून तूंच विचार करून तीं तपशीलवार शोधून काढून मला सांग असें आई, बाप, गुरु यांनीं सांगण्यास हरकत नाहीं. जी गोष्ट मुलें अगर शिष्य यांची तीच गोष्ट बायकांची, हीन जातींची वगैरे होय. विचार करण्याची संवय लावून त्यांना त्या त्या गोष्टींच्या फायद्याबद्दल खात्री करून दिली पाहिजे म्हणजे कोणतीहि सर्वमान्य गोष्ट दुष्कर नाहीं. मात्र दोन्ही बाजूंनीं समंजसपणें कामाला लागलें पाहिजे.

हिंदुस्थानांतील सामाजिक पद्धति धर्माच्या पायावर उभारलेली असून धर्म व व्यवहार हे अगदीं एकजीव झालेले आहेत; पण कारणें सांगण्याची हिंदु धर्मशास्त्रकारांची पद्धत नसल्यामुळें व कारणांवांचून हिंदी पद्धत मान्य केली पाहिजे अशी सक्ती नाहींशी झाल्यामुळें हल्लीं सर्वत्र बखेडा झाला आहे. हिंदुस्थानांतील लोकसंख्येची वाढ व हवापाणी देखील या बखेड्याला अनुकूल अशी आहे. हल्लींची शिक्षणपद्धति विध्वंसक

आहे, विधायक नाहीं. पाश्चात्यांच्या गोष्टी, कारण वगैरेची चौकशी न करतां स्वीकाराव्या पण हिंदी गोष्टी मात्र तशा स्वीकारूं नयेत असें प्रत्यक्ष अगर पर्यायानें सांगणारें शिक्षण हिंदुस्थानांत प्रचलित आहे. हिंदी लोकांची एकी किंवा संघटना म्हटलें कीं, सरकारचें धाबें दणाणतें व एकमेकांनीं एकमेकांना मदत करावी व सगळयांनीं मिळून सहकार्यानें कामें करावीं असें शिक्षण देण्यांत येत नाहीं. यामुळें काम व ज्ञान यांची खरी गोडी शिक्षणामुळें लागत नाहीं. शिकलेल्या माणसाला कामाचा कंटाळा व ज्ञानाची अरुचि उत्पन्न झालेली दिसते. लोकांना आपलें मन मोकळें करून सांगण्याची परवानगी नाहीं व यामुळें मनांत धुमसत असलेले विकार केव्हां केव्हां भडकून जातात. वाइटाबद्दल तिटकारा वाटणें साहजीक असून सुद्धां वाईट राज्यकारभाराचा द्वेष म्हणजे राजद्रोह समजला जातो. माणसांप्रमाणेंच वर्तमानपत्रांना मन मोकळें करून बोलण्याची परवानगी नाहीं. यामुळें शिक्षण घेणाऱ्या तरुणांना राज्याची खरी स्थिति अनुभवास येते, पण बोलतां वगैरे येत नाहीं; हें पाहून ढोंग करण्याची संवय लागते. असत्य भाषण म्हणजे पाप ही भावना जाऊन असत्य भाषण व ढोंगीपणा म्हणजे शहाणपणा किंवा व्यवहारचातुर्य समजण्यांत येतें. तरुणांचें लक्ष प्रत्यक्ष व्यवहाराकडे न लागतां काल्पनिक मनोराज्यांत गढून गेलेलें असतें व यामुळें त्यांची कर्तबगारी खुंटून मानसिक ऱ्हास मात्र होतो. याप्रमाणें सुंदर गुरुशिष्य-संबंध, उत्तम जातिव्यवस्था, सर्वोत्कृष्ट व्यवहारपद्धति हिंदी समाजांत असून त्यांचा पुरस्कार करणाऱ्या संस्था हिंदुस्थानांत नाहींत अशी स्थिति झाली आहे.

वर सांगितलेल्या सर्व सामाजिक सुधारणा करण्याचें काम विशेषतः तरुण स्त्री व पुरुष यांवर अवलंबून आहे. या कामांत कांहीं उत्तम संस्था काम करीत आहेत. परंतु त्यांत फारच थोडे लोक भाग घेत आहेत. या कामीं आतां सगळयांनीं शिस्तवार, एकजुटीनें, विचारपूर्वक हातभार लावला पाहिजे. कालेजांतून बाहेर पडलेल्या पदवीधरांत सामाजिक शिस्त दिसली पाहिजे व देशांतील पुढाऱ्यांनीं त्यांना अधिकारयुक्त रीतीनें योग्य वळण लावलें पाहिजे. खेडेगांवांतून शेती व धंदेशिक्षण यांच्या सहाय्यानें

योग्य शिस्त लावतां येईल; पण त्याहीपेक्षां सहकारी लहान लहान धंदे व कारखाने यांमुळेंच योग्य वळण लागणारें आहे. निरनिराळ्या कामाला वाहून घेतलेल्या संघांमार्फत ही शिस्त लागण्यासारखी आहे. मजुरांत मजूरसंघांनीं शिस्त उत्पन्न केली पाहिजे. मालकांनीं मजुरांना अर्ध्या वाटेवर समोर जाऊन भेटण्याचा प्रयत्न केल्यास मजूरसंघांपासून संप वगैरे त्रास होईल. पण ज्यापासून मुळींच त्रास होणार नाहीं अशी कोणतीच गोष्ट जगांत उत्पन्न झाली नाहीं. 'सर्वारंभाहि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः' ज्याप्रमाणें विस्तव पेटवावयाचा म्हटला कीं, धूर व्हावयाचाच, तसेंच कोणतेंहि काम करावयाचें म्हटलें म्हणजे त्यांत कांहीं दोष यावयाचेच. जास्त नफा आहे व दोष थोडे आहेत हें पाहून गोष्टी स्वीकारल्या पाहिजेत. हिंदुस्थानांत संघ होऊं लागले म्हणजे मजुरांचे देखील संघ होणारच व मजूर व मालक यांच्या संयुक्त मंडळानें दोघांचेंहि हित कशांत आहे याची चर्चा करून सलोख्यानें काम केलें पाहिजे. संघांनीं माहिती गोळा करणें, तिचा विचार करून निर्णय ठरविणें व ठरलेल्या निर्णयाप्रमाणें आचरण करणें या मार्गांनीं कसें काम करावें हें एका स्वतंत्र प्रकरणांत सांगितलेंच आहे.

सुधारणेंतील अत्यंत महत्त्वाचें अंग म्हणजे पैशांचा संग्रह करण्याची बुद्धि लोकांत उत्पन्न करणें. हा संग्रह म्हणजे सोनें वगैरेंत नव्हे तर पेढ्यांत संग्रह करणें, व्यापारांत संग्रह करणें हा होय. प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं कोणत्या तरी कारखान्यांत, कोणत्या तरी धंद्यांत कोणत्या तरी नादांत खर्च करण्यासाठीं संग्रह केला पाहिजे अशी गोडी उत्पन्न केली पाहिजे. तसेंच कर्जफेडीची व्यवस्था पाहिल्यावांचून कर्ज काढण्याची संवय मोडली पाहिजे. कर्ज फिटेल अगर कसें याचा मुळींच विचार न करतां व्यवहार करण्याची चाल फार घातुक आहे. त्याचप्रमाणें रोग, अपघात व मृत्यु यांसाठीं विमा उतरण्याचा प्रघात पुष्कळ पडला पाहिजे. विमा उतरणाऱ्या मंडळ्या स्थानिक असाव्या म्हणजे त्यांच्या व्यवहाराची माहिती लोकांना जास्त होते. इंग्लंडमध्यें आजारी लोकांसाठीं विम्याची योजना चांगली आहे. एक भाग मालकाकडून, एक भाग नोकराकडून व एक भाग धर्मादायांतून देऊन प्रत्येक गरीबाचा आजारीपणाचा विमा उतरलेला असतो. त्यामुळें लोकांचे हाल कमी होतात.

धंदेशिक्षण व कारखाने यांच्या योगानें हिंदुस्थानांतील दारिद्र्य समूळ घालवितां येईल. कित्येक लोक दारिद्र्य म्हणजे परमार्थाचें साधन समजतात. पण ही चूक आहे. अन्न असून नियम म्हणून उपाशी राहण्यांतच खरें पुण्य आहे. न मिळेल त्या दिवशीं उपास म्हणजे कांहीं पुरुषार्थ नव्हे. मोठ्या प्रमाणावर मालाची निपज व सहकारी दुकानामार्फत त्याची विक्री याच्या योगानें हि गरीबांची पुष्कळ सोय करतां येईल.

मालकांनीं मजूरांना जास्त पगार व सुखसोई द्याव्या असें म्हणतांना मजुरांनीं देखील आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. त्यांनीं झटून व व्यवस्थित रीतीनें काम केलें पाहिजे. कामकऱ्यांची आळस व हयगय करण्याची संवय कायदा व लोकमत यांनीं घालविली पाहिजे व असें झालें म्हणजे काम जास्त होऊन जास्त पगार देण्यास अडचण पडणार नाहीं. आजार व उपासमार गेली म्हणजे आळस कमी होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं. चढाओढीमुळेंच बाजारभाव उतरावा, याखेरीज त्याला दुसरा मार्ग असूं नये. त्याचप्रमाणें मिळेल तितका नफा उपटावा ही, पद्धति गेल्याशिवाय गरीबांचे हाल नाहींसें होणें शक्य नाहीं. प्रत्येकाने सर्वांसाठीं व सर्वांनीं प्रत्येकासाठीं झीज सोसण्याचा प्रघात पडल्याशिवाय मालक व मजूर यांचा झगडा संपणार नाहीं. यासाठीं उक्तें काम, नफ्याचा हिस्सा, वगैरे उपायांचा प्रयोग करून पाहण्यास हरकत नाहीं. तात्पर्य, मजुरांनीं जास्त उपज करावी व मालकांनीं जास्त मजुरी द्यावी अशा दोन्ही बाजूंनीं ही सुधारणा झाली पाहिजे.

मजूर कोणीकडे, कसे व कशासाठीं जातात याची चौकशी करून त्यांना योग्य मार्ग दाखविण्यासाठीं एक सल्लागार मंडळ नेमलें पाहिजे. या मंडळानें इतर देशांचा अनुभव पाहून तज्ञ व अधिकारी यांच्या सल्ल्यानें खूब मेहनत घेऊन काय करावे हें ठरवावें. या मंडळांत सगळे हिंदी पुढारीच असावे. परदेशाचे व्यापारी, धंदे अगर कारखाने यांच्या वाढीपासून आपणांस पुष्कळ गोष्टी शिकावयाच्या आहेत. संघांच्या मार्फत परदेशांत समंजस लोक पाठवून माहिती मागवून त्याप्रमाणें योजना करून सामाजिक व संघटित कार्यांची दिशा हिंदी लोकांस लावली पाहिजे.

त्यांनीं आपल्या परिस्थितीला योग्य असे नमुने तयार करावे व त्याबरहुकूम फायदे होतात असें दाखवून कारखाने वगैरेंत योजना कराव्या. दरएक युनिव्हर्सिटींत व्यवहार-लौकिक व्यवहार-हें एक शास्त्र शिकवावें. प्रत्येक शाळेंत नागरिकांचीं कर्तव्यें यावर धडे देत जावे व व्यावहारिक राजकारण तर प्रत्येक मुलाला कृतीनें आचरूं द्यावें. देशांत जी अवस्था असावी असें आपणांस वाटतें तिचें चित्र अगोदर प्रत्येक तरुणाच्या डोळ्यासमोर उभें करावें व मग त्याबरहुकूम त्यास आचरण करूं द्यावें.

परंपरा खंड

उपोद्घात

पूर्वी कृतयुगांत देवदानवांची लढाई चालली असतांना देवांनीं एखादा दानव वीर मारावा व त्या बाजूस दानवांचा पक्ष लंगडा होईल अशी अपेक्षा करावी. पण तसें होत नसे. त्या बाजूची सर्व व्यवस्था पूर्वीप्रमाणें कायमच असे. हें असें कसें होतें हें देवांना समजत नसे व दानवांचा गुरु शुक्राचार्य याजपाशीं संजीवनी-विद्या,मेलेले वीर जिवंत करण्याची युक्ति, आहे अशी त्यांची समजूत होती. अलीकडच्या काळांत ग्रीस देशांत मासिडोनचा राजा फिलिप हा असें म्हणत असे कीं, "माझ्या तीस वर्षांच्या कारकीर्दीत मला पार्मिअनशिवाय दुसरा सेनापति मिळाला नाहीं, व हे अथेनियन लोक दरसाल नवा सेनापति नेमतात. ही गोष्ट होते तरी कशी ? यांना इतके सेनापति मिळतात तरी कुठले ?" अगदीं अलीकडचें उदाहरण म्हणजे मराठे व इंग्रज यांची गांठ पडली तेव्हां इंग्रजांचे सेनापति वरचेवर बदलतात, नवीन येतात तरी त्यांच्या कामाची शिस्त व टापटीप बिघडत नाहीं; पण इकडे होळकरांना, शिंद्यांना दक्षिणेंत न्यावें तर उत्तरेचा बंदोबस्त करण्यास कोणी नाहीं अशी आपली अवस्था होते; एक नानाफडणवीस कैदेंत पडला तर त्याची जागा भरून काढण्यास दुसरा इसम मिळत नाहीं हें काय गौडबंगाल आहे असें मराठ्यांना वाटे. या सर्वांचें कारण हेंच कीं, शुक्राचार्यांप्रमाणें ग्रीस व इंग्रज यांजपाशीं संजीवनीविद्या आहे. ही संजीवनी विद्या म्हणजे प्रातिनिधिक संस्था होत. या प्रातिनिधिक संस्थांमुळें हरएक कामाचे माहितगार असे अनेक लोक निर्माण होतात. सर्वांना सर्व कामें माहींत असतात असें जरी नाहीं तरी पुष्कळांना एका कामाची माहिती प्रातिनिधिक संस्थांमुळें होते व यामुळें कोणत्याहि कामाची विविक्षित व्यक्तीसाठीं खोटी होत नाहीं. या प्राचीन प्रातिनिधिक संस्थांची माहिती "औशनस" सूत्रांत दिली आहे.

ही शुक्राचार्यांची संजीवनीविद्या संपादन करण्यासाठीं देवांचे गुरु बृहस्पति यांनीं आपला मुलगा कच यास दानवांच्या राज्यांत शुक्राचार्यांकडे पाठविले. कच बारा वर्षें दानवांचे राज्यांत राहून शुक्राचार्य दारूच्या गुंगींत बडबडत असतांना त्यांची विद्या शिकून देवांकडे परत आला. हा कच ब्राह्मण कशासाठीं आला आहे याची कल्पना दानवांना झाल्यावर त्याचें कार्य होऊं नये म्हणून त्यांनीं अनेक खटपटी केल्या. पण कचाचें सौजन्य, देवयानीचें प्रेम व शुक्राचार्यांची गुणलुब्धता यांमुळें त्या सिद्धीस गेल्या नाहींत. अखेर कच ती विद्या संपादन करून देवांकडे आला व त्यानें ती आपल्या बापास शिकविली. विद्या संपादन केली तरी अंगीं मुरवून, आत्मसात् करून तिचा उपयोग करतां येण्यास एक बुद्धिसामर्थ्य व धोरण लागतें तें कचांत नव्हतें म्हणून त्याची ती विद्या बृहस्पति शिकले व त्यांनीं तिजवर 'बृहस्पति' सूत्रें केलीं. या सूत्रांत बृहस्पतींनीं शुक्राचार्यांच्या पद्धतीचे दोष दाखवून त्या दोषांच्या निराकरणाचे मार्ग सुचविले आहेत. बृहस्पतींच्या सूत्रांप्रमाणें देवांनीं आपल्यांत गणसंस्था स्थापन केल्या. गणसंस्था नऊ होत्या त्या खालीं दिल्याप्रमाणें:—

१ आदित्य—या संस्थेंत बारा सभासद असून आकाशांतील ज्योतींचें निरीक्षण व त्यांचा अभ्यास करीत. तात्पर्य हे ज्योतिषी कालगणक होते. ही ॲस्ट्रानामिकल सोसायटी होय.

२ विश्वे—या संस्थेंत तेहतीस सभासद असून शिल्पविद्यांचा अभ्यास यांत चाले. मनुष्यांच्या सुखसोईसाठीं लागणाऱ्या सर्व वस्तु निर्माण करणें हें यांचें काम होतें. ही इंजिनीयर्स इनस्टिटयूट म्हणतां येईल.

३ वसु—या संस्थेंत आठ सभासद असून खाणीच्या कामाचा हे विचार करीत. खनिज द्रव्यें काढणें व त्यांचा उयोग करणें हीं यांचीं कामें होतीं. ही मायनर्स युनियन होय.

४ तुषित—या संस्थेंत छत्तीस सभासद होते. धान्याचा, भुसार मालाचा व्यवहार हे पहात असत. यांना कोआपरेटिव्ह आग्रिकल्चरिस्ट म्हणतां येईल.

५ भास्वर—या संस्थेंत सात सभासद असून हे रंग तयार करण्याचें काम करीत. ही डायर्स गिल्ड् होय.

६ अनिल—या संस्थेंत सात पोटशाखा असून एकएका पोटशाखेंत सात सभासद होते. ते साफसफाईचें काम करीत असत. निपज झालेला माल घरोघर फिरविण्याचें काम हे करीत. ही पॅकर्स युनियन् होय.

७ महाराजिक—या संस्थेचे दोनशें छत्तीस सभासद होते व सर्व खाद्यपेय पदार्थांचा व्यवहार करणें हें काम यांचेकडे होतें. यांना सप्लायर्स असोसिएशन् म्हणावें.

८ साध्य—या संस्थेचे एकशें पंचाण्णव सभासद होते व कष्ट करून निरानिराळ्या प्रकारची मजुरी करणें हें यांचें काम होतें. ही लेबर युनिअन् होय.

९ रुद्र—या संस्थेचे अक्रा सभासद असून दवंडी देणें व बातमीची प्रसिद्धि करणें हीं यांचीं कामें होतीं. यांना असोशिएटेड प्रेस युनियन् म्हणतां येईल.

या सर्व गणांवर एक गणाध्यक्ष नेमला होता, व त्यानें यांचीं कामें कशीं चालतात हें पहावयाचें असे. हा गणाध्यक्ष म्हणजे आर्बिट्रेशन् बोर्डच होता.

याप्रमाणें देवांनीं आपल्याकडे गणांची योजना केल्यावर दानवांवर त्यांना जय मिळाले व शेवटीं ते ‘अमर’ ‘निर्जर’ या पदव्यांना योग्य झाले. मासिडोनच्या राजानें अथेन्समधून किंवा मराठ्यांनीं इंग्रजांकडून ही विद्या संपादन करून उपयोग केला नाहीं; पण ग्रीसची ही संजीवनी-विद्या आज सर्व पाश्चात्य लोकांत पसरली असून जपानच्या ‘कचां’नीं मात्र ती त्या देशांत रूढ केली व देवांप्रमाणेंच तिचा उत्तम उपयोग करून दाखविला.

त्यानंतर या विद्येवर मनु, पराशर, भरद्वाज, विशालाक्ष, कौणपदंत, पिशुन, वातव्याधि व कौटिल्य उर्फ चाणक्य इतके ग्रंथकार झाले. श्रीदाशरथी रामाचे वेळीं भरद्वाजांच्या शास्त्राप्रमाणें काम चालत असावें व

चंद्रगुप्ताचे वेळीं चाणक्यांची पद्धति अमलांत होती. मागेस्थनिस, हुएन-संग वगैरेनीं ज्या हिंदी राजपद्धतीची इतकी स्तुती केली आहे ती कौटिल्याचीच असावी असें वाटतें. पुढें मुसलमानांशीं संबंध आल्यावर प्रातिनिधिक संस्थांचें काम ठीक चालेनासे होऊन त्या मोडल्या. त्या आतां फिरून आपण शिकून उपयोगांत आणणार आहों. या कशा मोडल्या वगैरे हकीगत पुढें येईलच. हल्लीं औशनस, बृहस्पति व कौटिल्य या तिघांचे मात्र ग्रंथ पाहण्यांत असून त्यांचे अनुरोधानें पूर्वींच्या प्रातिनीधिक संस्था कशा होत्या हें या खंडांत सांगण्याचा विचार आहे.

प्रकरण बारावें

प्राचीन हिंदी–प्रातिनिधिक संस्था

अगदीं प्राचीन काळीं जगांत कोणी राजा नव्हता. जग तेव्हां 'विराज्' बिनराजाचें होतें. प्रत्येक जण आपआपल्या गरजा आपल्या श्रमानें दुसऱ्याला त्रास न देतां भागवूं शकत असे. पण पुढें समाजाची वाढ होतां होतां असा एक काळ आला कीं, त्या वेळीं एका व्यक्तीचा दुसऱ्या व्यक्तीशीं संबंध आल्याशिवाय भागेना. उदाहरणार्थ, गांवांतील सर्व चांगली जमीन लागवडीखालीं येऊन शेतांच्या हद्दी एकमेकांस भिडल्या; शिकारीच्या रानांची देखील हीच स्थिति झाली. एक वस्तु अनेकांना एकाच काळीं हवी असें वाटूं लागलें. असें झालें म्हणजे स्पर्धा, बळजबरी व मारामारीचा प्रसंग येतो व जो जास्त शक्तिमान्, साहसी, कल्पक तो ती वस्तु मिळवितो. दोन इसम भांडूं लागले म्हणजे त्यांचे स्नेही, सोयरे वगैरे या भांडणांत एकएका पक्षास मिळतात व मग त्या मारामाऱ्यांना युद्धाचें स्वरूप येतें. या युद्धांत कोणी तरी अधिक साहसी, पराक्रमी, कल्पक असा निघतो व सर्वदा तो सर्वांच्या पुढें असतो. या इसमाला 'पुर एता' पुढें जाणारा, 'पुरुउष्' पुढें राहणारा असें नांव मिळतें व हा पुढें, पुढारी या नांवानें ओळखला जातो. अगदीं पहिला पुढारी म्हणजे अग्नि. इतर प्राण्यांपेक्षां माणसें याचा उपयोग अगोदर करूं लागलीं व याच्या सहाय्यानेंच माणसांनीं सर्व जग पादाक्रांत केलें. अगदीं आधुनिक तोफा, बांब म्हणजे अग्नीच होय. तो लागेल तेव्हां लागेल त्या ठिकाणीं 'सिद्ध' करावयाचा म्हणजे झालें. बांब, टार्पेडो हें अग्नि सिद्ध करणारे मंत्र आहेत. औशनसानें आपल्या सूत्रांत "पौरुषे निष्ठितो देवः" असें राजाचें लक्षण केलें आहे. नेहमीं पुढें राहणारा तो पुरुष. ही खोड म्हणजे पौरुष. ही खोड ज्याला आहे तो 'पौरुषे निष्ठित' व तोच 'देव' म्हणजे प्रकाशणारा, वाट दाखविणारा, पुढारी, राजा वगैरे. पुरुष शब्द पुर व वस् यांपासून झाला

आहे. " जितक्लेशस्य पौरुषं " ज्यानें क्लेश जिंकलेले आहेत, ज्याला क्लेशाचें कांहींच वाटत नाहीं, क्लेशामुळें ज्याला त्रास किंवा दुःख होत नाहीं तोच पौरुष होईल. " तपसा जितक्लेशो भवति " तपाचें योगानें कष्ट सोसल्यानें, शरीराला श्रमांची संवय ठेवल्यानें मनुष्य जितक्लेश होतो. ज्याला राजा किंवा पुढारी व्हावें असें वाटत असेल त्यानें पौरुषाची खोड किंवा संवय आपल्याला लावून घेतली पाहिजे. पौरुषाची खोड लागण्या-साठीं, क्लेशांची पर्वा नाहींशी होण्यासाठीं त्यानें तपश्चर्या केली पाहिजे. तपश्चर्या म्हणजे कष्ट किंवा श्रम सोसणें. माणसाला जे क्लेश होतात ते अमुक परिस्थिति किंवा प्रकारची राहणी पाहिजे अशी शरीराला संवय झाल्यानें होतात. राजा होण्यालायक मनुष्य कांहीं भणंग भिकारी नसावयाचा. मग याला कष्ट सोसण्याची संवय कशी व्हावी ? ही संवय त्यानें जाणूनबुजून करावयाची असते. अन्न मिळालें नाहीं म्हणजे कोणीहि उपाशीं रहातोच. पण सुग्रास चमचमीत अन्न घरांत मुबलक असतांना तें सोडून कदान्न भक्षण करणें, मऊ व जाड गाद्या मिळत असतांना घोंगडीवर निजणें, सर्व सोई असतांना उन्हातान्हांतून पायीं जाणें, शिपाईप्यादे असतांना एकटे हिंडणें, स्नेहीसोबती असतांना एकांतवासांत काळ घालविणें, अशा वागण्याला व्रताचरण किंवा तपश्चर्या म्हणतात. संपन्न माणसानें अशी तपश्चर्या केल्यावांचून तो जितक्लेश व 'पौरुषे निष्ठित' होत नाहीं, मग राजा किंवा पुढारी होण्याची गोष्ट लांबच राहिली. गृहस्थांनीं नियम पाळावे, व्रतें करावीं, तपाचरण करावें म्हणून हिंदु धर्मशास्त्र सांगतें व या गोष्टी विशेषतः ब्राह्मण व क्षत्रियांनींच केल्याचें पुराणें व इतिहास सांगतात याचें रहस्य हेंच. पण हल्लीं मात्र तें आचरण सुटलें आहे व त्याचें योग्य तें फळ मिळतच आहे. बृहस्पतींनीं आपल्या सूत्रांत " आत्मवान् राजा " अशी व्याख्या केली आहे. ' अत् ' नेहमीं जाणें या धातूपासून सारखा जाणारा येणारा तो आत्मा. हा नेहमीं प्रयत्न करीत राहण्याचा ज्याचा स्वभाव आहे तो आत्मवान् व हाच योग्य राजा होय. कौटिल्यानें " उत्तिष्ठमानः स्वामी " वर उभा राहणारा मालक असें मालकाचें लक्षण केलें आहे आहे किंवा मालक असा नेहमीं उभा, जागा, सावध पाहिजे असें सांगितलें आहे.

आपल्या अनुयायांत भांडणें होऊं नयेत म्हणून मग हा राजा त्यांचीं भांडणें मिटविण्याचें काम पत्करतो व त्यासाठीं नियम करतो. हे नियम म्हणजेच कायदे. राजाकडे याप्रमाणें दुसऱ्या समाजापासून आपल्या समाजाचें व आपल्या समजांतील व्यक्तींचें परस्परांपासून संरक्षण करणें हीं राजाचीं आद्य व मुख्य कामें होत. हीं कामें करण्याच्या व ओळखण्याच्या तीन पद्धति बृहस्पतींनीं व कौटिल्यांनीं सांगितल्या आहेत.

प्रत्यक्ष परोक्षानुमेया राजवृत्तिः।

राजाचीं कामें म्हणजे प्रत्यक्ष, परोक्ष व अनुमेय अशीं तीन प्रकारचीं असतात. 'स्वयंकृतं प्रत्यक्षं' राजानें स्वतः केलेलें सर्वांना दिसतें तें त्याचें प्रत्यक्ष काम होय. 'परोपदिष्टं परोक्षं' राजानें दुसऱ्याला करावयास सांगितलेलें व राजासाठीं दुसऱ्यानें केलेलें लोकांनीं पाहिलें तें राजाचें परोक्ष काम होय. व "कृतेनाकृतान्वेक्षणं अनुमेयं।" राजानें एक काम केलेलें लोकांनीं पाहिलें व त्यावरून त्यानें त्यापूर्वीं अमुक कामें केलीं असलीं पाहिजेत, एरवीं आज केलेलें काम करतां आलें नसतें अशीं जीं कामें तीं अनुमेय कामें होत. श्रीरामचंद्रांनीं रावणास मारलें यांत रामांनीं धनुष्यापासून बाण सोडला हें प्रत्यक्ष कर्म व रावण मेला हें प्रत्यक्ष कर्म व यावरून रामांनींच रावण मारला हें अनुमेय कर्म, होय. रामांनीं सेतु बांधला हें परोक्ष कर्म होय. रामाच्या आज्ञेनें रामाच्या कामासाठीं वानरांनीं सेतु बांधला म्हणून सेतु बांधणें हें रामाचें परोक्ष कर्म होय. याप्रमाणें राजाच्या हातून घडणाऱ्या कामांचे प्रत्यक्ष, परोक्ष व अनुमेय असे तीन प्रकार होतात व तिन्ही प्रकारच्या कामांबद्दल राजा जबाबदार होय.

राजानें परोक्ष कर्म कां करावें व त्याची नसती जबाबदारी आपल्यावर कां घ्यावी असा प्रश्न येतो व त्याचें कौटिल्यानें खालीलप्रमाणें उत्तर दिलें आहे.

कर्मणां अनेकत्वाद् अयौगपद्यत्वाद् अनेकस्थत्वाच्च देशकालव्यत्ययो मा भूदिति (प्रतिनिधि) अमात्यद्वारा परोक्षं कर्म॥

राजाला अनेक कामें, अनेक जागीं व अनेक वेळीं करावयाचीं असतात व तीं करतांना वेळ किंवा जागा यांत चूक पडूं नये किंवा काम

केलें नाहीं असें होऊं नये म्हणून त्याला आपल्या ताबेदारांच्या मार्फत परोक्ष कामें करणें भाग पडतें. हीं परोक्ष कामें करणारीं माणसें व त्यांनीं करावयाच्या कामाची पद्धत व व्यवस्था राजानें ठरवून दिलेली असते, म्हणून त्या कामांबद्दल तो जबाबदार असतो.

ज्याप्रमाणें कामें वाढल्यामुळें आपलीं कामें करण्यासाठीं राजाला प्रतिनिधी नेमावे लागतात व त्यांच्या कामांची जबाबदारी आपल्या शिरावर घ्यावी लागते त्याचप्रमाणें प्रजाजनांना आपलीं गाऱ्हाणीं राजापुढें मांडण्यास प्रतिनिधी नेमावे लागतात; व त्यांच्या कामाचें सुखदुःख मुकाट्यानें सोसावें लागतें. प्रजाजनांना देखील पुष्कळ कामें निरनिराळ्या वेळीं व एकाच वेळीं निरनिराळ्या ठिकाणीं करण्याचा प्रसंग येतो व यासाठीं त्यांना आपल्यातर्फे गुमास्ते किंवा प्रतिनिधी नेमावे लागतात. हे प्रतिनिधी जसे चांगले अगर वाईट असतील, त्याप्रमाणें ते आपण शिरावर घेतलेलें प्रजाजनांचें काम चांगलें अगर वाईट करतात; व अशा चांगल्या अगर वाईट कामाचें सुखदुःख प्रजाजनांना सोसावें लागतें. याप्रमाणें प्रतिनिधींच्या चांगल्या वाईटपणाचा परिणाम मुख्य इसमाला भोगावा लागतो, म्हणून प्रतिनिधी निवडण्यांत जितकी खबरदारी घ्यावी तितकी थोडीच होते. या कारणानें प्रतिनिधींची निवड, त्यांचे गुण व दोष व त्यांच्या कामाची पद्धत यांचे पुढें सांगितल्याप्रमाणें निमय केले आहेत.

आपस्तंब श्रौतसूत्रांत प्रतिनिधि संबंधांत खालील तीन सूत्रें दिलीं आहेत.

शिष्टाभावे सामान्यात्प्रतिनिधिः ।
तद्धर्मा स्याद् । अप्रतिषिद्धश्च ॥

१ विशेष कामासाठीं विशेष प्रकारांनीं ज्याचा उल्लेख केला आहे, तो जिन्नस मिळत नसल्यास किंवा उपलब्ध नसल्यास सामान्य जिनसांतून त्यांचे ऐवजीं प्रतिनिधि द्यावा.

२ हा प्रतिनिधि त्या विशिष्ट जिनसेच्या गुणांनीं युक्त असावा.

३ प्रतिनिधि ज्यांचा स्पष्ट निषेध केला आहे असा नसावा. प्रति-निधि म्हणजे ऐका जिनसेच्या ऐवजीं ठेवलेली दुसरी जिन्नस. ही दुसरी जिन्नस पहिल्या जिनसेच्या बदली ठेवण्याचें कारण ती जिन्नस मिळत नाहीं किंवा

त्या ठिकाणीं हजर अगर तयार नाहीं हें उघडच आहे. तात्पर्य, प्रतिनिधि निवडावयाचा किंवा नेमावयाचा तो खालील चार कारणांसाठीं निवडावा लागतो.

१ मुख्य जिन्नस मिळत नाहीं म्हणून.
२ मिळते पण हजर नाहीं म्हणून.
३ हजर आहे पण तयार नाहीं म्हणून.
४ अनवस्था प्रसंग येईल म्हणून.

मुख्य इसम मयत झाला किंवा मुळींच सांपडत नाहीं तेव्हां त्याच्या-बदली दुसरा इसम घ्यावा लागतो. याला वारस, जिम्मेदार, किंवा विश्वस्त असें म्हणतात. इंग्रजींत याला ट्रस्टी म्हणतात. मुख्य इसम त्या काळीं व त्या स्थळीं हजर राहूं शकत नसला म्हणजे जो त्याचे बदली येतो त्यास गुमास्ता किंवा मुनीम म्हणतात. मुख्य इसम तेथें हजर असून त्याला पुरेसें ज्ञान किंवा शक्ति नाहीं म्हणून जो इसम बदली नेमतात त्याला उपाध्याय, आचार्य किंवा वकील म्हणतात. मुख्य इसम लायक व तयार आहे पण, तें काम पुष्कळ माणसांनीं करावयाचें असल्यानें तीं सर्व, तें काम करूं लागलीं तर अनवस्थाप्रसंग येईल म्हणून, तें काम करण्यास त्यांच्या बदली जे नेमतात त्यांना पंच किंवा पुढारी म्हणतात.

औशनसानें आपल्या सूत्रांत प्रतिनिधींचे तीन वर्ग केले आहेत. ते असेः- शासनकारक, मितार्थ व विमृष्टार्थ.

शासनकारको मितार्थो विमृष्टार्थश्चेति प्रतिनिधयः ।

या सूत्राचें विवरण टीकाकारांनीं खालीलप्रमाणें केलें आहे.

संदेशकारको यस्तु भवेत् शासनकारकः ॥
मितार्थः कार्यकुर्वाणो न कुर्यादुत्तरोत्तरं ॥
विमृष्टार्थः कार्यवशात् शासनं न करोति यः ॥

१ ज्याला सांगितलें तितकेंच काम करण्याचा अधिकार आहे तो निरोप्या, सांगकाम्या, किंवा नोकर. हा अगदीं कमी दर्जाचा प्रतिनिधि. याला कौटिल्यानें अर्धप्रतिनिधि म्हटलें आहे. "अर्धगुणहीनः शासनहरः" नोकर हा शब्द कश्यपसंहितेंतील 'नृकर' शब्दापासून झाला आहे. जो

इसम कामाला येतांना फक्त आपले दोन हात मात्र घेऊन येतो म्हणजे काम करतांना ज्यानें आपल्या हातांशिवाय बाकी इंद्रीयें गुंडाळून ठेवली पाहिजेत तो ' नृकर '. मन, बुद्धि, डोळे, नाक, कान वगैरे इंद्रियें ज्याला असून नसल्यासारखीं, त्यांचा उपयोग ज्यानें कामांत करावयाचा नाहीं, मालकाच्या मन, बुद्धि वगैरे इंद्रियांच्या धोरणानेंच ज्यानें काम करावयाचें तो नोकर. हा मालकाचा फक्त कर्मेंद्रियांपुरतांच प्रतिनिधि म्हणून याला अर्धा प्रतिनिधि म्हणावयाचें.

२ ज्याला सांगितलेलें काम सिद्धीस नेण्यास अवश्य असें सर्व करण्याची मुभा किंवा स्वातंत्र्य आहे तो मितार्थ प्रतिनिधि. राजाचा प्रधान अशिलांचा वकील, यजमानाचा आचार्य हे असले प्रतिनिधी होत. यांना नेमून दिलेलें काम सिद्ध करण्याकरतां जें लागेल तें करण्याचा अधिकार असतो. मालक गैरमाहित, अशक्त किंवा अज्ञान म्हणून त्यानें हे प्रतिनिधी नेमून दिलेले असतात व त्यांनीं आपली माहिती, शक्ति किंवा ज्ञान आपल्या मालकाचे फायद्यासाठीं वापरावयाचें असतें. हे प्रतिनिधी निरपेक्षतेनें काम करीत नसतात, यांचा स्वतःचा स्वार्थ या काम करण्यांत साधावयाचा असतो व इतक्या अंशानें हे अपूर्ण प्रतिनिधी होत. हे पूर्ण नव्हेत. यांत वैगुण्य किंवा कमीपणा आहे म्हणून यांना कौटिल्यानें पाऊण प्रतिनिधी म्हटलें आहे. " पादगुणहीनः परिमितार्थः " ज्यांचें प्रतिनिधित्व मोजलेलें (Limited) मर्यादित आहे तो पाऊण प्रतिनिधि.

३ कार्याच्या धोरणासाठीं जो, सांगितलेलें काम किंवा मालक यांना धाब्यावर बसवूं शकतो तो विमृष्टार्थ प्रतिनिधि होय. हा प्रतिनिधि मालकाच्या ताब्यांत नसून उलट मालकच याच्या ताब्यांत असतो. न्यायाचे पंच, राजकार्यांचे प्रतिनिधी हे असल्या प्रकारचे प्रतिनिधी होत. हे सांगतील तें मालकांना मान्य करावें लागतें; म्हणून हे अत्यंत श्रेष्ठ प्रतिनिधी होत. ' शासनकारक ' अज्ञ असला तरी चालतो इतकेंच नव्हे तर तो अज्ञ असेल तितकें सोईचें असतें. ' मितार्थ ' हा एका कामांत तरी पूर्ण वाकब असावा लागतो. तो त्या कामांत जितका निष्णात तितका तो अधिक फायदेशीर असतो. मालकापेक्षां शासनकारक कमी ज्ञानी हवा. मितार्थ एका, त्याला सांगितलेल्या, कामांत तरी मालकापेक्षां शहाणा हवा. पण

' विमृष्टार्थ ' हा मिळेल तितका सर्वज्ञ, आपल्यापेक्षां मिळेल तितका चांगला पाहिजे. उत्तमांत उत्तम मिळेल तितका, शक्य तितका उत्तम माणूस हाच विमृष्टार्थ प्रतिनिधि असणें योग्य. याच्यापुढें आपलें सर्वथैव अज्ञान किंवा कमीपणा कबूल करण्यास मालकास लाज वाटूं नये, इतक्या योग्यतेचा हा पाहिजे. सर्वांत अत्यंत पूज्य व मानार्ह मनुष्य म्हणजे विमृष्टार्थ प्रतिनिधि. गांवांत, राज्यांत एखाद्याचा बहुमान करणें म्हणजे त्याला विमृष्टार्थ प्रतिनिधि निवडणें होय. म्युनिसिपालीटीचें, राजसभेचें प्रतिनिधी हे असले प्रतिनिधी होत. यांना जनतेचे नोकर असें कित्येक म्हणतात पण ही चूक आहे. हे जनतेचे नेते, पुढारी, प्रमुख किंवा शास्ते होत. ज्याप्रमाणें पंचांनीं दिलेला निवाडा सर्वांनीं मुकाट्यानें मान्य केला पाहिजे त्याचप्रमाणें या प्रतिनिधींनीं केलेले कायदे सर्वांनीं मुकाट्यानें पाळले पाहिजेत. ते कायदे या प्रतिनिधींनाच बदलतां येतील पण तसे ते बदलले नाहींत तोंवर ते प्रत्येकाला पाळले पाहिजेत व बंधनकारक आहेत. अशी स्थिति आहे म्हणून यांना कुलमुखत्यार म्हणतात. कौटिल्यानें यांना पूर्ण प्रतिनिधि किंवा आपले आत्मेच असें म्हटलें आहे. " आत्मसंपदुपेतो विमृष्टार्थः " आपण व आपली संपत्ति ज्यांच्या हातीं देतो तो विमृष्टार्थ होय.

याप्रमाणें प्रतिनिधींची अवश्यकता व प्रकार सांगितल्यावर त्यांच्या गुणांबद्दल विचार करूं. आपस्तंबाचें " तद्धर्मास्याद् " असें सूत्र आहे. प्रतिनिधि हा मालकाचे गुणानें युक्त असावा असा याचा अर्थ आहे. म्हणजे जो मत देण्यास लायक तो प्रतिनिधि होण्यास हरकत नाहीं. मालकाला जें करतां येतें तें प्रतिनिधीला करतां येईल असें पाहिजे. बोलूं शकणाऱ्या माणसाचा बोलण्याच्या कामीं प्रतिनिधि ' मुका ' असतां उपयोगी नाहीं. नागरिकांचा नगराधिपत्यासाठीं प्रतिनिधि त्या नगराशीं संबंध नसलेला चालणार नाहीं. लोकांचीं सुखदुःखें ज्याला समजत नाहींत, त्या सुखदुःखांशीं ज्याला सहानुभूति किंवा एकात्मता अगर तादात्म्यता नाहीं तो त्यांचा प्रतिनिधि होऊं शकत नाहीं. करांचा विनियोग व वसुली ठरविणारा इसम कर देणारा हवा. काळ्या माणसांचा प्रतिनिधि काळा माणूसच पाहिजे. गुलामांचा प्रतिनिधि गुलाम, विद्यार्थ्यांचा प्रतिनिधि विद्यार्थी, स्त्रियांचा प्रतिनिधि स्त्री, सांसारिकांचा प्रतिनिधि संसारी, दुःखितांचा प्रतिनिधि

दुःखी, मनुष्यांचा प्रतिनिधि मनुष्य हवा. ज्या ज्या गोष्टींबद्दल त्यानें प्रतिनिधित्व करावयाचें ती गोष्ट, तो गुण, तें दुःख, ती अडचण, त्या प्रतिनिधीला होत असली पाहिजे. तसें नसेल तर आपली बाजू त्याला योग्य रीतीनें प्रतिपादन करतां येणार नाहीं, मांडतां येणार नाहीं, लोकांना समजावून सांगतां येणार नाहीं; त्याला तें दुःख किंवा अडचण प्रत्यक्ष झाली असल्याशिवाय त्याचें निराकरण वगैरेच्या मार्गाबाबत त्याला मत देण्याचा अधिकारच पोंचत नाहीं. ज्या जिनसेच्या बदली दुसरी जिन्नस द्यावयाची त्या दुसऱ्या जिनसेंत जर पहिलीचे गुण नसले तर ती बदली कसची? अन्नाचे बदली खावयाची जिन्नस जर खाण्याची जिन्नस नसली, पिणाच्या पाण्याच्या मोबदला द्यावयाच्या जिनसेंत जर पाण्याचे गुण नसले, दिवा किंवा काठीच्या ऐवजीं घेतलेल्या जिनसेंत जर दिव्याचें किंवा काठीचें गुण नसले तर ती जिन्नस मोबदला येण्यास योग्य नाहीं हें अगदीं उघड आहे.

आतां प्रतिनिधीच्या दोषांचा विचार करूं. आपस्तंबांचे "अप्रतिषिद्धश्च" असें सूत्र आहे. मोबदला घ्यावयाची जिन्नस निषिद्ध मानलेली नसावी. खावयाच्या अन्नाच्या मोबदला विष चालणार नाहीं. प्यावयाच्या दुधाच्या मोबदला दारू चालणार नाहीं. मारामारीच्या खटल्यांत दरवडेखोर, खुनी पंच चालणार नाहींत. न्यायाच्या कामांत अन्याय करणारे प्रतिनिधी निरुपयोगी. राजशासनाचे कामांत अराजक प्रतिनिधि निरुपयोगी. तात्पर्य, जी गोष्ट एरवीं घेण्यास नालायक, ती मोबदला कशी चालेल? ज्याला मत देण्याचा सुद्धां अधिकार नाहीं तो प्रतिनिधि कसा होईल? ज्याला हात नाहींत तो नृकर, जें पितांच येणार नाहीं तें पेय, किंवा वांझेच्या मुलाप्रमाणें निषिद्ध प्रतिनिधि हा वदतोव्याघात आहे. चांगली उत्तम विशिष्ट गुणसंपन्न वस्तु मिळत नाहीं म्हणून तर मुळीं मोबदला घ्यावयाची व ती निरुपयोगी घ्यावी असें कोणी तरी म्हणेल काय? निरुपयोगी जिन्नस मुळीं उपयोगी नाहीं मग ती चांगलीच्या मोबदला कोण घेणार ? व ती घेऊं नये असें सांगण्याची खरोखर किंवा वास्तविक पाहातां जरूरच नाहीं. पण जगांत गैरसमजानें किंवा अज्ञानानें पुष्कळ घडूं नयेत अशा गोष्टी घडतात यासाठीं

त्यांचा स्पष्ट निषेध करणें सूत्रकारांना अवश्य वाटलें. चुकून सुद्धां असें होऊं नये म्हणून असें सांगितलें आहे.

येथपर्यंत आपण प्रतिनिधींचा सामान्यपणें विचार केला, पण प्रातिनिधिक संस्था म्हटल्या म्हणजे सार्वजनिक कामांतील प्रतिनिधींच्या संस्था असा आपण सामान्यतः अर्थ समजतों. खरोखरी संजीवनी विद्येचा उपयोग खाजगी कामांत नसून सार्वजनिक कामांतच जास्त असतो. व्यक्ति आपलें खाजगी काम आपल्या आयुष्यभर स्वतंत्रतेनें व एकसूत्रीपणानें करीतच असते. सार्वजनिक कामें मात्र एकसूत्रीपणानें चालण्यासाठीं त्यांत प्रतिनिधिसंस्थांचें व संघाचें काम लागतें. संघ किंवा प्रतिनिधि संस्था नसली तर सार्वजनिक काम एकसूत्रीपणानें व परंपरेनें चालणार नाहीं. ही परंपरा सुटूं नये, एकसूत्रीपणा रहावा म्हणून संघ व प्रतिनिधिसंस्था लागतात, व यासाठीं प्रतिनिधिसंस्था म्हणजे सार्वजनिक कामें करणाऱ्या संस्था अशी समजूत रूढ झाली आहे. या सार्वजनिक कामासाठीं प्रतिनिधींत कोणते गुण हवेत याचा आतां आपण विचार करूं. कश्यप संहितेंत याबाबद हा श्लोक आहे—

ब्रह्मज्ञः सत्यसंधः परधनतरुणीनिःस्पृहः कर्ममर्म-
ज्ञाता दातार्तपाता गणितबहुकलाशिल्पवित्सूत्रधारः ॥

१ **ब्रह्मज्ञः**—अनुभविक, "पुराकृतं तु यत्तज्ज्ञैस्तद्ब्रह्मेति प्रचक्षते" पूर्वी तज्ज्ञांनीं त्या कामांत जे अनुभव घेतले त्यांना ब्रह्म म्हणतात व ब्रह्मज्ञ म्हणजे अनुभव जाणणारा किंवा अनुभविक, वयानें प्रौक्त असा. स्वतःचे शरीराचा व कुटुंबाचा प्रपंच ज्यानें चांगल्या तऱ्हेनें केला आहे असा.

२ **सत्यसंधः**—खरें बोलणारा. सत्य म्हणजे चिरकाल टिकण्यास योग्य तें. सत् म्हणजे असणें या धातूपासून हा शब्द आला आहे. संध म्हणजे जोडणारा, तडजोड करणारा, दोन पक्ष दोन बाजूला ओढूं लागले असतां त्यांची समजूत घालून चिरकाल किंवा पुष्कळ दिवस टिकेल अशी त्यांच्यांत तडजोड किंवा समेट करणारा. नुसत्या खरें बोलणाऱ्यापेक्षां सत्यसंध या शब्दांत ज्यास्त अर्थ आहे.

३ परधनतरुणीनिःस्पृहः—विरक्त. दुसऱ्याचें धन किंवा किंवा पैसा व तरुणी म्हणजे तरुण रूपयौवनसंपन्न स्त्रिया यांची इच्छा सुद्धां मनांत न बाळगणारा. जगांत एकंदर अनेक मोह आहेत व या मोहांत गुंतल्यानें मनुष्य स्वकर्तव्यभ्रष्ट होतो. त्या सर्व मोहांत 'कनक' व 'कांता' हे दोन मोह मोठे बलिष्ठ आहेत. या दोहोंना जो जिंकतो तो इतरांना जिंकूं शकेल. यासाठीं प्रतिनिधि स्वकर्तव्यच्युत होऊं नये म्हणून तो या 'कांतासु कनकेषु च' गुंतूं नये.

४ कर्ममर्मज्ञाता—कामाची खुबी जाणणारा. प्रत्येक कामांत कांहीं तरी गोम किंवा खुबी असते. ही खुबी जो ओळखतो तोच तें काम नीट करतो. इतर ठिकाणीं काम बिघडलें तर तें मागाहून सुधारून घेतां येतें. पण मुख्य खुबी किंवा गोमच जर चुकली तर तें सुधारतां येत नाहीं. यासाठीं ही गोष्ट मुख्य संभाळली पाहिजे. कामांत दक्षता पाहिजे ती येथेंच.

५ दाता—देणारा. प्रतिनिधि घेणारा उपयोगी नाहीं, पण देणारा पाहिजे. उदार मनाचा, मोकळ्या हाताचा पाहिजे. सार्वजनिक कामांत अनेक धक्के चपेटे येण्याचा संभव असतो व हे धक्के चपेटे सोसणारा माणूस उदार मनाचा पाहिजे. अनेक गैरसमज होतील, अनेक निंदांचे प्रसंग येतील, अनेक चुका होतील तर त्या सर्वांना उदार मनानें विसरून जाईल तोच मनुष्य प्रतिनिधित्वाला योग्य.

६ आर्तपाता—दुःखितांचें रक्षण करणारा. प्रतिनिधीच्या हाताखालचे लोक अनेकांना त्रास देतील, दुःख देतील, तर त्या दुःखाचें निवारण करण्यासाठीं हाताखालच्या लोकांना आंवरून धरणारा, तसेंच हाताखालच्या लोकांचीं देखील दुःखें नाहींशीं करणारा. तात्पर्य, कोठेंहि दुःख असो तें ज्याला पहावत नाहीं, तें नाहींसें करण्यासाठीं जो झटतो तोच पुढारी, पंच किंवा प्रतिनिधि. अन्यायाची चीड, अन्यायाचा तिटकारा लोकांस त्रास न देणें हेंच ज्याचें ब्रीद तोच प्रतिनिधि. दुसऱ्याचें मोबदला काम करणाऱ्या माणसांत दुसऱ्याचे मनाशीं तादात्म्य पावण्याचा गुण पाहिजे, व हा गुण असला म्हणजे तो दुसऱ्याचें दुःख नाहींसें करण्यास झटणारच. मग तो दुसरा कोणीहि असो. दुसऱ्याच्या दुःखानें दुःखित होणारा इसम अन्याय करणार नाहीं.

७ गणित–बहुकला–शिल्पविद्––गणित म्हणजे हिशेब, जमाखर्च, आयव्यय, देणें घेणें. प्रतिनिधीला गणित येणें अवश्य आहे. अमुक गोष्ट बरोबर आहे व अमुक बरोबर नाहीं हें गणिताशिवाय नीट समजत नाहीं. गणिताचे सिद्धांत बिनचूक व अनपवाद असतात व त्यांच्या परिशीलनानें कांटेकोरपणा व स्पष्टपणा येतो. बहुकला–पुष्कळ कुसराईच्या गोष्टी. या कलांमुळें मनुष्य चतुर होतो. या कलांत चित्रकला प्रमुख आहे. सुतारी, सोनारी, शिंपीपणा किंवा दुसरें कोणतेंहि काम करण्यापूर्वी त्या कामाचें चित्र काढलें पाहिजे. चित्र काढण्यास कल्पनाशक्ति प्रगल्भ व हात आपल्या ताब्यांत लागतात. कोणतीहि गोष्ट कल्पनेनें डोळ्यापुढें उभी करणें व अशा उभ्या केलेल्या गोष्टीचें हातानें चित्र रेघांत काढणें हिला चित्रकला म्हणतात. शिल्पव्यवहारांत उपयोगी पडणाऱ्या वस्तु निर्माण करणें याला शिल्प म्हणतात. वस्त्र, पात्र, घर, वगैरे सर्व सुखसोई शिल्पांत येतात. यांचीहि माहिती प्रतिनिधीला हवी. तात्पर्य, गणित, चित्रें व व्यवहार यांची ज्याला माहिती नाहीं तो प्रतिनिधीत्वाला नालायक असें सुद्धां म्हणतां येईल. गणितांत नियमितपणा, चित्रांत चतुरपणा व शिल्पांत दक्षपणा हे तीन गुण प्रमुख होत व यासाठीं या गोष्टींची माहिती प्रतिनिधीस हवी.

८ सूत्रधारः—प्रतिनिधि हा जनतारूपी नौकेचा कर्णधार किंवा रथाचा सारथी होय. जनता कोणीकडे नेली पाहिजे हें ओळखून त्याप्रमाणें हळूहळू पण निश्चयानें योग्य सूत्रें हलवून, योग्य फेरफार करून त्यानें समाजात कार्य घडवून आणावयाचें असतें. आपण काय करतों हें कोणाला समजू न देतां त्यांना इष्ट स्थलीं घेऊन जाणें हें सूत्रधाराचें काम होय.

हे प्रतिनिधि निवडण्याची प्राचीन पद्धति अशी होती कीं, वर सांगितलेल्या गुणांनीं युक्त अशा माणसांची एक यादी करीत. नालायक माणसें या यादींतून लोकांच्या सूचनेवरून काढून टाकीत. गांवांतल्या प्रमुख देवळांत गांवांतील सर्व प्रमुख माणसें जमून देवाची पूजा करीत व योग्य प्रतिनिधींच्या नांवांच्या चिठ्या करून त्या एका भांड्यांत घालीत. पूजा झाल्यावर देवासमोर सोडतीप्रमाणें या चिठ्या काढीत. काढलेली चिठ्ठी

मुख्य पुजारी याच्या पसरलेल्या हातावर टाकल्यावर तीवरील नांव तो मोठ्यानें वाचून दाखवी. मग ती चिठ्ठी सर्व प्रमुखांकडे देत व ते तें नांव मोठ्यानें उच्चारीत व त्या वेळीं कोणी हरकत न घेतली तर तो इसम प्रतिनिधि झाला. याप्रमाणें पाहिजेत तितके प्रतिनिधी निवडीपर्यंत काम चाले.

प्रतिनिधींनीं मतदारांकडे जाऊन मतें मागणें व बहुमतानें निवडून येणें ही गोष्ट त्या वेळीं प्रचारांत नव्हती. ज्याचें वर्तन शुद्ध आहे अशा माणसांची यादी करणें व तांतून वाईट ठरतील किंवा म्हणण्यांत येतील त्यांना गाळण्यांत येऊन उरलेल्या सगळ्या गांवांतील शेलक्या माणसांतून सोडतीनें प्रतिनिधी निवडून येत. नेकीनें वागणें, धर्मप्रियता, सत्यनिष्ठा वगैरे गुणांना त्या वेळीं जास्त महत्त्व असे, व अशा प्रमुख माणसांतून सोडतीनें निवड होई. एकदां इतकीं माणसें या कारभाराला योग्य आहेत असें ठरल्यावर त्यांतून कोणीहि निवडून आला तरी सारखेंच. या यादींत नांव येणें हाच एक मोठा मान समजत; व हा मान मिळविण्यासाठीं शुद्ध वर्तन ही कसोटी होती. एका माणसानें दोष काढला तर तो माणूस लागलाच यादींतून गळे. यामुळें निव्वळ स्वच्छ माणसें मात्र यादींत उरत व त्यांतून सोडत होऊन निवडीत.

कौटिल्यानें राजानें नेमावयाच्या माणसांची परीक्षा कशी करावी हें सांगितलें आहे; व प्रजाजनांनीं देखील तशीच प्रतिनिधींची निवड केली तर कांहीं वावगें होणार नाहीं म्हणून ती माहिती खालीं दिली आहे.

१ तेषां जनपदं, अवग्रहं च आप्ततः परीक्षेत।

त्यांचा देश (रीतरिवाज) व कूळ (आनुवंशिक संस्कार) हें त्याच्या नातेवाइकांवरून ओळखावें. यावरून नेमावयाच्या माणसांची पूर्वपरंपरा पाहिली पाहिजे असें ठरतें.

२ समानविद्येभ्यः शिल्पं, शास्त्रचाक्षुष्मतां च।

त्यांच्याबरोबर अभ्यास केलेल्या लोकांपासून कामें करण्यांतील त्यांची कुशलता व कोणतीं शास्त्रें त्याच्या नजरेखालून गेलीं आहेत हें ओळखावें. प्रतिनिधि चतुर व शास्त्रें पाहिलेला पाहिजे. तो शास्त्रांत पारंगत नको पण

प्रसंगविशेषीं कोणती माहिती कोणत्या शास्त्रांत कोठें सांपडेल हें माहीत असून ती पाहून तिचा उपयोग करण्याचें सामर्थ्य त्याला पाहिजे.

३ कर्मारंभेषु प्रज्ञां धारयिष्णुतां, दाक्ष्यंच ।

त्याला कांहीं काम करावयाला सांगून त्याची अक्कल, आठवण व हुषारी ओळखावी. सांगितलेलें काम त्याच्या लक्षांत राहिलें पाहिजे व तें करतांना त्यानें आपली अक्कल वापरावी व चूक करूं नये.

४ कथायोगेषु वाग्मित्वं, प्रागल्भ्यं, प्रतिभावत्त्वं च ।

त्याच्याशीं गोष्टी बोलून त्याचें बोलकेपण, धिटाई व समयसूचकता यांची परीक्षा करावी. प्रतिनिधी धीट असावा, भाषा निपुण असावा व झालेली चूक समजली तर लागलीच सावरून घेणारा असावा.

५ आपदि उत्साहप्रभावो, क्लेशसहत्वं च ।

त्याला कांहीं अडचणींत पाडून त्याची धमक, पराक्रम व कष्ट सोसण्याची शक्ति यांची परीक्षा करावी. प्रतिनिधींत काम करण्याची धमक, संकटांना तोंड देण्याची शक्ति व लागतील ते कष्ट सोसण्याचें सामर्थ्य हवें.

६ संव्यवहारात् शौचं, मैत्रतां, दृढभक्तित्वं च ।

त्याच्याशीं देवघेव करून (जेवण सुद्धां यांत येतें) त्याची निर्मलता, मैत्री व निश्चल प्रेम यांची परीक्षा करावी. प्रतिनिधि शरीर, मन व आचार यांत निर्मळ पाहिजे, तो सुखदुःखांत आपला भागीदार पाहिजे व आपल्या-वर निश्चल प्रेम करणारा पाहिजे.

७ संवासिभ्यः शीलबलारोग्यं सत्वयोगं अस्तंभं अचापल्यं च ।

त्याचे शेजारीपाजारी यांजपासून त्याची वागणूक, शारीरिक शक्ति, निरोगीपणा व पाणीदारपणा, तसेंच इंद्रियें दमन करण्याची शक्ति किंवा ब्रह्मचर्य व खोड्या यांची माहिती मिळवावी. प्रतिनिधि सुदृढ, निर्व्यसनी व मन आंवरून धरणारा पाहिजे.

८ प्रत्यक्षतः संप्रियत्वं अवैरित्वं च ।

त्याला स्वतः डोळ्यांनीं पाहून त्याचा सुंदरपणा व दंश न धरणें या गुणांची परीक्षा करावी. प्रतिनिधीच्या शरीराची ठेवण अव्यंग व मन उदार असावें.

इति अमात्य संपद्

आपले सहकारी म्हणजे आपल्याशीं बरोबरीनें कामांत मदत करणारीं माणसें अशीं असावीं. आपले मदतनीस गुमास्ते, मुनीम इतक्या प्रकारांनीं अशी परीक्षा करून पसंत करावे.

एका माणसांत हे सर्व गुण सांपडणें पुष्कळदां कठीण पडतें व यासाठीं दोन अगर तीन माणसांची सांगड घालून त्यांच्या ताब्यांत आपलें काम द्यावें. एका कचेरींत परस्पर असंबद्ध अशीं अनेक माणसें एकत्र कामें करण्यास ठेवण्याचा हाच उद्देश असतो. एक हिशेब ठेवणारा फडणवीस स्वतंत्र, तो हिशेब ठेवण्यास योग्य. एक कामें वेळच्या वेळीं व ताबडतोब न्यायानिष्ठुरपणें करणारा स्वतंत्र असा शिरस्तेदार. एक स्वाभिमानी, पराक्रमी, हिम्मतदार, स्वतंत्र अंमलदार. व या तिघांनीं मिळून त्या कचेरीचें काम करावें असें ठरविलें म्हणजे कामाची हिशेबी परंपरा धरून, तडफेनें कामें करण्याची ढब नीट राहते. प्रतिनिधिसभेंत निरनिराळ्या गुणांचीं निरनिराळीं माणसें असल्यानें अशीच सुव्यवस्था रहाते.

हिंदी शास्त्रकारांनीं लोकांच्या जमावाचे चार प्रकार केले आहेत. (१) परिषद् (२) सदस् (३) सभा व (४) सत्र. याबद्दल विचार करून मग प्रतिनिधींच्या सभांच्या कामाबद्दल त्यांचे काय नियम होते तें सांगूं.

उगीच चैनीसाठीं किंवा करमणुकीसाठीं जमलेल्या मंडळीच्या जमावास 'परिषद्' म्हणतात. परि म्हणजे सभोंवार व षद् म्हणजे बसणारे. कोणाच्या तरी सभोंवार बसणाऱ्या लोकांचा जमाव म्हणजे परिषद्. लग्न वगैरे समारंभ, गाणें वगैरेंचे जलसे, पानसुपाऱ्या, गणपति उत्सव, व्याख्यानें वगैरे हे असले जमाव होत. या जमावांची जी मांडणी तिला व्यवस्था म्हणतात. वि म्हणजे विशिष्ट प्रकारची, सोईची अव म्हणजे खालीं, स्था म्हणजे रहाणें, बसणें, उभे रहाणें इत्यादि. कार्याच्या सोईप्रमाणें एका विशिष्ट प्रकारानें लोकांनीं रहाणें (उभें अगर बसून) म्हणजे व्यवस्था. ही व्यवस्था ठेवण्याचें काम ज्याच्या नजरेखालीं चालतें तो अध्यक्ष. अधि+अक्ष नजरेखालीं किंवा नजर ठेवणारा असा त्याचा अर्थ आहे. व या अध्यक्षांचे

जवळ बसणारा, अध्यक्षांचे खालोखाल नजर ठेवणारा तो उपाध्यक्ष. परिषदेस येणारी मंडळी कांहीं विशिष्ट गुणसंपन्न पाहिजेत असें नाहीं. तसेंच तिचे अध्यक्ष व उपाध्यक्ष देखील कांहीं विशिष्ट गुणसंपन्न पाहिजेत असें नाहीं. साधारणपणें ठेवण्यांत येत असलेल्या व्यवस्थेंत कांहीं अन्याय झाला तर तक्रार करून निकाल लावून घेण्याची सोय असावी इतकाच या अध्यक्ष व उपाध्यक्षांचा उपयोग व काम असतें.

२ कांहीं तरी ज्ञान संपादन करावें या हेतूनें जी मंडळी जमते त्या जमावाला 'सदस्' असें नांव आहे. या जमावाच्या घटकांना 'सदस्य' असें नांव असून यांना ज्ञान देणारा जो असेल त्याला 'सदसस्पति' म्हणतात व याच्या हाताखालीं त्याला मदत करणाऱ्या या इसमाला 'अनुमति' म्हणतात. सदसस्पति हा ज्या विषयाचें विवेचन होणार त्यांत पारंगत असला पाहिजे व त्या विषयाची माहिती आपणांस मिळावी या इच्छेनें सदस्यांनीं तेथें येऊन बसलें पाहिजे. परिषदेंतील लोकांनीं सोईप्रमाणें बसावें किंवा उभें रहावें पण 'सदस्' किंवा 'संसद्' मधील लोकांनीं बसलेंच पाहिजे. शिक्षणाच्या शाळा, शिक्षणासाठीं व्याख्यानें वगैरे जमाव यांत येतात. परिषदेपेक्षां सदस् किंवा संसद्मध्यें शिस्त पुष्कळ जास्त असते व अध्यक्षापेक्षां सदसस्पतीची योग्यता पुष्कळ जास्त असावी लागते. चाललेल्या ज्ञानचर्चेत अधिकारयुक्त वाणीनें त्याला सांगतां व बोलतां येईल इतक्या योग्यतेचा तो इसम लागतो.

३ कार्याकार्य विचारासाठीं योग्य माणसांचा जो जमाव ती 'सभा'. या जमावाच्या मुख्याला 'सभापति' म्हणतात व घटकांना 'सभ्य' अशी संज्ञा आहे. हे सभ्य लोक विशिष्ट गुणसंपन्न असावे लागतात, व त्या सर्वांना मान्य व पूज्य वाटेल तोच सभापति होऊं शकतो. प्रतिनिधी वगैरेंची राजकार्यासाठीं जुळविलेली ती सभाच असते. या ठिकाणीं काय करावें, काय करूं नये, कसें करावें वगैरे गोष्टींचा खल होऊन त्याप्रमाणें करावयाचें असतें. परिषदेस लहान पोरापासून म्हाताऱ्यापर्यंत सर्वांना जातां येतें. संसद्मध्यें ज्याला तो विषय समजेल इतक्या योग्यतेच्या लोकांना जातां येतें. पण सभेला विशिष्ट गुणसंपन्न लोकांना मात्र येतां येतें व इतरांना तींत मुळींच भाग घेतां येत नाहीं. 'सभ्य' हा शब्द सुद्धां

विशिष्ट गुणसंपन्न मनुष्य या अर्थाचा यावरून झाला आहे. कार्याकार्यांचा निर्णय सभापतीला द्यावयाचा असतो म्हणून तो पुष्कळच लायकीचा इसम लागतो. सभापतीनें दिलेला निर्णय सर्व सभ्यांना ग्राह्य व मान्य झाला पाहिजे इतकी जबाबदारी त्याच्यावर असते व ही जबाबदारी पार पाडण्यालायक इसमाला मात्र सभापति निवडला पाहिजे.

४ कोणतीहि अडचण आली असतां त्या अडचणींतून पार पाडण्यासाठीं जमलेल्या मंडळीच्या जमावाला 'सत्र' म्हणतात. सभा हा शब्द तेजानें युक्त अशा अर्थाचा आहे, व त्यावरून जमलेल्या लोकांचें जसें विशिष्टत्व दृष्टोत्पत्तीस येतें तसाच 'सत्र' हा शब्द, सत्–त चांगलें व टिकण्या योग्य अशा गोष्टींचें संरक्षण करणार, अशा अर्थाचा असून त्या जमावाचें विशिष्टत्व दाखविणारा आहे. या सत्राचे जे घटक त्यांना ऋत्विज म्हणतात. ऋतु म्हणजे काळ, परिस्थिति व इज् म्हणजे यज्ञ करणें, स्वार्थत्याग करणें, यावरून आपल्या परिस्थितीला किंवा कार्य अगर काळ यांना अनुसरून स्वार्थत्याग करणारे लोक असा ऋत्विज शब्दाचा अर्थ आहे. या ऋत्विजांत चार प्रमुख लागतात. त्यांना अध्वर्यु, होता, उद्गाता व ब्रह्मा अशीं नांवें आहेत. त्यांत सत्राला लागणाऱ्या सामानाची जुळवाजुळव करून ते वेळेवर तयार ठेवणें हें अध्वर्यूचें काम असतें. अध्वर्यूनें गोळा केलेलें सामान योग्य प्रमाणांत व योग्य वेळीं बळी देणें किंवा देवतेला योग्य प्रकारें अर्पण करणें हें होत्याचें काम असतें. होता जो बळी देत असतो त्या बळीचें व ज्या देवतेला देत असतो त्या देवतेची स्तुति किंवा प्रशंसा करणें हें उद्गात्याचें काम असतें. अध्वर्यु, होता व उद्गाता यांचीं कामें कोठें चुकतात कीं काय हें पाहून होत अगर होणार असलेली चूक दुरुस्त करणें अगर करविणें हें ब्रह्माचें काम असतें. वरील विवेचन यज्ञाच्या परिभाषेंत केलें तें केवळ सोईसाठीं केलें हें दाखविण्यासाठीं सत्रांची एकदोन व्यावहारिक उदाहरणें घेतों म्हणजे यांत कोणाचा गैरसमज होणार नाहीं. परचक्राची आपल्या देशावर स्वारी झाली असतां त्याचा प्रतिकार करणें हें एक सत्र आहे. यांत लढाईसाठीं लागणारीं माणसें, दारूगोळा, अन्न, वस्त्र वगैरे जमविणारें जें खातें तें अध्वर्यु होय. प्रत्यक्ष रणांगणावर सैन्याच्या हालचाली करणारा तो होता. आपले सैनिक,

सेनापति वगैरेंची स्तुति करून सर्व देशांत लढाईचा उत्साह उत्पन्न करणारे वर्तमानपत्रकार, कवि, भाट वगैरे हे उद्गाते. सर्व लढाईवर नजर ठेवणारें जें प्रधानमंडळ तें ब्रह्मा. गांवांत आग लागली किंवा पुराचें पाणी शिरलें तर त्याचा प्रतिकार करून लोकांचा बचाव करणें हें देखील एक सत्रच आहे. आग विझविण्यासाठीं पाणी वगैरे आणणारे लोक हे अध्वर्यु, तें पाणी आगीवर नेमक्या जागीं ओतणारे लोक हे होता, गांवांत आगीची दवंडी देणारे किंवा आगीच्या जागीं 'भले, एकजोर, जलदी करा' वगैरे शब्दांनीं लोकांना प्रोत्साहन देणारे हे उद्गाता, व या सर्व कामांची नीट व्यवस्था ठेवणारे प्रमुख हे ब्रह्मा होत.

सत्रांतील अध्वर्यु हा यजुर्वेदी असावा लागतो, होता हा ऋग्वेद-पारंगत हवा, उद्गाता सामवेदनिष्णात पाहिजे व ब्रह्मा हा तिन्ही वेदांतील ज्ञाता पाहिजे. या वेदांचीं नांवें सार्थ असून त्यांचे विषय त्या नांवांना अनुरूप असे आहेत. यजुष् हा शब्द यज् व उष् या शब्दांचा झालेला असून यज्ञ करून राहील, उरेल असा त्याचा अर्थ आहे. कोणत्याहि यज्ञाला पुरून उरेल इतकी सामुग्री कशीं मिळवावी हें यजुर्वेदांत सांगितलें आहे व यासाठीं अध्वर्यु यजुर्वेद शिकलेला पाहिजे. शस्त्रास्त्रें यांची जमवाजमव, उपयोग सांगणारा धनुर्वेद या यजुर्वेदाचें एक अंग आहे हें वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येईलच. ऋज् हा शब्द स्थिर असणें, (साध्यावर) अचल नजर ठेवणें या अर्थाचा आहे व यापासून ऋजु म्हणजे सरळ असा अर्थ होतो. स्थिर रहाण्याला, अचल नजर ठेवण्याला शिकविणारा तो ऋग्वेद व होता ऋग्वेद शिकलेलाच हवा. औषधांचें प्रमाण व योजना सांगणारा आयुर्वेद हा ऋग्वेदाचा एक भाग आहे हें त्याच्या उपयोगाला व नांवाला धरूनच आहे. साम् म्हणजे शांत करणें, एकी करणें, यापासून लोकांना उत्तेजित किंवा शांत करण्यास शिकविणारा तो सामवेद व उद्गाता सामवेद शिकलेलाच हवा. नाट्यवेद हा सामवेदाचा एक भाग आहे, हें योग्यच आहे. याप्रमाणें वेदांचीं नांवें सार्थ असून वेदमंत्रांचा अर्थ करतांना नांवाकडे लक्ष ठेवलें पाहिजे. एकच मंत्र निरनिराळ्या तीन वेदांत आला तर त्या त्या वेदाच्या नांवाला अनुरूप असे निरनिराळे अर्थ अरूले पाहिजेत. ही गोष्ट पुष्कळ

अर्थ करणारे विसरतात. ज्या अर्थी त्यांनीं विवक्षित मंत्र अमक्या वेदांत संग्रहीत केला आहे त्याअर्थी त्या वेदांच्या ध्येयाला अनुरूप असा त्याचा अर्थ असला पाहिजे. फार कशाला पण तो वेद शिकणारे लोक सुद्धां त्या त्या गुणांनीं युक्त असल्याचें आपण पहातों. साधारणपणें यजुर्वेदी लोक सावकार किंवा संग्राहक असतात. ऋग्वेदी लोक सरळ, स्थिर, हट्टी, असे असतात. सामवेदी लोक गोड बोलणारे, लघळ, असे असतात. वेद, शाखा, गोत्र वगैरे माहिती समजली तर अमुक इसम कोणत्या गुणांनीं युक्त असेल याचें बरेंच अनुमान हिंदुस्थानांत करतां येतें. हिंदी शास्त्रांचें व हिंदी ग्रंथांचें रहस्य समजावयाला मनुष्य हिंदीच लागतो, याचें कारण हिंदी लोकांच्या हाडांमासांत हजारों वर्षांच्या सहवासानें त्यांची संस्कृति भिनून गेली आहे. दुसऱ्या लोकांच्या सहवासानें ही ठेवण बिघडलेली असली तरी तिची मोडणी सर्वस्वी विसकटलेली नाहीं. इंग्रजांच्या किंवा पाश्चात्य लोकांच्या शिकवणीनें व सहवासानें वेदांचा अर्थ कळावा अशी हल्लीं पुष्कळांना इच्छा उत्पन्न झाली आहे, व ही इच्छा फार चांगली आहे. वेदांत अनेक वर्षांचा अनुभव ग्रथित झाला असून त्यांत पाश्चात्यांना ठाऊक नाहींत अशीं अनेक प्रमेयें आहेत. हीं प्रमेयें वेदांचा अर्थ समजल्यानें कळतील पण वेदांचा अर्थ करतांना फार धोरण ठेवावें लागतें. वेदांतील भाषाहि आंब्यांतील रसाप्रमाणें मूल स्वरूपांत असून अत्यंत लवचिक आहे. काव्य, नाटकग्रंथाप्रमाणें ती स्फटिकमय किंवा आंब्याच्या वड्या, साटें यासारखी ताठ झालेली नाहीं. यामुळें एका शब्दाचे व मंत्राचे अनेक शास्त्रांच्या धोरणानें वेदमंत्रांचे अनेक अर्थ होतात ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. ही गोष्ट विसरल्यामुळें पुष्कळ पाश्चात्य व पौर्वात्य विद्वानांनीं केलेले अर्थ अप्रयोजक—मंत्रांचा योग्य उपयोग न सांगणारे—झाले आहेत. कोणत्याहि मंत्राचा अर्थ करतांना तो कोणत्या वेदांत कोठें आला आहे हें पाहून केला पाहिजे तरच त्याचें रहस्य कळेल हें वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. पोऱ्या म्हटला म्हणजे तो नाटकांत निराळा, हॉटेलांत निराळा, वर्तमानपत्राच्या कचेरींत निराळा, धान्यांत निराळा, झाडांत निराळा आहे. या एका उदाहरणावरून एकाच मंत्राचा यजुर्वेदांत अर्थ निराळा, ऋग्वेदांत अर्थ निराळा

व सामवेदांत अर्थ निराळा असला पाहिजे हें त्या वेदांच्या नांवांवरून व साध्यावरून उघड आहे. असो. ब्रह्माकडे या सर्व कामांतील चुका दुरुस्त करण्याचें काम असल्यानें तो तिन्ही वेदांत पारंगत पाहिजे व यासाठीं व चोहोंकडे नजर ठेवण्यासाठीं त्याला चार तोंडें असणें अवश्य आहे. तात्पर्य, अध्यक्ष अगदीं सामान्य मनुष्य, सदस्पति एका शास्त्रांत पारंगत, सभापति व्यवहारनिपुण पण ब्रह्मा मात्र सर्वज्ञ पाहिजे.

प्रातिनिधिक संस्था या नेहमीं सभाच असतात व केव्हां केव्हां या संस्थांना ब्रह्मयाचेंहि काम करावें लागतें तरी त्यांचें 'सभापण' कांहीं नष्ट होत नाहीं. यासाठीं इतर जमावांची माहिती विषयांतर म्हणून सोडून देऊन सभांचें काम कसें चालवावें याचें विवरण पुढें केलें आहे. सभा या प्रतिनिधींच्या असतात, व प्रतिनिधि हे विशिष्ट गुणसंपन्न मनुष्य असतातच, यासाठीं ते सभ्य या पदवीस योग्य होत. सभा कशासाठीं भरतात, त्या कशा भराव्या, त्यांत कसें बोलावें, विचार कसा करावा, निर्णय कसा ठरवावा, झालेला निर्णय योग्य केव्हां, कसा व किती वगैरे तपशील पुढील विवेचनांत येईल व यावरून हिंदी लोकांतील प्रातिनिधिक संस्था किती प्रगल्भ दशेप्रत गेल्या होत्या व हिंदी लोक त्यांना कांहीं पारखे नाहींत इतकी गोष्ट वाचकांच्या नजरेस येईल.

एका सभेंत कमींत कमी किती सभासद असावे याबद्दल पुष्कळ मतभेद आहे. मनूच्या मतानें हे बारा असावेत, बृहस्पतीच्या मतानें हे सोळा असावे, उशनसाच्या मताप्रमाणें हे वीस असावेत, कौटिल्याच्या मताप्रमाणें कामाच्या सोईप्रमाणें लागतील तितके हे असावे पण तीन तरी पाहिजेत. वेदाप्रमाणें कमींत कमी पांच व इंद्राच्या सभेंत जास्तींत जास्त हजार सभासद आहेत, असें आहे. सर्व लोकांचें मत सभेंत विचाराच्या वेळीं यावें यासाठीं अठरा धंद्यांचे अगर कारखान्यांचे अठरा तरी प्रतिनिधी सभेंत हवे असें उशनसाचें मत आहे. प्रत्येक धंद्याच्या लोकांनीं निवडलेला एक एक प्रमुख प्रतिनिधि म्हणून सभेंत हवा म्हणजे तेथें झालेला निर्णय सर्वमान्य होय असें त्याचें मत आहे.

सभेंत साधारणपणें कोणताहि विषय असला तरी खालील चार सदरांत पडतो. कौटिल्यानें आपल्या ग्रंथांत--

अकृतानुरंभं, आरब्धानुष्ठानं, अनुष्ठितविशेषं, कर्मणां नियोग-संपदं च

असे ते चार प्रकार सांगितलेले आहेत.

(१) **अकृनुतारंभं**—एखादें नवेंच काम सुरूं करण्यासंबंधाचा विचार सभेंपुढें येईल. पूर्वीं चालू नसलेला नवा कायदा, कर किंवा प्रघात ही एक कामगिरी.

(२) **आरब्धानुष्ठानं**—पूर्वीं सुरूं केलेलें काम तसेंच पुढें चालू ठेवणें ही दुसरी कामगिरी.

(३) **अनुष्ठितविशेषं**--पूर्वीं केलेल्या कामांत कांहीं फेरफार करून ते प्रस्तुत प्रसंगाला योग्य होईल असें करणें, ही तिसरी कामगिरी.

(४) **नियोगसंपदं**--काम कसें करावें या संबंधाची योजना किंवा हुकूम व त्या कामाला लागणारें साहित्य, पैसा, अधिकारी, अधिकार वगैरे पुरविणें ही चौथी कामगिरी.

अशींच चार प्रकारचीं कामें सभेपुढें येतील किंवा यावींत.

सभेपुढें येणाऱ्या प्रत्येक कामाचे भाग पडतात व त्या प्रत्येक भागाची योग्य छाननी सभेपुढें झाली पाहिजे. ती अशी:—

> **कर्मणामारंभोपायः पुरुषद्रव्यसंपद् देशकालविभागः**
> **विनिपातप्रतीकारः कार्यसिद्धिश्चेति पंचांगो मंत्रः ।**

१ **कर्मणामारंभोपायः**--कामाची आवश्यकता व त्याला प्रारंभ कसा कोठें व कोणी करावा याची योजना.

२ **पुरुषद्रव्यसंपद्**--कामाला लागणारीं माणसें, लागणारें सामान, व यासाठीं लागणारा पैसा कोणी, कोठून पुरवावा याचा विचार.

३ **देशकालविभाग**—काम कोणत्या जागीं व किती दिवसांत किती मापाचें करावें. निरनिराळ्या जागेवर करण्याचें माप निराळें व तें निरनिराळ्या काळांत पुरें करावयाचें याचा विचार.

४ **विनिपातप्रतीकार**—कामांत येणाऱ्या अडचणी कशा दूर कराव्या, कोणती अडचण कोणी व कशी दूर करावयाची याचा विचार.

५ कार्यसिद्धि—काम पुरें करून इष्ट गोष्ट कशी साध्य व्हावयाची याचा विचार.

यांप्रमाणें कामाचा पांच बाजूंनीं विचार करावा लागतो व या पांचहि बाबींचा विचार झाल्यावांचून त्या कामाचा विचार झाला असें म्हणतां येत नाहीं. यासाठीं सभेपुढें कोणतेंहि काम आलें म्हणजे त्याचा या पांचहि बाजूंनीं विचार झाला असें पाहिल्याशिवाय राहूं नये. स्वार्थप्रेरित होऊन, घाई झाल्यामुळें किंवा गैर माहितपणानें पुष्कळदां एक दोन अंगांचा विचार करून काम करावें असें ठरविण्यांत येतें व मग तें सुरूं केल्यावर त्यांत दुरुस्ती करतां करतां शेवटीं तें काम पुरें होतांना निष्फळ होतें. गणपति करावयाचा बेत करून अनेक दुरुस्त्यांमुळें शेवटीं त्याचा मारुति होतो. राष्ट्रीय सभेच्या आजपर्यंतच्या कामांत असा पांचहि अंगानें विचार न झाल्यामुळें तीं कामें झालीं नाहींत अगर झालीं तर निष्फळ झालीं आहेत.

सभेंत कामें कशीं चालवावीं याबाबद खालील नियम घालून दिले आहेत.

> १ पूर्वं सभापतिना स्वामिकार्यनिवेदनं। कार्यमिदं। एवं आसीद् एवं वा यदि भवेत् तत्कथं कर्तव्यं इति॥
>
> २ ततः यथाक्रमं एकैकस्य मतं श्रोतव्यं पूर्वं स्वामिकार्यं संकीर्त्य स्वामिदोषं परदोषं, मध्यस्थदोषं च मंत्रयित्वा स्वाभिप्रायं निवेदयेत्।
>
> ३ सभापतिः पुनः कार्याणि उपायानि च निरूप्य बहुमतानुरोधेन कार्यं कल्पयेत्।

कौटिल्यानें देखील याबाबद असेंच सांगितलें आहे कीं—

> ४ तत्र एकैकशः पृच्छेत्समस्तांश्च। तत्र भूयिष्ठः कार्यसिद्धिकरं वा यथाब्रयुस्तस्था कुर्यात्।

१ पहिल्यानें सभेपुढें कोणतें काम आहे तें सांगावें. "असें करावयाचें आहे पण तें असें होईल किंवा असें झालें तर काय करावें" याचा विचार आज करावयाचा आहे.

२ नंतर याबाबद ओळीनें एक एकानें आपलें मत सांगावें. त्यांत काय करावयाचें आहे हें सांगून तसें केलें तर काय होईल, नाहीं केलें तर काय होईल, उलट केलें तर काय होईल याचें विवेचन करून काय करावें याबाबद आपलें मत स्पष्ट व खुलासेवार सांगावें.

३ सर्वांचीं बोलणीं ऐकून घेतल्यावर एकंदर भाषणांचा निष्कर्ष व त्याबद्दलचे गुणदोष सांगून बहुमतानें जसें ठरेल तसें काम करण्याचें ठरवावें.

४ कोणत्याहि कामाबद्दल प्रत्येकाला निरनिराळें विचारावें इतकेंच नव्हे तर सगळ्यांनाहि एकत्र विचारावें व मग त्यांमधील पुष्कळ किंवा जसें केल्यानें काम साधेल असें लोक सांगतील तसें करावें, असें कौटिल्य म्हणतो. कौटिल्य केवळ प्रजासत्ताक नाहीं व यासाठीं बहुमताच्या विरुद्ध सुद्धां पण इष्ट हेतु साध्य करतां येईल अशा तऱ्हेनें काम करावें असें तो सांगतो. प्रजासत्तेपेक्षां राजसत्तेंत इतका विशेष फायदा आहे.

सभेंत भाषणें करतांना वक्त्यांनीं काय बोलूं नये याबद्दल खालील नियम सांगितले आहेत.

१ शास्त्रवित् कथं कार्यं न प्रजानाति इति न वदेत्।
२ चपला न बहुमान्याः।
३ पूर्वमपकारं न निवेदयेत्।
४ उपकारं नियतं कुर्याद्।
५ मंत्रकाले मंत्रज्ञं न कोपयेत्।
६ भाविव्यसनं पूर्वं निवेदयित्वा व्यसनप्रतीकारं निवेदयेत्।
७ बहुवादं मधुरमेव कुर्यात्।
८ सत्यमपि दुःखानर्थसाधनं न वदेत्।

१ आपण शहाणे असून हें आमणांस कसें समजत नाहीं असें बोलूं नये.

२ वरचेवर ज्यांचीं मतें बदलतात त्यांच्या मताला मान देऊं नये म्हणजे त्यांचीं मतें पुरावा म्हणून घेऊं नयेत.

३ पूर्वीं एखाद्यानें चूक केली असेल तर तिचा उल्लेख करूं नये. एका गोष्टींत चुकला म्हणून तो नेहमींच चुकतो असें नाहीं.

४ पूर्वीं केलेल्या चांगल्या कामाचा उल्लेख करण्यास हरकत नाहीं. या संस्थेसाठीं इतकी कळकळ बाळगणाऱ्या माणसाचें मत विचारांत घेण्यांत आलें पाहिजे. हा संस्थेचा हितचिंतक असून तिचें नुकसान व्हावें म्हणून असें सांगतो असें नव्हे.

५ विचार चालला असतांना कोणाला राग येऊन त्याच्या विचार-शक्तींत विस्कळीतपणा येईल असें करूं नये. मन शांत असल्यावांचून योग्य विचार सुचत नाहींत हें ध्यानांत ठेवून कोणी विचार करतांना रागावूं नये.

६ पुढें कांहीं संकटें येतील असें वाटलें तर तीं संकटें सांगून तीं कशीं निवारण करावीं हें सांगावें.

७ कोणाला ठपका देणेंच असेल तरी तो हळूच द्यावा. कठोर भाषण सुद्धां मऊ असावें. कडू जितकें गोड करतां येईल तितकें करावें.

८ खरें बोलावें हा नियम खरा. पण ज्यापासून दुःख किंवा अनर्थ ओढवतील असें खरें बोलूं नये. त्या वेळीं गप्प बसावें. अनर्थकारक गोष्टी बोलण्यापेक्षां गप बसलेलें बरें. विरोधापेक्षां तटस्थपणा ठेवावा म्हणजे मैत्री मोडत नाहीं.

सभेच्या निर्णयाचें तारतम्य खालीं दिलें आहे.

१ ऐकमत्येन दंडनीतिनेत्रेण धीरैः मंत्रितः उत्तमः।
२ पूर्वं बहुबुद्धयः पश्चादेकमतयो यत्रभवंति स मध्यमः।
३ यत्र कलहं, भर्त्सनंच, एकस्य धर्मं, एकस्य अर्थं, एकस्य स्त्रीबालवृद्धैः सहरुदितं, एकस्य क्रोधः यस्मिन् स अधमः।

१ धर्म व नीतिशास्त्रें यांप्रमाणें विचार करून सगळ्या सभ्यांचा ज्या बाबतींत एकविचार होईल ती उत्तम. यांत सर्वांची व सर्व बाजूंनीं विचार करून सुद्धां एकवाक्यता होते त्याअर्थीं त्यांत दोष नाहींच म्हणण्यास हरकत नाहीं.

२ ज्या ठिकाणीं पहिल्यानें भिन्न मतें होतीं पण पुढें विचार व वाद करतां करतां एकमत झालें ती सल्ला मध्यम. हींत निरनिराळीं मतें होण्यास वाव होता पण सारासार विचारानें किंवा कार्यहानी होऊं नये म्हणून किंवा

मतभेद महत्त्वाचे नाहींत म्हणून मतांचा भिन्नपणा जाऊन एकवाक्यता झाली. त्या ठिकाणीं शेवटीं झालेली एकवाक्यता अखंड किंवा निर्भेळ नव्हे. पण एकवाक्यता आहे म्हणून ही सल्ला मध्यम. हिच्यांत दोष नाहींत असें नाहीं पण केवळ किरकोळ दोष, तपशिलांत दोष म्हणून ही सल्ला घेण्यास हरकत नाहीं.

३ ज्या बाबींत एके काळीं भांडणें व निंदा होत होती, जींत धर्माचें म्हणणें निराळें, अर्थाचें म्हणणें निराळें, जेथें बायका, पोरें, म्हातारे वगैरेपैकीं कोणी किंवा सर्व जण रडतात, व दया उत्पन्न करून मत फिरविण्यास सांगतात, एक रागावून उठून जातो अशी स्थिति असते तो सल्ला वाईट. या निकालांत दोष असतात इतकेंच नव्हे तर धर्म, अर्थ, दया, न्याय, अशा सद्गुणांचें भिन्न मत असल्यामुळें ते दोष खरे व शास्त्रसिद्ध असतात. तो सल्ला घेण्यास योग्यच नव्हे. व्यवहारासाठीं कांहीं तरी केलेंच पाहिजे म्हणून असा सल्ला कदाचित् घेऊन कांहीं तरी करणें भाग असेल. पण नाइलाज म्हणूनच ती घ्यावयाची. एक म्हणतो माझी धर्मासाठीं याला हरकत, दुसरा म्हणतो माझी याला अर्थासाठीं हरकत, तिसरा म्हणतो दयेसाठीं माझी हरकत, चौथा म्हणतो न्यायासाठीं माझी हरकत, असला सल्ला ग्राह्य नव्हे; सदोष हें लक्षांत ठेवून नाइलाज म्हणून ती पत्करावयाची तर पत्करावी पण दोष डोळ्यापुढें असूं द्यावे.

सभापतीनें काय करावें या बाबीवर खालील नियम पहा.

१ न कंचिदूनं मन्येत सर्वस्य शृणुयान्मतं ॥
बालस्याप्यर्थवद्वाक्यमुपयुंजीत पंडितः ॥१॥
२ धर्ममपि लोकविक्रुष्टं न कुर्यात्।
३ करोति चेदाशासयेदेनं बुद्धिमाद्भिः।

१ सभापतीनें कोणालाहि कमी महत्त्वाचा असें समजूं नये. त्यानें सर्वांचें म्हणणें सारख्या आस्थेनें व मोकळ्या मनानें ऐकून घ्यावें. ज्याच्यांत मतलब किंवा ग्राह्यांश आहे असलें भाषण लहान पोरानें केलें तरी शहाण्या माणसानें त्याचा उपयोग करून घेण्यास चुकूं नये. तात्पर्य, शहाण्यानें मधमाशीप्रमाणें जेथें जें घेण्यासारखें सांपडेल तें बेलाशक घेत जावें.

२ सभापतीनें धर्म म्हणजे लोकांची व्यवस्था नीट रहावी म्हणून सुद्धां लोक ज्या विरुद्ध ओरड करतात असें काम करूं नये. लोक गैरसमजामुळें किंवा अज्ञानामुळें सुद्धां एखाद्या गोष्टीबद्दल गैरशिस्त किंवा व्यर्थ गिल्ला करीत असतील तरी सुद्धां असली गोष्ट चांगली किंवा हितकर असली तरी करूं नये. तात्पर्य, बहुजनसमाजाला न रुचणारी गोष्ट सभापतीनें केव्हांहि करूं नये.

३ सभापतीनें करूं नये असें वर सांगितल्याप्रमाणें काम केलें तर शहाण्या लोकांनीं समजून सांगावें किंवा वर सांगितल्याप्रमाणें चांगली गोष्ट करावयाची आहे पण तिच्याविरुद्ध लोकमत आहे तर लोकांना शहाण्या लोकांमार्फत त्या गोष्टीचे फायदे वगैरे नीट समजावून द्यावे व त्यांचें मत बदलवून मग ती करावी. तात्पर्य, गोष्ट व लोकांचा गिल्ला यांपैकीं ज्याचा बदल करतां येईल त्याचा बदल करून एकवाक्यतेनें जें करणें तें करावें. लोकांचें मत तरी बदलावें किंवा आपले कायदे किंवा काम करण्याची पद्धत तरी बदलावी. तात्पर्य, लोकांना नाखुष करून कांहीं करूं नये.

याप्रमाणें प्राचीन काळीं मुसलमानांचा हिंदुस्थानांत प्रवेश होईपर्यंत व्यवस्था होती. दर गांवांत पंचायत, शहरांत नगराधिपत्य व राज्यांत राजसभा यांची प्रातिनिधिक व्यवस्था होती. आडदांड मुसलमानांशीं संबंध आल्यानें ही पद्धत सार्वजनिक कामांत मोडली व फक्त जातिव्यवहारापुरती राहिली. नुकत्याच झालेल्या जर्मन युद्धांत सुद्धां जर्मन सरकारच्या एकतंत्री राज्यपद्धतीशीं टक्कर देण्यासाठीं इंग्लंद, फ्रान्स वगैरे देशांना सुद्धां तात्पुरती आपली सत्ता एकमुखी करावी लागली, व अशीच स्थिति हिंदुस्थानाप्रमाणें पांचचारशें वर्षें टिकेल तर त्यांच्यात सुद्धां प्रजासत्ता मोडून जाईल. ग्रीस, रोम वगैरे प्रजासत्तक राज्यांची हीं अवस्था झालेली आपण पहातोंच. तरी हिंदुस्थानची सामाजिक व्यवस्था चांगली आहे म्हणून मुसलमानींत सुद्धा जीव धरून योग्य परीस्थिति येतांच मराठे, शीख, रजपूत वगैरे आपलीं स्वराज्यें स्थापू शकले.

आतां इंग्रजी राज्यांत फिरून आपणास आपल्या प्रातिनिधिक संस्था स्थापन करण्याची अवश्यकता उत्पन्न झाली आहे. या प्रातिनिधिक संस्था

कार्यक्षम व्हाव्या म्हणून पहिल्यानें अनेक संघ स्थापून आपणांस त्यांचा पाया घातला पाहिजे. शेतकऱ्यांचा संघ, व्यापाऱ्यांचा संघ, विद्यार्थ्यांचा संघ, पदवीधरांचा संघ, म्युनिसिपल मतदारांचा संघ, रेलवे प्रवाशांचा संघ, कौन्सिल मतदारांचा संघ, जहागीरदारांचा संघ, तालुकदारांचा संघ, जमीनदारांचा संघ, सरकारी नोकरांचा संघ असे संघ स्थापून फुकट व प्रामाणिकपणें कामें करण्याची संवय उत्पन्न केली पाहिजे. साधी रहाणी ठेवून क्लेश हौसेनें सोसण्याची शक्ति उत्पन्न केली पाहिजे. अनेक व्रतें, उपवास, वगैरे करून कंटकपणा आणला पाहिजे. मरणाची भीति नाहींशी केली पाहिजे म्हणजे आपण प्रातिनिधिक संस्थांमार्फत स्वराज्य मिळवूं शकूं. एकी व कष्ट सोसणें हे दोन गुण आपणांस पहिल्यानें पाहिजे आहेत व हे ब्राम्हण व क्षत्रिय यांनीं आणले पाहिजेत.

प्रकरण तेरावें

ग्रामपंचायती

कोणत्याहि देशांतील प्रातिनिधिक संस्थांचा विचार करूं लागलों म्हणजे त्यांत राजाच्या प्रतिनिधींचा त्याचप्रमाणें प्रजेच्या प्रतिनिधींचा विचार करावा लागतो व यासाठीं देशापासून घरापर्यंत भाग पाडावे लागतात. ते भाग व त्या भागांत काम करणारे राजाचे व प्रजेचे प्रतिनिधी यांची मांडणी खालीं दिली आहे.

	भाग	राजप्रतिनिधि	प्रजाप्रतिनिधि
५ पासून १० इंद्रियें = १	मनुष्य, स्वामी	पुरुष, आत्मा.	बुद्धि, प्रकृति
५ पासून १० माणसें = १	कुटुंब, ग्रह.	गृहपति	गृहिणी.
५ पासून १० कुटुंबें = १	आळी, वाडी	कुलपति	पुरएता, पुढारी
५ पासून १० आळ्या = १	पेठ, खेडें	ग्रामाधिप पाटील	ग्रामणी M. Panchayat
५ पासून १० पेंठा = १	गांव, मंडल	गोप	M. Union
५ पासून १० गांवें = १	नगर, तालुका	नगराधिप मामलतदार	नगरप्रणिधि Municipal
५ पासून १० तालुके = १	जिल्हा, जानपद	समाहर्ता सुभा	M. Board
५ पासून १० जिल्हे = १	प्रांत,	राज्य राजा	सरसुभा मंत्रज्ञ. Councillor
५ पासून १० प्रांत = १	देश, महाराज्य	महाराजा.	ऋत्विज M. Assembly

५ ते १० महाराज = सार्वभौम, पृथ्वीपति

५ ते १० सार्वभौम = प्रजापति, स्वाराज्य

५ ते १० स्वाराज्य = विष्णु, वैराज्य

राजा जसा देशाला एक तसा राजप्रतिनिधि राजानें नेमलेला एक इसम असणार, पण प्रजा पुष्कळ असल्यानें त्यांचे प्रतिनिधी अनेक असतात सबब त्यांच्या समुदायांना निरनिराळीं नांवें ठेवावीं लागतात व तीं खालीलप्रमाणें ठरवून ठेवावी.

जाति—वंशपरंपरेनें जन्मावरून जी ठरविण्यांत येते ती.

कुल—आचारावरून ज्याचा निर्णय करण्यांत येतो तें.

वर्ग—धंद्यावरून ठरणारा तो.

संघ—आपण होऊन जें सार्वजनिक काम पत्करलें तो.

समिति—विवक्षित काम करण्यासाठीं निवडलेल्या मंडळींची.

मंडल—ज्या समितीला गांवोगांव फिरावें लागतें तें.

सदस्—लोकांना शिक्षण देण्याकरतां बोलावलेली मंडळी ती.

परिषद्—सामान्य विचारांचा विनिमय करण्यासाठीं बोलाविलेली ती.

सभा—कार्याकार्य ठरविण्यासाठीं निवडक लोकांची भरविलेली ती.

सत्र—कायदे वगैरे सार्वदेशिक कामें करणारीं मंडळी ती.

हल्लीं मतदारांचे जे गुण तेच उमेदवारांचे आहेत. पण व्यवहारांत दोघांचें काम फार निराळें आहे. मतदारांनीं कामांची सामान्य दिशा ठरवावयाची असून उमेदवारांनीं त्या धोरणानें कामें प्रत्यक्ष घडवून आणावयाची असतात. यासाठीं मतदारापेक्षां उमेदवाराची योग्यता पुष्कळ जास्त पाहिजे. राज्यकारभाराचे व्यवहार करणाऱ्या मंडळींची व्यवहाराचे क्षेत्राप्रमाणें एकाहून एक चढते असे वर्ग लागतात. व यासाठीं एका क्षेत्रांतील उमेदवार ते दुसऱ्याच्या क्षेत्राचे मतदार असें केलें व ग्राम-पंचाइतींत सर्व लोकांना मताचा अधिकार ठेवला म्हणजे अगदीं खालपासून वरपर्यंत सारखी योग्य परंपरा व चढत्या गुणांमुळें काम करण्याची योग्य लायकी यांची सोय होईल. प्रजेनें निवडलेल्या लोकांनीं कामाची दिशा ठरवून तें कसें करावें हें ठरवावें व राजानें निवडलेल्या इसमांनीं त्याप्रमाणें अंमल-बजावणी करावी. असें केलें म्हणजे राजा व प्रजा या दोघांचाहि कामांत योग्य मिलाफ राहील. पैसे (कर) यांची सर्व मंजुरी प्रजाप्रतिनिधीकडे राहील व अंमलबजावणी करण्याचें काम राजाच्या अधिकाऱ्यांकडे राहील व न्यायनिवाडा देण्याचें काम राजा व प्रजा या दोघांचा विश्वास

असलेल्या माणसांकडे राहील. तात्पर्य, न्यायनिवाडा देण्याचें काम एका वर्गाकडे, अंमलबजावणी करण्याचें दुसऱ्याकडे असावें.

वित्तबंधुकर्मजातिविद्यावयांसि मान्यानि । परबलीयांसि ।
श्रुतं तु सर्वेभ्यो गरियः । अ. २० ते २३
तदपेक्षस्तद्धतिः । अ ८।७
वयोबंधुश्च वित्तं च विद्याचान्वरणं तथा ॥
एतानि मान्यस्थानानि गरीयो यद्यदुत्तरं ॥ भृगुसंहिता

वय म्हणजे जन्मकालापासून लोटलेला काळ, बंधु म्हणजे आपल्या मदतीला येणारे इसम, वित्त म्हणजे आपल्या ताब्यांत असलेली संपत्ति विद्या म्हणजे आपण मिळविलेलें ज्ञान व आचरण म्हणजे आपली वागण्याची तऱ्हा या पांच गोष्टींवर माणसाची योग्यता अवलंबून असते व या पांचांत पुढच्या पेक्षां अगोदरचे गूण कमी दर्जाचे होत. यासाठीं कोणाहि माणसाची योग्यता मोजावयाची म्हणजे या पांच गोष्टींनीं मोजावयाची व अमुक गूण पाहिजेत म्हणून सांगावयाचे म्हणजे या पांचांचें माप सांगावयाचें. यासाठीं खालीं दिलेल्या व्यवस्थेंत या पांचांचाच निर्देश केला आहे.

वय—**द्वादशवर्षा स्त्री प्राप्तव्यवहारा भवति षोडशवर्षः पुमान्.** मुलगी बारा वर्षांची झाली म्हणजे ती सज्ञान समजावी व मुलगा सोळा वर्षांचा झाला म्हणजे तो सज्ञान समजावा असें सूत्र आहे. पण सोळा वर्षांचें वय झालें तरी उपनयन करण्याइतकी अक्कल जर नसली तर फक्त ब्राम्हण जातीचा मुलगा मात्र व्रात्य (निरुपयोगी) ठरतो. क्षत्रिय व वैश्य या वर्गांना जास्त वर्षांची यत्ता ठरविली आहे व ज्याअर्थीं आपणांस या तिन्ही वर्गांना मताचा अधिकार देणें आहे त्याअर्थीं मतदाराच्या वयाची यत्ता सोळापासून चोवीस वर्षांपर्यंत ठेवली पाहिजे. चोवीस वर्षांचें वय झालें तरी जर कोणी इसम माणुसकीला योग्य इतका ज्ञानवान झाला नाहीं तर तो मतदारीला मुकला. हल्लींच्या कायद्यानें अठरा वर्षें वयाच्या माणसाला सज्ञान समजलें जातें व ही यत्ता सोळापर्यंत नेतां येईल.

तात्पर्य, सोळा किंवा अठरा वर्षें वय झालेल्या प्रत्येक माणसास मत देण्याचा अधिकार आहे मग तो स्त्री असो वा पुरुष असो.

बंधु—कोणाहि माणसाची कोणत्याहि कामीं निवड करावयाची म्हणजे त्याला दोन तरी बंधू पाहिजेत. एक पुरस्कर्ता किंवा प्रपोझर व दुसरा अनुमंता किंवा सेकंडर. करार वगैरे कागदावर दोन साक्षीदार लागतात याचें तरी कारण हेंच. आतां गांवपंचायतीच्या मतदारांना असे कोणते बंधु पाहिजेत ? या मतदारांत तर साधारणपणें सर्व लोकांचा समावेश व्हावयाला पाहिजे. यासाठीं श्रुतींत—

मातृमान् पितृमान् आचार्यवान् पुरुषो वेद ।

असें वाक्य आहे. आई ही कामपुरुषार्थाचा गुरु, बाप हा अर्थपुरुषार्थाचा गुरु व आचार्य हा धर्मपुरुषार्थाचा गुरु होय. यांपैकीं आचार्याचा आधार विद्येच्या विचारांत येईल. म्हणून बंधूमध्यें आई व बाप यांची गणना केली पाहिजे. खाण्यापिण्याच्या बाबतींत मुलाला शिकविण्याचें काम आईचें व त्यांत त्याला पुरेसें ज्ञान आहे असा तिनें दाखला दिला पाहिजे. पैसा, वगैरे व्यवहार शिकविण्याचें काम बापाचें व त्याबद्दल त्याचा दाखला पाहिजे. तात्पर्य, खाणेंपिणें व पैसा अडका हे व्यवहार ज्याला समजतात त्याला हे दोन बंधु आहेत असें समजावें. ज्याला आपण वेडा म्हणतो, तो मनुष्य मतदार होण्यास नालायक असें या विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. वरच्या संस्थांतील मतदारांना जास्त जास्त बंधु किंवा अनुयायी यांचा पाठिंबा पाहिजे हें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

वित्त—प्रत्येक मतदाराच्या मालकीचें कांहीं तरी व्यवहारोपयोगी द्रव्य किंवा पोटाला मिळविण्याचें साधन पाहिजे. ज्याची उपजीविका केवळ भिक्षेवर व ज्याला दुसऱ्या कशाची जरूर नाहीं असा विरक्त किंवा पशुतुल्य मनुष्य मतदार होण्यास नालायक समजावा. भीक मागून निर्वाह करणारे सर्व लोक याप्रमाणें मतदार होण्यास नालायक होत. याखेरीज बाकी गांवांत राहणारे सर्व लोक ग्रामपंचायतीसाठीं प्रतिनिधी निवडण्यांत मतें देण्यास लायक होत.

विद्या—ज्याला लिहितां वाचतां येतें तो या मतदारींत पुरेसा विद्यासंपन्न समजावा. विद्येची व्याख्या भृगूंनीं—

यद्यत्स्याद्वाचिकं सम्यक्कर्म विद्येति संज्ञितं ॥

अशी केली आहे. कोणतें तरी काम चांगलें करतां येत असावें व त्याची माहिती तोंडानें सांगतां येत असावी म्हणजे ती विद्या होय. सक्तीचें प्राथमिक शिक्षण घेऊन प्रत्येक इसम साक्षर व्हावा म्हणून ही लिहिणें वाचणें येण्याची अट मतदारांना ठेवणें इष्ट आहे. मुक्या माणसाला तोंडानें सांगतां न आलें तरी लिहून दाखवितां येईल; व अशा माणसांचा सुद्धां या लिहिण्यावाचण्याच्या योगानें विद्यासंपन्न माणसांत समावेश करतां येईल. आचार्यांचा इतक्या पुरता दाखला पाहिजे.

आचरण—मतदाराचें आचरण समाजविध्वंसक असूं नये. समाजाचा घात करणारा इसम मतदारीला नालायक होय. समाजाची सुव्यवस्था ठेवण्याच्या कामासाठीं माणसांची निवड करण्यास मतें द्यावयाचीं तेव्हां समाजविध्वंसक माणसें या कामीं उघडच नालायक ठरतात. समाजानें बहिष्कृत माणसें देखील, तशींच समाजबंधनें न मानणारीं म्हणून, नालायक समजावीं. सारांश, ग्रामपंचायतीच्या निवडणुकींत गांवांतील प्रत्येक इसमाला खालील अटींवर मत देण्याचा अधिकार असावा.

(१) सोळा वर्षांच्या वर त्याचें वय असावें.
(२) व्यवहार त्याला समजत असावा.
(३) त्याला उपजीविकेचें भिक्षेशिवाय साधन असावें
(४) त्याला बोलतां व लिहितांवाचतां येत असावें.
(५) तो समाजविध्वंसक अगर बहिष्कृत नसावा.

इतक्या गोष्टी अनुकूल असल्या म्हणजे प्रत्येक माणसाला मत देण्याचा अधिकार असावा. याला सार्वत्रिक मतदान किंवा ‘ युनिव्हर्सल सफ्रेज ’ म्हणतात.

या मतदारांकडून बहुमतानें निवडून आलेल्या लोकांनीं त्या गांवांतील सर्व सार्वजनिक कामें पहावीं. हीं सार्वजनिक कामें म्हणजे गांवांतील सर्व लोकांचे हितसंबंध असणारीं खालील कामें:—

(१) गांवांतील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था.
(२) गांवांतील स्वच्छता व आरोग्य यांची व्यवस्था.
(३) गांवांतील मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था.
(४) गांवांतील रस्ते व बाजाराची व्यवस्था.
(५) गांवांतील तंटे, भांडणांचा निकाल करण्याची व्यवस्था.
(६) गांवांत सुधारणा व्हावी म्हणून कराव्या लागणाऱ्या गोष्टी.

हीं सर्व कामें करण्यासाठीं लागणाऱ्या मेहनतीसाठीं प्रत्येक मतदारानें एक दिवस काम करावें अगर एक दिवसाची मजुरी द्यावी व निर्वाह होऊन उरणाऱ्या उत्पन्नावर पंचाईत ठरवील तो कर द्यावा.

कर्मिणो मासिमासि एकैकमहः कर्म कुर्युः । नौचक्रीवंतश्च । भक्तं तेभ्यो दद्यात् । पशुहिरण्यादीनां पंचाशद्भागः ।

धर्मसूत्राणि । अ० १०

शिक्षण हें सार्वत्रिक व सक्तीनें घ्यावयाचें आहे यासाठीं त्याला लागणारा खर्च सर्वांनीं दिला पाहिजे म्हणून थोडी घरपट्टी घराच्या योग्यतेप्रमाणें घ्यावी व या उत्पन्नांत जरूर ती भर वरिष्ठ सभांनीं घालावी. पाणीपुरवठा व रस्ते सर्वोपयोगी आहेत, व त्यासाठीं दरएक मतदारानें अंगमेहनत करण्याची सोय केलीच आहे. गांवांतील स्वच्छता प्रत्येक इसमानें व कुटुंबानें ठेवावी व ही तशी ठेवण्यांत येते अगर कसें हें पहाण्याचें काम लोकांनीं अंगमेहनतीनें फुकट करावयाचें व जे कोणी तसें करणार नाहींत त्यांस शिक्षा करून तें करावयास लावावयाचें. या दंडाच्या रकमेचा खर्च गोरगरीबांस औषधपाणी देण्याकडे करावयाचा. ज्यांनीं रोग उत्पन्न करावे त्यांनींच त्यांच्या प्रतिकाराचा खर्च द्यावा हें वाजवीच आहे. गांवांतील तंटे भांडणांचा निकाल पंचांनीं फुकट द्यावा. फक्त या तंटेभांडणाचें दप्तर संभाळणें व लिहिणें वगैरेचा खर्च भांडखोर लोकांनीं द्यावा. यासाठीं भांडण जितकें लांबेल तितका त्यावर खर्च जास्त बसेल असें करावें. तसेंच हमेश भांडणाऱ्या इसमापासून जास्त खर्च घेण्यांत यावा. उदाहरणार्थ पहिल्या फिर्यादीला खर्च कमी व पुढें दरएक फिर्यादीस जास्त जास्त वाढता खर्च पडावा. न्याय देणाऱ्या पंचाखेरीज भांडणारांच्या जातीचे, धंद्याचे वगैरे लोक पंच असावे—

**कर्षकवणिकपशुपालकुसीदिकारवः स्वे स्वे वर्गे।
तेभ्यो यथाधिकारमर्थान्प्रत्यवहृत्य धर्मव्यवस्था। धर्मसूत्राणि
स्ववर्गेऽव्यवरा धर्मान्प्रब्रूयुः।**

विशेषतः शेतकरी, व्यापारी, धनगर, सराफ व कारागीर यांचे त्यांच्या व्यवहारांचे रिवाज सर्वांना ठाऊक नसतात म्हणून यांच्या भांडणांत हेच पंच हवेत. हे पंच निदान तीन असावेत. या पंचांचा सल्ला घेऊन न्याय करणारांनीं निवाडा द्यावा, व या निवाड्याची गांवकामगारांनीं बजावणी करवावी. या निवाड्यावर जिल्ह्याचे ठिकाणीं फेरतपासणी होईल व त्यांवर (देश) राजधानीच्या ठिकाणीं तक्रार चालेल. यांशिवाय आपल्या गांवांत अमुक गोष्टीची उणीव अगर अडचण आहे असें दिसलें तर कोणा धार्मिक व संपन्न इसमाच्या किंवा सरकारच्या मदतीनें ती उणीव दूर होण्यासाठीं खटपट गांवपंचांनींच करावयाची असते. भिक्षुक लोक ब्रह्मदंड घेत असतात, व्यापारी लोक धर्मादाय रक्कम काढीत असतात, शुभ प्रसंग, उत्सव वगैरेंत भूयसी व अशुभ प्रसंगीं धर्मपिंड काढण्याचा प्रघात आहे. या दानधर्मांच्या रकमांतून विहिरी, धर्मशाळा, वाचनालयें, आजाऱ्यांसाठीं रुग्णालयें, वगैरे अनाथसुखसंवर्धक कामें करावीं व अशीं झालेलीं कामें दुरुस्त व चालू ठेवावीं. याप्रमाणें रयतेवर कोणत्याहि प्रकारें मोठा बोजा न पाडतां व सर्वांच्या मदतीनें गांवांतील सर्व कामांची व्यवस्था पंचांनीं ठेवावी व पंच जो निर्णय देतील तो सर्वांनीं मानला पाहिजे असा कायदा हवा. गांवचें काम राजाचे नोकर व लोकांचे प्रतिनिधी यांच्या मतानें चाललें पाहिजे व प्रतिनिधी सांगतील त्याप्रमाणें कामगारांनीं केलें पाहिजे.

ग्रामपंचायतीकडे कोणतीं कामें सोंपविण्यांत यावींत हें वर सांगितलें आहेच. हीं कामें चांगल्या रीतीनें करतां येतील इतके गुणसंपन्न प्रतिनिधी पाहिजेत. यासाठीं ते गुण कोणते याचा तपशीलवार विचार करूं.

१ वय—प्रतिनिधींना कामें प्रत्यक्ष करून घ्यावयाचीं असतात, त्यासाठीं ते व्यवहार जाणणारे पोक्त पाहिजेत. प्रत्यक्ष कामांत नुसता तात्त्विक विचार उपयोगी पडत नाहीं. हातून कांहीं तरी व्यवहार झालेला पाहिजे.

शिवाय माणूस प्रतिनिधि निवडावयाचा म्हणजे त्याची लायकी ओळखतां आली पाहिजे. त्याचा उच्छृंखलपणा जाऊन त्यास स्थिर गंभीरपणा आला पाहिजे, त्याचा पोरकटपणा व उतावीळपणा जाऊन त्याच्या ठिकाणीं दमदारपणा आला पाहिजे व या गोष्टींची परीक्षा त्याच्या वर्तनावरून करतां आली पाहिजे. यासाठीं प्रतिनिधींचें वय पस्तीस वर्षांचें पाहिजे. इतक्या वयांत त्याच्या मागील वर्तनावरून त्याच्या पुढील वर्तनाचें धोरण जाणतां येतें. मत देणारा कसाहि असला तरी काम करणारा पोक्त पारखलेला पाहिजे. त्याचे दिमतीस तरुण मनुष्य असला तर चालेल. यासाठीं प्रतिनिधि पोक्त व त्यांचे चिटणीस तरुण असावे. प्रतिनिधींच्या अंगांत विशिष्ट धमक व ताकद पाहिजे म्हणून सत्तर वर्षांपेक्षां जास्त वयाचा प्रतिनिधि नसावा. तात्पर्य, कोणाहि प्रतिनिधीचें वय पस्तीसापेक्षां कमी अगर सत्तरापेक्षां जास्त असूं नये.

२ बंधु—प्रतिनिधि होण्याला लायक अशा दोन तरी इसमांनीं प्रतिनिधींची शिफारस केली पाहिजे. मतदार तरुण अननुभवी असतात. सबब त्यांची शिफारस या ठिकाणीं ग्राह्य नाहीं. यानंतर मतें घेतल्यावर ज्यांना ज्यास्त मतें मिळतील ते इसम निवडून येतील. गांवांतील सहा कामें या पंचायतीकडे सोंपवावयाचीं आहेत. सबब दरएक गांवांत निदान सहा प्रतिनिधी निवडले पाहिजेत व एकंदर तीस सभासद निवडले म्हणजे पुरे. यासाठीं दर चाळीस माणसांस एक किंवा स्थूलमानानें शेंकडा दोन इसम याप्रमाणें प्रनिनिधि होण्यास लायक इसम निवडावे व या निवडलेल्या लोकांपैकीं गांवच्या कामाला लागत असतील तितके प्रतिनिधी मतदारांनीं पसंत करावे. जास्त बंधू असलेले असेच लोक शेवटीं निवडून येणार पण पहिल्यानें प्रत्येक उमेदवाराला दोन तरी बंधू पाहिजेत.

३ वित्त—आपलें स्वतःचें पोट भरतां येईल इतकी तरी मिळकत प्रतिनिधीची हवी. यासाठीं वर्षांकाठीं तीन रुपये शेतसारा अगर घरभाडें व कांहीं तरी गांवपट्टी भरणारा हा इसम असला पाहिजे. ज्याचे पैसे त्याच्या मतानें खर्च झाले पाहिजेत, यासाठीं जो इसम गांवपट्टी भरतो तो प्रतिनिधि होण्याला लायक. गांवचें सुखदुःख गांवांतील सर्व लोकांनीं पहावें हें योग्य. पण त्यासाठीं खर्च होणारा पैसा जे देतात त्यांच्या मतानें

तो खर्च झाला पाहिजे. परस्पर हलवायाच्या घरावर तुळशीपत्र असें होतां कामा नये.

४ **विद्या**—गांवपंचायतींत काम करणाऱ्या प्रतिनिधींना पत्रें लिहिणें व वाचणें, जमाखर्च व हिशोब, देशाची परिस्थिति व राज्यव्यवस्था, व लोकांच्या चालीरीती व धर्म यांची माहिती पाहिजे. प्राथमिक मोफत व सक्तीच्या शिक्षणांत खालील गोष्टी अवश्य शिकविल्या पाहिजेत.

१ व्यवहार–यासाठीं व्यवहारदर्पण म्हणून पुस्तक करावें.
२ नीति–यासाठीं नीतिपाठ म्हणून पुस्तक पाहिजे.
३ धर्म–यासाठीं धर्मरचना नांवाचें पुस्तक करवावें.
४ व्यापार–व्यापारी माहिती देणारें व्यापारी पुस्तक पाहिजे.
५ राष्ट्रकार्य–राज्यव्यवस्थेची माहिती देणारें पुस्तक पाहिजे.

इतक्या गोष्टी प्रत्येक मुलाच्या कानावरून गेलेल्या पाहिजेत व या गोष्टींचें ज्ञान असलेलाच इसम प्रतिनिधि होण्यास लायक होय. याशिवाय शिक्षणावर देखरेख ठेवणारीं माणसें निदान मराठी शिक्षण पुरें केलेलीं पाहिजेत.

५ **आचरण**—हें प्रत्येक प्रतिनिधीचें अत्यंत महत्त्वाचें अंग होय. प्रतिनिधि निवडावयाचा तो सदाचरणी पाहिजे. निदान तो सप्तव्यसनांकित नसावा.

मृगया द्यूतं स्त्रियाः पानमिति चतुर्वर्गः कामजः ।
वाक्पारुष्यं अर्थदूषणं दंडपारुष्यमिति त्रिवर्गः कोपजः ।

शिकार, जुगार, रांडबाजी व कैफ हीं चार व शिवीगाळ, चोरी, (हाताळपणा) व मारामारी हीं तीन अशीं सात व्यसनें प्रतिनिधींना असतां उपयोगी नाहींत. या सात व्यसनांच्या आधीन असणारा इसम प्रतिनिधि होण्यास नालायक होय.

व्यस्यति एनं श्रेयसः तद्व्यसनं ।

जें श्रेयस्कर काय याचा विचार करावयाला सवड देत नाहीं व एकदम काम करावितें तें व्यसन अशी व्यसनाची व्याख्या केली आहे व असा इसम या व्यसनामुळें अयोग्य कर्म करण्याचा संभव असतो म्हणून तो

प्रतिनिधित्वाला नालायक समजावयाचा. जो स्वतःचें कल्याण अकल्याण पाहूं शकत नाहीं तो दुसऱ्याचें कसें पाहणार हें उघडच आहे. 'सप्तव्यसन-वर्जितः ' सात व्यसनांपासून अलिप्त असेल तो मनुष्य भला मनुष्य म्हणावा.

तात्पर्य, ज्याच्या हातीं लोकांनीं आपली सर्व सत्ता ठेव म्हणून द्यावयाची तो इसम चांगला, तशाच योग्यतेचा पाहिजे. कोणी तरी केवळ मतदार होण्यास लायक असा इसम प्रतिनिधि होण्यास लायक समजणें, त्यानें भिकाऱ्याप्रमाणें दारोदार मतांची भीक मागत फिरणें, सूक्तासूक्त वाटेल त्या रीतीनें मतें मिळविणें, त्यासाठीं वाटेल तीं वचनें देणें वगैरे दोष हल्लींच्या निवडणुकीच्या पद्धतींत आहेत. आपण सर्व चांगले वाईट सारख्या योग्यतेचे अशी भलतीच समजूत सर्व मतदारांची झाल्यामुळें हल्लींच्या प्रातिनिधिक संस्थांचें समाजसत्तेंत (सोशिआलिझम, बोल्शेविझम वगैरे) रूपांतर होतें. हे दोष आपल्या पूर्वजांनीं मोठ्या चातुर्यानें घालविले होते. अनेक स्वाऱ्या, लढाया, आपसांतील द्वेष वगैरेंमुळें त्या संस्था मोडकळीस येऊन मोडल्या. ही गोष्ट निराळी. पण त्यांची रचना नमुनेदार असून ग्रीक संस्थानांनीं ती त्या काळीं उचलली तें योग्यच केलें. पुढें सुद्धा आपण तीच पद्धति स्वीकारली पाहिजे तरच आपलें कल्याण होणार आहे.

प्रकरण चौदावें

नगराधिपत्य MUNICIPAL BODIES

मागील प्रकरणांत आपल्या शरीरापासून तों थेट अखिल विश्वापर्यंत एकावर एक राजसंस्थांच्या कशा पायऱ्या आहेत हें आपण पाहिलें. दहापांच माणसें म्हणजे एक कुटुंब, दहापांच कुटुंबें म्हणजे एक आळी अगर वाडी, दहापांच आळ्या म्हणजे एक पेंठ किंवा गांव व दहापांच गांवें म्हणजे एक नगर हें कोष्टकहि तेथें दिलें आहे. नगराची व्याख्या शिल्पशास्त्रकारांनीं खालीलप्रमाणें केली आहे.

(१) **नगराणि करवर्जितानि यंत्रसाराणां निगमवणिजां च स्थानानि । भृगुसंहिता.**

(२) **विस्तीर्णमध्यो नगरः सममध्य चतुष्पथः ॥**
प्रपामंडपापणादिवनोपवनशोभितः ॥ कश्यपसंहिता.

(३) **नगरं राजवरालयसर्व जनावासरक्षकैः सहितं । मयमत.**

(४) **नवांगं नगरं प्राहुः**

या चार व्याख्यांत नगरांचे चार प्रमुख गुण सांगितले आहेत ते असे.

(१) ज्या जमीनीच्या भागावर राजाकडून कर घेतले जात नाहींत व जो भाग कारखानदार व अडत्ये यांनीं वसलेला असतो त्या भागाला नगर म्हणावें. या व्याख्येंत स्थानिक स्वराज्याची अगर लोकांनीं आपल्या कामासाठीं आपणच कर बसवून घेण्याची कल्पना प्रमुख असून हे लोक म्हणजे मोठमोठे कारखानदार व व्यापारी असावे असें सांगितलें आहे. इनामदार, संस्थानिक वगैरे लोक आपल्या कामासाठीं आपल्यावर कर बसवून घेतील पण तसलें क्षेत्र नगर नव्हे हें यांत उघड केलें आहे. तात्पर्य जेथें मोठा व्यापार चालतो व जेथील लोक स्वतःची व्यवस्था स्वतः करतात तें नगर अशा दोन अटी या व्याख्येंत आहेत. यावरून ज्या मुलखांत

भृगू होते तेथें व्यापारावर भर असून लोकसत्तापद्धति रूढ होती असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं.

२ कश्यपांनीं नगरांत विस्तीर्णपणा व मोठे वाडे यांवर भर दिला असून शोभेकडे पाहिलें आहे. यांतहि प्रपा (पाणीपुरवठा) मंडप (धर्मशाळा), आपण (बाज़ार) वगैरे व्यापारी बाबींना प्रमुखपणा दिलेला आहेच. पण त्या ठिकाणीं कर वगैरे बसविण्याच्या सत्तेचा उल्लेख नाहीं. यामुळें या नगरांत राजसत्ता नांदत असण्याचा पुष्कळ संभव आहे. मोठी लोकसंख्या, मोठा विस्तार व रस्ते वगैरे व्यापारास लागणाऱ्या सोई इतक्या गोष्टी असल्या म्हणजे ती जागा कश्यपांच्या मताप्रमाणें नगर झाली.

(३) मयांच्या मताप्रमाणें न्याय देण्याचें काम होणें, सर्व प्रकारच्या लोकांची वस्ती असणें व आपलें स्वतःचें संरक्षण करतां येणें या तीन गोष्टींवरच भर दिला आहे. यांत स्वतःचें संरक्षण करणें व न्याय देणें या गोष्टी भांडखोरपणा व्यक्त करीत असून लोकसत्तेशीं संबंध दाखवितात.

(४) चौथ्या व्याख्येंत नगराची नऊ प्रमुख खातींच सांगितलीं आहेत. ती अशीं—

१ **प्रपा–प्रकामंपीयते अस्यां**–पिण्याच्या पाण्याचा पुरवठा.
२ **मंडप–मंडपानि**–धर्मशाळा, विश्रांतीची जागा, विसांवा.
३ **आपण–प्रकामं पणयति**–देवघेव करण्याची जागा, बाजार.
४ **राजवरालय**–न्यायाच्या कचेऱ्या, राजाच्या प्रतिनिधींची बैठक.
५ **सर्वजनवास**–सगळ्यांची वस्तीची जागा, पेठवस्ती.
६ **रक्षक**-पहारेकरी, चौकीदार.
७ **स्मशान**–निरुपयोगी जिनसा टाकण्याची जागा, मसणवट.
८ **देवालय**–देवाची जागा, धार्मिक गोष्टी करण्याचें स्थान.
९ **वनोपवन**–वनांत विचार व उपवनांत आचार यांचें शिक्षण.

तात्पर्य, या नऊहि गोष्टी जेथील लोकांना मुखत्यारीनें व स्वतंत्रपणें करतां येतात तें नगर. या चार व्याख्यांवरून आपणांस लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी म्हणजे—

(अ) स्वतःचे कर व त्यांची व्यवस्था स्वतः करण्याचा अधिकार असणें.

(आ) हा अधिकार चालविण्यापुरती संपत्ति मिळवितां येईल अशी व्यापार वगैरेमुळें सांपत्तिक स्थिति असणें.

(इ) शत्रु वगैरेपासून संरक्षण करण्याची शक्ति असणें. हीं तीन नगरपणा येण्यास अवश्य अशीं साधनें होत.

वर जे नगराचे मुख्य नऊ भाग सांगितले त्यांचें सामान्य स्वरूप सांगून मग त्याबाबद कशी व्यवस्था ठेवीत हें आपण पाहूं.

(१) प्रपा. त्या वेळीं बहुधा घरोघर विहिरी असत. " आधीं जल व मग स्थल " अशी आपली म्हण आहे. पण जेथें घरोघर विहिरी असणें शक्य नसे, जेथें गोरगरीबांना विहिरी पाडणें शक्य नाहीं तेथें दरएक मोहल्यांत एक हौद बांधण्यांत येई. या हौदाचा आकार त्या आळींतील लोकसंख्येवरून ठरवीत असत. ब्राह्मण माणसाला नऊ घागरी पाणी, क्षत्रियाला सात, वैश्याला पांच, शूद्राला तीन व अंत्यजाला एक याप्रमाणें माणशीं पाण्याचा हिशोब करून याप्रमाणें हौदाचें माप ठेवण्यास शिल्पशास्त्रकारांनीं सांगितलें आहे.

सांडपाण्याची व्यवस्था 'प्रपा' या खात्याकडेच असे. ही सांडपाण्याची गटारें 'मुकुलाकार' म्हणजे खालीं चिवळ व वर रुंद अशीं असून तीं माणूस आंतून जाईल इतकीं तरी मोठीं ठेवीत असत. मोठ्या शहरांत—

भांडवाहिनीः कुल्याः कारयेत् ।

आंतून नावा जातील येवढीं मोठीं गटारें ठेवण्यास सांगितलें असून प्रत्येक घरवाल्यानें आपल्या घराचें सांडपाणी रस्त्यांतील मोठ्या गटारास मिळविलें पाहिजे, नाहीं तर त्यास दंड असें कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत नमूद केलें आहे. तें असें—

त्रिपदीप्रतिक्रांतं अत्यर्धं अरत्नीं वा प्रवेश्य गाढप्रसृतं उदकमार्गप्रस्रवणं प्रघातं वा कारयेत् । ३-८-६१

जमीनीच्या खालीं हात दीड हात खोलीवर गुळगुळीत एका ढाळाचे अगर पायऱ्या पायऱ्याचें असें सांडपाण्याचें गटार करावें. असें गटार न केलें तर—

तस्यातिक्रमे चतुष्पंचाशत्पणो दंडः ।

चौपन्न पण दंड होईल. याप्रमाणें प्रपा—पाणीपुरवठ्याला अनुसरून मोठमोठीं गटारें मात्र सरकार बांधीत असे.

(२) **मंडप** हे नगरांत क्षौर मंडपापासून नाड्य मंडपापर्यंत अनेक प्रकारचे असत ते असे—

वासार्थमंडपं चैव यागमंडपमेवच ।
अभिषेकादियोग्यं च नृत्तमंडपकं तथा ॥
वैवाहिकं च मैत्रं च तथोपनयनार्हकं ।
आस्थानमंडपं चैव बलालोकनमंडपं ॥
संधिकार्यार्हकं क्षौरं भुक्तिकर्म सुखान्वितं ॥मयमत॥अ.२५

(१) प्रवाश्यांना उतरण्यासाठीं, (२) यज्ञ करण्यासाठीं, (३) अभिषेक (सन्मान) करण्यासाठीं, (४) नाचासाठीं, (५) विवाहासाठीं, (६) मैत्रीसाठीं, (७) उपनयनासाठीं, (८) सांठविण्यासाठीं (कोठारें), (९) कवाईत, कुस्त्या व सामने पाहण्यासाठीं, (१०) भांडणें मिटविण्यासाठीं (लवाद), (११) हजामतीसाठीं, (१२)फराळ व (१३)आराम करण्यासाठीं, इतक्या प्रकारचे मंडप असून त्यांना अनुक्रमें १ मेरुक, २ विजय, ३ सिद्ध, ४ पद्मक, ५ भद्रक, ६ शिव, ७ वेद, ८ अलंकृत (कुलुपांचे), ९ दर्भ (कवाईत) कौशिक (कुरूपा) व कुलधारी (सामने), १० सुखांग, ११ सौख्यक, १२ गर्भ किंवा माल्य व १३ माल्याद्भुत अशीं नांवें आहेत. या मंडपांत त्या त्या कामांना अनुरूप अशी योजना व रचना केलेली असे.

रस्त्यांची रचना व दुरुस्ती हीं कामें या मंडपखात्याकडे असत. नगराच्या वेशीच्या आंतले रस्ते या खात्याकडे असून त्या रस्त्यांत ब्रह्माख्य (साधारण) रस्ते, राजाख्य (दरवाजे असलेल्या आळ्या) कुटिमकाख्य किंवा मंगल (मिरवणुकीचे), रथ्या (गाड्यांच्या रहदारीचे), व महापथ

(मुख्य रस्ते, ट्रंकरोड) असे प्रकार होते. व या रस्त्यांच्या बाजूला काय असावें म्हणजे दुकानें कोणच्या रस्त्यांवर, श्रीमंत लोकांचीं घरें कोणत्या रस्त्यांवर, नाटकें वगैरेंच्या जागा कोणच्या रस्त्यांवर, वेश्यांचीं दुकानें कोणच्या रस्त्यांवर हें ठरविलेलें असे. मंगल, रथ्या व महापथ या रस्त्यांवर दुकानें (किरकोळ जिनसांचीं दुकानें) घालण्याची बंदी होती. रेशमी कापड, सोनें, चांदी, जवाहीर वगैरेंचा मात्र या रस्यांवर व्यापार चाले.

(३) आपण—नगराच्या प्रमुख भागांत एक एक आपण (मार्केट) असे. त्या ठिकाणीं अमक्या दिशेला व अमक्या भागांत अमुकच जिनसांचा व्यापार चालावा असें ठरलेलें असें. गांव किंवा बाजार यांच्या सभोंवार जो रस्ता असे त्याला प्रदक्षिणा किंवा ब्रम्हावृत पथ म्हणत व त्यांतील व्यवस्थेचा नमुना खाली दिला आहे. यांत देशपरत्वें थोडा फार भेद आहे.

महेंद्राद्यग्न्यंतं भक्ष्यं भोज्यं च निर्दिष्टं ॥
अग्न्यादिपितृगृहपर्यंतं तत्र भांडानि ॥
तस्मान्निर्ऋतिपदांतं कंसादिकमत्र विज्ञेयं ॥
स्यात्पुष्पदंतभागांतं पितृभागादि वस्त्रादि ॥ मयमत। अ० १०

पूर्वेपासूत आग्नेयीपर्यंत खाण्यापिण्याच्या जिनसा, आग्नेयीपासून दक्षिणेपर्यंत भांडीं, दक्षिणेपासून नैर्ऋत्येपर्यंत धातू किंवा वस्त्रें वगैरे याप्रमाणें बाजाराची रचना असे. बाजारांत वजनें, मापें व माल यांची तपासणी दर सहा महिन्यांत तरी एकदां करीत.

तुला मानं प्रतीमानं । सर्वं च स्यात्सुलक्षितं ॥
षट्सु षट्सु च मासेषु । पुनरेव परीक्षयेद् ॥ मनु । अ० ८

याच आपणखात्याकडे शुल्क (जकाती) यांची व्यवस्था असे. आंत येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या अशा दोन्ही मालांवर जकात घेत व ती रोजची रोज चुकवावी लागे.

निष्क्राम्यं प्रवेश्यं च शुल्कं । बाह्यमाभ्यंतरं च आतिथ्यं । द्वारादेयं शुल्कपंचभागं आनुग्राहिकं वा यथादेशोपकारं स्थापयेद् । प्रवेश्यानां मूल्यपंचभागः । कौटिल्य. २।२२।४०

आंत येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या मालावर जकात, ती जकात आंतील असो अगर बाहेरील असो माल आल्यावेळीं दिली पाहिजे. आंत येणाऱ्या मालावर किंमतीचा पांचवा हिस्सा जकात घ्यावी. ही दारावर घ्यावयाची जकात मेहरबानी म्हणून किंवा दुसऱ्याशीं आपला जसा संबंध असेल तशी कमीजास्त ठेवावी.

क्रयविक्रयमध्वानं भक्तं च सपरिव्ययं ॥
योगक्षेमं च संप्रेक्ष्य वणिजो दापयेत्करान् ॥ मनु । ७।१२७

खरेदी, विक्री, वहातूक, व्याज, नोकर वगैरे खर्च व जिन्नस मिळविण्यास व संभाळण्यास पडलेला त्रास या गोष्टी विचारांत घेऊन जकात ठेवावी असा परिपाठ होता व परदेशाशीं जकात जशास तशी ठेवीत. "पण्यानां स्थापयेत् शुल्कं अत्ययं चापकारतः" हा त्या काळचा नियम होता.

(४) राजवरालय—नगरांतील व्यवस्थेसंबंधानें खालील प्रकारचे नियम अंमलांत होते व त्या नियमांबाबद चौकशी पंचांमार्फत होई.

(१) पांसुन्यासे रथ्यायामष्टभागो दंडः पंकोदकसन्निरोधे पादः ।
(२) पुण्यस्थान उदकस्थान देवगृह राजपरिग्रहेषु पणोत्तराविष्टा दंडाः । मूत्रेष्वर्धदंडाः । भैषज्यव्याधिभयानिमित्तं-अदंड्याः ।
(३) स्मशानादन्यत्र (प्रेतादीनां) न्यासे दहने च द्वादशपणो दंडः ।
(४) विनीतं भक्षयित्वा अवसृतानां उष्ट्रमहिषाणां पादिकं रूपं गृण्हीयुः । भक्षयित्वा निषण्णानां द्विगुणः परिवसतां चतुर्गुणः ।
(५) सस्यभक्षणे सस्योपघातं निष्पत्तितः परिसंख्याय द्विगुणं दापयेत् ।
(६) प्रणालीमोक्षो (रथ्यायां) वर्षति (देवे) अन्यथाद्वादशपणोदंडः ।

मोठ्या रस्त्यावर कचरा टाकला तर दोन आणे दंड, पाणी आडून चिखल झाला तर चार आणे, पवित्र जागा (समाधि वगैरे), उदकस्थान

(पाणवठे), देवगृह (देऊळ), राजपरिग्रह (कचेऱ्या वगैरे) या ठिकाणीं शौच केल्यास एक रुपया व लघ्वी केल्यास आठ आणे दंड. रोगी, औषध व भीति यामुळें शौच अगर लघ्वी झाली तर माफ. प्रेतें वगैरे घाण स्मशानाशिवाय इतरत्र ठेवली अगर प्रेत भलत्याच ठिकाणीं जाळलें तर बारा रुपये दंड. गवत खाऊन उंट, म्हशी वगैरे गेलीं तर चार आणे दंड (जातां जातां खाल्लें तर), खाऊन बसलीं तर आठ आणे व तेथेंच राहिलीं (वस्तीस) तर रुपया दंड. पेरलेलें धान्य खाल्लें तर किती नुकसान झालें याचा अंदाज करून त्याच्या दुप्पट भरून देववावें. मोठ्या रस्त्यावर पाऊस पडत असेल तेव्हां मात्र पन्हाळी पडाव्या. एरवीं घरांतून पाणी वगैरे रस्त्यावर पडेल तर बारा रुपये दंड; वगैरे शिक्षा कौटिल्य इत्यादि शास्त्रकारांनीं सांगित्या आहेत. याबाबद मनुस्मृतींत खालील श्लोक आहेत.

न मूत्रं पथि कुर्वीत ।
नाप्सु मूत्रं पुरीषं वा ष्ठीवनं वा समुत्सृजेत् ॥
दूरादावस्थान्मूत्रं दूरात्पादावसेचनं ॥
उच्छिष्टान्नाविषेकं च दूरादेव समाचरेत् ॥ मनुस्मृति । अ० ४

तसेंच पंचांसंबंधानें खालील धर्मसूत्र पहा—

कर्षकपशुपालवणिक्कुसीदकारवः स्वेस्वेवर्गे । धर्मसूत्र.

शेतकरी, धनगर, वाणी, सावकार व कारागीर यांचा न्याय त्यांच्याच पुढें व्हावा.

(९) सर्वजनवास. गांवांतील पेठांत कोणती वस्ती कोठें असावी याबद्दल निर्बंध होते. ते नमुन्यासाठीं खाली दिले आहेत.

(१) अग्निजीविनः एकस्थाने वासयेद् । कौटिल्य.
(२) वैश्यानां दक्षिणतः परितः सदनं तु शूद्राणां ॥
प्राच्यां वाप्युत्तरतो गेहं कुर्यात्कुलालानां ॥
मत्स्योपजीविनां स्याद्वासो वायव्यदेशेच ॥
पश्चिमदेशे मांसैरुपवृत्तीनां निवासः स्यात् ॥ मयमत अ० १०

(३) प्रधानकारवश्च क्षत्रियाश्च पूर्वां दिशामधिवसेयुः।
वैश्याश्च दक्षिणां दिशां, शूद्राः पश्चिमां, ब्राम्हणाश्चोत्तरां
दिशं। कौटिल्य। अ० २२

(४) वैश्यानां वणिजां प्राच्यां मध्ये राजापणो भवेत् ॥
प्रागुदीच्यां कुलालानां वापकानां च तत्रहि ॥
जालिकानां तु वायव्ये सूनानां पश्चिमे गृहं ॥
तैलविक्रयिणां सौम्ये तक्ष्णां वाप्यनिले नले ॥ शिल्परत्न
अ० ५

विस्तवाशीं कामें करणारे लोक (लोणारी, लोहार, भट्टयावाले) हे एका ठिकाणीं वसवावे. मयांच्या मताप्रमाणें वैश्य (वाणी) दक्षिणेस, शूद्र सभोंवार, पूर्व किंवा उत्तरेस कुंभार, मासे मारणारे कोळी वायव्येस, मांस विकणारे पश्चिमेस वगैरे रचना असावी. कौटिल्य (कश्यप) यांचे मताप्रमाणें उत्तरेस ब्राम्हण, पूर्वेस क्षत्रिय, दक्षिणेस वैश्य व पश्चिमेस शूद्रांची वस्ती असावी. शिल्परत्नकार (भृगू) यांच्या मताप्रमाणें पूर्वेस वैश्य, इशान्येस कुंभार व वापक (मासे मारणारे) जालिक वायव्येस, सून (मांस विक्रयी) पश्चिमेस, तेली उत्तरेस व आग्नेय किंवा वायव्येस सुतार वगैरेची वस्ती असावी. याप्रमाणें देशपरत्वें नगररचना निराळ्या प्रकारें होती. याप्रमाणें जातवार व धंदेवार पेठा असून पेठावार नगर प्रणिधि (सभासद) निवडीत असत. दरएक पेठेंत एक एक देऊळ व तें सर्व घरांपेक्षां उंच असावें लागे.

देवागारान्नराणामतिशुभदमिदं किंचिदूनं समं वा।
तस्मादभ्युन्नतं वा द्वितलविधिरपि नेष्यते तत्समीपे ॥

देवळाशेजारीं ठेंगणीं घरें असून कोणास उंच घर करणें तर त्यानें पहिल्यानें देऊळ उंच करावें व मग घर उंच करावें. पेठेंतील घरांच्या स्थितीवरून पेठेंतील लोक व धंदे यांची सुस्थिति समजून येत होती.

(६) रक्षक—नगरांचें रक्षण करण्याचें काम नगरांतील लोक करीत. त्यांत क्षत्रिय हे पगारी नोकर असून ब्राह्मण हे स्वयंसैनिक होते. या ब्राह्मण स्वयंसैनिकांना केव्हां बोलावावें याबाबद मनूनें खालील नियम सांगितला आहे.

शस्त्रं द्विजातिभिर्ग्राह्यं धर्मो यत्रोपरुध्यते ॥
द्विजातीनां च वर्णानां विप्लवे कालकारिते ॥
आत्मनश्च परित्राणे, दक्षिणानां च संगरे ॥
स्त्रीविप्राभ्युपपत्तौ च घ्नन् धर्मेण न दुष्यति ॥ मनु । अ० ८

ज्यावेळीं धर्माला (समाजव्यवस्थेला) बाध येतो तेव्हां ती नीट ठेवण्यासाठीं सर्व त्रैवर्णिकांनीं हत्यारें हातीं घ्यावीं. फक्त ब्राह्मण व क्षत्रिय हे दोनच वर्ण धंद्यापासून व व्यवहारापासून अलिप्त ठेवण्यांत आल्यामुळें जरी त्रैवर्णिकांना परवानगी असली तरी दोनच वर्णांना वाटेल त्या वेळीं शस्त्रग्रहण शक्य होतें. आपल्या जीवाचें रक्षण करण्यासाठीं, परदेशाशीं लढतांना (मनु उत्तरेकडचा म्हणून तो दक्षिणेला परदेश म्हणतो व मराठेशाहींत उत्तर हिंदुस्थान परदेश समजला जाई व त्या लोकांना 'परदेशी' हे नांव दक्षिणेंत अद्याप रूढ आहे) बायका व ब्राह्मण यांचा छळ होईल तर वाटेल त्यानें हत्यार घेऊन प्रतिकार करावा, अशी व्यवस्था मनूनें सांगितली आहे. कर म्हणजे रक्षणाचा विमा उतरल्याची वार्षिक फी (हप्ता) असें तेव्हां समजत व चोरीस गेलेलें द्रव्य राजाला भरून द्यावें लागे.

(१) चोरहृतं अविद्यमानं द्रव्यं स्वद्रव्येभ्यः प्रयच्छेत् । कौटिल्य.
(२) अरक्षितारं राजानं बलिषड्भागहारिणं ॥
तमाहुः सर्व लोकस्य समग्रमलहारकं ॥ मनु । अ० ८

चोरांनीं द्रव्य नेलें तर तें राजानें भरून द्यावें व तो तसें न करील तर सगळ्या लोकांत त्याची बेअब्रू होईल. हे पगारी रक्षक वेशींवर व नाक्यांवर जागोजाग उभे असत.

नगरे नगरे चैकं कुर्यात्सर्वार्थचिंतकं ॥ मनु । अ० ७

प्रत्येक नगरांत सर्व रक्षकांचा एक प्रमुख असावा व त्यानें नेहमीं शहरांत काय चाललें आहे हें लक्षपूर्वक पहात असावें व वाईट होत असेल त्याचा प्रतिकार करावा.

(७) स्मशान—स्मशान म्हणजे नुसती प्रेतें जाळण्याची किंवा पुरण्याचीच जागा नव्हे तर गांवांतील घाण वगैरे टाकण्याचीहि जागा होय.

प्रागुत्तरदिशि दंडैः पंचशतैः स्याच्छवावासं ॥
शेषाणामपि तत्र दूरे देशे स्मशानं स्याद् ।
चांडालचर्मकारस्मशानतोयाशयापयानं स्याद् ॥ मयमत अ० ९

गांवाच्या ईशान्येस पांचशें दंड अंतरावर प्रेतें पुरणें अगर जाळण्याची जागा असावी व गांवांतील कचऱ्यासाठीं गांवापासून पुष्कळ अंतरावर एक स्मशान (डेपो) असावा. चांडाल (भंगी), चर्मकार (ढोर) व स्मशान (घाणीचे सांठे) हे पाण्याच्या सांठ्यापासून लांब असावे.

चांडालयोषितस्तास्ताम्रायःसीसभूषणाः सर्वाः ॥
पूर्वाह्णे मलमोक्षक्रियोचिता ग्राममाविश्याः ॥ मयमत । अ० ९

भंग्यांच्या बायकांच्या अंगावर तांबें व शिसें यांचे दागिने असावे व त्यांना गांव साफ करण्याकरतां सकाळीं गांवांत येऊं द्याव्या. बाकी त्यांनीं गांवापासून दूर रहावें.

चांडालकुटीराणि पूर्वायां क्रोशमात्रे स्युः ॥ मयमत । अ० ९

भंग्यांच्या झोंपड्या गांवापासून कोसभर दूर पूर्वेकडे असाव्या असे मयाचें मत आहे. याबाबद भृगूचें व कश्यपाचें मत थोडें भिन्न आहे, तें असें—

(१) क्रोशद्वये वातस्यार्धे बहिश्चांडालपक्कणं ॥
प्रागुत्तरेण च क्रोशाद्बहिः पितृवनं भवेद् ॥
नदीसमीपे शैलेवा स्मशानं दूरतो भवेद् ॥ भृगुसंहिता,
(२) उत्तरः पूर्वो वा स्मशानवाटः । दक्षिणेन वर्णोत्तराणां ।
पाषंडचांडालानां स्मशानांतेवासः । कौटिल्य २-४-२३

ईशान्येकडे कोस दोनकोसांवर मसणवटी व चांडालांची वस्ती असावी. ही जागा गांवापेक्षां उंच असूं नये.

मसणवटी उत्तरेस अगर पूर्वेस असून तींत उंच वर्ण उत्तरेस व हलके दक्षिणेस अशी व्यवस्था असावी पाखंडी व चांडाल हे लोक स्मशानाजवळ वसवावे. प्रत्येक घराला शौचकूप नैऋत्येस पण सबंध गांवाची घाण ईशान्येस अशी व्यवस्था हिंदी शास्त्रकारांना मान्य आहे.

(८) **वनोपवन गोशाला दक्षिणतश्चोत्तरदेशे च पुष्पवाटी स्यात्॥**
पूर्वद्वारोपांते पश्चिमतस्तापसावासं ॥
सर्वत्रैव जलाशयमिष्टं वापी च कूपं च ॥ मयमत । अ० ९
वने वा नगरोपांते नागरैश्चजनैर्वृतं ॥
क्षेत्रारामाकरोपेतं शाखानगरमिष्यते ॥ शिल्परत्न, भृगु. ५

मयांच्या मताप्रमाणें गांवचीं गाईचीं खिल्लारें दक्षिणेस असून पूर्वेच्या वेशीजवळ उत्तरेकडे बागा असाव्या व पश्चिमेस तपश्चर्या करणारे ब्राह्मण व त्यांच्या शाळा असाव्या. गांवांत तळीं, विहीरी वगैरे पाण्याचीं साधनें जागोजाग असावीं. भृगूंच्या मताप्रमाणें नगराच्या पश्चिमेस नगरापासून लांब अगर जवळ शेती, बागा, खाणी यांनीं युक्त असें 'शाखा नगर' असावें व त्यांत शिक्षणसंस्था असाव्या. शिक्षणसंस्था नगराच्या बाहेर लांब वनांत व त्यांत शेती वगैरे करण्यासाठीं शेजारचा (उप) भाग (वन) अशी व्यवस्था होती. या वनांशीं नागरिकांचा नेहमीं संबंध असे.

(१) लहानपणीं स्वतः तेथें शिकणारे शिष्य म्हणून.
(२) मोठेपणीं आपलीं मुलें तेथें आहेत म्हणून.
(३) म्हातारपणीं संसाराचा कंटाळा आला म्हणून.

व यामुळें वनांत जाणें त्यावेळीं कठीण वाटत नसे. हल्लींसुद्धां हल्लींच्या परिस्थितीप्रमाणें शाळा व कालेजें नगराबाहेर नगरापासून लांब ठेवलीं व पेनशन घेतलेले वगैरे वृद्ध तेथें राहूं लागले तर या जागांना थोरवी येईल. विद्यार्थ्यांना म्हाताऱ्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा मिळेल, तरुण लोक सल्लामसलतीसाठीं तेथें येतील, म्हातारे आपला जन्माचा व्यासंग तेथें पुढें चालवितील व याप्रमाणें या जागा म्हणजे ज्ञानाचीं केंद्रस्थानेंच बनतील. श्रीमंतांच्या चैनी बंद झाल्या म्हणजे त्या बचतींत गरीबांचें

संगोपन होईल व ही 'शाखा नगरें' म्हाताऱ्यांचीं गांवें या नांवानें अनेक प्रकारें आदर्शभूत होतील. कोणाही इसमानें चैन, अनीति वगैरे गोष्टी तेथें आणूं नयेत असा निर्बंध पाहिजे. 'विनीतवेषेणैव प्रवेष्टव्यानि तपोवनानि नाम'.

(९) देवालय–प्रत्येक पेठेंत एक एका देवाचें प्रमुख देवालय असे व हीं देवालयें त्या त्या वस्तीच्या अनुरोधानें ठरलेलीं असत. तीं अशीं–

(१) अपराजित, अप्रतिहत, जयंत, वैजयंत कोष्ठकान्
शिववैश्रवण, अश्वि, श्रीमदिरागृहं च पुरमध्ये कारयेत् ॥
कौटिल्य । २-४-२२

(२) इंद्रश्च वासुदेवो गुहो जयंतश्च वैश्रवणः ॥
आश्विन्यौश्रीमदिरे शिवश्च दुर्गासरस्वती चेति ॥
मयमत । अ० १०

(३) पूर्वादि दिक्षुक्रमशः स्थिताः स्युः ।
तथार्यमश्चापि पुनर्विवस्वान् ॥
मित्रश्च पश्चाच्च महीधराख्यः ।
ब्रम्हाच मध्यस्थचतुष्पदस्थः ।

१ कौटिल्य (कश्यप) यांच्या मतानें शिव, वैश्रवण (कुबेर) अश्विनीकुमार व श्री (लक्ष्मी) यांची पूर्व, दक्षिण, पश्चिम व उत्तरेस; मदिरादेवीचें गांवामध्यें व अपराजित, अप्रतिहत, जयंत व वैजयंत यांचीं आग्नेय, नैर्ऋत्य, वायव्य व ईशान्य भागांत देवळें असावीं.

२ मयांच्या मताप्रमाणें नगराचे अक्रा भाग करून त्यांत इंद्र, वासुदेव, गुह कार्तीकस्वामी, जयंत, वैश्रवण, अश्विनीकुमार, श्री, मदिरा, शिव, दुर्गा व सरस्वती यांचीं देवळें असावीं.

३ भृगूंच्या मताप्रमाणें पूर्वेस अर्यमा, दक्षिणेस विवस्वान्, पश्चिमेस मित्र व उत्तरेस महीधर यांचीं देवळें असून मध्यें ब्रह्मदेवाचें देऊळ असावें. उपदिशांचे ठिकाणीं शर्व, स्कंद, जत्रक, व पिलिपिंझक यांचीं देवळें असावीं व वेशीच्या बाहेर चरकी, विदारी, पूतना व पाप राक्षसी यांचीं देवळें असावीं.

या देवळांत प्राथमिक शिक्षण मिळे, उत्सव वगैरेंत सर्वजण भाग घेत व त्यामुळें स्वयंसेवकत्वाचें व जुटीनें कामें करण्याचें शिक्षण मिळे. उत्सवांत कारागिरीला उत्तेजन असे. देवळांत रोज सायंकाळीं पुराण असून तें ऐकण्यास व देवदर्शन घेण्यास सर्व येत. पांथस्थ देवळांतच ओऱ्यांत उतरत व त्या ठिकाणीं गांवकरी व पांथस्थ यांचे विचारविनिमय होत. तात्पर्य, देवळें म्हणजे एक प्रकारचे (क्लब) अड्डेच होते. गांवाचीं सर्व कामें येथें ठरत, सर्व चळवळींचें केंद्र येथें होतें. सार्वजनिक निवडणुकी वगैरे देवळांतच देवासमोर (देवाग्निद्विजसन्निधौ) होत.

व्यवस्था—हीं सर्व कामें गांवानें निवडलेले लोक करीत. या कामांसाठीं खर्चाची व्यवस्था खालीलप्रमाणें होती.

१ प्रपा } गांवांतील धनिक लोक धर्म म्हणून हीं कामें धर्मार्थ करीत.
२ मंडप } यांना इष्टापूर्त धर्मकर्म म्हणून सर्व स्मृतिकारांनीं म्हटलें आहे. गांवाच्या जरूरीचीं तीं इष्ट व गांवाला पूर्णत्व देणारीं तीं पूर्त.

३ आपण—शुल्क जकातीवर याचा खर्च भागे.

४ राजवरालय—दंडाच्या उत्पन्नांतून याचा खर्च चाले.

५ सर्वजनवास } यासाठीं घरपट्टी होती. बाहेर जसा जमीनीवर
६ रक्षक } सारा तशी गांवांत ही पट्टी समजत.

७ स्मशान—केरकचरा वगैरेच्या उत्पन्नांत याचा खर्च भागे.

८ वनोपवन—शिकणाऱ्या मुलांच्या आईबापाच्या व राजाच्या देणगीवर या संस्था चालत. शिवाय पोटापुरतें धान्य वगैरे उत्पन्न करणें (शेती) व भिक्षा यांचा यांना पाठिंबा होता.

९ देवालय—धार्मिक वर्गणी व देणग्यांचें उत्पन्न यांतून यांचा खर्च चाले. नगराधिपतींचीं कामें खालील होतीं.

नित्यं उदकस्थानं, मार्गभूमिः, छन्नपथ, वप्रप्राकाररक्षोवेक्षणं नष्टप्रस्मृतापसृतानां च रक्षणं।
दिवसे पंचरात्रे वा बंधनस्थान् विशोधयेत्।
कर्मणा कायदंडेन हिरण्यानुग्रहेण वा ॥ कौटिल्य २–३६–५६

पाणी पुरवठा, रस्त्यांची जमीन, चोरवाटा व कोट व बुरूजांवरील पहारेकऱ्यांची तपासणी हीं कामें नगराधिपतींनीं रोज केलीं पाहिजेत. त्याचप्रमाणें नाहींसें झालेलें, विसरलेलें व चुकलेलें (माणूस, जनावर, अगर जिन्नस) संभाळणें हें हि त्यांचें अवश्य कर्तव्य असे. त्यांनीं दररोज अगर आठवड्यांतून एकदां दोनदां कैद्यांची तपासणी केली पाहिजे व ज्यांनीं कामें करून (सक्तमजूरी), कायदंडेन (मार वगैरे शिक्षा भोगून), हिरण्य (दंड वगैरे द्रव्य भरून), किंवा अनुग्रहेण (मेहेरबानी संपादन करून (माफी मिळवून) आपली शिक्षा पुरी केली असेल त्यांस सोडून दिलें पाहिजे. तात्पर्य, व्यवस्था व न्याय हीं त्यांचीं प्रमुख कामें होतीं.

प्रकरण पंधरावें

जानपद संस्था

गांव किंवा नगर यांचे पलीकडे राजकीय संस्थांची हिंदुस्थानांत प्राचीन काळीं वाढ झालेली नव्हती. पण सामाजिक, औद्योगिक व धार्मिक बाबींत या प्रकारच्या म्हणजे एका नगरापेक्षां मोठ्या देशविभागाचा विचार करणाऱ्या संस्था होत्या. पाणिनीच्या काळीं सुद्धां अशा संस्था व त्यांबद्दलचे नियम वगैरे होते असें पाणिनीच्या खालील सूत्रांवरून दिसतें.

(१) संघे चानौत्तराधर्ये । ३-३-४२

(२) संघोद्धौ गणप्रशंसयोः । ३-३-८६

पहिल्या सूत्राचा असा अर्थ आहे कीं, संघ (प्राण्यांचा समूह) अशा अर्थी 'चि' धातूचें रूप करणें असेल तर वरचा व खालचा किंवा श्रेष्ठ व कनिष्ठ भाव ज्यांत नाहीं अशा समूहासाठीं मात्र 'घञ्' प्रत्यय लागतो. यावरून माणसांचे संघ-ज्यांत श्रेष्ठ कनिष्ठ भाव आहे असे संघ-त्यावेळीं प्रचारांत होते. दुसऱ्या सूत्रांत तर 'संघ' हा शब्दच 'गण' (मोजून जेथें माणसांचे अनुक्रम लावलेले असतात) अशा अर्थींच तयार होतो, एरवीं हें रूप होत नाहीं असें स्पष्ट सांगितलें आहे. यावरून 'गण' संस्था स्थापन झाल्यानंतर या संस्थांचे लढाईसाठीं जाणारे प्रकार म्हणजे संघ (सम्यग् हन्यते येन) असा शब्द रूढ झाला असें स्पष्ट आहे.

याशिवाय पाणिनीचीं खालील सूत्रें त्यांचे प्रकार सांगतात.

(१) पूगाञ्ञ्योऽग्रामणीपूर्वात् । ५-३-११२

(२) व्रातच्फञोरस्त्रियां । ५-३-११३

(३) आयुधजीविसंघाञ्ञ्यड्वाहीकेष्वब्राह्मणराजन्याद् ॥५।३।११४

याप्रमाणें संघांचे (१) पूग (अर्थ काम प्रधानः) पैसे मिळविण्यासाठीं झालेला (२) व्रात (उत्सेधजीवि) लुटालुटीनें पोट

भरणारा, (३) गण (आयुधजीविवाहिकेषु) लष्करांत राहून हत्यारांवर पोट भरणारा (४) श्रेणि (वार्ताशास्त्रोपजीवी) व्यापार वगैरेंवर पोट भरणारा असे भेद होते. कौटिल्यानें यांचा उल्लेख केला आहे तो असा—(१) कांभोज, सुराष्ट्र, क्षत्रिय, श्रेण्यादयोवार्ताशास्त्रोपजीविनः। लिच्छिविक, वृजिक, मल्लक, मद्रक, कुकुर, कुरु, पांचालादयो राजशब्दोपजीविनः। कौटिल्य–११–१–१६०.

नारदांच्या काळीं या समूहांचे अनेक प्रकार होते. ते असे—

पाखंड, नैगम, श्रेणि, पूग, व्रात, गणादिषु ॥
संरक्षेत्समयं राजा दुर्गे जानपदेषु च ॥ नारद अ० १०
श्रेणिनैगम, पाखंडी, गणानामप्ययं क्रमः ॥
भेदं चैषां नृपो रक्षेत्पूर्ववृत्तिं च पालयेत् ॥ याज्ञवल्क्य (व्य०)

(१) पाखंड–हिंदु धर्माचीं तत्वें न मानणाऱ्या लोकांचे समूह.
(२) नैगम–परदेशीं व्यापारासाठीं जाणाऱ्या लोकांचा तांडा.
(३) श्रेणि–एक आचार विचार व धंदा पाळणाऱ्या लोकांचा जमाव.
(४) पूग–भिन्न आचार विचार पाळून एक धंदा करणाऱ्या लोकांची टोळी.
(५) व्रात–लुटालूट करून शस्त्रांवर पोट भरणारे पेंढारी.
(६) गण–देशाच्या हितासाठीं एकजुटीनें वागणारे लोक.

या सर्व लोकांना आपल्या देशांत अगर गांवांत आपला समय Agreement (करार) पाळण्यास राजानें लावावें. यांची जूट विवक्षित करारानें होत असे. ह्या कराराला 'समय' म्हणत व हे समय राजमान्य व सर्व लोकसंमत होते व ते पाळणें राजदंडाच्या भयानें भाग पाडीत असत, असें नारद स्मृतीवरून दिसतें. याज्ञवल्क्यांनीं पूर्वपरंपरा कायम ठेवून त्यांचे भेद (विशेष जे नियम असतील ते) पाळावे असें सांगितलें आहे. यावरून कांहीं सामान्य नीतितत्वें या संघांना आपल्या नियमांनीं मोडतां येत नसत किंवा असलीं नीतितत्वें सोडून असलेले करार राजाला मान्य नसत असें दिसतें.

पाखंडनैगमादीनां स्थितिः समय उच्यते ॥
समयस्यानपाकर्म तद्विवादपदं स्मृतं ॥ नारद अ० १०

पाखंड, नैगम वगैरे जुटींनीं जे आपसांत नियम केलेले असतात त्या नियमांना समय (Constitution) म्हणतात व हा समय न पाळणें हा एक न्यायाचा विषय (भांडण झाल्यावर कोर्टानें निवाडा करण्याचा विषय) होतो. या गोष्टीचा निकाल करणें राजाचें काम आहे व राजाच्या अधिकारक्षेत्रांत असले निकाल करण्याचें काम समाविष्ट होतें, व हा निकाल सर्वांनीं पाळला पाहिजे असें नारद म्हणतात.

निजधर्माविरोधेन यस्तु सामयिको भवेद् ॥
स तु यत्नेन संरक्ष्यो धर्मो राजकृतो मतः ॥ बृहस्पति अ० १७

आपल्या धर्माला बाध न आणतां जो कोणी इसम सामयिक त्या संघाचा समय पाळणारा सभासद होईल, त्याचें राजानें संरक्षण केलें पाहिजे, कारण राजाला मान्य व राजानें ठरविलेला धर्म तो पाळतो; यासाठीं अशा इसमाचें राजानें प्रयत्नपूर्वक संरक्षण करावें. तात्पर्य राजानें ठरविलेल्या धर्माला बाध न आणतां कोणालाहि या मंडळांचे सभासद होतां येई व त्याचें संरक्षण करणें राजाचें काम होतें. यावरून राजाज्ञा मोडणारे हि संघ त्याकाळीं होतें व त्या संघांना राजाच्या संरक्षणाचा फायदा मिळत नसे हें समजतें.

वणिजां कर्षकाणां च चोराणां शिल्पिनां तथा ॥
अनियम्यांशकर्तॄणां सर्वेषामेष निर्णयः ॥
तेषां चेत्प्रसृतानां च ग्रहणं समवाप्नुयाद् ॥
तन्मोक्षणार्थं यद्दत्तं वहेयुस्ते यथांशतः ॥ कात्यायन.

वर पेंढारी वगैरेंचे संघ असत असें सांगितलें आहेच व अशा अधार्मिक संघांना राजाचें संरक्षण मागण्याचा हक्क नाहीं असें बृहस्पतीच्या वाक्यांतून आपण वर श्लेष काढला; पण त्याबाबद कात्यायनानें स्पष्टच खुलासा केला आहे तो असा. वाणी (व्यापारासाठीं) शेतकरी (शेती सुधारण्यासाठीं), चोर (लुटालुटीसाठीं), शिल्पी (मोठे कारखाने

चालविण्यासाठीं) व असल्याच ज्या कोणी जबाबदारी ठरविली नाहीं अशा मंडळ्या अनियम्यांशकर्तृ (Unlimited Companies) या सर्वांना खालील नियम लागू आहे. तो असा कीं, जर हे लोक बाहेर (परदेशीं) गेले असतां यांना कोणी अडकविले तर त्यांना सोडविण्यासाठीं जो खर्च येईल तो त्या मंडळींनीं आपआपसांत वांटून करावा. असल्या अनियम्यांशकर्तृ बेजबाबदार (Unlimited) मंडळयांना राजाचें संरक्षण मिळणार नाहीं. संरक्षण पाहिजे असेल तर धर्माला धरून व योग्य असेच करार करून मंडळ स्थापलें पाहिजे.

आपली उपजीविका चालविण्यासाठीं धन प्रत्येकाला मिळवावें लागतें. पण त्या धन मिळविण्याच्या पद्धतींत धर्म्य (समाजांत वापरण्यास लायक) व अधर्म्य (समाजाला विघातक) असे दोन भेद होतात. यांत धर्मसाधनांचा उपयोग केला तर त्या उपभोग करणारांना राजापासून संरक्षणाचा फायदा मिळतो व तसें नसेल तर मिळत नाहीं. यासाठीं हीं धर्म्य साधनें कोणतीं हें सांगितलें पाहिजे.

सप्तवित्तागमा धर्म्या दायो लाभः क्रयो जयः ॥
प्रयोगः कर्मयोगश्च सत्प्रतिग्रह एवच ॥
विद्या शिल्पं भृतिः सेवा गोरक्ष्ये विपणिः कृषी ॥
धृतिर्भैक्ष्यं कुसीदं च दश जीवनहेतवः ॥ मनु–१०–११५।१६

वाडवडिलांपासून वारशानें मिळणें, ठेवलेली ठेव सांपडणें, परदेशांतून जिंकून आणणें, सावकारी करणें, कारागिरी करणें व चांगल्या माणसानें बक्षीस देणें या सात प्रकारांनीं द्रव्य मिळविलें तर तें धर्म्य होय. या सात द्रव्य मिळविण्याच्या पद्धति समाजाला हितकर आहेत. पोटाला मिळविणें तें विद्या (लोकांना शिकविणें), शिल्प (कारागिरी करणें), भृति (निरोप वगैरे पोंचवून पोटगी मिळविणें), सेवा (दुसऱ्याचें काम करून पोटास मिळविणें), गोरक्ष्य (गाई, शेळ्या वगैरे संभाळणें), विपणि (बाजारांत बसून जिन्नस विकणें), कृषी (शेती करणें), धृति (भजन, पूजन करीत बसून लोक देतील त्यांत संतुष्ट असणें), भैक्ष्यं (लोकांच्या दारोदार जाऊन मागणें) व कुसीद (लोकांस उसनवार देऊन वाढ वगैरेवर

निर्वाह करणें) या दहापैकीं कोणत्याहि प्रकारानें मिळवावे. प्रत्येक व्यक्तीनें अगर अनेक व्यक्तींच्या संघानें यांपैकीं कोणताहि मार्ग स्वीकारला तर तो धर्म्य (कायदेशीर) होय. याशिवाय दुसरा मार्ग हा अधर्म्य होय व या अधर्म्य मार्गानें जाणारेच नव्हेत तर त्यांचे मदतगार, स्नेही हे देखील वाईट समजण्यांत येतात.

(१) गणानां चैव याजकः। एतान्विगर्हिताचारान्..विवर्जयेद् ॥
(२) गणान्नं गणिकान्नं च विदुषां तु जुगुप्सितं ॥ मनु अ० ३, अ० ४

या शब्दांनीं मनूनें आपल्या स्मृतींत अधर्म्य टोळ्यांचा निषेध केला आहे व यांशीं संपर्क ठेवू नये असें सांगितलें आहे.

राजानें कायदे करतांना आपल्या देशांत राहणाऱ्या सर्व लोकांच्या चाली, रीति, आचार, विचार वगैरेंचा विचार करूनच कायदे करावे म्हणजे लोकांना त्याप्रमाणें वर्तन ठेवण्यास बरें पडतें असें मनूनें सांगितलें आहे.

जातिजानपदान् धर्मान् श्रेणिधर्मांश्च धर्मविद् ॥
समीक्ष्य कुलधर्मांश्च स्वधर्मं प्रतिपादयेद् ॥ मनु ८।४१

जातींच्या चालीरीति, देशांचे आचारविचार, धंदेवाल्यांच्या सोई गैरसोई कुळांच्या वहिवाटी या सर्व गोष्टी नीट रीतीनें विचारांत घेऊन मग राजानें आपले कायदे करावे. निरनिराळ्या देशांत (प्रांतांत) निरनिराळ्या जातींत निरनिराळे धंदे करणाऱ्या लोकांत व निरनिराळ्या घराण्यांत निरनिराळ्या गोष्टी सोईच्या व गैरसोईच्या, योग्य किंवा अयोग्य समजत असतात व या व्यवस्था लक्षांत घेऊन कायदे केले तर त्यांना मोडण्याचें कारण पडणार नाहीं. चांगलीं माणसें हे कायदे मग मोडणार नाहींत. बेशिस्त वागण्याची हौस असणारे लोक इतका विचार करून केलेलेहि कायदे मोडतील तर त्यांस शिक्षा करणें व शिस्त लावणें भाग आहे.

अकुर्वन् विहितं कर्म निंदितं च समाचरन् ॥
प्रसक्तश्चेंद्रियार्थेषु प्रायश्चित्ती भवेन्नरः ॥ मनु अ० ११।४४

जें काम करावें म्हणून विधि सांगितला तें न करणारा, जें काम करूं नयें म्हणून निषेध केला तें मुद्दाम करणारा व इंद्रियांची हौस पुरविण्या-

साठीं विधि किंवा निषेधरूपी धर्मांचें मोठें स्तोम माजविणारा असे तिन्ही प्रकारचे लोक शिक्षा करण्यास योग्य आहेत. करण्यास सांगितलेलें काम न केल्यानें समाजांत त्या कामापासून उत्पन्न होणाऱ्या गोष्टींची कमतरता पडते. करूं नये असें सांगितलेलें काम केल्यानें समाजाचें तितकें नुकसान होतें व आपणास बरें वाटतें म्हणून एकाद्या कामाचें स्तोम (बंड) माजविल्यानें त्या कामाची थट्टा होतें. व लोकांस वाईट वळण लागतें. यासाठीं या तिन्ही प्रकारच्या मनःप्रवृत्ति त्या समाजांतून घालविणें जरूर असतें व प्रायश्चित्त हें ती प्रवृत्ति घालविण्यांचें साधन आहे.

योग्य नियम करून मंडळ स्थापणें म्हणजे काय याचा असा खुलासा आहे व तो खालील वाक्यांवरून जास्त स्पष्ट होतो.

धर्मज्ञाः शुचयो, लुब्धा भवेयुः कार्यचिंतकाः ॥
कर्तव्यं वचनं तेषां समूहहितवादिनां ॥
कर्तव्यं वचनं सर्वैः समूहहितवादिनां ॥
यस्तत्र विपरीतः स्यात् स दाप्यः प्रथमंदमं ॥
समूहकार्यप्रहितो यल्लभेत तदर्पयेद् ॥
एकादशगुणं दाप्यो यद्यसौ नार्पयेत्स्वयं ॥
गणद्रव्यं हरेद्यस्तु संविदं लंघयेच्च यः ॥
सर्वस्वहरणं कृत्वा तं राष्ट्राद्विप्रवासयेत् ॥
समूहकार्य आपातान् कृतकार्यान् विसर्जयेद् ॥
सुदानमानसत्कारैः पूजयित्वा महीपतिः ॥ याज्ञवल्क्यव्य.
अनाच्छेद्यकरास्तेभ्यो दातव्या गृहभूमयः ॥
मुक्तभाव्याश्च नृपतिर्लेखयित्वा स्वशासने ॥ बृहस्पति अ० १७

कोणत्याहि समूहाचे कार्यचिंतक (कामाची काळजी वाहणारे हे) धर्म (न्यायान्याय) जाणणारे, शुचि (शुद्ध आचरणाचे) व अलुब्ध (निर्लोभ, निःस्पृह) असे असावे. हे त्या समूहाचे कल्याण सांगणारे असून त्यांच्या म्हणण्याप्रमाणें कामें व्हावीं. ज्यांना हल्लीं डायरेक्टर म्हणतात ते हे कार्यचिंतक होत. जो कोणी मंडळाचा सभासद या निवडक कार्यचिंतकांचें म्हणणें मानणार नाहीं त्याला पहिल्यानें दंड करावा.

समूहाच्या कामासाठीं गेलेल्या लोकांना जें कांहीं मिळेल तें त्यांनीं समूहाच्या खजिन्यांत भरावें. जो कोणी असें न करील त्याच्याकडून अकरापट किंमत भरून घ्यावी. जो समूहाचे संविद् (Clear understanding) मोडील व त्याचें द्रव्य खाईल त्याचें सर्व उत्पन्न जप्त करून राजानें त्याला हद्दपार करावें. ऋग्वेदांत 'पणी' नांवाच्या लोकांना याप्रमाणें हद्दपार केल्याची कथा आहे. दक्षिण हिंदुस्थान किंवा दंडक अरण्य ही अशा हद्दपार केलेल्या लोकांची राहण्याची जागा होती. समूहाचें काम उत्तम रीतीनें फत्ते करून आलेल्यांना व त्या कामीं खर्ची पडलेल्या लोकांना राजानें देणग्या, पदव्या, इनामें वगैरेंनीं भूषित करावें. याप्रमाणें परदेशीं जाऊन जुटीनें व्यापार, शेती, लढाई वगैरे करून यश संपादन करणारांचा जोंपर्यंत (बोलबाला) सत्कार होत असे तोंपर्यंत हिंदुस्थानांतून परदेशीं जाऊन नांव मिळविण्यासाठीं लोक उत्सुक असत व अशा लोकांना राजांकडून प्रोत्साहन व मदत मिळे. अशा लोकांना राजानें घरें व भूमि (जमीनी) अगर घरें बांधण्यालायक जमीनी सारा वगैरे माफ करून द्याव्या (जमीन इनाम द्यावी) व राजानें आपलें आज्ञापत्र काढून व त्यांत यांचें नांव व (मुक्तभाव्य) यांनीं केलेल्या स्वार्थत्यागाच्या गोष्टी यांची नोंद करून ती सनद इनामाबरोबर द्यावी, असें बृहस्पतींचें म्हणणें आहे.

तात्पर्य, कोणाहि (कॉन्स्टिट्यूशनल) नियम करून संघटित केलेल्या मंडळाला समूह (सम्-योग्य रीतीनें, ऊह—नांव ठेवलेला जमाव) असें म्हणतात. असा ब्राह्मणांचा समाज असला म्हणजे त्याला सभा किंवा परिषद् म्हणत, क्षत्रियांचा असला म्हणजे गण म्हणत, वैश्यांचा असला म्हणजे श्रेणि म्हणत, कारागिरांचा असला म्हणजे त्याला वर्ग म्हणत व त्रैवर्णिकांचा किंवा मिसळ असला म्हणजे त्याला संघ किंवा समिति म्हणत. अशा प्रकारचे समूह अस्तित्वांत असून चांगले भरभराटींत होते हें महाभारत शांतिपर्व अध्याय ५७ श्लोक ३१,३२ वरून व या गणांचीं जीं नाणीं वगैरे अवशेष सांपडतात त्यांवरून सिद्ध होतें.

असे समूह, दवाखाने चालविणें वगैरे सामाजिक कामें अंगावर घेत असत हें अशोकाच्या स्तंभावर कोरलेल्या आज्ञापत्र नंबर दोन-

वरून व प्रसिद्ध चिनी प्रवासी फाहीन यानें त्यावेळचे सरदार व श्रीमंत लोक यांच्या देणग्यांनीं स्थापलेल्या व नीट चाललेल्या अनेक ठिकाणच्या दवाखान्यांच्या वर्णनावरून उघड होतें. हे समूह नालंद, तक्षशिला येथील सारख्या मोठमोठ्या शाळा चालवीत असत. चिनी प्रवासी इत्संग यानें नालंद येथील शाळेचें जें सुंदर वर्णन केलें आहे त्यावरून त्या शाळेंत आठ मोठे दिवाणखाने (लेक्चर हॉल) व शंभर खोल्या (वर्ग) असून त्यांत पांच हजार विद्यार्थी होते असें समजतें. हे विद्यार्थी त्या ठिकाणीं जेवून खाऊन फुकट शिकत असत व त्यांचा खर्च चालण्यासाठीं या विद्यालयाला दोनशें गांवें इनाम होतीं. चिनी प्रवासी हुएन संग यानें या शाळेचें वर्णन करतांना ढगांच्या वर जाणाऱ्या तेथील वेध-शाळा व मनोरे यांचें व सुंदर इमारतीचें मनोवेधक चित्र रेखाटलें आहे. तक्षशिला येथें तर ग्रीस, रोम वगैरे देशांतून विद्यार्थी शिकण्यास येत व एका काळीं वीरदेव नांवाचा परदेशी विद्वान् येथें मुख्य 'सदसस्पति' होता असें वर्णन आहे. सरस्वती कांठच्या तक्षशिला येथील शाळेच्या बऱ्याच गोष्टी 'जातक कथांत' सांगितल्या आहेत, व सरस्वती म्हणजे विद्या असा जो अर्थ हल्लीं रूढ आहे तो हें तक्षशिला नगर व तेथील नदी यांच्या सांनिध्यानेंच आला आहे.

उत्तर हिंदुस्थानांत मात्र अशा सभा व त्यांचे मोठे दवाखाने, शाळा वगैरे होत्या असें नसून त्या काळीं म्हणजे खिस्त पूर्वी ५०० च्या सुमारें सगळ्या हिंदुस्थानांत अशा संस्था होत्या हें (१) आंध्र सेनापती उषवदात यानें नाशीक जवळील गोवर्धन गांवच्या 'निगम सभेला' दवाखाना चालविण्यासाठीं दिलेल्या देणगीच्या शिलालेखावरून व (२) पांड्य राजा उग्रपेरुवल्लुधि यानें एकुणपन्नास कवि सभासद असलेल्या साहित्य परिषदेला दिलेल्या देणगीवरून स्पष्ट सिद्ध होतें. या पांड्य राजानें 'कुरलग्रंथ' नांवाच्या ग्रंथास मोठें बक्षीस दिलें होतें. कुंभ मेळ्यांसारखे मेळे भरण्याची जी आपली चाल आहे ती या असल्या साहित्य परिषदांवरूनच पडलेली दिसते व ग्रंथकर्त्यांचीं नांवें न घालतां जे अनेक संहिताग्रंथ आपल्या देशांत मिळतात ते अशा विद्वत्सभांनीं एकत्र जमून प्रसिद्ध केल्यामुळेंच होत. एका विषयाचा व्यासंग करणाऱ्या अनेक विद्वानांच्या सभेनें जो ग्रंथ

प्रसिद्ध अगर मान्य केला तो या विषयाचा संहिता ग्रंथ होय व ज्या पंथाचा तो ग्रंथ त्या पंथाची ती संहिता असें म्हणतात. कश्यपसंहिता, भृगुसंहिता वगैरे ज्योतिष, शिल्प वगैरे विषयांवर जे निरनिराळे ग्रंथ आहेत ते त्या त्या पंथांच्या विद्वानांनीं याप्रमाणें एकत्र केलेल्या ज्ञानाचे सांठे होत असें वाटतें.

पुढें बौद्ध धर्मांत तर विहारांत संघांची व्यवस्था ठेवण्याबद्दलचे गौतमबुद्धाचे नियम स्पष्ट प्रातिधेनिक स्वरूपाचेच आहेत. या संघांत सम- याला (Constitution) विनय (Mission) शुभेच्छा असें नांव आहें. या विहारांत समानता, ज्यैष्ठय व ऐक्य यांचें सुंदर एकीकरण आहे. प्रत्येक इसमास एक मत असल्यानें सगळे समान होते (तेथें जातिभेद वगैरे तर नव्हताच); पण अधिक ज्ञानी माणसाला जास्त मान असल्यानें वडीलधाकटेपण होतें; व सर्वांना मान्य झाल्यावांचून कोणतीहि गोष्ट अमलांत येत नसल्यामुळें एकी होती. या विहारांत मतें घेण्याच्या तीन तऱ्हा होत्या (१) गुप्त, (२) संयत व (३) प्रगट. गुप्त पद्धतींत शलाका ग्राहकापाशीं (Polling officer) प्रत्येकानें येऊन होय किंवा नाहीं दर्शविणाऱ्या दोन काड्यांपैकीं एक काडी द्यावयाची व ती कोणास दाखवावयाची नाहीं अशी रीत होती. ज्या जातीच्या जितक्या काड्या खपल्या त्या जातीचीं तितकीं मतें पडलीं असें समजत. यामुळें कोणी काय मत दिलें हें समजत नसे. संयत पद्धतींत प्रत्येकास निरनिराळ्या रंगाच्या दोन काड्या देत व त्यांपैकीं एक काडी शलाकाग्राहकाजवळ द्यावयाची व ज्या बाजूला जितक्या काड्या जमल्या त्या अंगास तितकीं मतें पडलीं असें समजत. प्रगट पद्धतींत एका मताच्या लोकांनीं एका अंगास व दुसऱ्या मताच्या लोकांनीं दुसऱ्या अंगास गोळा व्हावयाचें असे. या मतें घेण्यांत ' अनुमतिकल्प ' म्हणून एक पद्धति असे. तींत हजर असलेल्या लोकांनीं " आम्ही हजर नसलेल्यांचीं मनें वळवून त्यांस अमुक बाजूस मतें द्यावयास लावूं " असें सांगावयाचें असे. पण ही पद्धत घातक असें दिसल्यावरून ती पुढें बंद करण्यांत आली.

एक धंदा करणारांच्या जमावांना श्रेणि म्हणत म्हणून वर सांगितलेंच. अशा श्रेणींचा उल्लेख राजेंद्र चोल राजाच्या वेळीं इरणसत्तन नांवाच्या

मेंढपाळानें ९० मेंढ्या राजाकडून घेतल्या व नंदादीपास तूप पुरविण्याचें कबूल केलें, त्या बाबदच्या शिलालेखांत आहेत. या शिलालेखांत त्या धनगरांच्या जातीनें (पशुपाल श्रेणी) इरणसत्तनाला आपण जामीन असल्याचें कबूल केलें आहे. विक्रम चोल राजाच्या शिलालेखांत 'कुसीद श्रेणी' सावकाराच्या सभेच्या उल्लेख आहे. 'वणिक् श्रेणि' व्यापाऱ्यांचा तांडा याचा उल्लेख जातक कथांत आहे. स्कंद गुप्तराजाच्या वेळीं इंद्रपूरच्या तेल्यांनीं जो करार केला आहे त्यांत तेल्यांच्या श्रेणीचा उल्लेख आहे. कुमारगुप्ताच्या वेळीं दशापूरच्या गुजराथी कोष्टयांनीं रेशिमाचे कारखाने काढण्याबद्दल मिळविलेल्या परवान्यांत 'कारू श्रेणी' चा उल्लेख आहे. गुजराथेंत गांधिक श्रेणि (वाणसवद्याचा व्यापार करणारांचा जमाव), घान्यक श्रेणी (भुसाऱ्यांचा जमाव) यांचे उल्लेख सांपडतात. नाशका-जवळील गोवर्धनच्या शिलालेखांत ओदयांत्रिक Hydraulic Engineers (बंधारे बांधून पाणी पुरविणारे), कुंभकार (मडकीं व विटा अगर घागरी करणारे) यांच्या श्रेणींचा उल्लेख आहे व या मंडळ्या उषवदात यानें दिलेल्या देणगीच्या दवाखान्यासाठीं जामीन व व्यवस्थापक होत्या. या दवाखान्याची व्यवस्था 'निगमसभे' कडे होती. या संबंधांचे नियम काय होते हें आपण आतां पाहूं. या श्रेणींचे स्वतंत्र निराळे ध्वज असत व त्यांत ज्येष्ठ (वडील माणसें) Vice President व श्रेष्ठ (सर्वांत मुख्य माणसें) President असे भेद असून या लोकांना जास्त मान होता.

वणिक्प्रभृतयो यत्र कर्म संभूय कुर्वते ॥
तत्संभूयसमुत्थानं व्यवहारपदं भवेद् ॥ नारद अ० ३
बहूनां संमतो यस्तु दद्यादेको धनं नरः ॥
करणं कारयेद्वापि सर्वैरेतत्कृतं भवेत् ॥ बृहस्पति अ० १७
शिष्यकाभिज्ञकुशला आचार्याश्चेति शिल्पिनः ॥
एकाद्वित्रिचतुर्भागान् हरेयुस्ते यथोत्तरं ॥ कात्यायन
हर्म्यं देवगृहं वापि धार्मिकोपस्कराणि च ॥
संभूयकुर्वतां तेषां प्रमुखो ह्यंशमर्हति ॥ बृहस्पति अ० ८
नर्तकानां एष एव धर्मः सद्भिरुदाहृतः ॥
तालज्ञो लभतेऽध्यर्धों गायकास्तुसमांशिनः॥ बृहस्पति अ०८

जेव्हां वाणी, कारागीर वगैरे लोक जूट करून एखादें काम करूं म्हणतात त्याला संभूयसमुत्थान (उक्ता ठराव) म्हणावें व हा पण न्यायाच्या निवाड्यासाठीं येत असतो. ज्यावेळीं पुष्कळ लोकांतर्फे एक माणूस पैसे देत अगर घेत असतो व ठरलेलें काम करून देत अगर घेत असतो तेव्हां तें काम त्या सगळ्यांनीं एकत्र मिळून केलें असें समजावें. कामें करणाऱ्या जमावांत कांहीं शिकणारे, कांहीं उमेदवार, कांहीं जाणते व कांहीं कामांत कुशल (प्रवीण) असे लागतात. मिळालेली मिळकत या लोकांनीं एक, दोन, तीन व चार या प्रमाणांत वांटून घ्यावी. इतक्या प्रकारचे लोक नसले व घर, देऊळ, भांडीं, उपकरणीं वगैरे कामें अनेकांनीं जुटीनीं मिळून केलीं तर मिळकतीचे तीन भाग करून प्रमुख मंडळींनीं दोन भाग व इतरांनीं एक भाग अशी वांटणी करावी. गाणाऱ्या लोकांत अशीच वांटणी करतात. ठेका व सूर (तबला व पेटी वाजविणारे) यांना निम्मा हिस्सा व निम्या हिश्यांत सर्व गाणारे यांचा सारखा भाग अशी वांटणी सर्वसंमत आहे.

तात्पर्य, हल्लींच्या सुधारलेल्या व भरभराटींत असलेल्या देशांत ज्या संस्था व जे नियम आहेत ते सर्व एका काळीं आपल्या देशांत होते व ऊर्जितावस्थेंत असलेल्या सर्व देशांत हीच स्थिति असते. आपला देश ऊर्जित दशेस यावा असें वाटत असल्यास आपण संघ स्थापून व्यापार, उदीम, शेती, कारागिरी, कारखाने वगैरे चालविले पाहिजेत. या संघस्थापनेला सत्य हें अवश्य आहे. सत्य हें उघड, एकजिनसी व सर्वांना समजणारें असल्यानें तें व्यवहारास फार सोईचें पडतें. असत्याचे हजारों प्रकार असल्यामुळें मोठ्या शहाण्या माणसास देखील त्यांतील रहस्य अगर खरा प्रकार ओळखणें मुष्कील होतें व त्यामुळें एकमेकांना एकमेकांचा विश्वास न वाटून व्यवहाराला अडचण होते. व्यवहाराला अडचण याचाच अर्थ समाजाची कुचंबणा व यापासून शक्ति वायां जाऊन समाजाचें नुकसान ही गोष्ट ठरलेली आहे. खरा प्रकार शोधून काढणें या एका गोष्टींतच समाजघटकांचें पुष्कळ सामर्थ्य खर्चीं पडलें म्हणजे समाजाचें हित करण्याला लागणाऱ्या शक्तीचा तुटवडा पडतो व अशा तुटपुंज्या शक्तीनें काय काम होणार ? जगांत आपला प्रयत्न व लोकांचा प्रयत्न यांची टक्कर असून ज्याची सरशी

होईल तो जिंकीत असतो. अर्थात् तुटपुंज्या शक्तीचा पराजय ठरलेला आहे. हिंदुस्थानांत थोड्याशा इंग्रजांचें राज्य नसून हिंदी लोकांच्या एकत्र बेरीज केलेल्या शक्तीपेक्षां जास्त भरत असलेल्या त्यांच्या शक्तीचें राज्य आहे. हजारों दिशांकडे ओढ घेणारी आपली शक्ति आपण एकमुखी केली तर हिंदी लोकांची शक्ति विजयी होईल. हीच गोष्ट आपण मुख्यत्वें लक्षांत ठेवून वागलें पाहिजे. संघस्थापनेनें मोठमोठीं कामें शेवटास जातात तीं या एकाग्रतेमुळें व ती साधण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे हें सगळ्या गोष्टींचें सार आहे.

वर सांगितलेल्या सर्व गोष्टींचा विचार करतांना आपणास दोन गोष्टी नीट ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. त्या अशा–

१ वर ज्या सुधारणा किंवा जगाची जी प्रगति म्हणून सांगितली ती अवघी शंभर वर्षांतील आहे. सन १८२४ सालीं इंग्लंद, यूरोप किंवा अमेरिका यांची स्थिति हिंदुस्थानापेक्षां कोणत्याहि प्रकारें श्रेष्ठ नव्हती. त्यावेळीं शर्यतींत आपण जगाच्या बरोबर होतों. त्यानंतर आपणाला एका झाडाला बांधून टाकल्यामुळें आपण जगाबरोबर पळूं शकलों नाहीं व अशा कारणानेंच आपण मागें पडलों आहोंत. आपण जर मोकळे असतों तर आपण सर्व बाबींत जगाची बरोबरी करून दाखविली असती याबाबद आपणांस संशय नाहीं व हीच गोष्ट आजच्या खालावलेल्या स्थितींतसुद्धां आपलीं बंधनें ढिलीं झालीं तर प्रत्यक्ष करून दाखवूं अशी आपणांस उमेद धरण्यास जागा आहे.

२ ही झालेली प्रगति इतकी थोडी आहे कीं, अवघ्या पंचवीस वर्षांत जपाननें हिची छाननी करून हिच्यांतील सार ग्रहण केलें व इतर जगाच्या बरोबरीचे आपण या बाबतींत झालों ही गोष्ट पुढें असणाऱ्या राष्ट्रांना पटवून दिली. जी गोष्ट जपाननें करून दाखविली तीच आपण करून दाखवूं असें तुर्कस्थान, चीन वगैरे राष्ट्रें म्हणत आहेत व तेंच म्हणणें हिंदुस्थानाचें आहे.

तात्पर्य, वर दाखविलेल्या जगाच्या व आपल्या स्थितींतील अंतरामुळें आपण खट्टू किंवा नाउमेद होण्याचें बिलकुल कारण नाहीं व अशी

निराशा पसरवावी हा या पुस्तकाचा हेतु नाहीं. आपली धमक इतकी आहे कीं, आपण पंधरा वर्षांच्या आंत हिंदुस्थानाला जगाबरोबर आणून सोडूं व हें आपणांस कसें करतां येईल हेंच या पुस्तकांत सांगितलें आहे. हिंदी लोकांची निराशा व झोंप घालवावी व " प्रास्थिता दीर्घमध्वानं यूयं किमवसीदथ " " लोक पुढें चालले; तुम्ही काय माशा मारीत बसलांत? उठा " हा ईश्वरी निरोप सर्वांना पोंचवावयाचा आहे.

संपादन खंड

उपोद्घात

या संपादन खंडांत येत्या तीन चार वर्षांत जे हक्क आपण संपादन केले पाहिजेत त्यांचा विचार केला आहे. हे हक्क कसे संपादन करावे हें ज्याचें त्यानें ठरवून त्या त्या प्रसंगाला अनुरूप अशा पद्धतीनें संपादन करावे. मतदार लोक आपले पुढारी किंवा नायक सरकारांत पाठवितात. या नायकांनीं आपल्या मुदतींत काय संपादन करावें अशी मतदारांची अपेक्षा आहे हें त्यांस निरोप देते वेळीं सांगण्याचा मतदारांस हक्क पोंचतो. सेनापति युद्धावर जाऊं लागला म्हणजे त्याला निरोप देतांना असाच प्रकार करण्यांत येतो. श्रीमती जिजाबाईसाहेब यांनीं तानाजीस निरोप देतांना सिंहगड तीन दिवसांत हस्तगत झाला पाहिजे म्हणून सांगितलें होतें. जपानी बादशहा मिकाडो यांनीं जनरल नोगीला तर नुसता पोर्ट आर्थर किल्ला घ्यावा इतकाच निरोप सांगितला होता. त्याचप्रमाणें आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधींनीं शक्य त्या उपायांनीं काय संपादन करावें इतकेंच आपण सांगावयाचें आहे. 'Everything is fair in love and war' या इंग्रजी म्हणीप्रमाणें हें संपादन करण्यांत त्यांना ज्या वेळीं जें योग्य वाटेल तें त्यांनीं करावें. यांपैकीं जेवढें व जशा प्रकारें संपादन होईल हें पाहिल्यावर पुढील निवडणुकीच्या वेळीं पुढचा विचार करतां येईल. आपणांस किती काम करावयाचें आहे याचा कांहीं तरी आडाखा डोळ्यापुढें असावा म्हणूनच पुढील पानांतील माहिती दिली आहे. इतकें काम झालें तर आपली निवड योग्य झाली व त्या माणसानें आपलें काम चोख केलें असें म्हणतां येईल. इतकें सुद्धां होईल का? अशी शंका कित्येक घेतील व जितकें मिळवितां येईल तितकें मिळवावयाचें हें तिचें समाधान होय. सर्व सत्ता आपल्या ढुंगणाखालीं घालून बसलेल्या नोकरशाहीच्या हातून ती सत्ता काढून आपल्या स्वाधीन ठेवणें हें एक मोठें युद्ध आहे

व या युद्धासाठीं अनुयायांनीं कष्ट सोसणें, मन आंवरून धरणें, व नियमित आचरण करणें या तीन गोष्टी करणें अवश्य आहे. काम करणाऱ्या निर्जीव यंत्राला सुद्धां या गोष्टी कराव्या लागतात मग स्वराज्य मिळवूं पाहणाऱ्या समाजाला त्या कराव्या लागल्या तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. तप, दम व नियम हे सर्वत्र उपयोगी असे पडणारे वागण्याचे मार्ग आहेत.

कोणत्याहि सरकारचे तीन मुख्य भाग असतात. (१) स्थानिक सरकार, (२) प्रांतिक सरकार व (३) मध्यवर्ति सरकार. या भागांना अनुसरून या खंडाच्या विवेचनाची विभागणी तीन भागांत केली आहे. स्थानिक सरकारांत गांवपंचायतीपासून जिल्हा लोकलबोर्डापर्यंत कोणत्या गोष्टी मिळविणें अवश्य आहे याचें विवेचन केलें आहे. येत्या काउन्सिलापुढें गांवपंचायती व म्युनिसिपालिट्या यांचे कायदे मंजुरीकरितां येणार आहेत व लोकलबोर्डाचा मंजूर झालेला कायदा दुरुस्त करून घेतला पाहिजे. प्रांतिक सरकार या प्रकरणांत मुख्य गोष्ट म्हणजे सबंध राज्यकारभार आपले हातीं येणें व यासाठीं ही निवडणूक याच तत्त्वावर व्हावी व मग ही गोष्ट सर्व जगास पटली म्हणजे येत्या तीन सालांत कोणत्या गोष्टी व्हावयाला हव्या त्याचें विवेचन केलें आहे. मध्यवर्ती सरकारच्या अडचणी सर्वांत जास्त आहेत. तरी त्यांत काय करतां येण्यासारखें आहे हें सांगून हिंदुस्थानाला प्रांतानिहाय आर्थिक स्वातंत्र्य देण्यास संस्थानांची अडचण येणार नाहीं हें जाणून आर्थिक स्वातंत्र्याचा विचार एका स्वातंत्र अशा चवथ्या प्रकरणांत केला आहे.

तात्पर्य, चालू परिस्थिति लक्षांत घेऊन म्हणजे आत्मनिरीक्षण करून नजीकच्या तीन चार वर्षांच्या काळांत लोकांना कोणते हक्क मिळावेत असें वाटतें त्या हक्कांचें स्वरूप सर्व लोकांपुढें असावें व त्या ध्येयाला अनुसरून ज्या ज्या गोष्टी आपण करणें इष्ट आहे त्यांचा निर्देश करणें हा या खंडाचा विषय आहे.

प्रकरण सोळावें

आत्मनिरीक्षण

हिंदुस्थानास स्वराज्य मिळावें असें म्हणतांना स्वराज्य म्हणजे काय मिळावयाचें असा प्रश्न साहजीक येतो; यासाठीं हिंदुस्थान व इतर स्वतंत्र देश यांत तफावत काय आहे हें पहावें लागतें. हिंदुस्थान व इतर स्वतंत्र देश यांत अमुक तफावत आहे असें ठरविल्यावर दुसरा प्रश्न अशी तफावत कां पडते हें पहाणें होय, व मग ही तफावत घालविण्यासाठीं अमुक करावें व हें करणें म्हणजे स्वराज्य मिळवणें असें आपणांस म्हणतां येतें. इतर राष्ट्रांच्या बरोबरीचे, त्यांनीं आपणांस मान द्यावा असे, आपण झाल्याशिवाय आपल्याला स्वराज्य, योग्य स्वराज्य, मिळालें असें होणार नाहीं. हिंदुस्थानची हल्लींची व पूर्वींची तुलना करून काम भागत नाहीं. तर हिंदुस्थानची हल्लींची स्थिति व इतर देशांची ज्यांना आपण प्रमुख देश म्हणतों अशा देशांची स्थिति यांची तुलना करून ती स्थिति प्राप्त करून घेणें म्हणजे स्वराज्य मिळविणें होय. समर्थांनीं असेंच सांगितलें आहे.

स्वराज्य सुराज्य असावें । इतर राष्ट्रें त्यास मानावें ।
सर्वतोपरी उन्नत व्हावें । या नांव देशहित ॥ दासबोध.

अशा तऱ्हेची आपण तुलना करूं लागलों म्हणजे आपणाला वाईट वाटेल, आपण तुच्छ, हीन आहोंत असें आपणांस वाटेल, पण त्यास इलाज नाहीं. आपलें कल्याण व्हावें म्हणून अशी तुलना करणें, आपल्या अभिमानाला धक्का बसेल असें करणें अवश्य आहे. जगांत काय स्थिति आहे हें पाहून अभिमान गळल्याशिवाय योग्य सुधारणा होत नाहीं. वामन पंडितांनीं आपला स्वतःचा विद्वत्तेसंबंधांत असाच अनुभव सांगितला आहे.

जधीं कांहीं थोडे हरिकवि असे शब्द शिकलों ।
तधीं मी सर्वज्ञ द्विपसम मदें याचि भरलों ॥
जधीं कांहीं नेणें म्हणुनि वदले पंडित मला ।
तधीं माझा गर्वज्वर सकळही तो उतरला ॥ वामन पंडित.

ज्या वेळेला मी जगाशी माझी तुलना केली, जेव्हां पंडितांनीं, 'मला कांहीं यावें तितकें येत नाहीं' असें ठरविलें, तेव्हां माझा अभिमान गेला आणि मग खूब प्रयत्न करून मला पंडितत्व मिळालें. खरी सुधारणा व्हावयाला याच रस्त्यानें जावें लागतें. देशाटन, पंडितमैत्री व सभेंत जाणें यानें माहिती, तुलना, निर्णय व सुधारणा या चार पायऱ्यांनीं मोठेपणा येत असतो व हाच मार्ग आपण स्वीकारावा.

देशोदेशींची जी माहिती प्रसिद्ध होते त्या माहितीकडे सहज नजर टाकली तरी आपण भांबावून जातों, इतकी तफावत आपणास हिंदुस्थानच्या बाबतींत दिसून येते. हिंदुस्थानचें क्षेत्रफळ इंग्रजी राज्याचें १०,९७,९०१ चौरस मैल व देशी संस्थानाचें ६,७५,२६७ चौरस मैल मिळून १७,७३,१६८ चौरस मैल आहे व लोकसंख्या सन १९२१ सालीं २४,७१,३८,३९६ इंग्रजी राज्याची व ७,१९,३६,७३६ देशी संस्थानांची मिळून ३१,९०,७५,१३२ होती. सगळ्या हिंदुस्थानांत सरासरी दर चौरस मैलाला १८० माणसें आहेत. इंग्रजी राज्यांत २२५ व देशी संस्थानांत १०७ याप्रमाणें त्यांचें प्रमाण आहे. ही वस्ती फार दाट आहे असें म्हणतां येणार नाहीं. कारण विलायतेंत वस्ती चौरस मैलीं ३७४ व जपानांत ३५६ आहे. हिंदुस्थानच्या कांहीं भागांत वस्ती दाट आहे. मद्रासेंतील कांहीं भागांत ती दर चौरस मैलीं १४८८, बंगाल्यांत ११६३, बहार व संयुक्तप्रांत यांत ८८२ अशी आहे. पण हे भाग अपवादात्मक होत. लोकसंख्येची अशी स्थिति असून सुद्धां जर एका हंगामांत पाऊस नीट पडला नाहीं तर हिंदुस्थानांत हाहाःकार उडतो. याचें कारण येथील तीनचतुर्थांश प्रजा निव्वळ शेतीवर अवलंबून आहे. लागवडी योग्य अशी बहुतेक जमीन लागवडींत येऊन बरीच वर्षें झालीं आहेत, व लोकांना उपजीविकेचें दुसरें साधन नाहीं.

हिंदुस्थानांत दरसाल दर हजारीं ३१·८ माणसें मरतात. हीच मृत्युसंख्या जपानांत २१·९ कानडांत १५·१२, विलायतेंत १४·६ अमेरिकेंतलि संयुक्त संस्थानांत १४·७, व आस्ट्रेलियांत १०·५ आहे. पाश्चात्य देशांतील माणसांचे सरासरी आयुर्मान ४५ ते ५५ आहे. पण तेंच आयुर्मान हिंदुस्थानांत फक्त २३ आहे. हिंदुस्थानाची हवा कांहीं इतकी वाईट नाहीं कीं, तीमुळें आयुष्य इतकें कमी असावें व मृत्युसंख्या मोठी असावी. या दोहोंचें कारण हिंदी प्रजेची उपासमारच होय याबाबद कोणाचाहि मतभेद नाहीं. जितकी मृत्युसंख्या जास्त तितकी जननाची संख्या जास्त हा नियम सृष्टींत झाडें, जनावरें वगैरे सगळ्यांत दिसतो. हिंदुस्थानांत दर साल दर दहा लक्षांस ३८·२, जपानांत ३४·२, संयुक्त संस्थानांत ३१·३ कानडांत २७·८, आस्ट्रेलियांत २७·७ व विलायतेंत २१·१ याप्रमाणें माणसें मरतात. या जन्म व मरण या दोहोंची वजाबाकी केली म्हणजे कोठें लोकसंख्या किती वाढत आहे हें समजेल. हे आंकडें पुढीलप्रमाणें येतात. हिंदुस्थान ६·४ मृत्यु जास्त व जपान १२·३ कानडा १२·७, संयुक्त संस्थानें १७·३ व आस्ट्रेलियां १७·२ यांत जन्म जास्त अशी स्थिति आहे.

हिंदुस्थानांतील साडेएकतीस कोटी लोकांपैकीं एक कोटी एकूण सत्तर लाख पुरुष व सोळा लाख स्त्रिया इतकींच माणसें साक्षर आहेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सतरा माणसांत एक माणूस लिहूं वाचूं शकतो. दहा बारा वर्षांपूर्वीं हिंदुस्थानांत शेंकडा पांच माणसें साक्षर होतीं. हें साक्षरतेचें प्रमाण इतरत्र जपानांत शेंकडा ९५, विलायतेंत शेंकडा ९४, संयुक्त संस्थानांत शेंकडा ९०, असें आहे. हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यांत १६५९३४५ शाळा आहेत व त्या शाळांत ५१,१७,२१९ मुलगे व १२,१०,७५४मुली शिकावयाला जातात. याशिवाय ६०,२०,३४ मुलें खाजगी शाळांत शिकतात. तात्पर्य, हिंदुस्थानांत १७१७ किंवा दोन हजार माणसांचे वस्तीस एक शाळा पडते. इतर देशांतून शाळेंत जाणाऱ्या मुलांची संख्या लोकसंख्येच्या एकपंचमांश किंवा षष्ठांश असते. आपण एक षष्ठांशच घेतली तर हिंदुस्थानांत दोन कोट मुलगे व दोन कोट मुली शाळेंत जावयाला पाहिजेत. पण प्रत्यक्ष पाहिलें तर दर तीन मुलांत

एक मुलगा व दर पंधरा मुलींत एक मुलगी शाळेंत जात आहे. इंग्रजी राज्यांतील शिक्षणखर्च सन १९१६।१७ सालीं अक्रा कोट रुपये होता तो १९२१ सालीं १६,७७,३३,००० रुपये झाला. म्हणजे दर माणशीं आठ आणे होता. हाच खर्च इतर देशांत म्हणजे विलायतेंत ३८ रुपये, कानडांत १०४ रुपये, जपानांत १३ रुपये व संयुक्त संस्थानांत ११४ रूपये होता. इतर देशांतील महागाई वगैरेंचा विचार केला तरी हिंदुस्थानांत शिक्षणाकडे खर्च अत्यंत थोडा होतो हें उघड आहे. धंदेशिक्षणाचा विचार केला तर सन १९१६।१७ सालीं चोवीस कोट लोकांत अवघे सोळा हजार लोक धंदेशिक्षण घेत होते व त्यांत एक हि मुलगी नव्हती. हिंदुस्थानांतील बहुतेक धंदेवाईक लोक घरींच आईबापांपाशीं व काम करतां करतां कसें तरी ज्ञान संपादन केलेले असतात व त्यामुळें त्या धंद्याचें शास्त्र, त्या धंद्याचीं यंत्रें, त्या धंद्याच्या नव्या योजना व झालेल्या सुधारणा यांची माहिती या लोकांना नसते. वंशपरंपरागत आलेल्या माहितींत या गोष्टींची भर घातल्याशिवाय ती पूर्ण होत नाहीं. याबाबद लोकांनीं किंवा सरकारांनीं जनतेला शिक्षण देण्याचा मुळींच प्रयत्न केला नाहीं असें दुःखानें म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

सन १९१७।१८ सालीं हिंदुस्थानांत ३९७८ वर्तमानपत्रें व मासिकें होतीं. याच नियतकालिकांची संख्या संयुक्त संस्थानांत २२५ विलायतेंत १९० जपानांत ५० व हिंदुस्थानांत बारा या प्रमाणांत पडते. संयुक्त संस्थानासारख्या स्वतंत्र देशांत छापखान्यांची हालचाल फार मोठी असते. सन १९१४ सालीं संयुक्त संस्थानांत वीस कोटी नियतकालिकें होतीं. नऊ कोटी लोकसंख्येंत वीस कोटी नियतकालिकें व हिंदुस्थानांत चोवीस कोटींत चार हजार नियतकालिकें म्हणजे किती अंतर ! संयुक्त संस्थानांत चोवीस पानांचीं कित्येक दैनिकें व त्यांचे रविवारचे अंक शंभर पानांचे अशी स्थिति आहे. छापखाने व नियतकालिकें हें शिक्षणाचें एक मोठें साधन आहे. संयुक्त संस्थानांतील कित्येक नियतकालिकें तर लांचलुचपत, दुर्व्यसनें ढोंगें वगैरे दुराचारांच्या बंदोबस्तालाच वाहिलेलीं आहेत. हिंदुस्थानांतील छापखान्यांची स्थिति फार वाईट आहे. देशी संस्थानें व इंग्रजी राज्य

या दोहोंतहि मुद्रणाबद्दल अनेक जुलमी कायदे आहेत व मुद्रणाला लोकमताचा असा फारसा पाठिंबा नाहीं.

हिंदुस्थानांत आरमार मुळीं नाहींच म्हटलें तरी चालेल. हिंदुस्थानाचे समुद्रांत संरक्षण करण्याचें काम विलायती आरमाराकडे सोंपविलेलें आहे व साम्राज्यांतील इतर घटकांना स्वतंत्र आरमार ठेवण्याची परवानगी मिळून कांहीं वर्षे झालीं तरी हिंदुस्थानांत तसें करण्याचा विचार दिसत नाहीं. हिंदी आरमाराची आवश्यकता महायुद्धांत 'एमडेन'नें उत्तम सिद्ध केली.

हिंदुस्थानांत ७०,००० इंग्रज, व १,४०,००० हिंदी लष्कर आहे. सैन्यांत हिंदी अधिकारी मुळींच नाहींत. महायुद्धांत इंग्रजांच्या वतीनें लढणाऱ्या लष्करांत शेंकडा पाऊणशें विलायती, शेंकडा बारा वसाहतींचे व शेंकडा तेरा हिंदी लष्कर होतें. त्यावेळीं हिंदुस्थानांतून नवीन सहा लाख सैनिक व चार लाख इतर लोक लष्करांत खुषीनें दाखल झाले होते. हिंदुस्थानांतील तेरा लाख लोक लढाईंत सामील होते. तरी पण तोफखाना वगैरे आधुनिक शस्त्रास्त्रांत हिंदी लोकांचा मुळींच समावेश केलेला नव्हता. याबाबद लॉर्ड फ्रेंच यांचीं खालील वाक्यें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत.

"So far as cavalry and infantry are concerned the native regiments might always be trusted to give a good account of themselves but of artillery they know nothing. The instinct of self-preservation in the minds of the British rulers has insisted upon keeping the Artillery-particularly horse, field and garrison artillery-entirely in British hands."

हिंदुस्थानच्या लष्कराकडे महायुद्धापूर्वीं दरसाल तीस कोटी रुपये खर्च होत असे, तो हल्लीं साठ कोटींवर गेला आहे. याबाबद इतर देशांचे महायुद्धापूर्वीं सन १९१३।१४ सालचे लक्ष पौंडाचे आंकडे खालीं दिले आहेत.

देशाचें नांव	लष्करी खर्च	आरमारी खर्च	एकूण
संयुक्त संस्थानें	३००	२७०	५७०
विलायत	२८०	४४०	७२०
जपान	७७	५४	१३१
आस्ट्रेलिया	२५		२५
कानडा	१५		१५
हिंदुस्थान	२१०		२१०

हिंदुस्थान देश परतंत्र, तीन बाजूंनीं समुद्रवेष्टित, चवथ्या बाजूला हिमालयासारखी अलंघ्य भिंत तरी आरमारी खर्च शून्य व लष्करी खर्च जपानच्या तिप्पट अशी हिंदुस्थानची स्थिति आहे.

हिंदुस्थानांत १९१७।१८ सालीं १९४१० पोष्ट आफिसें होतीं. देशाचा विस्तार पहातां ही संख्या फारच लहान आहे. पोष्टांतून पोंचविलेल्या जिनसांची संख्या ११४ कोटी किंवा दर माणशीं वर्षाकाठीं ३·६ इतकी आहे. हीच संख्या आस्ट्रेलियांत १४७, विलायतेंत १२३, संयुक्त संस्थानांत १३६ व जपानांत ३४ होती. तारखात्यानें पोंचविलेल्या तारा शंभर माणसांस ६·३ दरसाल पडतात. हीच संख्या विलायतेंत २९८, कानडांत १५४, व जपानांत ७३ होती. तारेनें बोलण्याचीं यंत्रें हिंदुस्थानांत नुकतींच सुरू होत आहेत. इतर देशांत दर लक्ष लोकसंख्येमागें हीं यंत्रें शिकागोंत १८५ न्यूयार्कमध्यें ११७ मांस्ट्रीलमध्यें ८०, सिड्नेंत ४८, लंडनांत ३९, टोकिओंत २०, मुंबईत ०.४ व कलकत्त्यांत ०·३ अशीं आहेत. या पोष्ट, तार व टेलिफोन यांच्या प्रसारावरून देशाच्या व्यापारी उलाढालींची बरोबर कल्पना होते. जितका व्यापार जास्त तितकीं हीं साधनें जास्त वापरण्यांत येत असतात.

देशांतील उत्पन्नाच्या बाबी म्हणजे दोन (१) शेती व (२) धंदे. या धंद्यांत खाणी, मासे मारणें, कारखाने वगैरेंचा समावेश करावयाचा. हिंदुस्थानांत एकंदर साडेसव्वीस कोटी एकरांत लागवड करतात व त्यांपैकीं पावणे पांच कोटी एकर बागाईत आहे. कोरडवाहू जमीनींत दर एकरीं पंधरा व बागाइतांत दर एकरीं पन्नास रुपये उत्पन्न होतात असें म्हटलें

तर हिंदुस्थानचें शेतीचें उत्पन्न सरासरी पांचशें साठ कोटींचें आहे. इतर देशांचे या उत्पन्नाचे आंकडे खालीं दिले आहेत.

देशाचें नांव.	उत्पन्न कोट पौंड.	माणशीं उत्पन्न शेती.	पौंड धंदे.
संयुक्त संस्थानें	४२७	४०·६	४६
जपान	३०		
कानडा	२४·७	२९·५	७२·१
विलायत	२३·९		
आस्ट्रेलिया	७·३		
हिंदुस्थान	३७·५	१·५	२·५

हिंदुस्थानांतील धंद्याबद्दलची माहिती उपलब्ध नाहीं. वरील आंकडे अदमासानें दिलें आहेत. ज्याप्रमाणें सरकार शेतीचे आंकडे गोळा करून प्रसिद्ध करते त्याचप्रमाणें धंद्याचे आंकडे गोळा करून प्रसिद्ध केलें पाहिजेत. म्हणजे लोकांचे तिकडे लक्ष लागून त्याबाबद काम करतां येईल व जें केलें त्याचा सालोसाल काय परिणाम झाला ही गोष्ट त्यांच्या डोळ्यांत भरेल.

हिंदुस्थानच्या आयात निर्गत व्यापाराचा आढावा काढला तर तो सालिना ३०६ कोटीचा, आयात १२४ व निर्गत १८२ कोटींची आहे. एकंदर माणशीं उत्पन्नाशीं याचें प्रमाण खालीलप्रमाणें बसतें व तें तुलनात्मक दिलेलें आहे.

हिंदुस्थान	१·१	आस्ट्रेलिया	३७·२
कानडा	६२·६	संयुक्त संस्थानें	१७·०
विलायत	४०·०	जपान	६·४

व्यापाराचें मुख्य साधन म्हणजे माल वाहून नेणारे रस्ते. हिंदुस्थानांत ठोकळ मानानें दोन लाख मैल रस्ते आहेत. त्यापैकीं पंचावन हजार मैल खडीचे रस्ते असून बाकीचे एक लक्ष पंचेचाळीस हजार मैल रस्ते साधे आहेत. हिंदुस्थानचें एकंदर क्षेत्रफळ १८,०२,६५७ चौरस मैल आहे व त्यांत अवघे दोन लाख मैल रस्ते म्हणजे फारच थोडे आहेत.

हिंदुस्थानांत सन १९१७।१८ सालीं छत्तीस हजार मैल रेलवे चालू होती. यापैकीं निम्मे रुंद साऱ्याची असून निम्मे अनेकविध अरुंद साऱ्याची होती. इंग्रजी राज्यास सन १९२१ सालीं रेलवे २४८७० मैल होती व शिवाय संस्थानांची. या सर्व रेलवे परकीय भांडवलावर सरकारनें राजकीय धोरणानें बांधविल्या आहेत व यामुळें इतर देशांशीं तुलना करतां त्या फारच अपुऱ्या आहेत. किती मैल आगगाड्या दर हजार चौरस मैल क्षेत्रास पडतात हें खालील तुलनात्मक आंकड्यांवरून दिसेल.

कोणत्या देशांत किती

हिंदुस्थान	११५,	संयुक्त संस्थानें	२५३३,
आस्ट्रेलिया	४९५५,	विलायत	५१५.
कानडा	४८२५,		

गेल्या पंचवीस वर्षांत मोटारी हें एक व्यापाराचें नवें साधन उत्पन्न होऊन त्याचा प्रसार फार झपाट्यानें होत आहे. या बाबतींत अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें फार पुढें गेलीं आहेत.

थोड्याच वर्षांत विमानें देखील व्यापाराच्या कामीं उपयोगांत येतील. इतर सर्व देश या बाबींत खटपट करीत असतां हिंदुस्थान कांहींच हालचाल करतांना दिसत नाहीं.

हिंदुस्थानांतून बाहेर देशीं सर्व कच्चा माल जातो व परदेशांतून सर्व पक्का माल येतो. या कच्चया मालाचें हिंदुस्थानांतच पक्कया मालांत रूपांतर झालें तर देशाचा किती तरी फायदा होईल. हिंदुस्थानाला कोणत्याहि मालासाठीं परदेशाच्या तोंडाकडे पहावें लागेल अशी स्थिति नाहीं. इतकेंच नव्हे तर कित्येक गोष्टींची पैदास हिंदुस्थानाला पुरून इतर देशांना पुरवठा होईल अशी आहे.

हिंदुस्थानांतील गलबतांचा धंदा तर अगदींच बसत चालला आहे. देशाला इतका समुद्राचा गराडा असून हिंदी गलबतांची माल वाहून नेण्याची शक्ति अवघी १६८७२ टन आहे व हिंदुस्थानाशीं होणाऱ्या व्यापाराची नेआण १९०८ सालीं १२९ लक्ष टन, १९१३ सालीं १७३ लक्ष टन व १९१८ सालीं १०९ लक्ष टन होती. इतर सर्व

देशांतून नवीन गलबतें वगैरे बांधण्याची जारीनें तयारी चालली असून हिंदुस्थानांत याबावद कांहींच गडबड दिसत नाहीं.

हिंदुस्थानाचें करांचें तुलनात्मक उत्पन्न खालीं दिलें आहे. दरमाणशीं किती कर द्यावा लागतो हें यावरून समजेल.

हिंदुस्थान	०·३४,	आस्ट्रेलिया	७· ९,
विलायत	१९· ३,	कानडा	६·४९,
संयुक्त संस्थानें	७· ९,	जपान	१· ५,

हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति खालील कोष्टकावरून ध्यानीं येईल. संयुक्त संस्थानांत पोस्टांत पैसे ठेवण्याची प्रवृत्ति कमी असून कानडा देशांत ती सर्वांत जास्त आहे.

देशाचें नांव	बँकांच्या कचेऱ्या	बँकांचें भाडवल दहालक्ष पौं·	बँकांत ठेवी दहालक्ष पौं.	पोष्टांत ठेवी.
हिंदुस्थान (१९१७)	३५९	२३	११८	०·६
संयुक्त संस्थानें (१९१७)	२८९१३	४८२	५७६७	३·७८
विलायत (१९१८)	९३५७	८८	२३५५	७७·७३
जपान (१९१६)	५८७४	६७	४९४	८·४
कानडा (१९१७)	३३२७	२३	३२४	१४·८५

हिंदुस्थानांतील लोकांची सर्व संपत्ति घरें, शेतें, बागा, सोनेंनाणें, वगैरे सर्व मिळून साडेतीनशें कोटी पौंड आहे असा अंदाज आहे. याचें तुलनात्मक कोष्टक खालीं दिलें आहे.

देशाचें नांव.	माणशीं संपत्ति पौंड.	देशाचें नांव.	माणशीं संपत्ति पौंड.
हिंदुस्थान	१४	आस्ट्रेलिया	२६२
संयुक्त संस्थानें	३९१	कानडा	२५९
विलायत	३२०	जपान	५२

या भागांत जेथें जेथें हिंदुस्थान म्हटलें आहे तेथें तें इंग्रजी हिंदुस्थान असें समजावें. देशी संस्थानांचे आंकडे उपलब्ध झाले तेथें ते निराळे दिले आहेत. इतरत्र देशी संस्थानांचे आंकडे उपलब्ध नाहींत. पण देशी

संस्थानांची स्थिति इंग्रजी राज्यापेक्षां कोणत्याही बाबींत जास्त चांगली नाहीं, इतकें सामान्य विधान करण्यास हरकत नाहीं.

वर बहुतेक बाबींत कानडा व जपान या देशांचीच तुलना मुख्यत्वें आपण घेण्यासारखी आहे. जपान हा देश आशियांतील असून पुष्कळ बाबींत म्हणजे आचार, विचार, रहाणी वगैरेंत त्याचें हिंदुस्थानाशीं साम्य आहे. कानडा हा देश ब्रिटिश साम्राज्यांत असल्यामुळें ब्रिटिश साम्राज्यांत असून सुद्धां काय करतां येण्यासारखें आहे याचा नमुना म्हणून तो आपणांस उपयोगी आहे. तात्पर्य, कानडा व जपान या दोन देशांच्या नमुन्यावर आपणास आपली सुधारणा केली पाहिजे. मुख्यतः यावरून हा निष्कर्ष निघतो कीं, हिंदुस्थान सर्वच बाबतींत जगाच्या मागें आहे. अर्थात् स्वराज्य मिळण्यास सर्वांगीण उन्नति झाली पाहिजे.

प्रकरण सतरावें

स्थानिक स्वराज्य

एका राजशासनशास्त्रज्ञानें स्वराज्य शब्दाची व्याख्या अशी केली आहे कीं " कोणत्याहि कामाची ज्यांना पूर्ण माहिती असावयाला पाहिजे व ज्यांना जास्तींत जास्त माहिती आहे व तें काम चांगलें होण्यांत ज्यांचे अतिशय हित आहे अशा अनेक लोकांनीं तें काम करणें अगर त्यावर देखरेख ठेवणें म्हणजे स्वराज्य. " तसेंच केंद्रीभूत राजसत्ता म्हणजे ' हातांत घेतलेल्या कामाची प्रत्यक्ष ज्यांना माहिती असण्याचा संभव नाहीं व ज्यांना त्याबद्दल अतिशय कमी माहिती आहे व ज्यांचें सुखदुःख त्या कामांत अत्यंत अल्प आहे अशा फार थोड्या लोकांच्या हातीं तें काम करण्याचा अगर त्यावर देखरेख ठेवण्याचा अधिकार असणें. ' प्रत्येक मतदाराच्या व कायदे करणाराच्या हृदयांत हीं वाक्यें कोरलेलीं असतीं तर जगांतील सर्व झोटिंगपातशाही व बरीच बेबंदशाही कधींच नाहींशी झाली असती. या जानफिस्कच्या वाक्यावरून पाश्चात्य देशांत स्वराज्य कशाला मानतात हें समजेल. तोच ग्रंथकार पुढें म्हणतो कीं, स्वराज्यांत अधिकारी लोकांसाठीं असतात व राजेशाहींत लोक अधिकाऱ्यासाठीं असतात. स्वराज्याचे योगानें लोकांची दृष्टि फांकते व त्यांना राज्यकारभाराचें शिक्षण मिळतें परंतु प्रत्येक गोष्ट लोकांकरतां राजानें केली पाहिजे या तत्वावर उभारलेल्या राजेशाहीनें लोकांचीं मनें खुरटतात, त्यांना पारतंत्र्याची संवय लागते व ते नागरिकत्वाच्या हक्काला निरुपयोगी होतात. स्वराज्यांत लोकांवर पूर्ण विश्वास असतो व लोकांबद्दल अविश्वास हे राजेशाहीचें आद्य तत्व आहे. हे शब्द अक्षरशः कोणीहि खरे मानीत नाहीं तथापि प्रत्येक हिंदी गृहस्थानें या वाक्यांच्या उजेडांत आपली हिंदुस्थानची राज्यपद्धति निरखून पाहिल्यास त्यास फायदाच होईल. आपण कोण व कोठें आहोंत इतकें त्यास यामुळें ज्ञान झालें तर तो जागा होऊन सुधारणेच्या मार्गाला लागेल. हिंदुस्थानांत स्थानिक स्वराज्याच्या पुष्कळ संस्था

आहेत. पण त्यापैकीं किती संस्था या वाक्यांत सांगितलेल्या नमुन्याजवळ तरी येण्यास लायक असतील कोण जाणे.

मांटेग्यु चेम्स्फोर्ड रिपोर्टांत असें म्हटलें आहे कीं, हिंदुस्थानांत थोडें-बहुत स्थानिक स्वराज्य आहे. पण या संस्थांच्या सभासदांना संपत्ति व स्वराज्यकारभार यांच्या उच्च पायरीवरील राज्यकारभाराची कांहींच माहिती नाहीं. हिंदुस्थानांत पाश्चात्य देशांच्या धर्तीचें स्वराज्य, लहान अगर मोठें, स्थापन करण्याचा कोणी अद्याप प्रयत्नच केला नाहीं. हिंदुस्थानांतील स्थानिक संस्थामार्फत खर्च होणाऱ्या पैशावरून सुद्धां या संस्था किती क्षुद्र आहेत याची कल्पना होते. सन १९१७।१८ सालीं हिंदुस्थानांतील लहान मोठ्या सर्व म्युनिसिपालिट्यांचा खर्च रु. १२,७५,००,००० होता व सर्व लोकलबोर्डांचा खर्च ११,४०,००,००० होता व हिंदुस्थान सरकारचा खर्च शंभर कोटींवर होता. यावरून एकंदर राज्यकारभाराचा किती लहान हिस्सा स्थानिक संस्थांच्या हातीं आहे हें समजेल. पण त्यांत सुद्धां स्थानिक संस्थांचीं सर्व मोठीं कामें फिरून सरकारच्याच नोकरांमार्फत होतात. संस्थांचें सभासदत्व, अधिकारीपण सरकारीं नोकरांच्याच हातांत पुष्कळ आहे. तात्पर्य, स्थानिक स्वराज्य किंवा स्वतंत्रता हिंदुस्थानांत अत्यल्प आहे; किंवा नाहीं म्हटलें तरी चालेल. या स्थानिक स्वराज्यांत स्थानिक करांचें उत्पन्न फार असतें व तें म्हणजे जकात, चाकपट्टी, घरपट्टी वगैरे. या स्थानिक स्वराज्याचा खर्च मात्र सर्व साधारण कामाकडे होतो; जसें रस्ते, नावा, शाळा, दवाखाने. जे लोक पैसे देतात त्या विशिष्ट लोकांच्या गांवच्या सोईकडे फारच थोडें लक्ष दिलें जातें. तात्पर्य, स्थानिक स्वराज्य म्हणजे सरकारचें काम व खर्च जनतेवर लादण्याची एक युक्ति अशी स्थिति आज आहे.

नवीन स्वराज्यांत प्रत्येक प्रांतिक सरकारनें अगदीं अवश्य व पहिल्यानें करावयाचें काम म्हणजे गांवोगांवीं लोकांच्या गरजा काय आहेत व इतर स्वतंत्र देशांच्या नमुन्यांचा विचार करतां त्या कशा पुऱ्या पाडतां येतील याची पाहणी करून निर्णय ठरविणें व तो अमलांत आणणें होय. नव्या स्वराज्यांत एक स्थानिक स्वराज्याचें खातें उघडण्यांत येईलच. हें खातें आपलें काम किती विचारपूर्वक व आस्थेनें करतें यावर देशाची सर्व

भवितव्यता अवलंबून राहील. कारण खरें स्वराज्य हें गांवपंचायत व स्थानिक स्वराज्याचा विस्तार होय. पिंडब्रह्मांडन्यायानें जें एका गांवांत तेंच देशांत व जें देशांत तेंच गांवांत असणार. शितावरून भाताची परीक्षा म्हणतात ती हीच.

हिंदुस्थान देशांत नऊदशांश लोक खेडेगांवांत रहातात व म्हणून खेडेगांवांची जी सुधारणा तीच देशाची खरी सुधारणा होय व म्हणून नव्या स्थानिक स्वराज्याच्या कायद्यांत खेडेगांवांच्या सुधारणेला मुख्य स्थान दिलें पाहिजे. जिल्हा बोर्ड, तालुका बोर्ड व म्युनिसिपालिट्या यांपेक्षां ग्रामपंचायतीचें महत्त्व याप्रमाणें फार मोठें आहे. यासाठीं दरएक गांवपंचायतीनें रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी, पाट यांकडे लक्ष घालून आपली सुव्यवस्था करण्यास शिकलें पाहिजे. हें शिक्षण व ही शिस्त अखेरपर्यंत उपयोगी पडणार आहे. शिक्षण, दवाखाने वगैरे कामें सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीनें उपयोगी असल्यामुळें त्यांचा बोजा स्थानिक संस्थांवर पडणें अयोग्य होय. त्या विशिष्ट भागांत चालणाऱ्या विशिष्ट धंद्याचें शिक्षण पाहिजे तर स्थानिक संस्थांनीं द्यावें. तसेंच सक्तीचें व शेतीचें शिक्षण त्यांनीं देण्यास हरकत नाहीं.

पुष्कळ खेडेगांवांतील घरें मातीच्या भिंती व गवतांचीं छपरें यांचीं असतात, व गांवाला रचना किंवा बाळसें मुळींच नसतें. गांवांत राहणाऱ्या लोकांना राजकीय किंवा सामाजिक कांहींच हक्क नसतात आणि एकजुटीनें कामें करून आपल्या गांवाचें हित करावें अशी त्यांस बुद्धीहि नसते व वावहि नसतो. यासाठीं गांवांत गांवपंचायती स्थापून त्यांना गांवच्या सुधारणा करण्यास उत्तेजन दिल्याखेरीज हिंदी स्वराज्य या नांवांत कांहीं अर्थच राहणार नाहीं. जसें हल्लींचे इंडियन सिव्हिल सर्वंट हे इंडियन नसतात, सिव्हिल नसतात व सर्व्हंटहि नसतात; त्याचप्रमाणें गांवपंचाइती व त्यांची राजकीय व सामाजिक शक्ति यांची स्थापना व वाढ झाल्यावांचून हिंदी स्वराज्य म्हणजे हिंदीहि नव्हे व स्व-राज्यहि नव्हे असें होईल. केंद्रीभूत राजसत्तेमुळें ज्या ग्रामपंचायती नष्ट झाल्या आहेत त्यांचें पुनरुज्जीवन करण्यावर मांटेग्यु-चेम्सफोर्ड रिपोर्टांत जोर दिला आहे. परंतु हल्लींच्या विसकटलेल्या स्थितींत यांना मूर्त व व्यवस्थित स्वरूप कसें द्यावें हें त्यांना न समजल्यामुळें ही बाब त्यांनीं सर्वस्वी प्रांतिक सरकारच्या हातीं सोंपविली

आहे. ग्रामपंचायतीचा प्रारंभ कोठून करावयाचा असा प्रश्न केला तर ग्राम (गांवा) पासून हें उत्तर चटकन कोणीहि देईल. पण हिंदुस्थानांत ग्राम (गांव) म्हणजे वाटेल तितका मोठा अगर लहान असूं शकेल. एका गांवांत पांचशें सुद्धा माणसें नसतील व अशा गांवानें राजकीय अगर सामाजिक सार्वजनिक कामें अंगावर घेणें अशक्य असतें. गांव सोडलें म्हणजे हल्लींचा दुसरा राजकीय विभाग 'तालुका' होय. एका तालुक्यांत साधारणपणें ऐंशी नव्वद गांवें असतात व इतक्या माणसांनीं किंवा क्षेत्रानें प्रारंभ करणें मोठेपणामुळें अव्यवहार्य होतें. केंद्रीभूत राजसत्तेंत एका माणसाच्या आटोक्यांत राहील तो भाग म्हणजे तालुका हें ठीक होतें. पण स्वायत्त स्वराज्यांत लोकांना स्वतःच्या नजरेखालीं सहज घालतां येईल इतकाच प्रदेश पाहिजे. यासाठीं तालुका व गांव यांच्या दरम्यान व साधारण सभासदाच्या आटोक्यांत असा भूगोलिक भाग घेऊन तेथून सुरुवात केली पाहिजे. बलीनें राज्याची जी व्याख्या केली आहे ती या ठिकाणीं ठीक लागू पडते. तो म्हणतो "आपल्या पोटाची व्यवस्था करून राहिलेल्या वेळांत ज्याचा कारभार केवळ स्वतःच्या माहितीनें करतां येईल त्याला 'राज्य' म्हणावें. आपण जमीनीवर उभे राहिलों असतां आपली नजर पोंचते इतकाच तो भाग असावा व त्याला 'स्थानीय' म्हणावें" असें भृगुसंहितेंत सांगितलें आहे. तात्पर्य, स्थानिक सामर्थ्य व स्वतःची आवरशक्ति या दोहींना पुरेल इतकाच तो मुलूख पाहिजे. जपाननें हा प्रश्न ७२,००० गांवांचे १२,००० संघ स्थापून सोडविला आहे. या संघांच्या योगानें प्रत्येक सांदीकोंदींतील खेड्यांत सुद्धां विशिष्ट शिक्षण, विशिष्ट उत्पन्न, विशिष्ट व्यवस्था व विशिष्ट एकी हीं स्थापन झालीं आहेत. अशी योजना केल्याशिवाय ही टापटीप त्याला करतांच आली नसती.

जपानच्या एका संघांत तीन ते चार हजार लोकसंख्या असते. क्वचित् एक हजार संख्येचा तसाच तीस हजार संख्येचाहि संघ आहे. पण असे संघ फार थोडे. ओसाड जंगलें किंवा दाट वस्तीचीं शहरें यांतच असे संघ आहेत. एका संघांत पांचसहा गांवें असतात. सर विश्वेश्वरअय्या यांनीं स्वतः पाहिलेल्या एका संघाची स्थिति त्यांच्या ग्रंथावरून खालीं देतों.

" त्या संघांत पांच गांवें असून त्याचें क्षेत्र चोवीस चौरस मैल होतें. त्याची लोकसंख्या ५,४९३ होती. त्या संघांत दहा पेठा व पन्नास आळ्या होत्या. त्या संघाचा एक मुख्य होता त्याला सांको (मुखी) म्हणतात. हा मुखी त्या संघाच्या लोकांनीं निवडलेला असून त्याची नेमणूक त्या सुभ्याच्या सुभेदारानें (देशमुख, गव्हर्नर) मंजूर करावी लागते. या मुखीच्या मदतीला एक सल्लागार मंडळ होतें व या मंडळाचा एक एक इसम एका एका आळीनें निवडलेला होता. साधारण मुलकी, फौजदारी व दिवाणी कामें या मंडळाच्या सल्ल्याप्रमाणें किंवा निकालाप्रमाणें लोक कबूल करतात. वादाचा न्याय करण्यासाठीं त्या व शेजारच्या आळींतील सभासदांची कमीटी नेमून निकाल करतात व हा निकाल कायद्यानें मान्य ठरविलेला आहे.

कित्येक गांवांत संघाचें निराळें मंडळ न निवडतां गांवचेंच मंडळ निवडतात व संघाचा फक्त मुखी निवडतात. हा मुखी त्या त्या गांवाचा कारभार त्या गांवाच्या मंडळाच्या सल्याप्रमाणें चालवितो. प्रत्येक गांवांत सारावसुली वगैरे नित्याचें सरकारी काम करण्यास एक नोकर असतो व या नोकराच्या कामावर मुखीची नजर असते. गांवचें मंडळ, गांवचें अंदाजपत्रक, जमाखर्च व वादांचा निकाल यांचें फेरिस्त ठेवतें व संघाच्या मंडळाच्या बैठकींत यांची फक्त चर्चा करून मंजूर करण्यांत येतें.

संघाच्या मंडळांतून एक कार्यकारी मंडळ निवडतात व हें कार्यकारी मंडळ तालुक्याच्या मामलतदाराशीं व तो जिल्ह्याच्या सुभेदाराशीं पत्रव्यवहार करतो. हे सुभेदार मध्यवर्ती सरकारशीं पत्रव्यवहार ठेवतात. व याप्रमाणें दर एक घराची दाद मध्यवर्ती सरकारापर्यंत एका आठवड्यांत लागते. गांवचे संघ ही एक राजकीय सत्ता आहे. मध्यवर्ती सरकार किंवा सुभेदार वगैरे त्यांच्या राज्यकारभारांत बिलकुल हात घालीत नाहींत. पण उलट सुधारणा करणें, कारखाने काढणें रस्ते वगैरे सुखसोई करणें या कामांसाठीं त्यांस पैशांची मदत करतात व त्यांस सल्ला मसलत देण्यासाठीं आपले तज्ज्ञ पाठवितात. हे तज्ज्ञ येऊन इष्ट त्या सूचना करतात व त्या स्वीकारणें अगर न स्वीकारणें हें त्या संघाच्या सभासदांच्या मर्जीवर असतें. गेल्या खेपेस मी जपानास गेलों तेव्हां उत्तम कामगिरी करण्याबद्दल

पंचाहत्तर संघांना सरकारांतून खास बक्षिसें म्हणून रकमा देण्यांत आल्या होत्या. ”

हा लेखक स्वतः कंदाहारपर्यंत अफगाण हद्दींत गेला होता. तेव्हां तेथें इतकी व्यवस्थित पद्धति नव्हती तरी गांवच्या पंचांना मुलकी, फौजदारी व दिवाणी कामांचा निकाल करण्याचा अधिकार होता व त्यामुळें गांवांत पंचांचें वजन असून व्यवस्था उत्तम होती. इंग्रजी राज्यांतील न्यायपद्धतीची अफगाण लोक खालीलप्रमाणें चेष्टा करतात.

“ इंग्रजी राज्यांत मारामारी झाली तर मार खाणारा इसम न्यायाधिशाकडे फिर्याद करतो. त्याचें म्हणणें ऐकून घेऊन न्यायाधीश म्हणतो ‘ तुझ्या एकट्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवतां येत नाहीं. पण जर चार सभ्य गृहस्थ तुझें म्हणणें खरें आहे असें सांगतील तर मग त्यावर विश्वास ठेवतां येईल. ’ मग तो गृहस्थ चार सभ्य गृहस्थांना (साक्षीदारांना) आणून रुजू करतो व न्यायाधीश त्याचें म्हणणें ऐकून घेतो. (खरें म्हटलें तर येथें न्यायाधिशानें निकाल द्यावयाला पाहिजे) मग न्यायाधीश मारणाराला बोलावून विचारतो. तो ठरल्याप्रमाणें मारल्याचें नाकबूल करतो. मग त्यालाहि चार सभ्य गृहस्थ (साक्षीदार) आणण्यास सांगण्यांत येतें व तो त्यांना घेऊन येतो. यांचें म्हणणें ऐकल्यावर मग न्यायाधीश आपल्याला वाटेल तो न्याय देतो. आपला जर साक्षीदारांवर विश्वास नाहीं तर त्यांनां कचेरींत आणवावें व शिणवावें कशाला ? दोघांचें म्हणणें ऐकून खरें वाटेल त्याप्रमाणें न्याय द्यावा झालें. सभ्य गृहस्थांना बोलावून त्यांना अविश्वासूक म्हणणें फार गैर आहे. तसेंच इंग्रज सरकार झालेली चोरी कधींच भरून देत नाहीं. चोरी होते ती सरकारच्या बंदोबस्तांतील कमीपणामुळें व यासाठीं चोरी सरकारनें भरून द्यावी अगर चोराकडून भरून देववावी पण तसें इंग्रज सरकार करीत नाहीं. आपल्या प्राचीन धर्म व अर्थ शास्त्रांतून राजानें चोरीची किंमत चोराकडून भरून देववावी अगर आपल्या खजिन्यांतून भरून द्यावी असें सांगितलें आहे. राजा जो षष्ठांश सारा घेतो तो मालमत्ता व जीवित यांच्या संरक्षणाच्या विम्याचा हप्ता आहे; व जोपर्यंत कोणी इसम तो हप्ता वेळचेवेळीं भरीत आहे तोंपर्यंत या विमा कंपनीनें (सरकारनें) झालेलें

" त्या संघांत पांच गांवें असून त्याचें क्षेत्र चोवीस चौरस मैल होतें. त्याची लोकसंख्या ५,४९२ होती. त्या संघांत दहा पेठा व पन्नास आळ्या होत्या. त्या संघाचा एक मुख्य होता त्याला सांको (मुखी) म्हणतात. हा मुखी त्या संघाच्या लोकांनीं निवडलेला असून त्याची नेमणूक त्या सुभ्याच्या सुभेदारानें (देशमुख, गव्हर्नर) मंजूर करावी लागते. या मुखीच्या मदतीला एक सल्लागार मंडळ होतें व या मंडळाचा एक एक इसम एका एका आळीनें निवडलेला होता. साधारण मुलकी, फौजदारी व दिवाणी कामें या मंडळाच्या सल्लयाप्रमाणें किंवा निकालाप्रमाणें लोक कबूल करतात. वादाचा न्याय करण्यासाठीं त्या व शेजारच्या आळींतील सभासदांची कमीटी नेमून निकाल करतात व हा निकाल कायद्यानें मान्य ठरविलेला आहे.

कित्येक गांवांत संघाचें निराळें मंडळ न निवडतां गांवचेंच मंडळ निवडतात व संघाचा फक्त मुखी निवडतात. हा मुखी त्या त्या गांवाचा कारभार त्या गांवाच्या मंडळाच्या सल्याप्रमाणें चालवितो. प्रत्येक गांवांत सारावसुली वगैरे नित्याचें सरकारी काम करण्यास एक नोकर असतो व या नोकराच्या कामावर मुखीची नजर असते. गांवचें मंडळ, गांवचें अंदाजपत्रक, जमाखर्च व वादांचा निकाल यांचें फेरिस्त ठेवतें व संघाच्या मंडळाच्या बैठकींत यांची फक्त चर्चा करून मंजूर करण्यांत येतें.

संघाच्या मंडळांतून एक कार्यकारी मंडळ निवडतात व हें कार्यकारी मंडळ तालुक्याच्या मामलतदाराशीं व तो जिल्ह्याच्या सुभेदाराशीं पत्रव्यवहार करतो. हे सुभेदार मध्यवर्ती सरकारशीं पत्रव्यवहार ठेवतात. व याप्रमाणें दर एक घराची दाद मध्यवर्ती सरकारापर्यंत एका आठवड्यांत लागते. गांवचे संघ ही एक राजकीय सत्ता आहे. मध्यवर्ती सरकार किंवा सुभेदार वगैरे त्यांच्या राज्यकारभारांत बिलकुल हात घालीत नाहींत. पण उलट सुधारणा करणें, कारखाने काढणें रस्ते वगैरे सुखसोई करणें या कामांसाठीं त्यांस पैशांची मदत करतात व त्यांस सल्ला मसलत देण्यासाठीं आपले तज्ज्ञ पाठवितात. हे तज्ज्ञ येऊन इष्ट त्या सूचना करतात व त्या स्वीकारणें अगर न स्वीकारणें हें त्या संघाच्या सभासदांच्या मर्जीवर असतें. गेल्या खेपेस मी जपानास गेलों तेव्हां उत्तम कामगिरी करण्याबद्दल

पंचाहत्तर संघांना सरकारांतून खास बक्षिसें म्हणून रकमा देण्यांत आल्या होत्या. "

हा लेखक स्वतः कंदाहारपर्यंत अफगाण हद्दींत गेला होता. तेव्हां तेथें इतकी व्यवस्थित पद्धति नव्हती तरी गांवच्या पंचांना मुलकी, फौजदारी व दिवाणी कामांचा निकाल करण्याचा अधिकार होता व त्यामुळें गांवांत पंचांचें वजन असून व्यवस्था उत्तम होती. इंग्रजी राज्यांतील न्यायपद्धतीची अफगाण लोक खालीलप्रमाणें चेष्टा करतात.

" इंग्रजी राज्यांत मारामारी झाली तर मार खाणारा इसम न्यायाधिशाकडे फिर्याद करतो. त्याचें म्हणणें ऐकून घेऊन न्यायाधीश म्हणतो ' तुझ्या एकट्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवतां येत नाहीं. पण जर चार सभ्य गृहस्थ तुझें म्हणणें खरें आहे असें सांगतील तर मग त्यावर विश्वास ठेवतां येईल. ' मग तो गृहस्थ चार सभ्य गृहस्थांना (साक्षीदारांना) आणून रुजू करतो व न्यायाधीश त्याचें म्हणणें ऐकून घेतो. (खरें म्हटलें तर येथें न्यायाधिशानें निकाल द्यावयाला पाहिजे) मग न्यायाधीश मारणाराला बोलावून विचारतो. तो ठरल्याप्रमाणें मारल्याचें नाकबूल करतो. मग त्यालाहि चार सभ्य गृहस्थ (साक्षीदार) आणण्यास सांगण्यांत येतें व तो त्यांना घेऊन येतो. यांचें म्हणणें ऐकल्यावर मग न्यायाधीश आपल्याला वाटेल तो न्याय देतो. आपला जर साक्षीदारांवर विश्वास नाहीं तर त्यांनां कचेरींत आणवावें व शिणवावें कशाला? दोघांचें म्हणणें ऐकून खरें वाटेल त्याप्रमाणें न्याय द्यावा झालें. सभ्य गृहस्थांना बोलावून त्यांना अविश्वासूक म्हणणें फार गैर आहे. तसेंच इंग्रज सरकार झालेली चोरी कधींच भरून देत नाहीं. चोरी होते ती सरकारच्या बंदोबस्तांतील कमीपणामुळें व यासाठीं चोरी सरकारनें भरून द्यावी अगर चोराकडून भरून देववावी पण तसें इंग्रज सरकार करीत नाहीं. आपल्या प्राचीन धर्म व अर्थशास्त्रांतून राजानें चोरीची किंमत चोराकडून भरून देववावी अगर आपल्या खजिन्यांतून भरून द्यावी असें सांगितलें आहे. राजा जो षष्ठांश सारा घेतो तो मालमत्ता व जीवित यांच्या संरक्षणाच्या विम्याचा हप्ता आहे; व जोपर्यंत कोणी इसम तो हप्ता वेळचेवेळीं भरीत आहे तोंपर्यंत या विमा कंपनीनें (सरकारनें) झालेलें

नुकसान भरून दिलें पाहिजे. ज्याप्रमाणें विमा कंपन्या डाक्टर, उपदेशक, आग विझविण्याचीं यंत्रें, बुडलेल्या आगबोटी काढण्याचीं यंत्रें वगैरे ठेवतात त्याप्रमाणें निरनिराळे अधिकारी, पोलीस, सैन्य हीं या विमा कंपनीचीं नुकसान भरून देण्याचीं अगर घेण्याचीं साधनें आहेत असें त्याचें म्हणणें आहे.

वर जी ग्रामांची संघ करण्याची पद्धत वर्णन केली ती हिंदुस्थानांत लागू करण्यासारखी आहे. या लागू करण्यामुळें जमाबंदी अगर शांतता याबाबदची चालू व्यवस्था मुळींच बदलावी लागणार नाहीं. दर एक पांच चार गांवांचा एक एक संघ करावा. मध्यवर्ती गांव त्या संघाचें मुख्य ठाणें ठरवावें, पातळ वस्तीच्या दहाबारा वाड्यांचा संघ करावा; तसेंच मोठ्या एका गांवाचाच संघ म्हणावा. हे संघ स्वराज्याचे मूल घटक होत. एका संघांतील गांवांनीं दहाबारा मंडळींचें एक संघाचें राजमंडळ निवडावें या राजमंडळाचे दोन भाग करावे. एका भागानें चालू कामें चालवावीं व नवीं सुरू करावीं व दुसऱ्या भागानें नित्य विचार करून कोणत्या सुधारणा कशा करतां येतील याचा विचार करावा. संघाच्या मंडळानें लोकांजवळून कर घ्यावे व वर्गण्या गोळा कराव्या. पैसे अगर त्या किंमतीचे श्रम अगर सामान हें वर्गणींत जमा धरावें. या उत्पन्नांतून त्या संघाच्या हद्दींतील रस्ते, घाट, पाणी पुरवठा, सांडपाणी, घाणीची व्यवस्था, झाडें लावणें अगर त्या हद्दींत चालवितां येण्यासारखे लहान कारखाने काढणें व चालविणें हीं कामें करावीं. या कामांचा विस्तार त्या लोकांची बुद्धि, शक्ति व ऐपत व एकीनें कामें करण्याची हातोटी अगर जूट यांवर अवलंबून राहील. पहिल्यानें लोक या कामांना पैसे देण्यास नाखुष असतील पण त्यांना हे पैसे केवळ आपल्या संघाच्याच उपयोग व सुधारणासाठीं आपल्याच हातून खर्च होतात असें दिसेल तेव्हां त्यांचा रोष पार जाईल. हे स्थित्यंतर ज्या वेळीं या सुधारणांमुळें शेतीचें पीक, गांवचे धंदे, लोकांचे उद्योग वाढण्यांत होतो व त्यामुळे संघाची स्थिति सुधारते असें दिसेल तेव्हां तर कराऐवजीं ते वर्गण्या अगर उसने पैसे देण्यास कबूल नव्हे उत्सुक होतील.

या ग्रामपंचायतीसाठीं जरूर ते कायदे प्रांतिक कायदेकाउन्सिल करीलच; तरी पण यांशिवाय जिल्ह्यांतील समंजस व धनिक लोकांनीं

हातीं घेण्यासारखीं पुष्कळ कामें उरतीलच. प्रत्येक संघांत एक सक्तीचें व धंदेशिक्षणाचें विद्यालय असावें, एक सभागृह अगर चावडी, वाचनालय, पुस्तकालय, एक शेतीसंस्था, सहकारी औद्योगिक संस्था, गांवची लोकपयोगी कामें करणारी संस्था, धंदे चालविणारी व उत्तेजन देणारी संस्था, भारत सेवक संस्था, दानधर्म संस्था, व त्या त्या परिस्थित्यनुरूप अनेक सहकारी संस्था असाव्यात. या संस्था सुरू करण्याचें काम संघाचें मंडळ व मतदार-संघ यांनीं एकमेकांस सहाय्य करून करावें. याबाबद संघटना कशी करावी हें मागें 'संघटना' या सदराखालीं तपशीलवार सांगितलें आहेच. एकएका संस्थेंत चारदोनच सभासद असावेत पण त्यांनीं आपली सर्व फुरसत त्या एका कामाकडेच लावली पाहिजे. आपणांस नुसत्या गप्पा, तोंडाच्या बाता माराव्याच्या नसून प्रत्यक्ष कामें करून दाखवावयाचीं आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अशा तऱ्हेनें ग्रामपंचायतींची रचना केली तरच स्वावलंबन, स्वसुधारणा व स्वराज्य यांचा पाया घालणें, वाढ व पोषण करणें व उपयोग करून दाखविणें शक्य आहे. मगच हिंदुस्थानांतील खेडीं सुंदर, बाळसेदार व सामर्थ्यसंपन्न होतील. एकदां लोकांना याप्रमाणें आत्मविश्वास उत्पन्न झाला म्हणजे त्या जोरावर मोठमोठीं साम्राज्यें उभीं करतां येतील.

हिंदुस्थानांत वीस हजार अगर त्याहून जास्त लोकसंख्येच्या गांवाला शहर म्हणण्याचा प्रघात आहे व ही लोकसंख्या जसजशी जास्त असेल त्या मानानें त्या शहराचीं कामें करण्याची ऐपत व सामर्थ्य जास्त असणार. अशा गांवांची व्यवस्था म्युनिसिपालटी नांवाच्या संस्थेकडे असते. या संस्थांचे कायदे प्रांतिक काउन्सिल पास करतें व लोकल गव्हर्मेंट बोर्ड नांवाच्या सल्लागार मंडळाची यांवर देखरेख असावी. दरएक म्युनिसि-पालिटींत म्यानेजिंग बोर्डाबरोबर एक सुधारणा बोर्ड पाहिजे. नेहमींचीं कामें चालू स्थितींत ठेवण्याचें काम म्यानेजिंग कमेटीकडे व शहरांत नव्या सुधारणा कोणत्या पाहिजेत हें ठरवून त्या अस्तित्वांत आणण्याचें काम सुधारणा बोर्डाकडे द्यावें. सुधारणा बोर्डानें कोणत्या सुधारणा पाहिजेत, त्या इतर ठिकाणीं कशा केल्या याबद्दल माहिती गोळा करून लोकांस सांगावी व त्या करण्याची गोडी त्यांत उत्पन्न करून त्यांच्या सहकार्यानें

त्या अमलांत आणाव्या. सुधारणा बोर्डाकडे नगररचनेंतील सुधारणा-पासून घरांतील व्यवस्थेच्या सुधारणापर्यंत लोकांच्या सर्व सुखसोईच्या सुधारणांचा विचार व काम सोंपवावें. लोकांना उद्योगधंदे, पोटापाण्याची सोय लावून देणें ही सुद्धां सुधारणेचीच बाब होय. ज्या बाबी म्युनिसि-पालिटीच्या कायदेशीर कार्यक्षेत्रांत येणार नाहींत त्या सुधारणा जनतेचे संघ, कंपन्या वगैरे स्थापून करवाव्या. प्रत्येक म्युनिसिपालिटीच्या मालकीच्या खालील गोष्टी पाहिजेत.

(१) सार्वजनिक दिवाणखाना (२) कमेटीची कचेरी (३) वाचनालय (४) पुस्तकसंग्रह (५) व्यापारी व धंदेविषयक प्रदर्शन, (६) चौकशी व माहिती पुरविणारी कचेरी व (७) प्राणिदुःखनिवारक संस्था. प्रत्येक कमेटीनें धंदे, व्यापार, कारखाने व पेढ्या यांना आपल्या हद्दींत सवलती देऊन स्थापवाव्या व शहर म्हणजे आसपासच्या गांवांना लागणारा माल तयार करण्याचें व पुरविण्याचें क्षेत्र करावें. आपल्या प्राचीन धर्मसूत्रांत नगरांचें हेंच वैशिष्ट्य सांगितलें आहे. ‘ नगराणि करवर्जितानि यंत्रसाराणां निगम वणिजां च स्थानानि ’ धर्मसूत्रें. मोठे कारखाने व व्यापारी उलाढाली चालविणारीं गांवें म्हणजे नगरें व यांवर राजाचे कर नसावे असें हें बौद्धसूत्र सांगतें. यासाठीं नगराच्या ठिकाणीं व्यापारी संघ, धंदेवाइकांच्या पेढ्या, शेतकरांच्या पेढ्या, अडत्यांचा संघ, कारागिरांचे समाज अशा संस्था असाव्या व त्यांनीं आपआपल्या परीनें त्या शहराची भरभराट करण्यास झटावें. कोणतेंहि शहर स्वयंसेवकपथक, बालसंस्था, आरोग्यभुवन (दवाखाने), अन्नछत्र, मित्तसमाज व स्वोद्धार मंडळ यावांचून पूर्ण समजण्यांत येऊं नयें. एकंदर शहरांत कोणत्या उणीवा आहेत, त्या भरून काढण्यासाठीं यंदा काय केलें, पुढल्या सालीं काय करण्याचा बेत आहे व किती काम उरलें याचा अहवाल सुधारणा बोर्डानें दरसाल जाहिर करून त्यावर लोकांना चर्चा करण्यास फुरसद द्यावी. म्युनिसिपालिटीच्या कामाचा असाच अहवाल दरसाल मतदारांपुढें वाचून त्यांस त्यावर चर्चा करूं द्यावी. सुधारणा बोर्डानें सगळ्या गांवाची लांबवर नजर देऊन पहाणी करावी. या पहाणींत जन्ममरण, रोगराई, शिक्षण, उत्पन्न व व्यापार इतक्या गोष्टी, व्यवसाय, धंदे, शहर सफाई, आरोग्य, मनोरंजन, क्रीडा-

भुवनें, धरभाडें व सोई, धंद्यांसाठीं सोई, धर्मादाय इतक्या बाबी यांची नोंद करावी. प्रत्येक पेठेंतील समंजस लोकांनीं हें काम करावें व तज्ञांची या कामांत त्यास सल्ला मोफत मिळावी. या पहाणीचा निष्कर्ष व सुधारणांची योजना छापून लोकांपुढें चर्चा व अंमलबजावणी यासाठीं मांडावी.

पांच हजारांपासून वीस हजारांपर्यंतच्या गांवांना हिंदुस्थानांत 'कसबे' म्हणतात. गांव व शहर यांच्या दरम्यान हें कसबे येतें. यासाठीं ग्रामसंस्था व म्युनिसिपालिटी यांचे दरम्यान या गांवाचा कारभार पहाणाऱ्या संस्था येतात. यांना नव्या म्युनिसिपल कायद्यांत 'मायनॉर म्युनिसिपालिटी' किंवा बाल म्युनिसिपालिटी म्हटलें आहे व शहरचा कारभार पाहणाऱ्या संस्थेस 'मेजर' किंवा प्रौढ म्युनिसिपालिटी म्हटले आहे. 'कसबे' हें नांवच या गांवांत कांहींतरी विशिष्ट कसब किंवा कुशलतेचा धंदा चालत असावा हें सुचवितें. शहराप्रमाणेंच या ठिकाणीं सर्व व्यवस्था पाहिजे. रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी वगैरे बाबींत कसबीं अद्याप फार मागासलेलीं आहेत व यांना योग्य ती मदत करून पुढें आणलीं पाहिजेत.

जिल्ह्याचा एकंदर कारभार जिल्ह्याच्या लोकलबोर्डाकडे असून त्या बोर्डांत जिल्ह्यांतील ग्रामसंघ व बाल म्युनिसिपालिट्या यांनीं निवडलेले लोक असावे. या जिल्हा बोर्डाची निवडणूक सर्व सभासदांची एकदम न करतां दरसाल एकतृतीयांश याप्रमाणें करावी. हे लोक आपल्या कामाला अद्याप अनभ्यस्त असल्यानें याप्रमाणें नव्या जुन्याच्या मिश्रणानें काम बरें होईल. सगळ्या जिल्ह्यांतील कामें व व्यवस्था या बोर्डाच्या हातांत पाहिजे. या बोर्डाच्या हाताखालीं एक पगारी सेक्रेटरी व पगारी कामें करणारीं माणसें असावींत. या बोर्डाकडे सक्तीचें शिक्षण, रस्ते, वाटा, पूल, पाणी-पुरवठे, सांडपाण्याची व्यवस्था, जनावरांची जोपासना, धर्मशाळांची व्यवस्था, आरोग्य, दवाखाने वगैरे गोष्टी सर्वस्वीं सोंपवाव्या. या बोर्डाला लोकल फंडाचें उत्पन्न, ग्रामसंस्था व म्युनिसिपालिट्या यांची वर्गणी व सरकारची मदत इतके पैसे खर्च करण्याचा अधिकार असावा. गांवोगांवचे कर गांवचे पाटीलच वसूल करतील व त्या वसूलांपैकीं कायद्यानें ठरलेली रकम लोकलफंड म्हणून या बोर्डाच्या ताब्यांत मिळेल. याशिवाय रेलवे, ट्रामवे, पूल, बंधारे, पाट, वीज वगैरे गोष्टींपासून ज्यांना फायदा होईल

त्यांजपासून रीतसर पैसे बोर्डांना वसूल मिळतील. लोकलबोर्डाचें मुख्य काम म्हणजे त्या जिल्ह्यांत उत्पन्न होणाऱ्या मालाची निपज वाढविण्यासाठीं व त्याचा चोहोंकडे पुरवठा करण्यासाठीं लागणारीं साधनें तयार करून देणें हें होय. अशीं कामें केल्यानें त्या जिल्ह्यांतील लोकांचा फायदा होऊन बोर्डालाहि एक उत्पन्नाची बाब होईल. अशा प्रकारचीं कामें करण्यास हिंदुस्थानांत पुष्कळ वाव आहे. उदाहरणार्थ नाशीक जिल्ह्यांत अनेक बंधारे आहेत व आणखी होण्यासारख्या जागा आहेत. तेथें पडणाऱ्या पाण्यांपासून वीज उत्पन्न केली, वाऱ्याचा उपयोग कामें करण्याकडे केला, उन्हानें वाफेचीं यंत्रें चालविलीं तर होण्यासारखें आहे. पण पहिल्यानें सरकारनें सुरुवात करून त्यांत नफा आहे असें दाखवून तीं कामें लोकांकडे सोंपविलीं पाहिजेत. बोर्डाला करावयाचीं कामें त्या जिल्ह्यांतील लोकांकडूनच करवावीं. हीं कंत्राटें घेण्यांसाठीं जरूर त्या कंपन्या त्या जिल्ह्यांतील लोकांकडूनच स्थापवाव्या म्हणजे लोकांना हा व्यवहार समजेल, लोकांना धंदा मिळेल, कामें करून घेण्याची माहिती होईल व जुटीनें कामें करण्याचें शिक्षण मिळेल व वळण लागेल. म्युनिसिपालिट्या वगैरेप्रमाणेंच लोकलबोर्डांत देखील दोन कमेट्या पाहिजेत. एकीकडे नव्या सुधारणा व योजना अमलांत आणण्याचें काम व दुसरीकडे अंमलांत आलेल्या योजना संभाळण्याचें काम द्यावें.

तालुक्यासाठीं बोर्ड नको. जिल्हा बोर्डाचे नोकर व जिल्हा बोर्डाची कमेटी यांनीं तालुक्यांतील कामें पहावीं. मात्र ज्या ठिकाणीं लोकसंख्या, क्षेत्र अगर ऐपत जास्त असेल तेथें जिल्हा बोर्डाच्या धर्तीवरच तालुका बोर्ड स्थापावें. या दोन बोर्डांत फक्त विस्ताराचीच तफावत; बाकी कामाची पद्धत एकच रहावी. तालुका बोर्ड निराळा स्थापन केला म्हणजे त्या ठिकाणीं जिल्हा बोर्डाचें काम, त्या तालुका बोर्डाचा आपल्या कामाशीं मेळ पहाणें इतकेंच राहील.

तालुका लोकलबोर्ड, जिल्हा लोकलबोर्ड व जिल्ह्यांतील मोठ्या म्युनिसिपालिट्या यांनीं निवडलेल्या सभासदांची एक डिस्ट्रिक्ट असेंब्ली असावी. या असेंब्लीची बैठक दर तिमाहीस एक व्हावी व या बैठकींत त्या

जिल्ह्याच्या काय उणीवा आहेत याबाबद सरकारी जिल्ह्याचे अधिकारी यांच्याशीं चर्चा व वाटाघाट व्हावी व जिल्हा लोकलबोर्डाच्या बजेटावर या असेंब्लीनें चर्चा करून तें पास करावें. बोर्डाला ज्या सूचना असेंब्ली करील त्या त्यानें मान्य कराव्या व अंमलांत आणाव्या. प्रांतिक सरकारचा जिल्ह्याशीं जो संबंध येईल त्याचा विचार ही असेंब्ली करील. ही असेंब्ली जिल्ह्याच्या सरकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या कामांत सल्ला देईल व सरकारी अधिकाऱ्यांनीं केलेल्या कामाची चर्चाहि करील. धंदेशिक्षण, कारखान्यांना सवलती वगैरे बाबतींत त्या त्या खात्याच्या सरकारी अधिकाऱ्यांना ही असेंब्ली सल्ला देईल व या असेंब्लीच्या बैठकीच्या वेळीं अधिकाऱ्यांना तिला आपली सल्ला देतां येईल. याप्रमाणें अधिकारी व असेंब्ली यांत मोकळ्या मनानें विचारविनिमय व्हावा.

जिल्ह्याचे सरकारी अधिकारी व जिल्ह्याचें लोकलबोर्ड यांनीं लोकांना प्रातिनिधिक संस्था चालविण्याचें शिक्षण देण्यासाठीं सुरू केलेल्या सर्व खाजगी प्रयत्नांना मदत केली पाहिजे. या शिक्षणांत नागरिकांचें कर्तव्य, सभ्यपणा, देशाभिमान, शिस्त व काटकसर या बाबींकडे विशेष लक्ष दिलें जावें. अतःपर प्रांतिक सरकारच दिवाण व जिल्ह्याचे अधिकारी यांनीं जिल्हा असेंब्लीच्या मार्फत लोकांनीं कसें वागावें व जिल्ह्याच्या कामांत सुधारणा वगैरे व्हाव्या म्हणून त्यांस कशी मदत करावी याची उपदेशपत्रकें किंवा मागण्या कराव्या.

लोकांचे जे पुढारी असतील त्यांनीं ताबडतोब आपल्या जिल्ह्यांत कोणच्या सुधारणा पाहिजेत व त्या कशा कराव्या याबद्दलचीं टिपणें तयार करावीं. याबाबद लोकांना शिक्षण द्यावें व त्या गोष्टी लोकांस पटाव्या म्हणून वर्तमानपत्रांतून त्यांची चर्चा सुरू करावी. तसेंच पैशाचा खर्च, श्रम, तयारी व अभ्यास केल्याशिवाय सर्व गोष्टी यथावकाश आपोआप मिळतील हा लोकांचा झालेला भ्रम घालविला पाहिजे व त्यांना पैसे खर्चून स्वार्थत्याग करण्यास तयार केलें पाहिजे. या उद्योगाला आतांच लागावें. याबाबद पुढील सर्व व्यवस्था स्थानिक बाबींत आपण जे कायदे करूं व जी मेहनत घेऊं त्यावर अवलंबून राहणार आहे. स्थानिक संस्था उत्तम नमुन्यावर आपण चालवूं लागलों कीं, वरच्या पायऱ्या आपणांस सुलभ व

साध्य आहेत. स्थानिक संस्थांत आपण लक्ष घातलें नाहीं, जरूर ती व्यवस्था करण्याची मेहनत व कष्ट केले नाहींत तर वरच्या पायऱ्यांचें काम आपल्या हातून व्हावें तसें होणार नाहीं. गांवतल्या गांवांत ज्याला रोज दोन तास या कामाकडे देतां येत नाहींत तो परगांवीं राहून रात्रंदिवस देशाचें काम कसें करील ? व अशीं कामें करणारीं, कळकळीनें कामें करणारीं माणसें मिळालीं नाहींत तर मग कसलें स्वराज्य व कसल्या गोष्टी ! अशानें स्वराज्य मिळणें दुर्घट, मिळालें तर टिकणें दुरापास्त व टिकलें तरी देशाचें कल्याण होणें अशक्य. अशा स्थितींत या गोष्टी केवळ शब्दांतच राहणार हें पक्कें समजावें. व यासाठीं ताबडतोब कामास सुरवात करावी.

प्रकरण अठरावें

प्रांतिक सरकार

हल्लींच्या द्विदल राज्यपद्धतींत सरकारनें पोलीस, न्याय, जमाबंदी
व पाणीपुरवठा हीं खातीं आपल्या नोकरांच्या ताब्यांत दिलीं आहेत व
शिक्षण, स्वराज्य, शिल्प, शेती, जंगल, वैद्यिक व अबकारी हीं खातीं
लोकांकडे दिलीं आहेत. पण त्यांत सुद्धां स्टेट सेक्रेटरींनीं नेमलेल्या
लोकांचा पगार कमीजास्त करण्याचा अधिकार लोकांना नाहीं. हा अधि-
कार लोकांना हवा. राज्यकारभारावर देखरेख ठेवणाऱ्या मंडळाचे श्याऐंशी
सभासद लोकांनीं निवडलेले, जाब विचारणारे व पंचवीस सभासद
सरकारी नोकर आपल्या कामाचा जाब देणारे अशी वांटणी आहे.
दिवाण हे निवडून आलेल्या लोकांना पसंत असे असले पाहिजेत.
त्यांची सल्ला गव्हर्नरांनीं घेतली पाहिजे व त्यांना आपल्या कामांत पूर्ण
स्वातंत्र्य पाहिजे. या द्विदल पद्धतीनें एकजूट होण्याऐवजीं दोन भाग
होतात व दर एक भाग आपल्याकडे राज्यशकट ओढूं पहातो. त्यांत
पैसे देण्याचें काम सरकारच्या हातांत आहे. तें लोकांच्या हातांत
पूर्णपणें पाहिजे. सरकारच्या उत्पन्नाची वांटणी या दोन भागांत कशी
करावी यांतच पहिल्यानें तंटा पडतो. या तंट्यांत एका अंगाला दोन
गोरे व दोन हिंदी नोकर व एका अंगाला तीन हिंदी दिवाण अशी
स्थिति होते. यांत दोन हिंदी नोकर आहेत. त्यांना गोरे अधिकारी
आपणांकडे ओढतात. व हिंदी दिवाण आपणांकडे ओढूं पहातील तर ते
दिवाणांकडे येतील. पण त्यांच्या खात्याच्या खर्चावर धाड येते म्हणून
ते तसें करीत नाहींत. हिंदी एक्झिक्युटिव्ह काउन्सिलरनीं पहिल्यानें हिंदी
लोकांच्या सबंद प्रांतांच्या कल्याणाकडे पाहण्यास शिकलें पाहिजे. आपल्या
हिंदी दिवाणांची अडचण त्यांनीं ओळखली पाहिजे. देशाचें शिक्षण,
देशाचे उद्योगधंदे, देशाचा व्यापार उदीम यांजकडे त्यांनीं लक्ष पोंचवून

आपले खात्यांत काटकसर केली पाहिजे. स्वार्थ, तात्कालिक फायदा, आपल्या कामाची सोय यांपेक्षां दीर्घकालीन हिताकडे त्यांनीं जास्त लक्ष दिलें पाहिजे. या उत्पन्नाच्या वांट्याच्या ओढाताणींत एकवाक्यता झाली नाहीं तर मागील सालाप्रमाणें ती वांटणी असावी असा नियम आहे. पहिल्या निवडणुकीच्या वेळीं मागील सालांतील वांटणी कायद्याचें होणारें धोरण पाहून दिवाणांकडे जाणाऱ्या खात्यांला कमी हिस्सा दिला असेल.

कायदा करणारांनीं मतदार नवीन आहेत, ते चुका करतील, दिवाणांना अनुभव नाहीं, तेही कामांत चुका करतील हें गृहीत धरलें आहे; पण त्याचप्रमाणें अधिकाराबाहेर जाणारे लोक अधिकार सोडण्यास खुष नसतील हें गृहीत धरलें नाहीं ही मोठी चूक केली आहे. अधिकारी लोक अधिकार सोडण्यास नाखुष असणार व दिवाणांना कामांत मदत करणारे अधिकारी हेच यासाठीं दिवाणांच्या कामांत अनेक अडचणी उत्पन्न करतील ही गोष्ट कायदे करणारांनीं डोळ्याआड केलेली आहे. यासाठीं दिवाणांच्या हाताखालील नोकरांची बढती व बहाली सर्वस्वी दिवाणांच्या हातीं पाहिजे होती. त्यांत दुसऱ्या कोणाचा संबंध नसावा, असें पाहिजे होतें. हा जो कायद्यांत दोष आहे त्याचें निराकरण केवळ जुटीनेंच आपल्याला करतां येईल. प्रत्येक जण जर हिंदुस्थानाच्या कल्याणासाठीं झटूं लागेल तरच हें काम होणार आहे. मतदारापासून तों थेट एक्झिक्युटिव्ह कौन्सिलरपर्यंत सर्वांनीं एकच ध्येय डोळ्यांपुढें ठेवलें पाहिजे व तें म्हणजे हिंदुस्थानचें कल्याण. हें हिंदुस्थानचें कल्याण सगळी सत्ता हिंदी लोकांच्या ताब्यांत आल्यानें होणार आहे. तेव्हां एक काळागोरा हा भेद. सर्व हिंदी म्हणजे एक असा परिपाठ पाहिजे. प्रत्येक गोष्टीला कायदे कौन्सिलाची संमति पाहिजे या एकाच गोष्टीवर आज आपणांस हिंदुस्थानचें कल्याण करतां येणार आहे. कोणतीहि गोष्ट कौन्सिलपुढें आली कीं, तींत हिंदुस्थानचें कल्याण किती हें पाहण्याची ज्याला अक्कल असेल, हें ओळखण्याची ज्याला माहिती असेल, गुंतागुंतीच्या प्रश्नांचा उलगडा करण्याची ज्याला संवय असेल असाच मनुष्य या कामासाठीं निवडला पाहिजे. मग कल्याणाचा तेवढा भाग घ्यावा व अकल्याणाच

भाग वगळावा अशा बेतानें कामें चाललीं पाहिजेत. या ओढाताणीच्या पहिल्या काळांत आपणाला माणसें फार जपून निवडलीं पाहिजेत. अधिकाऱ्यांना त्यांच्या कोटांतून बाहेर काढून देऊन त्यांचीं सूत्रें आपल्या हातीं आणण्यास फार चातुर्य लागतें. नाखुष माणसाकडून आपलें काम करून घेणें ही अवघड कला आहे.

राजकारभारांतील या ओढाताणीची कल्पना इंग्रजांना आहे. हिंदुस्थानचे एक अंडर सेक्रेटरी हाउस ऑफ लार्डस्‌मध्यें असें म्हणाले कीं, "रिझर्व खात्यांचा कारभारसुद्धां अतःपर जपून केला पाहिजे. कारण सर्व अंदाजपत्रक लोकांनीं निवडलेल्या प्रतिनिधि मंडळानें मंजूर करावयाचें आहे आणि ज्या गोष्टी यांना पसंत पडतील त्याच अखेर सिद्धीस जाणार आहेत. यासाठीं लोकांना पसंत तें सरकारला पसंत असें धोरण सरकारनें ठेवलें पाहिजे." निदान हिंदी कौन्सिलर्सनीं तरी हें धोरण ठेवावें. एकंदर राज्यकारभाराचा विचार केला तर दिवाण बरेच नेमावे लागतील. कारण कामें पुष्कळ करावयाचीं असून त्याला थोडे दिवाण पुरणार नाहींत. दिवाण वगैरेंना पगार मात्र तीन हजारांपेक्षां जास्त नसावा. कानडांतील प्रधानांना फक्त १७५० रुपये व जपानांतील प्रधानांना बाराशें रुपये पगार आहे. इंग्रज नोकरांना जास्त पगार द्यावा लागत असल्यामुळें हिंदुस्थानांतील सर्वच नोकरांना पगार जास्त आहेत व त्याचमुळें सरकारी नोकर सरकारच्या इतराजीला फार भितात. ज्या माणसाला बाजारांत कोणी दोनशेंला विचारणार नाहीं त्याला पांचशें पगार मिळाला म्हणजे तो साहजीकच भिऊन भिऊन मरतो.

प्रत्येक खात्याला दोन दिवाण असावे. एकानें नवीन विचार करून सुधारणा घडवून आणण्याकडे लक्ष द्यावें व दुसऱ्यानें फक्त चालू काम पाहून प्रश्न वगैरेंचे जबाब द्यावे. रोजचें आखलेलें काम करण्यांत गुंग झालेला मनुष्य त्या कामाच्या अडचणींतच गुरफाटलेला असतो; त्याला मोकळेपणें विचार करून सुधारणा व नवीन योजना यांजकडे लक्ष देण्यास होत नाहीं. शिवाय बारीक सारीक बाबींची चौकशी करणाऱ्या माणसाला विशाल विचार करण्याची संवय नाहींशी होते. सूक्ष्मदर्शक यंत्राप्रमाणें रोजचें काम करणारा इसम असतो. पण योजना करणारा इसम दूरवीक्षण

यंत्राप्रमाणें लागतो. हें दुसऱ्या म्हणजे योजना करणाऱ्या माणसाचें काम स्वतंत्र सल्लागार मंडळाकडे दिलें तर चालेल. पण अशीं दोन विचारांचीं दोन माणसें पाहिजेत. रोजचें काम पहाणारा मनुष्य व्यवहारदक्ष अगर व्यापारी धोरणाचा, सुशिक्षित असा पाहिजे.

राज्यकारभाराचें काम नियमांनीं बद्ध पाहिजे. प्रत्येक इसमाला वाटेल तें करण्याची त्यांत मुभा असूं नये. लहान मोठा कोणीहि नोकर चुकेल तर तो शिक्षेस सारखाच पात्र असावा. वरिष्ठ प्रतीच्या जागांवरील नोकरांनीं आपणच आपणांस शिक्षा करावयाची असते व म्हणून नियमांतील सवडींचा ते फायदा घेतात. यासाठीं अशा सवडी सहसा ठेवूं नयेत. सरकारी गुह्य हा शब्दच नाहींसा केला पाहिजे. अंतर्गत व्यवहारांत गुप्तपणाची जरूरच नसावी.

प्रांतिक जमाखर्चावर प्रांतिक सरकारचाच अधिकार असल्यानें प्रांतिक सरकारनें सर्व देणें आपल्या अडत्यामार्फत द्यावें. सरकारी अधिकारी जागोजाग ठेवून त्यांच्या मार्फत लागणारा माल खरेदी करण्यापेक्षां प्रांतिक सरकारनें जाहीर टेंडरें मागवून जेथें स्वस्त व चांगला माल मिळेल तेथून आपणांस लागणारा माल आपण आपल्या अडत्यामार्फत घ्यावा. प्रत्येक प्रांतिक सरकारनें आपलीं कामें करण्याची पद्धति वरील धोरणानें बदलल्याशिवाय इष्ट सुधारणा होणार नाहींत. आजपर्यंतचें धोरण शांतता ठेवण्याचें, फक्त शांतता ठेवण्याचें, आहे. तें यापुढें सुधारणा करण्याचें पाहिजे. प्रत्येक कचेरींत, प्रत्येक कामांत, प्रत्येक खात्यांत सुधारणा करून दाखवील तो बढतीस पात्र असें ठरवावें.

सुधारणेची गोष्ट काढली कीं, हल्लींचीं प्रांतिक सरकारें आपली विविधतेची सबब पुढें आणतात. प्रांतातल्या प्रांतात भेद व विविधता आहे, इतकेंच नव्हे; पण प्रांतिक सरकारांत परस्परांत देखील भेद व विविधता आहे व या सर्वांना एकसूत्रीपणा आणण्याच्या प्रयत्नांत शिथिलता मात्र येते. प्रत्येक प्रांताचा विस्तार, लोकसंख्या, भाषा, आचार यांत विविधता आहे. ती काढून भाषा व आचार यांस अनुसरून प्रांतरचना व त्यांतील भाग तसेच केले पाहिजेत. एक आचार, एक विचार, एक भाषा वगैरे असणारा एक

भाग व त्याची त्या गोष्टीला अनुसरून स्वतंत्र व्यवस्था अशी पद्धत पाहिजे. हल्लींच्या कायद्यांत याबाबद खालीलप्रमाणें व्यवस्था केली आहे.

कोणत्याहि प्रांतिक कायदेकौन्सिलला धर्म, जात, भाषा याला अनुसरून जिल्हे अगर भाग यांची वांटणी करावी असें वाटलें तर त्यांनीं स्टेट सेक्रेटरीस कळवावें. मग स्टेट सेक्रेटरीनें चौकशी करवून मग तसें करावें. नंतर त्या प्रांतिक कौन्सिलच्या बहुमताला ही गोष्ट पसंत नसली तरी हरकत नाहीं. साधारणपणें एक ते तीन कोट लोकसंख्येचा एक एक प्रांत असावा. यापेक्षां लहान प्रांत झाला तर त्याचें उत्पन्न पुरें होणार नाहीं; व मध्यवर्ती सरकारची भांड त्याला मोडवणार नाहीं. याहून मोठा प्रांत झाला तर त्यांत विविधता वाढून युनिव्हर्सिटी, धंदे, व्यापार, शेती वगैरेबाबद निरनिराळे भाग करावे लागतात. यासाठीं साधारणपणें दोन कोट लोकसंख्येचा भाषा आचार, रिवाज वगैरेंनीं समता असलेल्या लोकांचा एक भाग करावा.

प्रांतिक सरकारनें पहिल्यानें विचारांत घ्यावयाच्या गोष्टी म्हणजे खेड्यांतील लोकांची संख्या वाढविणें, उद्योगधंद्याच्या शिक्षणाचा सर्वत्र प्रसार करणें व प्रांताचें (प्रांतांतील लोकांचें) उत्पन्न वाढविणें हीं होत. या तिन्ही गोष्टी एकमेकांत गुंतलेल्या आहेत. उद्योगधंदे वाढले म्हणजे उत्पन्न वाढेल. शिक्षणाचा प्रसार झाला म्हणजे उद्योगधंदे वाढतील. शहरांतील गर्दी मोडून खेडगांवांतील वस्ती वाढण्यास उद्योगधंदे वाढले पाहिजेत. तात्पर्य, धंदेशिक्षण व कारखाने काढणें हें पहिलें सुरुवातीचें काम व मग यापासून इष्ट त्या गोष्टी आपोआप होत जातील. यासाठीं त्यांच्या होण्याला उत्तेजन दिलें पाहिजे. शेतीवर निर्वाह करणाऱ्या लोकांची संख्या कमी व्हावी म्हणून उद्योगधंदेच वाढले पाहिजेत. उद्योग धंद्याच्या वाढीनेंच उत्पन्नाचीहि वाढ होणार आहे. त्याचप्रमाणें लोकांची रहाणी सुधारावी, ते संपन्न व्हावे असें वाटत असेल तर त्यांना शिक्षण दिलें पाहिजे. तात्पर्य, पहिली गोष्ट म्हणजे शिक्षण, विशेषतः धंदेशिक्षण व कारखाने काढणें ही होय; हिच्यापासून आपल्याला आपलें काम सुरू केलें पाहिजे.

उद्योगधंद्यांची वाढ झाल्यावांचून हिंदुस्थानाची सांपत्तिक स्थिति सुधारणार नाहीं व सांपत्तिक स्थिति सुधारल्याशिवाय हिंदुस्थानाला स्वतंत्र स्वराज्य फार दिवस लाभणार नाहीं. जगाच्या चढाओढीला टक्कर देईल इतकें हिंदुस्थान आपल्या पायावर उभें राहिलें पाहिजे. तरच त्याचा निभाव लागेल व ही गोष्ट उद्योगधंद्यांच्या वाढीवांचून शक्य नाहीं. हिंदुस्थानाचें उत्पन्न निदान दुप्पट झालें पाहिजे, तेव्हां त्यांत कांहींतरी त्राण येईल. तेव्हां कौन्सिलच्या मंडळींचें पहिलें काम म्हणजे धंदेशिक्षण व कारखाने यासाठीं पैसे उभे करणें. हे पैसे उभे करून आपल्या स्वाधीन करा किंवा आम्हाला पैसे उभे करूं द्या अशी मागणी प्रांतिक कौन्सिलनें एकमुखानें केली पाहिजे. या पैसे उभारण्याच्या कामीं वाटेल ते कष्ट पडले तरी आपण सोसले पाहिजेत. प्रांतिक उत्पन्नापैकीं जितका भाग या कामीं वापरतां येईल तितका वापरावा व फक्त शिक्षण, सक्तीचें व धंद्यांचें, यासाठींच म्हणून निराळें स्वतंत्र कर्ज काढावें.

प्रांतिक सरकारापुढें म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्ड यांचे कायदे येतील. त्यावेळीं जपान, कानडा व संयुक्त संस्थानें यांचे हे कायदे पाहून त्या दिशेनें विचार व्हावा. कानडांतील ऑन्टेरिओ गांवच्या म्युनिसिपालिटी-साठीं नुकता नवा कायदा केला आहे, त्या धोरणानें हिंदुस्थानांतील म्युनिसिपल कायदा करावा. त्याचप्रमाणें या स्थानिक संस्थांना आपल्या क्षेत्रांत पूर्ण प्रातिनिधिक स्वातंत्र्य असावें. इतकेंच नव्हे तर हितकर व उत्पन्नाचीं कामें करण्यासाठीं कर्ज काढण्याचाहि त्यांस अधिकार असावा. प्रारंभींच या अधिकाराचा कोठें कोठें दुरुपयोग होईल. परंतु अशा गोष्टी शिकण्याचा मार्गच हा आहे. अनुभव हीच याबाबद मोठी शाळा आहे व त्या शाळेंत फी देऊन या संस्थांना जाऊं द्यावें. प्रत्येक स्थानिक संस्था स्वतंत्र असल्यानें तिच्या चुकीनें तिच्याच लोकांचें नुकसान होईल. पण इतरांना तिच्या प्रयोगांची माहिती झाली तर फायदाच होईल व असा फायदा मिळावा म्हणून प्रत्येक म्युनिसिपालिटीचा अहवाल सर्व म्युनिसिपालिट्यांस पाठवावा असा कायद्यांत नियम पाहिजे. याप्रमाणें स्थानिक स्वराज्याचा अनुभव घेतल्यानेंच लोक प्रांतिक व मध्यवर्ती कारभारांत लक्ष घालण्यास व भाग घेण्यास लायक होणार आहेत.

प्रत्येक तालुक्याच्या, प्रत्येक जिल्ह्याच्या आंत राहणाऱ्या लोकांचें, उत्पन्न वाढेल अशी तजवीज केली पाहिजे. स्थानिक संस्थांना लहान तळीं, कालवे, रस्ते, ट्रामवे, रेलवे वगैरे लोकोपयोगीं कामें करण्याची परवानगी द्यावी व या कामांसाठीं प्रांतिक कौन्सिलानें त्यांस नियम घालून द्यावे व त्या नियमांप्रमाणें कामास परवानगी द्यावी. या कामासाठीं लागणारे कारागीर, तज्ञ, डायरेक्टर, भांडवल वगैरे त्या जिल्ह्यांतच उभारलेलें असेल तर अशा कामें करण्यानें लोकांना अतिशय महत्त्वाचें शिक्षण घरच्या घरीं मिळेल व या शिक्षणाचा उपयोग पुढें फारच होईल. पहिल्या पहिल्यांदा पुष्कळ ठिकाणीं तज्ञ बाहेरून आणावे लागतील पण त्यांवर देखरेख व सत्ता स्थानिक बोर्डांचीच राहिल्यानें लोकांना आजपर्यंत ज्या व्यावहारिक शिक्षणाचा गंध सुद्धां नव्हता असें महत्त्वाचें शिक्षण मिळेल. अशा प्रकारच्या कामांमुळें लोकांचें उत्पन्न वाढेल इतकेंच नव्हे तर त्यांच्या अंगांत स्वाभिमान, आत्मविश्वास व स्वावलंबन यांचें वारें खेळूं लागेल.

याप्रमाणें स्थानिक कारखाने काढण्यांत शिक्षणाच्या व उत्पादक धंद्याच्या बाबींत दिवाणाला आपलें कौशल्य पुष्कळ दाखवितां येईल. एक कोट रुपये खर्चून जागोजाग शेतांस पाणी पुरवण्यासाठीं तलाव बांधले तर भांडवलावर व्याज मिळून शिवाय शेतकऱ्यांचें शेतीचें उत्पन्न एक कोटीनें तरी वाढेल. त्याचप्रमाणें पाण्यापासून वीज उत्पन्न करण्याच्या कारखानदारांना तज्ञांची मदत देऊन कामें केलीं तर व्याज मिळून उद्योगधंदेवाल्यांचें उत्पन्न वाढेल. किंवा ट्रामवे, रेलवे, खाणी वगैरेसारखे धंदे व कारखाने सार्वजनिक पैशांनीं व सार्वजनिक देखरेखीखालीं काढले तर पुष्कळ हित होणार आहे. या गोष्टी निव्वळ कागदावर न रहातां म्हैसूर संस्थानानें आपल्या संस्थांनांत करून दाखविलेल्या आहेत.

त्याचप्रमाणें प्रत्येक खात्यावर नजर ठेवून त्याचा कारभार सुधारावा म्हणून सरकारी नोकर नसलेल्या लोकांचें एकएक सल्लागार मंडळ नेमावें. या मंडळाच्या योगानें त्या त्या खात्याची माहिती लोकांना मिळेल व लोकांची नजर त्या खात्यावर राहील. याशिवाय कांहीं खात्यांच्या कारभारांत सुधारणा सुचवाव्या म्हणून स्वतंत्र लोकांचीं कमिशनेंहि नेमावीत.

याप्रमाणें आपल्यापुढें जीं कामें आहेत तीं करण्यासाठीं लोकांची तयारी पाहिजे. सर्व शाळांतून राजशासन व अर्थ या दोन शास्त्रांचें शिक्षण मिळावें. प्रत्येक गांवांत, कसब्यांत व शहरांत संघ स्थापन होऊन या संघांनीं इतर सुधारलेल्या देशांत नागरिक शहराच्या कारभारांत कसें लक्ष घालतात हें पाहून आपण तसें लक्ष घालून दाखविलें पाहिजे.

लोकांना शिक्षण देण्यासाठीं स्थानिक संस्थांनीं आपल्या नागरिकांना व प्रांतिक सरकारांनीं आपल्या प्रांतांतील व्यापारी, धंदेवाले व शिक्षक यांना बाहेरचा मुलूख पाहण्यास पाठवावें. हिंदुस्थानाबाहेर कानडा, जपान, आस्ट्रेलिया हे देश शेती, धंदे व कारखाने चालविण्याचें शिक्षण घेण्यास उत्तम आहेत. त्या त्या व्यवसायांतील तज्ञ निरनिराळ्या देशांत फिरून आले तर त्यांची दृष्टि फांकते, ज्ञान वाढतें व एकंदर देशाचें हित होतें. नुसते विद्यार्थी पाठविण्यापेक्षां माहितगार माणसें पाठविण्यांत फार फायदा आहे.

दरसाल कायदेकौंसिलच्या बैठकींत देशाचें उत्पन्न व लोकांचें सामर्थ्य वाढविण्यासाठीं त्या सालांत काय केलें याचा अहवाल वाचावा, व हा अहवाल सर्वत्र विक्रीस ठेवावा. प्रत्येक कमिटीनें किंवा बोर्डानें आपला अहवाल याचप्रमाणें चर्चेस व विक्रीस ठेवावा. असें केल्यानें देशाचा उत्कर्ष कसा होत आहे हें साऱ्या लोकांच्या लक्षांत येईल.

तालुकाबोर्ड, जिल्हाबोर्ड, म्युनिसिपालिटया यांत सार्वजनिक बाबींची चर्चा करण्यासाठीं अधिकारी व स्वतंत्र लोक यांच्या कमेट्या नेमाव्या. या कमेट्यांनीं फक्त सल्ला द्यावी असें ठरविलें तरी सुद्धां जनता व अधिकारी यांचा मेळ चांगला बसेल. अधिकाऱ्यांचें म्हणणें जनतेपुढें व जनतेचें म्हणणें अधिकाऱ्यांपुढें मांडण्यांत या कमेट्यांचा फार उपयोग असून त्या कायदेशीर असल्यानें त्यांत बरोबरीचें नातें ठीक रहातें. असल्या कमेट्या मुळें अधिकाऱ्यांचा तोरा व एकांगीपणा मोडेल व लोकांचीहि भीड चेपेल. ही भीड हिंदुस्थानांत फार आहे व त्यामुळें सुधारणा व सहकार्य होण्यास फार अडचण पडते. मोकळेपणा जो पाहिजे तो या भीडेमुळें येत नाहीं व नसता घाबरटपणा व बाऊ उत्पन्न होतो.

ज्या ज्या हिंदी गृहस्थानें स्वदेश व परदेश पाहिला आहे त्याला त्याला येथील सरकारी नोकर व जनता व परदेशांतील सरकारी नोकर व जनता यांच्या वागणुकींत जमीन अस्मानाचें अंतर दिसतें. इतर देशांत अधिकारी हे आपणांस रयतेचे ताबेदार समजतात व लोकांची गाऱ्हाणीं समजून घेण्याचा प्रयत्न करतात. पण हिंदुस्थानांतील अधिकारी आपणांस लोकांचे धनी समजतात व लोकांचीं गाऱ्हाणीं ऐकण्याचा कंटाळा करतात. इतर देशांतील अधिकाऱ्यांचें वर्तन अदबशीर व सभ्यपणाचें असतें. पण हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांचें वर्तन बेमुर्वतखोर व अरेरावीचें असतें. ही स्थिति मोठे हुद्देदार इंग्रज अधिकाऱ्यांचीच आहे असें नाहीं तर क्षुद्र हिंदी अधिकारी सुद्धां हीच ऐट राखतात.

त्याचप्रमाणें परदेशीं जाऊन आलेल्या हिंदी गृहस्थास परदेशांत वेळचे वेळीं व तत्काळ कामें करण्याची जी शिस्त दिसते ती हिंदुस्थानांत दिसत नाहीं. ज्या पत्राचें उत्तर इतर देशांत त्याच दिवशीं देण्याची वहिवाट आहे असें पत्र हिंदुस्थानांतील कचेऱ्यांत महिनेच्या महिने पडून रहातें व कधीं कधीं तर त्याचा मुळींच जबाब येत नाहीं. दुसऱ्या देशांत ज्या बाबींचा निकाल ताबडतोब लागला पाहिजे असें समजतात व करतात त्याच बाबी हिंदुस्थानांतील कचेऱ्यांत महिन्याचे महिने रखडत असतात. जर ही बाब न्यायाच्या संबंधाची असली तर मग मुळीं बोलूंच नये.

याबाबद राज्यकारभाराची पद्धतीच बदलली पाहिजे. कामाचे तास, सुट्या वगैरेंबद्दल स्पष्ट निर्बंध असावे. जास्त वेळ, सुट्टीच्या दिवशीं सुद्धां जो काम करील तो नालायक समजावा. हिंदुस्थानासारख्या उष्ण देशांत अकरा वाजतां कामास सुरुवात करण्याची पद्धत चूक आहे. कचेरी, शाळा वगैरे सर्व सकाळ संध्याकाळ भराव्या. म्हणजे थंड वेळीं तरतरीतपणें काम चांगलें व लवकर होतें. संध्याकाळीं कामें बंद करण्याची वेळ चांगली नाहीं. पांच वाजतां कचेऱ्या सुरू होऊन त्या आठ वाजेपर्यंत चालल्या तर बरें होईल. सुट्यासंबंधानें देखील हिंदुस्थानांत असाच अनवस्था प्रसंग आहे. हिंदु, मुसलमान, खिस्ती, पारशी वगैरे सर्व जातींच्या सणांच्या सुट्या येत असल्यानें त्या कितीतरी जास्त होतात. याबाबद निर्बंध असावे. हिंदी

व मुसलमान प्रजा फार आहे यासाठीं त्यांच्या सुट्या कामाला नडण्यासारख्या असतील त्या द्याव्या. दुपारीं कचेरीच नसल्यानें केवळ पंचपक्वान्न जेवण्यासाठीं सुट्टी नको. दसरा, संक्रांत वगैरे दिवशीं अर्धी सुट्टी पुरे. श्रावणी वगैरेस सकाळीं अर्धी सुट्टी द्यावी, इत्यादि.

स्थानिक संस्था त्या त्या परिस्थितीला अनुरूप अशा विविधतेनें स्वतंत्रपणें चालवाव्या. पण प्रांतिक बाबींत सरसकट एक नियम ठेवावा व मध्यवर्ति बाबींत एकच पद्धत सर्वत्र असावी. तात्पर्य, हिंदी राष्ट्र, त्याचे नियम, त्याचे आचार वगैरे सर्व देशभर एकजुटीचे असावे. त्याच्या योगानें राष्ट्रांत किंवा प्रांतांत फूट पडूं नये अशी तजवीज करावी. प्रांतांत फूट म्हटली म्हणजे राष्ट्रावर घावच पडला व असा घाव घातक आहे. प्रत्येकाच्या हृदयांत हिंदी राष्ट्रीयत्व क्षणोक्षणीं व पावलोपावलीं एकरूप दिसेल अशी व्यवस्था केली पाहिजे व सर्व अक्कल, धोरण व सामर्थ्य याच मार्गांत वापरावें.

प्रकरण एकोणिसावें

मध्यवर्ति सरकार

सन १९१९ सालच्या दिजंबर महिन्यांत जो रिफॉर्म ॲक्ट पास झाला आहे त्यांत पूर्वीची हिंदुस्थानची राज्यव्यवस्था पार बदलण्यांत आली आहे व त्याचप्रमाणें जरूर ती व्यवस्था पुढें मागें आणखी अशीच बदलतां येईल. या नव्या कायद्यानें स्थानिक सत्ता सर्वस्वी लोकांच्या हातांत दिली आहे. स्थानिक संस्थांतून सर्व सभासद व पुढारी लोकनियुक्त असून या संस्थांना कोणते अधिकार व कसे द्यावे हें सर्वस्वीं प्रांतिक सरकारकडे सोंपविलें आहे. त्यामुळें या ठिकाणीं लोकांनीं आपल्या आकांक्षा परिपूर्ण करून घेण्यास पूर्ण वाव आहे. प्रांतिक सरकारचे दोन भाग केले आहेत. एक राखीव व दुसरा सोंपीव. त्यांपैकीं राखीव भाग सरकारकडे राहून दुसरा सोंपीव भाग प्रातिनिधिक धर्तीवर चालवावयाचें ठरविलें आहे. प्रांतिक सरकारांतील ही वांटणी गैर असून सगळेंच प्रांतिक सरकार लोकनियुक्त सभासदांच्या ताब्यांत पूर्णपणें पाहिजे आहे. याबाबद विवेचन 'प्रांतिक-सरकार' या सदराखालीं केलेंच आहे. मध्यवर्ति सरकार कांहीं लोकप्रतिनिधीपासून अलग ठेवलेलें नाहीं. तथापि तें लोकप्रतिनिधींच्या ताब्यांत नाहीं व त्याची सत्ता सर्व हिंदुस्थानावर सारखी नाहीं तरी हिंदी लोकप्रतिनिधींना त्यावर पुष्कळ टीका करतां येते. ज्या ज्या बाबतींत हिंदुस्थान सरकार व प्रतिनिधिमंडळ यांत एकवाक्यता असेल त्या त्या बाबतींत स्टेट सेक्रेटरीची त्यावर सत्ता चालणार नाहीं व हीच स्थिति प्रांतिक सरकारची देखील आहे. स्टेट सेक्रेटरीच्या अधिकारांतहि फेरफार करण्यांत आले आहेत. सामानखरेदी वगैरे बाबींचा अधिकार स्टेट सेक्रेटरीकडे नसून त्या कामासाठीं हिंदुस्थानसरकारनें नेमलेल्या एका हाय कमिशनर-(अडत्या) कडे आहे. या भागांत मध्यवर्ति सरकारचा कारभार आणखी कसा बदलला पाहिजे हें पाहून पुढील दोन भागांत प्रांतिक सरकार व स्थानिक सरकार यांच्यांत यापुढें कोणते फेरबदल झाले पाहिजेत याचा

विचार करण्याचें योजिलें आहे. स्वायत्त, स्वतंत्र हिंदुस्थान होण्यास काय केलें पाहिजे याचा याप्रमाणें तीन भागांत विचार केला आहे.

हिंदुस्थान अद्याप स्वायत्त स्वराज्याला लायक नाहीं असा जो सिलेक्ट कमेटीनें निर्णय दिला आहे तो आम्हाला खालील दोन मुद्यांवर मान्य नाहीं.

१ अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें, कानडा किंवा आस्ट्रेलिया यांच्या धर्तीवर हिंदुस्थानांतील सर्व देशी संस्थानें व प्रांतिक सरकार यांचें स्वतःचें अंतर्गत स्वातंत्र्य कायम ठेवून राष्ट्रीय एकी करणें शक्य आहे. असें केलें म्हणजे अंतर्गत स्वायत्तता ठेवून बाहेर्गत स्वतंत्रता देखील साध्य होणारी आहे.

२ सरकारचे दोस्त मानलेल्या संस्थानांप्रमाणें प्रांतिक सरकारांना आपआपल्या प्रांतापुरती पूर्ण मुभा दिली तर त्यांना राज्यकारभारांत पुष्कळ सुधारणा करतां येऊन संस्थानांना उत्तम उदाहरण घालून देतां येईल. संस्थानांना प्रांतिक सरकारांचें अनुकरण करून आपलीं राज्यें इंग्रजी राज्याच्या तोडीचीं करणें भाग पडेल व असें सगळ्यांत समानत्व आल्यावर एकी होणें मुळींच दुर्घट नाहीं.

या कायद्यानें देशी संस्थानांना मध्यवर्ति सरकारच्या कारभारांत मुळींच हक्क दिलेले नाहींत, ही एक फार मोठी उणीव राहिली आहे. यामुळें हिंदुस्थान सरकारच्या उत्पन्नांत संस्थानांचा भाग असूनहि संस्थानच्या मंडळीस त्याच्या खर्चांत शब्द बोलण्याचा अधिकार नाहीं व त्याचप्रमाणें सर्वांच्या सुखदुःखाच्या कामांत त्यास सल्ला देण्याचाहि अधिकार नाहीं. परदेशांतून येणाऱ्या व परदेशीं जाणाऱ्या मालावर हिंदुस्थान-सरकार जी जकात घेतें, रेल्वे, पोष्ट, तार वगैरे खात्यांचे जे कर घेतें त्यांत संस्थानांतलि लोक इतरांबरोबर भागीदार आहेत. त्याचप्रमाणें परदेश वगैरेंशीं हिंदुस्थान सरकार जे व्यवहार करतें त्यांचा बरा वाईट सुखदुःखात्मक परिणाम इतरांप्रमाणें देशी संस्थानांवरहि होतो, तरी या दोन्ही बाबींत इतरांबरोबर संस्थानच्या प्रजेला सल्ला देण्याचा अगर शब्द बोलण्याचा अधिकार नाहीं ही गोष्ट गैर आहे. मध्यवर्ति सरकार जर संयुक्त

असते तर हे वाजवी हक्क संस्थानास बजावतां आले असते व एकींत जास्त मदत झाली असती.

हिंदुस्थान सरकार व देशी संस्थानें यांच्या परस्पर संबंधांच्या मोठमोठ्या व महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा करण्याकरितां नरेंद्रमंडळाची योजना आहे. फार झालें तर हें नरेंद्रमंडळ म्हणजे एक मोठें सोंग आहे. या पद्धतीचा अर्थ इतकाच होतो कीं, संस्थानांतील प्रजांचीं सुखदुःखें त्या संस्थानचे राज्यकर्ते बरोबर प्रतिबिंबित करतात! पुष्कळ संस्थानिक आपल्या प्रजांच्या सुखा-कडे चांगलें लक्ष देतात असें गृहीत धरलें तरी ते सर्वच असें करतात अगर आपल्या प्रजेच्या कल्याणासाठीं आपले राजकीय हक्क व अधिकार सोडण्यास कबूल आहेत असा अर्थ मुळींच होत नाहीं. व म्हणून इंग्रज-सरकारच्या अधिकाऱ्यांच्या बरोबरीनें प्रजांचें कल्याण, सुखदुःख उत्पन्न करणारें राजकारण व कायदे वगैरेंची चर्चा करण्यास ते योग्य प्रतिनिधी आहेत असें म्हणतां येणार नाहीं. इंग्रज सरकारचे अधिकारी नित्य व घडोघडीं बदलत असल्यानें प्रजेच्या हितसंबंधाचा विचार करतांना त्यांत त्यांच्या हिताहिताची थोडी फार गुंतागुंत असते; पण ती स्थिति संस्थानिकांची नसते. संस्थानिक कायमचे व वंशपरंपरा संस्थानांशीं निगडित असल्यानें प्रजा व संस्थानिक यांचे संबंध फार निराळे होतात व त्यामुळें नोकर अधिकाऱ्यांपेक्षां यांच्या मनोवृत्ति व विचार फार निराळे असतात. याप्रमाणें या नरेंद्रमंडळाचा संस्थानच्या प्रजेच्या सुखदुःखाशीं फार लांबचा संबंध पोंचतो व हें नरेंद्रमंडळ कोणत्याहि दृष्टीनें प्रातिनिधिक या नांवाला योग्य नाहीं.

देशी संस्थानांना जर आपण मध्यवर्ति सरकारांत प्रातिनिधिक संस्था-योग्य भाग घ्यावा असें वाटत असेल तर त्यांनीं आपल्या राज्यांची घटना प्रांतिक सरकारांच्या नमुन्याप्रमाणें पहिल्यानें प्रातिनिधिक केली पाहिजे. संस्थानी प्रजेला इंग्रजी प्रजेबरोबर प्रातिनिधिक संस्थांचें शिक्षण देऊन तरबेज केलें पाहिजे. नाहीं तर ही प्रजा अगर यांचे प्रतिनिधी हे पोहणारांचे गळ्यांत दगड बांधल्याप्रमाणें फुकट अडचणीचे व त्रासदायक मात्र व्हावयाचे. त्याचप्रमाणें शिक्षण, धंदे, सामाजिक प्रगति वगैरे बाबींत देखील

संस्थानीं प्रजा इंग्रजी प्रजेइतकी संपन्नतेला पोंचवून नियंत्रित राजांप्रमाणें किंवा प्रांतिक गव्हर्नरांप्रमाणें संस्थानिकांनीं आपणाला खर्च, अधिकार, व स्थैर्य या बाबतींत नियंत्रित करून घेतलें पाहिजे. जपान किंवा इंग्लंड यासारख्या देशांतील राजे आपलें उत्पन्न ठरवून टाकतात, त्याला प्रजेची संमति घेतात, कायद्यांनीं आपणाला बांधून घेतात व आपण अगर आपळे वारस प्रजेला मान्य असूं तोंवरच राज्य करूं असें कबूल करतात, त्याप्रमाणें हिंदी देशी संस्थानिकांनीं केलें पाहिजे. या संस्थानांत जीं मोठीं संस्थानें आहेत त्यांत दोन प्रतिनिधिमंडळें पाहिजेत. एक प्रातिनिधिक; यांत सर्व प्रजाजनांचे प्रतिनिधि सभासद असावेत व दुसरी मान्य सभा; जींत जन्म, वित्त, विद्या व व्यासंग यांस योग्य मान मिळावा. देशी संस्थानांची याप्रमाणें सुधारणा झाल्याशिवाय त्यांस मध्यवर्ति सरकारांत इतर प्रांतांच्या बरोबरीनें भाग घेतां येणार नाहीं.

याप्रमाणें नुसत्या अंतर्गत सुधारणा करून भागणार नाहीं. इंग्रजी राज्य व देशी संस्थानें यांचे बाह्यसंबंध घोंटाळ्याचे आहेत ते शिथिल केले पाहिजेत. हे संबंध संयुक्त संस्थानांप्रमाणें देशी संस्थानें व इंग्रजी प्रांत यांची एकी झाल्यानेंच सुटणार आहेत. प्रांतिक सरकाराप्रमाणें संस्थानांना पूर्ण स्वायत्तता येण्यास पोलिटिकल एजंटसारखे संबंध सर्व सुटले पाहिजेत. असें झालें तरच हिंदुस्थानचा प्रश्न नीट सुटेल व सर्व हिंदुस्थान संयुक्त हिंदुस्थान या नांवाला योग्य होईल. संयुक्त संस्थानें होण्यास एक प्रकारची घटकावयवांत समानता लागते ती या उपायाशिवाय येणार नाहीं व दोन्ही बाजूनें पूर्ण व योग्य बरोबरी झाली तरच त्यांचा संयोग होईल, व मध्यवर्ति सरकारांत सर्वांचा सारखा समावेश व बोज राहील. देशी संस्थानांना मध्यवर्ति सरकारांत हात पाहिजे असल्यास त्यांची याप्रमाणें सुधारणा होणें अगदीं अवश्य आहे.

ज्याप्रमाणें कानडांतील तिन्हीं संस्थानें अंतर्गत व्यवहारांत पूर्ण स्वतंत्र आहेत, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत प्रत्येक प्रांतिक सरकार व देशी संस्थान अंतर्गत व्यवस्थेंत पूर्ण स्वतंत्र पाहिजे. ज्याअर्थीं इंग्रज अधिकारी सुद्धां हिंदुस्थानास वसाहतींचें साम्राज्यांतर्गत स्वराज्य देण्यास हरकत नाहीं असें म्हणतात त्याअर्थीं हिंदुस्थान सरकारनें आपली खातीं वगैरेंची

रचना त्या धोरणानें आतांपासून बदलण्यास लागलें पाहिजे. हल्लींचें हिंदुस्थान सरकार हें गव्हर्नर जनरल व त्याचें सल्लागार (एक्झिक्युटिव्ह काउन्सिल) मंडळ यांचें झालेलें आहे. या मंडळाच्या सभासदांची संख्या मर्यादित नाहीं. यांपैकीं तीन सरकारी नोकर निदान दहा वर्षें नोकरी केलेले असावयाचे, न्यायमंत्री न्यायनिपुण असावा, मग तो हिंदी असला तरी चालेल. या मंडळांत निदान तीन गृहस्थ हिंदी पाहिजेत. शिवाय नोकरांत देखील दिवसेंदिवस हिंदीच माणसें असावींत. ही व्यवस्था काळजीपूर्वक व मनःपूर्वक अमलांत आणली पाहिजे. हिंदी लोकांच्या आकांक्षाप्रमाणें राज्यकारभाराची घडी बसावी म्हणून हिंदुस्थान सरकारचे दरबारांत जितके शक्य तितके हिंदी गृहस्थच तात्रडतोब नेमावे व अशा करण्यानेंच हिंदी लोक राजकारभारांत वाकब होतील. मात्र चांगलीं हुषारच हिंदी माणसें नेमलीं पाहिजेत. नीट काळजीपूर्वक निवड करून माणसें घेतलीं तर हिंदुस्थानांत सर्व कामें करण्यास पुरेशा माणसांची वाण पडणार नाहीं; त्याचप्रमाणें कामाच्या होणाऱ्या वाढीप्रमाणें पुरेसे मंत्री नेमण्यांत येतील. कानडाची लोकसंख्या व उत्पन्न हिंदुस्थानपेक्षां कमी असून देखील हिंदुस्थान सरकारपेक्षां कानडाचे सरकारांत जास्त दिवाण आहेत. त्यावांचून काम ठीक होत नाहीं.

मध्यवर्ति सरकाराकडे खालील खातीं रहातील.

१ लष्कर—सैनिक, नाविक व वैमानिक; २ आगगाड्या, टपाल, तारायंत्रें, सर्व प्रकारचीं; ३ आयात व निर्गत मालावरील जकाती; ४ उत्पन्नावरील कर, विमा व कर्ज; ५ न्याय दिवाणी व मुलकी; ६ शास्त्र, शोध व देशी व परदेशीं व्यापार. यांपैकीं न्याय व धंदे हीं दोन खातीं प्रांतिकसरकारांकडे दिलीं पाहिजेत.

हिंदुस्थान सरकारचें कायदेमंडळ द्विदल आहे तें असें.

१ **लेजिस्लेटिव्ह असेंब्ली**—हींत १०३ सभासद लोकांनीं निवडलेले, २६ सरकारी अधिकारी व १५ सरकारनियुक्त असावयाचे.

२ **काउन्सिल ऑफ स्टेटः**—यांत ३३ सभासद लोकांनीं निवडलेले, २० सरकारी अधिकारी व ७ सरकार नियुक्त असावयाचे.

यांच्या घटनेंत सामाजिक भेद स्वीकारले आहेत ही चूक आहे. यामुळें योग्य माणसें निवडल्यावांचून राहतील व त्यामुळें त्या मानानें कामांत वैगुण्य राहील. मागासलेल्या किंवा विशिष्ट जातींना त्यांचाच प्रतिनिधि पाहिजे अशीं अट न ठेवतां त्या जातींनीं कोणातरी एका माणसास निवडावें असा नियम योग्य झाला असता. उत्तम व्यवस्था म्हणजे लोकसंख्येच्या मानानें सभासद ही होय.

लेजिस्लेटिव्ह असेंब्लीसाठीं ६,८७,१०० साधारण मतदार, २०६,६४० मुसलमान व १,५०,००० शीख मतदार, आहेत. काउन्सिल ऑफ स्टेट-साठीं एकंदर सत्तर ते ऐंशी हजार मतदार आहेत. या सभांचे अध्यक्ष या सभांनींच निवडावयाचे आहेत. या मंडळांना सरकारांवर टीका करण्याचा अधिकार आहे. पण त्यांत कमीजास्त करण्याचा अधिकार नाहीं हा मोठा दोष आहे. हे कुत्रे भोंकतील पण चावावयाचे नाहींत. तूर्त असेंब्लीला सरकारवर अधिकार नाहीं पण तो अधिकार पाहिजे. जमाखर्चाचें अंदाजपत्रक या सभांपुढें मांडण्यांत येईल व त्यावर असेंब्लींत टीका होईल व व्याज, अनामत ठेव, पगार, पेनशनें व देशरक्षण या खात्यांखेरीज त्यांत कमी जास्त सुचविण्याचा असेंब्लीस अधिकार आहे. परंतु असेंब्लीनें नामंजूर केलेलाहि खर्च गव्हर्नर जनरलला मंजूर करण्याचा अधिकार आहे. असा प्रत्येक खर्च बादशहापुढें मांडण्यापूर्वी निदान आठ दिवस पार्लमेंटच्या दोन्ही सभांपुढें मांडण्यांत येईल.

याप्रमाणें जर राज्यकारभार सुरळीत चालावा अशी इच्छा असेल तर गव्हर्नर जनरलला आपला राज्यकारभार लोकांच्या प्रतिनिधींच्या मतांप्रमाणें चालविणें भाग आहे. कानडांतील गव्हर्नर जनरलला याप्रमाणें कायदे नामंजूर करण्याचा अधिकार आहे. पण त्यांनीं हा अधिकार कधीहि वापरलेला नाहीं. प्रत्येक कामाबद्दल प्रधानमंडळ जबाबदार असून गव्हर्नर जनरलचा अधिकार केवळ बादशहांच्या अधिकाराप्रमाणें आहे. कानडाची पार्लमेंट प्रधानांच्या संमतीशिवाय बरखास्त करतां येत नाहीं.

असेंब्ली व स्टेट कौंसिल मधील सर्व व्यवहार उघडा असून झटपट व बरोबर निकाल लागेल असा पाहिजे. याप्रमाणें सभासदांना प्रातिनिधिक

राज्यकारभाराचें शिक्षण मिळालें पाहिजे. इतर बाबतींत देखील कानडा वगैरे देशांतील व्यवस्थेप्रमाणें या व्यवस्थेपासून देशाची सुधारणा व कल्याणच होईल असें वाटतें.

सभांच्या सभासदांना तूर्त पगार देण्याची व्यवस्था नाहीं. संयुक्त संस्थानें, कानडा वगैरे देशांत सभासदांना पगार देण्याची वहिवाट आहे. लोकांत अद्याप राजकारणाची गोडी व माहिती नाहीं तोंवर पगार नसणेंच बरें. प्रवासखर्च मात्र प्रत्येक सभासदास मिळावा. प्रवासखर्च मात्र सरकारी नोकरांप्रमाणें आगगाडीचे पहिल्या वर्गाचे दोन तिकिटांची किंमत, पायवाटेला मैलीं एक रुपाया व घरून निघून परत जाईपर्यंत दररोज रुपये पांचप्रमाणें मिळावा. तात्पर्य, सरकारी कामाचा सभासदाला बोजा वाटूं नये, त्याचप्रमाणें लोभहि उत्पन्न होऊं नये. खऱ्या देशहिताची कळकळ सभासदांत दिसूं लागली, स्वराज्य पुरें मिळालें, त्याचा नीट भोगवटा होऊं लागला म्हणजे गरीब सुद्धां सभासद होतील तेव्हां त्यांस पगार देण्याची योजना करण्यास हरकत नाहीं. तोंवर पगाराची लालूच ही एक घातक गोष्ट होण्याचें भय आहे.

लवकरच या कायदेमंडळांना अनेक प्रकारचे निकडीचे व गुंतागुंतीचे प्रश्न हातीं घ्यावे लागतील, त्यांचा विचार आतां केला पाहिजे. हिंदुस्थान विस्तारानें मोठा असून त्याची सांपत्तिक वाढ थोडी झालेली आहे व त्यामुळें तो गरीब आहे. यासाठीं पावलोपावलीं स्वदेशी व परदेशी हितसंबंधाचा विरोध उत्पन्न होतो. संयुक्त संस्थानांच्या नमुन्यावर हिंदुस्थानाची घटना केली नाहीं तर देशी संस्थानांचा हिंदुस्थान सरकारांत अंतर्भाव न झाल्यामुळें तें पुष्कळ केंद्रीभूत राहणार आहे. थोड्या लोकांच्या हातांत पुष्कळ लोकांच्या कारभाराची सत्ता याला केंद्रीभूत सत्ता म्हणतात. परदेशाच्या संबंधाने अशी ही केंद्रीभूत सत्ता हल्लीं आहे.

सगळ्या अधिकाऱ्यांना आपला राज्यकारभार लोकप्रतिनिधींच्या सल्ल्यानें करतां यावा व महत्त्वाच्या व जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर यथास्थित चर्चा होऊन निकाल लागावा म्हणून लोकप्रतिनिधींच्या मंडळाची (लेजिस्लेटिव्ह असेंब्लीची) बैठक पुष्कळ दिवसपर्यंत सालोसाल चालावी. याप्रमाणें

केलें म्हणजे दोन बैठकींच्या दरम्यान राज्यकारभार स्वतंत्र दामटण्याची बुद्धि अधिकाऱ्यांना व्हावयाची नाहीं. या बैठकींना कायद्यानें मर्यादा घातलेली नाहीं हें ठीक केलें आहे व प्रत्येक सभेच्या पुढाऱ्यांच्या सल्ल्याशिवाय हिंदुस्थान सरकारनें या बैठकी बंद करूं नयेत म्हणजे बरें. इंग्लंडची पार्लमेंट दरसाल दोनशें दिवस काम करते व तितकें तरी काम लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें दरसाल केलें पाहिजे.

दर एक सालाच्या प्रारंभीं खातेवार सल्लागार मंडळें लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या सभासदांचीं करावीं. या मंडळांनीं त्या त्या खात्याच्या सर्व कामांवर लक्ष ठेवावें व अधिकाऱ्यांवर दाब ठेवावा. या योगानें अधिकाऱ्यांवर दाब राहून त्यांना लोकमताला मान द्यावा लागेल व लोकप्रतिनिधींना कारभाराचें शिक्षण व माहिती मिळेल. हीं मंडळें प्रत्येक खात्याला जोडावीं म्हणजे खात्यांच्या अधिकाऱ्यांना लोकांच्या आकांक्षा कळतील व सगळ्या महत्त्वाच्या बाबींत लोकांची नजर राज्यकारभारावर राहील व लोकांच्या म्हणण्याकडे अधिकाऱ्यांचें लक्ष ओढलें जाईल. मुख्य सरकारच्या, आंतरराष्ट्रीय वगैरे बाबींत लक्ष घालून सुधारणा सुचविण्यासाठीं व महत्त्वाच्या बाबींचा विचार करण्यासाठीं अधिकारी, स्वतंत्र लोक व असेंब्लीचे सभासद यांची सल्लागार मंडळें नेमावीं. यांनीं रात्रंदिवस चौकशी करणें माहिती गोळा करणें व सुधारणा होण्यासाठीं सूचना करणें या कामांत गर्क असावें. अधिकाऱ्यांना या सभांत बोलण्याचा अधिकार असावा व मत देण्याचा अधिकार असू नये. मंडळ काम करीत असेपर्यंत त्यानें आपणांस लागणारे नोकर नेमून घ्यावे व परदेशच्या राजसत्तांशीं माहिती वगैरे मिळविण्यासाठीं पत्रव्यवहार करावा. जपानमध्यें याप्रमाणें सरकारी अधिकारी व खाजगी गृहस्थ यांच्या कमेट्या शिक्षण, शेती, धंदे व व्यापार या चार बाबींत नेहमीं काम करीत असतात. हिंदुस्थाननें तोच कित्ता उचलला पाहिजे.

मध्यवर्ती सरकार, ब्रिटिश सरकार व प्रांतिक सरकार यांचे परस्परसंबंध काय असावें याचा विचार करण्याकरतां मध्यवर्ती सरकारनें जपान वगैरे देशांत शिष्टमंडळें पाठवावींत. या शिष्टमंडळानें स्वायत्तसत्ता कशी उत्पन्न करतात व वापरतात याबद्दलची माहिती गोळा करावी व त्याला

अनुसरून हिंदुस्थानांत सुधारणा सुचवाव्या. मध्यवर्ती सरकार जर संयुक्त संस्थानाच्या दर्जास चढावयाचें असेल तर काम करण्याच्या पद्धती ठरवून टाकाव्या लागतील. धोरणें, पद्धती, व कामें यांचा विचार पुरा झाला कीं, त्याबद्दल कायदे व शिस्ती घालून टाकाव्या आणि हीं तत्वें ठरलीं असें समजून सर्व राष्ट्रभर त्यांना अनुसरून अंमलबजावणीस सुरुवात व्हावी. या कायद्यांच्या अंमलबजावणीच्या सक्तीमुळें स्वायत्त व सुधारलेल्या राज्यपद्धती-कडे सर्व देश जाणार याबद्दलची पावलोंपावलीं खात्री पटेल. याप्रमाणें सुयंत्र व्यवस्था असून शिवाय खालीलप्रमाणें तजवीज झाली पाहिजे.

मध्यवर्ती सरकारांत तीन नवे कारभारी नेमले पाहिजेत (१) पुनर्घट-नेचा कारभारी (२) परंपरा राखण्याचा कारभारी व (३) मजूर व सांपत्तिक कामांसंबंधीं कारभारी.

१ पुनर्घटनेच्या कारभाऱ्यानें या पुस्तकांत नमूद केल्याप्रमाणें अनेक बाबींची सुधारणा व पुनर्घटना करण्याकडे लक्ष घालावें. परतंत्रते-पासून स्वतंत्रतेकडे नेणाऱ्या व स्वतंत्रतेला पोषक अशा अनेक गोष्टी अमलांत आणण्याचेंच काम याला असावें म्हणजे त्या कामाकडे त्याचें पूर्ण लक्ष राहील व त्यानें केलेल्या कामाचा जाब त्याला विचारतां येईल.

२ नवीन होत असलेल्या व्यवस्था व मागून आलेली पूर्वपरंपरा यांचा वेळोवेळीं मेळ घालण्याचें काम परंपरा राखणाऱ्या कारभाऱ्यांचें होय. जुनें हळू हळू सुटत व नवें हळू हळू घेत यानें राज्यकारभाराची गाडी नेहमीं चालती व रुळावर ठेवली पाहिजे.

३ लोकांना नवीन धंदे शिकविणें, त्यांसाठीं नवे कारखाने काढणें, प्रांतिक सरकारला दिलेल्या नव्या अधिकारांचा उपयोग करून सुधारणांना वाव करून देणें व याप्रमाणें सर्व देशाला नवें शिक्षण देऊन वळण लावणें हें काम मजूर व सांपत्तिक कारभाऱ्याकडे राहील.

या तिन्ही बाबींचा गेलीं शंभर वर्षें कांहींच विचार झालेला नाहीं, म्हणून यासाठीं हीं तीन नवीं स्वतंत्र खातीं निर्माण केलीं पाहिजेत.

रिफॉर्म ॲक्टांत दहा वर्षांत तुम्हीं काय केलें हें पाहून तुम्हांला नवे हक्क देऊं असें म्हटलें आहे. सबब याप्रमाणें मिळालेल्या सवलतीचा फायदा घेऊन नंतर दहा वर्षांनंतरच्या हक्कांत कोणते हक्क व कसे मिळवावयाचे याचा विचार मध्यवर्ती सरकारनें आतांपासून ठरवून जाहीर करावें व त्याप्रमाणें अवश्य तें शिक्षण जनतेला मिळेल अशी तजवीज करावी. हिंदुस्थान सरकारनें उद्यांचें उद्यां पाहतां येईल असें म्हणतां उपयोगी नाहीं. आजचें काम आज करून उद्यांच्या कामाची तयारी केली पाहिजे.

श्वः कार्यमद्य कुर्वीत पूर्वाण्हे चापराण्हिकं ॥
यौवने तच्च कुर्वीत येन वृद्धः सुखी भवेत् ॥

नीति अशी आहे कीं, कोणत्याहि कामाची आगाऊ मांडणी व तरतूद केली पाहिजे. ' कल करे सो आज कर आज करे सो अब्बी ' ही हिंदी म्हण लक्षांत ठेवण्यासारखी आहे. Take time by the fore-lock 'काळाचें पुढचें झुलूप धरा' ही इंग्रजी म्हण देखील हेंच सांगते. येत्या दहा वर्षांत हिंदुस्थान सरकार काय करून दाखवितें यावरून त्याची पुढची किंमत ठरणार आहे. त्याची योग्यता या कामावरूनच पुढचे इतिहासकार ठरवितील.

वर सांगितलेंच आहे कीं, हिंदुस्थान सरकारचा एक हाय कमिशनर इंग्लंडमध्यें हिंदुस्थानाकरतां माल खरेदी करण्यासाठीं हल्लीं नेमला आहे. असला एक हाय कमिशनर कानडातर्फे इंग्लंडमध्यें आहे. याच प्रमाणें जगांतील सर्व प्रमुख देशांत हिंदुस्थानचे वतीचे हाय कमिशनर असावेत. नुकताच कानडाला तर वाशिंगटनच्या राजदरबारीं आपला स्वतंत्र वकील ठेवण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. मग वकील नव्हे पण व्यापारी अडत्ये प्रमुख परदेशांचे हद्दींत नेमण्यास हिंदुस्थानाला जरूर परवानगी हवी. हाय कमिशनर नेमल्यामुळें यापुढें स्टेटसेक्रेटरीला फक्त राजकीय बाबींचाच विचार करावा लागेल व यासाठीं त्याचा पगार हिंदुस्थानानें न सोसतां इंग्लंडनें सोसावा असें नुकतेंच ठरलें आहे. खरोखर म्हटलें तर स्टेटसेक्रेटरीचा पगार इंग्लंड देणार तर स्टेटसेक्रेटरीनें हिंदुस्थानासाठीं माल वगैरे खरेदी करण्याचे काम फुकट कां करावें अशा

विचारानें निराळा हायकमिशनर नेमावा लागला. हें इंग्लंडचें व्यापारी दृष्टीचें द्योतक आहे.

नव्या कायद्याप्रमाणें हिंदुस्थानावर स्टेट सेक्रेटरीला आर्थिक सत्ता राहिली नाहीं. इतर वसाहती जशा आपल्या आर्थिक बाबींत स्वतंत्र आहेत तसें हिंदुस्थान देखील अतःपर राहावें असें ठरविलें आहे व यासाठीं गव्हर्नर जनरल व हिंदी प्रतिनिधि यांचें एकमत असेल तेव्हां स्टेट सेक्रेटरीनें हिंदी कारभारांत ढवळाढवळ करूं नये असें ठरविलें आहे. ज्या ठिकाणीं ब्रिटिश सरकार साम्राज्यातर्फे वचनबद्ध झालें असेल तेथें मात्र स्टेट सेक्रेटरीनें हात घालावा असें ठरलें आहे त्याच्याऐवजीं ब्रिटिश सरकारनें परराष्ट्राशीं कोणताहि करार वगैरे करण्यापूर्वी त्या कराराला हिंदी प्रतिनिधींची अनुमति घ्यावी असें ठरलें पाहिजे. म्हणजे होणाऱ्या करारांचा हिंदी दृष्टीनें आगाऊ विचार करण्यास बरें पडेल. नाहीं तर बैल गेला व झोंपा केला असें होणार. अगोदर ब्रिटिश सरकारनें वचन द्यावें व मागाहून हिंदुस्थान सरकारनें पुरें करावें ही व्यवस्था चांगली नाहीं.

पार्लमेंटची निवड झाली कीं, बैठकीच्या सुरवातीसच दोन्ही पार्लमेंटाच्या हिंदुस्थानावर देखरेख ठेवणाऱ्या कमेट्या नेमावयाच्या आहेत. या कमेट्यांनीं या अवस्थांतर किंवा संक्रमण कालांत स्टेट सेक्रेटरीला या कमेट्यांनीं सल्ला द्यावयाची आहे. लवकरच सर्व साम्राज्याच्या कारभारावर लक्ष ठेवून त्याची नीट सांगड घालण्यासाठीं साम्राज्य–परिषद भरेल. हिंदुस्थानानें तेथें आपला योग्य प्रतिनिधि पाठविण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

तहपरिषदेस हिंदुस्थानातर्फे प्रतिनिधि होता पण तो निवडलेला नव्हता व सगळया तहपरिषदांना नव्हता. अतःपर तरी असें न होईल अशी खबरदारी हिंदुस्थान सरकारनें व असेंब्लीनें घेतली पाहिजे. त्याचप्रमाणें सगळ्यास परमुलखांतून हिंदुस्थानच्या वतीनें जाणारीं माणसें हिंदीच असलीं पाहिजेत. राष्ट्रसंघांत देखील अनायासें हिंदुस्थानाला जागा मिळालेली आहे; पण तेथें सुद्धां आपला प्रतिनिधि योग्य हिंदी गृहस्थच राहील ही खबरदारी हिंदुस्थानानें घेतली पाहिजे.

तात्पर्य, हिंदुस्थानाला जे जे हक्क मिळाले आहेत ते हिंदी लोकानींच हिंदुस्थानच्या हिताकडे लक्ष देऊन काळजीपूर्वक बजावले पाहिजेत व नवीन कोणचेहि हक्क उत्पन्न होतील तेव्हां ते आपणास असावे अशी दक्षता ठेवली पाहिजे. आपल्या वतीनें नेहमीं हिंदीच गृहस्थ असावा, त्यानें योग्य तयारी करून जावें व परत आल्यावर आपल्या कामाचा अहवाल प्रसिद्ध करावा व जाहीरपणें सांगून त्यावर चर्चा व्हावी म्हणजे हिंदी राष्ट्राचें लक्ष त्या बाबीकडे लागेल. जगाच्या उलाढालींत आपला हात असावा हें ज्ञान अद्याप हिंदी जनतेस नाहीं व ही जाणीव तिला व्हावी म्हणून सर्व प्रकारची खटपट आपण केली पाहिजे.

प्रकरण विसावें

आर्थिक स्वातंत्र्य

हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत पुष्कळ विसंगत बाबी आहेत त्या अशाः—

१ हिंदुस्थानचा सर्व कारभार रुपयांत चालतो; तरी देशाचें अंदाजपत्रक रुपयांतच न करतां तें पौंडांत करण्यांत येतें व त्यापैकीं मोठी म्हणजे सरासरी पन्नास साठ कोटींची रक्कम लष्कर, पेनशन व मालखरेदी या कामीं खर्ची पडते. कानडा वगैरे साम्राज्यांतर्गत दुसरे देश असल्या कामांसाठीं पैसे द्यावयाचे ते बँकांच्या मार्फत देतात व त्यांना लागणाऱ्या जिनसा ते स्वदेशीं दुकानदारांच्या मार्फत खरेदी करतात. यामुळें हुंडणावळ वगैरे बरेच पैसे त्यांच्या स्वतःच्या देशांतच उरतात.

२ हिंदुस्थानांतील अंतर्गत व्यवहार चांदींत होतो. कांहीं वर्षांपूर्वीं बसलेल्या कमेटीनें हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें सुरू करावें अशी शिफारस केली. इतर सुधारलेल्या देशांतून सोन्याचें नाणेंच व्यवहारांत आहे. विलायतेंतील सावरीन हिंदुस्थानांत चालतो पण हिंदुस्थानचा रुपया इंग्लंडांत चालत नाहीं; इतकेंच नव्हे तर रुपयाचे सावरीन हिंदुस्थानांत वाटेल तेव्हां मिळतील असा नियम नाहीं.

३ हिंदुस्थानचा व्यापार स्वतंत्रपणें चालणें इष्ट आहे. नाहीं पण कौन्सिल बिलें, टेलिग्राफ ट्रान्सफर व रिव्हर्स ड्राफ्ट यांनीं त्यांत ढवळाढवळ केली जाते. सोन्याची ठेव व कागदी गंगाजळी हिंदुस्थानांत न ठेवतां ती लंडनमध्यें ठेवण्यांत येते. यामुळें या ठेवीचा फायदा हिंदुस्थानचा व्यापार व हिंदुस्थानची पत यांना होत नाहीं. या ठेवींतून उलट इंग्रज व्यापाऱ्यांनाच हलक्या व्याजानें कर्ज मिळतें. याप्रमाणें स्टेट सेक्रेटरी हा हिंदुस्थानचा राजा व सावकार आहे.

४ हिंदुस्थानसरकारच्या सर्व कारभारांत व्यापाराचा संबंध आहे. "ज्या ज्या वेळीं सरकार हें व्यापाऱ्यांच्या खाजगी हालचालींत आपल्या

उलाढालीनें गोंधळ करतें त्या त्या वेळीं तें असल्या व्यापाऱ्यांच्या फायद्यांत भर घालून घेण्यास जागा करून देत असतें." स्वतंत्र राज्यांत असा अनुभव येतो असें लार्ड ब्राईस यांचें म्हणणें आहे तर परतंत्र राज्यांत असल्या उलाढालींनीं काय होत असेल याची कल्पनाच करावी. विमा, ठेवी, हुंडणावळ, जकात व देवघेव या बाबींत हिंदुस्थानसरकार नेहमीं खाजगी व्यापारांत ढवळाढवळ करतें. रेलवे, पोष्ट, तार, पाटबंधारे, पाणीपुरवठा हे सर्व व्यापार हिंदुस्थानांत सरकारी आहेत.

५ प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञांचें म्हणणें असें आहे कीं, हिंदुस्थानसरकारची सांपत्तिक उलाढाल हिंदुस्थानाला फार घातक अशी आहे. हिंदुस्थानांत मोकळें सोन्याचें नाणें सुरू केलें तर हिंदुस्थानची पत पुष्कळ वाढेल व त्यामुळें व्यापार व धंदे या कामीं हिंदुस्थानला पुष्कळ फायदा होईल. हल्लींची यूरोप व अमेरिका यांमधील सांपत्तिक स्थिति तर हिंदुस्थानांत सोन्याचें नाणेंच व्हावें असें म्हणण्याजोगी आहे. साधारण दिवसांत हिंदुस्थानांतून परदेशीं जाणारा मालच नेहमीं जास्त असतो व यामुळें हिंदुस्थानाला बाहेरदेशीं सोनें पाठविण्याचा प्रसंग सहसा येणार नाहीं.

६ महायुद्धाच्या काळांत हिंदुस्थान परतंत्र असल्यानें त्याच्या पैशा संबंधीं सर्व बाबी लंडनच्या हातीं होत्या. महागाईमुळें लोकांचे फार हाल झाले. युद्धामुळें होणारा नफा हिंदुस्थानांत फार थोड्यांच्या वांट्यास आला. पुष्कळ जिनसा हिंदुस्थानांतून जगांत येणाऱ्या किंमतीपेक्षां पुष्कळ कमी किंमतीस नेल्या. अन्नावर तर गुप्त रीतीनें हात मारण्यांत येऊन किती अन्न देशा बाहेर गेलें याचा हिंदी लोकांस वास सुद्धां येऊं दिला नाहीं. हिंदुस्थानांत याप्रमाणें चांगल्या अन्नाचा तुटवडा पडून इन्फ्लुएंझा (पडसें ताप) आला तेव्हां लाखों लोक मृत्युमुखीं पडले. चामडीं वगैरे जिनसा मन मानेल त्या भावानें दोस्तांना मिळाव्या म्हणून त्यांचा व्यापार प्रतिबंधांत ठेवला होता. त्याचप्रमाणें तांदूळ, ताग, लांकूड

(इमारती), गहूं, चामडीं व दुसऱ्या उपयुक्त जिनसांच्या मोकळ्या व्यापाराला बंदी करून त्या स्वस्त दरानें दोस्तांना मिळतील असें केलें होतें. हिंदुस्थानानें इंग्लंडला जें कर्ज दिलें त्यावर योग्य व्याज त्याला मिळालें नाहीं आणि हिंदुस्थानानें लंडनमध्यें ठेवलेली मोठी ठेव त्या वेळीं गडप झाली. चांदी हिंदुस्थानांत बाजारभावानें खरेदी न करतां इंग्रज व्यापाऱ्यांकडून मक्त्यानें खरेदी करण्यांत आली.

कानडासारखा स्वतंत्र देश इंग्लंडला सर्वतोपरी मदत करून सुद्धां वर लिहिलेल्या उलाढालींत पुष्कळ गबर झाला. याप्रमाणें कानडानें प्रत्यक्ष स्वहित साधलें. जपान व संयुक्त संस्थानें देखील या लढाईत चांगलीं गबर झालीं. संयुक्त संस्थानें तर आज जगांत सर्वसंपन्न देश होऊन बसला आहे व सर्व जगाची सावकारी आज त्याच्या एकट्याच्या हातीं आहे. आजपर्यंत प्रतिस्पर्धेमुळें किंवा चढाओढीमुळें मिळालें नव्हतें असें मोकळें रान महायुद्धांत जपानास मिळालें. हिंदुस्थानचा कारभार हिंदी लोकांच्या हातीं असता, अगर हिंदुस्थानच्या हिताकडे पाहून चालविण्यांत येता तर महायुद्धाच्या पांच वर्षांतील नफ्यानें त्यापूर्वींच्या पन्नास वर्षांचें नुकसान भरून निघालें असतें.

हिंदुस्थान हा एक परतंत्र देश असून जगांतील राष्ट्रांशीं त्याचा लढाई वगैरेंत मुख्य संबंध कोठेंच येत नाहीं. असें असून लष्कराकडे होणारा अवाढव्य खर्च कशासाठीं करण्यांत येतो याचें समर्पक उत्तर कोणालाच देतां येत नाहीं. महायुद्धांत तर हिंदुस्थानचा कांहींच हितसंबंध नव्हता तरी त्यास वर वर्णन केल्याप्रमाणें नागविण्यांत आलें व त्याच्या भरपाईचा प्रश्न लढाई संपल्यावर कोणीं काढला सुद्धां नाहीं.

सन १९२०-२१ सालीं चौसष्ट कोट रुपये लष्कराकडे खर्च आहे. ही रक्कम सबंध उत्पन्नाच्या निम्मे आहे. उत्पन्नापैकीं निम्मा खर्च संरक्षणाकडे ही एक अश्रुतपूर्व गोष्ट आहे व तीहि शांततेच्या काळीं ! कोणीहि इसम आपलें निम्में उत्पन्न केवळ राखणदार भय्याला द्यावयास कबूल व्हावयाचा नाहीं, पण हिंदुस्थानसरकार तसें प्रत्यक्ष करीत आहे. विलायतसरकार आपल्या लष्करावर किंवा जपानसरकार आपल्या लष्करावर उत्पन्नाचा एक

लहानसा भाग खर्च करतात व इतक्या खर्चावर तीं आपलें राष्ट्र संभाळतात, इतकेंच नव्हे तर परराष्ट्रांशीं दोन हात करण्याची धमक हमेशा बाळगतात.

आतां परिस्थिति अगदीं बदलली असल्यामुळें सगळा लष्करी व आरमारी खर्च व संरक्षणासाठीं लागणारीं साधनें यांचा खर्च यांचा फेरविचार केला पाहिजे. नव्या राज्यव्यवस्थेंत अगदीं पहिली गोष्ट म्हणजे हिंदी लोकांची एक कमेटी नेमून तिनें याबाबद सर्व छाननी व चौकशी करावी व ती जो निणर्य ठरवील तो ताबडतोब अमलांत यावा. सन १९२० च्या आक्टोबर महिन्यांत एशर कमेटीनें हिंदी लष्करावर जो लेख (रिपोर्ट) प्रसिद्ध केला त्यांत हिंदुस्थानचें उत्पन्न व लष्करी खर्च यांचा हिंदुस्थानचें कल्याण करावयाच्या दृष्टीनें ताबडतोब विचार होऊन खर्चांत काटकसर व्हावी असें सुचविलें आहे. लंडन टाइम्ससारख्या प्रमुख वर्तमानपत्रानें देखील हिंदुस्थानचें निम्में उत्पन्न केवळ विलायती लष्करखात्याच्या स्वाधीन करावा असा या चौकशीवरून निर्णय निघतो असें म्हटलें आहे. या बाबींत हिंदुस्थानसरकारचें काम म्हणजे निव्वळ हे पैसे गोळा करून लष्करी खात्याच्या स्वाधीन करणें इतकेंच आहे. एखाद्या वसाहतीला जर याप्रमाणें निम्में उत्पन्न तोडून आमच्या स्वाधीन करा म्हटलें असतें तर तिनें किती थैमान केला असता याची कल्पना सुद्धां होत नाहीं.

सन १८३३ सालीं जेव्हां ईस्ट इंडिया कंपनीला हिंदुस्थानांत राज्य चालविण्याबद्दलचा शेवटचा परवाना मिळाला तेव्हां फ्रान्सखेरीज जगांतील कोणत्याहि राज्याच्या उत्पन्नापेक्षां हिंदुस्थानचें उत्पन्न जास्त आहे असें उद्गार लॉर्ड मेकॉले यांनीं काढले आहेत. त्या वेळच्या कंपनीच्या राज्यास आणखी विस्तृत व मोठ्या लोकसंख्येचे अनेक भाग जरी जोडण्यांत आले आहेत तरी आज नव्वद वर्षांत ती स्थिति अगदीं उलट झाली आहे. फाजील लष्कराकडे म्हणजे माणसें मारण्याच्या कारखान्याकडेच उत्पन्नाचा मोठा भाग खर्च होत असल्यानें इतर कारखान्यांकडे हिंदुस्थानसरकारला लक्ष देतां येत नाहीं अशी अवस्था झाली आहे.

सन १९१३–१४ सालीं संपणाऱ्या पाव शतकांत हिंदुस्थानचें उत्पन्न सरासरी शेंकडा छत्तीस या प्रमाणांत वाढलें. पण त्याच पंचवीस वर्षांत

विलायतचें उत्पन्न शेंकडा एकशें पंधरा, कानडाचें शेंकडा २४५ व जपानचें शेंकडा ६४० याप्रमाणें वाढलें. हे आंकडे तुलनेला उपयोगी पडण्याइतके बिनचूक आहेत व यांवरून हिंदुस्थानाच्या मानानें इतर देश किती झपाट्यानें वाढत आहेत हें समजेल व ही स्थिति आज जवळ जवळ शंभर वर्षे चालू आहे. त्यामुळें १८३३ व १९२३ यांत जमीन अस्मानाचें अंतर पडतें. मागचा पुढें व पुढचा मागें याप्रमाणें फरक झाला आहे.

कानडा देशाची लोकसंख्या अवघी ऐंशी लक्ष असून १९१६ सालीं त्या सरकारचें उत्पन्न पन्नास कोटी रुपये होतें आणि हिंदुस्थानची लोकसंख्या तीस चाळीस पटीनें जास्त असून हिंदुस्थानसरकारचें उत्पन्न दुप्पटहि नाहीं व त्या स्थितींतहि हिंदुस्थानची उपासमार होते याचें कारण कानडा देशाला आर्थिक स्वातंत्र्य आहे तसें हिंदुस्थानाला नाहीं. याखेरीज या दोन देशांत कांहीं म्हणण्यासारखी तफावत नाहीं. हिंदुस्थानाचें उत्पन्न याप्रमाणें कमी आहे पण राज्यकारभाराचा खर्च सगळ्या जगांतील कोणत्याहि राष्ट्रापेक्षां जास्त आहे आणि हा खर्च दिवसेंदिवस वाढतच जात आहे.

उत्पन्नाच्या बाबींकडे लक्ष दिलें तरी हिंदुस्थानांत असाच विलक्षण प्रकार दिसतो. विलायतसरकारच्या उत्पन्नाच्या बाबी म्हणजे जकात, अबकारी, जहागिरी, मिळकत व मालमत्तेवरील कर व टपाल व तार ह्या आहेत. संयुक्त संस्थानांत तर अबकारी, परवाने, जकात व टपाल इतकींच उत्पन्नाचीं खातीं आहेत. कानडांत जकाती, मिळकतीवर कर व लोकोपयोगी कामें इतकींच उत्पन्नाचीं खातीं आहेत. हिंदुस्थानांत जकातीचें उत्पन्न मुळींच नाहीं म्हटलें तरी चालेल. कर घेण्यासारखें लोकांना उत्पन्नच नाहीं. तेव्हां उत्पन्नाची सगळी मदार हिंदुस्थानांत शेतसाऱ्यावर आहे व हा शेतसारा प्रत्येक गरीब रयतेकडून वसूल होतो. हिंदुस्थानची शिक्षणपद्धति बदलून धंदे व कारखाने यांची योग्य वाढ केली व जकाती बसवावयाला पाहिजे तशा बसविल्या तर दहा वर्षांत हिंदुस्थानाचें उत्पन्न सहज दुप्पट होईल; इतकेंच नव्हे तर तें पंधरा वर्षांत तिप्पट सुद्धां होईल. पण जित राष्ट्र म्हणून त्याला आजपर्यंत ही योग्य व्यवस्था कोणीं करूं दिली नाहीं.

हिंदुस्थानांत आणखी एक विलक्षण प्रकार आहे, तो असा कीं, सरकारचें बहुतेक उत्पन्न हिंदुस्थानसरकारच्या ताब्यांत जातें. ह्यांतून त्यांच्या तब्बेतीला लागेल तशा रकमा प्रांतिक सरकारला खर्चासाठीं देण्यांत येतात. या खर्चाच्या रकमा ठरवितांना कोणत्या प्रांताच्या काय अडचणी आहेत, त्याला किती पैसे पाहिजेत वगैरे गोष्टींचा चांगलासा विचार करण्यांत येत नाहीं. हिंदुस्थानसरकारचें पोट भरल्यावर उरेल त्यांतून वाटेल तशी वांटणी करण्यांत येते. हिंदुस्थानसरकार अगर प्रांतिक सरकार यांच्या कौंसिलांत अंदाजपत्रकावर वाटाघाट म्हणजे निव्वळ सोंग किंवा खेळ आहे. लोकांना अगोदर योग्य वाटाघाट करण्यास वाव नाहीं व त्यांच्या सूचनांचा विचार किंवा अंमलबजावणी होत नाहीं, मग लोकांच्या म्हणण्याप्रमाणें खर्च करून प्रयोग करून पहाणें तर दूरच राहिलें. आतां नव्या सुधारणांत प्रांतिक सरकारचें उत्पन्न व मध्यवर्ती सरकारचें उत्पन्न अशी फोड केली आहे, पण त्यांत सुद्धां प्रांतिक सरकारांना पूर्ण स्वातंत्र्य नाहीं. त्याचप्रमाणें प्रांतिक सरकारांनीं मध्यवर्ती सरकारला द्यावयाच्या खंडणीची रक्कम त्यांची ऐपत पाहून ठरविलेली नाहीं या बाबींत मद्रास इलाखा व संयुक्त प्रांत यांचे फार हाल आहेत. खरें म्हटलें तर मध्यवर्ती सरकाराकडे जकाती, आगगाड्या व मिळकतीवरील कर इतकींच खातीं दिलीं पाहिजेत. याखेरीज सर्व कर व त्यांचें उत्पन्न प्रांतिक सरकारच्या पूर्ण ताब्यांत पाहिजे. अंदाजपत्रकांत रेलवेचें, खर्च वजा जातां, उत्पन्न दाखल करावयाला हवें. पण तसें न करतां सर्व उत्पन्न व सर्व खर्च दाखवून अंदाजपत्रकाचा आंकडा व्यर्थ फुगविलेला असतो. रेलवेचा कारभार सर्व हिंदी लोकांच्या ताब्यांत व हिंदी हिताच्या दृष्टीनें चालविला पाहिजे, पण तसें न करतां सरकारला केवळ जास्त पैसे मिळावे ही मुख्य दृष्टि ठेवून तो चालविण्यांत येतो.

प्रांतिक सरकारला आर्थिक स्वातंत्र्य मिळालें म्हणजे प्रांतांत उत्पन्न केलेला पैसा प्रांतांतच खर्च होईल. त्यामुळें कर देणारांना कराचें फळ दिसून अधिक कर देण्यास उत्साह वाटेल. असा उत्साह वाटतो असा संयुक्त संस्थानें, कानडा वगैरे परदेशांत अनुभव आला आहे. त्याचप्रमाणें म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्ड यांना त्यांच्या हद्दींत कारखाने

काढणें, वगैरे बाबींसाठीं कर्ज काढण्याची परवानगी द्यावी. या पुस्तकांत लिहिल्याप्रमाणें ग्रामसंघांना कारखाने वगैरे काढण्याची मोकळीक देऊन कर्ज काढूं दिलें तर पुष्कळ फायदा होईल. प्रत्येक स्थानिक संस्थेनें आपल्या उत्पन्नांतून स्वच्छता व रस्ते यांकडे लक्ष देऊन उरतील ते पैसे (१) धंदेशिक्षण, (२) देशसुधारणा व (३) त्या भागांत उत्पन्न होणाऱ्या कच्च्या मालाचा पक्का माल बनवून विकण्याचे कारखाने काढणें व चालविणें याचें शिक्षण मिळण्यासाठीं खर्च करावे. असें केलें म्हणजे लोकांवर कर न वाढवितां आपल्या जिल्ह्यांत सोईनें चालवितां येणारे कारखाने वगैरे चालवून उत्पन्न वाढविण्याची गोडी या संस्थांना लागेल व देशाचें मोठें हित होईल. तूर्त या कारखाने वगैरेसाठीं लागणारे निम्मे पैसे त्या लोकांनीं व निम्मे प्रांतिक सरकारनें देऊन हें काम हातीं घेतलें तर ठीक होईल.

मध्यवर्ती, प्रांतिक व स्थानिक सरकाराकडे खर्चासाठीं देण्यांत येणाऱ्या रकमा हिंदुस्थानांत नीट वांटलेल्या नाहींत. सन १९१४ सालीं या रकमा खालीलप्रमाणें होत्या.

	हिंदुस्थान रुपये.	जपान पौंड.
प्रांतिक व मध्यवर्ती सरकार	१,२७,५०,००,०००	५,९०,००,०००
सर्व हिंदुस्थानचीं लोकलबोर्डें	५,८५,००,०००	८०,००,०००
सदर म्युनिसिपालिट्या	८,१०,००,०००	२,१०,००,०००
एकूण	१,४१,४५,००,०००	८,८०,००,०००

याच सालचे याच बाबीचे जपानचे आंकडे पहा. यावरून हें सहज उघड आहे कीं, जपानांत स्थानिक संस्थांकडे पुष्कळ खर्च होतो व तो असे कारखाने वगैरे काढण्याकडे होत असल्यानें जनतेला अत्यंत हितावह आहे. लष्कर ठेवून देशांत शांतता स्थापन करण्यापेक्षां कारखाने काढून लोकांना संपन्न व संतुष्ट ठेवणें जास्त हितकर नाहीं काय ? पण हिंदुस्थानांत संतोषापेक्षा शांततेकडे जास्त लक्ष दिलें जातें व त्यामुळें अखेर संतोष नाहीं व शांतताहि नाहीं असें होईल कीं काय अशी धास्ती वाटते.

एकंदर देशाचें उत्पन्न व खर्च यांची तुलना केली तरी देखील हिंदुस्थानांत असाच चमत्कार दिसतो. विलायतसरकारचें उत्पन्न व खर्च यांचें प्रमाण ११ स १ असें आहे व हिंदुस्थानसरकारचें हेंच प्रमाण ६ स १ आहे. याचा अर्थ असा कीं, विलायतेंत माणसाला जर अकरा रुपये मिळाले तर सरकारला तो एक रुपया कर देतो. पण हिंदुस्थांत त्याच माणसाला जवळ-जवळ दोन रुपये कर द्यावा लागतो. इतर देशांत तर विलायतपेक्षांहि कमी कर दर माणशीं द्यावा लागतो व त्यामुळें लोकांना कर देणें अवघड जात नाहीं. न्यायमूर्ति रानडे हे शेतकऱ्यांचा कायदा जाणणारे न्यायाधीश पुष्कळ वर्षें मुंबईइलाख्यांत होते. त्यांनीं आपला अनुभव असा नमूद केला आहे कीं "हिंदुस्थानांत सरकारी शेतसारा देऊन शेतकऱ्याच्या कुटुंबाचें पोट देखील भरत नाहीं. त्याला पोट भरण्याकरतां निराळी मजुरी करावी लागते. गरीब शेतकऱ्यांची याप्रमाणें उपासमार होते व सधन शेतकरी शेती सुधारण्यासाठीं पैसे खर्च करण्यास धजत नाहीं. यामुळें एकंदरींत शेतीचे व देशाचें नुकसान होत आहे."

इतर देशांत कर देणाराचें पोट भरून उरेल त्यावर कर घेण्याची वहिवाट आहे. माणसास पोट भरण्यासाठीं अमुक रक्कम लागते, तेव्हां त्या रकमेच्या आंतील सर्व उत्पन्नावर कर नसावा हें तत्व सर्वमान्य झालेलें आहे. ही कसोटी जर हिंदुस्थानांत लावली तर बहुतेक सर्व शेतकरी सारामाफींत निघतील. परंतु अशी सवलत देण्यापूर्वीं कारखान्यांची वाढ व परदेशीं जाणाऱ्या व येणाऱ्या मालावर जकात अशी तजवीज झाली पाहिजे; पण या दृष्टीनें कोणीच उपक्रम करीत नाहीं. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत अबकारीचें उत्पन्न मोठें आहे. पण हें व्यसनापासून मिळतें म्हणून अजिबात बंद केलें पाहिजे. लोकांस उपाशी ठेवून पैसे घेणें जसें वाईट त्याचप्रमाणें लोकांना दुर्व्यसनी करून पैसे कमावणें वाईट आहे. इतर देश दारूची बंदी करीत आहेत. संयुक्त संस्थानांत अशी बंदी झाली व हिंदुस्थानांत जेथें दारूची बंदी प्राचीन काळापासून होती तेथें इंग्रजी राज्यांत अन्नापेक्षां दारूचाच जास्त सुकाळ झाला आहे.

हिंदुस्थानांत धंदेशिक्षण व कारखाने यांची फार अवश्यकता आहे, परंतु यासाठीं लागणारा पैसा सरकारच्या उत्पन्नांतून कैक वर्षें मिळणें

अशक्य आहे. शिवाय या कामाचा सर्व बोजा एकाच पिढीनें उचलावा हेंहि योग्य नाहीं. याप्रीत्यर्थ हिंदुस्थानसरकारनें दरसाल पंधरा वीस कोट रुपये धंदेशिक्षणाकडे व पांचपन्नास कोट रुपये कारखाने काढण्याकडे, निदान दहा पंधरा वर्षें, खर्च केले पाहिजेत व यासाठीं लागणारी रक्कम कर्ज काढली पाहिजे. इतर देशांनीं महायुद्धासाठीं मोठमोठे कर्जाचे बोजे डोक्यावर घेतले आहेत व हिंदुस्थानानें देशाच्या उन्नतीसाठीं तसा बोजा घेणें गैरवाजवी नाहीं इतकेंच नव्हे तर अवश्य आहे. शिक्षणासाठीं कर्ज काढणें विलक्षण आहे खरें. पण हिंदुस्थानांत वर सांगितल्याप्रमाणें अनेक गोष्टी विलक्षण असल्यानें हें एक विलक्षण कृत्य करावें लागत आहे. जपानसरकारनें इतकी धंदे वगैरेंत प्रगति केली आहे तरी नुकतेंच शिक्षणासाठीं कर्ज काढलेंच आहे. या कामीं जपानी पार्लमेंटनें शिक्षण म्हणजे कांहीं धंदा किंवा उत्पन्नाची बाब नाहीं सबब यासाठीं कर्ज काढूं नये असें म्हटलें. पण शिक्षणासाठीं खर्च झालेली रक्कम पुढें सव्याज फिटेल असें अश्वासन देऊन जपानी सरकारनें हें कर्ज काढलेंच. हिंदुस्थानांत कारखाने वगैरेंची वाढ मुळींच झालेली नाहीं, अशा स्थितींत हें कर्ज काढणें किती अवश्य आहे हें कोणासहि सांगावयास नको. हिंदुस्थान-सरकारला हल्लीं कर्ज आहेच व त्यांत महायुद्धासाठीं म्हणून भर पडून त्याची स्थिति खालीं दिल्याप्रमाणें आहे.

पाटबंधाऱ्यांसाठीं काढलेलें कर्ज	६६ कोटी
आगगाड्यांसाठीं काढलेलें कर्ज	३५९ कोटी
महायुद्धासाठीं काढलेलें कर्ज	१३३ कोटी
एकूण	५५८ कोटी.

याच कर्जांत धंदेशिक्षण व कारखाने यासाठीं आणखी पांचशें कोटींच्या कर्जाची भर घातली तर कांहीं मोठी हानी होणार नाहीं. देशाचें सालिना उत्पन्न सव्वाशें कोटींचें आहे व त्याला हजार कोटींचें कर्ज मोठें भारी नाहीं. शिवाय दहा वर्षांनंतर शिक्षण व कारखाने यापासून लोकांची संपन्नता वाढली म्हणजे तर हें कर्ज म्हणजे कांहींच बाब नाहीं असें वाटेल. प्रत्येक प्रांतानें आपल्या कामासाठीं त्या प्रांतांतच कर्ज काढावें व त्या कर्जाचा

खर्च केवळ त्याच कामाकडे हिंदी लोकांच्या हातून हिंदी लोकांच्या कल्याणाकडे व्हावा. खर्चाची अशी हमी व फायद्याचा असा अनुभव आल्यावर लोक मोठ्या खुषीनें पैसे देतील व आपलें दैन्य घालविण्यास मदत करतील.

या कर्जाबरोबरच हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें सुरू करून हिंदुस्थान सरकारची मान विलायती व्यापाऱ्यांच्या हातून सोडविली पाहिजे. त्याचप्रमाणें स्टेट सेक्रेटरीचा हिंदी खजिन्यावर ताबा नसावा. विलायतेंतील लोकांचें देणें लंडन शहरांत एक हिंदी पेढीची शाखा काढून तिच्या मार्फत देण्यांत यावें व आपलें उत्पन्न कसें व कोणत्या उपायानें वाढवावें याबाबद हिंदुस्थानाला स्वातंत्र्य पाहिजे. दुसऱ्या गोष्टी सोडल्या तरी हिंदुस्थानांतील लोकांचा असा ग्रह झाला आहे कीं, विलायती व्यापाऱ्यांच्या फायद्यासाठीं हिंदुस्थानची गळचेपी करण्यांत येते. हा ग्रह नाहींसा व्हावा इतक्यासाठीं तरी वर लिहिलेल्या सुधारणा झाल्या पाहिजेत. यासाठीं एक कमीशन नेमावें. त्यांत दोनतृतीयांश हिंदी लोक असून एकतृतीयांशांत अधिकारी व अनधिकारी तज्ञ असावे. या कमीशननें कानडा, आस्ट्रेलिया वगैरे देशांतून माहिती मिळवून इंग्लंड व हिंदुस्थान यांचा संबंध निश्चित ठरवावा. असें केल्याशिवाय वरील चमत्कार बंद होणार नाहींत.

हिंदी नाणें, पेढ्या वगैरेंचा प्रश्न हिंदुस्थानसरकारनें हिंदी प्रतिनिधींच्या सल्ल्यानें सोडवावा. यासाठीं एक कमीशन, एक लेजिस्लेटिव्ह असेंब्लीची कमेटी व सर्व प्रांतिक कौन्सिलांच्या निरनिराळ्या कमेट्या नेमून त्यांच्याकडून तावडतोब निर्णय व त्याप्रमाणें बजावणीची व्यवस्था झाली पाहिजे. अधिकारी व तज्ञ यांना या कमेटींत नेमावें. पण त्यांनीं निर्णयांत मत देऊं नये. यापुढें पैशाचे सर्व व्यवहार राजरोस, लोकांच्या सल्ल्यानें होऊन त्यांची वेळोवेळीं प्रसिद्धी करण्यांत आली पाहिजे. सरकारच्या कामांत, सार्वजनिक कामांत गुप्तपणा बिलकुल उपयोगी नाहीं.

प्रकरण एकवीसावें

उपसंहार

येथपर्यंत आपण हिंदुस्थानांत स्वराज्य स्थापन होऊन तें टिकाऊ होण्यासाठीं काय केलें पाहिजे हें पाहिले. पण ही गोष्ट साध्य कशी करावी हें कोठेंच सांगितलें नाहीं. याचें मुख्य कारण या बाबींत अनेक मतभेद होतील. जो तो मनुष्य आपआपल्या हिमतीप्रमाणें व परिस्थितीप्रमाणें हें काम करणार व प्रत्येकाला तसें करण्यास पूर्ण सवड पाहिजे. हें काम सगळ्यांचें आहे. यांत यश आलें तर सगळ्यांचाच फायदा आहे. हें न केलें तर सगळ्यांचेंच नुकसान आहे. यासाठीं पुष्कळ लोक जे मनांत व अचरणांत आणतील त्याप्रमाणें नफा अगर नुकसान होणार आहे. झटणारीं, आळशी व विरुद्ध जाणारीं किंवा झटणारीं व न झटणारीं या माणसांची संख्या जशी लहान मोठी असेल त्याप्रमाणें हें काम होणार आहे व यासाठीं लोकजागृती करणें, लोकांना कामाला लावणें, काम करणाऱ्यांना योग्य वळण देणें हें काम पुढारी म्हणविणारांचें आहे.

परमात्मा जसा सर्वव्यापी, निर्गुण, निराकार, मायावी पण आपल्याच शब्दानें बांधलेला आहे त्याचप्रमाणें सरकार व जीव या संस्था देखील त्या त्या शरीरापुरत्या सर्वव्यापि, निर्गुण, निराकार, मायावी वगैरे आहेत. परमात्म्याबद्दल विचार करूं लागल्यावर तो जसा पांच घरांत (पंचायतनांत) दृष्टीस पडतो त्याचप्रमाणें सरकार देखील पांच ठिकाणीं व जीवहि पांच ठिकाणीं अनुभवास येतो. सरकारच्या अनुभवास येण्याच्या पांच जागा म्हणजे (१) राजा किंवा तत्सदृश ऐश्वर्यपूर्ण लोकांची संस्था, (२) मध्यवर्ति प्रातिनिधिक संस्था, (३) प्रांतिक प्रातिनिधिक संस्था, (४) स्थानिक प्रातिनिधिक संस्था व (५) ग्रामसंस्था या होत. या पांच जागा परमेश्वराच्या अद्वितीयत्व, सर्वज्ञत्व, सर्वशक्तिमत्व, दयालुत्व व न्यायित्व या स्वरूपांना सदृश आहेत व या नांवावरून त्या त्या संस्थांच्या

कामाचें स्वरूप आपणांस नीट समजतें. शरीराच्या ठिकाणीं जीव किंवा बुद्धि, मन, ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें व स्पर्श अशीं पांच तत्सदृश केंद्रें आहेत. या केंद्रांनीं करावयाचीं कामें परस्परांशीं अगदीं सदृश आहेत यासाठीं त्यांची जास्त फोड करीत नाहीं. कोणाहि विचारी माणसाला त्यांचें सादृश्य दिसून येईल. ग्रामसंस्थांत न्यायानें वागणारीं माणसें पाहिजेत, स्थानिक संस्थांत दया करणारीं माणसें पाहिजेत, प्रांतिक सरकारांत शक्तिमान् माणसें पाहिजेत, मध्यवर्ती सरकारांत ज्ञानवान् माणसें पाहिजेत व राजाजवळ अद्वितीय ऐश्वर्यसंपन्न माणसें पाहिजेत. यासाठीं आपण प्रत्येक निवडणुकींत या योग्यतेचीं माणसें नीट काळजीपूर्वक निवडावीं व त्यांना आपल्याला योग्य व शक्य दिसेल तें करूं द्यावें. निवडलेलीं माणसें नियमित मुदतीं पुरतींच असतात व त्यांना निवडण्यांत चूक झाली असें दिसल्यास झालेली चूक पुढील निवडणुकींत दुरुस्त करावी.

या निवडलेल्या माणसांना कामें करण्यास कांहीं तरी मार्गदर्शक असावें. जसा दिवा हा तात्पुरता मार्ग दाखवितो व तो आपल्याबरोबर चालत असल्यानें क्षणोक्षणीं पुढचा थोडा मार्ग दाखवून आपणांस रस्त्याच्या टोंकापर्यंत जाण्यास मदत करतो त्याप्रमाणें नाना देशांतील माहिती गोळा करून तिच्या उजेडांत तात्पुरत्या सुधारणांचा निर्णय करावा व त्याप्रमाणें अंमल करावा. हें माहिती गोळा करण्याचें व निर्णय ठरविण्याचें काम अखंड चालू पाहिजे व त्याच्या प्रकाशांत दर क्षणीं नव्या माहितीचा उपयोग करून पुढें पाऊल पडत असावें अशी योजना पाहिजे. नाना खात्यांची माहिती गोळा करून त्यापासून निष्कर्ष काढणारे संघ पहिल्यानें स्थापन झाले पाहिजेत. या संघांत कामें करण्यास आज अगदीं थोडीं म्हणजे दोन चार, कदाचित् एकच, मनुष्य मिळेल. पण त्या एकट्यानेंच मिळालेली माहिती जनतेपुढें मांडून तिच्यापासून निर्णय ठरवून व त्याप्रमाणें स्वतः एकट्यानेंच आचरण करण्यास सुरुवात केली पाहिजे. कालांतरानें या कामाकडे लोकांचें लक्ष लागेल, अनेक कामें करण्यास माणसें मिळतील व काम होईल. प्रत्येक कामाची दिशा म्हणजे अनेक ठिकाणची माहिती गोळा करणें, तिचा विचार करून निर्णय ठरविणें व त्या निर्णयाप्रमाणें अंमलबजावणी करणें ही ठरलेली आहे. या

मार्गानें आज जाण्यास सुरुवात व्हावी अशी सुरुवात करतां यावी यासाठीं ग्रंथारंभीं कांहीं माहिती दिली आहे, ग्रंथांत कांहीं दिली आहे व शेवटीं हि माहिती दिली असून त्यावरून निर्णय ठरविले आहेत, ते पुढील-प्रमाणें:—

इंग्लंडसारख्या स्वतंत्र देशांत सुद्धां उद्योगधंद्यांच्या सुधारणांसाठी खालीं लिहिल्याप्रमाणें चार गोष्टी करण्यांत येत आहेत.

१ नवीन शोध लागावे व कारखान्यांची वाढ व्हावी म्हणून सरकार प्रयत्न करीत आहे. याबाबदचें ढळढळीत उदाहरण म्हणजे इंग्लंडमध्यें शेतीसुधारणा व रंग तयार करणें या कामीं होत असलेले प्रयत्न होत. याबाबद इंग्लंडपेक्षां जर्मनी व संयुक्त संस्थानें यांनीं धंद्याच्या बाबतींत नवीन शोध लावण्याबद्दल जास्तच लक्ष दिलें आहे. संयुक्त संस्थानांनीं दहा लाख पौंड म्हणजे दीड कोट रुपये नवे धंदे व शास्त्रीय शोध यांसाठीं दरसाल खर्च करण्याचें ठरविले आहे.

२ घरें बांधणें यासारख्या केवळ स्थानिक कामासाठीं देखील मध्यवर्ती सरकाराकडून स्थानिक संस्था व खाजगी व्यक्ति यांना मदत देण्याचें ठरलें आहे. लढाईपूर्वींच लोकांना हें स्पष्ट दिसूं लागलें होतें कीं, गरीब लोकांना विशेषतः शेतकींत कामें करणाऱ्या मजुरांना नवीन धर्तीवर अधिक आरोग्यकारक घरें बांधून दिलीं पाहिजेत व ही गोष्ट एक राष्ट्रीय धोरण म्हणून सर्व देशभर अमलांत आली पाहिजे. लढाई संपल्यानंतर तर या बाबींत सर्व मतभेद नाहींसे होऊन सरकार या कामीं मनःपूर्वक खटपट करीत आहे.

३ हल्लींचें प्रधानमंडळ जरी त्या गोष्टीला कबूल नाहीं तरी दिवसें-दिवस खाणी व आगगाड्या सरकारच्या मालकीच्या करण्याकडे लोकमत झुकत चाललें आहे. कापड, चामडें, तेल, कोळसा, लोखंड व गलबतें या कारखान्यांनीं ज्या प्रचंड जुटी केल्या आहेत त्यांचें वजन व बंड हे कारखाने सरकारच्या मालकीचे व सार्वजनिक केल्याशिवाय मोडणार नाहीं. याबाबद आतां सर्वांची खातरी झाली

आहे. लढाईपासून हे प्रचंड संघ स्थापन करण्याकडेच कारखानदारांची प्रवृत्ति आहे. विलायतेंतील सर्व पेढ्यांचा कारभार आतां फक्त पांच मंडळांचे हातांत आला आहे व कालांतरानें तो एका मंडळाच्या हातीं जाईल.

४ प्रत्येक गोष्टींत जनतेचा हात व मजुरांचें सुख यांचा शिरकाव झाला पाहिजे, हा सिद्धांत दिवसेंदिवस उग्र स्वरूप धारण करून विचार करण्यायोग्य होत चालला आहे. कारखाने वगैरेंचे जे प्रचंड संघ होत आहेत त्यांना कह्यांत ठेवणें सरकारला अशक्य होत चाललें आहे व ज्या कारखान्यांच्या कारभारांत आपला हात नाहीं त्या कारखान्यांत मजुरी करण्यास आपण तयार नाहीं असें मजूर देखील एकमुखानें म्हणूं लागले आहेत. कांहीं वर्षांपूर्वीं व्हिटले कमिटीनें मजुरांच्या सोईसंबंधानें विचार करीत असतां असें मत स्पष्टपणें दिलें कीं, कारखान्यांचा कारभार मजुर व मालक यांच्या संयुक्त मंडळाकडे असावा. लढाई संपल्यापासून याच दिशेनें कारखान्यांचा कारभार संयुक्त मंडळांकडे सोंपविण्याचे प्रयत्न होत आहेत. याहीपेक्षां आगगाड्या व खाणी ह्या सरकारच्या मालकीच्या करण्यासाठीं प्रयत्न चालू आहेत व त्यांत लवकरच यश येईल असें वाटतें ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे.

परकी व्यापार वाढविण्यासाठीं तर ‘ इंपिरीयल ट्रेड इन्व्हेस्टिगेशन बोर्ड’ (व्यापारासंबंधीं चौकशी करणारें साम्राज्य मंडळ) व ब्रिटिश ट्रेड कार्पोरेशन (विलायती व्यापाराचें मंडळ) अशीं दोन मंडळें सरकारच्या परवानगीनें स्थापन करण्यांत आलीं आहेत. याप्रमाणें विलायतसारख्या संपन्न व सार्वभौम सरकारला जेथें आपलें याप्रमाणें व्यापाराचें मुक्तद्वार बंद करावें असें वाटूं लागलें आहे तेथें हिंदुस्थानसारख्या निव्वळ शेतीच्या देशानें आपल्या व्यापाराची वाढ व्हावी म्हणून संरक्षक जकाती बसवूं नये असें कोण म्हणूं शकेल ?

कानडा देश हिंदुस्थानप्रमाणेंच शेतीचा आहे. पण त्या सरकारलासुद्धां आपण निव्वळ शेतीवर अवलंबून रहाणें पसंत नाहीं व हिंदुस्थान मात्र

तसेंच शेतीवर अवलंबून ठेवावें हें योग्य होईल काय ? आजची कानडाची स्थिति पाहिली तर त्याचें शेतीचें उत्पन्न कमी असून धंद्याचें जास्त आहे असें दिसेल. शेतीपासून १६२ कोट डालर, माशांचें उत्पन्न चार कोट डालर, जंगलचें उत्पन्न सतरा कोट डालर, खाणींचें उत्पन्न एकोणीस कोट डालर व कारखान्यांचें उत्पन्न २४० कोट डालर असें कानडाचें उत्पन्न सन १९१७ सालीं होतें व त्यांत गेल्या पांचसात वर्षांत सुधारणा झालीच असेल. ही सुधारणा होण्यासाठीं कानडानें आयात व निर्गत मालावर सरासरी सरसकट पंचवीस टक्के जकात ठेवली आहे. कारखान्यांच्या वाढीबरोबर पेढ्यांचा व्यवहार देखील वाढत आहे. आतां कानडा सरकारनें आपला व्यापार परदेशांत वाढविण्याकडे लक्ष लावलें आहे व यासाठीं व्यापार व धंदे आणि पैसा व पेढ्या अशीं दोन खातीं झटून काम करीत आहेत. व्यापारोपयोगी माहिती गोळा करण्याचें एक खातेंच काढलें असून धंद्यांना उत्तेजन देण्यासाठीं मोठी खटपट चालली आहे. सरकारच्या या खात्यांतून लोकांत माहिती पसरावी म्हणून नेहमीं पत्रकें व पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत येतात. आठवड्याकाठीं एक पत्रक तर सर्वत्र फुकट वांटण्यांत येतें. खरोखर म्हटलें तर कानडा सरकार म्हणजे एक या कामीं गिरविण्या-लायक कित्ता आहे. धंदेशिक्षण देणें, धंद्यांस मदत करणें व धंद्यांबद्दलची माहिती प्रसिद्ध करणें या गोष्टी धंद्यांच्या वाढीला अवश्य आहेत हें अगदीं उघड आहे.

कानडाचें मध्यवर्ती सरकार फक्त माहिती गोळा करतें व प्रसिद्ध करतें. त्याप्रमाणें प्रत्यक्ष धंदे काढण्याचें काम प्रांतिक सरकारांकडे आहे. एका प्रांतानें धंदे वाढविण्यासाठीं एका सालांत वीस लक्ष डालर मदत केली व ही मदत जो कोणी कारखान्यासाठीं जितकी रक्कम जमवील तितकीच सरकार देतें अशी आहे. पूर्व कानडांत तर लहान धंद्यांना म्युनिसिपालट्या अशी मदत देतात. हिंदुस्थानांतील पद्धत कानडाच्या अगदीं विरुद्ध आहे. हिंदुस्थानांत कोणतेंच सरकार कारखान्यांना मदत करीत नाहीं व अशी मदत देऊं नये असें विलायतेपासून सरकारचें धोरण दिसतें.

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत कारखानदारांना मदत देण्याची जरूर पडत नाहीं तरी जकातीची भिंत मजबूत घातलेली आहे. अमेरिकेंत पैसा

पुष्कळ असून तेथें धंदे पूर्णावस्थेस पोंचले आहेत तरी ही भिंत काढण्याची गोष्ट कोणी बोलत नाहीं. अनेकविध यंत्रें, नानाविध कार्यकारी शक्ति व थोड्या खर्चांत उत्तम देखरेख या गोष्टी अमेरिकेंतील धंद्याचें एक सगळीकडे दिसणारें लक्षण आहे. व म्हणूनच प्रचंड संघ व अवाढव्य कारखाने तेथें आहेत. फोर्डमोटार कंपनीचा दरसालचा व्यवहार पस्तीस चाळीस कोट डालरचा आहे. यांत छत्तीस हजार लोक नेहमीं कामावर असतात व दर एकूणतीस सेकंदाला म्हणजे अर्ध्या मिनिटाला जरा कमी इतक्या वेळांत एक मोटार तयार होते व आठ तासांच्या एका दिवसांत एकदां त्यांनीं तीन हजार मोटारी तयार करून दिल्या. खाजगी इसमांची संपत्ति तर कल्पनातीत आहे. जगप्रसिद्ध जान राकफेलर यांची मिळकत तीस अब्ज डालरची असून त्याचें उत्पन्न दरसाल दहा कोटी डालर आहे.

अमेरिकेंत आठ दहा हजार पेढ्या आहेत व त्या सर्वांची एक मध्यवर्ती जूट आहे. वाशिंग्टन येथील पेढ्यांच्या मंडळाकडें बारा संघांचें काम आहे व या सगळ्या पेढ्यांत अशीच स्थिति आहे. या मंडळानें परदेशीं पेढ्यांचीं दुकानें काढण्याचें ठरविलें असून मध्य व दक्षिण अमेरिकेंतील संस्थानांतून सोन्याचें नाणें सुरू करण्यास मदत करण्याचें ठरविलें आहे. याचप्रमाणें सगळ्या देशभर जागोजाग व्यापारी मंडळें किंवा चेंबर ऑफ कामर्स स्थापन झाल्या आहेत. या चेंबर्स ऑफ कामर्सचें मध्यवर्ती मंडळ म्हणजे अमेरिकेंतील सर्व प्रमुख व्यापाराचे प्रतिनिधि होय. याची कचेरी वॉशिंग्टन येथें आहे व मोठे कारखानदार व व्यापारी, याचे सभासद आहेत. या मंडळानें आपल्या पदरीं, तज्ञ, कारभारी, शोध करणारे, वर्तमानपत्रकार व स्वयंसेवकपथक इतकी मंडळी बाळगली आहेत.

अमेरिकेचा पुढचा सुधारणेचा बेत पुढीलप्रमाणें आहेः—शेती व धंदे यांच्या उत्पन्नांची वाढ करणें, परदेशीं व्यापार वाढविणें व अमेरिकेचीं गलबतें वाढविणें. आपला व्यापार परदेशांत वाढावा असें वाटत असेल तर गलबतें बांधणें व बंदरें सुधारणें या गोष्टी अवश्य केल्या पाहिजेत ही गोष्ट अमेरिकनांना पटली आहे. आपलीं गलबतें पुरेशीं नव्हतीं म्हणून आपला परदेशाशीं व्यापार वाढला नाहीं ही गोष्ट त्यांनीं ओळखली असून

नवीन गलबतें बांधण्याकडे त्या देशांत विशेष लक्ष देण्यांत येत आहे. जगांत जहाजें बांधण्याची सर्वांत मोठी गोदी हाग बेटावर आहे. तींत पन्नास आगबोटी एकदम बांधतां येतात. याखेरीज अमेरिकेचा सगळा किनारा गलबतें बांधण्याच्या गोद्यांनीं व्यापून टाकला आहे.

गलबतें बांधण्याचें काम एका बोर्डाकडे असून हा सरकारी बोर्ड गलबतें बांधून लोकांस विकतो. स्वस्त माल मिळण्यास चढाओढ पाहिजे ही गोष्ट अमेरिकेला मान्य आहे. परदेशीं व्यापार वाढविण्यासाठीं लोक व सरकार सारखेच झटत आहेत. आयात व निर्गत व्यापाराचा अभ्यास केलेल्या विद्वानांना अमेरिकन सरकार मुद्दाम इतर देशांत पाठवितें व यांजकडून आलेली माहिती सर्वांस मिळेल अशी प्रसिद्ध करण्यांत येते. अमेरिकेंतील मालाचा इतर देशांत फैलाव होण्यासाठीं अमेरिकेनें खालील युक्त्या वापरण्याचें ठरविलें आहे. (१) अमेरिकन मालाचीं फिरतीं चित्रें, (२) यंत्रें व माल यांचे नमुने प्रदर्शनासारखें मांडणें, व (३) परदेशी व्यापारांत वापरण्यांत येणारे कागदपत्रांचे नमुने प्रसिद्ध करणें. संपन्न व पूर्णतेस पोंचलेल्या अमेरिकन सरकारास जर इतक्या खटपटी कराव्याशा वाटतात तर हिंदुस्थानांत असल्या खटपटींची किती जरूर आहे बरें ?

पण हिंदुस्थानाला अमेरिकेचा कित्ता घेणें त्यांच्या सांपत्तिक स्थितींतील भेदामुळें अशक्य आहे. पण जपानाची तशी स्थिति नाहीं. जपानानें थोड्याच वर्षांत धंद्यांत सुधारणा घडवून आणल्या व त्याचा कित्ता हिंदुस्थानास गिरवितां येईल. जपानांत धंदे व सरकार यांचा निकट संबंध आहे. जपानचे प्रमुख धंदे सर्व सरकारनें सुरू करून पुष्कळ दिवस चालविले होते. अदमासें तीस चाळीस वर्षांपूर्वीं सर्व गलबतें बांधण्याचे कारखाने सरकारी होते. सन १९०० च्या सुमारें सरकार दर एक टन बोजा नेणाऱ्या गलबतास ११ ते २२ येन बक्षीस देत असे व नुकतीं दहावीस वर्षें झालीं, सरकारनें सर्व गलबतें बांधण्याचें काम खाजगी लोकांकडे दिलें आहे. मात्र दरसाल या खाजगी मंडळांना सरकारांतून इनामें मिळतात. याशिवाय धंदे वर काढण्याचा दुसरा मार्ग नाहीं. जपानला असा अनुभव आला कीं, त्याची पहिल्यानें चीन व मागून रशियाशीं

लढाई झाल्यानें देशांत फार एकी होऊन व्यापाराला जोर आला. तशांत लढाईचा खर्च, खंडणी वगैरे रकमा मिळाल्यानें तर तितकें भांडवल धंद्यासाठीं एकदम उपयोगी पडलें.

याशिवाय जपानसरकारनें सामाजिक सुधारणेचें एक कायमचें व सतत चालणारें ध्येय आपल्यापुढें ठेवलें आहे. संशोधनाचें काम, संशोधन मंडळें, युनिव्हर्सिट्या, व्यापारी मंडळें, धंदेमंडळें व मजुरांच्या संस्था यांच्या मार्फत सारखें चालू आहे. हें काम दर एक म्युनिसिपालिटीपासून वरच्या प्रत्येक संस्थेवर कायद्यानें लादलें आहे. सर्वांत मोठीं अशीं दोन संशोधन मंडळें टोकीओ व ओसाका येथें असून येथें सर्व प्रकारचीं साधनें अनुकूल ठेवलीं आहेत. याशिवाय खाजगी व्यापाऱ्यांनीं संशोधक पदरीं ठेवले असून त्या व्यापाऱ्यांना या कामीं सरकारांतून मदत मिळते व बादशहा खुद्द खाजगींतून इनामें अगर बक्षिसें देतात. धंदेशिक्षणांत यंत्रें, रसायन, व्यापार याबाबद सर्वांगपरिपूर्ण शिक्षण देण्याची सोय केली आहे. जपानमध्यें शेंकडा वीस ते साठ टक्केपर्यंत संरक्षक जकाती आहेत. व्यापारासाठीं कंपन्या स्थापण्याला कायद्यानें फार सवलती ठेवल्या आहेत. उदाहरणार्थ, पोलादाच्या कारखान्यांना जमीन फुकट मिळते व इतर लागणाऱ्या सामानावरील कर माफ ठेवले आहेत.

व्यापार, पेढ्या याबाबद देखील अशाच सवलती आहेत. सर्व देशांतील पेढ्यांची व्यवस्था पाहून, त्यांतील उत्तम गुणांचा संग्रह करून जपानांतील पेढ्यांची व्यवस्था केली आहे. सगळ्या पेढ्यांच्या शिरस्थानीं जपानी पेढी आहे व हिला कागदी चलन काढण्याचा अधिकार आहे. प्रत्येक तालुक्याला तालुक्याची पेढी आहे व ही तालुक्याच्या सरकारप्रमाणें पेढीचें काम करते. धंद्यांच्या उत्तेजनार्थ धंद्यांची एक मध्यवर्ति पेढी आहे व हिला आपल्या भांडवलाच्या दसपट किंमतीपर्यंत कागदी चलन काढतां येतें. ही धंद्यासाठीं भांडवल पुरविते. शेती सुधारण्यासाठीं शेती पेढी आहे. परदेशी व्यापारासाठीं याकोहोमा स्पेसी बँक आहे. ही परदेशांत सर्वत्र शाखा स्थापून तेथें जपानी लोकांना मदत करते. याप्रमाणें प्रत्येक खेड्यापाड्यापासून तों थेट परदेशापर्यंत सर्व व्यवहारांची सोय

पेढ्यांनीं केलेली आहे. कोणत्या कामासाठीं कर्ज देणें योग्य हें पाहून या पेढ्या लोकांना कर्ज देतात, त्या व्यापाऱ्याला माहिती, सल्ला वगैरे देतात, इतकेंच नव्हे तर एक बँक दुसऱ्या बँकेला मदत देण्यासाठीं शिफारस करते. यामुळें एका खेड्यांतल्या कर्तबगार शेतकऱ्याला परदेशच्या राजधानी पर्यंत ओळखपाळख व सवलती मिळतात. आपली पोष्टाची बँक खाजगी केली तर तिला असला व्यवहार उत्कृष्ट रीतीनें करतां येईल.

जपानी सरकार आपल्या व्यापारावर सूक्ष्म दृष्टी ठेवतें व कच्च्या मालाचा पुरवठा व पक्या मालाचा उठाव याला शक्य ती मदत करतें. देशांत साठ सत्तर व्यापारी मंडळें असून चाळीस पन्नास व्यापारी प्रदर्शनें आहेत. हार्बिन, सिंगापूर वगैरे ठिकाणीं तर परदेशी व जपानी वस्तु शेजारीं शेजारीं मांडतात. लोकांना शिक्षण, उत्तेजन व प्रोत्साहन देण्यांत जपानी अडत्ये पश्चिमात्यांच्या बरोबरीनें काम करतात. हे अडत्ये आपला माल खपविण्याच्या व आपल्या देशाला माल पुरविण्याच्या कामीं मदत करतात, इतकेंच नव्हे तर इतर देशांतून घेण्यासारखी गोष्ट तत्काळ उचलून आपल्या देशांतील लोकांना तिची माहिती देण्यांत तत्पर असतात. त्याचप्रमाणें जपान सरकारचे वकील या कामांत मनोभावानें फार मदत करतात. अशी माहिती जपानांत येतांच ती सर्व वर्तमानपत्रांना पुरवितात व ही आठवड्यांतून दोनदां प्रसिद्ध होते. व्यापारासाठीं कोणी जपानी गृहस्थ परदेशीं जाईल तर त्यासहि मदत व सवलती मिळतात. सन १९१६ सालीं तर दहा माणसांचें एक मंडळ सरकारनें अमेरिकेंत पाठविलें. पण अशा प्रकारच्या हिंदुस्थानांतील मंडळांत हिंदी गृहस्थ नसतो. यःकश्चित रस्त्यांची आंतरराष्ट्रीयसभा पॅरिस शहरांत भरली होती तर तिला हिंदी सभासद हिंदी सरकारनें पाठविला नव्हता. देशांत पूर्ण धंदेशिक्षण घेतलेले ऐंशी विद्यार्थी जपानी सरकार दरसाल परदेशीं ज्ञानसंपादनासाठीं पाठवितें. ही पद्धत वीस वर्षांपासून चालू असून शिकून आलेले सरासरी सहाशें इसम तज्ञ म्हणून तेथें कारखाने चालवीत आहेत.

या परदेशाच्या एकंदर निरीक्षणापासून आपणांस काय बोध घेतां येईल याचा विचार करून हें प्रकरण संपवूं.

१ पहिला धडा शिकावयाचा तो हा कीं, धंदे, कला, व्यापार यांची वाढ देशांत होते ती झाडांप्रमाणें आपोआप होत नाहीं. ती घराप्रमाणें रचनेनें करावी लागते व यासाठीं माहिती गोळा करणें, योजना तयार करणें व ती आचरून दाखविणें या गोष्टी कराव्या लागतात. कानडा, जपान, इंग्लंड, फार काय पण अमेरिकेतील संयुक्त संस्थानां सारख्या सर्वसंपन्न देशांतसुद्धां सरकारनें स्वस्थ बसून या गोष्टी घडून आल्या नाहींत. यासाठीं हें काम सरकारला करणें भाग पाडणें व लोकांनीं स्वतः शक्य तें करणें या गोष्टी झाल्या पाहिजेत.

२ कामाच्या प्रारंभींच नव्हे तर धंदे चांगले ऊर्जित दशेस आले तरी सरकारनें आपल्या व्यापारी व उद्योगधंद्याच्या खात्यामार्फत त्यांना सर्व प्रकारें मदत केली पाहिजे. या बाबींत हिंदुस्थानानें जपानची नक्कल करावी.

३ हिंदुस्थानसरकारनें नाहीं म्हणावयाला आगगाड्यांना थोडी सवलत दिली व पाटबंधाऱ्यांचें काम थोडें बहूत केलें. पण धंदे, कारखाने व व्यापार याबाबद हिंदी जनतेला पुढें आणण्याचा मुळींच प्रयत्न केला नाहीं. जनतेला या गोष्टींपासून शक्य तितकें पारखें ठेवून इंग्रज व परकीय व्यापारीसंस्थांना मात्र चरण्यासाठीं कुरण मोकळें करून दिल्यासारखें केलें.

४ महायुद्धापासून सर्व जगांत एक प्रकारची क्रांति झाली असून इंग्लड, अमेरिका वगैरे देशांत जशी पूर्वस्थिति केव्हांहि येणें शक्य नाहीं त्याचप्रमाणें ती हिंदुस्थानांत देखील शक्य नाहीं. यासाठीं हिंदी लोकांना या कामांत भागीदार करणें अवश्य आहे.

५ हिंदी लोकांना, लोकमताला सरकार दरबारीं मान देण्याची, निदान लोकमत स्पष्ट करण्याची सवलत नव्या रिफॉर्म ॲक्टनें मिळाली आहे. यासाठीं ठराव आणून हिंदुस्थानांत अमुक गोष्टी करण्यांत याव्या अशी सरकारांत शिफारस व लोकांत जागृति उत्पन्न करणें शक्य आहे.

६ प्रांतिक सरकारच्या कामांत कांहीं भाग लोकमताच्या ताब्यांत आहे. त्याचा शक्य तो फायदा घेऊन पुढें धैर्यानें पाऊल टाकलें पाहिजे. इंग्रज किंवा इंग्रजी लोकमताची पर्वा न करतां दिवाणांनीं हिंदी लोकांच्या कल्याणासाठीं झटलें पाहिजे.

७ हिंदुस्थानसरकारच्या प्रत्येक अधिकाऱ्यानें, निदान हिंदी अधिकाऱ्यानें यावत्शक्य ती सुधारणा करण्यासाठीं मनोभावें झटलें पाहिजे व लोकांनीं शिक्षण, माहिती व वळण या तीन गोष्टी संपादन करण्यांत व करविण्यांत आपली अक्कल व शक्ति वापरली पाहिजे. असें होईल तरच हिंदुस्थानचें कल्याण होणार आहे.

समाप्त.

विषय सूची

अधीरवृत्तीचा खोटा आरोप १२३
अनुकूलता ७२,७३
अफगाण २६९
अमेरिकेंतील उद्योगधंदे ३१३
अश्वशक्ति १५४
असेंब्लीचे अधिकार २९२
अस्पृश्य जाती १६९,१७०
आकांक्षांची वाढ ७४
आचारोच्चाराची विसंगतता ३३, ३४
आपण २२९
आपसांतलें भांडण ९६,९८
आयरिश ३९
आर्थिक ५६
आस्ट्रेलिया १५९
इंग्लंड २६, १०३, १०५, १२७, १८०, ३११
इंडियनांयझेशन ४०
उत्पन्नाच्या बाबी ३०३
उत्पादक मंत्रिमंडळ ५४
उद्योगधंदे सहायक बोर्ड १३१, १३३
उद्योगधंद्याचें महत्त्व १२६,४७,५५
उद्योगीपणाचा गुन्हा ६४,६५
उधळेपणा ९५
उमेदवार व मतदार यांचे गुण २१६
एकी १२५
औद्योगिक कमिशन १२९
अंकानुमान शास्त्र १०९,१२३
कमी पिकाचीं कारणें ११३
करविवेक ३०६
कर्जाचे आंकडे ३०७
कसबे २७३
कानडा २७,२८,१०३,१४१, ३०१,२९१,३१२
कायद्यांत सुधारणा १३३
कुटुंब पद्धति १७६
खर्चाचे आंकडे ३०५
खागी १५६
खातेवार सल्लागार २९४
गणसंस्था १८६
गतानुगतिकत्व नको १६
ग्रामपंचाइतीचीं कामें २२०
” जरूरी २६६
ग्रामसंस्था २७०,२७१
गांवची व्यवस्था २३७
गांवोगांव पेढ्या १३३
गुणविवेक २१७
घटस्फोट १७६
घरगुती धंदे १७७,१२९,१२२

चालूं राज्यपद्धति ४,५
चीन ११२,१२४
जगाचें निरीक्षण ३७,३१६
जगांतील उलाढाली ८३
जपान २७,३७,८०,१०२,१०५,
११२,११५,११९,१२४,
२६८,३१४,३१५,१२७,
१३२,१४३,१४६,१५७
जर्मनी १०५, १४३,३९
जमावाचे प्रकार २०२
जातिधर्म १७८
जानपदसंस्था २३९
जिल्हा २७५
झुटीचे प्रयत्न ५९
जंगलखातें १५४
टिपणांचें महत्त्व ९,१०
ढोंगी पुढारी ९४
तक्षशिला २४६
तज्ज्ञमंडळ ४९
तपश्चर्या १९०
तयारी ८२
तालुका २७४
तुलनात्मक अभ्यास ७६
दागिने १३३
दारिद्र्याचीं कारणें १६७
देवालय २३६
देशापुढील प्रश्न २६
देशी भाषेंतून शिक्षण १५०
द्रव्यदान ३४
द्विदल पद्धति २७७,२८०
धर्मतत्त्वें ८६
धर्ममंदिर ८७
धर्म व राजकारण ८५
धार्मिक पुस्तकें ९८
धार्मिक शिक्षण ९९
धार्मिक हक्क ८७
धंदेवार संघ ६
धंदेशिक्षण १३५
धंदे शाळा १०८
धंद्याचे प्रकार १२७,१२९
ध्येयरूपरेखा १९
नगराचीं खातीं २२६
नगराधिपत्याची व्याख्या २२५
नमुन्याचीं शेतें ११९
नरेंद्र मंडळ २८९
नवे कारभारी २९५
नव्या कारखान्यास मदत १३०
नाणें ३०८
नाण्याचा घोटाळा १४२
नियामितपणा २५
निवडणुकीची जुनी पद्धति १९९
निष्काळजीपणानें स्वराज्यनाश २८
नोकरशाही १२९,१३७,११६
न्यायपद्धति २६९
पतितपरावर्तन १००
परदेशगमनास मोकळीक १७२
परदेशी अडत्ये २९६
परदेशी तज्ज्ञ १३२

परिषद २०२
पाटबंधारे १५३
पाणिनीकालीन संघ २३९
पार्लमेंट व हिंदुस्थान २९७
पुढाऱ्यांचा घडा १४
” चें वर्तन ३०
पुनर्विवाह १७१,१७६
पोटजाती मोडणें १७१
पोष्ट आफीस २५९
पंचांचीं कामें २२१
प्रजोत्पादनशक्ति ७१
प्रतिनिधी १९२, १९७, १९३, १९६,२००,२२२,२२४
प्रतिनिधींची भिक्षा ७८
प्रत्यक्ष सुखानुभव ३१,३२
प्रपा २२७
प्रयत्न व प्रारब्ध १६६
प्रयत्नाचा हेतु ३७
प्रयोगकारास प्रोत्साहन १३४
प्रवासाची सोय १५१,९१
प्रवासी संघ ९३
प्रातिनिधिक संस्था ७९
प्रांतिक सरकारचीं कामें२८१,२८३
प्रांतिक संस्थानें ५३
प्रांतीय सल्ला ४४
फिलिपाइन १०६
फ्रान्स १४३
बँका १४२,१४४,२६२
बेल्जम १४१
बोर्डाच्या इमारती २७२
बोर्डाच्या कामाची पद्धत २७१
बौद्ध विहार संघ २४७
ब्राह्मणद्वारा २२
भावी स्वराज्याचें स्वरूप ५
मजूरसंघ १७२
मध्यवर्ती सरकारचीं खातीं २९१
महायुद्ध ४०,१४१,६१,६४, ८४,९६
माणशीं उत्पन्न २६०
माणशीं कर २६२
मालक व मजूर यांचीं भांडणें ९७
मीठ १५८
मुलींचें शिक्षण ९०
मुस्कटदाबी १८१
मोटारी १६०
मंडप २२८
युनिव्हर्सिटी ११०
योग्य संघ प्रारंभ १५
रक्षक २३२,२३३
रशिया ११५
रस्ते १६०
राजकीय चातुर्वर्ण्य ५५
राजकीय सुधारणा ५६
राजकीय धोरण ६७
राजप्रजा विरोध २९
राजवरालय २३०
राजसत्ताक काल ४,१८०
राजाचीं कामें १९१

राज्याचीं अवश्यक अंगें ३५,३६
राष्ट्रीयत्व २७,२८,३०,४१,४२
राज्यकारभारांतील विसंगतता २९९,३०१
रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूज ६४
रेलवे १५९,२६१,१३०
रोटीबेटी व्यवहार १७९
लग्नाचें वय १७५,१७६
लष्कर २५८
लष्करी खर्च ३०२
लोकमत वळविण्याचा मार्ग ७५,७७
लोकसंख्या १२६
लोकांचा भिडस्तपणा ७८
लोकांची संघटित संस्था ७६
वक्त्याचे नियम २११
वर्तमानपत्रादि साधन महत्त्व ११, १२,१३
वाचनालय १०७
विचार, उच्चार, आचार ७
विचार व्याख्या २३
विचाऱ्यांचें महत्व ८
विभाग कोष्टक २१५
विमा १८२
विमानें १६०
वेदांतील शब्दांचें अर्थवैविध्य २०५,२०६
व्यक्तिस्वातंत्र्य १६५
व्यक्ति व राष्ट्र यांचा मेळ ४५
व्यापारमंडळ १४७
व्यापाराचे आंकडे १३९,१४०
व्यापारी पेढी ५१
शहराचे भाग २३५
शिकार १५८
शिक्षण ४७
शिक्षणाचे आंकडे १०६,२५७
शिक्षणखातें १०७
शिक्षणांतील दोष १०४
शिक्षणसुधारणा ६२,६४
शिक्षणाचं प्रमाण १०३
शिस्तवार प्रयत्न १००
शेतकऱ्याच्या दैन्यावस्थेचीं कारणें १२१
शेतकरी संघ ११८
शेतकऱ्याचा अडचा ११६
शेतकी शाळा ११९
शेतीची सुधारणा ५०,११७,१२०
श्रेणी २४८
श्रेष्ठकनिष्ठ भाव ९२,१६८
सत्र २०४
सदस् २०३,२०७,२०८
सभा २०३,२०७,२०९,२१३
सभांचें काम २०७,२०८
सभापतीचीं कामें २१३,२१४
सभासदत्वाची गोडी १७
सभासदांचा पगार २९३
सभेचा निर्णय २१२
सभेंतील कामाचे नियम २०९,२१०
सफाईक कंपन्या १३३

समाजानिंदावैयर्थ्य ३१
समाजेंद्रिय ३०
समुदायाचीं नांवें २१६
समूह प्रकार २४०,२४३
समूह व्याख्या २४५
समूह कार्यचिंतक २४४
सरकार व जीव यांची तुलना ३०९
सरकार व जनता ५२
सरकारी अनास्था ६६
सरकारी शेती सुधारणा ११५
सर्वजनवास २३१
सर्वधर्मसंस्थांचीं कामें ८९,९०
सवलतीचें धोरण १४९
साधनकाठिण्य ४३
सामाजिक ५६
सामाजिक सुधारणेस विरोधक कारणें १७४
सामान्य धोरण २८,२९
सामुदायिक घटना ३
सावधानता ३८
सार्वजनिक स्वच्छता ८८
साशंक वृत्तीचा हितकारीपणा ११३
सुधारणा उचलण्याचा सोपेपणा २५०
सुधारणा व जुनी शिस्त ९९
सुधारणामंडळ १८,१९,५४
संकुचित दृष्टि ६८
संग्रहाचें प्रमाण ९४
संघ कार्यक्रम दिशा १९,२०
संघपरंपरा ६
संघसामुग्री ६,७
संघाची जरूरी ५७
संघाचे प्रकार १८,२३
संजीवनी विद्या १८५,१९७
संयुक्त संस्थानें २७,२८,३९,४०, १०३,११२,१७६
संस्थानें २९०
स्त्रीपुरुष भेद ७०
स्त्रीस्वातंत्र्य १७३,१७७
स्थानिक स्वराज्याचें उत्पन्न २६५
स्पष्ट ध्येयांची जरूरी १,२
स्मशान २३४
स्वराज्याची उत्सुकता ३२
स्वायत्त स्वराज्याच्या अपात्रतेची नाकबुली २८८
स्वावलंबन १३६,१३७
स्वावलंबनाची जरूरी ८१
हातकाम ४२
हाय कमिशनर २८७
हितसंवर्धक कंपनी ३५
हिंदी गलबतें १५८
हिंदुस्थानचें क्षेत्र व लोकसंख्या २५५,२५६
हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार ३०४
हीन स्थिति ८३
हुडा ९३,१७१

कृ. वि. वझे, इंजिनियर, नाशिक, यांचे ग्रंथ

१ धर्मशिक्षणाचा ओनामा पुस्तक पहिलें			०–१२–०
२ ,, ,,	दुसरें		०–८–०
३ ,, ,,	तिसरें		२–०–०
४ ,, ,,	चवथें		०–०–६
५ ,, ,,	पाचवें	छापत आहे	०–०–६
६ ,, ,,	सहावें	छापणें आहे	
७ ,, ,,	सातवें	छापणें आहे	
८ ,, ,,	आठवें	छापत आहे	१–०–०
९ व्यापारी शिक्षण पुस्तक पहिलें			०–१२–०
१० ,, ,, दुसरें छापणें आहे			
११ विद्यार्थी धर्म		,,	०–४–०
१२ चरका व त्याचा उपयोग		,,	०–३–०
१३ भावी हिंदी स्वराज्य		,,	१–८–०
१४ हिंदी शिल्प शास्त्राचें सार		,,	२–०–०
१५ हिंदी शिल्पशास्त्र भाग पहिला छापत आहे			
१६–१८ ,, ,,	छापणें आहे		
१९ स्वराज्यसंस्था छापत आहे			०–८–०

द. वि. आपटे, बी. ए. (१७३ शनवार पुणें) यांचे ग्रंथ

	रु. आ.
१ श्रीरंगपट्टणावर मोहीम अथवा सवाशें वर्षांपूर्वीचा दक्षिण हिंदुस्थान ,, ,, ,,	१–८
२ चंद्रचूड दप्तर, कलम पहिली [शके १८४२]	३–०
३ इतिहासमंजरी भाग १, अथवा निवडक ऐतिहासिक उतारे	२–०
४ संशोधकाची छोटी जंत्री [१८४४]	०–४
५ ऐतिहासिक दंतकथा व गोष्टी [शके १८४६]	०–८
६ सभाप्रदीप अथवा सभा व संस्था यांचें शास्त्र,	०–८

E/162

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—

१ कृष्णाजी विनायक वझे, इंजिनियर, चिटणीस राष्ट्रीय लोकल बोर्ड मंडळ, नाशिक.

२ वासुदेव लक्ष्मण भावे, बी. ए. चिटणीस, राष्ट्रीय लोकल बोर्ड मंडळ, केसरी ऑफीस, पुणें.

३ रावजी श्रीधर गोंधळेकर, बुकडेपो, बुधवार चौक, पुणें.